ॐ

॥ श्रीमद् सद्गुरवे नमः ॥

॥ ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय ॥

श्री सत्पंथ नवनीत

प्रकाशक

आचार्य श्री जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज

श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

(प्रथमावृत्ति)

(सन १९८८)

ॐ

।। श्रीमद् सद्गुरवे नमः ।।

।। ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय ।।


श्री सत्पंथ नवनीत

प्रकाशक

आचार्य श्री जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज

श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

(प्रथमावृत्ति) (सन् १९८८)



सतगुरु समंदर बेलीया, अने संसार लहेरे पूर ।
गुरुनर बेलीये बेठ-चले, उपर वरसन लागा नूर ॥

realpatidar.com

ॐ

॥ श्रीमद् सद्गुरवे नमः ॥
॥ ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय ॥

श्री सत्पंथ नवनीत

प्रकाशक
आचार्य श्री जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज
श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

(प्रथमावृत्ति) मूल्य रु. ३० (सन १९८८)

संकलक व प्रकाशक
आचार्य श्री जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज
श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर
ता. यावल, जि. जळगांव.

मुद्रक
श्री सी. जी. नंदनवाड
प्रोप्रायटर
शारदा प्रिंटींग प्रेस
पी. बी. नं. १९, स्टेशन रोड
पिंपरी, पुणे १८

ध्यानमूलं गुरोर्मुर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ।।

अगर जलता गुण करे छे, अने चंदन घसी घसी जोय ।
अवगुण केडे गुण करे छे, गोर कहे हुं बलहारी तो५ ।।
अहेरण घणना घाव हीरा सहे, अने तेमाहे गडी जाय ।
साचा मुनिवर जेणे कहिये, जेम नमक पाणीमां घुली जाय ।।


भाई धरम अेवा लोडीये, अने ईमान आवे सार ।
प्रेमे प्रीते ओराधिये, कोईने मुखथी न कहिये मार ।।
जीव छुडावाने हृदयामा जागो, विवेक ईमान तमे पेला मागो ।
सत सबुरी क्षमा शांति जो मागो, ईमाने हरीशुं जीकीरे जागो ।।

—गुरुवाणीना दिव्य संदेशो.



जन्म इ. स. १४४० **महात्मा सद्गुरु श्री इमामशाह महाराज** समाधि इ.स. १५००





॥ ॐ नमो निकलंकी नारायण जनार्दनाय ॥
श्वेत घोडो पलाणसे ने प्रभुजी थासे स्वार । त्रिधारु खड्ग स्वामी हाथे लेसे तो सर्वे सैन्य लावे साथ ॥
कुदरतनो घोडो स्वामी भीडसे मोती पुरावसे बालोबाल । माणक मोति हिरा रतन जडसे चितरीया करसे पलाण ॥
स्वामीजी सोवन भंडांर भरीया तेनी शुं कराये वखाण । सोळा कळानु तेऊ चांदरणु जेना श्री निकलंकी नाम ॥
– आगमवाणी–सद्‌गुरु इमामशाहकृत
कलियुग प्रमाण ४,३२,००० वर्ष
अवतार कार्य ४,३२,००० वर्ष
प्राधान्यभूत वेद - अथर्ववेद
श्री निकलंकी अवतार
श्वेत घोडा
महाबली हनुमान



स म र्प ण



ब्रह्मलीन आचार्य गुरु. पुरुषोत्तम महाराज.

गुरु गम गाइये गोविंदने, जीवनुं जोखम जाय ।
दान दया ने दीनता, अे तरवानो उपाय ॥
घट घट प्रत्ये रचना घणी, भरीया रत्न भंडार ।
हिरा मोतीनी हाटडी, सद्गुरु खोलन हार ॥

श्री गुरुंचे परमस्वरुप विवेक–ज्ञानचक्षु असलेल्या मानवास अमृतासमान आहे. पण मंदभागी लोक ते पाहू शकत नाही; ज्याप्रमाणे अन्ध मनुष्य सूर्य पाहू शकत नाही. वस्तुतः श्री गुरुदेव निष्कल असूनहि सोळा कळांनी युक्त असतात. त्यांच्या प्रत्येक कलेतून अनंत सृष्टीचा विकास होतो. प्रत्यक्ष असो वा अप्रत्यक्ष दृश्य असो वा अदृश्य, हरेक स्वरुप–सौंदर्य त्यांचाच कलाविष्कार असतो. पण ही जाणिव विवेकाच्या म्हणजे ज्ञानचक्षुच्या प्राप्तिशिवाय होत नाही. श्री गुरुंच्या अनुग्रहाने म्हणजे कृपामय शक्तिपातान्च्य जीवात्म्यास ज्ञानचक्षु प्राप्त होतात. ज्ञानचक्षु साधारण स्वरुपच केवळ पाहत नसतात्त तर त्यांच्यात गुरुंचे संपूर्ण ज्ञान सामावलेले असते, म्हणून ते श्री गुरुंचे संपूर्ण स्वरुपदर्शन करीत असतात. गुरु सच्चिदानंद स्वरुप असल्याने ज्ञाननेत्रयुक्त मानव अमरपदाची प्राप्ति करुन घेतात. गुरुला पाहून गुरुला जाणून तसा जीवात्मा स्वयं शिवस्वरुप सच्चिदानंद रुप होऊन जातो. अशी कृपादृष्टी प्राप्त करवून दिलेल्या प. पू. गुरुवर्यांच्या परमपावन करकमली हे सतपंथ नवनीत सादर समर्पण

– जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज.

सहा



प. पू. आचार्य काकाश्री करसनदासजी महाराज

o आशिर्वाद o

श्री सतपंथी मंदीर फैजपूरके आचार्य श्री जगन्नाथ महाराजजीने उनकी प्रादेशिक भाषामें अपने धर्मप्रेमीओंके लिये जो पुस्तक बडे परिश्रमसे तैयार किया है यह "श्री सतपंथ नवनीत" सबमें लोकप्रिय और उपयोगी बने अैसी आंतरिक अभिलाषा। सद्‌गुरु इमामशाहजी महाराज उनको अैसे धर्मप्रवण साहित्य प्रकाशनके लिये शक्तीमान बनाये अैसा मेरा सप्रेम शुभ आशिर्वाद है। शेष भगवत्कृपा।

गादीपति आचार्य काका श्री करसनदासजी सवजीकाका
धर्मपीठ पीराणा जि. अमदाबाद
(गुजराथ राज्य)



प. पू. स्वामी ॐ चन्द्रकिरण सरस्वती

० आशिर्वाद ०

महाराष्ट्र, गुजराथ, सौराष्ट्र, कच्छ और मध्यप्रदेश आदि राज्योंमें व्याप्त सतपंथ संप्रदाय यह सनातन वैदिक धर्मका अेक प्रमुख अंग है। वह भगवान सच्चिदानन्दके निर्गुण निराकार – सगुण साकार स्वरुपकी उपासना करनेवाला और वैदिक कर्मकांडका आचरण करनेवाला विशुध्द, निर्मल, पवित्र संप्रदाय है। उसके प्रवर्तक सद्गुरु इमामशाह अन्य ज्ञातीके होते हुअे भी मानव-कल्याण और आत्महितके लिये उन्होने जो मार्गदर्शन किया है वह अप्रतिम है।

श्री सतपंथी मंदीर, फैजपूर के आचार्य जगन्नाथ महाराजने अपने सांप्रदायीक अनुयायीयोंके लिये 'श्री सतपंथ नवनीत' यह अेक शोधपूर्ण पुस्तकके रुपसे साहित्य प्रकाशन किया है वह जनता जनार्दनकेलिये बोधप्रद और अभ्यासपूर्ण रहेगा।

बडोदा निवासी सौ. सुमनताई भारंबे ने इसके बारेमे बहोत परिश्रम उठाकर अेक प्रबंध तैयार किया। उसके आधार और विचारमंथन पर 'श्री सतपंथ नवनीत' प्रगट हुआ है।

पुस्तकका स्वरुप, प्रयोजन और संयोजन अच्छी तरहसे हुआ है। सद्भक्तोंके कथानक रेखाचित्रोंके साथ बडे सुंदर रीतीसे वर्णित किये गये है। अपार परिश्रम उठाकर जगन्नाथजीने यह जो पुस्तक तैयार किया है वह सभीके लिये अत्यंत उपयुक्त और ज्ञानप्रद होगा। अैसी साहित्य-सेधा उनकेद्वारा हमेशा होती रहे, अैसी भगवान सच्चिदानन्दके पास प्रार्थना, आंतरिक शुभेच्छा और सप्रेम शुभ आशिर्वाद है। इति अलम्

ॐ चन्द्रकिरण सरस्वती.
महर्षि कण्वाश्रम, कानळदा
जि. जळगाव.

o अभिप्राय o

'सतपंथ नवनीत' असा पुस्तक है, जो सतपंथ संप्रदायका अनन्य ग्रंथ साबित हो सकता है। जीवन वृत्तान्त एवं शोधपूर्ण माहिती सभर दृष्टिकोणको लक्षमे रखते हुअे संपादक श्री आचार्य जगन्नाथ महाराजजीने रुचिकर शैलिमे ज्ञानसंपदा प्रस्तुत की है।

अन्य धर्म ग्रंथो और मान्यवर लेखकोंकी अनुपम कृतियोंका समन्वय यह ग्रंथकी उत्तमता है।

श्री जगन्नाथ महाराजजीने अपने हाथसे बनाये हुअे प्रसंगोचित रेखांकन और वार्तांचित्र पुस्तककी शोभारुप बन गये है।

धर्मोत्सुक अनुयायीओंके लिये यह ग्रंथ बहुतही उपयोगी होगा।

– श्री नाथुभाई अेस्. जादव
मानद्‌मंत्री,
सतपंथ सेवा मंडल.

o अभिप्राय o

सद्‌गुरु इमामशाह महाराजे सतपंथना दिग्दर्शन कराव्या काळना वहन साथे अेमा परिवर्तन थयु. अे साहित्यना क्षेत्रमा संशोधन अने शुध्दिकरणनी जरुरत पडी, पू. श्री. जगन्नाथ महाराजजी ये उंडा जळमां डुबकी मारी मुक्ताफळ प्राप्त कर्या. अने अे बहुमुल्य मौक्तिकोनी माळा गुंथी धर्म प्रेमीओना कर कमळमां 'सतपंथ नवनीत' नामना महाग्रंथनी रजुआत करी.

आ समये अे संतपुरुषना महिमानु शब्दोथी वर्णन थई शके नही, अेमना महद् उपकार बदल आपणे सहु ऋणी छीये. अंतमा अे महापुरुषना चरणमा वन्दना करता विरमीये –

– माणेकलाल शंकरलाल राणा.
सुरत.

० अभिप्राय ०

प. पू. जगन्नाथ महाराज यांनी 'श्री सतपंथ नवनीत' च्या हस्तलिखीतातील चुका दुरुस्त करण्यासाठी मला वाचावयास दिले. संतवाङ्मय, अध्यात्मशास्त्र, तत्त्वज्ञान ह्या विषयी मला गोडी असल्यामुळे ही गुरु-आज्ञा मी आनंदाने स्विकारली मात्र त्यांतील चुका पूर्णपणे दुरुस्त करण्याचे काम माझ्याकडून बरोबर झाले असेल असे मला वाटत नाही, कारण वाचनाच्या भरात मी सर्रास वाचतच सुटलो, चुका शोधण्याचे भान राहिलेच नाही तशा सहज लक्षात आलेल्या चुका मी दुरुस्त केल्या आहेतच.

प. पू. जगन्नाथ महाराज यांनी सतपंथ धर्म साहित्याचा अभ्यास बारकाईने केलेला आहे. शिवाय गीता, उपनिषद, भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध इ. ग्रंथांचाही त्यांनी अभ्यास केलेला आहे. आज ह्या पंथातील ते अधिकारी पुरुष व सिध्दहस्त लेखक आहेत.

प्रस्तुत पुस्तकात सुरुवातीला सतपंथ संप्रदायाचा उदय कसा झाला ते उत्तम रीतीने समजावून सांगितले आहे. नंतर पुढील प्रकरणात सत्पंथाचे ज्ञान साहित्य, कर्मकांड, नीतिशतक यांची माहिती दिलेली आहे ती फारच उद्बोधक आहे. 'सतपंथाचे तत्वज्ञान' ह्यात वेदान्त आणि सांख्यदर्शन ह्याविषयी सतपंथ साहित्यातील विचार सोप्या भाषेत दिलेला आहे.

उत्तरार्धात सत्पंथातील सद्भक्तांची जीवनरेषा दिलेली आहे सद्भक्तांची चरित्रे वाचतांना वेळेचे भान रहात नाही इतक्या उत्तमरीतीने लिहीलेली आहेत.

माझ्यासारख्या नवशिक्या माणसाने अभिप्राय तो काय लिहायचा? लिहू म्हटल्याने लिहीता येते थोडेच. परंतु प. पू. जगन्नाथ महाराजांचा शब्द तरी कसा मोडावा? म्हणून मनाजोगते लिहिता न आले तरी येईल तसे लिहावे असा विचार करून अभिप्राय लिहीण्यास सुरुवात केली, प. पू. जगन्नाथ महाराज यांनी हा अभिप्राय प्रसिध्द करण्यात जी सहृदयता दाखविली त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

वाचनोत्सुक वाचक हा अभिप्राय वाचण्याच्या फंदात पडणार नाहीतच. जे वाचतील त्यांचेही आभार मानतो. जे अर्ध्यावर सोडतील अगर मुळातच वाचणार नाहीत त्यांचेहि आभार मानतो–त्यांना ते पोचणार नाहीत ही गोष्ट निराळी.

ह्या पुस्तकामुळे सत्पंथ साहित्यात मोलाची भर पडली असून अशा प्रकारचे सत्पंथ साहित्य पुढेही प्रकाशित करण्यासाठी प. पू. जगन्नाथ महाराज यांना ईश्वर दीर्घायुरारोग्य देवो ही प्रभुचरणी प्रार्थना करुन हा लांबलेला अभिप्राय पूर्ण करतो.

फैजपूर.

व्ही. आर्. महाजन
बी. एस्. सी बी. एड.

० प्रकाशकाचे दोन शब्द ०

प्रातर्वन्दनीय परमपूज्य सद्‌गुरु इमामशाह महाराजांच्या असीम कृपेने हे श्री सतपंथ ज्ञान प्रकाशनांचे ८ वे पुष्प परम प्रेमळ वाचकांच्या हाती देतांना मनाला खूप आनंद होतो. आतापर्यंत सतपंथाचे जे साहित्य प्रकाशित झाले त्याहून हे पुष्प कांही आगळयावेगळया स्वरुपाचे वाचकांना वाटेल, कारण या पुस्तकाचे लिखाण करतांना सत्पंथाच्या प्राथमिक स्वरुपाचा अभ्यास करण्याचेच ध्येय फक्त डोळयासमोर ठेवलेले आहे.

सतपंथाचे ज्ञान साहित्य अगाध अगम्य अशा ज्ञानभांडाराने भरलेले आहे पण हे एवढे संक्षिप्त आणि समजण्यास अत्यंत क्लिष्ट आहे कीं सर्वसामान्य माणूस ते वरवर चाळूनच गप्प बसण्याचा प्रयत्न करतो. एक तर ते लिखाण ५०० ते ६०० वर्षापूर्वीचे हस्तलिखीत आणि ते ही लेखनाची कला धड अवगत नसणाऱ्या अशा अल्पशिक्षीत परंतु अत्यंत मेहनती, चिकाटीबाज व परमश्रध्दाळू भाविक लोकांनी लिहिलेले आहे. त्यात परमश्रध्देचा, सामान्य व अंधश्रध्देचा सुध्दा समावेश असल्याकारणाने सद्‌गुरु मुखातून श्रवण करुन, स्मरणठेवून स्वतःच्या बुध्दीने व स्मरण शक्तीने उतरवून ठेवलेले असल्याने प्रत्येक उतारा करणाऱ्या लेखकाचे लिखाण बहुशः जरी सारखे दिसले तरी आंतरिक उल्लेख रुपांतरीत झालेले, थोडयाफार अंशाने फेरबदल झालेले आढळून येते, आणि एकापासून दुसऱ्याने तिसऱ्याने अशा परंपरेने ते उतारे होत आल्याने त्यांच्यात बऱ्याच अंशी क्लिष्टपणा आढळून येतो. बरेच अपभ्रंश झालेले शब्द वाक्ये, श्लोक लिहीले गेलेले त्यात आढळतात.

बरेच साहित्य काव्यमय ओवीबध्द असल्याने संपूर्ण संशोधनाच्या अभावी बऱ्याच ठिकाणी अर्थबोध होऊ शकत नाही. कित्त्येक ठिकाणी अरबी-हिंदी भाषेच्या प्रभावाने अरबी शब्द घुसडलेले आढळून येतात. या साऱ्यांचा सांगोपांग अभ्यास करुन निर्विवाद भाषेत सारे साहित्य रुपांतरीत करुन त्याचा अभ्यास करणे फार जिकीरीचे आहे, पण तसे केल्याशिवाय हे ज्ञान सामान्य वाचकापर्यंत जाऊच शकणार नाही.

सतपंथ हा खूप मोठा सर्वत्र व्यापलेला एक पंथ वा मार्ग आहे. लौकिक दृष्टीने त्याचे बरेच भेद-शाखा उपशाखा आहेत. त्या सर्वांचा सखोल अभ्यास अद्याप पावेतो कोणीही करु शकला नाही. कारण, बऱ्याच ठिकाणी तो अंधानुकरणा प्रमाणे परंपरागत गुप्त रीतीने पाळला जातो. त्याच्या उघड चालीरीती रीवाज वेगवेगळ्या पाहण्यात वा ऐकण्यात येतात. मात्र साऱ्यांचे ध्येय शेवटी जीवनाच्या सार्थकतेचेच असते, त्यात कोणतेही दुमत नाही. पण, अभ्यासकाला बऱ्याच अंशी सांगोपांग अभ्यास करता येत नाही कारण त्यांचे बहुतेक सर्वच साहित्य हस्तलिखित आणि पंचभाषिक आहे.

सतपंथात साधारणतः फकिरीमार्ग, सुफीमार्ग, नूरशाही, जलालशाही, आगाखानी खोजा, सातीया, आठीया, पाचीया, नवसारीशाही, बहादूरपूरशाही, अशा प्रकारच्या वेगवेगळ्या शाखा पडतात. पण खुद्द इमामशाहांनी स्थापन केलेली सतपंथाची निर्विवाद शाखा पीराणा सतपंथ या नावाने प्रसिध्द आहे. ही एकमेव शाखा गुरु–शिष्य परंपरेने इमामशाहांच्या हयाती पासून, जवळ जवळ ५०० वर्षापासून चालू आहे. या व्यतिरिक्त सर्वशाखा वंश परंपरागत चालू आहेत आणि आजही त्यांचे अनुयायी सर्वत्र गुप्तरीतीने तो पंथ पाळत आहेत.

या विषयी दीर्घ संशोधनात्मक अभ्यास करुन प्रबंध लिहिण्याचे मौलिक कार्य बडोदा येथील निवासी सौ. सुमनताई भारंबे यांनी केलेले आहे. अपार परिश्रम करुन सर्व साहित्य जमा करुन त्यांनी आपला बराच वेळ व पैसा या संशोधन कार्यात ओतून अभ्यास केला. त्यांच्या त्या संशोधनात्मक प्रबंधाला अनुसरुनच सदर पुस्तकाचे पहिल्या प्रकरणाचे लिखाण झालेले आहे. सौ. सुमनताईंनी या पुस्तकाच्या बाबतीत बरीचशी माहिती पुरविली व वेळोवेळी वैचारिक सुचना सल्ला दिली. प्रकाशक या नात्याने त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

या पुस्तकातील ७ व्या प्रकरणात सतपंथातील सद्‌भक्तांच्या जीवनरेखा म्हणून जो भाग उद्‌धृत केलेला आहे तो संक्षिप्त चरित्रात्मक भाग सुरत येथील सिध्दहस्त लेखक श्री. माणेकलाल शंकरलाल राणा यांनी लिहून प्रसिध्द केलेल्या 'संत नायाजी,' 'संत भाभाराम महाराज,' 'संत साध्वी कवयित्री कीकीबाई,' 'संत सद्‌गुरु इमामशाह महाराज' यांच्या काव्यमय चरित्र पुस्तकांतून घेतलेला आहे. श्री. माणेकलाल यांनी गुजराथीतून ही काव्यचरित्रे प्रसिध्द केलेली आहेत. ती फारच मनोरम व अद्‌भूत प्रेममय रोमांचकारी असल्याने त्याचा मराठीतून अनुवाद करुन सदर पुस्तकात ग्रथीत केलेली आहेत. लेखक माणेकलाल यांनी सद्‌भाव प्रेमाने सदर पुस्तकात हा भाग उद्‌धृत करण्यास सहमति दर्शविली म्हणून मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

या पुस्तकात ७ व्या प्रकरणात सद्‌भक्तांची जीवनरेखा म्हणून जो भाग प्रसिध्द झालेला आहे. त्या प्रसंगाना अनुसरुन जी रेखाचित्रे रेखाटलेली आहेत त्याबाबतीत फैजपूर येथील हायस्कूल मधिल शिक्षक श्री. ए. पी. भारंबे सर यानी आपला मौलिक वेळ व लक्ष्य घालून साहाय्य केले. तसेच हस्तलिखीत साहित्य तपासून देण्याचे काम फैजपूर येथील श्री. व्ही. आर. महाजन सर यांनी करुन दिले याबद्दल या दोघांचे मनःपूर्वक आभार मानतो.

श्री. सतपंथ नवनीतचे लिखाण हस्तलिखीत लिहून तयार झाले पण त्यास प्रिंटींगचा प्रत्यक्ष साज चढविण्याकरिता जेव्हां विचार झाला तेव्हाची परिस्थिती पाहता वाटायला लागले कीं आपला हा प्रयत्न सफल होण्यासारखा नाही कारण, एवढ्या पुस्तकाला प्रींट करुन प्रसिध्द करण्यासाठी लागणारा पैसा जमवायचा कसा? शे पाचशे हजाराचे हे काम नव्हते. महागाई भयंकर वाढलेली. संस्थेचा कारभार तर आर्थिक तंगीत चाललेला. पुरेशी रक्कम हाती नाही. अशा परिस्थितीत हे काम व्हावे कसे अशा विवंचनेत असतांनाच एक आशेचा किरण उगवला. श्रीमति बेबीताई रेवा भारंबे हिने आपल्या जीवनाच्या अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतूनही रु. पाच हजाराची देणगी या पुस्तकास देऊन प्रकाशकाला चालना दिली. राजोरा येथील श्री सतपंथी मंदीराच्या उद्‌घाटन समयी तेथील अनुयायांनी सदर पुस्तकास रु. ५०१ ची देणगी दिली. तसेच चिनावल येथील भाविक भक्त श्री. पुंडलिक महाजन यांनी रु. १००१ व श्री. गोविंदा महाजन यांनी रु. ५०१ ची देणगी देवून तसेच बऱ्याच नामी अनामी भाविक भक्तांनीं आंतरिक सद्‌भावना, प्रेम व सदिच्छा व्यक्त करून सदर पुस्तकाच्या प्रकाशनाला चालना दिलेली आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

सदर पुस्तकाचे प्रुफरिडींगचे काम व अन्य सर्व देखरेखीच्या कामाची जबाबदारी राजोरा येथील श्री. पंडित तुकाराम पाटील व सौ. निलीमा पाटील यांनी सांभाळली. पुण्यासारख्या शहरात नोकरी व्यवसाय सांभाळून सदर जिकीरीचे काम करणे अत्यंत कठिण असते पण त्यातल्या त्यात वेळ काढून बिना मोबदल्याने अविश्रांत मेहनतीने हे काम त्यांनी केले व स्वतः लक्ष्य घालून प्रिंटींगचे काम पूर्ण करवून घेतले म्हणून त्यांचेसुध्दा मनःपूर्वक आभार.

वस्तूतः वरीलपैकी कोणीही व्यक्ति आभार प्रदर्शनास तयार नाही कारण प्रत्येकाला असे वाटते की हे काम आपलेच आहे व आपण ते केवळ कर्तव्य म्हणून पार पाडायला पाहिजे त्यांत आभारी होणे योग्य नाही. पण केवळ रिती रिवाज म्हणून हा खटाटोप केलेला आहे

सर्वात महत्वाचे आभार पुणे पिंपरी येथील "शारदा प्रिंटींग प्रेस" चे मालक व चालक श्री. नंदनवाड व त्यांच्या कुटूंबाचे मानायला हवे. त्यांच्या व कामगारांच्या अविश्रांत परिश्रमाने अत्यंत अल्प मुदतीत त्यांनी सदर पुस्तक प्रिंट करुन तयार करुन दिले. पुस्तकाचे छपाईचे काम अत्यंत सुबक सफाईदार करण्याचा निर्धार त्यांनी आधीच केलेला होता. त्याप्रमाणे काम चांगल्या रीतीने करुन दिलेले आहे त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

पीराणा सतपंथ धर्मपीठाधिपति आचार्य प. पू. गुरुवर्य करसनजी महाराज यांनी या पुस्तकाकरिता आपला मौलिक आशिर्वाद महात्मा सद्‌गुरु इमामशाह महाराजांच्या वतीने लिहून पाठविला हे खरोखर आम्ही आमचे थोर भाग्यच समजतो. आतापर्यंत आम्ही दृढश्रध्दा बाळगून सद्‌गुरु महाराजांची आपल्या या धर्म साहित्य प्रकाशनास मूक संमति आहे असे समजत होतो, पण आता प्रत्यक्ष सद्‌गुरु महाराजांची आपल्या स्वयंसिध्द प्रतिनिधींच्या करवी आम्हाला हा कृपाशिर्वाद पाठवून आमच्या या अल्पशा सेवेचा गौरव केला याहून आणखी कोणते थोर भाग्य

असणार ! सद्गुरु महाराजांचे व त्यांच्या प्रतिनिधी काकासाहेब करसन महाराजांचे मी कोणत्या शब्दात आभार मानावे ! केवळ बोलून वा लिहून आभार मानण्याच्या पलिकडची ही स्थिती असल्याने या बाबतीत केवळ औपचारीक आभार न मानता त्यांच्या ऋणात मी कायमचेच राहावे असे वाटते.

तसेच जळगांव जिल्हयातील कानळदा येथील महर्षि कण्वाश्रमाचे महान विद्वान वेदान्ताचार्य प. पू. स्वामी ॐ चन्द्रकिरण सरस्वती महाराजांनी या आमच्या अल्पशा सेवा कार्याला गौरवून आपला कृपाशिर्वाद पाठविला हे सुध्दा परम भाग्यच समजतो. त्यांच्याही ऋणातून मला मुक्त होता येणार नाही.

बडोदानिवासी आमचे परमस्नेही गुरुबंधु, सत्पंथाचे अध्वर्यु व सतपंथ सेवा मंडळाचे प्रमुखकार्यकर्ते मानद् मंत्री श्री. नाथुभाई अेस्. जादव यांनी सदर पुस्तकास अभिप्राय कळवितांना या पुस्तकाचे गुजराथीतून अनुवाद करण्याची जबाबदारी स्विकारुन गुजराथीतून प्रसिध्द करण्याची गौरवास्पद कामगिरी करण्याचे व्यक्त केले हे जाणून मनाला खूप आनंद होतो. त्यांचे सुध्दा मी मन:पूर्वक आभार मानतो.

शेवटी आमचा प्रेमळ चाहक वाचकवर्ग यांचेसुध्दा मन:पूर्वक आभार मानावे असे वाटते. कार्य ज्यांच्यासाठी करायचे आहे त्यांनी आपुलकी प्रेमभाव व सदिच्छा व्यक्त केली म्हणूनच हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा झाली. यात माझे स्वत:चे असे काहीही नाही. सतपंथ ज्ञान साहित्याचा माल सद्गुरु महाराजांच्या ज्ञानग्रंथ भांडारातून काढून त्यांच्या चाहत्या श्रध्दाळू वाचकवर्गाला व अनुयायांना व्यवस्थित रीतीने पुरविण्याचे हमालीचे काम केलेले आहे, त्याच्या मोबदल्याची अपेक्षा नाही. केवळ तो माल वाचकवर्गाला अथवा अनुयायीवर्गाला कितपत पचविता येतो हे संबंधितांनीच ठरवायचे आहे. प्रत्येकापर्यंत हा माल पोहोचल्याने होणारे आत्मिकसमाधान हीच त्याची मजूरी, सधन्यवाद.

विनीत,
प्र का श क

श्री जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज.
श्री सतपंथी मंदीर, फैजपूर.

★ — ★ — ★

अनुक्रमणिका

o चित्रसुची o

* * *

॥ ॐ श्रीसद्‌गुरवे नमः ॥

॥ ॐ नमो निकलंकी नारायण जनार्दनम् ॥

" श्री सत्पंथ नवनीत "

सद्‌गुरु श्री इमामशाह प्रणित सत्पंथाचे मुख्य स्वरुप दर्शन.

प्रकरण १ ले

" सत्पंथ संप्रदायाचा उदय. "

हिंदुधर्म हा वेदकाळापासून मानला जातो. वेद हे अनादि व अपौरुषेय असल्यामुळे हिंदुधर्म अनादि या महत्तमपदास पात्रला आहे. आज जगात प्रचलित असलेल्या बहुतेक सर्वच धर्मांचा काल हा वेदकालानंतरच ठरलेला आहे. म्हणून हिंदुधर्माइतका जुना धर्म पृथ्वीच्या पाठीवर दुसरा नाही. हिंदुधर्म वेदप्रणित आहे आणि वेद हे अपौरुषेय असल्याने हिंदुधर्माचा प्रणेता कोणीही विशिष्ट व्यक्ति नाही. प्राचिन मान्यवर ऋषिमुनींच्या आध्यात्मिक अनुभूतीतून त्यांना स्फुरलेल्या आंतरिक प्रेरणेने मानवी जीवन सुखी व समृध्द करण्याकरिता लागणाऱ्या साधनांची शिकवण त्यांनी मानवसमाजास शिकविली; त्यासर्वास धर्माचे स्वरुप प्राप्त झाले. वेद प्रणित मार्गास वैदिक धर्म, सनातन धर्म, वेदांत, श्रुतिस्मृत्यूक्त धर्म वा आर्यधर्म म्हणू लागले. त्या सनातन आर्य संस्कृतिच्या मूलभूत तत्त्वांचे अनुकरण प्रत्यक्ष वा रुपांतराने पुष्कळ झालेले आहे व त्यामुळे या धर्माला विविधता आलेली आहे.

एखाद्या राजमंदिरास अनेक द्वारे असावीत किंवा एखाद्या भव्य वृक्षास अनेक शाखा उपशाखा असाव्यात त्याप्रमाणे हिंदुधर्मासारख्या हिंदुस्थानातील प्रचंड धर्मात अनेक धर्मपंथ निर्माण झालेत. कोणताही धर्म घेतला तरी त्यांत भिन्न भिन्न असे धर्मपंथ निर्माण व्हावयाचेच. कारण, साधु संत महात्मे तपस्वी हे आत्मोन्नतिच्या बलावर केव्हाच ईश्वरीपदाला पोहोचलेले असतात, पण रुळलेल्या धर्म मार्गावरून संसाराचा अनुभव घेत घेत मंदगतीला ते केव्हांच अनुसरत न्हाहीत. अशा साधु संतांच्या ठायी सामान्य जनाला जे अनेक चमत्कार पाहायला सापडतात त्या चमत्कारांनी त्यांची त्यांच्याठायी भक्ति बसत जाते व ते त्या महात्म्याला आणि त्याने दाखविलेल्या परमार्थ मार्गाला अनुसरतात. शिवाय ज्या सुलभ मार्गाने आपले जीवित साफल्य झाले त्या मार्गाने इतरांनीही जाऊन आत्मकल्याण करावे अशी त्यांची सदिच्छा असते. त्याच उद्देश्याने नव्या नव्या धर्म पंथांचा उदय होत असतो.

जगात अनेक महापुरूष होऊन गेलेत. प्रत्येकाने आपले जीवन एका विशिष्ठ ध्येयाला अर्पण केलेले असते. साधुसंतांनी पण आपले जीवन हे धार्मिक कार्यासाठी अर्पण केलेले असते. आपल्या जीवनात अनेक कष्टमय साधना करून ते आपली आत्मोन्नति करून घेतात. नंतर चैतन्यमय ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झाल्यावर त्यांना आपले जीवन धन्य झाल्यासारखे वाटते. आपल्याला प्राप्त झालेल्या या अमुल्य शांतिचा लाभ दुसऱ्या लोकांनाही मिळावा म्हणून ते उपदेश देऊ लागतात अथवा लोक त्यांच्याकडे आपोआप आकर्षिले जातात. त्यांच्या निर्मळ आचार विचारांचा प्रभाव लोकावर पडून लोक त्यांची भक्ति करू लागतात. सर्व साधारण माणसे चमत्कारी शक्तीने प्रभावित होतात व त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने जाऊन आपल्या जीवनाचे कल्याण करून घेतात, अशा वेगवेगळ्या संतांच्या भक्त मेळाव्यापासून वेगवेगळे पंथ निर्माण होतात.

भारतात जे अनेक संप्रदाय निर्माण झाले त्याला वर्णाश्रम धर्मव्यवस्था विस्कळित होणे हे एक कारण आहे. कालप्रवाहाबरोबर धर्माची पुरातन घडी विस्कटली जाते. मानवी आचार धर्मातले प्रमाद महात्मा पुरुष काढून त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी प्रयत्न करतात त्यांच्या या प्रयत्नासच पुढे संप्रदायाचे स्वरुप येते. म्हणून सर्व संप्रदाय हे एकाच झाडाला फुटलेल्या शाखा प्रशाखा आहेत व झाडाचे मूळ सनातन वैदिक धर्मच होय. परंतु प्रत्येक मनुष्य स्वतःचे वेगळे अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो आणि या भावातच त्याचा विकास होतो. ज्याप्रमाणे फुले फळे येतात ती फांद्या उपफांद्यानाच. मूळ फक्त फुलाफळांचे पोषण करण्याचे काम करते. त्याप्रमाणे धर्म प्रचार हा या संप्रदाय स्वरुपानेच पसरत असतो. परंतु जर एखाद्या संप्रदायाने मूळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला तर त्यात ह्याचा स्वतःचाच नाश होतो.

आज जगात बरेच धर्मपंथ संप्रदाय प्रचलित आहेत. सनातन धर्म, जैन, बौध्द, इस्लाम, ख्रिश्चन, कॅथालिक, यहुदी वगैरे अनेकानेक धर्म; वैष्णव, शैव, शाक्त्य, ब्राह्म्य, वगैरे अनेक देवतांच्या उपासनेवरून ते ते पंथ निर्माण झाले. त्या प्रत्येक पंथामधून आणखी अनेकानेक उपपंथ वारकरी, नाथ, महानुभाव, स्वामीनारायण, प्रणामी असे निर्माण होऊन प्रत्येकाने वेगवेगळ्या साधनांनी ईश्वरोपासना करण्याचे ध्येय ठरवून साधना केल्या. तेच हे वेगवेगळ्या संप्रदाय रुपाने जन्माला आले. 'सत्पंथ' हा त्यातलाच एक विशेषत्वाने वेगळे स्वरुप धारण केलेला संप्रदाय आहे.

भागवत धर्मातील वैष्णव मार्गाची उपासना करावयास शिकविणारा हा संप्रदाय आहे. पण त्यास वेगळे स्वरूप (वैशिष्ठ्य) कां प्राप्त झाले हेच आपणास पहायचे आहे.

सत्पंथ संप्रदायाचे प्रवर्तक सत्पंथाच्या निर्मितीविषयी माहिती देतांना सांगतात कीं हा सत्पंथ आजकालचा किंवा शे पाचशे हजार वर्षांचा नसून अनादि काळापासूनचा आहे. मी नविन काहीही सांगितले नसून मूळ सनातन युगधर्माला उजाळा दिलेला आहे.

All religions claim to be in existence since infinity. But thats not true.

आद निरंजन नारायण अवतरीया, तेनु थानक छे अेरा खंडमाहे ।
सद्गुरुजीये सोही देखाडिया, ते सेवीया नवे खंड माहे ॥
ते नूर माहेथी नूर प्रगटचा, तेनो वासो छे नुरज माहे ।
तेमणे आ सतपंथ पेदा किधा, अलेख निरंजन स्वामी राये ॥

(ऋषिवर चेतामणी)

सतपंथ जुगा जुगे आवीया, की भाई युगायुगे आवीया ।
तो सत् मार्ग दिखलाया, लोभीरे तमे मायामो रहचो ॥

(गुरुवाणी)

तीस पहिले एक ज्योत जो होती, तीस आगळ चंद्र सूर्य नही होता ।
तीस पहिले सतपंथ निपाया, आप शरीर सतगुरू किया ॥

(गुरुवाणी)

चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्र, तारे, पृथ्वी नव्हती तेव्हा एक अविनाशी सत्–चित्–आनंद स्वरुप आपल्याच स्वरुप ध्यानात मग्न अनंत तेजोराशी चैतन्यरूप प्रकाशाने विलसत होते. त्यानेच संकल्पमात्राने अनादि प्रकृति, सत्त्वरजतमात्मक मायाशक्ति निर्माण करून तिच्यापासून पंचमहाभूतांची, पंचप्राण, पंचज्ञानेन्द्रिये, पंचकर्मेन्द्रिये, मन, बुध्दि, चित्त अहंकार महत्तत्वादि प्रकृति निर्माण झाली. त्याच प्रकृतिपासून समष्टि म्हणजे सृष्टि व व्यष्टि म्हणजे प्राणिमात्रांचा पिंड तयार झाला. अशा प्रकारे या साऱ्या चित् जड वस्तूमात्रांची उत्पत्ति एकमेव सत्चित् अविनाशी ब्रह्मापासून झालेली आहे. उपनिषदात जीव आणि ब्रह्माचा संबंध असा दाखविला आहे की,–

यथा सुदीप्तात् पावकाद् विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः ।
तथाक्षराद् विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापि यन्ति.॥

मुंडक. २।१।१

सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः
...... ऐतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि ॥

छान्दोग्य. ६।८।४

ज्या प्रमाणे जळणाऱ्या अग्नितून त्याच्या समान रूपाच्या हजारो ठिणग्या निघतात, त्या प्रमाणे हे सोम्य ! अविनाशी ब्रह्मापासून नानाप्रकारचे भाव (जीव) निर्माण होतात आणि त्यातच ते परत लीन होतात. हे सोम्य ! ही सर्व प्रजा सत् रूप कारणापासून उत्पन्न झाली. सत् मध्येच निवास करते आणि अंती सत् मध्येच प्रतिष्ठित होते. हे सर्व ब्रह्मरूप आहे. ते ब्रह्मच सत्य आहे. ते ब्रह्म आत्माच आहे व ते ब्रह्म तूं ही आहेस.

सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ।।

छांदोग्य. ६।२।१

हे सोम्य ! आरंभी हे एकमात्र अद्वितीय सत्च होते. सर्वांचे मूळकारण सत्च आहे. तेच परम आश्रय आणि अधिष्ठान आहे. ज्या प्रमाणे अत्यंत सूक्ष्म वटबीज फार मोठया विशाल वटवृक्षाचा आधार आहे त्याप्रमाणे सूक्ष्म सत् आत्मा या समस्त स्थूल जगताचा आधार आहे. अशा त्या अविनाशी सूक्ष्म महान् सत्ला जाणण्याचा जो मार्ग त्यासच सद्गुरू इमामशाहांनी सत्पंथ हे नांव दिलेले आहे.

सतपंथ-धर्म सो कहिये, जेणे ओळख्या सतगुरु नुर रे ।
परिब्रह्मा विष्णुने ओळख्या, ते तो अमर हुवा ततखेवरे ।।

— गुरुवाणी

परब्रह्म परमात्म्याच्या स्वरूपाची जाणिव करून घेऊन जो त्याच्या ध्यान चिंतनाने सद्रूप — तत्रूप होऊन जातो तोच मुक्त होतो.

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भाव भावितः ।।

भगवद्गीता ८।६

जो मनुष्य अंतःकाळी ज्या ज्या भावनेचे स्मरण करून देहाचा त्याग करतो, त्या त्या भावास तो प्राप्त होतो म्हणून

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।।

भगवद्गीता ८।५

जो मनुष्य अंतःकाळी माझेच म्हणजे सत् रूप परमात्म्याचेच चिंतन करीत हा देह सोडून जातो, तो माझ्या — परमात्म्याच्या स्वरूपास प्राप्त होतो. यात कोणताही संशय नाही.

यावरून अन्यान्य देवी देवतांच्या उपासनेने सत्साधक जन्म मरणाच्या फेऱ्यास कारणीभूत होतो म्हणून सत्साधकाने केवळ एकमेव सत्चीच उपासना केल्यास तो सत्पदास — अविनाशी अशा मोक्षपदास प्राप्त होईल. पूर्ण ब्रह्म परमेश्वराची निष्काम भावनेने उपासना करणारे मुमुक्षुजन सुद्धा हेच मोक्षधाम गाठतात. योगवाणी शास्त्रात योगी लोकांना उपदेश करतांना सद्गुरू इमामशाह महाराजांनी त्यांना सांगितलेले आहे की,

आद उनाद जो सतगुरु सरजा, त्रण मुरत तारे सरजी ।
त्रण मुरत अेक ज्योतसु खेले, तेणे आद उनाद लेजो जोई ।।
रे जोगेश्वरो ! तो जोगना मर्म कोयेना जाणे ।। १
सतपंथमध्ये सतगुरु आवीया, तो सत्‌ने संतोष बेहु लावीया ।
धर्म प्रकाशिने पाप प्रजाळीया, तो सृष्टीना गुरु केवाया ।। २
सतपंथ पालीने पावल पीधा, ते चारे खाणीथी छुटा ।
दुनिया लोक तो दुनियासु लागा, ते सतपंथ माहेथी त्रुटा ।। ३
रखेशर ते जे रतनने पछाणे, अने कंचन कामनीने तजे ।
सतपंथ माहे ध्यान धरीने, अलेख पुरूषने भजे ।। ४
विष्णुने ओळखीने पात्रने पुजे, तो दुनियानी तजे आशा ।
आद पुरूषनु ध्यानज राखे । जेणे होये अमरापुरी वासा ।। ५
आद पुरूष सतपंथमा आव्या । ये योगी सो रखेशर पाया ।
कहेत इमामशाह। अमघेर आद छे योगी, भेटे अमर थाये काया ।। ६

पुराणपुरुष परमात्म्याची प्राप्ति ज्या साधनांनी होऊ शकते त्यापैकी प्रमुख साधन म्हणजे आत्मशुध्दि होय, आत्मशुध्दि नसलेल्या साधकास त्याची प्राप्ति होऊ शकत नाही.

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।
अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ।।

मुंडक. ३।१।५

सर्वांच्या शरीरात म्ह. हृदयात विराजमान असलेल्या परमविशुध्द प्रकाशमय ज्ञानस्वरूप परब्रह्म परमात्म्यास सर्व प्रकारच्या दोषरहित प्रयत्नशिल सत्साधकच जाणू शकतो. सदैव सत्यभाषण, तपश्चर्या, संयम स्वार्थत्याग करणारा व ब्रह्मचर्य पालन करणारा यथार्थ ज्ञानाद्वारेच त्यास प्राप्त करूं शकतो. या सद्‌गुणाविरहीत जो भोगात आसक्त आहे, त्यांच्या प्राप्तिकरिता जो मिथ्या भाषण करतो, आसक्तिवश होऊन ब्रह्मचर्याचा त्याग करतो तो स्वार्थपरायण अविवेकी मनुष्य त्या परमात्म्याचा अनुभव करूं शकत नाही कारण तो त्यास प्राप्त करण्याची इच्छाच करीत नाही.

सत्यमेव जयति नानृतं, सत्येन पन्था विततो देवयानः ।
येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ।।

मुंडक. ३।१।६

सत्यच विजयी होते, असत्य नव्हे. परमात्मा सत्यस्वरूप आहे. म्हणून त्याच्या प्राप्तिसाठी मनुष्याने सत्याचीच कास धरावी. बुध्दिमान मनुष्य सत्यभाषण आणि सदाचारालाच सर्वश्रेष्ठ मानतो, असत्याला नाही. कारण की, ज्यांची भोगवासना नष्ट झालेली आहे असे पूर्णकाम वितराग ऋषिमुनिगण ज्या मार्गाचे आचरण करून त्या परम निधान पूर्णब्रह्म परमात्म्यास प्राप्त करून घेतात तोच हा देवयान मार्ग, अच्युतपथ वा निर्वाणपदाचा रस्ता आहे.

सतपंथ आपणा सतकरी सेवो, सतगुरु ब्रह्माने पासे हो ।
सतपंथमा आवीने जे कोई भुल्या, ते जासे घोर अंधारा हो ॥

— गुरूवाणी.

असत्य–अज्ञानपणाचा मार्ग टाकून जीवात्म्याने आत्मज्ञानाचा मार्ग पत्करावा. प्राचिन काळापासून ऋषिमुनि सत्साधकगण याच मार्गाचे आचरण करून परब्रह्म स्वरूपात लीन झाले. याच मार्गाचे आचरण करुन तपस्वी, योगी, सत्पुरुष आपल्या जीवनाचे अंतिम साध्य साधून ब्रह्मरूप झाले. तोच हा अनुभवाचा मार्ग सद्गुरु इमामशाह महाराजांनी सद्भक्तास दिग्दर्शित केलेला आहे. ते म्हणतात –

सतपंथ सदाय छे रे उत्तम, सतपंथ विना मोक्ष कोइ ना थाय ।
अमो ब्रह्माने अमो महेश्वर, अमो निरंजननी कळाओ मळचा ॥
रे योगेश्वरो, जेणे सरज्या तेणे सेवो ॥

अेक आत्मा राजा गुरुने, मारु मन प्रधान ।
उमीया अमारी माता अने, निरंजन अमारा तात ।
ॐकार देवने कायापुरी नगरी, अेणी सेवायें खेलो साक्षात ।
रे योगेश्वरो, जेणे सरज्या तेणे सेवो ॥

— योगवाणी.

' अहं ब्रह्मास्मि ', ' शिवः केवलोऽहम् ', माझा आत्मा हाच गुरु, मन हे प्रधान, शक्ति हीच माझी माता व निरंजन हाच पिता, ॐप्रणव ब्रह्म हाच माझा देव, अशा या माझ्या कायापुरी नगरीत केवळ प्रारब्ध कर्माचे खेळ खेळण्याकरितां मी या जगतात् आलेलो आहे. पण या जगत् व्यवहाराच्या पर अशी माझी स्थिती आहे. ही स्वरूपस्थिती हे योग्यांनो तुम्ही पहा व या मार्गाचं आचरण करून मुक्त व्हा हाच मार्ग सद्गुरु इमामशाह महाराजांनी दिग्दर्शित केलेला आहे.

अवधूत सत्य अमारा गुरु भणीये, ब्रह्म अमारारे ज्ञान ।
त्रिलोक अमारा स्थानक भणीये, विष्णु अमारा ध्यान ॥
सुणोरे योगी सुणोरे अवधूत, तेज भेदका कहु विचारी ।
कहे गुरु इमामशाह असे पंथ प्रगटाव्यो, सत्पंथ लई जंबुद्विपमा आव्या ॥

❀ ❀ ❀

ब्रह्मपणु भेदीने ब्रह्मकळा किधी, त्यारे योगीये युक्ति जाणी ।
कहे इमामशाहा चरणे लाग्या, अंते सद्गोर बोल्या वाणी ॥
अमे सद्गोर ब्रह्माना आसण पुजीये, अने कळारे सेवु तमारी ।
अथर्ववेदना वाक्ये अमे भाख्यु, अने सतपंथ सेवु विचारी ॥

❀ ❀ ❀

This is wrong statement as the context shown above is from Veds and Upanishads, which are not written by Imamshah

तन मन वारोने विषिया वारो, सोही आवे अमरापुरना वासा ।
अमे धर्म तपासीने घटपाट स्थाप्यो, त्यां बांधी जीवोनी आसा ॥
रे योगेश्वरो ! सद्गुरु ब्रह्माविना मोक्ष ना होवे ॥
– योगवाणी.

अशा अनेक प्रमाणांनी हेच सिद्ध होते कीं, सद्गुरु इमामशाह महाराजांनीं सतपंथ ह्या सनातन वैदिक धर्माचेच व मुक्तीमार्गाचेच दिग्दर्शन केलेले आहे. त्यांनी जो योगमार्ग आपल्या सद्भक्तांना शिकविलेला आहे, तो अप्रतिम आहे. मनुष्याने आपला गृहस्थाश्रम सांभाळून या योगमार्गाचे आचरण करून जीवननौका भव सागराच्या पार न्यायला हवी आहे आणि ती जीवननौका सद्गुरूला नावाडी केल्यासच पार जाईल अन्यथा षड्विकारांच्या आवर्तनात कोठे गोते खाऊन नष्ट भ्रष्ट होईल तर त्याचा थांग पत्ता सुद्धा लागणार नाही.

This proves the point that values and concepts of Hindu religion are used to project Imamshah as ultimate saviour, which is a false statement. Nothing of such sort in Hinduism

संसार तो सागर हैं, माया मोह महाजाळ ।
सतकी नावे बेठीया, ते उतरी गया पार ॥
नाव कीजे हरी नामकी, सतका तो भरीये भार ।
पवन जो चाले प्रेमका, तो सतगुरु उतारे पार ॥
– गुरुवाणी

सतपंथाच्या आचरणाने व सद्गुरु महाराजांच्या कृपादृष्टीने सत्साधक पंचकोशांचे आवरण भेदून परमानंद स्वरुपात विलीन होऊन जातो. अर्थात् सतपंथाचे आचरण करणेच फार अवघड आहे.

मोक्षमार्ग दोहेला, चलना खंडाधार ।
सुली उपर खेलना, कोई खेले खेलनहार ।
इळ भ्रमरी, पठंतरो, लई मंदरमा जाय ।
भ्रमरी चटको इळ खमे, तो आपसमाना थाय ॥
-- अमृतवाणी.

अळी–भ्रमरीच्या दृष्टांतावरून सद्गुरू महाराजांनी सतपंथ–मोक्ष–मार्गाचे आचरण कसे करावे याचे स्पष्टिकरण केलेले आहे. तन मनाच्या उच्छृंखल वृत्या विसरून सतत एकाग्रतेने एकमेव ईश्वराचे ध्यान केल्यास साधकास लवकर तद्रुप होता येते. ब्रह्माकार वृत्ती ब्रह्म जाणल्या वाचून कशी होऊं शकेल ? आणि ते ब्रह्म जाणण्यास ज्या ज्ञानरूप साधनाची गरज असते ते 'सत्' ज्ञान अनुभवी गुरुवाचून होणे कदापि शक्य नाही. श्रवण, मनन, निदिध्यास आणि आत्मचिंतन हेच ते ज्ञान प्राप्तीचे साधन आहे. सत्पंथ मार्गाचे विशेष स्पष्टिकरण करताना सद्गुरु इमामशाहांनी एका भजनात म्हटलेले आहे कीं, –

सतपंथनु मूळ सत् छे, अने जिभ्या हेत प्रीत ।
नासका ते गुरुनरनो नाम छे, क्षमा दया बे दरूष्ट ॥
देवने सुगुण सुरता श्रवण छे, जप तप छे बे प्राण ।

धरम देवनी देही छे, चार पाव छे परमाण ।।
गिनान देवनुं मन छे, अने वलण विवेक विचार ।
संतोष देवनो झांज छे, अने दत्त देवनो आहार ।।
देवने आकाश मंडळ मुख छे, अने पाताळ छे देवना पाये ।
देवने काळ नही निंद्रा नही, महाऋषि देवने धाये ।।
वीर मन पुष्पथी पूजा करे, सतगुरु मुख प्रसन्न थाये ।
तमे सती लोक सेवजो, आवागमनना भय जाये ।।
सतपंथनी सेवा करता, होवे तारण भव संसार ।
गुरु नरना नामथी बहु उतर्या, तेनी गणती नावे पार ।।
जाहा कलश थाये रे स्थापना, गत करो रे अमृतपान ।
आ गुरुनरना चरणथकी प्राछत हरे, अने उपजे ते प्राण समान ।।
गत सऊ तमे हेते मळो, अने राखो हरीसु रे ध्यान ।
माहे माहेना मेल मेलो, अने अेक अेकनो सिरदो मान ।।
अेवोरे मन ओराध करता, होवे हरीजीनी सुध ।
मनखा देही जेणे गुरु सळचा, तेणे होई नव निध्द ।।
गुरु मळे तो फेरा टळे, गुरुनर जपता उतरीये पेले पार ।
सुखे अमरापुरी पामसो, सही जाणजो निरधार ।।
सतपंथनी शोभा घणी, दिन दिन अदक जो थाय ।
गुरु इमामशाहा वचन बोलीया, तमे जोई लेजो रे जाण ।।

— गुरुवाणी

Concepts, not available in Hinduism, but Islam. Following Islamic Taqiyya, Hindu looking concepts are used to attrack hindus and divert their faith to Islam.

सतपंथाचे मुळस्थान – जन्मस्थान सत् (निर्गुण निराकार परब्रह्म स्वरूप) होय. या सत्च्या आधारानेच हे अखिल विश्व ब्रह्मांड उभारले गेले. सत् हे त्रिकालाबाधित निरुपमेय एकमेवाद्वितीय ब्रह्म होय. त्या सगुण साकार – निर्गुण निराकार ईश्वराची नारायण रूपाने मूर्ति कल्पिल्यास सत् हे त्याचे शिरकमल म्हणजे तालू होय. त्याची जीभ हेत – स्नेहभाव व प्रेम निर्विषयी – निरिच्छ प्रेम होय. गुरुनराचे स्मरण ध्यान चिंतन हेच त्या सत् नारायणाचें नाक होय. क्षमा आणि दया हे त्याचे दोन डोळे होत. सद्गुण आणि धारणा हे त्याचे कान होय. जप म्हणजे नामस्मरण–नामचिंतन व तप म्हणजे संयम हे त्याचे श्वास व उच्छ्वास होत. सच्चिदानंद नारायणाचा देह म्हणजे धर्म होय. दान (निरहंकार बुध्दिने त्याग), दया (प्राणिमात्रांचे भरण पोषण व संरक्षण संगोपन करणे), तपश्चर्या (इंद्रियदमन व आत्मनिग्रह करणे) व शुचिर्भूतता (अंतर्बाह्य पावित्र्य) हे त्या धर्मरूप ईश्वराचे चार पाय आहेत. त्या देवाचे मन ज्ञान विज्ञान – आत्मज्ञान हे होय. विवेक व विचार ही देवाची वृत्ति आहे. संतोष हे देवाचे स्वरुप होय. देहात्मबुध्दिचा त्याग हेच दान हा देवाचा आहार होय. आकाशमंडल हे देवाचे मुख तर पाताळ हे पाय होत (आकाशी पाताळी तो एकमेव परमेश्वर भरून उरलेला आहे.) देवास काळ (जन्म जरा मृत्यू व्याधि) निद्रा वगैरे काहीही नाही. मनपुष्पाने त्याची मनोमन (मानसिक) पूजा करावी म्हणजे तो परमात्मा प्रसन्न होऊन तुम्हास दर्शन देईल. त्यायोगे तुमचे जन्ममरणाचे बंध तुटतील व तुम्ही अविनाशी परम सुखात सत् चित्

आनंद स्वरूपात निमग्न व्हाल. अशा प्रकारचा दिव्य अविनाशी असा हा सतपंथ मार्ग आहे. त्याची सेवा करीत करीत जीवात्मा भव सागर पार उतरून जातो. आजपर्यंत अनेकानेक सद्‌भक्त याच मूळ सनातन मार्गाची सेवा करीत करीत पैलतीराला जाऊन पोहोचले. याकरिता सद्‌भक्तांनो जेथे कलशस्थापना होईल व त्याच्या पूजा अर्चनेकरिता गतगंगा एकत्र येइल, सत्संग करतील, तेथे गुरुचरणामृत–वचनामृत पान करा. कारण, त्याच्याने सर्व पाप प्रायश्चित्ते हरले जातात व जीवात्म्याच्या चित्तात निर्मल विशुध्द आत्मज्ञान जागृत होते. त्यायोगे तो अपार अपरिमित असे अमर पदाचे सुख प्राप्त करून घेतो. तो जीवात्मा अजर अमर असे सच्चिदानंद स्वरुप मोक्षसुख अनुभवतो. अशा प्रकारचा हा अमरपद प्राप्तीचा – मुक्तीचा मार्ग सद्‌गुरु इमामशाह महाराजांनी सतपंथी अनुयायास दर्शविलेला आहे. त्यांनी एका पदात म्हटले आहे कीं,–

आ सतपंथ सेवो सत भावसु, अने मलीया ते सतगुरु ब्रह्मा ।
जेणे दर्शन किधा गत तिर्थना, तेना वैकुंठ पोता जीव ।।

– गुरुवाणी

जीवन्मुक्तिचा लाभ झाल्याशिवाय जीवात्मा अमर होत नाही व आत्मज्ञानाची पूर्ण अनुभूति आल्याशिवाय जीवात्मा जीवन्मुक्त होत नाही. जीवन्मुक्तीचा लाभ घडविणाऱ्या मुमुक्षूस अपरिमीत ज्ञान साधना, सत्संग, गुरुसेवा करावी लागते. मन उन्मन करून प्रेमघन ईश्वरी स्वरुपात लावावे लागते. बुध्दि स्थिर करून सतत आत्मचिंतन, वैराग्य विचार जागृत ठेवावे लागतात तेव्हाच जीवात्म्याचे मन शांत व स्थिर होते व तो मोक्ष साधनाच्या एकेक पायऱ्या चढून मोक्ष मंदीर गाठू शकतो.

अशा या दिव्य अमरत्वाच्या मार्गात मूर्तिपूजा, प्रतिकोपासना अन्योन्य देवदेवतांच्या उपासना, साधारण कर्मकांड हे सर्व गौण मानले आहे. ही सर्व साधने सत्पंथात नाहीत असे नाही; पण त्यास गौणत्व मानलेले असल्याने प्राधान्यभूत नाही. कित्येक लोक याच अनुषंगाने सत्पंथाविषयी गैरसमज करून घेतात. कित्येक लोक सत्पंथ शास्त्रातील उध्दरणे घेऊनच सत्पंथ प्रवर्तक इमामशाहांना मूर्तिपूजा मान्य नाही असे प्रतिपादन करतात, उदा: –

'पाषाणनी पूजा करवी नही ।'
'जुवो जुवो पंडिता वेद पुराण, किये अवतार हरी होते पाषाण ।'
'पाणी पथ्थर पूजे नही पामे मोक्ष ।'

वगैरे पदावरून स्पष्टपणे शब्दशः अर्थ तर होतो की, सद्‌गुरु इमामशाहांना मूर्तिपूजा अभिप्रेत नाही. पण वस्तुतः ज्या महात्म्याने आपल्या ज्ञानपद संग्रहात ही पदे सांगितली आहेत, त्यातच त्यांनी म्हटलेले आहे कीं, –

" पाषाणनी पूजा करवी नही, आत्मापूजा करवी सही ।। "
" कुंभकलश तमे साचो करी पूजो, ते सोळ कळा छे घटमाही ।। "
" आवा सुनमंडलमाहे सोधो, पण परतमा पूजे पाप न जाये ।
जोग कमावो तमे जोगी जोई, धरणी करणी जीवने साथे थाये ।। "
" अडसट तीर्थे परबतने नीर, अने ताहा निवेडा नही थाये ।
कहेत इमामशाहा सुनो मारा जोगी, गुरु मळे तो फांसा टळे ।। "
" सो क्रियानी तमने जनोई आपी, ब्रह्म जाणो ब्राह्मण थावो ।
पण तीर्थे न्हाया तो पाप न जाये, आ पथ्थर कोने बताव्यो ।।
पाचमो वेद ते मुगतीनो भेद, पण स्वर्ग मृत्यूनी आशा जेणे ।
निर्मल मन पालो गुरुना वचन, हेते प्रीते हासल होसे तेणे ।। "

– योगवाणी

" पींड पखाली हिरदा जो मयेला, चोखा केम करी थाये ।
उदक उछालीने पाथर पूजे, काहे कारन तमे ध्यावे ।।
सजीव छोडीने निर्जीव पूजे, भुलडा नरगे जावे ।
विभुत उछालीने टीला लगावे, पाखंड प्रिथमी खावे ।।
सत् छोडीने असत् पूजावे, ते पाखंडे मूळ गमावे ।
कहेत इमामशाहा सांभालो मुनिवर, रखेशर अमरापुरी जावे ।। "
" ब्रह्म होईने ब्रह्म ना जाणे, तो क्रिया भ्रष्टना मेळारे ।
गायत्री नो जाप तो जाणे, ब्रह्मवर ते मानो रे ।। "
" आवो मोरा भाई तमे गतमा मळो, अडसठ तीरथनो छे महिमो ।
अहीं बेठा गुरु मुखी देवने द्वार, पंच निवारो हरी वेद विचार ।। "
" सतगुरु ब्रह्मा गीनान संभळावीया, तमे सांभलो मुनिवर भाई ।।
परगट वेला आवी मळो, तो साची तमारी कमाई ।।
परगट ठाम जेणे कहिये, भाई घटपाटनी बेळा थाये ।
देव तेत्रीस करोडी आवी मळे, तो स्वामी वासो पुरो त्याये ।। "
" हिरदा माहे प्रभुजी बैठा, पितल फत्तरने ना पुंजो ।
मारु तारु मेलीने छांडो, वाद न करसो वीरारे ।। "
" आत्माराम तमे अविगत सेवो, सर्व ही भूत निवासी हो ।
सहेजतणा परमारथ जाणो, तो काहे हिंडो वनवासी हो ।।
जप तप तिरथ व्रत उपवासी, मूळ न जाणे सो अंधा हो ।
मद मत्सर अहंकार न मुके, प्रिथमी पाखंड धंदा हो ।।
पिंड पखाली दाही दिशा निहाळी, मिथ्या वाद न मुके हो ।
वेद गतगुरु मुखे भेद न जाणे, तो अेक ही अर्थ न सुझे हो ।।

जोगी जुगत ना जाणे जोग वखाणे, बैठाही लोचन ताने हो ।
गगननाथ गुरु भेद न जाणे, तो सींगी सुर ताने हो ।।
आप न सुझे ने काहे सिर लोचे, सच्चिद् ज्ञान ना जाणे हो ।
हिरदे दया नही कर्म वखाणे, मनशा कर्मे लाग्या हो ।।
त्रिगुण टाळे ने पंच निवारो, तो सुनमंडल माहे वासा हो ।
कहेत इमामशाहा निर्मल सेवो, तो ज्योतबींब प्रकाशा हो ।। "
'आ दल प्यारमे राचारे भाई, गुरु के शब्दसे राचारे भाई ।
अब मैं समझारे भाई, गुरुके शब्दसे राचारे भाई ।।
तीरथ ना जाऊं ने डुबकी ना खाऊ, ना डालू उपर पाणी ।
देवल भीतर लागी छे टाली, जहा मेरी सुरत समाई ।।
घंटा बजाऊ ना पाती चढाऊ, ना फेरू हातमे माला ।
आसन मांडीने जुगतसे बेसु, चवुदिस करु अजवाला ।।
धुंडत धुंडत धुंडत थाका, जब मार्ग लीया विसराम ।
उलट भेदकी सुझ जो लागी, कोटी कलप अहो रामा ।।
नेमही थाके प्रेम ही थाके, थाके लोक बढाई ।
कहेत इमामशाहा सुनो मोरा भाई, अटल पवमो पाई ।। "

— गुरुवाणी.

Wrong Statement

वरील सर्व उध्दरणावरून हेच सिध्द होते कीं, सदगुरु इमामशाह महाराजांनी मूर्तिपूजेचा निषेध केलेला नाही. संत रामदास, संत कबीर, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज वगैरे अनेक संतांनी ठिकठिकाणी आपल्या वाङ्मयातून मूर्तिपूजेविषयी कडाडून टिका केलेली आहे. त्याचा अर्थ असा नाही कीं त्यांनी मूर्तिपूजेचानिषेध केलेला आहे. पण समाजात मूर्तिपूजेत अथवा प्रतिकोपासनेत जे अवास्तव स्तोम माजविण्यात येते, त्या योगे खऱ्या योगक्रियेपासून वा ईश्वरानुसंधानापासून सत्साधक पराङ्मुख होतो व तशा सत्साधकाची बहुजन समाजात कुचंबणा होते. म्हणून ईश्वरभक्तीचे तसे अवडंबर अथवा स्तोम न माजविता मनोमन भगवंताच्या दर्शनाची साधना करा. मन शुध्द, पवित्र व स्थिर करण्याचा प्रयत्न करा म्हणजे आत्मसाधना करण्यास तत्पर करा. मूर्तिपूजेच्या समयी कोणताही उपासक आपले पूजा नैवेद्यादि उपचार या दगडास अथवा धातूस अर्पण करीत आहे, असे तर समजत नाही; पण या ईश्वरी स्वरुपाला मी हे सर्व अर्पण करीत आहे याच भावनेतून श्रध्देने सर्व उपचार अर्पण करतो. म्हणजे त्या मूर्तीच्या ठिकाणी उपासकास ईश्वरी भावना कल्पावी लागते. अज्ञानी व मूर्ख लोक मात्र अज्ञपणाने मूर्ति हाच देव व मूर्ति हेच आपले सर्वस्व मानतो व शेवटपर्यंत अंधश्रध्देने बध्द होऊन आपल्या भावनांची—मनाची उन्नति करूं शकत नाही. त्या योगे त्यास आत्मज्ञान, आत्मानुभूति होत नाही, त्याचा आत्मविकास होऊ शकत नाही, त्यामुळे त्याचे विचार थोटे व संकुचित होत असतात. अन्यांचा द्वेष, मत्सर, तिरस्कार, निंदादि दुर्गुणांना तो बळी पडतो, म्हणून मूर्तिपूजेचे तत्त्व रहस्य समजावून घ्यावयास हवे आहे.

मूर्तिपूजा म्हणजे मूर्त स्वरूपाची उपासना होय. मूर्त म्हणजे प्रत्यक्ष मूर्तिमंत व्यक्त स्वरुप. भगवंताची व्यक्त व अव्यक्त अशी स्वरूपे आहेत. व्यक्त म्हणजे जे डोळ्यांनी दिसू शकते, आकारास येते, प्रगट होऊ शकते व प्रत्यक्ष रूपाने दर्शन देते ते स्वरुप. अर्थात असे भगवंताचे चैतन्यमय व्यक्त स्वरुप म्हणजे त्याच्या विभूतीच होत. जड स्वरुपाला प्रत्यक्ष प्रगट अथवा व्यक्त स्वरुप म्हणता येत नाही. म्हणून मूर्ति हे भगवंताचे चैतन्य स्वरुप नव्हे तर जड स्वरुप, कल्पिलेले आहे. वस्तुतः भगवंताचे व्यक्त चैतन्य स्वरुप म्हणजे त्याचे अवतार विग्रह होत. वेळोवेळी अधर्माचा उच्छेद, धर्माची स्थापना, सृष्टांचे पालन व दुष्टांचे (धर्मविघातक अशा दुर्जनांचे) निर्दालन करण्याकरितां व मूळ सनातन धर्माची असुरांनी विस्कटून टाकलेली घडी नीट बसविण्याकरितां भगवंताचे जे गुप्त वा प्रगट अवतार होतात, ते जाणून त्याच व्यक्त सगुण साकार अवतार विग्रहांची पूजा, ध्यान, सेवा, स्मरण करणे हीच खरोखर मूर्तिपूजा होय. पण तसे अवतारी पुरुष व्यक्त रूपात असणे व समजून येणे फार कठिण असते म्हणून त्यांचे मार्गदर्शन करणारे संत, महात्मा, सत्पुरुष अनुभवी गुरु, सद्गुरु यांची कास धरल्याशिवाय ते त्यांचे स्थान दर्शवूं शकणार नाहीत. " सद्गुरु वाचूनि सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ।। " असे संतपुरूष एवढ्यासाठीच सांगत असतात. " गुरु गोविंद दोनो खडे किसे लागु पाय । बलिहारी उस गुरूकी जिन्हे गोविंद दियो बताय ।। " गोविंदाची - भगवंताची ओळख अथवा प्राप्ति सहज शक्य नसते. गुरुंच्या संतांच्या, महात्म्यांच्या अनुग्रहानेच ईश्वराची प्राप्ति होऊ शकते. शास्त्रज्ञान श्रवण, गुरु उपदेश ग्रहण करून आत्मानुभवानेच ईश्वर दर्शन होते, म्हणून गुरुगम मार्गात मूर्तिपूजेला दुय्यम स्थान म्हणजे गौण स्थान मानलेले आहे.

सत्पंथ संप्रदायात सद्गुरु इमामशाह महाराजांनी ॐ प्रणव ब्रह्माचे स्मरण - चिंतन, ज्योतींचे ध्यान, कलशपूजन व दश अवतार उपासना ह्या प्रमुख तत्वांना प्राधान्य दिलेले आहे.

यदक्षरं वेदविदो वदन्ति, विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति, तत्तेपदं संग्रहेण प्रवक्ष्ये ।। गीता ८।११
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।। गीता ८।१३

वेदवेत्ते पुरुष ज्या सच्चिदानन्दघनरूप परम पदाला अक्षर (अविनाशी) म्हणतात, विरक्त व यत्नशील यति ज्यात प्रवेश करतात व ज्याची इच्छा करणारे (मुमुक्षू) ब्रह्मचर्य व्रताचे आचरण करतात ते पद तुला मी संक्षेपाने सांगतो. सर्व इंद्रियद्वारे रोधून मन हृदयात स्थिर करून, प्राण मस्तकात स्थापन करून समाधियोगात स्थिर होत्साता ॐ या एकाक्षर ब्रह्माचा उच्चार करीत व माझे स्मरण करीत जो देह सोडून जातो, त्याला उत्तम गति मिळते.

ॐकारमध्ये ध्यान जो धरीया, अने धुंधुकार रचिया ।
ध्यान माहेथी जोग जो सरजा, जोगमाथी निपनी काया ।।
रे जोगेश्वरो, तो जोगनी जुगतो अनेरी ।।

आदे उनादे अहंकार उपना, तारे सबदमा सर्वे समाया ।
आदेथी उपना ते अंते समाया, तेज मध्ये बांधी काया ।।
रे जोगेश्वरो, तो जोगना मरम ना जाणे कोई ।।

– योगवाणी

सत् शब्द है गुरु हमारा. ताको लखे न ये संसारा ।।
सत् शब्दका करो विचारा, ॐ सोहं करोजी वारंवारा ।।
प्रथम ध्यान रसनासु कीजे, निसदिन ॐ सोहं भणीजे ।।

– ब्रह्मप्रकाश

ॐ प्रणव ब्रह्माचे स्वरूप स्वयं ज्योतीरूप असल्याने तसेच आत्मज्योतिस्वरुप भगवंताचे ध्यान करण्याचे माध्यम ज्योत, तेज, सूर्य, तारे असेच असल्याने ज्योतीचे ध्यान सतपंथ संप्रदायात प्रामुख्याने सांगितलेले आहे.

हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।
तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यदात्मविदो विदुः ।। मुंडक. २।२।९

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं, नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।
तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ।। मुंडक २।२।१०

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।
अन्तः शरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीण दोषा ।।

मुंडक ३।१।५

ज्योते स्वरूपे जाणीये, आदबुंद विंड केवायरे ।
निराकार रूपे तो पोते छे, ते तो अकल कहाव्या नव जायरे ।।
झव्हेरी होवे तो पारखे, अने हिरा चऊटे बाजार ।
मुनिवर होवे तो पारखे, गीनाननी सुरती लगाय रे ।।

– गुरुवाणी.

ते निर्मल अवयव रहित परब्रह्म प्रकाशमय परमकोशात परमधामात विराजमान आहे. ते सर्वथा विशुध्द सर्व ज्योतींचीही ज्योति आहे. तिला आत्मज्ञानीच फक्त जाणतात. तेथे त्या ब्रह्मास सूर्य प्रकाशू शकत नाही, चन्द्रमा अथवा तारांगण अथवा ही विद्यूत सुध्दा त्यास प्रकाशवू शकत नाही तर मग अग्नीची तेथे काय कथा ? कारण की, त्या ब्रह्माच्या प्रकाशानेच संपूर्ण जगत् प्रकाशित होत असते. ह्या शरीरांतर्गत हृदयात विराजमान ज्योतिस्वरुप परम विशुध्द परमात्मा

निःसंदेह सत्यभाषण तप व ब्रह्मचर्यपूर्वक यथार्थ ज्ञानानेच सदैव प्राप्त होणारा आहे. त्यास सर्व प्रकारच्या दोषांनी रहित असलेला यत्नशील साधकच पाहू शकतो.

ॐ प्रणव ब्रह्माच्या चिंतनाबरोबर ज्योतिस्वरूप परब्रह्माचे ध्यान करणे सत्पंथ संप्रदायात प्राधान्यभूत गणले आहे. सतपंथ घटपाट पूजा विधीच्या समयीं शुध्द घृताच्या तीन ज्योति ब्रह्मा, विष्णू, महेश्वराच्या प्रतिकात्मक लावून त्यांचे एकरूपतेचे ध्यान करणे ही निर्गुण निराकाराची उपासना म्हणून या संप्रदायाची महत्वाची उपासना – साधना होय. या संप्रदायात कलश घटपाट पूजा ही सुध्दा एक उपासना पध्दति आहे. ह्या विषयी हिन्दुधर्म शास्त्रात मंत्र दिलेला आहे तो असा –

कलशस्य मुखे विष्णुः कण्ठे रूद्रः समाश्रितः ।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा, मध्ये मातृगणाः स्मृताः ।।
कुक्षौ तु सागरा सर्वे सप्तद्विपा वसुंधरा ।
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ।।
अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्चिताः ।
अत्र गायत्री सावित्री शांतिपुष्टिकरी तथा ।।
आयान्तु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः ।
गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।।
नर्मदे सिंधु कावेरी जलेऽस्मिन्सन्निधिं कुरू ।
वरुणाय नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।।

कलशपूजा म्हणजे सर्व देवतांच्या उपासनेचे साधन होय. मंत्रोपचाराने सर्व देवदेवतांना आवाहन, पूजन, अर्चन, वंदन करून नैवेद्य समर्पण करून त्यांचे ध्यान चिंतन स्मरण केले जाते. अर्थात मूर्तिपूजेप्रमाणे हे कलशपूजन प्रतिकोपासनाच होय, पण तद्वारा कोणत्याही ऐच्छिक देवतास्वरुपाचे आराधन करून इप्सित हेतु पूर्ण करता येतो. अनादि काळापासून हे कलशपूजन यज्ञविधी चालत आलेले आहे. कलश घटपाट पूजा म्हणजे ब्रह्मा विष्णू महेश आद्यशक्ति व आद्यनारायण या सतपंथ पंचायतनाची पूजा असा सत्पंथ संप्रदायाचा संकेत आहे. त्याविषयी इमामशाह महाराज म्हणतात–

अेक तुही तु अेक तुही तु ।
संसार सागर भुली मत जावो । घट तिरथ घट न्हावो ।।
अेणे घटे ब्रह्माने अेणे घटे विष्णु । अेणे घटे देव महेश्वर सोये ।।
अेणे घटे ज्योति अेणे घटे जुगती । अेणे घटे प्राणी पावे मोक्षमुगती ।।

– गुरुवाणी

घट पुंजो ने घट तीरथ न्हावो ॥
अेणे घटे ब्रह्माने अेणे घटे विष्णु । अेणे घटे देव महेश्वर सोये ॥
आव्यारे नारायण देव आ घट स्वामी ।
आव्यारे निकलंकी देव आ घट स्वामी । जीरे हो ।
आजकलवारा पुरुष तमे सेवो रे सारंगधर ।
सेवो तमे पात्र निकलंकी रे भाई, रूखीयाने तारणहार ॥

– गुरुवाणी

This concept is totally alien to Hinduism. This concept is used by Islam to project Islam is the only true religion of current times. Other religions are abrogated.

सद्‌गुरु इमामशाहा महाराजांनी युगधर्मानुसार वेगवेगळ्या युगातील वेगवेगळ्या उपासना पध्दति सांगितलेल्या आहेत. मूळस्तंभ या फार जुन्या ग्रंथात सुध्दा युगधर्माची माहिती दिलेली आहे, त्याशी पडताळून पाहता इमामशाहांनी दर्शविलेला युगधर्म परंपरेनुसार जुळत असल्याचे आढळून येते. सत्ययुगाचा युगधर्म असा –

युगपुरुष ब्रह्मदेव, ऋग्वेद प्राधान्यभूत, उत्तरदिशा ध्यानगम्य सुवर्णघट पाट कलशपूजा. अवतार चार – मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह. प्रत्येक अवतारांची कालमर्यादा ४ लाख ३२ हजार वर्षे म्हणून १७ लाख २८ हजार वर्षे सत्ययुगाचे प्रमाण. प्राधान्यभूत अवतार नृसिंह म्हणून नृसिंह मृत्युंजय गायत्री मंत्राचा जाप युगतारक मंत्र, भक्त चार रूक्मांगद, अंबरीष, ध्रुव व प्रल्हाद, व्रत गुरुवार एकादशीच्या दिवशी युग प्रारंभ झाला असल्याने ती युगतिथी गणली गेली. दानाचा प्रकार हत्तीदान (हत्तीच्या किंमतीचे दान) शरीरात वायुतत्वाचा प्रादुर्भाव अधिक म्हणून वनदाग प्राधान्यभूत, क्षेत्र हंसपूर पाटण अवतार कार्याचे क्षेत्र. मनुष्य शरीराचे प्रमाण २१ हात उंच, गाईच्या दुधाचे प्रमाण विपुल, त्यांच्यावर आश्रमधर्म व्यवस्था निर्वाह. धर्मनीती नियमांचे प्रमाण शेकडा साडेसत्त्याण्णव व पापकर्माचे प्रमाण शेकडा अडीच असे होते.

त्रेता युगात युगपुरुष वशिष्ट मुनि, प्राधान्यभूत वेद यजुर्वेद, पूर्वदिशा पूजनीय, ध्यानकर्मास श्रेष्ठ, रुप्याच्या घटपाटाची कलशपूजा उपासना. अवतार पात्र तीन वामन, परशुराम, व श्रीराम. प्राधान्यभूत अवतार श्रीराम म्हणून रामतारक गायत्रीमंत्र हा मुक्तीचा जाप. प्रत्येक अवताराचे कार्य ४ लाख ३२ हजार वर्षे म्हणून त्रेतायुगाचे प्रमाण १२ लाख ९६ हजार वर्षे. सद्‌भक्त कमलध्वज, कमलापति व हरिश्चन्द्र हे होत. रविवार चतुर्दशीला युगाची सुरुवात म्हणून ती त्रेतायुगाची युगतिथी होय. शरीर रचनेत जलतत्व अधिक म्हणून जलदाग प्राधान्यभूत. बगपूर हे अवतार कार्याचे क्षेत्र. मनुष्य शरीराचे प्रमाण १४ हात ऊंच. दान कर्म अश्वाने गणले जाई. आश्रमधर्म व्यवस्था गाईवर चालत असे. धर्मनीती नियम पालनाचे प्रमाण शेकडा पंचात्तर व पापाचरणाचे प्रमाण शेकडा पंचवीस होते.

द्वापार युगात प्राधान्यभूत वेद सामवेद, युगपुरुष वेदमूर्ति व्यास. दक्षिणदिशा पूजनीय. तांब्याच्या घटपाटाची कलशपूजा उपासना. अवतार पात्र दोन श्रीकृष्ण व बौध्द. प्राधान्यभूत

अवतार श्रीकृष्ण म्हणून श्रीकृष्णाचा तारक गायत्री मंत्र हा मुक्तीचा जाप, प्रत्येक अवताराचे कार्य ४ लाख ३२ हजार वर्षे म्हणून युगाचे प्रमाणे ८ लाख ६४ हजार वर्षे. सद्भक्त पांडव युधिष्ठिर, सोमवार अमावशेस युगाची सुरुवात म्हणून सोमवती अमावशा युगतीथीचे व्रत. विपुल दुधयुक्त गाई हे दानाचे प्रमाण. आश्रमधर्म अन्नधान्य व दुधावर चालवीत. शरीर रचनेत अग्नितत्व अधिक म्हणून अग्निदाग प्राधान्यभूत. मनुष्य शरीराचे प्रमाण ७ हात उंच. धर्मनीती नियमांचे व पापाचे प्रमाण हे अर्धे म्हणजे शेकडा पन्नास असे होते. शामपूर अथवा कुरुक्षेत्र हे अवतार कार्याचे क्षेत्र होय.

कलियुगात प्राधान्यभूत वेद अथर्ववेद, पश्चिम दिशा पूजनीय ध्यान करण्यास श्रेष्ठ. मातीच्या घटपाट कलशाची पूजा उपासना. अवतार पात्र एकच श्री निकलंकी नारायण, त्याचे प्रमाण ४ लाख ३२ हजार वर्षे म्हणून युगाचे प्रमाण ही तेवढेच. सद्भक्त कमलाकुंवर, कार्यक्षेत्र कुंवारीकाभूमी, शुक्रवारी बीजेच्या दिवशी युगास सुरुवात म्हणून ती युगतिथी. अल्पदुधवती गाई म्हणून अन्नधान्यावरच निर्वाह. दानाचे प्रमाण शेळीचे व माध्यम लोखंडाचे. शरीर रचनेत भूमी (पृथ्वी) तत्व अधिक म्हणून भूमीदाग प्राधान्यभूत. मनुष्य शरीराचे प्रमाण साडेतीन हात ऊंच. धर्मनीतीचे प्रमाण शेकडा अडिच व पापकर्माचे प्रमाण शेकडा साडेसत्त्याण्णव असे होय.

अशा प्रकारचा युगधर्म सतपंथ संप्रदायांच्या धर्मसाहित्यात मार्गप्रवर्तक सद्गुरु इमामशाह महाराजांनी दर्शविलेला आहे. त्याचे थोडक्यात समर्थन खालील प्रमाणे समजावे.

भरतखंड जंबुद्विपातील कुवारीका क्षेत्राच्या पश्चिमेस असलेल्या श्वेतद्विप अथवा सहस्त्र द्विपात भगवान शेषशाई नारायणाचे वास्तव्यस्थान आहे असे आपल्या विष्णुपुराण, मार्कण्डेय पुराण, ब्रह्मवैवर्तपुराण आदि अनेक हिंदुधर्म ग्रंथात ग्रथीत केलेले आहे. कलियुगात प्राधान्यभूत अवतार हा त्याच शेषशाई नारायणाचा असल्याने व तो अजून प्रगट झालेला नसल्याने, त्याच्या आगमनाकरितां पश्चिमेस मुख करून कलितारक निकलंकी गायत्री मंत्राचा जाप करावा अशी सत्पंथ प्रवर्तकांची आज्ञा आहे. कलियुगात दाटलेल्या घोर अज्ञान अंधःकारमय स्थितीतून पार उतरून जाण्याकरितां सोळाकळांनी युक्त अशा भगवंताचा षोडशाक्षरी मंत्राचा जाप करावा असे कलिसंतरणोपनिषदात पण सांगितले आहे. सतपंथातील षोडशाक्षरी मंत्र "ॐ नमो निकलंकी नारायण जनार्दनम् ॥" असा असून गायत्री मंत्र 'भस्मायुधाय विद्महे दिव्यनेत्राय धीमहि तन्नोज्वरहरः प्रचोदयात् ॐ शांतिः शांतिः शांतिः" हा आहे. या षोडशाक्षरी मंत्राने आणि गायत्री मंत्राच्या ध्यान चिंतन व जापाने षोडशकलांनी युक्त असलेल्या जीवात्म्यास परमात्मस्वरुपाची प्राप्ति होते असे प्रश्नोपनिषद् (६।४), मुंडकोपनिषद् (३।२।७), श्वेताश्वरोपनिषद् (५।१४) वगैरे अनेक ग्रंथात सांगितलेले आहे. तेच सतपंथ प्रवर्तकांनी उपदेशिलेले आहे. श्वेतद्विप अथवा सहस्त्रद्विप भूगोलाच्या पाठीवर उत्तर ध्रुव प्रदेश श्वेत बर्फाने आच्छादिलेला प्रदेश व थाऊजंडलँड म्हणून सहस्त्रद्विप हा प्रदेश प्रसिध्द आहे. नारद सनकादि ऋषिंचे हे वास्तव्य स्थान आहे असा श्रीमद्भागवतातही उल्लेख आहे आणि हा प्रदेश जंबुद्विपाच्या पश्चिमेस असल्याने बहुतांशी मंदिरात मूर्तिची स्थापना पूर्वाभिमुख असून पूजकाचे मुख पश्चिमेकडेच असते असे आढळून येते.

शुक्रवार शुध्द बीज म्हणजे चन्द्रदर्शन हे कलियुगाचे युगतीथीचे व्रत आहे. त्यास अजवाली बीज अथवा थोरबीज असेही म्हणतात. बुधवार अमावस्येच्या दिवशी कलियुगाची मांडणी मांडली जाऊन शुक्रवार बीजेच्या दिवशी त्याची प्रत्यक्ष सुरुवात झाली म्हणून बुधवार, गुरुवार व शुक्रवार ह्या तीन दिवसांचा उपवास व्रत करून दानधर्म करावा, अशी सतपंथ प्रवर्तकांची आज्ञा आहे. शुक्रवार हा बऱ्याच मानवसमाजाचा 'देवाचा' दिवस गणला जातो. हे चन्द्रदर्शनाचे व्रत हिन्दूधर्मशास्त्रात् 'बालेन्दु व्रत' म्हणून प्रसिध्द आहे. तसेच चन्ददर्शन, सहस्त्रचन्द्रदर्शन या व्रताविषयी पंचांगात विस्तृत माहिता दिलेली असते.

शुध्द बीजेचा चन्द्र कर्तृत्वाचा प्रतिक आहे. शुध्द बीजेच्या चन्द्रकलेप्रमाणे आपल्या जीवन कलेचा सुध्दा उत्तरोत्तर विकास व्हावा म्हणून त्याचे दर्शन घ्यावे. भारतीय संस्कृति औदार्य आणि कर्तृत्व यांची पूजक आहे. चन्द्र शुध्द पक्षात कमावतो व वद्य पक्षात स्वतःच्या कलांचे उदारतेने दान करतो. अमावस्येच्या दिवशी तो खाली होऊन जातो आणि शुध्द बीजेपासून परत कला कमाविण्याच्या उद्योगास लागतो. अशा या विश्वजीत यज्ञ करणाऱ्या कर्मयोग्याला ज्याने समस्त विश्वाचे वैभव प्राप्त केले पण समस्त विश्वाच्या कल्याणाकरिताच त्या वैभवाचे दान करून टाकले अशा या कर्मयोग्याला भगवान शिवाने आपल्या माथ्यावर धारण केले आहे. शुध्द बीजेच्या चन्द्राचे दर्शन घेऊन लोक कृतार्थता अनुभवतात. त्याचे दर्शन पवित्र, मंगलकारी, पावनकारी, अमृतोपम आहे. चन्द्राचे किरण अमृतस्त्रावी आहेत म्हणून त्याचे दर्शन पुष्टीकारक व तुष्टीदायक आहे. औषधी वनस्पति यांत त्याचा अमृतरस ओतला जातो. त्यांच्या सेवनाने मनुष्य पशुप्राणि पुष्ट व तुष्ट होतो मग प्रत्यक्ष चन्द्रदर्शनाने कां होऊ नये. म्हणून प्रत्येक महिन्याच्या चन्द्रदर्शनास व शुक्रवारच्या चन्द्रदर्शनास सत्पंथ प्रवर्तकांनी विशेष प्राधान्य दिले आहे. शुक्रवार अथवा चन्द्र हा जगातील एखाद्या विशिष्ट जाती जमाती करितां अथवा धर्म पंथीयाकरितां ईश्वराने निर्माण केलेला नसून अखिल विश्व, भूतप्राणिमात्रांकरिता त्याची निर्मीती आहे.

युगधर्मानुसार सद्गुरु इमामशाहांनी अथर्ववेदाला प्राधान्य दिलेले आहे. अर्थात सतपंथ घटपाट कलश पूजाविधी मंत्र हे अथर्ववेदाच्या अनुरोधाने तयार केलेले आहेत असा उल्लेख सतपंथ साहित्यात आढळतो अथर्ववेद व त्याच्या उपनिषदांना आधारभूत मानून सद्गुरु इमामशाह महाराजांनी हा सतपंथ दिग्दर्शित केलेला आहे. इमामशाहांनी केलेल्या चेतावणी, गुरुवाणी, योगवाणी वगैरे अनेक तत्वग्रंथावरून हे स्पष्ट दिसून येते.

चार वेद चारे मुखेथी बोलिया, सतगुरु ब्रह्मा ते सरवे आये ।
अे गीनान तो श्रीनारायणे आपीया, जे छे सर्वे वेद माहे ।।
ते ब्रह्माना मुखमाहेथी उपना, ते तो परवरीया पृथ्वीनी माहे ।
ऋग्वेद यजुर्वेद सामवेद कहिये, अने तेनी मायेनी छे अथर्व वेदमाहे ।।
अथर्ववेद माहेथी काढी करी, ते तो आपी सतपंथीयोने आज ।
रेहेणी राखो तमे निश्चे करी, तो सरसे आपणर जीवना काज ।।

– ऋषिवर चेतामणी.

सतपंथ सेवो मारा मुनिवरो, तो पामीये मुगत दरशन ।
आज कलजुग संधे मत भुलजो, हरीने मानस रूपे अवतार ।।
अथरणवेद भणे मारा मुनिवरो, तमे सतसु जागो मारा वीर ।
ब्रह्मा विष्णु महेश्वर जाणिया, आज कलिमा साचा सद्गोर ।।
भाई अमर देहा कीजिये । अने हेते वरसे मेहे ।।
अथरण वेदमाहे अेम भाकीया । हवे जुगनो आव्यो छेहे ।।

– गुरुवाणी

अनंत रूपे चौद भुवनना भूप, वेद परमाणो रुप खोजो ।।
अथर्ववेदनी जुगती जाणी, अेणी जुगतीये जोगने सोजो ।।
रे जोगेश्वरो, निरंजन लाधे तो जोगने काढे ।।

– योगवाणी.

अथरण वेदमा अेम भाकीया, अने मुनिवर कीजे उत्तम काम ।।
जो मन मुंडन कीजिये, तो वैकुंठमा पामीये ठाम ।। गुरुवाणी.
नाभी कमलथी दम उठे, स्वाँस उस्वास होय रे ।
दमे दमे हरीने जपीये, तो अमर होये सोय रे ।।
त्रिवेणी त्रिखुटीमा न्हाइये, अने पुरा संगम होयरे ।
चांदो सुरज बे दिप कहिये, तो ज्योतमा ज्योत समायरे ।।
सुरत लगाडीने चहडिये, अने पुरा गुरुने साथरे ।
अजंपा जापने जपीये रे, तो प्राछत सगला जायरे ।।
कहेत इमामशाहा सुनो मुनिवररे । तमे साचु जाणो निर्धार ।
अथरण वेदमा अेम भाकीया, आगळ नथी अग्यारमो अवताररे ।।

– गुरुवाणी.

अमर थवानो जपवो अजंपा जाप, अथर्ववेदनी कांडी भणी उतारवो पाप ।।

Attempt to connect Satpanth to Hindu Atharv Ved

या व अशा अनेक अवतरणावरून हेच सिध्द होते कीं सतपंथ प्रवर्तक सद्गुरु इमामशाहांनी अथर्ववेद आणि त्याचे ज्ञानगम्य उपनिषद ग्रंथ प्रमाणभूत – आधारभूत मानलेले आहेत. अथर्ववेदात व उपनिषदात सत्पंथाचा स्पष्ट उल्लेख जरी नसला तरी पण देवयान मार्ग, आत्मज्ञान योगमार्ग अथवा मुक्तिमार्गाचा उल्लेख तर स्पष्टच आढळतो. अर्थात त्या मार्गाचे अवलंबन करून लक्षचौऱ्यांशीचे फेरे मिटवून जीवात्मा स्वयंप्रकाश आत्मस्वरूप ओळखू शकतो व स्मरण चिंतन ध्यानाने त्या स्वरूपात लीन होऊ शकतो तीच ब्रह्मविद्येची क्रिया सद्गुरू इमामशाहांनी सतपंथ ज्ञान साहित्यात निवेदन केलेली आहे. असा ब्रह्मविद्येने ओतप्रोत भरलेला हा अथर्ववेद युगधर्मानुसार कलियुगात प्राधान्यभूत आहे. त्यांतील कुंभ कलश घटपाट म्हणजे वरुणयज्ञ–जलयज्ञ इमामशाहांनी स्विकारून त्याद्वारे मूळ सत् चित् आनन्द घन ईश्वराची उपासना

व अन्योन्य देवदेवतांचे पूजन, अर्चन, नमन, नैवेद्यसमर्पण वंदन व तद्वारा त्यांचा कृपाशिर्वाद ग्रहण करण्याचे साधन सतपंथ पूजाविधीद्वारा दिग्दर्शीत केलेले आहे. नित्य नैमित्तिक आणि काम्य कर्मे करीत करीत निष्कर्म होऊन शेवटी आत्मज्ञान श्रवण, सत्संग, ज्ञानचर्चा, मनन, निदिध्यासन आदि साधनांनी मन शांत स्थिर करून भगवंताच्या निर्गुण निराकार सत्‌चित् स्वरुपाचे ध्यान चिंतन करीत करीत आपल्या सर्व वृत्तींचा–कामनांचा लय त्यात करण्याची यौगीक क्रिया या वेदाच्या आधारानेच इमामशाहांनी उपदेशिलेली आहे.

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरश्योध्या ।
तस्यां हिरण्मयः कोशः स्वर्गो ज्योतिषावृत्तः ।।

– अथर्ववेद १०।२।३१

आत्मानं रथिनं विध्वि, शरीरं रथमेव तु ।
बुध्दि तु सारथिं विध्दि, मनः प्रग्रहमेव च ।।
इंद्रियाणि हयानाहुर्विषयाँस्तेषु गोचरान् ।
आत्मेन्द्रियमनोयुक्त भोक्तेत्याहुर्मनीषिणः ।।

– कठोपनिषद् १।३।३–४

श्री सतपंथ ज्ञानपद साहित्यातील एक पदात सद्‌गुरु इमामशाह म्हणतात –

मुंड कमंडल कांही थरकरी राखो । नाभी कमलथी जगावो ।।
सतगुरु शब्दका माहे बाजा बजाइये । सुरती सुहाग चढाइये ।।
मुखवीना गाइये श्रवणविना सुणीये । बीन करताल बजाइये ।।
टाळ पखवाज मृदंग बाजे । बीन रसना गुण गाइये ।।
इंगळा पिंगळा सुषुम्ना नाडी । त्रिवेणी तिरथ परठे रहिये ।।
भ्रमर गुंफा उपर तखत विराजे । बाजा निशाण बजाइये ।।
कहेत इमामशाह सुणो मोरा भाई । अेम करी दर्शन पाइये ।।

गुरुवाणीच्या एका ज्ञान पदात सद्‌गुरु इमामशाहांनी या यौगिक क्रियेविषयी क्रमाने विवेचन केलेले आहे, ते म्हणतात –

आद उनादना नाथ रे, स्वामी तमे छो करतार ।।
भरतखंड जंबुद्विपमाहे, दसमो छो निकलंकी रुप ।।
सतगुरु केरा हाटमा, जडी गीनान सबद केरी जड ।।
गीनान दिपक समारीये, सतगुरु बेखाडसे अमरमेद ।।
अमरपद गुरु गम जडी, ता तो पाप ते परळा जायरे ।।
पाच तत्वनी रचना बनी, तारे त्रण जग कर्या प्रकाश ।।

पाच ही रसने वारीये, तेना रूप छे सहस्त्र पचास ।।
नाभी कमलथी उपजे, ताहा गैबी ते गर्जना थाय ।।
सुन शिखरमा सुरता धरी, ताहा थाये छे अजंपा जाप ।।
इंगळा पिंगळा संगम माहे, ताहा सुषुम्ना वहे अति सार ।।
अनहद बाजा ताहा गडगडे, ताहा बर्ताये जयज्‍प्रकार ।।
बंक नालना घाटमाहे, ताहा अनहद थय्ये प्रकाश ।।
आ घेरथी अमी उतरे, ताहा पीये हरिजन विरला कोय ।।
सुरत नुरतनी जुगत भणी, परिब्रह्मा छे पोताने पास ।।
अखंड ज्योत ताहा झगमगे, अे तो अलख पुरुष केरा मेल ।।
अलख निरंजनने सेविये, तारे जनम मरणनो भय जाये ।।
कहेत इमामशाह सुणो मोरा भाई, तमे गावो सिखो सांभळो भाई ।।

या पद्यावरून व अशाच स्वरूपाचे वर्णन असलेल्या श्री निकलंकी गीता, चिद्‌विचार, श्री देवी नारायण संवाद, ब्रह्मप्रकाश, गुरुवाणी, योगवाणी वगैरे अनेक ग्रंथात कथन केलेला हा योगमार्ग अथवा ब्रह्मविद्या प्राप्तीचा मार्ग सद्‌गुरु इमामशाहांनी अथर्ववेदाच्या आधारानेच कथन केलेला आहे. म्हणून त्यांनी अथर्ववेद व त्याच्या उपनिषदांना प्राधान्यभूत मानून या सतपंथाची रचना केलेली आहे. सतपंथाची शिकवण सांगताना ते सुचवितात कीं, –

शुध्द बुध्दे राचो हो मुनिवरो, दिलथी मेलज थाये दूर ।
हृदयथी जो मेल दूर थाये, तो स्वामीजी होवे हजूर ।।
स्वामी दया सारू तने सृजियो, काये भुलो वारोवार ।
मनुष्य देही फरी नही मळे, तमे चेतीने चालो गेमार ।।
भाई जेना दिलमा दया नही, तेना दिलमा नाखो धूल ।
ते तो फुटी हांडी तोल छे, तेनु कोडी ना आवे मोल ।।
जेना हृदयमा क्षमा आवसे, तेणे जाणो आरीसा प्रमाण ।
आरीसामा जेम प्रकाश छे, तेम स्वामी भीतर तुज रे जाण ।।
भाई सतपंथे साचा चालसो, तेना जीव अमरपुरमा जाये ।
अमरापुर तमे अेम पामसो, जो जीवता मृतक थाये ।।
भाई काची काया छे तारी कारमी, तेणे जाता नही लागे वार ।
जेऊं सपनांतरनु पेखणु, तेवो छे रे आ संसार ।।
अंध भावे तेणे काही ना सुजे, अे स्वामी छे तुज पास ।
कामक्रोध मत्सर परहरो, अने थावो सतगुरुजीना दास ।।
गुरु इमामशाहा अेम बोलीया, सांभलो मुनिवर अे गीनान ।
सतगुरुना कह्या जे कोई मानसे, तेना थासे अेकोत्तरसोना काम ।।

– गुरुवाणी

शुध्द बुध्दिचा उपयोग करून कर्मे करणे, हृदय निर्मल पवित्र ठेवणे. अंतरबाह्य मलीनतेचा त्याग, दयामय अंतःकरणाचे अवलंबन करणे, सद्‌विचार सतत जागृत ठेवून अमुल्य मानव जन्माचे सार्थक करणे, दया, क्षमा, यथाशक्ति दान व यथालाभ संतोष याने आपले अंतःकरण आरशाप्रमाणे निर्मळ स्वच्छ करून आत्मप्रकाश त्यांत पाहांवा. सत्पंथ सत्य धर्माचे आचरण करून जीवन्मुक्ती मिळवावी व त्यायोगे अमरपदाचे – आत्मानंदाचे सुख अनुभवावे. शरीर हे नाशवंत आहे. जीवन हे दीर्घ स्वप्न आहे. जगत् हे एक दीर्घ नाट्य आहे. आपणा सर्वांस त्यांत आपापल्या भूमिका बजवायच्या आहेत. नट ज्याप्रमाणे आपलें स्वत्त्व कायम ठेवून निर्लीप्त - अलिप्तपणे नाट्य करीत असतो तद्वत या संसार मोहजालातून आपणास सर्व कर्मे करुन अलिप्त राहायचे आहे. त्यासाठीं अविद्या–अंधपणाचा त्याग करावा, ज्ञानदृष्टीचा अवलंब करावा काम क्रोध मत्सर यांना थारा देऊं नका. सदैव सद्‌गुरुंचा – अनुभवी गुरुंचा दासानुदास होऊन वागा. त्यांचा अनुग्रह प्राप्त करून हे ज्ञान आत्मसात करा. त्यायोगें आपण आपलाही उध्दार करूं व आपल्याबरोबर एकशे एक पिढींचा सुध्दा उध्दार होईल. अशा प्रकारचा अमरपदाचा अमरमार्ग अस्थिर-चंचल अशा मनास स्थिर करणाऱ्या साधना शिकविणाऱ्या अथर्ववेदावरून इमामशाहांनी उपदेशिलेला आहे.

कलियुगाच्या युगधर्माची शिकवण देतांना इमामशाहांनी घटपाट स्थापनेचे एका मंत्रात म्हटलें आहे कीं –

> स्वामी तमे ॐकार साहे आपोआप, शक्तिरुपी जपाव्यो जाप. शक्तिरुपी रच्यो संसार,
> शक्ति वेद उत्तम आचार, हेठे शक्तीने उपर कला पाचे देव तो सभरे भर्या, आसन
> शक्ति नुरे तेज, नुरे सरजा निरंजन हेज, श्रेष्ठ शक्ति माटी सही, माटीविना न
> उपन्या कोई, माटी घट ने माटी पाट, माटी मोक्ष मुक्तीनी वाट.

हे स्थूल शरीर पृथ्वी तत्वाच्या आधिक्याने बनलेले आहे. युगधर्मानुसार पृथ्वीतत्व या शरीरात अधिक प्रमाणाने आहे. सत्ययुगात वायुतत्व अधिक म्हणून प्रेतसंस्कार वनदागाने होत असे, त्रेतायुगांत जलतत्व अधिक म्हणून प्रेतसंस्कार जलदागाने होई. द्वापारयुगात तेज तत्व अधिक म्हणून अग्नीदाग दिला जाई व कलियुगात पृथ्वी तत्व अधिक म्हणून प्रेत संस्काराच्या क्रिया दफन पद्धतीने कराव्या म्हणजे भूमीदाग करावा असा उल्लेख अथर्ववेदात ही १८ व्या कांडात आढळतो. प्रेतसंस्काराविषयी अथर्ववेदाची आज्ञा आहे की –

> ये निखाता ये परोप्ता ये दग्धा ये चोध्दिता ।
> सर्वास्तानग्ने आवह पितृन् हविषे अत्तवे ॥
>
> – अथर्ववेद १८।२।३४

हे अग्निदेवता ! जे पितर (जीवात्म्याचे कलेवर) जमिनीत गाडलेले आहेत, जे पाण्यात दूर वाहून गेलेले आहेत, जे अग्निने जाळून टाकलेले आहेत, तसेच जे जमिनीवर उघडयावर हवेत सोडून दिलेले आहेत अशा सर्व पितरांना तू हवी भक्षणार्थ घेऊन ये.

वस्तुतः आजकाल हिंदुलोक प्रेत अग्नीत जाळतात आणि नंतर तिसऱ्या दिवशी एक दगड (अश्मा) घेऊन त्यास जमिनीत गाडून टाकतात. तसेच मृत व्यक्तीच्या अस्थि गोळा करून एका मातीच्या मडक्यात ठेवतात अथवा एखाद्या झाडावर लटकावितात. कित्येक लोक तर जवळपास असलेल्या नदीच्या पाण्यात टाकून देतात. जर हे ही नाही झाले तर कणकेचा अथवा तांदूळाचा पिंड बनवून त्यावर [मृत पितराप्रित्यर्थ पूजा करून तो पिंड नदीत टाकून देतात. मेल्यानंतर दहाव्या दिवशी वरील प्रमाणे पिंड बनवून घराच्या बाहेर पटांगणात खुला ठेवतात कावळयाने त्यास स्पर्ष करावा हा त्यातील उद्देश्य असतो. जोपर्यंत कावळा त्यास स्पर्श करीत नाही तो पर्यंत अंतेष्टी संस्कार पूर्ण झाला नाही असे समजतात. हा संकेत प्रेतास पारसीया सारखे हवेत खुले सोडण्याच्या क्रियेचा आहे. अशा प्रकारच्या या चार विधी हिंदुत सुध्दा निरनिराळ्या रूपाने पाळल्या जातात. त्यातील भूमीदाग देण्याची एक प्रथा आहे त्या विषयी अथर्ववेदात म्हटलेले आहे की, –

> अभि त्वोर्णोमि पृथिव्या मातुर्वस्त्रेण भद्रया ।
> जीवेषु भद्रं तन्मयि स्वधा पितृषु सा त्वयि ।। अथर्व. १८।२।५२

हे प्रेता ! तुला माता पृथ्वीच्या कल्याणकारी वस्त्राने आच्छादित करतो अर्थात् जमिनीत तुला गाडतो. जीवीतात जे कल्याण आहे ते माझ्यात येवो म्हणजे मला प्राप्त होवो व पितरात जी स्वधा आहे ती तुझ्यात येवो म्हणजे तुला प्राप्त होवो. यावरून वेदात स्पष्ट शब्दात भूमीदागाचे समर्थन केलेले आहे.

> इदमिद वा उ नापरं दिवि पश्यसि सूर्यम् ।
> माता पुत्रं यथा सिचाभ्येनं भूम ऊर्णु हि ।। अथर्व. १८।२।५०

हे मृत पुरुषा तूच एक आहेस जो द्युलोकात सूर्य पाहत आहेस, दुसरा नव्हे. ज्या प्रमाणे माता पुत्रास आपल्या पदराने झाकते त्याप्रमाणे हे पृथ्वी, तू सूध्दा या मृत पुरुषास चारही बाजूंनी झाकून घे.

> असौ हा इह ते मनः ककुत्सलमिव जामयः ।
> अभ्येनं भूम ऊर्णु हि ।। अथर्व. १८।४।६६

हे अमूक नामधारी प्रेत इथे तुझे मन आहे. हे पृथ्वी ! ज्या प्रमाणे स्त्रीया आपल्या बालकांना वस्त्रांनी झाकतात अथवा कुलवानस्त्रिया आपले शिरकमल झाकतात त्या प्रमाणे तूं या प्रेतास सर्व बाजूंनी झाकून टाक.

> पृथिवीं त्वा पृथिव्यामावेशयामि देवो नो धाता प्रतिरात्यायुः ।
> परापरैता वसुविद वो अस्त्वधा मृताः पितृषु सं भवन्तु ।।
> अथर्व. १८।४।४८

मृत्तिकेने बनलेल्या हे मृतपुरुषा ! तुला या मातीत पुरतो. अर्थात् मृत्तिकेचे बनलेले हे स्थूल शरीर जमिनीतच गाडतो. हे धारक देवा, आमचे आयुष्य वाढू दे. हे पितर प्रकृति नुरुप देह धारण केलेल्या जीवात्म्या तूं आमच्या पासून खूप दूर गेलास. तुझ्याकरितां धाता देव आश्रय रूप होवो. आणि या मृत पितरांची उत्तम प्रकारची गति होवो अर्थात पितृलोकात तो जाऊन मिळो.

या अनेक श्लोकावरुन प्रेत संस्कार भूमीदागाने केल्यास कोणताही प्रत्ययवाय नाही. कारण, भूमिदाग, जलदाग, अग्निदाग, व वायुदाग हे चारही वैदिक प्रथेवरुनच प्रचलित आहेत. म्हणून सद्‌गुरु इमामशाहांनी युगधर्मानुसार प्रेतास भूमिदाग देण्याची आज्ञा केलेली आहे.

खाकका पुतला बना, खाककी तसबीर है ।
खाकमें मिल जायगा, खाक दामनगीर है ।।

या सर्व विवेचनावरुन समजून येते कीं सद्‌गुरु इमामशाहांनी दिग्दर्शित केलेला सतपंथ हा अनादि काळापासून प्रचलित असलेला युगधर्मानुसार बाह्य स्वरुपात बदल झालेला पण अंतरंग रुपाने मूळ सनातन वैदिक धर्माचाच एक भाग आहे - शाखा आहे. देश काळ व वातावरण – परिस्थितीनुरुप धर्माचे बाह्यांग बदलत असते. सतपंथात निर्गुण निकाराची उपासना, ॐ प्रणवब्रह्माचे स्मरण चिंतन, ज्योतिस्वरुप भगवंताचे ध्यान, कलश घटपाटाची उपासना, दशवतारांची उपासना, शुक्रवार चन्द्रदर्शनाचे व्रत उपवास करणे, भूमिदाग देणे वगैरे अनेक प्रथांचे मूलतः समालोचन न झाल्याने व विधर्मी लोकांनी सत्पंथी संप्रदायाच्या अनुयायावर केलेल्या अत्याचाराने या संप्रदायाचा पाहिजे तसा प्रचार होऊं शकला नाही.

Attempt to show Satpanth as victim, which is false.

तथाकथित हिंदुधर्मीयांनी सुध्दा अनेक अनिष्ट रुढींना जोपासून व अन्योन्य देवीदेवतांच्या आसुरी उपासनांना सामाजिक रुढीत अग्रगण्य स्थान देऊन, सत्पंथासारख्या सत् उपासकांची ते केवळ इमामशाह प्रणित मार्गाचे आचरण करतात म्हणून वेळोवेळी त्यांची अवहेलना केली, त्यांना बाटलेले मुसलमान समजून विटंबना केली. अर्धदग्ध धर्म पाळतात, विधर्मीयांच्या धर्माचे अवलंबन करतात असे समजून त्यांना अतोनात छळले, वाळीत टाकले, हटकले, दंड आकारले व धर्माचा त्याग करायला भाग पाडले. सत्पंथी अनुयायावर अनेकानेक घाणेरडे व ओंगळ स्वरुपाचे आरोप करुन त्यांच्याशी रोटी – बेटी व्यवहार बंद करुन त्यांची मानहानी करण्याचा प्रयत्न केला. पण एवढा खटाटोप करुन ही शेवटी निष्पन्न कांहीच निघाले नाही. शांत आणि निर्विकार वृत्तीने राहून व केवळ गुरुंची शिकवण शिरसावंद्य मानून सत्पंथी अनुयायांनी कालक्रमणा केली. " मारु तारु मेलीने छांडो वाद न करसो विरा नही तो खासो फुकट फेरा " या वचनानुसार त्यांनी कोणत्याही विवाद्य विषयाला बळी न पडता आपल्या जीवनाला – विचारांना प्रक्षुब्ध होऊ दिले नाही.

सतपंथाच्या अनुयायांमध्ये सर्व हिंदु लोकच असून त्यात लेवा – कडवा – पाटीदार, मराठा, गुजर, राजपूत भावसार, साळी, माळी, बारी, कासार, सोनार, राणा, काछीया, कोळी, रबारी वगैरे अनेक जाती उपजातींचा समावेश आहे. कच्छ, सौराष्ट्र, भावनगर, खंबात, उत्तर गुजराथ – साबरकांठा, दक्षिण गुजराथ, काठा विभाग, महाराष्ट्रातील जळगांव धुळे जिल्हा (पूर्व व पश्चिम खानदेश) मध्य प्रदेशातील निमाड विभाग, बनासकाठा, विदर्भात आकोट – अंजन वगैरे भागात या पंथाचे अनुयायी बहुसंख्येने आहेत. कित्येक ठिकाणी गुप्तरीतीने हा पंथ पाळण्याची अंधपरंपरा आहे.

Gupt Panth = Hidden Sect

या पंथाचे अनुयायांनी साहित्य विकासात फारसे लक्ष घातले नाही. परंतु जुन्या काळचे लोक इमामशाहांची भजने म्हणजे ज्ञानपदे मुखपाठ करीत असत. या पंथाचे जुन्या काळचे शेतकरी लोक सुध्दा शेतीची कामे करता करता या पदांचे पाठांतर करीत. असत इतर अन्य व्यवसायी लोक सुध्दा फुरसतीच्या वेळात पदांचे पाठांतर करीत. सर्व ज्ञानपदे हस्तलिखीतच व पाठांतरीतच (मौखिकच) होती. ती पदे गाण्यांचा त्यांचा विशिष्ठ ताल-लय असल्याने ऐकणाऱ्यांची हृदये ती ऐकून तल्लीन होऊन जात, विशेषतः ही भजने रात्रीच्या वेळी सत्संग व पूजा यज्ञविधीच्या वेळी म्हणण्याची प्रथा होती. त्यांनी ही ज्ञानपदे शब्द रुपाने कागदावर उतरविण्याला फारसे महत्वच दिले नाही. उलट हे ज्ञान अश्रध्दाळू माणसाच्या हातात गेल्यास त्याचे विडंबन होईल असे ते मानीत असत म्हणून या पंथाचा योग्य तो साहित्यीक विकास आढळत नाही.

या संप्रदायाच्या विकासास सर्वच विभागातून फारमोठा प्रतिबंध झाला. यास प्रमुख कारण म्हणजे संप्रदायाचे प्रवर्तक जातीने सैयद, ते वैदिक धर्माबद्दल काय सांगू शकतील; हा केवळ वरून देखावा आहे, आतून तर इस्लाम धर्माचा प्रचार असावा हा संभ्रम व ते मुसलमान जातीचे असूनही हिंदु धर्माचा उदो उदो कां करतात ? म्हणून मोंगलांनी त्यांना छळले. त्यांचे तत्त्व ध्येय, त्यांची पात्रता, योग्यता, ज्ञान वगैरे सर्वाविषयी दुर्लक्ष होऊन दोनही बाजूंनी उपेक्षा त्यांना पत्करावी लागली. समाजातील उच्चभ्रू लोकांनी सुध्दा त्यांच्या ज्ञानमार्गाची उपेक्षाच केली, कारण सत्ता व वैभवाच्या बळावर जीवन समृध्द करून घेण्यास ते समर्थ होते. गोर गरीब वा उपेक्षित समाजास जीवन सुखमय व आनंददायी करण्यास धनासारखे साधन नसल्याने अन्योन्य धार्मिक उपायांनी ते जीवन सुखमय करण्याचा प्रयत्न करतात व तसेच लोक संत महात्मा, औलिया, पीरबाबांच्या भजनी लागतात. त्याकाळात सद्गुरु इमामशाहाविषयी दैवी विभूति एवढ्या मर्यादेतच पाहण्याचा त्या समाजाचा दृष्टीकोन असल्याने त्यांच्या सेवेने व कृपेने आपण सुखी होऊ. एवढ्याच भावनेतून ते त्यांच्या संप्रदायात सामिल झाले. दृढश्रध्दा अढळ असल्याने त्यांचे जीवन सुखी समृध्द तर झालेच पण त्याबरोबर सत्संग, सभा, चर्चा, पूजा अर्चा वगैरे साधनांनी त्यांनी आपले अध्यात्मजीवन सुध्दा उन्नत केले. पण मुसलमान गुरुचा अनुग्रह घेतला म्हणून इतर समाजबांधवांनी त्यांचा तिरस्कार करून अवहेलना केली. त्यामुळे सतपंथी अनुयायी वर्ग सामाजिक कार्यक्रमामधून अलिप्त राहू लागला. हेच वैगुण्य कालांतराने दृढमूल झाले म्हणून सत्पंथ संप्रदायाचा जसा पाहिजे तसा उत्कर्ष होऊ शकला नाही.

Clearly accepts that Imamshah was muslim

This is completely false statement. See Satpanth Rahasya [691]. Shankarcharya, in fact said Satpanth is muslim.

एकोणविसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्यां शतकाच्या पूर्वार्धात खानदेशातील या सतपंथ समाजास ज्ञातीबांधवांशी खूप मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागले. रोटी बेटी व्यवहारात अनेक प्रकारचा विरोध व अपमान सहन करावा लागला. सत्पंथ संप्रदाय वेदान्तर्गत आहे किंवा वेदबाह्य आहे असे अनेकानेक प्रश्न शंका कुशंका उपस्थित होऊन त्यांत सतपंथाची नांव वेदान्तर्गतच्या किनाऱ्यास लागली. अनेकानेक विचारवंत पुढारी, समाजधुरीणांनी प्रयत्न करून श्रीमत् शंकराचार्यांकडून सतपंथ संप्रदाय वेदान्तर्गत असल्याचे मान्यतापत्र मिळवून शेवटी सतपंथीयांना जातीत सामावून घेतले. त्यांत सतपंथीयांचे बरेच श्रम द्रव्य व शक्ति वाया गेली व त्यामुळें संप्रदायाचा सांस्कृतिक वाङमयीन अभ्यास होऊ शकला नाही.

False Statement

काही विदेशी लोकांनी म्ह. W. Ivonus सारख्यांनी या सत्पंथाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला पण तो अभ्यास धार्मिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचा म्हणता येणार नाही, कारण त्यांना हिंदु समाजाचा अभ्यास नव्हता व त्यांची माहिती परावलंबी वाटते. नंतर Mr. Forbes यांनी सन १७८१ साली या संप्रदायाच्या मूळ ठिकाणाला 'पीराण्याला' भेट दिली. त्यांनंतर Mr. Ferguson यांनी भेट दिली. त्यानंतर सन १८७७ मध्ये Mr. J. F. Homero यांनी भेट दिली. परंतु या सर्व लोकांनी तेथील बांधकामाच्या वास्तुशास्त्राचाच अभ्यास केला व त्याचे सुंदर वर्णन करून ठेवले आहे अशी माहिती Bombay Gazeteer मध्ये मिळते. इतर History of Gujarath. गुजराथनु पाटनगर अमदाबाद, तवारीखे नवसारी, गुजराथ सर्वदर्शन वगैरे अनेक पुस्तकात जी थोडी या पंथाबद्दल माहिती मिळते ती Bombay Gazeteer वर आधारीत असल्याचे आढळून येते.

Conveniently, Pirana is missing... May be because it is main central organisation which gives Satpanth a muslim identity.

पीराणा हे या पंथीयांचे मुख्य पवित्र धाम आहे. गुजराथमध्ये आभाराम (देवा), कीकीबाई (रुण), नायाकाका (कुकस) ही या पंथीयांची मुख्य धर्मस्थाने आहेत. त्या शिवाय भावनगर, अंगिया, कादिया, खंबात, आवाखल, सुरत, वडाली वगैरे अनेक गांवी या सतपंथाची बरीच मंदीरे आहेत. कांठा विभाग व साबरकांठा जिल्ह्यात तर गांवोगांव सत्पंथी मंदीरे आहेत. प्रत्येक ठिकाणी स्थानिक लोक अथवा पंथिय लोक त्याला अत्यंत भक्तिभावाने मान देतात. परंतु ज्ञान प्रचाराचे कार्य त्याठिकाणी कांहीही पाहण्यात येत नाही, भारतभर सर्वच सत्पंथी मंदीरामध्ये, नित्यपाठ, दर्शन, सत्संग, पूजापाठ करतात पण ईमामशाहांचा मुख्य हेतु जो ज्ञान प्रसार तो मात्र आढळत नाही. कारण शिक्षीत समाज त्यात भाग घेत नाही.

या संप्रदायाची सविस्तर माहिती आणि सखोल अभ्यास फक्त खानदेशातील फैजपूर या गांवी सुमारे ३०० वर्षापासून जुन्या असलेल्या सतपंथी मंदीरात मिळू शकतो. सतपंथाचे रक्षण याच ठिकाणी झाल्याचे आढळून येते. या ठिकाणी तीनशे वर्षापासून या मंदीराची वहिवाट चालू आहे. या मंदिरात धार्मिक श्रध्दाळू पाटीदार लोक अगदी बालपणापासून आपल्या मुलाला धर्मशिक्षणासाठी व रक्षणासाठी अर्पण करतात व त्या बालकाला तेथील तशाच बालब्रह्मचारी गुरु कडून धार्मिक शिक्षण मिळते. या ठिकाणच्या गावी[illegible]

This is false statement. Infact Kutch was never ruled by any muslim ruler. Khandesh was ruled by Muslims. The name reflect this as it has the word "Khan"

सर्वच धर्मगुरु हे बालब्रह्मचारी असतात. ते शेवटपर्यंत मंदीरातच राहतात व व्यावहारिक दृष्टया इतर नातेवाइक अथवा समाज यांच्याशी त्यांचा संबंध नसतो.

या मंदीरात सतपंथाचे जे मूळ स्वरूप अस्तित्वात आहे, तसे अन्यत्र कोठेही नाही. त्याचे कारण या पंथावर वा पंथीय वाङ्‌मयाग्वर गुजराथमध्ये जे भरगच्च मुसलमानी हल्ले झालेत तसे खानदेशांत आणि त्यातल्या त्यात फैजपूरच्या परिसरात मुळीच झालेले नाहीत म्हणून या पंथाचे व साहित्याचे रक्षण मूळ स्वरूपात येथे आढळते.

खानदेशात लेवा पाटीदार लोक कसे आलेत या बद्दल फारसे मतभेद नसून हे लोक गुजराथमधून आलेत असे सांगण्यात येते. परंतु हे लोक निश्चित कोणत्या अडचणीमुळे पावागड सोडून गेलेत याबद्दल निश्चित माहिती नाही. काहींच्या मते दुष्काळ तर काहींच्या मताने महंमद बेगडयाच्या स्वारीमुळे असे सांगण्यात येते. Bombay Gazeteer Vol. No, 12 खानदेश व Encyclopaedia Vol. No. 3 मध्ये या खानदेशातील लेवा पाटीदार लोकांबद्दल माहिती मिळते. या लोकांमध्ये फक्त चार पंथ प्रचलित आहेत. १) सतपंथ २) स्वामीनारायण ३) वारकरी ४) महानुभाव पंथ. या पैकी महानुभाव व वारकरी पंथ हे महाराष्ट्रात मुळचेच चालू होते. परंतु स्वामीनारायण आणि सतपंथ हे दोन पंथ मात्र गुजराथ मधून या लोकांनी बरोबर आणलेत. कारण स्वामी नारायणाचे मूळस्थान हे वडताल या गांवी गुजराथमध्ये आहे आणि सतपंथीयांचे मूळस्थान अमदाबाद जवळ ११ मैलावर पीराणा या गावी आहे.

सतपंथाची सुरूवात पाहू गेले असता आपणाला इमामशाह व त्यांच्या काळापासून बरेच मागे जावे लागेल. काही पुस्तकांच्या मता प्रमाणे पीर शमसच्या नंतर पीर सदरुद्दीन पासून जे लोक इस्लामी धर्माच्या प्रचारासाठी हिंदुस्थानात आलेत त्यांनी त्यांच्या धर्म प्रचाराच्या विशिष्ट पद्धतीला सतपंथ नाव दिल्याचे आढळून येते. काहींच्या मते नवसारीचे नुर सतगुरु यांनी सतपंथाला सुरूवात केली असे आहे. तर काही सतगुरु हेच इमामशाह असा दावा करतात. एकंदरीत माहितीवरुन सतपंथ हिंदुस्थानात चालू झाल्याला एक हजार वर्षाचा कालावधि आढळून येतो आणि त्यांच्याच मालिकेतील इमामशाहा यांनी पाचशे वर्षापूर्वी इस्माइली धर्म प्रचारकांच्या अनिबंध वागणुकीला कंटाळून स्वतःचा स्वतंत्र प्रचार चालू केला. इमामशाह महाराज हे अलौकिक सिध्द पुरुषांपैकी एक होते. परमार्थाचा एक मार्ग दर्शक या दृष्टीने आपल्या शिष्य-वृंदांच्या धार्मिक रूढीस व कल्पनास न दुखविता त्यांनी उपदेश केला. हे उपदेशक वत्यांनी केलेला उपदेश यास पूज्य मानणारे सतपंथी म्हणवले जातात. इमामशाहा यांच्या शिष्य समुदायाने त्यांचा एक स्वतंत्र पंथ स्थापन केला व त्याला 'इमामशाही पंथ' अथवा 'पीराणा पंथ' म्हणू लागले, लोक आदराने त्याला 'सतपंथ' देखिल म्हणतात. परंतु मुळ सतपंथापासून हा पंथ संपूर्णतः वेगळा पडतो. सतपंथाच्या अनेक शाखा आहेत त्यांच्याशी या इमामशाही पंथाच्या शाखेचा संबंध दिसून येत नाही. यांचे अनुयायी सर्व हिंदूच आहेत आणि त्यांची आचार संहिता संपूर्ण हिन्दुसनातन धर्म मार्गाप्रमाणेच आहे.

Here it is accepted that Satpanth was founded by Imamshah about 500 years ago

Connection of Multan

बऱ्याच पुस्तकांत जी सतपंथाबद्दल माहिती मिळते त्यात सातीया, आठीया, पाचीया व नूरशाही या पंथामध्ये इमामशाही पंथ एकत्रीत करुन टाकलेला आढळतो. परंतु इमामशाहा हे सतपंथ या शाखेपासून स्वतंत्र झाले होते व त्यांनी आपला स्वतःचा वेगळा पंथ चालवला होता. तसेच त्यांनी मुलतान येथील खोजा लोकापुढे शपथ घेतली होती कीं मी एकहि मुसलमानाला उप्देश देणार नाही. खरोखरच त्यांच्या उपदेशात एका शद्बानेही मुस्लीम धर्माचा अथवा रिवाजांचा उल्लेख नाही व एकही मुसलमान त्यांचा शिष्य नाही. एकदा एक पठाण त्यांच्यावर प्रभावीत होऊन त्यांच्याकडूनच अनुग्रह घेण्याचा हट्ट करुन बसला, परंतु इमामशाहांनी त्याला दुसऱ्या एका मुसलमान गुरुकडे पाठवले व शेवटपर्यंत आपले वचन सत्य करुन दाखविले.

Birth of Imamshah

भारतात या पंथाची स्थापना सुमारे पाचशे वर्षापूर्वी सद्‌गुरु इमामशाह यांनी केली. याचा प्रचार आजपर्यंत पंजाब, सिंध, कच्छ, गुजराथ, खानदेश, वऱ्हाड, नेमाड वगैरे प्रान्तातून प्रामुख्याने आढळून येत आहे. इ. स. १५ व्या शतकाच्या मध्यास इमामशाह महाराज या नावाचे एक प्रसिद्ध औलिया होऊन गेले. हे महान बुद्धीमान, धर्मपरायण व सदाचारी असून लोकोत्तर दैवी शक्तीचे प्रवर्तक होते. यांचा जन्म हि. स. ८५६ म्हणजे इ. स. १४५२ मध्ये पंजाबात 'उंच मुलतान' या गावी झाला. हा गांव भागलपूर राज्याच्या अहमदपूर परगण्याच्या ताब्यातील होय. ह्यांचे वाडवडिल हे इराणमधून भारतात आले. ते सदाचारी, धार्मिक, प्रवृत्तीचे व शाही घराण्यातले होते. हे सैयद घराणे असून शियापंथी होते असे म्हणतात. इमामशाहांच्या वडिलांचे नाव कबीरुद्दीन होते. इमामशाहा हा कबीरुद्दीनचा तिसऱ्या बायकोचा तिसरा मुलगा आहे. यास त्याच्या वडिलांनी गुजराथेत पाठवले. यांचे मूळ नांव सय्यद अब्दुल रहिम होते. तारुण्यात त्यास इमाम म्हणत. पुढे त्यांचे शिष्य लोक त्यांना इमामशाह म्हणू लागले. इमामशाहा गुजराथेत येतांना सिंध प्रान्तात 'जुणबदिना' येथे आले. तेथे पूर्वी बनलेल्या सतपंथी खोजांनी त्यांची काही व्यवस्था न करता त्यास पूजाघरातून काढून दिले व बेअदबी केली. म्हणून ते इराणी इमामांची मर्जी संपादण्यासाठी इराणमध्ये गेले. तेथे कंदहार (अफगाणीस्थान) नावाच्या गावी इमाम-शाहांची गादी होती, तेथे कांही दिवस राहिल्यानंतर त्यांच्या काकांचा 'ताजदीन' चा खून झाल्याचे ऐकून 'जूणबादिना' ला परत आले. येतांना बरोबर हाजरबेग ह्या शिष्याला घेऊन संवत १५०८ च्या भाद्रपद शु॥ ११ ला ते गुजराथमधिल अटुणा या गावी आले. तेथील एका मशिदीत मुक्काम केला. मशिदीत आल्यावर ही इमामशाहाने नमाज न पढल्यामुळे मुसलमानांनी त्यास विचारले असतां त्यांनी मशिदीच्या मनोऱ्यासच नमाज पढविण्यास लावले. ही गोष्ट गांवात पसरुन ती बादशहा 'महंमद बेगडा' यास कळली म्हणून त्याने इमामशाहास बोलावले व त्यांचे ज्ञान व चमत्कार यावर खूष होऊन त्याने आपली मुलगी इमामशाहांचे मुलास दिली, असे कांही काव्यातून वाचण्यात येते.

Imamshah comes from Saiyed family. Son of Kabiruddin. His true name is Saiyed Abdul Rahim

Hajarbeg is from Afghanisthan. Came to Gujarat on 07-Sep-1451, which seems to be a wrong date

In other books, this incident is about Delhi. This is wrong story.

नंतर ते अमदाबादहून ११ मैलावर असलेल्या गीरमथा गांवी आले. या भागात सतत तीन वर्षे भयंकर दुष्काळ पडला होता. त्या ठिकाणी आल्यावर यांच्या तोंडातून उद्‌गार निघाले की 'आज पाऊस पडेल' आणि खरोखरच त्या रात्री भरपूर पाऊस पडला. लोक अत्यानंदाने

Story of arrow piercing Lion's ear is not there. Which means such story is concocted.

दुसऱ्या दिवशी इमामशाहांना भेटायला आले पण नदीच्या भरमसाठ पुरामुळे त्यांना महाराजा–कडे येता येत नव्हते. तेव्हा इमामशाहांनी कागदाची होडी बनवून त्यांत बसून त्या लोकांना भेटायला गेले. तेव्हा पासून गुजराथ मधिल पाटीदार वर्ग त्यांना अद्वितीय विभूती म्हणून मानू लागले. एका पाटीदाराच्या मृत मुलास त्यांच्या विनंतीवरून दया येऊन त्यांनी जिवंत केले, तेव्हा त्याने त्यांना मोठे बक्षिस देऊ केले, पण इमामशाहांनी त्यास सांगितलें कीं ज्या पडित जमिनीवर तीर फेकीन ते ठिकाण माझ्या सतपंथाला वस्ती करण्यास दे. ह्या गोष्टीस पाटील कबूल झाल्यावर इमामशाहांनी अरण्याच्या दिशेने तीर फेकला, त्या ठिकाणी इमामशाहांनी आपले स्थान स्थीर केले आणि संवत १५२४ ते १५२८ मध्ये त्या भूमित भव्य दर्ग्याची वास्तु उभारली गेली. असे सांगतात की ही वास्तु त्यांनी दीड लाख रुपये खर्च करुन बांधली आहे.

Imamshah himself built Dargah at Pirana (not temple)

या ठिकाणी वास्तव्य करुन इमामशाहांनी साध्या सरळ भाषेत लोकांना अध्यात्मिक विकासाचा मार्ग दाखविला. या ठिकाणालाच पुढे 'पीराणा' हे नाव प्राप्त झाले व कांही भाविक लोक त्यास 'इमामपूर' 'हेमपूर' 'निकलंकीधाम' 'कुवारीकाक्षेत्र' वगैरे अनेक नावांनी ओळखतात पीराणा हे सत्पंथी लोकांचे मुख्य आणि परमपवित्र तीर्थस्थान गणले जाते. सतपंथात इमामशाहा हे मुख्य संस्थापक मानले जातात. त्यांच्या शिष्यांपैकी चार-मुख्य समले जातात. संत आशाराम, साध्वी कीकीबाई, संत नायाकाका व संत शाणाकाका. यांच्यापैकी शाणाकाका हे इमामशाहानंतर त्यांच्या पीराणा येथील मुख्य गादीवर बसलेले होते, आणि असा नियम चालत आलेला आहे कीं, पीराणा येथील मुख्य गादीवर पाटीदारच गादीपति होतात. दुसरे तिन्ही शिष्य वेगवेगळ्या गांवी स्वतंत्र स्थान बनवून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांची मंदिरे देखिल सतपंथी लोक यात्रेचे ठिकाण या उद्देशाने मानतात व भक्ति भावाने दर्शनाला जातात. सतपंथात पाचीया, सातीया व आठीया असेही काही भाग आहेत.

Accepts that there is Roza in Pirana

इमामशाहांचा रोजा पीराणा येथे आहे, तो फारच सुंदर कोतरकाम केलेला पक्क्या बांधणीचा आहे. आठही बाजुस आठ घुमट व मध्य भागी मुख्य नववा घुमट आहे. वास्तु फारच सुरेख भव्य व रमणीय आहे. दरवर्षी हजारो लोक दर्शनास येऊन तेथे अपार दानधर्म करतात. इमामशाहाच्या हयातीपासूनच तेथे सदाव्रत-अन्नसत्र व अखंड घृतज्योत अव्याहतपणे चालू आहे. त्यांचा अनुयायांची संख्या सुरवातीपासूनच खूप मोठी होती. त्यांत मुख्यत्वे लेवा व कडवा पाटीदार, कोळी, काछीया सोनार, कासार, घांची, गोलाराणा तसेच थोडेबहूत वाणी ब्राह्मण पण आहेत. पण कोणीही मुसलमान, शेख अथवा मुमना पीराणा सत्पंथाचा अनुयायी नाही. इमामशाहांचे अनुयायी मुख्यत्वाने सुरत जिल्हा खानदेश, बऱ्हाणपूर, कच्छ, भावनगर, बडोदा खंबात चरोतर आणि असदाबाद विभागात आहेत.

पीराण्यास आणखी दुसरे चार स्थाने आहेत. त्यापैकी नुरशाहीचा एक रोजा आहे. त्यांचे अनुयायी मुमन आहेत. ते मुळचे हिंदुच आहेत पण सैयदांनी जबरदस्तीने बाटवून त्यांना मुमन केले आणि अंधपरंपरेने ते लोक स्वतःला मुसलमानच समजून बसले.

तिसरे ठिकाण सुराभाईचे आहे. तेथे रोझा नाही पण गादी आहे. रबारी लोक त्यांना मानणारे आहेत. पाटण प्रगण्यातील बालेसण गावातील रबारी, शीहोरमधिल सोनार आणि कच्छ, भूज अंजार मांडवी तसेच मुंबई येथील सोनार व कासार हे सुराभाईच्या गादीचे अनुयायी आहेत. पीराण्यास पाचीया म्हणून हे ठिकाण प्रसिद्ध आहे.

चौथे ठिकाण बालामहंमदशाहांचा रोझा. त्यास सातीया असे म्हणतात. त्यांचे अनुयायी वसो, पेटलाद, खंबात, नडियाद व बोरसद वगैरे भागात विखुरलेले आहेत.

पाचवे ठिकाण बाकरअलीचे. त्यांच्या ठिकाणाला आठीया म्हणतात. त्यांचे अनुयायी काछीया, कुणबी, कोळी आणि सुतार आहेत. त्यांचा मुख्य भाग सुरत, बडोदा, अमदाबाद, महीकांठा आणी काठेवाड–सौराष्ट्र असा आहे.

जे लोक इमामशाहांना गुरुस्थानी मानतात व त्यांच्या उपदेशाप्रमाणे धार्मिक आचरण करतात, त्या लोकांचा सतपंथी म्हणवून देखिल इतर सातीया, आठीया वा पाचीया लोकांशी संबंध नाही आणि यांचे धार्मिक रिवाज संपूर्ण वेगळे आहेत. तसेच इमामशाहांचे सतपंथी लोक फक्त इमामशाहांच्या चार शिष्यांनाच मानतात परंतु त्यांच्या वंशावळीला मानत नाहीत. इमामशाहांच्या सतपंथात वंशावळीला स्थान नाही असे त्यांच्या वाङ्मयावरुन दिसून येते.

Attempt to seperate Imamshah from his descendents

सत्पंथ–सत् पथ–सत् पदाकडे जाण्याचा पोहोचण्याचा मार्ग, अशी इमामशाहांची मान्यता आहे. ते म्हणतात की, –

" पंथी रे कोई खोटा नथी, चांदरण मार्ग नयने जोये ।। "

कोणताही मार्ग खोटा अथवा निरुपयोगी नाही, परंतु या पंथाच्या तत्वरुपी प्रकाशाकडे दृष्टी करुन पहा, या प्रकाशाचा अनुभव करुन पहा. इमामशाहांनी त्यांच्या भजनाद्वारा अत्यंत सरल भाषेतून व व्यावहारिक उदाहरणे देऊन लोकांना ब्रह्मज्ञानाचा–आत्मज्ञानाचा उपदेश केला आहे. त्यांच्या उपदेशात सत्य आणि शुद्ध नीतीचाच समावेश झालेला आहे. म्हणून या पंथास सत्पंथ असे नांव पडले. सत्पंथी लोक शुद्ध पवित्र आचरण करुन व्रतांचे पालन, घटपाट पूजा यज्ञविधीचे आचरण करतात. मादक पदार्थांना त्याज्य समजतात. म्हणून अभक्ष्य–भक्षण व अपेयपान या पासून ते अलिप्त राहातात. कुलाचार पाळणे व स्पर्शास्पर्श यांचा सूक्ष्म विवेक ठेवणे यांतही ते चुकत नाही. परमेश्वर एक आहे जेथे निश्चय कराल तेथेच तो तुम्हास लाभेल असे त्यांच्या गुरुंचे त्यांना सांगणे आहे.

Imamshah is Saiyed

इमामशाहांच्या अलौकिक दिव्य प्रभावामुळे व ते स्वतः सैयद फकीर असल्याने त्यांचे अनेक सैयद मुसलमानही शिष्य होऊ पाहात पण त्यांना इमामशाहांनी स्पष्ट नकार दिला. तसेच त्यांच्या वेदवेदांताच्या गहन अभ्यासामुळे व अध्यात्मिक शक्तीमुळे व ते स्वतः दैवी विभूति

False and concocted story

असल्यामुळे त्यांच्या बाबतीत बरेच मुसलमान व बरेच कट्टर हिंदु हे दोन्हीही त्यांचा द्वेष करुं लागले, तर कित्येक हिंदु श्रद्धाळू लोक त्यांचा अनुग्रह घेऊ लागले. त्यांचा श्रद्धेचा व दानधर्माचा ओघ इमामशाहाकडे त्यांच्या हयातीत व त्यांच्या नंतरही पीराण्यास चालू राहिला. त्या संपत्तीच्या मोहाला बळी पडून सैयद लोकांनी या ठिकाणावर आपला हक्क गाजवण्यास सुरुवात केली व त्या काळातील मुसलमानी सत्तेच्या वर्चस्वाचा फायदा घेऊन या इमामशाहाच्या हस्त लिखीतात स्वतःच्या मुस्लिम धर्माप्रमाणे फेरफार घडवून आणले. लोकांच्य अशिक्षीतपणाचा व अंधश्रद्धाळू पणाचा फायदा घेऊन या ठिकाणावर मुसलमानी छाप पाडण्याचा प्रयत्न केला. काहीही असो पण हा मध्यंतरी सुप्तस्वरुप धारण केलेला 'सतपंथ' मोठ्या प्रमाणात अनेक घरात आचरण केला जात असूनही तो गुप्त असल्यासारखा राहिला व यावर मुसलमानी रिवाजांचा आरोप ठेऊन खानदेशातील अनेक लोकांनी यावर फार मोठा हल्ला केला व त्याला नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण तरीही वैदिक धर्माप्रमाणे हा धर्म वाढत आहे व त्याच्या हस्तलिखीत ग्रंथांचा हल्ली बऱ्याच लोकाकडून सूक्ष्म अभ्यास केला जात आहे.

Gupt Panth = Hidden sect

सत्पंथ हा गुप्त स्वरूपात आढळून येतो कारण या पंथाचे लोक जरी स्वतःला सत्पंथी म्हणवून घेत असले अथवा गुरुस्थानी इमामशाहांना मानत असले तरी त्यांच्या जातीपासून ते वेगळे झालेले नसतात· सामाजिक रूढी प्रमाणे पंथ स्वीकार हा ऐच्छिक म्हटला जातो. त्यामुळे एकाच जातीत अनेक पंथ पाळणारे लोक असू शकतात धार्मिक आचार विचार हे प्रत्येक व्यक्ती स्वेच्छेने करण्यास स्वतंत्र असते. त्याच प्रमाणे सत्पंथ अनेक प्रान्तातून प्रत्येक जातीतील अमुकच व्यक्ति आचरत असतात. सत्पंथाचे साहित्य पाहिले असतां त्यांतील इमामशाहांचे ज्ञानपदसंग्रह यातून फारच उच्च कोटीचे तत्त्वज्ञान आढळून येते. याचे एकंदरीत निरीक्षण केले असतां हे अथर्ववेदाच्या आधारे निर्माण झाले असावे असे दिसून येते. अथर्ववेदाचा बऱ्याच ठिकाणी उल्लेख केलेला आढळतो. मानवी जीवनाचे ध्येय म्हणजे आत्मसाक्षात्कार – स्वतःच स्वतःला ओळखणें हे होय. एका पदामध्ये इमामशाहा म्हणतात,–

सतपंथ धरम सो कहिये, जेणे ओळख्या सतगुरु नुररे ।
परिब्रह्म विष्णुने ओळख्या, ते तो अमर हुवा ततखेवरे ॥

सत्गुरु रुपी प्रकाशाचा म्हणजे सत् चा ज्याने अनुभव केला तोच खरा सतपंथी म्हटला पाहिजे. सतपंथ हा ज्ञानाच्या अनुभूतीचा मार्ग आहे. म्हणून ते तत्व समजणे अत्यंत कठीण असते. सर्व सामान्य मनुष्य सांसारीक सुखोपभोगाच्या दृष्टीकोनातून धर्माकडे बघत असतो. निरनिराळ्या कामना वासना हेतु उराशी बाळगून तो धर्मकृत्ये करीत असतो. ती कर्मे सकाम असतात. ती फळतात ही, पण कर्म वासनांनी बध्द झालेला जीवात्मा मात्र त्या कर्मकांडातच शेवटपर्यंत अडकून राहतो. ती चाकोरी सोडून पलिकडे जाऊ शकत नाही म्हणून ज्ञानाच्या खऱ्या अनुभूती पासून तो पराङ्मुख राहतो. सतपंथ संप्रदायाचे प्रवर्तक निष्काम कर्माचरणाविषयी व निरभिमान होऊन लोकाभिमुख कार्य करण्यावर विशेष भर देतात. वैराग्य विचार सतत चित्तात स्मरुन जीवन जगा. जन्म सफळ होण्याकरितां जीवीताची सदैव फिकीर बाळगा. जीवनाची क्षणभंगूरता जाणून सदाचाराने वागा. हीच इमामशाहांची शिकवण आहे. मानव जीवन सफलतेच्या तळमळीनेच त्यांनी हा सतपंथ मार्ग दिग्दर्शीत केलेला आहे.

प्रकरण २ रे

" सत्पंथाचे ज्ञान साहित्य "

कोणताही धर्म पंथ अथवा मार्ग असो, त्याचा मुळ पाया म्हटला म्हणजे त्याचे ज्ञान साहित्य होय. त्या त्या पंथाच्या अथवा मार्गाच्या संस्थापकांनी, मार्गदर्शकांनी तत्त्वज्ञानाच्या ज्या प्रणालीनी अनुयायांना संबोधित करुन उपदेश दिलेला असतो तो त्या पंथाच्या अथवा मार्गाच्या साहित्यरूपाने अस्तित्वात असतो. कोणत्याही मार्गाला तत्वज्ञानाची बैठक नसली तर त्याला कांहीच मूल्य अथवा स्थैर्य नसते. साहित्य अथवा वाङ्मय हा त्या मार्गाचा आत्मा असतो. संत महात्म्यांचे चरित्र अथवा त्यांच्या पूर्वज – वंशजांच्या इतिहासाला साहित्य म्हणता येत नाही. एखाद्या थोर अलौकिक दिव्यशक्तीशाली महात्म्याने आपल्या अनुयायांना स्वतःच्या अनुभूतीतून ईश्वरदर्शन – आत्मसाक्षात्काराविषयी केलेल्या उपदेशाचा साहित्यात समावेश होऊ शकतो. पण तो महात्मा स्थूलरुपाने या जगतातून पार निघून गेलेला असेल अशा समयी त्याचे साहित्यच त्याच्या रुपाने कार्य करीत असते. महात्मापुरुष स्वतः या उपाधीपासून वेगळे राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांना आपल्या नावाची अथवा कीर्तीची आसक्ति नसते म्हणून ते एखादा तत्वज्ञान ग्रंथ लिहिण्याच्या भरीस पडत नाहीत. त्यांच्या मुखातून जी वाणी निघत असते तोच एक महान ग्रंथ असतो. आणि अशा तत्त्वरुप अमृताचा वर्षाव वारंवार होऊ शकत नाही जेव्हा ते महापुरुष ब्रह्मानुभूतीत मग्न होतात तेव्हाच त्यांच्या मुखातून हे ज्ञानामृत स्त्रवत असते. सद्भक्तानुयायी

हा ज्ञानामृत प्रवाह वाहून जाऊन नष्टप्राय होऊ नये म्हणून अथवा विस्मृत होऊ नये म्हणून आपल्या ज्ञानशक्तीच्या बळाने जे शक्य असते ते ज्ञानामृत साठविण्याचा प्रयत्न करतात ते पुढे साहित्यरुपाने प्रसिध्दीला येते. प्राथमिक स्वरुपात ते वाङमय हस्तलिखीतच असते नंतर विद्वान बुध्दिमंताच्या प्रयत्नाने त्यास साज शृंगार, अलंकार, समास, काव्याच्या रुपाने सौंदर्य प्राप्त होते व त्याच्या या गुणावर त्यास प्रतिष्ठा प्राप्त होते.

Knowledge of Imamshah came from his forefathers (who by the way are muslims)

सत्पंथ ज्ञान साहित्याच्या बाबतीत सुध्दां असेच झालेले आहे सद्गुरु इमामशाह व त्यांचे पूर्वज यांच्या जीवन वृत्तान्तावरुन दिसून येते कीं त्यांना या आत्मज्ञानाचा वारसा वंश परंपरागत मिळालेला होता एखाद्या देहधारी गुरुकडून अनुग्रह घेऊन त्याच्या साधनांचा अभ्यास करुन हे आत्मज्ञान त्यांनी संपादन केल्याचे उल्लेख त्यांच्या चरित्रात नाही, पण परंपरागत दैवी शक्तीचा प्रवाह त्यांच्या घराण्यात वाहत असलेला उपलब्ध इतिहासावरुन समजून येतो. त्यास 'पाती' अथवा 'दैवीकळा' असे म्हटलेले आहे. यास योगशास्त्रात शक्तिपात करण्याची क्रिया म्हणतात. अशा प्रकारची दैवीकळा इमामशाहांना वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या वडिलाकडून प्राप्त झाल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात आहे. ती प्राप्त होण्याच्या आधी सुद्धा इमामशाहांचे उपदेश कार्य चालू होते. यावरून अगदी बालपणापासून त्यांना वेदगतीचे उपजत ज्ञान होते म्हणजेच ते योगभ्रष्ट महात्मा पुरुषच होते व कांही अपूर्ण राहिलेला योग पूर्ण करण्यासाठी अथवा लोक सेवेसाठी भगवंताकडून प्रेषित आधिकारीक जीवन्मुक्त महात्मा पुरुष या अंवनीतलावर अवतरलेले असावे असे वाटते त्यांची बुद्धिमत्ता व ज्ञानाधिकार फार मोठा होता. तत्कालिन राजसत्तेला त्यांच्या या गुणांचे आकलन करता आले नाही, कारण प्रसिध्दीपराङ्मुख असलेल्या त्या महापुरूषांचे ज्ञान विवेकशून्य, धर्मान्ध व मत्सरग्रस्त अशा मोगल सत्तेला व नंतरच्या आंग्ल सत्तेला पेलता आले नाही.

Family tradition of descending spiritual power at the age of 15

मध्ययुगात मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळे भारतीय जनतेवर बरेच दडपण आलेले होते. त्यांची झळ राजकीय क्षेत्राप्रमाणे धार्मिक क्षेत्रालाहि बसली व हिंदु लोकात ब्राह्मणवर्ग आपले वैदिक तत्त्वज्ञान बाटेल या भीतीने इतर जातियांना – ब्राह्मणेतर वर्गाला हीन समजून सांगण्यास तयार होत नव्हते व त्यांनी फक्त उपासनेचेच – कर्मकांडाचेच अवडंबर या लोकांना प्रत्यक्षात आणून दिले व स्वतःचा चरितार्थ चालविला. अशा या काळात इमामशाह यांनी आत्मज्ञान विषयक ज्ञान हे अत्यंत सोप्या म्हणजे सर्व सामान्य जनतेत प्रचलित असलेल्या लोक भाषेत समजावून सांगितले. त्यांचे प्रचारक्षेत्र गुजराथमध्येच बहुशः असल्याने गुजराथीतूनच त्यांचे वाङ्वय आढळते.

Fore fathers of Imamshah were muslims

सतपंथ ज्ञान साहित्याचा विचार करता आढळून येते की, सतपंथ प्रवर्तकांचे सर्व ग्रंथ हस्तलिखीतच असून त्यात निरनिराळ्या काळी झालेल्या मार्गदर्शकांनी आपापल्या मताप्रमाणे भर घातलेली आहे. नुर सतगुरु, पीर शमस, पीर सदरुद्दीन, पीर साहेबदिन, पीर कबीरुद्दीन वगैरे इमामशाहांच्या पूर्वजांनी कांही ज्ञानपदे केलेली आहेत. कांही श्लोक, काव्ये व गद्यस्वरुपात वेचे तयार केलेले आहेत ते हल्ली फारशा प्रमाणात उपलब्ध नाहीत पण सद्गुरु इमामशाहांनी

तयार केलेल्या ज्ञानपद साहित्यात हस्तलिखीतात त्यांचा समावेश उतारा करणारांनी करुन टाकलेला आहे. बऱ्याच हस्तलेखकांनी तर अशी सळमेसळ केलेली आढळते कीं सर्व महापुरुषांची वाणी एकाच ग्रंथात उतारुन सर्व वाङमय एक करुन टाकलेले आढळते. त्यामुळे प्रत्येक महात्म्याच्या बोलीभाषेचा वेगवेगळ्या काळाचा प्रभाव सर्व एकत्रीत झाला. नर सद्गुरु हे ८ व्या शतकात झालेले, मूळ इराणमधून आलेले म्हणून त्यांचा वाङमयात अरबी भाषेचा संबंध – समावेश अधिक आहे. त्यांच्या नंतरच्या महात्म्यांच्या वाङमयात कमीअधिक प्रमाणात अरबी भाषेचा संबंध आढळतो इमामशाहांचे वडिल व आजोबा हे पंजाबमध्ये स्थाईक झाल्याने काही ज्ञानपदात व साहित्यात पंजाबी शब्दांचासुद्धा समावेश झालेला आढळतो. इमामशाहांचे प्रचार कार्य गुजरातमध्ये झाल्याने त्यांच्या ज्ञानपदात बाकीच्या सर्व भाषांचे शब्द प्राबल्य कमी होऊन संपूर्ण गुजराथी भाषेचाच त्यांनी वापर केलेला आहे. पण हे सर्व ८ व्या शतकापासूनचे १५ व्या शतकापर्यंतचे वाङमय एकाच हस्तलिखीतात जमा झाल्याने सर्व भाषिक शब्दांचा त्यात समावेश झाला व म्हणून सत्पंथ वाङमयात अशी भाषिक खिचडी झालेली आढळते. त्यामुळे सतपंथ वाङमयाचा व विशेषतः इमामशाहांच्या वाङमयाचा मूळातून अभ्यास करतांना भाषिक अडचणी येतात. इमामशाहांच्या नंतर संपूर्ण भारतात मोगलसत्ता सुरु झाल्याने तर सतपंथ साहित्यावर अतोनात आक्रमण झाले.

False statement

इमामशाहांनी त्यांच्याच हयातीत शाणाकाकांना गादीवर बसवून संपूर्ण सत्ता त्यांच्या हाती शिष्य परंपरेनुसार सोपविली हे त्यांच्या तथाकथित वंशजांना खपले नाही. आपल्या पुढिल उत्पन्नाचे ताट गेले म्हणून असंतुष्ट झालेल्या इस्लामी सैयदांनी सतपंथाच्या मूळ वाङमयावरच घाव घातला. आपल्या वंशजांना उपयुक्त व परंपरागत उत्पन्न मिळून आपल्या आलपालबालांचे कल्याण त्यांनी आपला हक्क संस्थानवर जमवून करुन घेतले. धार्मिक शिक्षण रुढीतून दान दसवंतची रक्कम ते स्वतःच उपटून घेऊं लागले. 'हा आमचा हक्क आहे. आम्ही कलियुगातील ब्राह्मण आहोत आमचे पाय धरल्याशिवाय तुम्ही मुक्त होणार नाहीत, कारण आम्ही प्रत्यक्ष हजरपीर आहोत,' वगैरे जोर जुलुम जबरदस्तीने भाविक भोळ्या हिंदु लोकांना अडवून हटकून त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार जमविला. त्यांच्या दानधर्माचा ओघ सैयदांच्या खिशात जाऊन त्यांच्या कुटूंब पोषणाकरिता त्याचा विनियोग होऊ लागला. सत्पंथी लोकांच्या खात्रीकरितां वाङमयातून स्वकृत रुपांतरीत पदे, उतारे, मुखी, मान्यवर पुढारी वगैरेकडून लिहून घेऊन, शास्त्रात उतरवून ते लोकांना पटवून देऊ लागले की ही पदे इमामशाहांनीच केलेली आहेत. आमच्या पदरचे कांहीही नाही. अशा प्रकारचा आपमतलबाचा पोटभरु उपदेश करुन भाविक भोळ्या श्रध्दिष्ठ अनभिज्ञ लोकांच्या श्रद्धेचा उपयोग स्वतःच्या उदरभरणाकडे व ऐष– आराम – सुखोपभोगाकरिता करुन घेतला. मोगल सत्तेला तर कसेही करुन शक्य तेवढ्या हिंदु लोकांना बाटवून मुसलमान करायचेच होते व आपल्या भजनी लावावयाचेच होते. असे कृत्य करणारांचा मान सन्मान, बक्षिस, पैशांचे आमिष दाखवून त्यांना इस्लामी धर्माचा प्रसार करायचाच होता, म्हणून अनायासे ह्या सैयदांना हाताशी धरुन, त्यांचा मान मरातब करुन किताब नोकरी, बक्षिस देऊन, उद्योगधंद्याचे आमिष दाखवून सतपंथीय भाविक भोळ्या हिंदु

False statement.
No historical
evidence

लोकांना इस्लामकडे वळविण्याचा प्रयत्न केला आणि केवळ पैशाकरिता व पोटभरण्याकरितां हपापलेल्या सैयदांनी ते कार्य आनंदाने स्विकारून पूर्वापारपासून चालत आलेले निर्विवाद सत्पंथाचे वाङमय इस्लामी शब्द घुसडवून, इस्लामी आचार विचार व रितरिवाज घुसडवून भ्रष्ट केले. व त्याच अर्धदग्ध वाङमयाचा सत्पंथी अनुयायात प्रचार – प्रसार केला. मुखी, आगेवान लोकांना जोर जुलूम जबरदस्ती व आमिष दाखवून तसेच भय दाखवून त्यांच्याकडून हे प्रचाराचे कार्य करवून घेतले.

इमामशाही सत्पंथी लोकांचे आचरण इमामशाह यांनी घालून दिलेल्या शुध्द आचार व विचार यांच्या नियमाप्रमाणे चालते. इमामशाह यांनी त्यांच्या " शिक्षापत्री " या पुस्तकात एकंदर शंभर नियमापैकी एक नियम असा आहे कीं, शुद्ध वैदिक पध्दतिप्रमाणे आपल्या स्वकष्टार्जित सचोटीने मिळविलेल्या उत्पन्नाचा दहावा भाग प्रथम देवाला अर्पण करुन नंतर आपण आपल्या जीवनासाठी त्याचा उपयोग करावा.

न्यायोपार्जितवित्तस्य दशमांशेन धीमता ।
कर्तव्यो विनियोगश्च ईशप्रीत्यर्थ मेव च ।।
स्कन्दपुराण, माहेश्वर खंड – केदार खंड १२/३५

" दसवंत सुक्रीत गुरुद्वारे देवूरे भाई " या नियमाप्रमाणे सर्व सत्पंथी लोक आपल्या उत्पन्नाचा अमुक हिस्सा पहिल्यांदा पीराणा येथे इमामशाहांच्या गादीवर अर्पण करुन नंतर बाकी स्वतःकरिता वापरतात यामुळे या देवस्थानाचे उत्पन्न इतके भरमसाठ वाढू लागले की इतर मुसलमान लोकांना त्या संपत्तीचा मोह उत्पन्न झाला, आणि त्यांनी स्वतःचा मालकी हक्क या स्थानावर दाखवण्यासाठी या बिनाशिकलेल्या परंतु अत्यंत श्रद्धाळू लोकांना फसवून मुसलमान धर्माची छाप यांच्या धर्म साहित्यावर पाडण्यास सुरुवात केली. तसेच इमामशाहा यांच्या वारसाबाबत अनेक नसलेले पुत्र निर्माण केले व त्यांच्या साहित्यात अनेक कुराणातील वाक्ये मिसळून ते मुसलमानी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्या प्रमाणे अग्निजवळ आलेला कचरा स्वतःच जळून जातो त्या प्रमाणे हे स्थान आणि त्यांचे अनुयायी मुळ हिंदुस्वरूपीच उभे आहेत; परंतु त्यांना या निरर्थक गोष्टींशी लढण्यात त्यांचे जीवन नष्ट करावे लागले.

इमामशाहांनी जे आपल्या पंथाचे मुख्य केंद्र पीराणा येथे बनविले त्याची भरभराट मुसलमान लोकांच्या अपेक्षेपेक्षा अतिशय जास्त प्रमाणात झाली आणि तेथील वाढत्या उत्पन्नाचा लोभ लागून इमामशाह यांचा ते लोक द्वेष करु लागले. त्यांच्या इतर नातेवाईकांनी इमामशाहांच्या मृत्यूनंतर पीराणा संस्थानाच्या उत्पन्नावर आपला हक्क दाखवायला सुरुवात केली. इतकेच काय पण याच्यासाठी मुसलमान लोकांनी साम, दाम, दंड, भेद इ. सर्व नीतींचा उपयोग करुन पीराणा गादीवर बसलेल्या हिंदु गादीपति (काका) याला त्रास देऊन, पीराणा गादीवर हक्क दाखवावयाचा सतत प्रयत्न चालविला. इमामशाहांच्या अनुयायीं वर्गापैकीं

समाज सोजके शिक्षण झालेला आणि अंधश्रद्धाळू असलेला श्रमजीवी व शेतकरी वर्ग होता. या कारणामुळे इमामशाहांच्या कुळपरंपरेतील इतर लोकांना पीराणा पंथातील साहित्यात आपल्या नावाचा शिरकाव करायला आणि कुराणातील कांही रीतिरिवाज त्यात लिहून ठेवायला फारच सोपे गेले. गादीपति काका यांनी प्रतिकार केल्यास ते लोक त्यांना खूनाच्या धमक्या देत असत. असो. तरीही अमूक मर्यादेपलिकडे या लोकांना यश येऊ शकले नाही व इमामशाहांचे अनुयायी हे हिंदु रिवाजाप्रमाणेच आपला धर्म पाळत राहिले. हल्लीच्या काळात तर फारसा प्रश्नच येत नाही कारण, शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे आणि धर्मनिरपेक्ष लोकशाही अस्तित्वात असल्यामुळे लोक स्वतंत्र विचार करुन प्रतिकार करुं शकतात.

फैजपूर येथील खानदेशात असलेली सतपंथी संस्था तर साहित्य संशोधनाच्या बाबतीत फारच भरभराटीत आहे. इमामशाहांच्या सर्व ज्ञान साहित्याचा या संस्थेत सांगोपांग अभ्यास केला जातो. परंतु याच्या आधीच्या तीनशे चारशे वर्षात मात्र या पंथाच्या साहित्यात फारच गुंतागुंत होऊन बसली आहे. कारण इतके दिवस या पंथाच्या साहित्यात बाहेरुन जो कचरा पडला तो काढून टाकण्याकडे कोणी लक्षच दिले नाही ही पहिली गोष्ट, व ज्यांनी तो प्रयत्न केला त्यास सैयदांचा व अंध श्रद्धाळू अज्ञ समाजधुरीणांचा कडाडून विरोध झाला. ही गुंतावळ जर हळूवारपणे बुद्धिपूर्वक सोडवली तर इमामशाहा यांच्या उज्वल ज्ञान साहित्याचे आणि प्रभावी व्यक्तिमत्वाचे दर्शन होते.

सत्पंथ ज्ञान साहित्याचे संपूर्ण निरिक्षण केले असता त्याचे ठळकपणे तीन भाग साखळी प्रमाणे एकमेकात गुंतलेले आढळून येतात.

१) श्री सतपंथ कलश घटपाट पूजा यज्ञविधी हा एक स्वतंत्र विभाग होऊ शकतो ज्यात या पंथाची स्वतंत्र वेगळी अथर्ववेदावर आधारीत कर्मकांडाची रीत आपण पाहू शकतो. यात मुख्यत्वे तीन प्रकार आहेत. १) नित्य पूजाविधी २) नैमित्तिक पूजाविधी ३) काम्य पूजाविधी. पूजेमध्ये कलश पूजा आणि घृतज्योत या मुख्य गोष्टी आहेत. याच्याशिवाय पूजा होऊ शकत नाही आणि प्रसादाशिवाय पूजेचा शेवट होत नाही प्रसादात फळे आणि शिरा हे आवश्यक असतात. क्वचित तांदूळ, दुध, आणि गुळ यांचा सुद्धा प्रसाद करतात.

Mahabharat and Shrimad Bhagavad based Dasavatar

२) स्मार्त साहित्य :– सतपंथातील साहित्यात प्रामुख्याने पुराणातील कथा त्यात फक्त महाभारताचा मुख्य उल्लेख आढळतो आणि श्रीमद्भागवतात वर्णिलेल्या दशावतारांच्या आधार घेऊन इमामशाहांनी केलेला उपदेश दिसून येतो ध्रुव, प्रल्हाद, हरिश्चंद्र, पांडव वगैरे सद्भक्त चारित्र्यावर आधारलेले काही काव्यात्मक साहित्य आहे. तसेच इमामशाहांनी शिक्षापत्री या पुस्तकात रोजच्या जीवनक्रमाबद्दल आचार शुध्द ठेवण्यासाठी शंभर नियम सांगितले आहेत. सतपंथी लोक याचे रोज नियमाने नित्यपठन करतात. सद्गुरू इमामशाहांच्या पश्चात त्यांचे चरित्र आणि चमत्कार यांचा एक स्वतंत्र भाग सतपंथी लोकामध्ये जास्त प्रमाणात असून यावर केलेली भजने लोक अत्यंत आवडीने व आदराने म्हणत असतात.

३) ज्ञानपद अथवा श्रौत साहित्य – इमामशाह यांचे ज्ञानपद संग्रह आहे ते भजन रुपाने आहे. परंतु यात फक्त शुद्ध ब्रह्मज्ञान व योगज्ञान आढळते. वेदांत उपनिषदादि सद् ग्रंथात उल्लेखिलेले तत्वज्ञान काव्य रुपाने यात समाविष्ट झालेले आहे. त्यात पूजा अथवा स्मार्त–साहित्य यांचा उल्लेख आढळत नाही. फार क्वचित ठिकाणी ओझरता उल्लेक आहे. ज्ञानपद साहित्यात इमामशाहांनी इतर गोष्टीपेक्षा आपल्या आत्म्याला महत्व देण्याच्या आणि आत्मज्ञान करुन घेण्याच्या सुचना केलेल्या आढळतात.

वर सांगितलेले तिनही प्रकार एकमेकांच्या अगदीच स्वतंत्र आहेत, तरीपण सतपंथी लोकांच्या धार्मिक जीवनात ते एकमेकात इतके सहज मिसळून गेले आहेत की ज्ञान भक्ति आणि कर्म यांचा स्वतंत्र विचार या लोकांनी करुन पाहिलेला आजपर्यंत त्यांच्या साहित्यात उल्लेखच आढळत नाही.

सतपंथ हा एक गुरूपदेश आहे व तो श्रुति स्मृति पुराणे व उपनिषदे यांतील हिंदुधर्म तत्वाला धरुन इमामशाह महाराजांनी केलेला आहे. श्रीमद्भगवद्गीता, भागवत, रामायण, महाभारत, योगवाशिष्ठच वगैरे ग्रंथ सत्पंथी लोक पवित्र मानतात. श्रीमद्भागवताच्या द्वादश स्कंदाची एक हस्तलिखीत प्रत ३०० वर्षापूर्वीची सत्पंथी लोकांच्या पवित्र ग्रंथात समाविष्ठ झाली. सतपंथी लोकांचे पंथ बिशिष्ठ जे ग्रंथ आहेत त्यातील विषय पहिला म्हणजे सत्पंथ हा सनातन हिंदु व वैदिक धर्म यास अनुसरुन आहे हे स्पष्ट होते. हे ग्रंथ पुढील प्रमाणे होत.

List of books of Satpanth

१) मुळबंध. २) सत्वचन. ३) दशावतार. ४) मुनिवर चेतावणी. ५) ऋषिवर चेतावणी. ६) मनहरज्ञान. ७) संतवाणी. ८) योगवाणी. ९) गुरूवाणी. १०) आगमवाणी ११) शिक्षापत्री. १२) अमृतवाणी. १३) कलशघटपाट पूजाविधी मंत्र.

या ग्रंथात विशेषत्वाने ज्या विषयांचे प्रतिपादन केलेले आहे त्याचा सार पुढील प्रमाणे आहे.

१) मुळबंध – खंड १ " दश धुंधःकार " (भाषा – संस्कृत मिश्र गुजराती)

यात १७ स्तबके आहेत. पहिल्या सात स्तबकात परब्रह्म परमात्म्याच्या निर्गुण निराकार निरंजन स्वरुपाचे वर्णन केलेले असून ते स्वरुप अनाकलनीय आहे. त्या स्वयंज्योति स्वरुप भगवंताने संकल्पमात्राने अनंत काळामध्ये निरनिराळी स्वरुपे धारण करुन आपल्या स्वतःच्या प्रकृतिशी अनंत लिला – क्रिडा केल्याचे सुरेख वर्णन संक्षिप्तपणे केलेले आहे. गुजराथी शब्दांनाच संस्कृत रुप देऊन अनुप्रास तयार केलेली अशी मधूर पण क्लिष्ट भाषा या ग्रंथाची आहे. बहुतेक साराच ग्रंथ द्विरूक्तीने भरलेला आहे. आठव्या स्तबकापासून क्रमाक्रमाने १० धुंधुःकाराची निर्मिती सांगितलेली आहे. त्यापैकी पहिले अनंत धुंधुःकार, दुसरे लील धुंधुःकार, तिसरे कलप धुंधुःकार, चौथे शेष धुंधुःकार, पाचवे महा धुंधुःकार, सहावे शंख धुंधुःकार, सातवे दीप धुंधुःकार, आठवे अरब धूंधुःकार, नववे नरब धुंधुःकार व दहावे तेज धुंधुःकार. अशा प्रकारच्या दहा धुंधुःकारामध्ये प्रकृतिच्या इच्छानुरुप उत्पत्तिने जगताची मांडणी

म्हणजे बांधणी होऊन नारायणानेच वेगवेगळी स्वरुपे स्वसंकल्पाने निर्माण करुन या जगतात अनंत चैतन्य मूर्त स्वरुपाने तोच सर्व क्रिडा करीत आहे त्याचे वर्णन या ग्रंथात केलेले आहे.

खंड २ रा. " देवी – नारायण संवाद " (भाषा – संस्कृत मिश्र गुजराथी)

मुळबंधाच्या या दुसऱ्या खंडात श्री शक्ति देवी व श्री नारायण यांच्या संवाद रुपाने पुरुष, प्रकृति, महत्तत्व, अहंकार, या तत्वांची पिंडात निर्मिती. ब्रह्मांडात मानव, दानव, दैत्यकूळ, नागकूळ, वनस्पति आदि चेतन सृष्टीची निर्मिती, चोवीस देशांची रचना, त्यांत निर्माण झालेल्या मानव प्राणिमात्रांचे वर्णन, आहार-विहार-व्यवहाराची रुपरेषा दिलेली आहे. तद्नंतर या सृष्टीची कालगणना, चार कल्पांची रचना, चार युगांची रचना, चार खाणी, चार वाणी, वर्णाश्रम धर्माची रचना, सत्धर्माची–मुक्तिमार्गाची रचना, धर्माच्या उपांगांची रचना, दशावतारांची योजना मांडणी व कार्य, जीवाची निर्मिती, त्रिगुणांचे कार्य चतुर्मूर्तस्वरुपाची ईश्वरी लीला, जगदुत्पत्ति व प्राणिमात्रांचा जप, पूजा, ध्यान, सेवेने लय कसा होतो याचे वर्णन यात आहे. स्वर्गियसुख प्राप्ति आणि मोक्ष प्राप्तीचे मार्ग वेगवेगळे असून मोक्षप्राप्तीची साधने, शक्तीची महत्ता वगैरे विषयांचे वर्णन या ग्रंथात आहे.

खंड ३ रा. " श्री देवी – नारायण संवाद " ' गर्भगोळ ' (भाषा – गुजराथी)

या खंडात पिंडाच्या निर्मितीविषयी वर्णन असून ॐ कार स्वरुपाची रचना, जीव पिंडाची रचना, मातेचे व पित्याचे गुण, प्रकृतीचे गुण वगैरेचे वर्णन केले आहे. पिंडी ते ब्रह्मांडी तत्वांची रचना दाखविली असून ७२ कोठे, चौदा भुवने, सात समुद्र, नद्या, पर्वत, वने, वेद विद्या शास्त्रे वगैरे सर्व या पिंडात भगवंताने निर्माण केलेले आहे. कस्तुरी मृगाच्या नाभीत असलेल्या कस्तूरी प्रमाणे सर्व कांही या पींडात असून ही ईश्वर शोधनास – शिवदर्शनास जीवात्मा बाहेर गोते खातो व ईश्वर दर्शनावाचून नाश पावतो. पुढे पंचीकरणाचे वर्णन आलेले आहे. तदनंतर षड्चक्रवर्णन, षड्दर्शनाचे स्वरुप वर्णन गुरु शिष्याच्या संवाद रुपाने केलेले आहे. तदनंतर ब्रह्म, माया, जीव, पंचकोश, कर्म, भक्ति, ज्ञान, विवेक, वैराग्य, दमशम, मुमुक्षुत्व, मुक्तीची साधने यांचे वर्णन करुन षड्कर्म, अष्टांग योग साधन याचे वर्णन केलेले आहे. जेव्हा जीवात्मा पींड साडून जातो तेव्हा त्याची चिन्हे, मनुष्याची तीस धर्म लक्षणे वर्णून नंतर गर्भ गोलाविषयी शिव–पार्वती संवाद रुपाने तत्वांचे विवरण केले आहे.

खंड ४ था " निकलंकी गीता " ' देहीशोधन ' ' चिद्‌विचार ' (भाषा – गुजराथी)

गुरु–शिष्य संवाद रुपाने या ग्रंथात चतुर्शुन्य निरुपण, चतुर्देह निरुपण, पंचमहाभुतांचे पंचीकरण, षड्चक्र दर्शन भेदन व ब्रह्मचक्र दर्शनाचे वर्णन, चतुर्मुद्रा, चतुर्भुक्ति, आत्म तत्व, निरुपण, हठयोग साधन, दिव्य मार्गकथन, नवविधाभक्ति निरुपण, अष्टसिद्धी

नवनिध्दीचे वर्णन लिंगदेहाच्या छत्तीस कलांचे वर्णन, गायत्रीपद निरुपण अशा अनेक विषयांचे संक्षेपाने विवरण २४ प्रकरणात केलेले आहे. बऱ्याच ठिकाणी असंबध्द उतारा असल्याने थोडे क्लिष्ट वाटते.

खंड ५ वा " शिष्यपुराण " (भाषा – गुजराथी)

गुरुशिष्य संवाद रुपाने या खंडात जीव, ब्रह्म, माया, गुणतत्व निरुपण, जीवनमुक्ताचे लक्षण, विदेहमुक्ताचे लक्षण वर्णन करुन नंतर जगतातील पाखंडपणाचे व्यवहार, धुतारीपणाचे दिग्दर्शन करुन लोकांना खऱ्या मुक्तिपासून परावृत्त करण्यासाठी अनेक चमत्कार करुन बाळविणारांचे व लोकांना भ्रांतीत टाळणारांचे वाईट फळ मिळते याचे वर्णन आलेले आहे. जगतभ्रांति मायाजाळापासून सावध राहण्याचे शिकविले आहे. अनेक सिध्दी साधन करुन भाविक भोळ्या लोकांना फसवून नादी लावण्याचे प्रकारापासून सावध राहण्यास सुचविले आहे.

खंड ६ वा " विराट् स्वरुप " (भाषा – गुजराथी)

यात ब्रह्मांडाची उत्पत्ति व रचना यांचे वर्णन आहे. प्रथम सप्त पाताळांची रचना, नंतर कृतकत्रैलोक्य त्यात मृत्यूलोक भूलोकाचे वर्णन असून त्यात सप्तद्विप नवखंड पृथ्वीची रचना वर्णिलेली आहे. तदनंतर नरकलोकांची रचना, एकवीस स्वर्ग भुवर्लोक – पितृलोक त्यांत इंद्रभुवन – अमरावतीपुरी, संयमिनीपुरी – यमपुरी, ५२ यमघाटींचे वर्णन, इंद्रपुरी, रुद्रपुरी, ब्रह्मपुरी विष्णुपुरी, मायापुरी, क्षीरसागर, शिवपुरी, स्वर्गलोक त्यांत सूर्यमंडल, चंद्रमंडल, तारा – नक्षत्रमंडल, ग्रह – ज्योतीर्मंडल, शिशुमारचक्र, ध्रुवमंडल, कैलासस्वर्ग – कैलासपुरी, पुण्यस्वर्गवसंतपुरी, गणस्वर्ग–कृष्णपुरी, गंधर्वस्वर्ग सुभद्रागपुरी, मालंतंत स्वर्ग, उंचस्वर्ग, रेवतस्वर्ग, नीलस्वर्ग, रुद्रमंडल, महर्लोक (कृतकाकृतक लोक) अमरापुरीमंडल, जनलोक (अकृतकत्रैलोक्य) तपोमंडल – तपोलोक, तेजोमंडल – सत्यलोक व निजधाम – निरंजनपद – मोक्षपद या सर्वांचे वर्णन या ग्रंथात आहे. शेवटी वायुच्या सात शाखांचे वर्णन आलेले आहे.

खंड ७ वा " युगसृष्टीनु मंडाण " (भाषा – गुजराथी)

विश्वाची रचना करण्यास लागलेल्या काळाचे – युगांचे वर्णन. यात २८ प्रकरणे असून २८ युगामध्ये भगवंताने या विश्वाची रचना कसकशी केली याचे सविस्तर वर्णन या ग्रंथात केलेले आहे.

खंड ८ वा " जडबंध. " (भाषा – गुजराथी)

या ग्रंथात पृथ्वीची जड कशी बांधली गेली म्हणजे पंचमहाभूतापासून पृथ्वीची – स्थूलरुपाची रचना कशी झाली त्याचे वर्णन, आद्य कळश घटपाट स्थापना व सृष्टीची उत्पत्ति, त्रिगुणात्मक तीन देवांची निर्मीती, धर्माची उत्पत्ती, चार खाणीची उत्पत्ति, दशारायण कल्पाचे मंडयाण, देवगुण, पंखला व करण कल्पांचे मंडयाण, सत्य, त्रेता,

द्वापार व कलियुगाचे मंडचाण यांचे वर्णन असून चार युगांच्या चार वेदांच्या गायत्री मंत्रांचे वर्णन यात केलेले आहे. अशा प्रकारचा हा मुळबंध ८ खंडात विभागलेला आहे.

२) सत्वचन :– (गुजराथी – हिंदी मिश्र भाषिक ओवीबद्ध.)

या ग्रंथात काव्यरुपाने श्लोक असून भगवंताच्या निरंजन स्वरुपाचे, त्याच्या प्राप्तीच्या साधनांचे वर्णन केलेले आहे. परिमीत रुपाने पंचविषय सेवन व षड्रिपूंचा त्याग हे पौराणिक दृष्टान्ताने पटवून दिलेले आहे. त्याच्या दुसऱ्या भागात मुनिवराला सदाचाराचा सदुपदेश केलेला आहे. मानव जन्माचे महत्व व साफल्य याविषयी उपदेश केलेला असून आत्मज्ञानानेच मोक्ष मिळू शकतो, त्याचा अनुभव स्वतःच घेऊन प्राप्त होतो. हा सदुपदेश या ग्रंथात सद्गुरुंनी पटवून दिलेला आहे.

३) श्री दशावतार :– (गुजराथी ओवीबद्ध)

यात भगवंताच्या दहा अवतार विग्रहांचे – लिलांचे वर्णन असून भगवंताला दहा अवतार घेण्याचे प्रयोजन कां? याचे सुरेख वर्णन केलेले आहे. भगवंताच्या चरित्रा बरोबरच सद्भक्तांचे जीवन दर्शन पण सद्गुरुंनी घडविलेले आहे. दुष्टांचे निर्दालन, सृष्टांचे पालन संरक्षण व धर्माची स्थापना करण्यास भगवंताने जे अवतार विग्रह घेतले त्यांची मालिका अशी,

१) मत्स्य अवतार	– शंखासूर दैत्य	– सद्भक्त रुक्मांगद
२) कूर्म अवतार	– मधुकैटभ दैत्य	– ,, अंबरीष
३) वराह अवतार	– मोरध्वज हिरण्याक्ष	– ,, ध्रुव
४) नृसिंह अवतार	– हिरण्यकश्यिपू	– ,, प्रल्हाद
५) वामन अवतार	– दानवेन्द्र बलिराजा	– ,, कमळाधेन
६) परशुराम अवतार	– सहस्त्रार्जुन	– ,, कमळापति
७) श्रीराम अवतार	– राक्षसराज रावण	– ,, हरिश्चन्द्र
८) श्रीकृष्ण अवतार	– कंसासूर	– ,, पांडव
९) श्री बौद्ध अवतार	– दुर्योधन	– ,, युधिष्ठिर
१०) श्री निकलंकी अवतार - कालिंगादैत्य - कमलाकुंवर		

यांत भक्त ध्रुवाख्यान, हरिश्चन्द्रख्यान आणि पांडवांचे आख्यान - स्वर्गारोहण या आख्यानांचा सुद्धा समावेश झालेला आहे.

४) मुनिवर चेतावणी :- (गुजराथी ओविबद्ध चौकडी)

या ग्रंथात सद्गुरु इमामशाहांनी मुनिवराला संबोधित करुन ज्ञानोपदेश केलेला आहे. मनुष्यप्राण्याच्या बाल, तारुण्य प्रौढ, वार्धक्य या अवस्थांना युक्त असे कर्माचरण मनुष्याने करायला हवे आहे. देहाभिमान न धरता परमार्थसेवन करावे, कायारुपी शेतीची मशागत उत्तम प्रकारे करावी, कारण तीमधून आपणास आत्मानुभवरुपी

उत्पन्न घ्यायचे आहे. खरा मुनिवर वानप्रस्थी कोण, त्याची लक्षणे सद्‌भक्तांच्या दृष्टांतांनी उपदेशिलेली आहेत. खरा ब्राह्मण कोण, क्षत्रीय वैश्य यांच्या धर्माची लक्षणे काय, मानव देहाची नश्वरता जाणून प्राप्त परिस्थितीत जीविताचे साफल्य करावे, कच्च्या मडक्याच्या दृष्टांतावरुन, नावेच्या दृष्टांतावरून, मृदंगाच्या उदाहृणावरुन हे तत्व त्यांनीं पटवून, दिले आहे. पंचेन्द्रियदमन, जप, तप, तीर्थ व्रत उपवास आदि कर्माचरणाने चित्त शुध्द करुन भगवंताची प्रीती जोडता येते पण शेवटपर्यंत त्याच साधनांशी चिटकून राहिल्यास आत्मसाधना केव्हा होईल? म्हणून निरिच्छ निष्काम बुध्दिने ती कर्मे करुन आत्मप्राप्ति करा असे सद्‌गुरु इमामशाहांनी या ग्रंथात प्रतिपादिलेले आहे.

५) ऋषिवर चेतावणी :- (गुजराथी ओवीबध्द चौकडी)

सतपंथी गृहस्थाश्रमी अनुयायांनी आपला संसार उत्तमरीतीने करावा व परमार्थसाधन करण्यास ज्या त्यागबुध्दिने कर्माचरण करावे त्याचे वर्णन या ग्रंथात सद्‌गुरुंनी उत्तम प्रकारे केलेले आहे दान, दया, तपश्चर्या, शुचिर्भूतता ही धर्माची बैठक आहे, त्यास अनुसरुन मनुष्याने आपले जीवन जगावे, तरच त्याच्या जन्मण्याचे सार्थक आहे व जो तसे आचरण करु शकत नाही - शुध्दविचार विवेकाने वागत नाही त्यास वारंवार जन्ममरणाचे चारही खाणींचे फेरे खावे लागतात.

६) मनहर ज्ञान :- (गुजराथी काव्यात्मक पंचकडी श्लोक)

या छोटयाशा ग्रंथात सद्‌गुरुंनी मानवी मनास सदुपदेश करुन विषय, विरागाबद्दल वर्णन केलेले आहे. मानवीमन अस्थिर चंचल विषयानुवर्ती आहे त्याला स्थिर, शांत व समाधानी बनवून प्रभूठायी लीन करावे या विषयी हा उपदेश आहे.

७) संतवाणी :- (गुजराथी - हिंदी मिश्र काव्यात्मक पंचकडी श्लोक)

भगवंताच्या प्राप्तीकरिता ज्या नवविधा भक्ती सांगितल्या आहे. त्या करुन जे सद्‌भक्त आर्त, अर्थार्थी, जिज्ञासु, ज्ञानी याच्यांही पलिकडे निघून गेले आहे, अशा प्रेमलक्षणा भक्तीचे यथार्थ वर्णन या ग्रंथात केलेले आहे. प्रेमभक्ती वैराग्यपर उपदेश यात केलेला आहे.

८) योगवाणी :- (गुजराथी भजनसंग्रह)

यात सद्‌गुरु इमामशाहांनी योगी लोकांना उद्देशून योगसाधने विषयी व अष्टांग योग साधनेचे महात्म्य वर्णन केलेले आहे

९) गुरुवाणी :- (गुजराथी भजनसंग्रह)

यात सद्‌गुरुंनी वेदांतसिध्दान्त तत्वांचा काव्यरुपाने सद् भक्तांना उपदेश केलेला आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य, मुक्ति यांचा विचार त्याच प्रमाणे ध्यानयोग, जपयोग, लययोग, प्रेमयोग साध्य करुन कशारीतीने भगवंताची प्राप्ति करावी व मानवजन्माचे कल्याण करावे याचे वर्णन या भजनावलीच्या रुपाने इमामशाहांनी केलेले आहे.

१०) आगमवाणी :– (गुजराथी भजनसंग्रह)

यात सद्‌गुरुंनी आगम – अगम्यवाणी वर्णिलेली आहे. भगवंताचा आगामी होणारा अवतार त्याचे स्वरुपदर्शन, अवतारकार्य व सद्‌भक्तांचा उध्दार, दुष्ट दुर्जनांचा संहार धर्माची संस्थापना करण्यासाठी जो निकलंकी अवतार होईल, त्याचे दिग्दर्शन या ग्रंथात भजनाद्वारे सद्‌गुरुंनी केलेले आहे. अवतारकार्य संपल्यानंतर होणाऱ्या सृष्टीलयाचे सुध्दा वर्णन अत्यंत संक्षेपाने सुरेख रीतीने केलेले आहे.

११) शिक्षापत्री :- (भाषा गुजराथी.)

यात मानवमात्राची कर्तव्ये, त्याचा जीवनक्रम कसा असावा आपली शारिरीक शुद्धता कशी ठेवावी, मानसिक पावित्र्य कसे सांभाळावे, आत्मिक उन्नति कशी प्राप्त करावी, मनुष्याचा आहार विहार व्यवहार दिनचर्या वगैरे कसा असावा म्हणजे तो आदर्श मानव गणला जाईल याविषयी शास्त्रशुद्ध जी नियमावली सद्‌गुरु इमामशाहांनी सांगितली आहे ती या शिक्षापत्री ग्रंथात समाविष्ट केलेली आहे. प्रत्येक कांकण बांधलेल्या म्हणजे दीक्षा घेतलेल्या सत्पंथीयास या नीतीनियमांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे नित्यपाठाप्रमाणे दररोज वाचन करणे व त्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. तरच सत्पंथाची दीक्षा घेतल्याचे श्रेय आहे, नाही तर 'धर्मलिया तो शुं थया, गुरुसु ना लागा रंग। जेम पाणीमा पत्थर वसे, तेनु निरे ना भीजे अंग ।।' अशा प्रकारची स्थिती झाल्यास त्या धर्मस्विकारास कांहीच अर्थ उरत नाही. ज्या पवित्र बंधनाने सती स्त्री आपल्या पतीशी एकनिष्ठ राहू शकते त्याच पवित्र बंधनाने सत् शिष्याने – सद्‌भक्ताने आपल्या ज्ञानोपदेशक गुरुशी एकनिष्ट राहिले तरच त्याच्या जीवनाचे साफल्य होत असते, अव्यभिचारी भक्तीनेच जीवात्मा मुक्त होतो.

१२) अमृतवाणी :– (सद्‌गुरुचे श्लोक) (गुजराथी दोहावली)

यात ज्ञानोपदेशपर, व्यवहारोपयुक्त असे श्लोक अथवा दोहे सद्‌गुरुंनी उपदेशिलेले आहेत.

१३) पूजायज्ञ विधीमंत्र :– (गुजराथी)

हे मंत्र साहित्य कलश घटपाट पूजा विधीचे आहे. हा पूजाविधी सद्‌गुरु इमामशाहांनी मानवी जीवनाच्या उन्नतिकरितां दैवी साधना करुन दैवीशक्ति जोडण्यासाठी अवलंबीलेला आहे. तसेच मृतजीवात्म्यास शांतिलाभ घडावा व त्याच्या वासना इच्छा कामना मधून तो मुक्त व्हावा म्हणून एक स्वतंत्र पींडश्राध्द उदासन विधीची योजना सतपंथ प्रवर्तक इमामशाहांनी केलेली आहे त्याचा यात समावेश झालेला आहे.

अशा प्रकारचा सतपंथ ज्ञान साहित्याचा हा अल्प परिचय आहे. या संपूर्ण वाङ्मयाचा समग्र अभ्यास केल्यावर पूर्णपणे समजून येते कीं सत्पंथ प्रवर्तक इमामशाहांची शिकवण मानव मात्राच्या कल्याणासाठी व आत्मोन्नतीचीच आहे, नविन कांहीतरी

खूळ काढून वादविवाद करण्याची नाही. त्यांची राहाणी व करणी वेदांत्याचीच आहे. त्यांची ज्ञानदृष्टी संकुचित नसून विशाल आहे. हे सर्व वाङ्मय हस्तलिखीत आहे. परंपरागत उतारे करून आतापर्यंत हे टिकवून ठेवण्यात आले आहे. हळू हळू त्यातले काही साहित्य प्रकाशित होत आहे. हस्तलिखीतामुळे मात्र बऱ्याच ठिकाणी ते फार क्लिष्ट झाले आहे. त्याच्या संशोधनाची व अभ्यासात्मक विश्लेषणाची आणि प्रकाशनाची अत्यंत गरज आहे. सतपंथातील बुध्दिनिष्ठ विचारवंतांचे व श्रीमान् सज्जनांचे ते काम आहे.

प्रकरण ३ रे

" सत्पंथातील कर्मकांड "

कर्मकांड ही धर्माची पहिली पायरी आहे. उपासनेचा आधार घेऊन मनुष्य आपल्या अध्यात्मिक उन्नतिकडे जात असतो. हिंदुस्थानात अनेक पंथ प्रचलित आहेत. त्यांचे मूळ जरी एकच असले तरीपण वेगवेगळया नांवांच्या रूपाने प्रचारात आलेले आहेत. ज्या प्रमाणे वृक्षाचे खोड एकच असते आणि त्यातून वेगवेगळया फांद्या निघत असतात त्यावेळी प्रत्येक फांदीचे खोडामध्येच आपले मूळस्थान स्वतंत्र रीतीने आपल्या दृष्टीस पडते. ह्या नियमाला अनुसरुन मूळ सनातन धर्माची तत्वे जरी एकच असली तरी बहुजन समाजाला ती सोपी करुन समजावण्याकरिता अनेक महापुरुष फांदीरुपाने या मूळातून प्रगट होतात, त्यालाच आपण पंथ हे नांव देतो. प्रत्येक पंथात जीवनात आचार आणि विचार सुधारण्यासाठी उपासना आणि कर्मकांड यांचा आधार घेतला जातो, आणि त्या तर्फे लोकांना तत्वज्ञान सांगितले जाते. सतपंथातही इमामशाहांचे उच्च तत्वज्ञान समजाविण्यासाठी कांही विशिष्ट प्रकारचे कर्मकांड विधी सांगण्यात आले आहे. सतपंथी लोक वेदप्रणित वर्णाश्रमधर्म पाळतात. चतुर्वेद, उपनिषदे व दशावतार प्रमाण मानतात. ब्रह्मा, विष्णु, महेश, आद्यशक्ति व आद्यनारायण ह्या त्यांच्या ईष्ट देवता आहेत. कलशपाट व अखंड ज्योत यांची ते पूजा करून तद्वारे परमात्म्याची आराधना करितात.

प्रथम पूजास्थान उदधूप – उदबत्ती वगैरे सुगंधी पदार्थांच्या योगाने शुध्द व पवित्र करतात. पूजा यज्ञविधीच्या वेळी शुध्द तुपाच्या तीन ज्योती लावतात. त्रिगुणात्मक देवतांचे प्रतिक म्हणून या ज्योतींची स्थापना होते. सिंहासन व घटपाटाची स्थापना मंत्रोपचाराने करतात. प्रत्येक पूजाविधीच्या क्रियेच्या वेळी त्यानुसार मंत्र म्हटले जातात. कलश हे ईश्वराचे प्रतिक असून केशर, कस्तुरी, फूल, चंदन, अत्तर वगैरे सुगंधी द्रव्याने त्याची यथाविधी पूजा केली जाते. त्यात मंत्रोपचाराने शुध्दजल (काही ठिकाणी दुध) भरुन अक्षता वगैरे टाकून व गुरुचरणामृत (पाऊळगोळी) ह्यांच्या साहाय्याने तीर्थ (अमीरस - अमृत) तयार केले जाते. या कलशाच्या ठिकाणी-कलशातील तीर्थ जलांत सर्व देवदेवतांना मंत्रोपचाराने आणि त्या देवदेवतांच्या नामोच्चाराने नमन करुन आवाहन केले जाते म्हणजे कलशातील तीर्थ सर्व देवदेवतांच्या अधिष्ठानाने युक्त होते. शुध्दतूप साखर, रवा, दुध, तांदूळ, गुळ, सुकामेवा, पंचमेवा मिष्ठान्न व फळे यांच्या साहाय्याने केलेल्या प्रसादाचे पात्र भाग करुन प्रथम भगवान विष्णुच्या नैवेद्याचा नंतर अनुक्रमे ब्रह्मा, महेश, आद्यशक्ति आणि अक्षयपात्र (अन्नपूर्णा) या देवतांच्या नैवेद्यांचे मंत्र होतात. सर्व साधारणपणे नेहमीच्या नित्य पूजेचा असा पूजाविधी असतो. तीर्थप्रसादाच्या सेवनाने मनुष्याच्या त्रिविधतापांची निवृत्ती होऊन मानवी जीवन सुख समाधानाने युक्त होते असा सर्वसाधारण समज आहे. मानवी जीवनातील कांही ठळक घटनांचा या पूजाविधीत समावेश आहे.

स्थूलमानाने पाहता सतपंथ घटपाट पूजाविधीत तीन प्रमुख कर्मकांडाचा समावेश होतो १) नित्य. २) नैमित्तिक ३) काम्य.

१) नित्यकर्म :– नित्यकर्मात नियमीत सकाळी ४ वाजता मंदिरात शुध्द तुपाची ज्योत लावून मंत्रोपचाराने उदधूप सर्वदूर फिरवून वातावरण निर्मळ शुध्द व पवित्र केले जाते. ज्योतीला, कलशाला, सद्गुरुचरण पादुकांना व वेदोपनिषदादि पवित्र धर्मग्रंथाना उदधूप करून पुष्प, फुलहार, अत्तरचंदन वगैरे उपायांनी पूजन करून वंदन केले जाते. नगारा, दुंदुभी व घंटानाद करून दशावतार व सद्गुरुंची आरती केली जाते, नंतर गुरुमंत्रजप व ध्यान केले जाते. नंतर सद्गुरु चरणामृत घेतात. कार्तिक मासात काकड आरती केली जाते. ही झाली सत्पंथी मंदिरातील प्रथा. घरोघरी नित्यविधी म्हणून सत्पंथ संप्रदायाचे लोक तुपाची ज्योत लावून सद्गुरुमहाराजांच्या व निकलंकी नारायण आणि दशावतारांच्या फोटोला उदधूपाने ओवाळून फुलें अथवा फुलहार चढवून पूजन करतात मंत्र जप करतात. कित्येक लोक नित्यपाठ व आरती करतात. दुपारच्या प्रहरी जेवण करतांना अन्न ब्रह्मार्पण करण्याचा मंत्र करुन जेवण करतात. ज्या भगवंताच्या कृपेने हे अन्न मिळाले व ज्याच्याने आपले धारण पोषण होते ते अन्न ब्रह्मरुप आहे. म्हणून ईश्वरस्वरुप अशा अन्नास नमस्कार करुन भगवंताचे नामस्मरण चिंतन ध्यान करीत करीत ते ग्रहण करावे. संध्याकाळी मंदिरात तुपाची ज्योत लावून उदधूप फिरवून नगारा दुदुंभी व घंटानाद करून दशावतारांची आरती म्हणतात नंतर ध्यान आणि मंत्रजप करतात. प्रत्येक गुरुवारी रात्री पूजा अथवा भजन पंचपदी सत्संग करतात. घरोघरी लोक ज्योत


तपश्चर्या
शुचिर्भूतता



लावून उदबत्ती ओवाळून आरती म्हणतात. दररोज मध्यरात्री मनोमन ईश्वराचे ध्यान स्मरण चिंतन व नामस्मरण करतात. अशा प्रकारे सत्पंथ संप्रदायात या चार वेळेच्या संध्या नित्यकर्मात गणल्या जातात. सत्पंथ संप्रदायाच्या नियमाप्रमाणे सत्पंथाची दीक्षा घेतल्यानंतर – कांकण बांधल्यानंतर लौकिकदृष्ट्या तो सत्पंथ संप्रदायाचा गणला जातो, पण जो चार संध्या करुन भजन – पूजन – सत्संग करतो तोच खरा सत्पंथी गणला जातो.

२) नैमित्तिक कर्म :– अ) जन्मानिमित्ताने. ब) मंत्रदीक्षाग्रहण. क) लग्नानिमित्ताने. ड) व्रतोपवासनिमित्ताने. इ) दूध दही शुध्दि निमित्ताने. फ) उत्तरकार्य – मृतसंस्कार– पिंडदान श्राध्दनिमित्ताने.

अ) जन्मनिमित्ताने :– (लाईसुतक) जननाशौच. स्त्री व पुरुष यांनी संतानाच्या जन्मानंतर सव्वा महिन्याने देवदर्शन करण्याचा हा विधी असतो. जननाशौच म्हणून गोत्रजांनी ११ दिवसपर्यंत वृध्दि पाळावी. संतानाच्या मातापित्याने ४० दिवसपर्यंत जननाशौच पाळून त्यानंतर स्नानादिने शुचिर्भूत येऊन मंदीरात होऊन विधियुक्त पूजा करावी. जन्मलेले मूल व त्याचे आईवडिल यांना मंत्रोपचाराने तीर्थ प्रायश्चित्त घेऊन पवित्र केले जाते. नामकरणविधी हा सामाजिक पध्दतीने केला जातो, ह्याच्यासाठी मंदीरात विधी करण्याची जरूर नसते. मूळनक्षत्रावर जन्मलेल्या मुलांच्या शांतीसाठी मंदीरात पूजाविधी केला जातो त्याला जन्मशांती अथवा मूळशांती म्हणतात. जन्मनक्षत्र, जन्मयोग सदोष असल्यास त्या बालकाला त्रास होतो म्हणून त्या बालकाच्या नावाने स्वतंत्र पूजाविधी करून तो दोष घालविता येतो.

ब) मंत्रदीक्षाग्रहण :– मुलगा समंजस झाल्यावर म्हणजे सुमारे १०/१२ वर्षांचा झाल्यावर त्यास पूजाविधीने युक्त गुरुमंत्र-दीक्षा दिली जाते, त्यास कांकण बांधणे असे ही म्हणतात. त्यानिमित्ताने पूजाविधी करून तीर्थजलाने युक्त सुगंधीफूल (चाफा, मोगरा आदि पांढरेशुभ्र फूल) दीक्षा घेणाऱ्याच्या हात जोडलेल्या मनगटावरून फिरवितात नंतर त्यास मंत्रोपचाराने शुध्द व पवित्र करुन गुरुमंत्र दिला जातो. त्याच तारकमंत्राचे आमरण स्मरण करायचे असते. हा विधी झाल्यापासून ती व्यक्ति सत्पंथाची अनुयायी गणली जाते. मुलींच्या बाबतीत दीक्षाग्रहण ऐच्छिक आहे. कारण विवाहसमयी त्या परगोत्रात जातात. सत्पंथाचा अनुग्रह सहसा वंश परंपरागत चालतो.

क) लग्ननिमित्ताने :– संपूर्ण लग्नकार्य विधी वैदिक सनातन पध्दती प्रमाणे ब्राह्मणाकडूनच केला जातो. पण सत्पंथाच्या नियमाप्रमाणे वराने अथवा वधूने (उपवर कन्येने) विवाहाच्या आधी पूजाविधी करवून त्यांत हळद व कुंकू मंत्रवून घ्यावे. त्याला देव ब्राह्मण अथवा हळदीचा देव असे म्हणतात. वराने अथवा उपवर मुलीने गुरुमंत्र दीक्षा घेतल्याशिवाय हा पूजाविधी करता येत नाही. लग्नाच्या

वेळी ते मंत्रविलेले हळदकुंकू नवऱ्या मुलाला अथवा मुलीला लावतात. लग्नानंतर घरात आणलेल्या नविन वधूला पूजाविधी करुन मंत्रदीक्षा दिली जाते. विधवेशी पूर्नविवाह केलेल्या स्त्री पुरुषांचा गांधर्वविवाह झाल्यानंतर एक स्वतंत्र विधी केला जातो त्याला गुन्हा उतरणे म्हणतात. गांधर्व हा सामाजिक रुढी परंपरेप्रमाणे दोष मानला जातो, कारण वैदिक विवाहविधीनुसार परगोत्रात गेलेल्या पण पतिनिधनाने अथवा सोडचिठ्ठी करुन पित्याच्या घरी आलेल्या मुलीचा पुन्हा नविन गोत्रातील वराशी संबंध येतो तो सामाजिक दोष टाळण्यासाठी हा पूजाविधी करतात. हिंदुधर्माप्रमाणे स्त्रीयांना पुनर्लग्न करण्याचा अधिकार नव्हता. पण सामाजिक हिताकरिता स्त्रीयांनी पुनर्लग्न केले तर त्यांनी प्रायश्चित्त घेण्याकरिता हा विधी करावयाचा असतो.

ड) व्रतानिमित्ताने :– प्रत्येक महिन्याच्या शुध्द बीजेला चंद्रदर्शनाच्या दिवशी निरंकार उपवास करुन संध्याकाळी चंद्रदर्शन घेऊन उपवासाचे पारणे करावे. त्या निमित्ताने मंदीरात समुहपूजा होते. थाऊरबीज म्हणजे अजवाळी बीज–ज्यावेळी बुधवारी पूर्ण अमावस्या गुरुवारी पूर्ण प्रतिपदा व शुक्रवारी पूर्णबीज असून चन्द्रदर्शन असते तेव्हा गुरुवार व शुक्रवार या दोन दिवसांचा म्हणजे १२ प्रहरांचा उपवास निरंकार केला जातो. शुक्रवारी संध्याकाळी चन्द्राचे दर्शन करून समूह पूजाविधी केली जाते व उपवासाचे पारणे करतात. सतपंथाच्या मान्यतेप्रमाणे कलियुगाचे फार महत्वाचे असे हे व्रत आहे. याला युगतिथी ही म्हणतात. ज्या प्रमाणे सत्ययुगात गुरुवारची एकादशी, त्रेतायुगात रविवारची चतुर्दशी व द्वापार युगात सोमवती अमावस्या, तसेच कलियुगात ही अजवाळी बीज महत्वाची युगतिथी म्हणून मानली जाते. या तिथ्यांना युगतिथी मानण्याचे कारण असे की त्या दिवशी त्या युगाला सुरुवात झालेली असते. हे सारे वर्णन आपल्याला "मूळस्तंभ" या ग्रंथात वाचायला मिळते. तसेच सत्पंथाच्या "मूळबंध" ग्रंथातील 'युगसृष्टीनु मंडाण' या भागात सुध्दा आलेले आहे.

याशिवाय गुढीपाडवा, अक्षयतृतीया, गुरूपौर्णिमा, रामनवमी, गोकुळअष्टमी, पोळा, विजयादशमी, एकादशी, श्राध्दपक्ष, गुरुवार इ. व्रते सत्पंथी लोक करतात. व्रतवैशिष्टयाप्रमाणे त्या दिवशी मंदीरात पूजा अर्चा भजन पूजन सत्संग वगैरे कार्यक्रम होतात.

इ) दूध–दही शुध्दि निमित्ताने :– गाय अथवा म्हैस व्यायल्यानंतर बाराव्या दिवशी दूध दही व तूप मंदिरात आणून पूजाविधी होऊन मंत्रोपचाराने ते शुध्द व पवित्र केले जाते व तूपाची ज्योत लावतात त्यास आरती लावणे असेही म्हणतात नंतर ते दूध विकण्यास अथवा पूजाकार्यास उपयुक्त होते.

फ) उत्तरकार्य निमित्ताने :–

प्रेत संस्कार :– सत्पंथी अनुयायांच्या मृत देहाला भूमिदाग देण्याचा नियम–प्रथा अथवा रूढी आहे. देश, काल, परिस्थिती आणि निमित्त विशेषाने क्वचित प्रसंगी अग्नी संस्कार ही करण्यात येतो. कोणत्याही अंत्य संस्काराच्या वेळी मंत्रोपचार अथवा पूजा-विधी नसतो. सामाजिक रूढी परंपरेनुसार संस्कार करण्यात येतात. भूमिदाग देतांना साधारणतः दक्षिणोत्तर ६ ते ७ फूटाचा खोल व २ फूट रुंद असा खड्डा खोदून प्रेतास धुवून पुसून स्वच्छ करून उत्तरेकडे शिर व पश्चिमेस मुख करुन भूठमाती देतात. तिसऱ्या दिवशी म्हणजे २४ प्रहरानंतर (सामाजिक प्रथेनुसार खांदे उतरविल्यानंतर) दररोज रात्री मृतजिवात्म्याच्या नांवाने पूजाविधी करुन थाळ भरतात. दहाव्या दिवशी म्हणजे ८० प्रहरानंतर सामाजिक प्रथेनुसार ब्राह्मणाकडून पिंड पाडले जातात व त्या दिवसापर्यंत थाळ भरतात. २४ प्रहर पर्यंत मृतात्मा आपल्या देहाभोवती अथवा घराभोवती घोटाळतो म्हणून अन्नदान करून त्याला तृप्त करतात. २४ प्रहरापासून ८० प्रहरपर्यंत त्याचा यमपुरीचा प्रवास असतो म्हणून थाळ भरुन त्याला तृप्त करतात. त्या नंतर मृतात्म्याच्या कर्मांचा निवाडा व न्याय दान असते म्हणजे पुढची गति त्याला प्राप्त होते अशी समज आहे म्हणून हे सर्वविधी करणे आवश्यक असतात. थाळ भरणे ज्याला शक्य नसते ते लोक ११ दिवसपर्यंत मंदिरात मृतात्म्याच्या नांवाने शुध्द तूपाची अखंड ज्योत लावतात. ११ व्या दिवशी गंधमोकळा होतो म्हणजे सुतक नाहिसे होते.

Dead is buried in Sleeping posture and not in Sitting posture

उटासन विधी :– ११ व्या दिवसापासून पुढे केव्हाही त्या मृतात्म्याच्या शांतिसाठी व मुक्ति-साठी उटासन (उच्चासन) विधी करण्यात येतो. त्यावेळी त्या जीवात्म्याच्या नांवाने घटपाट पूजा यज्ञविधी द्वारा पींड पाडतात म्हणून त्यास पिंडश्राध्दसुध्दा म्हणतात. त्याचा विधी थोडक्यात असा आहे की, मृतात्म्याच्या वंशातील अथवा गोत्रातील कोणीही सतपंथाचा अनुग्रह घेतलेली व्यक्ति मृतात्म्याच्या नांवाने पिंड सारतात. प्रथम नेहमीची पंचनैवेद्य समर्पणाची साधी पूजा झाल्यानंतर यमदूतांना नमस्काराचे व आवाहनाचे मंत्र होतात. नंतर पंचमहाभूत, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेन्द्रिये, पंचप्राण, सत्व, रज, तम, मन, अहंकार, महतत्व, प्रकृति व पुरुष या २८ तत्वामधून त्या जीवा-त्म्याला मुक्त करण्याकरिता २८ पींड (रवा, साखर, तूप दुधाने युक्त प्रसादाचे पींड) तयार करुन त्यावर मंत्रोच्चार होतो. नंतर तीन पिंडांवर त्या जीवात्म्याचे त्रिविध ताप निवारण्यासाठी लाईसुतक उतरण्याचे मंत्र होतात. नंतर सात देवदूतांना नमस्कार व आवाहनाचे मंत्र होतात. क्रमाने पुढे हरिवंशाचा मंत्र होऊन एका मोठ्या पिंडावर पुढचा सर्वविधी होत असतो त्यास स्वेदज, अंडज, उद्भीज, जारज या चारही खाणींचे मंत्र होऊन त्या जिवात्म्याच्या जीवनात कांही दोषयुक्त, पापयुक्त, नियमबाह्य कर्मे घडलेली असल्यास त्या दोषातून–कर्मबंधातून मुक्त होण्यासाठी अपराध क्षमा करण्याचे मंत्र होतात. नंतर मृतात्म्याच्या नावाने सुक्रित म्हणजे दानपुण्य, दसवंत वगैरेंचे मंत्र होतात. पुढे त्या जीवात्म्याला मृत्यूलोकातून उठवून सूर्यमंडल, चंद्रमंडल,

नक्षत्रमंडल, वायुमंडल, ध्रुवमंडल यांच्यावर चढवून महर्लोक, जनलोक, तपोलोक व तेथून तेजोलोकात म्हणजे अमरपदात अथवा ब्रह्मलोकात पोहोचविण्याचे मंत्र होतात. मध्यंतरी असलेल्या यम घाटीचे ५२ घाटींचे मंत्र होतात. त्याठिकाणी मृतात्म्याच्या नांवाने पींडदान, गोदान, वस्त्रदान पात्रदान, काठीकांबळ, छत्री पादत्राण दान, मेवामिष्ठान्न अन्नदान सुगंधीद्रव्यदान, महेलमाडी, शेतीवाडी, वृक्ष दान, वगैरे दानाचे मंत्र होतात. हे दानकर्म ऐच्छिक असते. तो ज्याचे त्याचे आर्थिक परिस्थितीचा व श्रध्देचा भाग आहे. नंतर त्या जीवात्म्याच्या सूक्ष्म इच्छा, वासना, कामना तृप्त होण्याकरिता व त्यास सौख्य शांति परमगति लाभण्याकरितां भगवंताच्या आराधनेचे मंत्र असतात. या संपूर्णविधीच्या योगाने मृतात्म्यास शांतिलाभ होतो त्याच्या इच्छा वासना कामना तृप्त होतात व तो मुक्त होतो अथवा त्यास सद्‌गती लाभते. अशा प्रकारचा हा विधी आहे. याविधीत श्रध्दा, पावित्र्य आणि मनोधैर्याची अत्यंत आवश्यकता असते. पूजा करणारा व करविणारा या दोघांच्या मानसिक शक्तिने व पावित्र्याने, संतुष्टतेने ही कार्ये सफळ होतात. ज्यांची श्रध्दा डळमळीत आहे, मनोबल अपूर्ण आहे, आर्थिक बाबीवरच केवळ दृष्टी आहे. शारीरीक पावित्र्य नाही, स्पर्शा-स्पर्श, सूतक वृध्दि यांनी युक्त म्हणजे सदोष कार्य झाल्यास त्या मृतात्म्यास तो विधी लाभत नाही. अशा वेळी मृतात्म्यास दूर्गति वा पुनर्गति मिळण्याचा संभव असतो. अशा प्रकारची उदाहरणे बरीचशी होत असतात व तसा शास्त्राधारही आहे म्हणून या कार्यात शुध्दता, पावित्र्य व मनोबल अत्यंत उपयुक्त आहे.

श्राध्दविधी :– दरवर्षि त्या मृतात्म्यांच्या पुण्यतिथी निमित्ताने वंशजांना त्याचे स्मरण म्हणून पूजाविधी करतात त्यास वर्षश्राध्द सुध्दा म्हणतात. कित्येक लोकांचे असे म्हणणे असते कीं ज्या जिवात्म्यांचे उत्तरकार्य झालेले असते त्यांचे श्राध्द वा पुण्यतिथी करूं नये, कारण मुक्त झालेल्या जिवात्म्यास परत या सांसारीक उपाधीत टाकू नये. पण श्राध्द वा पुण्यतीथीच्या विधीत तसा कांहीही संबंध नसतो. ते केवळ पितृस्मरण म्हणून घरातील लहान मोठ्या जिवात्म्यांना आपल्या पूर्वजांचे स्मरण राहावे म्हणून तो विधी करायचा असतो. तसे जर केले नाही तर गृहस्थजीवनात पितृयज्ञ म्हणून पंचमहायज्ञातील एक यज्ञीय कर्म न केल्याचा दोष लागेल व उत्तम प्रकारचा गृहस्थाश्रम आचरण्याचे श्रेय लाभणार नाही व पितृबाधेचे दुःख होण्याचा संभव असतो म्हणून श्राध्द अवश्य करावे.

३) काम्यकर्म :– (सकाम कर्म.)

अ) मानीत पूजा :– कोणत्याही इच्छेच्या पूर्तिसाठी, उद्योगधंदा व्यापार व्यवसाय, शेती, व्याधिनिवारण इ. साठी मानता बाधा मानून केलेला पूजाविधी.

ब) दसवंत – सुक्रित राशीपूजा :– ही पूजा नविन आलेल्या उत्पन्नाचा दहावा भाग मंदीरात दानधर्म म्हणून अर्पण करुन त्या निमित्ताने ब्रह्मार्पण म्हणून पूजाविधी केला जातो.

क) व्याधिपीडा निवारणार्थ, (सौख्य शांति प्रित्यर्थ)

कोणत्याही प्रकारची व्याधी अथवा दुःख निवारण करण्यासाठी जी पूजा केली जाते तिला नवग्रहशांतीची पूजा म्हणतात. हीच पूजा एखाद्या वास्तूत कांही दोष असल्यास अथवा शेतातील विहिरी वगैरे सदोष असल्यास तो दोष निवारणार्थ व शांति प्रीत्यर्थ ही पूजा करतात.

अशा प्रकारचा कर्मकांड पूजाविधीचा प्रादुर्भाव सत्पंथात विशेषत्वाने आहे. ही सर्व पूजाविधी अथर्ववेदाच्या आधाराने रचलेली कर्मकांड विधी आहे. ह्या विधीतील एकूण एक मंत्र व शब्द अगाध शक्ति सामर्थ्याने भरलेला आहे. शुचिर्भूततेने व श्रध्दायुक्त अंतःकरणाने केलेली पूजा जीवात्म्याची ऐहिक व पारमार्थिक उन्नति घडवून आणते. द. गुजरात मधिल डुंमस या गावी सन १९६० मध्ये भरलेल्या अखिल भारत सत्पंथी संमेलनात अध्यक्षिय भाषणात बोलतांना वेदमूर्ति पं. सातवळेकर यांनी सांगितले होते कीं, 'सत्पंथ हाच खरा सनातन धर्म आहे. अथर्ववेदावर आधारलेला हा पंथ असून यातील मंत्रशास्त्र व अध्यात्म ज्ञान संपूर्ण अथर्ववेदाचेच आहेत. यावरून या पंथाचे सर्व अनुयायी अथर्ववेदी आहेत. एका मंत्रात म्हटलेले आहे की "स्वामी तमे ॐकार माहे आपोआप शक्तिरुपी जपाव्यो जापं, शक्ति रूपी रच्यो संसार, शक्ति वेद उत्तम आचार." शब्दामध्ये भरपूर शक्ति भरलेली आहे जी तुमच्यात माझ्यात आणि संपूर्ण विश्वात आहे. त्या योगे मानव कित्येक चमत्कारयुक्त कार्य करु शकतो. सर्प विंचू आदि विषारी प्राण्यांचे विषाक्त दंश सुध्दा केवळ मंत्रशक्तिने उतरतात ही तर अगदी सामान्यातली सामान्य बाब आहे. मंत्रशक्ति जगातील सर्वश्रेष्ठ शक्तिमधिल श्रेष्ठतम शक्ति आहे. मी परमेश्वराचा पुत्र आहे अशी श्रध्दा आणि धैर्य असेल तरच दिव्यशक्ति प्रगट करता येते. ही शक्ति सर्वच स्त्री पुरुषांमध्ये गुप्त रीतीने दडलेली आहे म्हणून सर्वांनी श्रध्दापूर्वक मानले पाहिजे व सांगितले पाहिजे कीं मी परमात्म्याचा पुत्र आहे. तेहतीस कोटी देवता माझ्या शरीरात आहेत असे ठाम पणे तुम्ही समजलात तर तुमच्यातही दिव्यशक्ति प्रगट होईल या विषयी शंकाच नाही तर मग या प्रचंड शक्तिचा उपयोग कां होत नाही, हा प्रश्न उभा राहतो. याला कारण एकच ते म्हणजे आपला आत्मविश्वास त्यावर नाही व ती शक्ति प्रकट करण्याची रीत आपल्यास माहित नाही.'

False statement by Satwalekar (if he has made any)

'सत्पंथ आणि सनातन धर्माचे ग्रंथ सर्व हेच सांगतात तुमच्या या धर्मग्रंथात सूर्य आहे, वायू आहे, वरूण आहे, अश्विनीकुमार आहेत, इंद्रसुध्दा आहे, याचा विचार मी केला म्हणून सांगतो कीं, मानवामध्ये अमोघशक्ति दडलेली आहे. पोटात कांही दुखत असेल तर पोटाची देवता द्रोण आहे. असे जाणून तुम्ही त्यावर सर्वध्यान केन्द्रीत करा म्हणजे ते जसा हुकूम करीत तसे तुमच्या शरीरात घडत राहील. मी दीन आहे. दुर्बल आहे, अशी भिकाऱ्यासारखी वृत्ति होऊ देता कामा नये, तर मी परमेश्वराचा पुत्र आहे आणि वाटेल ते काम करु शकेल अशी आत्मश्रध्दा आणि हिंमत हवी आहे. असे झाले तर परब्रह्मपरमात्म्याच्या दिव्य शक्तिचा अंश तुमच्यात उतरल्याशिवाय राहणार नाही आणि हाच अंश महान आहे. ज्या प्रमाणे कोरड्या गवतावर विस्तवाची एकादी ठिणगी जरी पडली तरी दावानल प्रगट होतो, त्याप्रमाणे ही

मंत्रशक्ति अग्नीच्या एका स्फुल्लींगा प्रमाणे आहे. जगामध्ये जेवढी शक्ति आहे. तेवढी सर्व मानवाच्या देहात भरलेली आहे. तुमच्या सत्पंथी सनातन धर्माच्या मंत्रामध्ये या शक्तिचा पुरेपुर उपयोग केलेला आहे याचा तुम्ही अनुभव पहा.

अथर्ववेदाचा हिंदुधर्मात फारमोठा महिमा आहे. त्यात ब्रह्मा हा अध्यक्षस्थानी आहे. आणि त्याला मानणारा अथर्ववेदी गणला जातो. मी त्याचा पूर्ण अभ्यास केला आहे. या अथर्व वेदात विश्वातील मोठ्यात मोठे शास्त्र रचलेले आढळून येते. या वेदाचे तुम्ही सर्जण अनुयायी आहांत, ही गोष्ट तुमच्या सद्भाग्याचीच गणली जाईल. तुमच्या ग्रंथकर्त्यांने अथर्ववेदाचीच सारी उदाहरणे घेतलेली आहेत. यज्ञामध्ये सुध्दा अथर्ववेदी ब्राह्मण पाहिजेच आहे. या वेदाचे एवढे मोठे महत्व एवढयाच साठी आहे कीं प्रत्येक मनुष्य या वेदाप्रमाणे आपली शक्ति वाढवू शकतो. वेदात सांगितलेल्या रीतीनुसार कृति केल्यास इच्छाशक्तिच्या बळावर मनुष्य दीर्घायुषी होऊ शकतो. प्राचिन ऋषि मुनि व अवतारी पुरुष आपले आयुष्य सत्कारणी लावून शम संतोष शांतीने प्रदीर्घ करीत असत. तसे दीर्घायुष्य तुम्ही आजपण मिळवू शकाल. आज कसेही घोर कलियुग असो त्याचे तुम्ही सत्ययुग करुं शकता असे अथर्ववेद सांगतो. विश्वातील सर्व देवांच्या शक्तिकडून मी कार्य करुन घेतो. त्यांच्यावर माझा प्रभाव आहे. अशी भावना तुम्ही जागृत करा. तेव्हाच ती शक्ति तुम्हास प्राप्त होईल.

अथर्ववेदात तर कित्येक विद्या आहेत त्यात लिहीलेले आहे कीं शरीरावर सोने जर धारण केले तर आयुष्य वाढते. तर मग इंजेक्शनची काय गरज? मन मजबूत करा असे हा वेद सांगतो त्यात असेही सांगितले आहे कीं वनस्पतिजवळ वैद्य जातो आणि तिला सांगतो की रोग्यास औषध द्यावयाचे आहे तर त्याचा तो रोग तू नाहीसा कर. याकरुन असे सिध्द होते कीं वनस्पतीत जीव आहे. तिच्यात दुसऱ्यास दुःख देण्याची भावना नसते. आपला सुध्दा असा धर्म असल्यावर आपण बिमार पडतो. वेद सांगतो कि प्रथम मनुष्याचे मन बिमार होते आणि त्यानंतर शरीरात बिमारी येते. जर आपण बाह्य जीवन निरोगी केलं तर आपण आजारी सुध्दा पडणार नाही.

तुमची आणि तुमच्या शास्त्राची अशक्ति म्हणजे शास्त्रांचे अनुवाद व्हावयास हवे आहे हे एक अल्पदूषण आहे. ती पुस्तके तुम्ही जवळ बाळगा. खिस्तांचे बायबल बाराशे भाषेत भाषांतरीत झालेले आहे. त्याच प्रमाणे वेदांचेसुध्दा व्हायला हवे. अथर्ववेदाचा अनुवाद जर केला तर देशातील डॉक्टरांची संख्या पुष्कळ कमी होईल. माणसांची आज धार्मिकभावना घटली म्हणूनच डॉक्टरांची संख्या वाढली. गाईंचे दुध तूप संध्या हवन वगैरे हे सर्व गेले. जेव्हा हे सर्व होते तेव्हा ही व्यर्थ यातायात नव्हती. पण आज तर त्या गाईही नाहीत आणि त्या गाईंचे तूप दुध ही नाही. अथर्ववेदात गाईंचा असा एक अध्यायच आहे आणि त्यात गाईंच्या संस्थेतील संगोपनाविषयी ज्ञान सांगितलेले आहे.

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे आपले चारवेद आहेत पैकी अथर्ववेद हा मानवी जीवनातील महत्वाचा वेद आहे. यात कोणतीही व्यक्ति बिमार होणार नाही अशी किल्ली आहे. पाण्यामध्ये सर्व प्रकारची औषधी आहे असे त्यात दर्शविलेले आहे त्याचा उपयोग आणि प्रकार

पण सांगितलेले आहेत. आज डॉक्टर हजारो दवा वापरतात पण अथर्ववेदाच्या एकट्या पाण्यात सर्व औषधींचे गुणधर्म आहेत ते दाखविलेले आहे आणि त्याकरिता पाण्याचा कसा उपयोग करावा हे सुध्दा सांगितलेले आहे. सूर्यप्रकाश हा रोग निवारण कसा करुं शकेल त्याविषयी सुध्दा यात माहिती आहे. आज तर युरोपातील लोक नग्न होवून सूर्यस्नान करतात. तेथे बाराही महिने हवेत उष्णता नसल्यामुळे सूर्यस्नान त्यांना फार महत्वाचे आणि आल्हाददायक वाटते. आपल्याकडे तर ते ईश्वराने आपणास वाटेल तेवढे व पाहिजे तेव्हा मिळेल असे दिलेले आहे. संस्कृतात घराचे नांव रोग असे आहे, कारण कीं घरामध्ये सूर्यप्रकाश येऊ शकत नाही. म्हणून तुम्ही सहा महिने सूर्यकिरण अंगावर घेण्याचा प्रयोग करुन बघा त्यास एक पैसा सुध्दा खर्च येत नाही आणि त्यापासून किती रोग दूर होतील याचा अनुभव पहा.

राजकारणाविषयी सुध्दा अथर्ववेदाचे स्थान किती उच्च आहे बघा, विचार करुन कारभार चालवावा. सरकारात खरेपणा हवा आहे हे त्यात सांगितलेले आहे आणि शिवाय राजकर्त्यांची भावना उदार पाहिजे व राज्यात लांच लुचपतीचा प्रकार व्हावयास नको, असे त्यात सांगितलेले आहे. या दृष्टीने आपले तंत्र काय आहे याचा विचार करा.

अशा प्रकारे आरोग्य,- राजकारण, गृहव्यवस्था आदर्शजीवन संस्कृति या शिवाय आणखी कित्येक विषयांचे ज्ञान पण सांगितले आहे. असे पुस्तक सर्वभाषात शब्दशः उतारावयास हवे त्या करिता या कार्यात अडथळा येणार नाही याची काळजी घ्या. तुमच्या धर्मग्रंथात जे कांही वाईट साईट असेल, अबोध वा क्लिष्ट वाङमय असेल ते दूर करा अथवा ते सर्वांना समजू शकेल असे करा. या कार्यात तुम्हाला शक्य तो सल्ला देण्यास मी तयार आहे. तुमच्या जवळ असल्या प्रकारचे दिव्यज्ञान असतांना तुमची उन्नति कां होऊ नये ? जे प्रत्यक्ष असते त्याला प्रमाणांची जरुरच काय ?

झोपेत शक्ति आहे आणि ती कोटयावधी रुपयांनी मिळत नाही. महंमद गझनी भारतास लुटून गेला, त्यानंतर मरणास टेकला तेव्हा धनाच्या ढिगासमोर जाऊन रडू लागला. रडून शक्ति मिळत नाही पण झोपेने शक्ति मिळते, त्यागाने शक्ति मिळते, भक्तीने शक्ति मिळते. सर्वांचे जी भरण पोषण करते तिचेच नांव झोप. ती जर नियमीत असली तर आपण महाशक्तीचे स्वामी होऊ शकू. झोप, समाधि आणि मुक्ति ह्या तीनही इच्छित स्थानाकडे घेऊन जाणाऱ्या शक्ति आहेत. चार दिवस झोप आली नाही तर आपले चित्त बेचैन होते परमेश्वर प्राप्तिकरीता आपणास ही गोष्ट उचित आहे. परमेश्वर प्राप्तिचा खरा व सोपा मार्ग म्हणजे शांत भावाने व एकाग्रतेने त्याची प्रार्थना करणे. भजन गायन स्मरण करण्याने मोठी तकलिफ दूर होऊन मनाला आनंद होतो. परमेश्वरात तल्लीन होण्यास एकाग्रता फार महत्वाचे साधन आहे.

अथर्ववेदात एकंदर सहा हजार मंत्र आहेत. ही ईश्वरी रचित आणि ऋषिमुनिरचित मोठी दौलत आहे. तिचा उपयोग करा जगत् दुःखमय नाही. पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश यांचे कडून कांही दुःख झाले काय ? तर मग जगत् दुःखमय कसे ? मानवी जीवन सुखी आणि समृध्द करण्यास हेच पंच महाभूत उपयुक्त होत. एक जिलेबी पचत असली आणि पाच खाल्ल्या आणि

अपचन झाले तर दोष कोणाचा ? आपण स्वतःच दुःख निर्माण करतो परंतु जगत तर आनंदमय आणि सच्चिदानन्द परमात्म्याच्या रम्य लीलेने भरलेले आहे. मी ज्या मार्गाचा आहे त्याच मार्गाचे तुम्ही आहांत. तुम्ही शक्तिमान आहांत असे मानून तुमच्यात जी कमतरता असेल ती दूर करण्याचा प्रयत्न करा.' अशा प्रकारचे उद्‌बोधन पं. सातवळेकरजींनी केलेले आहे. त्यावरुन हेच सिध्द होते की सत्पंथ घटपाट पूजाविधी कर्मकांडात दिव्य शक्ति आहे. ती जाणून आपणास आत्मसात करायची आहे.

या कलश पूजा यज्ञविधीद्वारा महान कर्ममार्ग सद्‌गुरु इमामशाहांनी सत्पंथी अनुयायांना दर्शविला आहे. या कर्ममार्गाची मानवी जीवनात आवश्यकता कां असते त्याचे स्पष्टिकरण करतांना सद्‌गुरुंनी सांगितले आहे की, –

देहने आगे प्रारब्ध कर्म, ते पोते अभोगता ब्रह्म ।
अेम जे जाणे अनुभवयुक्ति, तेणे कहिये जीवनमुक्ति ।।
देहन हूंमाने कोई जेह, महादोषी कहिये तेह ।
आत्मबुध्दि जेणे भाई, महापुण्य–वंत गणिये भाई ।।

मानवी जीवन समृध्द, सुखी व उन्नत करण्यासाठी कर्माची आवश्यकता आहे. ज्ञान भक्ति जपतप वगैरे साधन कर्माशिवाय अपूर्ण पडतात कारण त्या प्रत्येक साधनांच्या मूळाशी कर्म असतेच म्हणून या कर्ममार्गाचे विशुध्द रीतीने आचरण करावे. सत्पंथ घटपाट कलश पूजा विधी हा एक यज्ञच आहे; कारण त्यात अनेकानेक सृष्टिचक्र चालक देव देवतांचे आवाहन करुन आराधन केले जाते म्हणून तो एक यज्ञीय महान कर्म मार्गच आहे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे कीं;

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्य कर्मणः ।
शरीरयात्राऽपि च तेन प्रसिध्यदकर्मणः ।। गीता ३।८

हे अर्जुना! तू आपले विहीत म्हणजे स्वधर्मोक्त कर्म कर. कारण कर्माभावापेक्षा कर्मानुष्ठान श्रेष्ठ आहे आणि शिवाय कर्माचा स्वरुपतः त्याग केल्यास तुझी जीवन यात्राही नीटशी चालणार नाही. शरीरयात्रा चालविण्यासाठी करावे लागणारे जे जे कर्म ते ते अपरिहार्यच असल्याने नियत कर्माच्या गणणेत त्याचा प्रथम उल्लेख केला आहे. नियत कर्म पुढिलप्रमाणे होत,– १) शरीरयात्रा चालण्यासाठी अपरिहार्य असे कर्म. २) स्ववर्णाश्रमधर्म विहीत नित्य नैमित्तिक कर्म. ३) स्वभावजकर्म. ४) यज्ञतप दानादि पावन कर्म. ५)लोक संग्रहार्थ प्रसंगप्राप्त करावे लागणारे कर्म. पूर्वी सृष्टयारंभकाळी यज्ञमूलक कर्तव्य पाठीस लावून देऊन मानवी प्राण्यांची उत्पत्ति करुन त्यांना प्रजापति म्हणाला या यज्ञाने तुम्ही आपली अभिवृध्दि करुन घ्या. हा यज्ञच तुम्हाला इच्छित वस्तू देणारा कामधेनू होवो. या यज्ञसाधनाने तुम्ही देवांना संतुष्ट करा व ते देवही तुम्हाला संतुष्ट करोत. या प्रमाणे परस्परांना संतुष्ट करुन तुम्ही उभयताही आत्यंतिक कल्याण प्राप्त करुन घ्या. बुध्दिविशिष्ट असा मनुष्यप्राणी ज्या वेळेपासून या सृष्टिवर संचार करुं लागला त्या वेळेपासून त्याला यज्ञाची जरुरी भासू लागली. सर्व मानव जातीला आवश्यक असा हा यज्ञ कोणता?

या विषयी गीतेत स्पष्ट उल्लेख आहे कीं केवळ होम हवन करणे म्हणजे यज्ञ नव्हे, आणि होमात ज्या ज्या देवतांच्या उद्देश्याने आहुति देतात केवळ तेवढ्या देवता असा संकुचित अर्थ अभिप्रेत नाही, तर ज्याला ज्याची सेवा किंवा उपासना करावी लागते त्याचा तो देव, सति पतीची सेवा करते म्हणून पति हा सतीचा देव, शिष्य गुरुची सेवा करतो म्हणून गुरु हा शिष्याचा देवच होय. याच दृष्टीने पुत्राला मातापिता, अनाथाला रक्षणकर्ता, आश्रिताला आश्रयदाता, भीति ग्रस्ताला अभयदाता, पतिताला उध्दारकर्ता हे त्या त्या कार्यापुरते देवच होत. ब्राह्मणवर्ग जेव्हा सर्व वर्णियांना पूज्य होता तेव्हा तो भूदेव व राजाविषयी समाजात आदरभाव होता तेव्हा तो नृदेव (नृपति) गणला जात होता. इहलोकातील मानवी प्राण्यापेक्षां स्वर्गादि लोकातील अदृश्य व्यक्ति अधिक सामर्थ्य संपन्न असल्याने मानव जातीला परलोकातील देवता पूज्य आणि उपास्य वाटू लागल्या आणि अशा अदृश्य शक्तींना उद्देशूनच देव हा शब्द प्रचारात आला. गीतेतील यज्ञ शब्दाची सुध्दा संकुचितता जावून त्याची व्याप्ति वाढली म्हणून यज्ञ म्हणजे पूज्य व्यक्ति करितां करावा लागणारा त्याग किंवा तशा पूज्य व्यक्तिची सेवा असा अर्थ निश्चीत होतो. अशा रीतीने सृष्टीतील मानवी प्राण्यांची उत्पत्ति यज्ञासहच झाली आहे. म्हणून तुम्ही परस्परांना संतुष्ट करुन आपले कल्याण साध्य करुन घ्यावे. जगात श्रेष्ठ कनिष्ठभाव व तन्मूलक सेव्य सेवक भाव अपरिहार्य असल्याने प्रत्येक व्यक्तिने जी वस्तु स्वसामर्थ्याने प्राप्त करुन घेणे अशक्य असेल ती श्रेष्ठांच्या उपासनेने मिळवावी व त्या उपासनेकरितां स्वतःच्या मालकीच्या कोणत्याही प्रिय वस्तूंचा त्याग करण्याला प्रवृत्त व्हावे. देवांची उपासना करुन त्यांच्याकरितां यज्ञ करुन त्यांना संतोषवावे व देवांनीही आपल्या उपासकांना इच्छित वस्तू देऊन त्यांना संतुष्ट करावे असा हा नियम अखंड रीतीने पाळला गेला तरच सृष्टीचे कार्य सुखासमाधानाने चालेल. प्रजेने राजास कर द्यावा, राजाने प्रजेचे संरक्षण करावे. शिष्यांनी गुरुची सेवा करावी व गुरुदक्षिणा द्यावी आणि गुरुंनी शिष्यांना शिकवून विद्यासंपन्न करावे. कुटूंबातील लहानांनी वडिलांच्या आज्ञा पाळाव्या व वडिलांनी त्यांचे सर्वतोपरी पालन पोषण व संवर्धन करावे. निर्धनांनी धनिकांची सेवा करावी व धनिकांनी त्यांचा ऐहिक योगक्षेम चालवावा. त्याच प्रमाणे मानवी प्राण्यांनी देवतोद्देशाने यज्ञयागादि कर्मे करुन देवांना प्रसन्न करुन घ्यावे व देवांनी त्यांच्या संकटांचे निवारण करुन त्यांचा अभ्युदय करावा असा हा अन्योन्य संबंध अव्याहतपणे चालवावा असाच परमेश्वराचा ही सृष्टी निर्माण करतांनाचा हेतु आहे व तो हेतु ओळखून सर्वांनी आपापल्या परीने कर्तव्य म्हणजेच यज्ञ करावा.

हीच कर्तव्याची कल्पना ऋण या शब्दाने प्राचिन ऋषींनी व्यक्त केली आहे. प्रत्येक मनुष्य आपल्या बरोबर देवऋण, ऋषीऋण व पितृऋण अशी तीन ऋणे घेऊन जन्मतो. या तीन ऋणात आणखी एक सामाजिक ऋणाची गणना गीतेत केलेली आहे, व ते फेडण्याचे साधन म्हणजेच लोक संग्रहार्थ कर्म करणे व तत्प्रित्यर्थ यज्ञ करणे आवश्यक आहे. यज्ञद्वारा संतुष्ट केलेले देव तुम्हास इच्छित भोग्य वस्तु देतील. जो मनुष्य देवांनी दिलेल्या इच्छित वस्तु त्यांना समर्पण केल्याशिवाय उपभोगतो त्याला चोरच म्हटला पाहिजे. देवतोद्देशाने यज्ञ केल्यानंतर ज्या वस्तू अवशिष्ट राहतील त्यांचा उपभोग घेणारे सज्जन सर्व पापापासून म्हणजे त्या वस्तू प्राप्त करून घेतांना घडलेल्या दोषापासून मुक्त होतात. जे केवळ स्वतःकरिताच म्हणजे यज्ञादिकरण्याचे

मनात न आणता अन्न शिजवितात ते पातकी जणू काय पापच भक्षण करतात. इतरांचा योग्य वाटा न दिल्याने त्यांचा अपहार केल्याचे आणि आनृण्य संपादन न केल्याचे पाप त्यास लागते.

भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात कीं, सर्व प्राण्यांची उत्पत्ति अन्नापासून होते. अन्नाची उत्पत्ति पर्जन्यापासून होते. यज्ञ केल्याने पर्जन्य पडतो. यज्ञ कर्मातून निर्माण होते. कर्म वेदापासून वेदाज्ञेने उत्पन्न होते. वेद सगुण ब्रह्माच्या मुखापासून निर्माण झाले आहेत आणि हे सगुणब्रह्म सर्वव्यापी परब्रह्मापासून निर्माण झाले आहे. अशारीतीने परब्रह्म सर्वव्यापी असल्यामुळे जेथे जेथे म्हणून यज्ञकर्म चालू असेल तेथे तेथे परब्रह्माचे अधिष्ठान निश्चयेकरून असते असे समजा. वेदांनी प्रतिपादिलेले जे कर्म त्यात ॐकार रूपाने परब्रह्म अधिष्ठित असतो. शिवाय यज्ञार्थ केलेले कर्म वेद प्रतिपादित असते. त्यात त्यागवृत्ति, उपासनाबुध्दि अनासक्ति इ. गुण असल्यामुळे यज्ञार्थ कर्म करणे ही एक ईश्वरी उपासनाच होय आणि अशी उपासना करणारा पुरुष निःश्रेयस प्राप्त करुन घेतो. अर्थातच यज्ञार्थरुपाने जेथे जेथे उपासना चालली असेल तेथे तेथे यज्ञकर्त्याला मोक्षसिध्दी होण्याचे अभिवचन भगवंतांनी दिलेले आहे. तेव्हा यज्ञार्थकेलेले निष्काम कर्म बंधनकारक न होता निःश्रेयसकारक होते हे सिध्द होते.

जो मनुष्य आत्मसुखात रमणारा, आत्मानंदातच तृप्त असणारा आणि आत्मज्ञानामध्येच संतुष्ट राहणारा असतो त्याला अवश्य कर्तव्य असे काहीच नसते. त्याला कर्म करुन काही स्वतःचे सुख साधावयाचे नसते आणि कर्म न करण्यापासून ही त्याला कांही साधावयाचे नसते. तसेच जगातील कोणत्याही भूतमात्राशी त्याचा स्वतःचा कसलाही अर्थ प्राप्तीचा हेतु गुंतून राहिलेला नसतो. त्याला इतरापासून कांही प्राप्तव्य नसते, म्हणूनच तो परोपकारार्थ निष्कामतेने कार्य करु शकतो. म्हणून अशा निष्काम कर्मयोग्याप्रमाणे तू देखिल आत्मरत, आत्मतृप्त व आत्मसंतुष्ठ होऊन अनासक्त बुध्दिने आपले यज्ञमय आवश्यक कर्तव्य सदोदित करीत राहा. कारण अशा प्रकारचा आसक्तिरहित पुरुषच निष्काम कर्माचे आचरण करीत करीत परमस्थान मोक्ष प्राप्त करून घेतो. श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करतो तसेच सामान्य जनहि आचरण करतात. श्रेष्ठ पुरुष जो धर्म प्रमाणभूत मानतो त्याला अनुसरुन सामान्य लोकहि वागतात अज्ञानी माणसे कर्माच्या फलाच्याठायी आसक्ति ठेऊन जशी कर्मे उत्साहाने करतात तशीच लोकसंग्रह करण्याची इच्छा धरणाऱ्या आत्मज्ञानी माणसाने आसक्ति सोडून उत्साहाने कर्मे करावी. ज्ञात्याने कर्माच्या ठिकाणी आसक्ति असलेल्या अज्ञजनांचा आपल्या स्वैराचरणाने किंवा कर्मत्यागाने बुध्दिभेद करु नये एवढेच नव्हे तर त्याने समत्वबुध्दिने स्वतः सर्व कर्मे करुन आपल्या उदाहरणाने अज्ञ जणांना त्या कर्माविषयी आवड उत्पन्न होईल असे करावे.

सतपंथ घटपाट पूजा यज्ञविधीद्वारे सद्‌गुरु इमामशाहांनी सुध्दा सकाम व निष्काम कर्माचरणाचे साधन आपल्या संप्रदायात सुरु केलेले आहे. त्याच माध्यमातून भगवंताची निष्काम भावनेने उपासना करण्याची शिकवण सद्‌गुरुंनी दिलेली आहे. गुरुवाणीच्या एका पदात त्यांनी म्हटलेले आहे की. –

युग परमाणे वेदने ध्यावो मुनिवरो ।
भाई काहेने खोवे पूर्वजन्मनी कमाई ।। १

अेक करी सेवो ने गीनान विचारो ।
जीत्या फल तमे काहे ने हारो ।। २

खरी खरी वेलामा रमत मांडी ।
कहा तमे चाल्या सत छांडी ।। ३

परन्या मेलीने परघर जावे ।
बेइमानी जीवडो वैकुंठ ना पावे ।। ४

जनम दुहागण होती जे नारी ।
आज सतपंथ मलीया सुहागण नारी ।। ५

चार जुगनी दुहागण नारी ।
देव दुनियामा रहे छे बिचारी ।। ६

पाच मळीने तेनो वमरस कीजे ।
खरा खोटा रतन तमे परखीने लीजे ।। ७

साचूने मळो ने झुटू ना बोलो ।
जेम शिंगडीथी तुटो छे वेलो ।। ८

सतक्रिया मुखे साचो जो बोलो ।
गुरु गतमा जई अपराध खोलो ।। ९

आद उनाद आजे सतपंथ साचु ।
अेणे पंथे चढीया कोईनथी वळिया पाछु ।। १०

साचे इमाने प्रभुनी भगती कीजे ।
कुटूंब पद अमरापुरी लीजे ।। ११

ज्ञान ध्यान वेद केवाये चालो ।
साचा इमानी जीव वैकुंठ माळो ।। १२

निर्मळ मन करी दिजे हो दान ।
जीकरे जागी करो उत्तम काम ।। १३

आगम गुरुजी बताया छे भेद ।
फल छे अनंत तमे करो नखेद ।। १४

वारुसवेलामा सुमरण कीजे ।
गुरु गतमा जाई अमरपद लीजे ॥ १५

पुरुष नारीना अे छे धरम ।
करसो खमीया तो नथी लागे करम ॥ १६

यहा कछु देसो तो आगळ जाइने लेसो ।
सुक्रीत विना जीव झुरी झुरी मरसो ॥ १७

अथरण वेद बोल्या आ पर्व साचु ।
फल छे पाकु पण दिसे छे काचु ॥ १८

कहेत इमामशाहा काही विलंभ न किजे ।
पवित्र दृष्टे फल अमीरस पीजे ॥ १९

अशा प्रकारे मानवी जीवन सुखी समृध्द व्हावे, त्यातील दु:ख, कष्ट, क्लेश, दैन्य दैवी उपासनेने क्षीणप्राय व्हावे, त्यांची ऐहिक उन्नति व्हावी, सर्वांगीण विकास व्हावा व परमार्थाचा लाभ घडावा, कर्म दोष निवृत्ति व्हावी आणि आत्मसाधन जोडण्यास तो पात्र–युक्त व्हावा यासाठी सद्गुरुंनी हा कर्ममार्ग अथर्ववेदाच्या अनुषंगाने उपदेशिलेला आहे. कलशपूजा म्हणजे वारीयज्ञ वा जलयज्ञ होय असे म्हणतात. अग्नीच्या माध्यमाने यज्ञात जशी अन्यान्य देवतांची उपासना केली जाते तशी सृष्टीचक्र चालक देवतांची व ईष्ट आराध्य दैवतांची उपासना सुध्दा या घटपाट पूजा यज्ञविधीद्वारा या संप्रदायात करण्यात येते. हा अत्यंत गुह्य आणि क्लिष्ट विषय असल्याने संशोधनात्मक आहे.

प्रकरण ४ थे

" सत्पंथातील धार्मिक बाधा – मानता व उत्सव. "

सतपंथ संप्रदायाच्या तीर्थस्थानात अनेक प्रकारचे चमत्कार आजपर्यंत चालू असल्याचे पाहण्यात येतात. या गोष्टी म्हणजे सदगुरु इमामशाहांच्या दिव्य शक्तीचे प्रतिकच आहेत. अशा प्रकारच्या घटनांचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) भविष्यविषयक बेडी – शकुनावली.
२) गंगाकुआ माहात्म्य. कुंवारिका क्षेत्र दर्शन पूजा.
३) सत्पंथ तीर्थधामावरील मानमान्यता, बाधा व पूर्तता.
४) सामाजिक व धार्मिक उत्सव, व्रते.

१) भविष्य विषयक बेडी – शकुनावली.

सतपंथाचे मुख्य तीर्थक्षेत्र पीराणा येथे एक लोखंडी बेडी (साखळदंडासारखी) असून त्या द्वारा लोक आपल्या भविष्यातील गूढ प्रश्नांची उत्तरे मिळवित असतात. हे प्रश्न म्हणजे नोकरी, उद्योगधंदा, रोजगार, विवाह, संतानप्राप्ति. शैक्षणिक, नैतिक, आरोग्यविषयक अशा अनेक प्रकारचे असू शकतात.

प्रथम ही बेडी सद्‌गुरु इमामशाह व त्यांचे सेवक हाजरबेग यांच्या समाधीवरुन ओवाळून हाजरबेगच्या समाधीपासून २०/२५ पावलावर सामोरे उभे राहून आपला प्रश्न इमामशाह महाराजांना भक्तिभावाने सांगून हात जोडावेत. नंतर दोन्ही पायात दोन्ही बेड्या घालतात त्या दोन्ही पायातील कड्या साखळदंडांनी एकमेकींशी जोडलेल्या असतात. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा ताण पडणार नाही अशा रीतीने हळू हळू चालायला सुरुवात करतात. प्रश्न सुटायचा असल्यास अथवा अनुकूल उत्तर यायचे असल्यास साखळदंड आपोआप कडीतून खाड्कन् बाजूला फेकला जातो. पायातली बेडी जर एक दोन पावलातच सुटली तर समजावे कीं आपले काम लवकरच सिध्दीस जाईल. ५/६ पावले गेल्यानंतर सुटली तर समजावे कीं थोडा उशीर लागेल. आणि हाजरबेगच्या समाधीपर्यंत जाऊनही जर बेडी आपोआप सुटली नाही तर समजावे कीं आपले काम सिध्द होणे शक्य नाही. अजूनही ही चाल अस्तित्वात आहे व बरेच लोक या प्रकारचा कौल पाहून मानता – बाधा ठेवून आपले जीवनं सुखी करतात.

सद्‌गुरु इमामशाहांच्या हयातीत ते स्वतःच या सर्व गोष्टींचे भविष्य जाणून सांगत असत, पण त्यांच्या नंतर सद्‌भक्तांची होणारी गैरसोय व त्रूटी दूर करण्याकरिता त्यांनी ह्या पध्दतीचा उपयोग करण्यास सुचविले. बेडी वगैरे कांहीच भारलेले नसते, परंतु जे कार्य घडते ते केवळ त्या महात्म्यांच्या दिव्यशक्तीचाच प्रताप आहे.

२) गंगाकुआं :–

सद्‌गुरु इमामशाहांच्या समाधिस्थानाच्या पूर्व बाजूस कंपाऊंडला लागून एक विहीर आहे. त्या विहीरीमधून इमामशाहांनी भक्तिभावाने आवाहन करुन गंगाजळ काढून यात्राळू संघास स्नान घालून त्यांना काशीविश्वेश्वराचे दर्शन घडविले होते असा इतिहास आहे.

इ. स. १९२०/२१ च्या सुमारास कच्छमध्ये सत्पंथाच्या अनुयायांना शुध्द करण्याची चळवळ पटेल नारायण रामजीने चालविली आणि सत्पंथ व त्याच्या प्रवर्तकांच्या विरुध्द प्रचार कार्य केले. त्याचा दुष्परिणाम अनुयायावर होऊन त्यांच्यात बेदिली अस्थैर्य येऊ लागले. त्यांच्यापैकी कांही अनुयायांनी धारिष्टच करुन निश्चय केला की दसवंतची रक्कम जी दरसाल चैत्र शुध्द बीजेच्या दिवशी जमात-संघ पीराण्यास घेऊन येतो ती रक्कम इमामशाह महाराज जो पर्यंत कांही चमत्कार दाखविणार नाही तो पर्यंत देऊ नये. ठरलेल्या वेळे प्रमाणे संघ पीराण्यास येऊन दाखल झाला. संघाचे पाऊल गुरु महाराजांच्या दरवाजात पडताबरोबर इमामशाहा महाराजांनी ज्या विहीरीतून गंगाजळ काढून यात्रेकरुंना काशी दर्शन दिले होते त्याच विहीरीतून एकाएकी पाण्याचा प्रवाह वर येऊन काठावरुन बाहेर ओसंडू लागला. एक सारखे आठ दिवसपर्यंत ते गंगाजल वाहू लागले. कच्छची जमात तर हा चमत्कार पाहून दंगच झाले. त्या गंगाकुव्याजवळ उभे राहिल्यानंतर विहीरीत असा कांही गडगडाट होत होता कीं जणू आत यंत्रच बसविलेले आहे. त्या पाण्याचा दिव्य सुगंध आजूबाजूस पसरुन सर्व वातावरण दिव्य सुगंधमय आनंदीत उल्हासित बनून गेले. आजूबाजूच्या गांवातील लोकांना ही बातमी समजताच सर्वजण धावत आले व सद्‌गुरु महाराजांचा हा प्रत्यक्ष प्रगट चमत्कार पाहून आश्चर्य पावून धन्य झाले.

कच्छच्या जमातने सुध्दा आपला विश्वास सुदृढ बनवून सद्गुरु महाराजांना क्षमा मागितली व अनन्यभावे नमन करुन त्यांनी दसवंतची रक्कम तेथे अर्पण केली. मग फुलें व नारळ, चंदन, अक्षता यांनी साक्षात् गंगामातेची पूजा अर्चा करुन गंगाकुआ मध्ये वाहिली तेव्हा प्रवाह वाहणे आपोआप बंद झाला. सर्वांनी गंगामातेचा व सद्गुरु इमामशाह महाराजांचा व सनातन सतपंथाचा जयजयकार केला.

इ. स. १९२४ च्या सुमारास महाराष्ट्रातील खानदेशच्या फैजपूर येथील जमातला सुध्दा अशाच प्रकारचे गंगादर्शन झाले होते त्या विषयी हकिकत सांगतात कीं फैजपूर, बामणोद, राजोरा, चिनावल, रोझोदा वगैरे गावांमधून जवळ जवळ ३०० सत्पंथी अनुयायी मंडळी गुरु दर्शनासाठी पीराणा येथे गेले असतांना त्यांनी तेथील गादीपती श्री लक्ष्मणकाका यांच्याजवळ असा आग्रह धरला कीं पूर्वी कच्छी बांधवांना ज्या प्रमाणे येथे गंगादर्शन घडले होते त्याच प्रमाणे आम्हाला पण घडले पाहिजे. त्यावेळी देवस्थानात सत्यवादी राजा हरिश्चन्द्र आख्यानाचे कीर्तन चालू होते. काकांनी सांगितलें कीं तुम्ही आबालवृध्दांनी सद्गुरु इमामशाहांच्या समाधीस्थानाला १०८ प्रदक्षिणा घालून अत्यंत भक्तिभावाने स्मरण किर्तन करा. तुमची मनोकामना सद्गुरु महाराज पूर्ण करतील.

सर्वांनी स्नान करुन १०८ प्रदक्षिणा घातल्या. भक्तिभावपूर्ण कीर्तन सुरु झाले, आख्यानाचा विषय हरिश्चन्द्राची कसोटी व सत्वपरिक्षा हाच होता. सर्वजण आख्यान ऐकण्यात तल्लीन झाले. तारामतीची व हरिश्चन्द्राची शेवटची सत्वपरिक्षा चालू असतांना सर्वांच्या नयनातून अश्रु प्रवाह वाहत होता. अगदी त्याच समयी भगवान प्रगट झाले. भगवन्नामाचा गजर सुरु झाला बाहेर मोठमोठ्याने गलका सुरु झाला. " गंगा मैया की जय ! सद्गुरु इमामशाह महाराज की जय ! श्री निष्कलंकी नारायण भगवान की जय !! सनातन सतपंथ की जय !!! "

आतील गजर कमी झाल्यावर बाहेरील कोलाहल काय आहे याचा कानोसा घेतल्यावर त्यांना गंगा प्रगट झाल्याचे समजून आले. सर्वजण आतूरतेने गर्दी करीत गंगादर्शनाकरिता धडपडू लागले. देह भान विसरुन एकमेकांच्या अंगावर पडत आदळत धावपळ करीत सर्वजण गंगाकुआजवळ गेले. पाहतात तो विहीरीतून प्रचंड आवाजासहित पाण्याचा प्रवाह बाहेर उसळत होता. कांही लोकांनी त्याचे तीर्थ म्हणून बाटल्या डबे भरलेत व नंतर पाण्याचे सत्व पहावे म्हणून एकाने अशी इच्छा व्यक्त केली की या पाण्याचा दिवा जाळावा. परंतु तितक्यात एका अस्पर्श असलेल्या स्त्रीच्या स्पर्शाने गंगाप्रवाह वाहणे बंद झाला तो जेथून उदभवला तेथे एक वीतभर खड्डा होता, तेथे पाणी साचून राहिले. त्यातले पाणी आणून दिवे जाळण्यात आले तर ते तूपाच्या दिव्याप्रमाणे जळत होते. त्या खळग्यातील पाण्याने लोकांनी ४८ तास दिवे जाळले नंतर ते पाणी ही नष्ट झाले.

गंगाकुआं ही जागा अजूनही विहीर रुपाने शिल्लक आहे. त्यातल्या पाण्याने आंघोळ करुन महापूजा म्हणजे कुवारीका क्षेत्राचे दर्शन करतात. कुवारीका क्षेत्र म्हणजे सद्गुरु इमामशाहांनी समाधी घेतलेले स्थान. ही भूमी कुमारी आहे असे या संप्रदायातील मान्यवरांची मान्यता आहे.

इमामशाहांच्या दशावतार ग्रंथात वर्णन आलेले आहे की भगवंताचा दहावा अवतार जेव्हा प्रगट होईल व भारतात जंबुद्विपात येईल तेव्हा या कुवारीका भूमीवर त्याच्या सैन्याचा पडाव राहिल, तेव्हा ही भूमी सुवर्णरुप होईल. त्याचे अवतार कार्य संपल्यानंतर ही भूमी उपवर कुमारीचे रुप धारण करुन विजेत्या भगवंताची आरती ओवाळून त्याला वरमाला घालील. अशा प्रकारची आख्याइका वर्णिलेली आहे. सद्गुरु महाराजांच्या समाधीस्थानाला १०८ प्रदक्षिणा घालून मध्यरात्रीच्या वेळी गंगाकुआचे स्नान करुन स्त्री पुरुषांनी शुचीर्भूत झाल्यावर कुवारीका क्षेत्राची महापूजा केली जाते. तेव्हा सद्गुरु इमामशाहांना स्वर्गलोकातून प्राप्त झालेल्या सोन्याची वीट म्ह. पाट, सुवर्णकलश, कल्पवृक्ष, स्वर्ग गंगा वगैरे वस्तूंचे दर्शन घडवितात.

३) सत्पंथ तीर्थधामावरील मानमान्यता, बाधा व पूर्तता.

१) हाजरबेगची उन्हात तापूनही सदैव थंड राहणारी समाधी.

हाजरबेग हा इमामशाहांचा परम सेवक होता. इमामशाहांच्या निर्वाण समयी त्यांनी हाजरबेग यास वरदान दिले होते कीं माझ्या समाधीसमोर खुल्या पटांगणात तुझी समाधी राहिल व लोक पूजा अथवा मानता उतरवतांना माझ्या आधी तुला फूल वाहून पूजा करतील आणि खुल्या मैदानात उन्हात राहूनही तुझी समाधी भर दुपारी सुध्दा तापणार नाही. थंडगार राहिल. सद्गुरुंच्या वरदानाप्रमाणे आजही त्यांचीच आधी पूजा केली जाते व वरुन कितीही कडकडीत ऊन तापत असले तरी ती समाधी थंडच असते. तिच्याच बाजूला एक दगड संगमरवरी बसविलेला आहे. तो पण त्याच्या आजूबाजूचे दगड खूप तापतात तरी सुध्दा तो दगड थंडगार असतो.

२) भाभाराम व कीकीबाई. यांचे धर्मक्षेत्र.

हे दोघे बहिण भाऊ मोठे संस्कारी आणि योगी होते. सद्गुरु इमामशाहांच्या अनुग्रहाने त्यांना आत्मसाक्षात्कार झाला होता. सद्गुरुंचे त्यांच्यावर अपार प्रेम होते. इमामशाहांनी त्यांना वरदान दिले होते की तुमचे स्थानही एक तीर्थधाम गणले जाईल व तुमच्या स्थानात जळत असणाऱ्या अखंड ज्योतीस काजळी येणार नाही. खेडा जिल्हयातील देवा या गांवी असलेले सद्भक्त भाभारामचे ठिकाण व त्यापासून २ मैलावर असलेले रूण या गांवी साध्वी कीकीबाईचे ठिकाण या दोन्ही ठिकाणी चारशे साडेचारशे वर्षापासून जळत असलेल्या अखंड घृतज्योतीवर अजूनही कधी काजळी आलेली नाही.

या गोष्टीची सत्यता पटवून घेण्यासाठी बडोद्याचे महाराजा श्री. सयाजीराव गायकवाड यांनी एका काश्याच्या ताटलीला तूप लावून ती त्या ज्योतीवर धरली पण तरीही तिला काजळी मुळीच आली नाही. तेव्हा प्रभावीत होऊन त्यांनी त्या ठिकाणच्या दिवाबत्तीच्या खर्चासाठी कांही जमीन दान दिली आहे.

३) नायाकाका यांचे धर्मस्थान.

सद्गुरु इमामशाह महाराजांच्या भक्त मालिकेतील शिरोमणी सद्भक्त नायाजी महाराज. यांना पण इमामशाहांनी वर दिला होता कीं, कुकस या गांवी तुझे स्थान होईल व ते यात्राधाम म्हणून मानले जाईल. या ठिकाणी अजूनही दरवर्षी भाद्रपद शुध्द बीजेला मेळावा भरुन प्रचंड

गर्दी होते. हजारो स्त्री पुरुष आबालवृध्द दर्शनास येतात. पूजा अर्चा सत्संग मेळावा होतो. येथे जळणाऱ्या अखंड घृतज्योतीला सुध्दा काजळी येत नाही. लोक येथे चांदीच्या वस्तूंची मानता उतरवतात. उदा. ज्याचे डोळे खराब झाले असतील तो मानतो कीं माझे डोळे बरे झाल्यास मी चांदीचे डोळे अर्पण करीन. कित्येकांनी गुरा जनावरांच्या बाबतीत तर कित्येकांचे संततीच्या बाबतीत असे मान्यीत असते तशा प्रकारच्या चांदीच्या लहान मोठ्या वस्तू तयार करुन लोक तेथे अर्पण करीत असतात. अजूनही कित्येक तशा वस्तु आपणास तेथे पहावयास मिळतात. या देवस्थानच्या दरवाजा समोर दोन उंच दगड पडलेले आहेत असे सांगण्यात येते की, एकदा दोन चोर तेथे चोरी करण्यासाठी आले, ते मंदीराच्या दारात प्रवेश करताच तेथे दगड होऊन पडले. कुकस आणि आजूबाजूचे गावातील लोक मोठे वर्णन करून ही कथा सांगतात. या धर्मस्थानाला खूपच मान देत असल्याचे दिसून येते.

४) फैजपूर येथील सत्पंथी मंदीर.

पूर्व खानदेश म्हणजेच जळगांव जिल्हयात फैजपूर येथे सतपंथ संप्रदायाचे एक विस्तृत बांधकाम केलेले दोन मजली धर्मस्थान "श्री सत्पंथी मंदीर" आहे. त्या ठिकाणी मंदीराच्या ईशान्य कोपऱ्यात धर्मध्वजा आहे. हे स्थान जवळ-जवळ ३०० वर्षापासून फैजपूरला आहे. सुमारे १०० वर्षापूर्वी येथे धर्मध्वजेवर आकाशातून शुभ्र व सुगंधी फुलांची पुष्पवृष्टी झाली होती, जुने लोक सांगतात की त्या फुलांना अलौकिक सुगंध होता आणि तेथून एका महापुरुषाची स्वारी अदृश्यरुपाने जात असल्याने ती पुष्पवृष्टि झाली होती. आजही हे ठिकाण लोकांच्या श्रध्देचे–भक्तीभावाचे एक पवित्र स्थान म्हणून भरभराटीत आहे. हल्ली या वास्तूचा बराच जीर्णोध्दार झालेला आहे च एक आदर्श प्रेक्षणीय स्थळ म्हणून या परिसरात त्याचा नांव लौकिक आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी निशाण–ध्वज अर्पण करणे, संतति प्राप्तीसाठी नवस करून त्यानुसार बालकांचे जाऊळ उतरविणे, (प्रथम केश खंडन करणे), मुलाच्या भारोभार गुळ, साखर अथवा मिठाई देणे (तुला दान करणे) त्याच प्रमाणे छत्रदान, अखंड घृतज्योतिसाठी तूप अर्पण करणे वगैरे अनेक प्रकारच्या बाधा मानता या मंदीरात उतरविल्या जातात.

पीराण्यास ज्याप्रमाणे शकुनावली पाहण्यासाठी बेडीची प्रथा आहे तशा प्रकारची शकुनावली पाहण्याची प्रथा फैजपूर येथील सतपंथी मंदीरात प्रश्नावली आहे. तीस नंदिकेश्वर प्रश्नावली म्हणतात, फार जुन्याकाळापासून ही प्रश्नावली असून अभिमंत्रीत फाशावरुन विचारलेल्या समस्यांचे अचूक उत्तर त्यावरुन मिळते.

५) सत्पंथ संप्रदायाची अन्य धर्मस्थळे,

वरील मुख्य धर्मस्थळांशिवाय निरनिराळ्या प्रान्तात अनेक धर्मस्थळे आहेत. उदा. गुजरात-मध्ये कानम जिल्हयातील आवाखल, पीसाई. खंबात येथील बालेशाहांचेमंदीर, सौराष्ट्रातील भावनगर येथील सत्पंथी मंदीर, सुरत येथे बोडामुखी सतपंथी मंदीर, कानबाई सतपंथी मंदीर, उखामुखी सतपंथी व्यारभाई सत. इच्छाराममुखी इंदरपूरा सतपंथी मंदीर वगैरे ५ मंदीरे आहेत. डुमस, भीमपूर,

भाटपूर, भाटा, अठवा, कादीपोर, निमराई, बमशेली, उभरात वगैरे गावोगांवी ही मंदीरे आहेत. कच्छमध्ये अंगीया, खिडोई, कोटडा, मांडवी वगैरे ठिकाणी मुख्य व अन्य गांवोगांवी सतपंथी मंदीरे आहेत. त्या शिवाय साबरकांठा जिल्ह्यात ज्याठिकाणी कच्छी कडवा पटेल सत्पंथी बांधव शेती व्यवसाय करण्यासाठी वसलेले आहेत त्या त्या प्रत्येक गांवी सत्पंथी मंदीरे आहेत. मध्य-प्रदेशातील बऱ्हाणपूर, खंडवा, निमाड जिल्हा,. खरगोन, राजपिपला व नर्मदा कांठावरील अनेक गांवी सतपंथी मंदीरे आहेत. महाराष्ट्रात धानोरा, अमळनेर, आकोट, सुरजीअंजन वगैरे गांवी तसेच चोपडा, शिरपूर, धुळे, नंदूरबार, यावल, रावेर, भुसावळ या तालुक्यातील अनेक गांवी सतपंथी मंदीरे, पूजाघरे, देवघरे आहेत. त्या प्रत्येक ठिकाणी सद्‌गुरु इमामशाह प्रणित सतपंथ घटपाट विधीयुक्त पूजा अर्चा आरति, ध्यान, सेवा, सत्संग वगैरे कार्यक्रम चालू असतात. त्या प्रत्येक ठिकाणी लोक मान्यतेनुसार मानता, बाधा, नवस वगैरे चालवून लोक आपले ऐहिक जीवन सुखाने जगण्याचा प्रयत्न करतात व सद्‌गुरु इमामशाह महाराज आपल्या भाविक भोळ्या भक्तांची मनोकामना पूर्ण करतात.

४) " सतपंथातील सामाजिक व धार्मिक उत्सव. "

सत्पंथ धर्म तत्व प्रणालीनुसार देश काल आणि परिस्थितीनुरुप परंपरागत चालू असलेल्या सामाजिक उत्सवात कोणतेही वैशिष्टय अथवा वैगुण्य नाही. सत्पंथी सोडून इतर समाज जे उत्सव सण वगैरे साजरे करतात तेच सतपंथीयात चालू आहेत. फैजपूर येथील सत्पंथी मंदीरात सत्पंथी अनुयायी जे उत्सव साजरे करतात ते असे–

१) गुढी पाडवा :– चैत्र शुध्द प्रतिपदा. या दिवशी ध्वजारोहण होते. ॐ चिन्हांकित भगव्या निशाणाचे मंदीरावरील ध्वजेवर आरोहण केले जाते. त्या वेळेस मंगलवाद्ये वाजवून सद्‌गुरु महाराजांच्या नाम घोषाने व जयजयकाराने निशाण लावले जाते. या उत्सवास गांवोगांवचे सत्पंथी अनुयायी व अनेक प्रेमी सद्भक्त दर्शनास येतात. कित्येक लोक बाधा मानता मानून त्यादिवशी जाऊळ उतरणे, तुलादान करणे वगैरे करतात. भजन पूजन आरती वगैरे होऊन तीर्थप्रसाद वाटला जातो.

२) श्रीरामनवमी :– चैत्र शुध्द नवमीच्या दिवशी भगवान श्री रामचंद्राचा जन्मोत्सव साजरा केला जातो, भजन पूजन आरती होऊन प्रसाद वाटला जातो.

३) अक्षयतृतिया :– वैशाख शु।। तृतीयेच्या आधीच्या दिवशी रात्री मंदिरात पूजाअर्चा होऊन मृत जीवत्म्यांच्या शांतिप्रित्यर्थ सामुहिक श्राध्द विधी केला जातो.

४) गुरुपौर्णिमा :– आषाढ शु।। पौर्णिमेच्या दिवशी व्यासपूजनाच्या वेळेस सतपंथ ज्ञान प्रवर्तक व मार्गदर्शक सद्‌गुरु महाराजांच्या ग्रंथांचे व पादुकांचे पूजन केले जाते. सर्व अनुयायी गुरुदर्शनास व पूजनास येतात.

५) जन्माष्टमी :— श्रावण मासात महिनाभर कोणताही धार्मिक पौराणिक ग्रंथ वाचला जातो. त्या वेळेस उत्साहाने अनेक लोक श्रवण करण्यास येतात. वद्य अष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा केला जातो. भजन पूजन आरती वगैरे होऊन तीर्थप्रसाद वाटला जातो.

६) पोळा :— वृषभपूजनाचे व्रत. पोळयाच्या आधीच्या दिवशी रात्री सामुहिक पूजा होऊन वाढयाबैलांचे म्ह. महादेवाचे पूजन केले जाते. दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजेच्या सुमारास सर्व शेतकरी बंधु आपापल्या बैलजोडयांना सजवून मंदीरात देवदर्शनास आणतात. उदधूप घेऊन त्यांच्या उपवासांचा पारणा करतात. श्रावणात महिनाभर मंगलवाद्ये सनया चौघडा वाजवून देव जागरण करतात.

७) श्राध्दपक्ष :— भाद्रपद शुध्द पक्षात तृतीयेस हरितालिका, गणेशचतुर्थी, ऋषिपंचमी ही व्रते सामुदायीक स्वरुपातून मंदिरात केली जातात. वद्य पक्षात पंचमी, नवमी, दशमी अमावशा या दिवशी सामुहिक पूजा होऊन कुवारपणी वारलेली मुलं, अविधवा वारलेल्या स्त्रीया, घरातील वारलेल्या वाडवडिलांच्या नांवाने मंत्रोपचार होऊन श्राध्द पक्ष उजवला जातो.

८) आश्विन शुध्द पक्षात नवरात्रात दुर्गोत्सव व पूजा केली जाते. मंगलवाद्ये सनया वगैरे वाजवून देवतार्चन होते. विजयादशमीच्या दिवशी गांवोगांवचे सर्व सतपंथी अनुयायी आणि प्रेमीभक्त गुरु दर्शनास येतात.

९) कार्तिक महिन्यात महिनाभर म्ह. आश्विन व।। १ पासून कार्तिक शु।। १५ पर्यंत दररोज सकाळी भजन पूजन काकड आरती केली जाते. कार्तिकी आणि आषाढी एकादशीचे सुध्दा व्रत करतात.

१०) प्रत्येत महिन्याच्या शुध्द बीजेस व्रत उपवास करुन रात्री चन्द्रदर्शनाची पूजा केली जाते. विशेष म्हणजे कोणत्याही वेळेस बुधवारी अमावस्या, गुरुवारची प्रतिपदा आणि शुक्रवारचे चन्द्रदर्शन असेल तर सत्‌पंथ तत्वानुसार व युगधर्मानुसार ते कलियुगाचे महान व्रत गणले जाते. त्यावेळेस गुरुवार व शुक्रवार या दोन्ही दिवशी निरंकार—निराहार व निर्जल उपवास केला जातो. या व्रतास गांवोगावचे सर्व सतपंथी अनुयायी बहुसंख्येने उपस्थित राहून भजन पूजन कार्यक्रमात हिरीरीने भाग घेतात. दान दसवंत वगैरे श्रध्देने मंदीरात अर्पण करतात.

११) दिनांक २६ जुलै रोजी श्री सत्‌पंथी मंदीरातले भूतपूर्व आचार्य कै. गुरु. पुरुषोत्तम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त पूजा होऊन सर्व भाविक अनुयायी लोक त्यांच्या समाधी स्थानाचे दर्शन घेऊन आपल्या गुरुवर्यांचे स्मरण चिंतन करून त्यांचा मूक आशिर्वाद घेतात.

अशा प्रकारची ही व्रते फैजपूर येथील श्री सतपंथी मंदीरात अनुयायाकडून आचरली जातात. सतपंथ संप्रदायाच्या निरनिराळया धामात वेगवेगळे उत्सव साजरे करण्यात येतात.

प्रकरण ५ वे

श्री सत्पंथाचे नीतिशतक

सद्गुरु इमामशाह प्रणित सतपंथाची आचारसंहिता – शिक्षापत्री.

सद्गुरु इमामशाहांनी दिग्दर्शित केलेल्या सतपंथ मार्गात आचार संहिता दिलेली आहे. मानवाने आपले स्वतःचे जीवन उन्नत करुन आपल्या समाजबांधवांचे कशारीतीने कल्याण साधावे याचे सुरेख नियम त्यांनी आपल्या शिक्षापत्री नांवाच्या नियमावलीच्या छोट्या पुस्तिकेत दिलेले आहेत. प्रत्येक सतपंथीयास ते माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी जीवनात शेवटपर्यंत अनेक समस्या येतात त्यावेळी ज्ञानाच्या अभावी मनुष्य बेताल वर्तन करुन समाजस्थिती बिघडवून टाकतो अशा वेळी जो गुरुमार्गी असतो त्याचीच खरी कसोटी असते. सर्व सामान्य मनुष्याप्रमाणे त्याने काम, क्रोध, द्वेष, लोभ, मोह, मद, मत्सर, निंदा, तिरस्कार वगैरे भावनांच्या आहारी न जाता त्याने गुरुवरील सद्भावाने आपला तोल सांभाळण्याचा प्रयत्न करायला हवे आहे. अस्थिर झालेले मनस्वास्थ्य दृढ सखोल विचाराने स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. पण त्यासाठी त्याला आचार-संहिता माहित असण्याची अत्यंत गरज आहे. हे लक्षात घेऊनच सद्गुरु इमामशाहांनी सतपंथीयास या शिक्षापत्रीच्या रुपाने अनंत विचारांची अमूल्य भेट दिलेली आहे.

स्थूलमानाने पाहू जाता नियमावलींचे शारीरीक शुध्दता मानसिक पावित्र्य आणि अध्यात्मिक उन्नति अशा प्रकारचे तीन भेद पाडता येतील. त्या पैकी शारीरीक शुध्दतेला सद्‌गुरु महाराजांनी प्रथम प्राधान्य दिलेले आहे. पशुपक्षी वगैरे प्राण्यांना कसे राहावे, कसे खावे, कसे वागावे या विषयी कोणतेही शिक्षण देण्याचो गरज नसते, ती गरज फक्त ज्ञानी म्हणविणाऱ्या मानवी प्राण्यासच पडते. तो बुध्दिजीवी जरी असला तरी पण प्रत्येक बाबतीत त्याला समज द्यावी लागते. ती देऊनही कित्येक वेळेस तो पशुपेक्षाही हल्कट पणाने वागतौ. तो त्याचा प्रकृति स्वभाव आहे. आणि ही प्रकृति त्याच्या आहार विहार विचारावरच अवलंबून आहे. अगदी प्राथमिक स्वरुपाच्या शारीरीक शुध्दतेच्या नियमापासून सद्‌गुरुंनी सुचना केलेल्या आहेत.

१) "पेहेली क्रिया शरीरशुध्दि करीये. २) मेदान जई आवीने पाच आचमन किजे. ३) पाणी लइने लघुनीत करवू. आचमन त्रण करबा सही. ४) माटी लइने धोवो हाथ, दात मुख धोई करवू स्नान. ५) नहाई करी निश्चे थावो पाक. ६) निर्मल थइने धरवू ध्यान. ७) प्रभाते न्हाई करीने बाहेर निसरवू. ८) संसार करे ते तव न करवू."

सकाळी सूर्योदयापूर्वी उठून शौचमार्जन करुन स्वच्छ व्हावे. शौचविधी करुन आल्यानंतर प्रथम हात नंतर पाय चांगले धुवावे. माती लावून घासून धुऊन-पुसून स्वच्छ करावे- पाच आचमन गुळणे करावे. लघ्वीला जातांना पाणी घेऊन जावे, लघ्वीनंतर इंद्रिय धुवून टाकावे. नंतर हात पाय धुवून तीन आचमन करावेत, दंतमंजन अथवा मातीलावून अथवा दंतधावनाने दात चांगले घासून स्वच्छ करावे. मुख प्रक्षालन करुनच मग स्नान करावे. स्नान करुन निर्मल पवित्र झाल्यावर देवतार्चन पूजन दर्शन करावे. मंदीरात जाऊन सद्‌गुरु चरणामृत घ्यावे. त्यांचे पूजन दर्शन घेऊन आशिर्वाद घ्यावा. प्रातर्संध्या, नित्यपाठ वगैरे करावा. एवढे सर्व काही करण्यास वेळ नसेल तर कमितकमी ५/१० मिनीटभरात भगवंताचे ध्यान स्मरण चिंतन एकाग्रतेने करावे. प्रार्थना-आराधना करावी. सकाळी स्नान झाल्यानंतर आळसावून परत झोपण्याची वाईट सवय लावून घेऊ नये. कारण तसे केल्यास संपूर्ण दिवस रटाळ जावून निरुत्साहीपणा येतो. कोणतेच काम करण्यास लक्ष लागत नाही. सकाळच्या पवित्र शांत वेळेस विषयदुर्गंधाने भरलेले विचार करीत पडल्यास विकार वाढतात व त्या जीवात्म्यांची अधोगति होते, मन प्रसन्न राहात नाही. ते कामी, क्रोधी, कुढे, विषयी व व्यसनी बनते याकरितां तसे विचार झुगारुन द्यावे. श्रमजीवी लोकांनी मनापासून श्रम करावेत पण बुध्दिजीवी लोकांनी सकाळच्या प्रहरी बाहेर मोकळ्या वातावरणात फिरायला जावे. शुध्दहवेच्या पुरवठ्याने आरोग्य सुधारते. मानवी मनावर आहाराचाही जास्त परिणाम घडतो. जशा प्रकारचा व संस्काराचा आहार मनुष्य करतो तशी त्याच्या मनाची जडन घडन होते. सात्विक, राजसी व तामसी अशा तीन प्रकारचा आहार असतो. त्याविषयी सद्‌गुरु सांगतात-

९) शुचिर्भूत थइने नीत नीत जमीये. १०) अनगळ नीर ना पिऊ प्राणी. ११) अन्नने खारु माठु कहेवु नही, वखाणवु पण वखोडवु नही. १२) हिंडता चालता खावू नही. १३) भोजन छांडी उठवू नही. १४) चापी आहार न करशो भाई. १५) बाटचु टाटु झुटू खावु नही. १७) झुटू पशूने वालवू नही. १) वण पुछु खाधा बहु छे पाप.

जेवणाच्या आधी हात पाय मुख चांगले धुवून, आचमन करावे. अन्नाला मान देऊन म्हणजे आपल्या बसण्याच्या आसनापेक्षा उंच भागावर अथवा पाटावर ताट ठेऊन अन्न ब्रह्मार्पणाचा मंत्र म्हणावा. ज्या ईश्वरी शक्तीच्या कृपेने आपल्याला अन्न मिळालेले आहे व ते खाऊन आपणास जीवनरस मिळणार आहे त्या ईश्वरी शक्तीचे स्मरण करुनच अन्न सेवन करावे. जेवत असतांना कोणत्याही प्रकारची बड बड करुं नये, मौन पाळावे. अन्नास नावे ठेवू नये. खारट, अनलवण, बेचव वगैरे नांवे ठेवून त्याचा अपमान करु नये. शक्य झाल्यास त्याची वाखाणणी करावी पण हेटाळणी करुं नये. आवडीचा पदार्थ झाला नाही तरी ताटावरुन तुसडेपणाने उठून जाऊ नये अथवा संताप करुं नये, फेकून देऊ नये. चालता फिरतांना अन्न सेवन करुं नये एके ठिकाणी बसूनच खावे.

आश्रयदोष, जातीदोष आणि निमीत्तदोष असलेले अन्न सेवन करुं नये. त्याचा दूरवरचा परिणाम आपल्या जीवन रसावर होऊन मनाची घडण तशी होते म्हणून तो दोष टाळावा. तसेच उष्टे, खरकटे, करपलेले, शिळे, कुजलेले अन्न खाऊ नये. एवढेच नव्हे तर तसे अन्न पशूंना सुध्दा खाऊ घालू नये. जमिनीत पुरुनच त्याचा नाश करावा. पाणी नेहमी गाळूनच प्यावे अथवा वापरावे आरोग्याच्या दृष्टीने ते हितावह आहे. जेवण अगदी पूर्ण पोटभर करुं नये. अर्धभुक्त असावे अथवा पूर्ण जेवणाच्या तिसऱ्या भागाएवढे जेवण करावे. नाहीतर मनुष्य सुस्तावतो, आळसतो व उद्योगधंद्यात दूर्लक्ष करतो. ईश भजनापासून पराङ्मूख होतो. कुटूंब प्रमुखाने घरातील सर्वांच्या जेवणाची विचारपूस केल्याशिवाय जेवण करुं नये ते पापमूलक आहे. तसेच दुसऱ्या कोणाचीही वस्तू विचारल्याशिवाय घेणे अथवा वापरणे दोषयुक्त आहे.

१८) मादक आहार अंमल तजोरे भाई. १९) भांग तंमाखु न खाशो कोई.
२०) जुवा जुगटा न रमीये साध. २१) नाच छंद न जोइये भाई. २२) अे छल
भेद सद्गुरुथी खोवा सही.

मनुष्याने नेहमी शुध्द सात्विक आहार घ्यावा. फळे, फळभाज्या, पालेभाज्या, कंद, मुळे, दुध दही, कडधान्ये, ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ वगैरे धान्यांचा वापर करुन आहार समतोल व पाचक घ्यावा. राजस आहाराचा म्हणजे पक्वान्नाचा सतत वापर करु नये. सणासुदीच्या वेळेस ते होतातच. सतत पक्वान्नाचे सेवन परवडण्यासारखे व पचण्यासारखे नसते. त्यामुळे प्रकृति बिघडून तनस्वास्थ्य व मनस्वास्थ्य नष्ट होते व मनुष्य रुग्णाइत बनतो. म्हणून शुध्द सात्विक आहाराचेच सेवन करावे. तामस आहाराचा सखोल परिणाम मनुष्याच्या मनावर घडतो त्यायोगे मनुष्य तामसी व विकारी बनतो. मादक आहार म्हणजे अभक्ष्याभक्ष्य व अपेयपान ही केल्याने मनुष्याची वृत्ति राक्षसी बनते व महत्वाकांक्षा जोरावते. सत्पंथ तत्व प्रणालीनुसार मद्य मांस तर वर्ज्यच केलेले आहे पण लसूण, कांदा, भांग, तंमाखू, अफीम, गांजा हे अमली पदार्थ सुध्दा वर्ज्य केलेले आहे. यांच्या सेवनाने सत्साधकास साधनाभ्यास करता येत नाही. त्या मार्गापासून माणसाचे मन विचलित होते. माया विकाराकडे धाव घेते. सद्विचारावर नियंत्रण राहात नाही अस्थिरता बळावते. अमली पदार्थाप्रमाणे नाच, छंद, नाटक सिनेमा वगैरे शृंगारीक साधनांनी सुध्दा मन

विचलीत होते, जुवा सोंगटचा, जुगार, सट्टा, पत्ता, रेस, लॉटरी वगैरे उपायांनी मनुष्य श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतो पण ती संपत्ति सात्विक नसल्यामुळे सुखकर होऊ शकत नाही. अनेकानेक मार्गाने ती संपत्ति मानसिक स्वास्थ्यासह नष्ट होते. शुध्द सात्विक सद्‌गुरुंच्या मार्गापासून तो जीवात्मा दुरावतो.

२३) गुळीना वस्त्र पहेरवू नही. २४) नीचनी संगत करवी नही. २५) पगडी वाकी न बांधशो भाई. २६) वडा लुडाने मानवो सही. २७) अरु परु न करशो दुःखी, २८) पडोशीने दुभी न करशो दुःखी २९) केने गाळ न दिजीये जाणी ३०) कोइनी अयब न उघाडवी जाणी. ३१) सऊ गाळ सांखवीने क्रोध न करवो. ३२) अवगुण करे तासु गुणज करवो. ३३) भांजगड कोईथी करवी नही. ३४) जोर जवानी वश जो करवी.

गुळीने रंगविलेले वस्त्र अथवा भडक रंगी बेरंगी चित्रविचित्र वस्त्रे नेसू नयेत. वस्त्रे साधे शुभ्र आणि सोज्वळ नेसावेत. गुळीच्या रंगाने वस्त्रास विशिष्ट वास येतो त्यामुळे मन मलीन होते. चित्रविचित्र पोशाखाने मन चंचल व मूढ बनते. रंगीबेरंगी वस्त्राने मन अस्थिर होते व मौजमजेत मन रमते. शुभ्र धौत वस्त्राने मन निर्मल शीतल शांत आणि उज्वल होते म्हणून नेहमी करितासुध्दा व पूजेअर्चेच्या वेळी ही वस्त्रे उज्वल स्वच्छ व शुभ्र असावे. छानशोकीचे स्वच्छंदतेचे सर्व मादक उपाय सेंट, अत्तर, फुले वगैरे वस्तूंचा वापर कमी करावा. नीच प्रवृत्तिच्या लोकांची संगत करुं नये. 'संगति संगदोषः.' 'तुख्खम ताशीर सोबतका आसर.' अशी एक लोकोक्ति आहे ती अनुभवाची आहे म्हणून नीच मनुष्याची संगत नको. मनुष्य नीच जातीचा असला पण सुसंस्कारी असला तर त्यांची संगत करायला हरकत नाही पण उच्च कुळातला असून नीच प्रवृत्तिचा असल्यास त्याची सोबत नको. पगडी, फेटा अथवा टोपी तिरपी घालू नये, समाजात ते एक आढयतेचे लक्षण समजले जाते. आपल्या पेक्षा वयाने, ज्ञानाने, अनुभवाने मोठा असल्यास त्यास मानाने वागवावे. त्याची अदब पाळावी. अरे तुरे बोलून अथवा अद्वातद्वा बोलून कोणालाही दुखवू नये. प्रेम व्यक्त करण्याचे वाणी हे एक मुख्य साधन आहे. त्याचा चांगला वापर करावा. नुसत्या बोलघेवडेपणाने कोणाला वश करुन घेऊ नये. तर वेळ प्रसंगी त्याच्याशी तशाच गोडपणाने वागावे.

शेजाऱ्या पाजाऱ्यांशी अदबीने वागावे. आपसात दुही करुन अथवा शिवीगाळ करुन कोणालाही दुःखी करुं नका. कोणाचा न्यूनगंड शोधून त्याच्या वर्मावर घाव करुं नका. परस्पर त्याची समज घालून त्याची चूक उघड करुन सांगा पण मनदुखेल अथवा तुटेल असे त्याच्याशी वर्तन करुं नका. कोणी संतापाने द्वेष मत्सर तिरस्काराने जरी आपल्यास शिवीगाळ केली तरी एकदम क्रोध येऊ न देता शांतचित्ताने विचार करुन परिणामकारक असेच बोला. शब्दाला शब्द वाढवून भांडत बसू नका. कोणी दुष्ट हेतूने जरी आपणास सताविण्याचा प्रयत्न केला तरी आपण उलट त्यास सताविण्याच्या सूडबुध्दीने त्याच्याशी तसे वागू नका. चंदन घासल्याने सुगंध देते. धूप जळून सुगंध देतो. तर सज्जन माणसाने अवगुणावर मात करुन सद्‌गुणाने वागण्याचा प्रयत्न करावा. यातच

त्याच्या उत्कर्षाचे रहस्य आहे. तारुण्यमदाने धुंद होऊ नये. ते तारुण्य आहे तोपर्यंत आपल्या कार्यक्षेत्राची चांगली मशागत करा. उतारवयात आपले कार्यक्षेत्र सुधारण्याचा कितीही प्रयत्न केला तरी इंद्रिये आपल्यास साथ देणार नाहीत याची चांगली जाणीव ठेऊन वेळीच सावध व्हा.

३५) ओछु केने आपवू नही, अधिकू कोईनु लेवु नही. ३६) लालच प्रीत न करशो भाई.
३७) माता पिता गुरु तणा वचन पालवा निरधार. ३८) माता करी जाणो वडिल भवजाई. ३९) धर्म तणु अळस न करवू. ४०) नीत नीत गतमाहे मलीये जाई.
४१) वखत वेळा न चुकवूरे प्राणी. ४२) गुरु मुखी गतमाहे नमवू धाई.

व्यापार धंदा बाजारहाट वगैरे करतांना कोणालाही कमी मापून देऊ नये अथवा कोणाकडून अधिक मापून घेऊ नये. दांडी दीडदांडी वगैरे अथवा खोटे वजन मापे वापरुन कोणालाही फसवू नये. उद्योगधंदा व्यवसायात अधिक लालचीपणा करुं नये. जास्त नफ्याची लालच अथवा हाव विनाशकारी असते. अल्प नफा जास्त व्यापार असा उद्योग शास्त्रात दंडक आहे. ज्या प्रमाणे प्रत्येक व्यवसायाचे समजून हुशारीने वागावे.

माता पिता आणि गुरु अनुभवी व्यक्ति यांचे वचन पालन करावे. प्रसंगी त्यांचे वचन कटु वाटत असले तरी त्यांच्या भावना आपल्या पाल्याविषयी चांगल्याच असल्याने त्यांच्या वचनात अनहित नसते म्हणून त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानावी. हिंदुधर्म शास्त्रात मातापिता आचार्य आणि अतिथी यांना देव मानलेले आहे. सद्भावनेने त्यांची सेवा करुन कृपा संपादन करावी. आपल्यापेक्षा वडिल भावाच्या पत्निशी मातेप्रमाणे व लहान भावाच्या पत्निशी सुनेप्रमाणे अथवा मुलीप्रमाणे वागावे. त्यांनी सुध्दा त्याच वडिलकीच्या अदबीने वागावे.

धर्मकृत्य करतांना पूजा–अर्चा, तप, जप, ध्यान, सेवा, स्मरण करण्याच्या बाबतीत आळस करुं नये. नित्य पूजन भजन आरती सत्संगास हजर राहावे. सत्पंथ धर्म प्रणालीनुसार चार संध्या सांगितल्या आहेत. सकाळ, दुपार. संध्याकाळ व मध्यरात्र या चार वेळेस तरी भगवंताचे स्मरण चिंतन, ध्यान अवश्य करायला हवे. ह्या नेमलेल्या वेळा चुकविता कामा नये. त्यात आळस प्रमाद अथवा चुकारपणा करता कामा नये. गुरु गतगंगेत सतसंगात जाऊन मुखी आचार्य गुरु यांना प्रथम नमन करावे. नंतर सर्व गुरुबंधूस नमन करावे. आचार्यांच्या निर्देशानुसार बसावे. शक्य तेवढी गत गंगेची सेवा करावी त्याच्या कृपाशिर्वाद संपादन करावा.

४३) नीत धोत अमी पीवे ते धर्मी. ४४) अहंकार न मुके ते कुकर्मी.
४५) सुरीजनसाथे ध्यानज धरवु. ४६) दसवंत सुक्रीत गुरु द्वारे देवू रे भाई.
४७) युगतिथी व्रत उपवास करवू सही. ४८) युग प्रमाणे अवतारने ध्यावो रे भाई.
४९) सुपात्रने दान देवु रे प्राणी. ५०) भुख्याने अन्न आपवु सही, तरशाने तो पावू पाणी.
५१) नागाने वस्त्र आपीने अरथज लेवु. ५२) सगा सागवाने ग्रासज सहेवू.
५३) सेवा अभ्यागतनी करवी सही.

गूरु गतगंगेत जाऊन मुखाने नित्य गुरुचरणामृत प्राशन करावे व कानांनी नित्य गुरु वचनामृत श्रवण करुन त्याच वचनाप्रमाणे आचरण करावे. तोच खरा श्रेष्ठ धर्मी होय. जो धर्माचे रक्षण परिपालन करतो तोच धर्मी व धर्म त्याचे रक्षण करीत असतो. सर्व भक्षक अशा अहंकाराच्या धुंदीत जो सदैव असतो तो कुकर्मी होय. गुरुगतगंगेत अथवा पूजेत आल्यानंतर एकमेव सृजनहार जो परब्रह्म परमात्मा त्याचे ज्योतिस्वरुपातून ध्यान करावे. सत्पंथ मार्गात घटपाट पूजेच्या वेळी पंचाग्तनाची उपासना केली जाते. आदिनारायण (परम पुरुषोत्तम सनातन सत्चिद् आनंद स्वरुप ईश्वर.) आदिशक्ती (जगत्कर्त्री चित्कला परब्रह्मस्वरुपीणी शक्ती–योगमाया) ब्रह्मा (रजोगुणाधिष्ठित जगत उत्पत्तिकर्ता व ज्ञानदाता.) विष्णु (जगताचे पालन पोषण व संरक्षण कर्ता.) महेश (जगताचा संहार व लय कर्ता.) अशा या पंचायतनाचे ज्योतिस्वरुपातून ध्यान चिंतन स्मरण करणे हे सत्पंथाचे मूळ तत्त्व आहे.

युगतिथीचे व्रत उपवास जप तप पूजा सेवा करणे युगधर्मानुसार प्रत्येक महिन्याच्या शुध्दबीजेच्या दिवशी चंद्रदर्शनाच्या दिवशी उपवास करुन पूजा करावी. शुक्रवारच्या दिवशी चन्द्रदर्शन असल्यास गुरुवार, शुक्रवार अशा दोन दिवसांचा १२ प्रहरांचा उपवास निरंकार निराहार व निर्जल करावा. त्या दिवशी जप तप ध्यान स्मरण चिंतन पूजा सेवा दानधर्म करावा. दसवंत (सचोटीच्या स्वकष्टार्जित कमाइचा दहावा भाग) सुक्रीत (वीसावा भाग) पूजेत गुरु मुखी यांच्या हस्ते धर्मास अर्पण करुन त्यांचा आशिर्वाद घ्यावा. युगधर्मानुसार प्रचलित अवतारी ध्येय पुरुष निकलंकी नारायणाचे नामस्मरण चिंतन ध्यान करावे.

दानधर्म करतांना कांही गोष्टी विचारात घ्याव्या. भुकेलेल्यास भोजन देऊन तृप्त करावे. तहानलेल्यास जल देऊन शांत करावे. उघडयास पांघरुण घालून संरक्षीत करावे. द्रव्यदानाच्या वेळी पात्रापात्र पाहूनच द्रव्यदान करावे. जिथे पात्रापात्रतेचा विचार करण्यासारखा नसतो त्यावेळी ब्रह्मार्पण करुन दान करावे. अशा प्रकारचा धर्माचा हा सूक्ष्म विचार आहे. सगे सोयरे, इष्टमित्र, संबंधीत लोकांशी सौजन्याने, चांगुलपणाने वागावे व त्यांची मर्जी संपादन करावी. अतिथी, अभ्यागत, भिक्षुक, रुग्णाईत यांची आपणास शक्य असेल त्या मानाने सेवा करावी व त्यांचा आशिर्वाद घ्यावा.

५४) परस्त्रीगमन करवू नही. ५५) भुंडी नजरे जोवू नही. ५६) स्त्री आगळ गुंजन करवी. ५७) झुटी जाणी अजाणी गवाई न दिजे. ५८) झुटो खत न लखवी सति. ५९) लालच न खाइये एक रति. ६०) जहर खाई झपलाई मरवू नही, आवागवन सही अवतरवू.

परस्त्रीगमन वा चिंतन हा फार मोठा अनर्थकारी दोष आहे. हिंदुधर्म संस्कृतीत या दोषाच्या निवारणार्थच विवाहासारखे सुसंस्कार सांगितलेले आहे. समाजस्थिती काम विकाराने बिघडून जाऊ नये वा विस्कळीत होऊ नये म्हणून योग्य वय होताच मुला मुलींचे विवाह करुन टाकावे. परस्त्रीगमन वा चिंतनाने शारीरीक हानी, मानसिक व्याधी व आत्मिक अशांति होते. कोणाकडेही वाईट नजरेने पाहू नये मनात कोणत्याही विकारांची अढी धरुन म्हणजे कामी, क्रोधी, द्वेष, मत्सर युक्त नजरेने पाहू नये. स्त्रियांशी कामाव्यतिरिक्त जास्त गुंजन करुं नये. त्याचप्रमाणे

अति महत्वाची गोष्ट वा गुप्त गोष्ट स्त्रियांना विश्वासात घेतल्याशिवाय करुं नये. देश रळण शत्रुनिवारण वगैरे बाबतीत गुप्त खलबते, गुप्त कारस्थाने यात स्त्रियांच्या संबंधाने सर्वनाश झाल्याचे अनेक उदाहरणे असल्याने तशा बाबतीत सावध राहून वागावे.

आपल्या धर्मशास्त्राने स्त्रीला स्वगृहातील मंत्री म्हणून उपमा दिली आहे. व्यवहार करतांना स्त्रीच्या सल्याशिवाय-विचारविनिमियाशिवाय व्यवहार करु नये असा सुध्दा दंडक घातलेला आहे.

जाणून बुजून खोटी साक्ष देऊ नये. खोटे पत्र दस्तऐवज वगैरे लिहू नये. बिना कारण कोणालाही फसवू नये. लाच लुचपत देऊन अथवा घेऊन कार्य साधून घेऊ नये. त्याने नैतिक हानि होते. जीवनात तो मनुष्य कितीही श्रीमंत असला तरी सुध्दासुखी होत नाही. धंद्यात नुकसान, व्यवहारात अपयश, कार्यात मनोभंग वगैरे जरी झाले तरी सहनशील वृत्तीने मनास आवरण्याचा प्रयत्न करावा. विष घेऊन, जाळून घेऊन अथवा विहीरीत उडी टाकून अथवा मानेस फास अडकवून आत्म घात करु नये. त्यायोगे कार्य तर सुरळीत अथवा यशस्वी होत नाहीच पण उलट तसा मनुष्य अवगतीस जातो. अनंत हाल अपेष्टा-यमपूरीच्या जाच भोगून आवागमनाच्या फेन्यात अपूर्ण राहिलेला कर्मभोग भोगण्यासाठी भ्रमण पावतो मनास विकारांच्या आहारी जाऊ देता कामा नये.

६१) अग्नीउपर झुट्ट पाणी छाटवू नहीं. ६२) नीळू झाड उखाडवू नहीं.
६३) प्रभाते फळ फूल चुटीया बहु छे पाप. ६४) अवाचक प्राणीने आळ न करवी.
६५) हाड विकरो करे पातक सही. ६६) पशु पोशीने वेचवू नहीं. ६७) जीव जंतूने न मारवू जाणी. ६८) मुखथी मार न रहेवू लगार.

अग्नीवर उष्टे, खरकटे, घाणेरडे पाणी टाकू नये. अग्नी विझवायचा असल्यास चांगल्या पाण्याने विझवावा कारण अग्नी ही देवता आहे आणि त्याचा अपमान करणे योग्य नव्हे. हिरवे झाड उपटणे, कापणे, तोडणे हा सुध्दा दोष आहे कारण ते सजिव आहे. त्यात वसलेल्या चैतन्याचा नाश करणे हे महत्पाप आहे. सकाळच्या प्रहरी फळे अथवा पाने तोडणे दोषास्पद आहे. झाडावरुन गळून पडलेली अथवा देठापासून सुटलेली फुलें अथवा फळे वापरावी. ज्याला वाचा नाही, आपली व्यथा बोलून दाखविता येत नाही अशा प्राणि पशुपक्षावर आळ घेऊ नये. त्या पशु प्राण्यांपेक्षा मानवी बुध्दि अधिक असल्याने गरीब बिचाऱ्या पशुवर आळ घेऊ नये. हाडांचा विक्रय करु नये. मानव (स्त्री, पुरुष, मुले, मुली यांचा) विक्रय तसेच गाय, बैल, म्हैस, घोडा, शेळी, गाढव, खेचर वगैरे प्राण्यांचा सुध्दा आपल्या स्वार्थाकरितां विक्रय करुं नये. ज्या पशूंना पाळून पोसून आपण वाढविलेले असेल त्यांच्याकडून वेळप्रसंगी काम करुन घेतलेले असेल अशा पशूंना-प्राण्यांना त्यांच्या विपन्नावस्थेत वाऱ्यावर सोडता कामा नये. नैतिक दृष्टचा तो गुन्हा आहे. मरेपर्यंत त्याची सेवा करणे हे पालन कर्त्याचे कर्तव्य आहे. जीव जंतु सूक्ष्म स्थूल जीवांना ते जरी स्वेदज उद्भीज असले व त्रास देत असले तरी त्यांना मारता कामा नये. ते उद्भवणारच नाहीत याची काळजी घ्यावी.

ह्या वरील तत्वावरुन अहिंसावृत्ति अथवा प्राणिमात्राविषयी दयाभावच इमामशाहांनी शिकविलेला आहे. त्यांचे म्हणणे असे कीं पशु प्राणिमात्रांना प्रत्यक्ष मारण्याने जी जीवहिंसा घडू शकते ती नुसत्या 'मार' असे म्हटल्याने सुध्दा घडते. 'भाई मार कहानू दोष छे, मार कहेता मरी जाये। तो जीव हिंसा करवानू दोष छे, भाई शब्द एकज सारे ॥'

६९) धरतीनो मोल न करशो अे छे माता. ७०) कन्या तणो द्रव्य एखे न खाशो.
७१) झुठू रत्नेश्वर बोलवू नही. ७२) धन व्याजनी न लेवो आहार.

जमिनीचे मोल करु नका. ती अमुल्य आहे. ही खडकाळ ती खारचट तर अमुक मुरमाड, नापेर, खराब अशी नावे ठेवून तिला हिनवू नका आणि केवळ माझी आहे, माझ्या मालकीची आहे, मीच तिचा उपभोग घेणारा आहे असा अहंभाव बाळगू नका, वंश परंपरागत जरी तुम्हाला मिळालेली असली तरी हा विचार करा कीं, ही माझ्या वडिलाकडून मला मिळाली, त्यांच्या वडिलाकडून त्यांना मिळाली. आज मितीस ते माझे वाडवडिल राहिले नाहीत कीं त्यांचे वडिल राहिले नाहीत पण जमिन मात्र जशीच्यातशीच आहे अविकारी निर्विकारी आहे. म्हणून तिचे मोल करुन तिचा अपमान करुं नका. ती माता आहे. क्षमाशिल आहे. माते प्रमाणे तिला मान देऊन लाभघ्या स्त्री प्रमाणे उपभोग्य समजू नका.

कन्येने विश्वासाने बापाकडे ठेवलेले धन--ऐन वेळेस उपयोगी पडेल या उद्देश्याने जमा केलेले द्रव्य, बापाने आपल्या प्रपंचाकरितां वापरुन टाकू नये. योग्य वेळी प्रसंगी तिला पूर्णांशाने परत करावे. कन्येचाच काय पण कोणाचाही विश्वास घात करुं नये. खोटे बोलून कोणाला लुबाडू नये अथवा कोणाला अडचणीत आणू नये. केवळ पैशाकरितां कुलवधूस छळू नये. हुंडा अथवा स्त्री द्वारा धन मिळवून त्यांचा आत्मनाश करु नये. त्यासारखे महापाप अन्य नाही. धनावर जुलूमाने व्याज वगैरे घेणे, सवाई दिढी अथवा दुपटीने रक्कम वसुल करणारा असेल त्याच्या घरी अन्नाचा कण सुध्दा सेवन करुं नये.

७३) मेली थापण न राखवी जाणी. ७४) विश्वासघात केना करवू नही.
७५) पडी जडी वस्तू केनी लेवी नही. ७६) कुड कपटनी मेलो घात.
७७) उधार उसणू न राखवी प्राणी. ७८) पारकू धन लइने भोगवू नही, पुत्र थइने ते धन आपवू पडशे सही.

कोणाचीही ठेव म्हणून ठेवलेली रक्कम हडप करुं नये. गहाण फरोक्त कर्ज वगैरे बाबतीत खोटे दस्तऐवज करुन घेऊन लुबाडू नये. ज्याची रक्कम असेल त्यास ती परत करावी. विश्वासघाताने अगर अन्य बेईमानीपणा करुन बळकावून बसू नये. तशा अन्यायाने जमविलेली आसुरी संपत्ति त्या मनुष्यास सौख्यशांति देऊ शकत नाही. ती आसुरी संपत्ति त्याच्या दैवी संपत्तिसह त्याचा पूर्णपणे विनाश केल्याशिवाय राहात नाही.

कोणाचाही कोणत्याही बाबतीत विश्वासघात करु नये. कारण ते महत् पातक आहे. कोणाचीही रस्त्यात पडलेली जरी वस्तू असली तरी ती आपल्याला सापडली आता त्या वस्तूचे आपणच मालक आहों असे समजून उचलू नये. तसेच कोणाचीही वस्तू चोरीने, अन्यायाने

बळजोरीने उचलून घेऊन ही आमचीच आहे, असे सांगून तिचा उपभोग घेऊ नये. तसे केल्यास आपण त्यांच्या ऋणात बांधले जातो. ते ऋण परत फेड केल्याशिवाय फिटू शकत नाही. कोणा जवळून उधार उसनवार आणलेली रक्कम अगर वस्तू परत केल्याशिवाय राहू नये. ती परत न केल्यास अगर विसरल्यास त्यांच्या ऋणानुबंधनास आपण बांधले जातो. व हरप्रकारे तो पूर्ण करावा लागतो. आपल्या मनातून अन्य जनाविषयी असलेले कुडकपट, विश्वासघात सर्वस्वी काढून टाकावे. दुसऱ्याचे धन अन्यायाने हडप करुन उपभोग घेऊ नये. ऋणानुबंधाच्या नियमाने त्यास पुढच्या जन्मी तेच धन पुत्र रुपाने अथवा अन्योन्य रुपाने परत करावे लागते.

७९) दया राखवी दिलसु जाणी. ८०) पवित्र दिले रहेवु निरधार. ८१) प्रथम हिरदे धोई निर्मल किजीये. ८२) शत्रु करे ते न करवू. ८३) परदुःख जाणीने पाछे रहु. ८४) मोठाईमा गर्व न करवू. ८५) सते चालो तमे दिवसने रात.

सर्व भूत प्राणीमात्राविषयी मनात दया बाळगावी. काया वाचा मनाने कोणालाही दूखवू नये. हृदय नेहमी पवित्र भावनांनी युक्त असावे. हृदयशुध्दि हे सतपंथ शास्त्रात नीतिमत्तेचे प्रथम क्रमांकाचे कलम आहे. सूक्ष्म विकारांचा त्याग केल्याशिवाय हृदयशुध्दि होत नाही आहारशुध्दि, विहार, विचार, संस्कार शुध्द आचरणावरच हृदयशुध्दि अवलंबून आहे.

आपण मनाने मानलेला शत्रु जसे वागेल त्याच्या उलट वागावे याचा अर्थ केवळ विरोध करावा असे नसून शत्रुपक्षाने आपल्याविषयी जो गैरसमज धरलेला असेल तो दूर करण्याकरितां आपण शुध्द मार्गाने वागावे म्हणजे शत्रूच्या मनात असलेली किल्मिषे दूर होतील व त्याची समज झाल्याने शत्रुत्वच राहणार नाही.

दुसऱ्याच्या अंतर्यामीचे दुःख जाणून सहानुभूतीने त्यास सहकार्य करावे. प्राणिमात्रांचे दुःख समजावून घेऊन त्यांना दुःखत्रासातून मुक्त करण्याचा अथवा त्यांचा दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न करावा. भगवंताच्या कृपेने आपण मोठे असल्यास धन, मान, प्रतिष्ठा, ज्ञान वगैरे साधनाने जनसामान्यापेक्षा वरिष्ठ असल्यास त्या बद्दल अहंकार करु नये. अहंमन्यता, गर्व. ताठरपणा हा आपल्या आत्मिक प्रगतीला मोठा अडसर आहे. लोक आपल्याकडे ज्या मोठेपणाच्या अपेक्षेने पाहतात ते पद सार्थ करण्यास आपण प्रयत्नशिल राहून खरोखरीचा मोठेपणा पदरात पाडून घ्यावा.

रात्रंदिवस सत्यतेने–सचोटीने वागावे. आपल्याकडून ज्यायोगे कोणास दुःख कष्ट क्लेश चिंता उपद्रव होणार नाही अशा सोज्वळतेने वागावे. हे जगत् खरोखर असत्य मिथ्या नाशिवंत आहे त्यांत एकमेव ईश्वरच नित्य, अविनाशी, अखंड आहे आणि तो प्रत्येक प्राणिमात्रात चैतन्य-रुपाने व वस्तूमात्रात चित्‌जडरुपाने व्याप्त आहे, हे जाणून सर्वांशी सचोटीने वागावे.

८६) लोभ न करवो रखे लगार. ८७) काम क्रोध तजवोरे भाई. ८८) तप तिरथ करवू स्नान. ८९) उपवास व्रतनी आस न धरवी. ९०) पाषाणनी पूजा करवी नही, आत्मापूजा करवी सही.

कोणत्याही गोष्टीचा अतिलोभ करुं नका. कोणत्याही वस्तूचे आपल्या जीवित कार्यास आवश्यक तेवढे उपार्जन नीतिमार्गाने करा. जास्त हव्यास अथवा अतिलोभ करु नका. तो वासनामूलक आणि विनाशकारक असतो. कामविकार आणि क्रोधीविचार हे आपले दुष्ट शत्रु आहेत. त्यांचा ताबडतोब त्याग करावा. त्यांच्याशिवाय त्रिभुवनात आपला शत्रु कोणीही नाही. त्यांना मनाची साथ मिळाल्यास ते आपला घात करतात.

प्रत्येक मनुष्याने ध्यान धारणा समाधि तपश्चर्या इ. चे शास्त्रशुध्द नियमानुसार दररोज अनुष्ठान करावे. तीर्थस्नान अथवा तीर्थयात्रा अवश्य कराव्यात. ईश्वर साधनेस आवश्यक अशा मानसिक पावित्र्याकरिता तीर्थयात्रेचे महत्व सांगितले जाते म्हणून तीर्थयात्रा करतांना मन शुध्द व पवित्र ठेवा. व्रत उपवासांची फलाकांक्षा धरु नये. निरिच्छ निष्काम बुध्दिने कोणतेही कर्म करण्याचा प्रयत्न करावा. फलाच्या इच्छेनेच ही कर्मे केल्यास फलप्राप्ति तर होईलच पण निष्कामतेने ही कर्मे केल्यास त्याचा प्रभाव सहेतूक कर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ राहिल.

देव म्हणून केवळ दगडाची पूजा करु नका. कारण मूर्तीत ज्या ईश्वराचे अस्तित्व कल्पावे लागते तेच ईश्वरत्व प्रत्येक प्राणिमात्रांचे हृदयात चैतन्यरुपाने असते म्हणून मूर्तिपूजेपेक्षा आत्म्याची जीव प्राणिमात्रांची–त्यांच्याशी चांगल्यारीतीने वागून पूजा करणे सर्व श्रेष्ठ आहे. जडवस्तूंच्या पूजे पेक्षा चैतन्यशक्तिच्या उपासनेस अधिक महत्व आहे. मूर्तिपूजा ही धार्मिक भावनांची पहिली पायरी आहे. मानसिक पूजा ही मधली तर आत्मौपम्यबुध्दि ही शेवटची पायरी आहे. मनुष्याने पायरी पायरीने आपली अध्यात्मिक उन्नति करावी. एकच पायरीवर अडकून राहू नये.

९१) अमर थाये तो जपीये जाप, योगाभ्यास नीत करवू सही. ९२) खट दर्शन पूजे नही पामे मोक्ष. ९३) वेदशास्त्र कहे तें करवू रे भाई. ९४) चतुराई चोखाई रहेवूरे भाई. ९५) मूर्खपणमा न रहेवूरे प्राणी. ९६) ज्ञान दृष्टे जोवू सही सरखू.

अमर होण्याकरिता सदैव नामस्मरण, जप, पूजा ध्यानपूर्वक करा. सदैव अष्टांग योग साधन करून त्याचा अभ्यास करा. यम, नियम आसन, प्राणायाम, प्रत्याहार धारणा, ध्यान करून समाधियोग साध्य करा. यम नियम वगैरे सर्व साधनांची आपल्या जीवनात आत्यंतिक आवश्यकता आहे. मनःपूर्वक अजंपाजाप लक्षपूर्वक साधनाभ्यासाने मनुष्य हळू हळू मुक्त होत जातो. एकदम कोणतीच गोष्ट साध्य होत नाही. अभ्यासाने असाध्य गोष्ट साध्य होते. असत्यदर्शन अर्थात खटदर्शन अथवा नास्तिकता मनुष्याला आपल्या जीवनात कधीच यशस्वी होऊ देत नाही. वेद-शास्त्रांचे तत्व व नीतिमत्तेचे तंत्र हे अनुभवांचे असतात. त्यावर अश्रध्दा ठेवून चालत नाही. आपल्याला ते समजू शकले नाही किंवा आकलन होऊ शकले नाही म्हणून असत्य समजू नये व मनास नास्तिकतेकडे घेऊन जाऊन आत्मनाश करुन घेऊ नये. मनुष्याने मूर्खपणात राहूं नये. जेथे आपणास समजण्यासारखे नसेल अशा वेळी जाणत्याचा सल्ला घ्यावा. जो आपल्यापेक्षा ज्ञानाने बुध्दिने व मानाने मोठा असेल त्याजकडून धर्मतत्वांची जाण करुन घ्यावी. अहंमन्यतेत

राहून आत्मवंचना करु नये. सदैव ज्ञान दृष्टीचा अवलंब करा. व्यवहार कार्यात आपण आपल्या बुध्दीची कसोटी लावून ज्या प्रमाणे यशस्वी होतो तशीच सद्‌बुध्दी परमार्थ मार्गात वापरुन जन्माचे सार्थक करावे. अज्ञानांधःकारात गटांगळ्या खाऊन बुडून मरु नये. नित्या नित्य वस्तूंचा विवेक करुन अनित्यवस्तूंचा त्याग व नित्य वस्तूंचा स्विकार करुन आत्मोन्नति करावी.

९७) साचु झुटू ना करशो वाद. ९८) गुरुनु वचन लोपवू नही. ९९) शिखामण पुछे तेणे सारी दिजे. १००) सांजे सुमरणी लई हरिस्मरण कीजे.

मी सांगतो तेच खरे, बाकी सारे खोटे अशा प्रकारचा खऱ्याखोटयाचा व्यर्थ वाद विवाद करीत बसून भांडणतंटा करु नका. वादविवाद मत मतांतरे या योगाने मनुष्याची मति स्थिर राहात नाही. अहंगंड तयार होतो तो दुसऱ्यास तुच्छ समजतो म्हणून सारासार विचार करुन खोटयाचा त्याग करा व खऱ्या शास्त्र संमत मताचा अवलंब करा. जे समज–ण्यासारखे नसेल तेथे गुरुकडून समजावून घ्या. गुरुचे वचन लोपवू नका. गुरु वचनाच्या मर्यादेचे उल्लंघन करु नका. सद्‌गुरुंनी कथन केलेले ज्ञान वाचन करुन, श्रवण करुन सोडून देऊ नका. त्या ज्ञानाप्रमाणे यथाशक्ति यथामति आचरण करा. यथामति त्याचा प्रचार करा. आत्मोन्नति करितां सद्‌शास्त्रांनी व सद्‌गुरुंनी कथन केलेले ज्ञान संकुचितपणाने स्वतःजवळ लपवून ठेऊं नका. जो मनुष्य सत्यधर्माची सन्मार्गाची शिकवण विचारील; ज्याला त्या ज्ञानाची आवश्यकता असेल, उत्कंठा, जिज्ञासा, तळमळ असेल, जीवनात कसे वागावे याविषयी जाणून घेण्याची आकांक्षा असेल त्यास यथाबुध्दि योग्य शिकवण द्यावी. सन्मार्गदर्शन करावे. अयोग्य अधर्मभूलक अश्रध्दायुक्त शिकवण देऊन कोणालाही फसवू नये.

दररोज सायंकाळी सायंसंध्या करा. हातात जपमाळा घेऊन भगवंताचे नामस्मरण करा. संध्याचार वेळा करायची सत्पंथ आचार संहितेत सांगितले आहे. प्रातरसंध्या म्हणजे सकाळी सूर्योदयाचे आत उठून प्रातर्विधी स्नान वगैरे आटोपून नामस्मरण प्रार्थना संध्या करावी, दुपारी जेवणाच्या आधी संध्या करुन प्रार्थना पूर्वक भोजन करावे. संध्याकाळी कामधंदा वगैरे करुन आल्यानंतर शक्य असल्यास स्नान करुन अथवा हातपाय मुख प्रक्षाळून भगवंताच्या नावाने उदधूप दिप आरति करुन यथावकाश भगवंताचे नामस्मरण करावे. मध्यरात्री हात पाय मुख प्रक्षालन करुन भगवंताचे ध्यान स्मरण चिंतन करावे. अशा प्रकारची ही सतपंथाची आचार संहिता सदगुरु इमामशाह महाराजांनी आपल्या सद्‌भक्तांना दिग्दर्शीत केलेली आहे.

स्थूलमानाने या आचारसंहितेवरुन पाहता मानवाच्या जीवनाची नैतिक चाकोरीच इमामशाहांनी रेखाटलेली आहे, त्याची शारिरीक शुध्दता, मानसिक पावित्र्य, आत्मिक उन्नति व श्रेयप्राप्ति कशा पध्दतीने होते त्याची दैनंदिन दिनचर्या कशा प्रकारची असावी, आपले ऐहिकप्रेय, पारलौकिक श्रेय व पारमार्थिक ध्येय कशा आचरणाने गाठावे याबद्दल कळकळीने उपदेश केलेला आहे. खरोखर या आचारसंहितेचा अवलंब केल्यास मानवातील दानवता मिटून तो नराचा नारायण होईल, नारायणाचा नरोत्तम होईल व नरोत्तमातून पुरुषोत्तम होईल.

प्रकरण ६ वे

" सतपंथातील तत्त्वज्ञान "

सत्पंथ संप्रदयातील अध्यात्म विषयक तत्त्वज्ञान.

सद्‌गुरु इमामशाह प्रणित सतपंथ ज्ञान साहित्यात आचारसंहिते प्रमाणेच तत्वज्ञानाला फार मोठे प्राधान्य दिलेले आहे. कर्म भक्ति, उपासना, ज्ञान व प्रेमभक्ति या सार्‍या योगसाधनांचा अवलंब करून आत्मज्ञान साध्य करून मनुष्य मुक्त होऊ शकतो हे त्यांनी आपल्या साहित्यात ठिकठिकाणी दर्शविलेले आहे. समाधीविशेषाच्या अभ्यासानेच तत्वज्ञान प्राप्त होते. तत्वज्ञानाचा अधिकारी होण्यासाठी आवश्यक ती तयारी करावी लागते. आत्म–अनात्म, तत्वविवेक, वैराग्य, शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रध्दा, समाधान, मुमुक्षत्व म्हणजेच प्रभुकृपा संपादन करण्यासाठी अनन्यभक्तिचा तत्वप्रयोग यामुळे तत्वज्ञान उत्पन्न होते.

मूलतत्व दोन आहेत. आत्मतत्व व दुसरे अनात्मतत्व. प्रकृतिद्वाराच परमतत्वाच्या किंचित सामर्थ्याने सृष्टिला निर्माण करणारे तत्व प्रगट झाले. जीवात्म्याचा त्याच्याशी संबंध घडला आणि सुप्त अवस्थेत परिवर्तन घडून जागृतावस्था प्रगट झाली. ज्या प्रकृतिला परमेश्वराने गति दिली ती तीन गुणांनी युक्त होती. सत्व, रजस् आणि तमस्. हेच तीन गुण पुढे सर्व तत्वात मिसळले. हे त्रिगुणच जगतातील संपूर्ण वस्तूमात्रात न्यूनाधिक अनेक मात्रांनी विद्यमान आहे. याचकारणामुळे सृष्टित भिन्नभिन्नता दिसून येते. नानारुप, नानायोनी नाना विचारधारा, नाना नामे दिसतात पण वस्तूतः हे जग त्रिगुणात्मक प्रकृतिचाच एक अविष्कार व जीवात्म्यांच्या कर्माचाच विस्तार आहे.

जो पर्यंत जीवात्मा प्रकृतिच्या तत्वात फसलेला आहे, तिच्या विविध कामनांच्या पूर्तित लागलेला आहे. तो पर्यंत त्यास कोणत्याही प्रकारची शान्ति प्राप्त होत नाही. जगतातील आधुनिक वैज्ञानिक किंवा विद्वान विचारवंत यांनी कितीही प्रयत्न केला तरी भौतिक तत्वांनाच प्रसन्न करुन अथवा मायिक आज्ञांचे पालन करुन आणि अनात्म वस्तूंना एकत्र आणून ते दु:ख वाढवू शकतील पण मनुष्यास आत्मिक शांति उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत. ते काम धर्म संतपुरुष आणि महात्मा पुरुषच करू शकतात. त्यांच्या अनुभूतीतून हेच सिध्द होते कीं सुख प्रवृत्तीत नाही पण निवृत्तीतच आहे. हेच दोन मार्ग सृष्टीतील जनतेसमोर खुलतात; एक प्रेय व दुसरा श्रेय. या मार्गातूनच एकतर आसुरी संपदा संग्रहीत होते किंवा दैवी संपदा. तत्वज्ञान प्राप्त करणारे दैवी संपदा जोडून चालतात. तत्वज्ञान शून्य लोकच आसुरी संपदेच्या नादात पडून मृगजलतृष्णेच्या आसक्तीने दु:ख सागरात जाऊन पडतात. आज जगतातील बहुतांश लोक आसुरी संपदा जोडण्याच्या नादात पडलेले आहेत. त्यायोगे जगताची खरोखर उन्नति अथवा प्रगति होईल किंवा नाही अशी शंका उद्भवते. परंतु ही शंका उचित नाही, कारण कीं आसुरी वा दैवी संपदेचा संबंध जगतातील नाना पदार्थ वस्तुमात्राशी अथवा आविष्कारांशी नसून अंतःकरणाशी आहे. जगतातील कोणतीही वस्तू धन, वैभव, ऐश्वर्य इ. आसुरी नाही किंवा दैवी ही नाहीत. त्या निर्विकार आहेत पण त्यांचा प्रयोग ज्या भावनेतून, ज्या वृत्तीतून, ज्या लक्ष्यातून आणि ज्या उद्देशाने केला जातो तो त्यास आसुरी अथवा दैवी बनवितो. धन एक साधनमात्र आहे. त्याचा दुरुपयोग आसुरी आहे. आणि सदुपयोग दैवी भावनेने केला जातो.

नाना प्रकारच्या दु:ख झगडे आणि विपत्तीतून सुटायचे असेल तर प्रथम तत्वज्ञान प्राप्त करावयास हवे. तत्वज्ञान झाल्यावर जगत् तुच्छकार वाटायला लागते. परम तत्वाच्या ज्ञानानेच मन स्थिर होते हे तत्वज्ञान मानव शरीरातच प्राप्त होऊ शकते अन्य देहात नव्हे. म्हणून दुर्लभ मनुष्यत्व प्राप्त झाल्यानंतर तत्वज्ञान संपादन न केले तर या नरदेहास काय अर्थ ?

मनखा देही तो दुर्लभ छे, ते नही आवे वारंवार ।
पात्र पछानी परिब्रह्मपुजीये, तो कुळना होवे उध्दार ।।
चार खाणमा जीव आवीयो, भुलो ते बहु अपार ।
पूर्वपुण्य पोता तणो, तेंणे पामो मनखा अवतार ।।
मनखा देही पाम्या शुं थयु, न जाण्या मुगतीनो भेद ।
माणक मोठू मोलनु, पड्या है अंतर छेद ।।
सहस्त्र पचास भोगवीने, आवे मनखा देह ।
दया क्षमा धर्म जाण्या नहीं, जेम उन्हाले वरसे मेह ।।

मानव देहात येऊन जीवात्म्याने आपले जीवन शास्त्रशुध्द मार्गानेच जगून आत्मज्ञान संपादन करावे. यातच आपल्या जन्माचे सार्थक आहे. जगतात आत्मतत्व व जीवतत्व हे दोन पृथक् व स्वतंत्र सत्ता धारण करणारे चैतन्य प्रवाह आहेत. जीवतत्व त्रिगुणात्मक प्रकृतिच्या आविष्काराने बनलेले जडरुप तत्व आहे. तर आत्मतत्व चिन्मय ज्योतिस्वरुप चैतन्य स्वरुप आहे.

या जडचेतनाच्या संयोगाने ही व्यष्टी, समष्टि, जीव, प्राणिमात्र निर्माण झालेले आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि या अष्टांग योग साधनांच्या दृढअभ्यासाने जीवात्मा जेव्हा आपले मलिन अविद्या स्वरुप जड तत्व जाणून त्याचा त्याग करण्याचा अभ्यास करतो तेव्हाच चेतन स्वरुप ज्ञानावलंबनाने तो दुःखमुक्त होत जातो कारण दुःखाचे कारण असलेल्या त्रिगुणात्मक प्रकृतिला आपल्या विवेक बलाने तो दूर करतो.

जीरे मारा हंसा करडी कमानो, स्वामीसु खेचो ।
तो तीरथ त्रिवेणी माहे तरना ।।
ढालधणीना धर्मनी बांधो, तो सतनी समशेर साथे लढना ।
बुध्दिनी बंदूक सुरतनी दारु, गीनाननो गोळो वचे धरना ।।

योगज्ञानाच्या दृढबलाने आठही अंगांचे तीव्रतेने व सावधानतेने अनुष्ठान करावे. यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि नियम म्हणजे शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान या दहाही यम नियमांचे आचरण आपल्या जीवनात करावे. यमाकडे दूर्लक्ष करुन केवळ नियमांचेच पालन केले तरी जीवात्म्याचे पतन होऊ शकते म्हणून यम व नियमांचे यथार्थतेने दृढतेने आचरण करावे, कारण त्या पायावरच बाकीच्या योग अंगाचा महाल उभा करायचा असतो.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, व अपरिग्रह या पाचही यमाच्या सहाणेवर जेंव्हा साधकाचे जीवन घासले जाते तेव्हा ते उजळून निघते पण त्या उजळलेल्या जीवनावर जेव्हा शौच, सन्तोष तप, स्वाध्याय व ईश्वर परायणता यांची चमक (पॉलिश) चढते तेव्हा त्या जीवनात एक अद्भूत दिव्य विद्युत शक्ति प्रगट होऊ लागते व तीच शक्ति त्या जीवात्म्याचे आसन दृढ स्थिर बनविते. प्राणायामाला अनुकूल बनविते. नंतर साधकास आपल्या इंद्रियावर अधिकार जमविता येतो. साधक आपल्या इंद्रियांच्या रजोगुण व तमोगुणास पार झटकून टाकून शुध्द सात्विक चित्त बनवितो. प्रत्याहाराची ही भूमिका दृढ स्थिर झाल्यावर एकच स्थान, प्रदेश, चिन्ह वा बिंदुवर धारणा करणे सुलभ होते. एकाकार वृत्ति झाल्यावर एकाच विषयावर निरंतर धारणा केल्याने ध्यान अवस्था प्राप्त होते. हेच ध्यान दीर्घकाळपर्यंत टिकून राहिले तर ते समाधी अवस्थेत परिणत होते. या अवस्थेत पोहोचण्याचा प्रयत्न सतत दृढतेने करावा म्हणजे आत्मसाक्षात्कारतत्वदर्शन घडते.

साधकाने समाधी अवस्थेत या साऱ्या तत्वांचा साक्षात्कार करून घ्यायचा असतो. साक्षात्ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच 'जाणणे'. तत्वज्ञान वाचणे अथवा ऐकल्याने होत नसते तो जाणण्याचा विषय आहे. ध्यान अवस्था विवेकख्यातीत प्रवेश करुन तत्वांचे साक्षात्ज्ञान जाणण्या-करितां प्रथम शाद्विकज्ञान प्राप्त करणे व नंतर मनोमन जाणण्याने साक्षात्कार होतो.

कपिलमुनिप्रणित 'तत्वसमास', 'सांख्यशास्त्र' तसेच भगवान शंकराचार्यकृत 'तत्वबोध' तद्वत वेद उपनिषद् गीता योगवाशिष्ठच भागवत आणि अन्य ऋषिमुनियोगी पुरुषाद्वारे जे सृष्टि-विज्ञान, तत्वव्याख्या आणि तत्वनिर्णय केला गेलेला आहे त्यांच्यात परस्पर विरोध असा विशेष

कांही नाही, जो कांही आहे तो केवळ शाब्दिक आहे. व्यवहारात सर्व एकरुपच व्यक्त होतात. प्रथम अनादि तत्वे ३ आहेत. १) ब्रह्मतत्व २) आत्मतत्व ३) प्रकृतितत्व. प्रकृतीचे ३ गुण आहेत १) सत्त्व २) रज ३) तम हे तीनही गुण जोपर्यंत सम अवस्थेत असतात तोपर्यंत सर्ग काल म्हणजे निष्क्रिय अशी प्रलयावस्था असते. परमात्मा जेव्हा आपल्या सामर्थ्याने प्रकृतीस गति देतो तेव्हा या त्रिगुणात विषमता येते व तत्द्वारा विविध प्रकृति निर्माण होते. प्रकृति आठ आहेत. अव्यक्त, महत्, अहंकार, आणि पाच तन्मात्रा. विकार सोळा आहेत पंच महाभूत व अकरा इंद्रिये असे मिळून २४ तत्वे आहेत. १) अव्यक्त–प्रकृति. २) महत्–बुध्दि. ३) अहंकार ४) शब्द. ५) स्पर्श. ६) रुप. ७) रस. ८) गंध. ९) आकाश. १०) वायू. ११) अग्नि. १२) जल. १३) पृथ्वी, १४) त्वक्. १५) नेत्र. १६) कर्ण. १७) घ्राण. १८) रसना. १९) वाक्. २०) हस्त. २१) पाद. २२) उपस्थ, २३) गुदा. २४) मन हे चोवीस तत्व आहेत ते सर्व जड आहेत त्यांत २५) रज. २६) सत्त्व. २७) तम आणि २८) पुरुष यांचा समावेश होतो म्हणून एकूण २८ तत्व होतात. या २८ तत्त्वांनी मिळून जीवात्म्याचा पिंड म्हणजे स्थूल शरीर बांधले जाते. याच्या पलिकडे आत्मतत्त्वाची स्थिती असते कारण आत्मतत्वाचा संयोग जोपर्यंत या पिंडास नसतो तोपर्यंत तो पिंड जड असतो. आत्मतत्त्वाच्या संयोगानेच तो चेतनमय होतो व तेव्हाच ही जीवपींडाची सृष्टी दृष्टीगोचर होते.

प्रकृतीत भगवंताच्या सामर्थ्याने जेव्हा गति प्राप्त होते तेव्हा प्रकृति ही द्रवावस्थेत येऊ लागते. याच अवस्थेस वेदात 'समुद्रोअर्णवः' (लहरणारा समुद्र) असे म्हटलेले आहे. हा लहरणारा समुद्र किती दीर्घ कालपर्यंत लहरत राहिला याचा अंदाजच सांगता येत नाही. अत्यंत दीर्घकालाने त्यास स्थूलरुप येऊं लागले व त्या पासून सूर्य, चंद्र, नक्षत्र, पृथ्वी इ. स्थूललोक–परलोक निर्माण झाले. हे तर प्रलयापासून सृष्टि निर्मीतीचे साधारण विज्ञान आहे पण विशेष हे आहे कीं प्रकृतीत जेव्हा प्रभु सामर्थ्य प्रगटते तेव्हा त्या अव्यक्तात नित्य पदार्थ अवस्थित झाले तेच महत्तत्त्व होय. या अवस्थेस समष्टि बुध्दि असे ही म्हणतात. जे तत्त्व मनुष्यात म्हणजे व्यष्टीत बुध्दी म्हटले जाते समष्टीत तेच महत्तत्व गणले जाते. या महत्तत्वात आणखी गति प्राप्त होऊन सूक्ष्मता कमी होत जाऊन जडता येते त्यास अहंकार म्हणतात. अहंकार म्हणजे अहंभाव. जेव्हां ही भावना होते कीं हे काम मी केले आहे. मी पणाची अवस्था म्हणजे अभिमान होय. आता हे नित्य स्मरण ठेवावे कीं ज्या प्रकृतीस भगवंताने गति देऊन कार्यान्वित केली ती सत्व रजस् व तमस् गुणांनी युक्त आहे. हे तीन गुण प्रकृति अथवा तिच्या पासून उत्पन्न झालेल्या सर्व तत्त्वात व पदार्थात सर्वदा विद्यमान राहतीलच. अहंकारातसुध्दां हे तीन गुण असणारच. आता अहंकारापासून पाच भूते व पाच सूक्ष्मशक्ति–तन्मात्रा निर्माण होतात. शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध या सूक्ष्म तन्मात्रापासून आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी उत्पन्न झाली आणि याच महाभूतापासून अनेक प्रकारची सृष्टी निर्माण झाली.

दुसऱ्या प्रवाहात अहंकारापासूनच अकरा इंद्रिये उत्पन्न झाली आणि त्या साऱ्यांचा संयोग जेव्हा घडून आला तेव्हा जीवात्म्याने पूर्व कर्मानुसार बुध्दि अहंकार मनाने युक्त जन्म धारण केला म्हणून ५ ज्ञानेंद्रिये ५ कर्मेन्द्रियें मन, अहंकार व बुध्दी या मध्ये बुध्दीच प्रधान पदावर आहे. जगताची

व जीवात्म्याची ही रचना आहे. एक प्रकृतीने २४ रुप धारण करणे व शिवाय तीन गुणांच्या योगाने अनेक रुप प्राप्त करणे. नाना प्रकारच्या सृष्टया, नाना प्रकारच्या खाणी, नाना प्रकारच्या जीव-योनी, नाना प्रकारचे स्वभाव वगैरे हे कशाकरिता आहेत कीं मनुष्याने भोग अथवा अपवर्ग प्राप्त करावेत. यासाठी अव्यक्ताचे तीन धर्म आहेत १) एकत्व २) अर्थवत्व ३) परार्थ्य.

एकत्व म्हणजे केवळ एक आत्मरूप होऊन राहणे. अर्थवत्व म्हणजे प्रयोजन, पुरुषाला भोग आणि अपवर्गाची प्रेरणा करणे. आणि परार्थ्य म्हणजे दुसऱ्यांच्या करिताच केवळ कार्य करणे, स्वतःकरिता नव्हे. जेव्हा जीवात्मा या विकारांशी संयुक्त झाला तेव्हा तीन प्रकाराने त्याने कर्म सुरु केले आणि तेच कर्म त्यास बंधनकारक झाले. दाक्षणिक वैकारिक व प्राकृतिकबंध दाक्षणिक बंध असे आहेत की फलाची कामना करून इष्टपूर्त कर्मात प्रवृत्त होणे. तो जीवात्मा कर्मभोगासाठी परत जन्म घेतो, मुक्त होत नाही. वैकारिकबंध असा आहे कीं जे मन व इंद्रिये केवळ विकारांचीच उपासना करुन त्याचाच उपभोग घेतात ते सुध्दा दृढवासनेने पुनर्जन्म घेतात. मुक्त होत नाहीत.

प्राकृतिकबंध असा आहे की जो जीवात्मा पूर्वोक्त विचाराहून पुढे सरकतो आणि अष्टविध प्रकृतीच्या चिंतनात घुटमळतो तो सुध्दा सूक्ष्म वासनेने पुनर्जन्मास प्राप्त होतो. मुक्त होत नाही. साधकास या तीनही प्रकारच्या बंधनातून सुटायचे आहे. दाक्षणिक बंधातून सुटायचे असेल तर निष्काम कर्मे केली पाहिजेत. बाकी दोन बंधातून सुटायचे असल्यास साधकाने आपले चित्त सर्व विकृति प्रकृतीच्या पलिकडे नेऊन केवळ आत्मस्वरुपातच स्थिर करायला हवे, तेव्हाच त्याची या बंधनातून मुक्तता होईल.

जेव्हा आत्म्याचा या जड तत्वांशी संबंध घडून आला तेव्हा समष्टीत जे महत् झाले तेच मानवात बुध्दिरुपाने अवस्थित झाले. तेव्हाच प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे पाच वायु कार्यरत झाले आणि तेव्हांच पाच प्रकारच्या अविद्येने त्यास घेरले. १) अविद्या. २) अस्मिता. ३) राग. ४) द्वेष आणि ५) अभिनिवेश. मनुष्य जेव्हा आपल्या शरीरावर आत्मबुध्दीची धारणा करतो त्यासच अविद्या म्हणतात आपल्या बुध्दिलाच आत्मा समजतो ती अस्मिता. माझ्याजवळ हे हे पदार्थ असायला पाहिजे अशी लोभी वृत्ति म्हणजे राग. आणि हे हे पदार्थ दूर व्हावे अशी घृणावृत्ति म्हणजे द्वेष. मी सदैव अमर राहावे मृत्यूवश होऊ नये अशी वृत्ति म्हणजे अभिनिवेश. या पाच प्रकारच्या अविद्येने जीवात्म्यास दृढ बंधनात फसविले आहे.

बुध्दीचे सुध्दा आठ रुप आणि तीन वृत्या आहेत. धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, अधर्म, अज्ञान, अवैराग्य व अनैश्वर्य ही बुध्दीची आठ रुपे आहेत. शांत, घोर व मूढ ही सर्व रुपे व सत्व, रज, तम या तीन गुणांच्या अनुसार कार्य करीत असतात. ही सर्व रुपे व सर्व वृत्त्या बुध्दीत विद्यमान तर असतातच पण जेव्हां बुध्दीत एक रुप प्रधानपणे कार्य करीत असते तेव्हा त्याच्या विरोधी रुप अथवा वृत्ति दबलेली असते. साधकाने हा प्रयत्न करायचा असतो. कीं चांगले रुप अथवा वृत्त्या उन्नत कराव्या आणि विरोधी रुप अथवा वृत्त्या दाबण्याचा अभ्यास करावा.

बुध्दीत जेव्हा सत्व वाढतें रजस्, तमस् दाबले जातात, तेव्हा मनुष्य धर्माचे पालन करण्यास (दान, दया, तप, यम, नियम पालन करण्यास) प्रवृत्त होतो. ज्ञान म्हणजे प्रकृतीचे अथवा आत्म्याचे तत्वज्ञान प्राप्त करतो. वैराग्य अर्थात इंद्रियांना विषयातून परावृत्त करतो. सर्व वासनामधून मन अलग करून वैराग्य जोडतो. ऐश्वर्य म्हणजे तत्वज्ञानाच्या मार्गानुसार वर्तन करुन मन प्रसन्न सत्यसंकल्प युक्त आणि अद्‌भूत ज्ञानानंदात मग्न होतो. हे बुध्दीचे चार सात्विक रुप आहेत. याच्या विपरीत चार तामस रुप आहेत. साधकाने या चार तामस रुपा पासून स्वतःला वाचवून आत्मिक उन्नति करीत राहावे.

आपल्याला जे स्थूल शरीर दिसते त्याच्या आंत आणखी दोन शरीरे आहेत. स्थूल शरीर पंचीकरणाने (पंचमहाभूतांच्या) कर्मानुसार बनलेले आहे. आणि सुख दुःख भोगण्याचे प्रधान साधन आहे. हे स्थूल शरीर उत्पन्न होते, वाढते, कृश होतें, रोगी होते, नाश पावते अशा त्याच्या अवस्था होतात. त्याच्या मध्ये ५ कोश, ५ प्राण, ११ इंद्रिये आहेत. आत्मा त्या सर्व संघाचा चालक असतो. यात जर सत्वगुण प्राधान्याने असेल तर शरीर हलके होते. इंद्रियांना प्रसन्नता वाटते. बुध्दि निर्मळ होऊन प्रकाशमान होते. जर शरीरात रजोगुण अधिक असला तर ते शरीर दुःखरुप होते. उत्तेजना व चंचलता वाढते. कोणत्याही एका कामात मन टिकाव धरत नाही. तमोगुण अधिक असला तर तो मोहस्वरुप धारण करतो, शरीर भारी होते, इंद्रिये शीघ्रतेने काम करीत नाहीत, भजन सत्संगात निद्रा घेरते.

या स्थूल शरीरात १) अन्नमय कोष. अन्नाने संतुष्ट होणारा व सर्व कोषाचा आधार असलेला एक कोष आहे. २) प्राणमय कोष. पाच प्राण व पाच कर्मेन्द्रिये यांच्या सहयोगास प्राणमय कोष अथवा 'क्रियाशक्ति' असे म्हणतात. ३) मनोमयकोष. मन आणि श्रोत्र, घ्राण, चक्षु, जिव्हा आणि त्वक् या पाच ज्ञानेंन्द्रियांनी बनलेला हा कोष इच्छाशक्तीचे केन्द्र आहे. ४) विज्ञानमयकोष. बुध्दि आणि पाच ज्ञानेन्द्रियांच्या संयोगाने जो प्रकाश उत्पन्न होतो त्यास ज्ञानशक्ति म्हणतात. ५) या सर्वाहून पर अशी आनन्दाची मात्रा जेथे प्रगट होते तो आनन्दमयकोष होय तेथे क्रियाशक्ति, इच्छाशक्ति आणि ज्ञानशक्ति शान्त होऊन जाते. आत्मा त्या सर्व कोषाहून भिन्न आहे.

स्थूल शरीरान्तर्गत एक सूक्ष्म शरीर आहे. जे जन्म जन्मान्तरी जीवात्म्याच्या सोबतीस राहाते. हे सूक्ष्म शरीर जेव्हापासून आत्म्याचा शरीराशी संबंध घडला तेव्हापासूनचे आहे आणि जीवात्म्यास जोपर्यंत मोक्ष मिळत नाही तो पर्यंत राहिल. योगीलोक याच सूक्ष्म शरीराद्वारे मागच्या अनेक जन्मांचे स्मरण ठेवतात. हे पंच तन्मात्रांनी बनलेले आहे. सुखदुःख भोगण्याचे साधन आहे. या शरीरात पाच ज्ञानेन्द्रिये, पाच प्राण, पाच तन्मात्रा आणि मन बुध्दि अशी तत्त्वे आहेत. आत्मा याहूनही भिन्न आहे.

या सूक्ष्म शरीरात जन्मान्तरीच्या कर्माच्या वासना बीजरुपाने राहतात. याच शरीराच्या साहाय्याने आपल्या कर्मानुसार आत्मा भिन्न भिन्न योनीत जाऊन पोहोचतो. ते अत्यंत सूक्ष्म आहे. अणू, रेणू, त्रसरेणू एवढ्या जीवात्म्यात सुध्दा ते सूक्ष्म रुपाने आहेच. जेव्हा कोणाचा मृत्यू होतो तेव्हा त्याचे सूक्ष्म शरीर आतील साऱ्या सुक्ष्म शक्ति आणि इंद्रियांच्या

सूक्ष्म भागांना एकत्रीत करुन आपल्या बरोबर घेऊन जातो. आपण या जीवनात जे कांही कर्म करतो, धर्म वा अधर्म भक्ति वा मुक्ति, वैराग्य वा अवैराग्य, ऐश्वर्य वा अनैश्वर्य या सार्‍या कर्मांचे अत्यंत सूक्ष्म संस्कार या सूक्ष्म शरीरात होतात. आपला एकूण एक संकल्प विचार कर्म हावभाव जशाच्या तसाच सूक्ष्मशरीराच्या चित्तात अंकित होतो. स्थूल शरीर आत्मघात अथवा अन्य अनेक उपायांनी नष्ट होऊ शकते पण सूक्ष्म शरीर जगतातल्या कोणत्याही उपायाने नष्ट होणारे नाही. हेच सूक्ष्म शरीर भिन्न भिन्न योनित मानव आत्म्याला कर्मानुसार घेऊन फिरते· अथर्ववेदाच्या पाचव्या कांडात म्हटले आहे कीं, –

ओं आ यो धर्माणि प्रथमः ससाद ततो वपूंषि कृणषे पुरुणि ।
धास्युर्योनिं प्रवेम आ विवेशा यो वाचमनुदितां चिकेत ।।

मनुष्य पूर्वजन्मात उत्तम प्रकारे धर्माचरण करुन त्यायोगे उत्तम शरीर धारण करतो व अधर्माचरणाच्या योगाने त्यास नीच शरीर प्राप्त होते. पूर्वजन्मातील पाप पुण्याचे फळ भोगणारा आत्मा पूर्वजन्मातील शरीर सोडल्यानंतर वायुरुप राहतो नंतर जल औषधी अन्न यात प्रवेश करुन आपणास योग्य अशा पित्याच्या शरीरात वीर्यरुपाने वा मातेच्या शरीरात रजोरुपाने स्थिर होऊन मातेच्या गर्भाशयात अनुरुप काळी धारण केला जातो व पुनः जन्मास येतो. जो जीवात्मा पूर्व सुसंस्कारानुसार अनुदित वेदवाणी यथार्थतेने पालन करतो तो उत्तम सुखे भोगतो. आणि जो दुष्टबुध्दिने अधर्माचरण करतो तो नीच कीटक पतंग पशू आदि शरीरे धारण करुन अनेक दुःखे भोगतो. जेव्हा आत्मा मनास आणि मन इंद्रियांना कोणत्याही विषयात लावते. (चांगल्या अथवा वाईट) जीवाची इच्छा त्या इच्छित विषयावर जात असते. त्याच क्षणी आत्म्यात वाईट काम करतांना भय शंका व लज्जा प्रगट होते व चांगले काम करतांना अभय, निःशंकता व आनंदोत्साह प्रगट होतो. ह्या सर्व क्रिया जीवात्म्यावर नाही पण त्यात वसलेल्या सूक्ष्मशरीरानुसार–आत्मतत्त्वानुसार घडत असतात. जीवात्मा जेव्हां परमात्म्याच्या या आदेशास ऐकून आपली इच्छा व संकल्प सोडून देऊन परमात्म्याच्याच आज्ञेचे पालन करील तर सूक्ष्म शरीर निर्मळ शुध्द बनून मनुष्याच्या स्थूल शरीरासुध्दा शुध्द व पवित्र बनवितो.

तिसर्‍या शरीराचे नांव आहे कारण शरीर. प्रकृति जेव्हा विकृत होते तेव्हाच प्रत्येक जीवात्म्यास या प्रकृतीचाच एक अत्यंत सुक्ष्म भाग प्राप्त होतो; पण तो भागसुध्दां प्रकृतिरुपच असल्याने विभु आणि सर्व जीवाकरितां जरी असला तरी आत्मा त्याहून भिन्नच आहे. मनुष्य जेव्हां सुषुप्ति अवस्थेत असतो तेव्हा तो आपल्या कारण शरीराने कार्य करीत असतो. ज्या प्रमाणे माचे–पैये, गात, दोरी अथवा नवार यांच्या साहाय्याने पलंग तयार होतो व तो कोणाकरिताही उपयोगात आणला जातो, तद्वत या शरीराचा संघात जीवात्म्याकरितां असतो. हा जीवात्मा सत् चित् स्वरुप आहे. जगतातील भोग भोगण्याकरितां व दुःखाच्या आत्यंतिक निवृत्ति करुन मोक्षप्राप्तिकरितां मानव शरीराशी याचा संबंध येतो. या आत्म्याचे आपले निजरुप कधीच कशानेच बिघडत नाही. सदैव एकरस ज्ञानवान असते. प्रकृतिच्या २४ तत्वापैकी हा आत्मा कोण्या एखाद्या जड तत्वाशी आत्मबुध्दि करतो तेव्हा दुःखी होतो. पलंगावर झोपलेला मनुष्य जर म्हणेल की मी पलंगच आहे तर त्याची जशी हास्यास्पद स्थिती होते, तशी मी शरीर आहे असे समजणाऱ्याची

सुध्दा समजावी शरीराशी संबंधीत आत्मा सुखी होतो, दुःखी होतो, हसतो, रडतो, स्वस्थ ही होतो. रोगीही होतो पण जेव्हा जीवात्मा ध्यान अवस्थेत गेल्यानंतर प्रत्यक्ष पाहतो कीं मी तर प्रकृतिहून व प्रकृतीच्या साऱ्या तत्वाहून सर्वथा भिन्न आहे. तेव्हा त्याचा सारा भ्रमजाल निघून जातो. सर्व पापे, जरा, मृत्यू, रोग, शोक, क्षुधा, पिपासा रहित मी आहे, मी सत्यकाम आहे, सत्य संकल्पआणि एकमात्र अटल आश्रय आहे हे त्याला समजून येते. जीवात्म्याला हाच पुरुषार्थ करावयाचा आहेकी त्यास प्रकृतीच्या तत्वांची वास्तविकता ओळखून त्यामधून उत्थान करुन सत्‌चित् आनंद तत्वाशी एकरुप व्हावयाचे आहे.

ब्रह्म सत् चिद् आनन्द आहे. याच्याशी मित्रत्व पावून सत् चिद् रुप असलेला जीवात्मा आनंद प्राप्त करुन घेतो. स्थूल शरीर तर मरण धर्मा आहे. सिंहाच्या मुखात असलेल्या बकरी प्रमाणे स्थूल देह काळाच्या मुखात आहे. जीवात्मा या मरणधर्मा शरीराचा आश्रय केल्यामुळे स्वतःला सुखदुःख ग्रस्त मानतो पण जीवात्म्याने जर परमात्म्याशीं आपला संयोग जोडला तर त्याला पूर्ण आनन्दाचा लाभ होईल. ब्रह्मतत्वाच्या सामर्थ्याने प्रकृतीत गति उत्पन्न होते आणि ती जीवात्म्याच्या हितासाठी प्रभुआज्ञेने विकृत होऊन नाना रुप धारण करते. ब्रह्मतत्व फक्त तार छेडते आणि जीवात्मा व प्रकृतीचे २४ तत्त्व खेळ खेळतात. ब्रह्मतत्व केवळ द्रष्टा बनते. संसारातील-- सर्वात महत्वाचा महद् कोष आनन्द त्याने आपल्याजवळ ठेवलेला असतो. ब्रह्म सर्वत्र व्यापक आहे. त्याचा गुण आनन्दही सर्वव्यापक आहे परंतु प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या पदार्थात त्या आनंदाची केवळ छाया आहे. प्रकृतिजन्य तत्वांनी मिळालेला जीवात्मा भ्रमाने-अज्ञानाने समजतो कीं प्रकृतीच्या तत्वात आनन्द आहे. छायेला तो वास्तविक वस्तू समजतो व नंतर तिच्या प्राप्तीसाठी दुःखी बनतो. हे दुःख तेव्हाच दूर होते जेव्हा हा भ्रम निघून जाऊन आनन्दाचा स्त्रोत ब्रह्मतत्वापर्यंत पोहोचतो.

आत्मतत्व आणि ब्रह्मतत्वाचा मिलाप तत्वज्ञानाचे फळ आहे. पण अनुभवी महात्म्यांचे निश्चित मत आहे की नाशवान् अस्थिर प्रकृतिच्या विकृतीतून बनलेल्या पंचमहाभूतांच्या (ज्यांना आपली कोणत्याही प्रकारची सत्ता नाही अशा सत्ताविरहीत) स्थितीस विवेक बुध्दीने जाणून तिचा त्याग करून अद्वैत सत्त्व आत्म्यास ओळखावे. ही विकारी भूतें प्रथमतः नव्हती, अंतिसुध्दा असणार नाही. हे माझ्या कल्याणाकरितां निर्माण झालेली आहेत. हे माझे दास आहेत. मी त्यांचा दास नव्हे. ते नाशवान्, जड, ज्ञानशून्य आहे, मी नित्य चेतन आणि ज्ञानवान आहे. मी त्यांच्या जाळ्यात कां फसावे ? मी तर आत्मा आहे. अल्पज्ञ असेन, शरीरात बंदिस्त असेल, दुःख भोगत असेल, आनन्द प्राप्तीचा प्रयत्न करीत असेल पण आहे तर आत्माच. माझा सहयोगी परमात्मा आहे. परमात्मा आणि जीवात्मा एकाच परिवाराचे आहेत. जीवात्म्यास उचित आहे कीं त्याने आपल्या चेतन तत्वाशी एकरुप होण्याचा प्रयत्न करावा. विवेकख्यातीच्या साधनाने या साक्षात ज्ञानाचा प्रसाद मिळवावा. ती स्थिती जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत प्रभुभजन, सत्संग, स्वाध्याय, करावा. प्रतिदिवसाच्या कार्यक्रमाचे निरिक्षण करावे. बुध्दिपूर्वक सांसारिक कार्य करुन सर्वाहून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करावा.

जगतात–संसारात दुःखांची गणती करता येण्यासारखी नाही पण त्या सर्व दुःखांचे तीन विभाग केले जातात १) आध्यात्मिक दुःख :–रोगादिद्वारा, अपघातद्वारा शरीरात उत्पन्न झालेले दुःख आणि कामक्रोधादि विकारांनीं मनात झालेले दुःख. २) आधिभौतिक म्हणजे विषाक्त जीव-जंतुपासून अथवा व्याघ्रसिंहादि क्रूर प्राण्यापासून झालेले दुःख ,अग्नि, वारा, पाणी इ. नी निर्माण झालेले दुःख. ३) आधिदैविक :–अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ, भूकंप, महापूर इ. द्वारा निर्माण झालेले दुःख, अशा रीतीने ह्या तीन प्रकारच्या दुःखांनी जीवात्मा पीडीत होतो. आणि त्यातून सुटण्याकरिता तो धडपडत प्रयत्न करीत असतो. या सर्वामध्यें भुक आणि तृषा यांचे दुःख अधिक असते, भूमीची उत्तम प्रकारे मशागत करून धान्य घरात येईपर्यंत किती परिश्रम उठवावे लागतात किती चिंता कराव्या लागतात. किती कष्ट सहन करावे लागतात. सर्व संसार याच तर फंदात फसलेला आहे. एका दुःखातून दुसऱ्या अनेक दुःखांची उत्पत्ति होते. जीवात्मा एक दुःख मिटविल्या नंतर आपण सुखी होऊ असा विचार करतो पण खरोखर तो सुखी होत नाही. जर भगवंताने ही सृष्टी बुध्दिपूर्वक आणि पूर्ण नियमांनी बनविली आहे तर दुःख दूर करण्याच्या प्रयत्नात मनुष्य सफल कां होत नाही ? दुःख नित्यप्रति कां वाढते ? याचे कारण एकच आहे कीं जीवात्मा दुःखाचा नाश करण्याचा प्रयत्न करीत नाही. दूर करण्याचा म्ह. दुःख टाळण्याचा फक्त प्रयत्न करतो. सर्वशास्त्रात आणि सर्व अनुभवी महात्म्यांनी दुःखाचा आत्यंतिक नाश आणि सदैव सुखात मग्न राहण्याचा मार्ग अथवा साधन एकच सांगितलें आहे ते म्हणजे तत्वज्ञान प्राप्ति. तत्वज्ञानाशिवाय त्या उद्देश्यापर्यंत पोहोचणे कठिण आहे.

युञ्जानः प्रथमं मनस्तत्त्वाय सविता धियः ।
अग्नेर्ज्योतिर्निचाय्य पृथिव्या अध्याभरत् ।। यजु. ११/१

तत्वज्ञानाच्या प्राप्तिकरिता जेव्हा योगी आपल्या मनास प्रथम ईश्वराशी युक्त करतो तेव्हा परमेश्वर त्याच्या बुध्दिस आपल्या कृपेने आपल्यात युक्तकरीत असतो, नंतर तो साधक परमेश्वराच्या प्रकाशास आपल्यात धारण करीत असतो.

युक्तेन मनसा वयं देवस्य सवितुः सवे ।
स्वर्ग्याय शक्त्या ।। यजु. ११/२

दुःखापासून सुटून मोक्ष–आनन्द प्राप्त करण्यासाठी योग अथवा विज्ञान अथवा तत्वज्ञाना-च्या सामर्थ्याने उपासना–योगद्वारा आत्म्यास शुध्द करुन परमेश्वरात प्रकाशरुप आनन्द प्राप्त करुन घ्या. शरीर आणि ब्रह्मांड दोघांचे तत्व एकच आहे. दोघात खूप साम्य आहे. पृथ्वी, जल, वायु, अग्नि, आकाश आणि अव्यक्त ब्रह्म म्हणजे परमात्मा या सहा धातूंनी बनलेले हे जगत आहे. त्याच प्रमाणे मनुष्य शरीरातही पाचभूत आणि आत्मा आहे. जगतात एकाबाजूस पाण्याचा प्रभाव आहे. शरीरातही क्लेदरुपाने पाणी आहे. जगत् जड दृश्यमान आहे, शरीरहीजड पृथ्वीरुप दृश्यमान आहे. जगतात अग्नी आहे, शरीरातही जठराग्नी आहे. जगतात वायु वाहतो, शरीरातही प्राण अपान वायूचे गमन आहे. जगतात आकाश आहे, शरीरातही छिद्र समुह आहेत. जगताचा

प्रकाशक ब्रह्म आहे, शरीराचा प्रकाशक जीवात्मा आहे. अशा प्रकारे पींडात जे आहे ते ब्रह्मांडात भरलेले आहे आदियोगी भगवान शिव म्हणतात कीं, –

देहेऽस्मिन् वर्तते मेरुः सप्तद्वीपसमन्वितः ।
सरितः सागराः शैलाः क्षेत्राणि क्षेत्रपालकाः ।।

या शरीरात सप्तद्वीपवति पृथ्वी, सुमेरु पर्वत आणि नद्यांचे समुह सप्तसागर आणि क्षेत्रपाल विद्यमान आहेत. सप्तलोक, सप्तपाताळ सुध्दा या शरीरात आहेत.

मूलाधारे तु भूर्लोकः स्वाधिष्ठाने भुवस्ततः ।
स्वर्लोको नाभिदेशेच हृदये तु महस्तथा ।।
जनलोकं कण्ठदेशे तपोलोकं ललाटके ।
सत्यलोकं महारन्ध्रे इति लोकाः पृथक् पृथक् ।।
तलं पादांगुष्ठतले तस्योपरि तलातलम् ।
महातलं गुल्फमध्ये गुल्फोपरि रसातलम् ।।
सुतलं जंघयोर्मध्ये वितलं जानुमध्यगम् ।
ऊर्वोर्मध्ये तलम्प्रोक्तं सप्त पातालमीरितम् ।।

आपल्या शरीरात चौदाभुवन वसलेले आहे. मूलाधार स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहद, विशुध्द, आज्ञा आणि सहस्त्रार चक्रांचे ठायी अनुक्रमे भूलोक, भुवर्लोक, स्वर्गलोक, महर्लोक, जनलोक, तपलोक व सत्यलोक वसलेले आहेत. तसेच तळपायात, पावलात गुडघ्यात, मांड्यात, जांघेत, हातात व बाहूत अनुक्रमे तल, तलातल, महातल, रसातल, सुतल, वितल व पाताल असे चौदाभुवन याच शरीरात वसलेले असून त्या भुवनांचा चालक अनंत ब्रह्मांडनायकही या शरीरात ओतप्रोत भरलेला आहे. त्याच्या चालने शिवाय कोणतीही इंद्रिये कार्यरत होत नाही. प्रकृतिच्या संगाने आत्मा कर्मवश होऊन सुख दुःख भोगतो पण कर्मक्षयाने जेव्हा त्याची आत्मबुध्दि प्रगट होते तेव्हा त्यास आपले प्रकृतीहुन भिन्नत्व समजून येते व तो निरिच्छ निष्काम निरामय होऊन दुःखांचा आत्यंतिक नाश करुन मोक्ष प्राप्त करुन घेत असतो.

साधकाने सर्वप्रथम आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी यांचे यथार्थ ज्ञान प्राप्त करावे. त्या वस्तू कशा आहेत ? त्यांचे कार्य काय आहे ? स्वभाव, गुण कसे आहेत ? त्यात सात्विकता, राजसता, तामसपणा कशा प्रकारचा आहे याचे ज्ञान संपादन करावे. नंतर आपल्या शरीरात हे पंच प्राण कोठे आणि कसे काम करीत आंहेत हे सारे ज्ञान महानज्ञानी अशा वितराग मुनि, गुरु, महात्म्याद्वारा प्राप्त करुन घ्यावे व आपल्या ध्यान अवस्थेत तसा अनुभव घ्यावा. हरएक तत्वाचे शरीरात काय कार्य आहे आणि ब्रह्मांडात ते तत्व काय कार्य करीत आहे. शरीराची तत्वे आणि जगतातील तत्वे यांची अशी समानता एकरुपता व्हावी कीं जगतातील कोणतेही तत्व शरीरातील

कोणत्याही तत्वाला हानी पोहोचवू शकणार नाही. उलट सहाय्यक होऊन रक्षक झाली पाहिजेत. बाह्यजगत् आणि आंतरिक जगताचे अभेदत्व यावरुन समजून येईल तसेच आत्मतत्व व ब्रह्मतत्व यांतही साम्य नव्हे पण अभेदत्व जाणण्याचा प्रयत्न करावा. या संबंधात प्रथम हे समजावे कीं ब्रह्मतत्व तर जगतातही आणि जगताच्या बाहेरही विराजमान आहे पण जगतातही कोणत्याही वस्तूमात्रात ते लिप्तायमान नाही, असंग आहे. ब्रह्मतत्व केवळ नाटक पाहणारे आहे. नाटक करणारे वेगळेच आहे. त्यांच्या चांगल्या किंवा वाईट कलाकृतींना बक्षिसे देणे अथवा नाराजी व्यक्त करणे त्याचे काम आहे. जीवात्मा या शरीरात बंद-बध्द आहे. जोपर्यंत या शरीरात आहे तोपर्यंत मन आणि इंद्रियाकडून व्यवहार चालवितो, बन्धनात आहे जोपर्यंत इंद्रियाकडून भले बुरे कर्म करवून त्याची सुख दुःखरुप फळे चाखतो. स्वतः नाटकरुप होऊन जातो. पण साधकाने त्यास जाणून आपल्या आत्मतत्वाला त्यापासून अलग-अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करावा. आरशाचा उपयोग करणारा स्वतःला आरसा समजत नाही तर आरसा आपले स्वरुप ओळखण्याचे–पाहण्याचे केवळ साधन मात्र आहे आपण स्वतः आरशा रुपाने नाही, आरशाहून वेगळे आहोत, त्याप्रमाणे माया, प्रपंच, इंद्रिये, मन आदि आपले स्वरुप ओळखण्याचे साधन आहे त्यांच्या कर्मांशी तद्रूप होऊन शोक, मोह, हर्ष, उन्माद वगैरे करण्याची काय गरज ? कारण मी आत्मा आहे ते अनात्म आहेत. अनात्म अथवा भौतिक पदार्थाहून आपण आत्म स्वरुप वेगळे आहोत असा अनुभव साधक जेव्हा ध्यान अवस्थेत करतो तेव्हा त्यास तत्वज्ञान झाले असे म्हटले जाते.

इयं कल्याण्यजरा मर्त्यस्यामृता गृहे ।
यस्मै कृता शये स यश्चकार जजार सः ।। अथर्व. १० । ८ । २६.

कल्याण करणारा हा आत्मदेव अमर आहे. आणि तो मर्त्य प्राण्याच्या घरात म्हणजे शरीरात राहतो. ज्याला आत्मबोध होतो तो सुख प्राप्त करतो आणि जो पुरुषार्थी आहे. स्तुति करण्यास तोच पात्र आहे.

तत्वज्ञानाने कार्यासहीत अज्ञानाची निवृत्ति होते व त्यामुळे आत्मतत्व आणि ब्रह्मतत्वयांत कोणत्याही प्रकारचे आवरण राहात नाही. त्याचे एकरुपत्व – मिलन होते. अज्ञान अविद्यारुपी आवरण दूर झाले. आत्मा तोच परमात्मा हे ज्ञान नव्हे ही ' एकत्वमनुपश्यति ' अवस्था आता प्रगट झाली. जे या शरीरात तेच जगतात याची जाणिव साधकास होऊन तो विराम पावतो.

स एष एक एकवृदेक एव ।। अथर्व. १३।४।१।१२.

परमात्मा सर्व व्यापक असून केवळ एकच आहे. तो अनुपम, अजर अमर, अभय, नित्य, सनातन, निर्विकार, निर्मल, अंतर्यामी आणि सर्वांचा उपास्य आहे. इंद्र, मित्र, वरुण, अग्नि सुपर्ण, दिव्य, यम, मातरिश्वा वगैरे त्याची अनेक नामे आहेत त्याचे मुख्य आणि बीजनाम ॐ आहे. वेद, उपनिषद्, गीता, दर्शने वगैरे सर्व शास्त्रानी त्यास ॐ यांच नांवाने ओळखून त्या तत्वाप्रत जाण्याचा आदेश दिलेला आहे. अथर्ववेदाच्या ११ व्या कांडातील ७ व्या सुक्तात २७ व्या मंत्रात सृष्टिसंबंधी खूप सुंदर वर्णन केलेले आहे. ही सारी सृष्टी परमात्म्याच्याच सामर्थ्याने

बनलेली असून तोच आपल्या सामर्थ्याने तिला धारण करतो, पंचभूत, सप्त उर्ध्वलोक, सप्त पाताळ, दहा प्राण, नवग्रह, दशेन्द्रिये या सर्वांची उत्पत्ति त्या पासून होते, लयही त्यातच होत असतो. तोच परमात्मा पित्याचाही पितामह आहे. प्राणांचा पालक – रक्षक आणि हितकारी आहे. सृष्टीत राहून सर्व बंधनाच्या पलिकडे आहे.

आविः सन्निहितं गुहा जरन्नाम महत् पदम् ।
तत्रेदं सर्वमार्पितमेजत् प्राणात् प्रतिष्ठितम् ।।

अथर्व. १०।८।६

पुरातन विशाल तत्व सर्वत्र गुढ व व्याप्त आहे. ते प्रगट असून ही सम्यक् रुपाने प्रछन्न (सर्वव्याप्त) आहे. जो प्राण धारण करतो हालचाल करतो तसेच जो स्थिर आहे, हे सर्व एकाच तत्वात समर्पित आहे.

यदेजति पतति यच्च तिष्ठति प्राणदप्राणन्निमिषच्च यद् भुवत् ।
तद् दाधार पृथिवीं विश्वरुपं तत् संभूय भवत्येकमेव ।।

अथर्व. १०।८।११

जो हालतो, उडतो, थांबतो, प्राण धारण करतो, प्राण धारण करीत नाही, जो डोळ्यांची उघडझाप घडवितो असा जो परमेश्वर आकाशादि सर्व भूतात तसेच सूर्यादि सार्‍या लोकात व्याप्त झालेला आहे तोच दिशा उपदिशात ओत प्रोत भरलेला आहे. तोच आपल्या सामर्थ्याने युक्त आत्मा कल्पादि सृष्टीसुध्दा उत्पन्न करतो त्या आनन्दस्वरुप परमेश्वरास जो जीवात्मा आपल्या सामर्थ्याने–मनाने यथार्थतेने जाणतो तोच त्याला प्राप्त करुन घेतोव सदैव मोक्षसुख भोगतो.

महद्यक्ष भुवनस्य मध्ये तपसि क्रान्तं सलिलस्य पृष्ठे ।
तस्मिञ्छियन्ते य उ केच देवा वृक्षस्य स्कन्धः परित इव शाखाः ।।

अथर्व. १०।७।३८

ब्रह्म जे महत् म्ह. सर्वात श्रेष्ठ, सर्वात पूज्य आहे, जे सर्व लोकात राहून उपासना करण्या-योग्य आहे. विज्ञानादि गुणांनी जे सर्वश्रेष्ठ आहे जे आकाशरुप आहे त्याचा आधारही आहे, त्यात व्याप्तही आहे तसेच जगत् प्रलयाच्या मागे सुध्दा जे नित्य निर्विकार राहणारे आहे. ज्याच्या आश्रयाने रुद्र, आदित्य, वसू, वगैरे तेहतीस कोटी देव स्थित आहे जसे कीं पृथ्वीतून वृक्षाचा प्रथम अंकूर निघतो व तोच पुढे स्थिर होऊन बाकीच्या शाखा प्रशाखांचा आधारभूत होतो तद्वत सर्व ब्रह्मांडाचा आधार तोच एक परब्रह्म परमेश्वर आहे.

उतेयं भूमिर्वरुणस्य राज्ञ उतासौ धौर्बृहति दूरे अन्तः ।
उतौ समुद्रौ वरुणस्यकुक्षी उतास्मिन्नल्प उदके निलीनः ।।

अथर्व. ४।१६।३

ही भूमी वरुण राजाची आहे. वरुण राजाच या भूमीवर शासन करीत असतो, जी महान् द्यूलोक आहे तो सुध्दा त्याचे दोनही किनारे आहेत. दोन्ही समूद्र (वायू व जल) हे त्याची कुक्षी म्हणजे उदर आहे. तोच स्वयमेव ईश्वर पाण्याच्या एका सूक्ष्म कणातसुध्दा सामावलेला आहे. भगवंताच्या परमतत्वाची ही महानशक्ति आहे. ती जगतातील एका सूक्ष्म जीवजंतूत, प्रत्येक प्राणिमात्रात तसेच प्रत्येक जड चेतन वस्तूमात्रात, एकेक गतीत, एकेका हावभावात, एकेका स्पंदनात ओत प्रोत भरलेली आहे. त्याच शक्तीला शक्तीमान होऊन आपल्याला पाहायचे आहे. ही सम्यक् दृष्टी ज्याची झाली त्याच्या हृदयात कोणत्याही प्रकारची कोणत्याही विषयाची पापवासनाच शिल्लक राहात नाही. तो पवित्र निर्मल होऊन जातो. शारीरिक दुःख त्याला दुःखात टाकत नाही, सुखे त्याला मोहवूं शकत नाहीत. सतत फिरणाऱ्या चक्राप्रमाणे भोग्य पूर्ण होताच तसा जीवात्मा मुक्त होऊन जातो. तत्वांच्याही परम तत्वांत तो परमविलय पावतो.

प्रकरण ७ वे

Life of Imamshah

" सत्पंथातील सद्भक्तांची जीवनरेखा. "

१) सत्पंथ प्रवर्तक इमामशाहांचे संक्षिप्त जीवनदर्शन.

सद्गुरु इमामशाहा महाराजांचा जीवनवृत्तान्त लिहीतांना त्या काळाला अनुसरुन झालेल्या राजकीय घडामोडी व त्यांचा सामाजिक जीवनावर झालेला परिणाम या गोष्टीकडे विशेष लक्ष्य खेचले जाते. या काळातील धार्मिक जीवन व साहित्य यांचा अतिशय गुंता झालेला आढळतो आणि हा गुंता अत्यंत हळूवारपणे सोडवतांना उज्वळ आणि प्रभावी अशा सत्पुरुषाच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे आपणाला दर्शन होते. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात वरील प्रकारच्या एका सत्पुरुषाने तेच उपनिषेदांचे शुध्द तत्वज्ञान सामान्य लोकांना समजण्यालायक बनवून ते साध्या आणि स्पष्ट भाषेत भजनांच्या, ज्ञानपदांच्या रुपाने लोकांना प्रसाद रुपाने दिलेले आहे. ज्या प्रमाणे गुळाची ढेप कोठेही रानात नेऊन ठेवली तरी तिच्या गोडीने मुंगळे आपोआपच तिच्याकडे खेचले जातात त्या प्रमाणे सद्गुरु इमामशाह जरी सुफी संत होते तरी शेतकरी हिंदु समाजाने त्यांना गुरु म्हणून मान्य केले आणि त्यांच्या सेवेने स्वतःचे जीवन पावन करुन घेतले.

हिंदु समाजात अनेक संत होऊन गेलेत की ज्यांनी अत्यंत सरळ भाषेत अमुल्य तत्वज्ञानाचा ठेवा समाजापुढे प्रसाद रुपाने अर्पण केला आणि त्या प्रमाणे अशा लोकांच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेल्या लोकांनी त्यांना गुरु मानून त्यांचा एक स्वतंत्र संप्रदाय सुरु केला असे अनेक संप्रदाय हिंदुस्थानात प्रचलित आहेत. इमामशाह यांच्या संपर्कात आलेल्या ५०० वर्षापूर्वीच्या लोकांनी पण इमामशाही पंथ नावाचा संप्रदाय इमामशाहा यांना गुरुस्थानी मानून चालू केला तो आजपर्यंत चालू आहे.

कोणत्याही महापुरुषाच्या जीवनाचा आदर्श समाजाच्या सभोर मांडण्याचे मुख्य तीन हेतु असतात. पहिला म्हणजे त्यांचे उज्वल चारित्र्य लोकांच्या हृदयात उतरविणे. दुसरा हेतु म्हणजे त्यांच्या आदर्श विचारांना निर्भयपणाने जीवनात उतरविण्यासाठी मनोबल प्राप्त करणे. तिसरा हेतू म्हणजे देश आणि काळ यांना अनुसरुन महापुरुष कशा युक्तीने आणि आत्मविश्वासाने ब्रह्मज्ञान लोकांच्या हृदयात उतरवून लोकांचे कल्याण करतात; ह्या साऱ्या हेतूंचा विचार करुनच महापुरुषांचे जीवन चरित्र हाताळावे. महा पुरुषांच्या जीवनात देश काळाची छाप पडलेली आपणास आढळून येते. ज्या देशातील लोकांचे जीवन ज्या रोगाने पछाडले असेल त्या रोगाला गुणकारी असलेल्या औषधाने नष्ट करावे लागते. कांही वेळेला पायात खुपलेला काटा काढण्यास काट्याचाच उपयोग करावा लागतो.

समाज, संस्कृति आणि जीवनाचे आदर्श नेहमीच कांही एक सारखे राहात नाहीत. यांच्यामध्ये काळाप्रमाणे स्थित्यंतर होत असते. तरीही हे परिवर्तन आपला मूळ हेतु जिवन ठेऊनच घडत असते. पृथ्वीतलावर अनेक महापुरुष आतापर्यंत होऊन गेलेत. काहींचे क्षेत्र विशाल बनले व कांहीचे सीमित ठरले. आपल्या क्षेत्राप्रमाणे या लोकांचे कार्य चालूच असते. " बहुरत्ना वसुंधराम् ." एकाच परमेश्वराकडून या साऱ्यांना शक्ति प्राप्त झालेली असते परंतु लोक समाज, भाषाभेद, रुपभेद आणि देशभेद लक्षात घेऊन त्यांना अवतार, तीर्थंकर, पैगंबर, नबी, ऋषि, आचार्य, महापुरुष, आदर्श पुरुष, मर्यादा पुरुष, फरिश्ता, संत, महात्मा, योगी पीर अशा अनेक नावांनी ओळखत असतात. ज्या प्रमाणे एकाच रोगावर डॉक्टर, वैद्य, हकिम वेगवेगळ्या प्रकाराने औषध देतात हेतुमात्र हाच असतो की रोग निवारण झाले पाहिजे, त्याच प्रमाणे ब्रह्मानंदाच्या, आत्मानुभूतीच्या आनंदासाठी वेगवेगळे संत पुरुष वेगवेगळ्या पध्दतीने एकाच तत्वाचा बोध करत असतात.

सदगुरु इमामशाह देखिल असेच एक प्रभावी संत महात्मा होऊन गेलेत. पंधराव्या शतकात त्यांच्या उपदेशाने व त्यांच्या सरळ पध्दतीने सांगितलेल्या ज्ञानाने लोक प्रभावित होऊन त्यांना गुरुस्थानी मानू लागले. गुजराथ, कच्छ, मारवाड, नेमाड, खानदेश या ठिकाणी बहुसंख्य हिंदू अनुयायांनी त्यांना सद्गुरु मानले आणि एक नविनच पंथ निर्माण झाला. हा पंथ दोन तीन नांवानी ओळखला जातो. कांही लोक याला ' सतपंथ ' म्हणतात, कांही 'इमामशाही पंथ' म्हणून ओळखतात तर कांही ' पीराणा पंथ ' म्हणूनही ओळखतात. 'सतपंथ' या पंथात अनेक शाखा निर्माण झालेल्या आहेत. परंतु हा 'इमामशाही पंथ' अथवा ' पीराणा पंथ' हा या सर्व शाखापासून संपूर्ण रीतीने वेगळा आहे.

सद्‌गुरु इमामशाह यांचे जीवनचरित्र लिहीतांना सामाजिक आणि राजकीय परिवर्तन या दोन्ही गोष्टीकडे लक्ष जाते, या काळात हिंदुस्थानात राजकीय क्षेत्रात मुसलमानी सत्तेचे वर्चस्व होते. मुसलमानांच्या परधर्मद्वेषी धोरणामुळे हिंदु लोकांच्या धार्मिक जीवनात फारच गुप्तता आली होती. हिंदु देवालये आणि धार्मिक साहित्य या दोन्ही गोष्टी या काळात मुसलमानांच्या जुलमी धोरणामुळे छिन्नविछिन्न झाल्या होत्या.

इमामशाही पंथाच्या साहित्यावर देखिल याच कारणामुळे मुस्लीम लोकांनी त्यांच्या धर्माची छाप पाडण्याचा प्रयत्न केला. इमामशाह यांनी मुलतान येथे त्यांच्या वडिलांच्या मृत्यू समयी शपथ घेतली होती कीं, मी हिंदुच अनुयायी बनवीन आणि या पुढचे माझे आयुष्य मी हिंदुना हिंदुधर्माप्रमाणेच उपदेश करण्यात खर्च करीन ! इमामशाहांचे सर्वच अनुयायी हिंदु आहेत आणि त्यांचे रीतीरिवाज ते हिंदुप्रमाणेच पाळत असतात. इमामशाह यांच्यावर फक्त सद्‌गुरु म्हणूनच त्यांची अनन्यसाधारण श्रध्दा आहे.

इमामशाह यांचा जीवन वृत्तान्त पाहू गेल्यास आपल्याला त्यांच्या जीवनाचे दोन भाग दृष्टीस पडतात. पहिला भाग म्हणजे संत कबीरुद्दीनच्या हयातीत गेलेले इमामशाहांचे जीवन आणि दुसरा भाग म्हणजे संत कबीरुद्दीनच्या मृत्यूनंतरचे इमामशाहांचे जीवन. या दोन्ही काळात त्यांनी उपदेश देण्याचे व आपल्या दैवी शक्तीच्या साहाय्याने लोकांचे दुःख दूर करण्याचेच कार्य केले. परंतु संत कबीरुद्दीन यांच्या मृत्यूनंतर संत इमामशाह हे मुसलमान समाजापासून आणि त्यांच्या नातेवाइकापासून संपूर्णपणे वेगळे झाले होते आणि तें नंतर शेवटपर्यंत त्यांच्या हिंदु अनुयायांचे स्वतः गुरु बनूनच राहिलेत. इमामशाह यांचा सद्‌गुरु म्हणून त्यांचा हिंदु अनुयायांनी स्विकार केला होता. गुरुला स्वतःला जात पात कांही नसतें. गुरुचे नाते हे स्मशान घाटाच्या पलिकडे सुरु होते. मनुष्य ज्या जातीत जन्मतो ती जात, तो लौकिक धर्म, त्या देहाला अनुसरुन चालणारे रीतिरिवाज सर्व स्मशान घाटापर्यंतच असतात आणि तेंथेच ते लोप पावतात. पुढील प्रवास जीवात्म्याला या सान्या गोष्टी तेथेच सोडून करावा लागतो. या प्रवासासाठी लागणारी शिदोरी सद्‌गुरु कडून मिळते. अशा या पवित्र नात्यावर स्वार्थी लोक आपल्या स्वार्थासाठी जाती पातीचे बुरखे चढवत असतात. संत पुरुष तर जीवंत पणीच स्मशान घाट ओलांडून पार झालेले असतात अशा या तेजस्वी पुरुषाच्या छायेखाली आज पाचशे वर्षांपासून अनेक लोकांनी आपले जीवन धन्यकरुन घेतले आहे.

इमामशाह यांचा जन्म पंजाबमध्ये उंच गांवी झाला. उंच गांव हे खूपच जूने नगर आहे. कराची लाहोरहून अहमदपूर स्टेशनवर उतरुन उंच गावाला जाण्यासाठी १४ मैलांचा पायदळ रस्ता आहे. याच गांवी इमामशाह यांचा जन्म झाला. हिजरीसन ८५६ म्हणजेच इ. स. १४५२ सालाचा उल्लेख कांही पुस्तकात आढळतो. साधारणत. इमामशाह गुजराथमध्ये आले त्याची तारीख आणि साल पुस्तकांमध्ये उल्लेख केला आहे पण जन्माचे साल फारच थोड्या पुस्तकांत सांपडते आणि तेही वेगळे वेगळे आहे. एके ठिकाणी इमामशाहांचा जन्म २७ सफर ८४४ हिजरी व मृत्यू २५ रमजान ९१९ हिजरी असा उल्लेख आहे. 'तवारीखे पीर' च्या लेखकाच्या मते

हिजरीसन ८५६ तारीख २७ माहे रबी उस्सानीत दाखविला आहे. इव्हानो डब्ल्यूच्या संशोधनावरुन 'मंझील' या पुस्तकाच्या आधारे २७ रज्जब किंवा ११ जमादिलारवर ८५६ हिजरी म्हणजेच इ. स. १४५२ जन्म दाखविण्यात येतो. शिवाय या पुस्तकाच्या आधारे संतकबीरुद्दीन यांच्या मरणाचा सन हि. स. ८५३ इ. स. १४४९ आहे आणि सर्व पुस्तकांच्या आधारे संत कबीरुद्दीनच्या मरण समयी संत इमामशाहांचे वय १५, १८ वा १७ वर्षाचे असे थोडयाफार फरकाने वर्णन केलेले आहे. सर्वसाधारणपणे सर्व पीर त्यांच्या वडिलांचा वारसा बाराव्यावर्षी अथवा पंधराव्या वर्षी घेतात असे त्यांच्या लिखाणावरुन दिसून येते. या जन्म सनाबाबत वेगवेगळी मते दिसून आली तरी एवढे मात्र निश्चित आहे कीं इमामशाह हे गुजरातमध्ये आले तेव्हां प्रसिध्द मुस्लिम राजा ते महंमद बेगडायाची कारकिर्द चालू होती. हिजरीसन ८६३ ते ९१७ म्हणजे इ. सः १४५८ ते १५११ याबाबतीत दुमत आढळत नाही. असो आपण आता संत इमामशाह यांच्या बालपणाबद्दल पाहू.

कांही हस्तलिखीत वाचून आपल्याला इमामशाह यांचे बालपण समजते. इमामशाह हे कबीरुद्दीनच्या तिसऱ्या बायकोचा मुलगा होता. 'कबीरुद्दीनला एकूण सात बायका व त्यांची १८ मुले होती. इमामशाह यांच्या जन्माच्या आधी असा आदेश मिळाला कीं अविनाशीची अमरज्योत तुझ्या घरात प्रकट झाली आहे.

योगविभुति अवनीमे, प्रगटे शहर मुल्तान ।
अविगत को कैसे बुझे, कहाँ हिंदु मुसलमान ॥
बावा कबीरुद्दीनको, अविगतकी गम पाय ।
अमर ज्योत अविनाशकी, तेरे घर प्रगटाय ॥

आश्चर्यचकित झालेल्या पित्याने जाऊन मुलाचे मुखारविंद न्याहाळले. आयुष्यात कधिही पाहिली नसेल अशी दिव्य कांति आणि तेजोमय मुख पाहताच ते परमानन्दात मग्न झाले आणि त्यांचे नांव इमामशाह ठेवण्यात आले.

लेखक चुन्नाराच्या पुस्तकाप्रमाणे आगाखान यांच्या पूर्वजापैकी हे ३३ वे इमाम आहेत. परंतु पुढे 'पीरातन' साठी होणाऱ्या भानगडी, शिवाय ज्ञान आणि दैवीशक्ति प्राप्त केल्याशिवाय जे मुसलमान धर्मातील धर्मगुरु म्हणून हक्क गाजवू लागले. हा सगळा गोंधळ पाहून ते गुजराथ बाजूला आलेत व स्वतः हिंदु बनून राहिले.

This is false information

चार वर्षाचे वय झाल्यावर त्यांना शाळेत दाखल केले परंतु ते तर सर्वज्ञान संपन्नच जन्मले होते. त्यांना शिकायचे ते काय बाकी होते ? शाळेत जाऊन त्यांनी अनेकांचे दुःख दूर करण्याचा उद्योग आरंभला.

बालपनमें इमामको बहुरी पीर मिटाय ।
जित देखे तीत दुःखिया, शहर मुलतान ऊठ धाय ॥
अन्धेको लोचन दिये, बहिरे श्रवण सुनाय ।
निर्धनीयाको धन दिये, वंझा घर पलना झुलाय ॥

कोण्या आंधळ्याला दृष्टी दिली, कोण्या बहिऱ्याला श्रवणशक्ती दिली, कोण्या मुक्याला वाचा दिली तर निर्धनाला धनवान केले, कोण्यां वंध्येला पुत्रलाभ घडविला अशा एक ना दोन या अद्भूत बालकाच्या प्रभावाने सबंध मुसलमान शहर त्यांच्या मागे धावू लागले.

एक वखत मुलतानमारे, फरता पिताने पुत्र ।
नगरनी शोभा निहाळतारे, त्या आवी स्त्री तूरत ।।
आवी उभी गुरु आगळरे, बोली कबीरदीननी साथ ।
पुत्र मारारे नेत्र नहिरे, दुःखी थाये छे नाथ ।।
जन्मता तुरत अंधो थयोरे, क्रिपा करो युगराय ।
शरणे आवेलो उगारजोरे, करजो सेवकनी सहाय ।।
पीर कबीरदीन बोलीया, सांभळ मारी वात ।
जन्म अंध ते केम टले, करोड करे उतपात ।।

संत कबीरदीनने या दुःखी बाईला उत्तर दिले की जन्मांध मुलाला करोडो प्रयत्न केले तरी त्याला दृष्टी येणार नाही. हा संवाद शेजारी उभा असलेल्या बाल इमामशाहाने ऐकला. त्यांनी वडिलांना विचारिलें कीं 'पिताजीं! या बाईला काय दुःख आहे? ही का रडत आहे? तिच्या बरोबर हा कोण मुलगा आहे?' तेव्हा ती बाई म्हणाली, 'या मुलाचे नांव धनो आहे. माझे नांव केसरबाई आहे व मी जातीने खत्री असून मुलतानची रहिवाशी आहे. हा माझा मुलगा बालपणापासूनच आंधळा असल्यामुळे मी दुःखी आहे ' तेव्हा बाल इमाम सहजतेने बोलला.–

पूत्र तारो आज पोढसेरे रजनीये जे वार ।
दिनकर संघात उठसेरे ढळशे अंध अवतार ।।
घर गई कामिनी ज्याहरे पुत्र लइने साथ ।
रजनी वीती वातमारे, थयो दिवस प्रभात ।
हरखी जोयु पुत्रनेरे, नेत्र थया रे प्रकाश ।।

अशा प्रकारच्या काव्यपंक्तीतून इमामशाहांचे चरित्र आणि त्यांच्या दिव्यशक्तीचा परिचय होतो. एकदा मुलतान शहरात कांही 'जोगी' लोक आलेत. त्यांच्या कानावर बाल इमामशाहांची कीर्ति गेली आणि ते या दिव्यशक्तिधारी बालकाला भेटायला आले. त्यांना मनात वाटत होते कीं आपण योगी लोक, आपण जीवनभर योग साधना करुन अजून जे साध्य करुं शकलो नाही ते या लहान मुलाला घर बसल्या कसे साध्य होईल बरे ? असा विचार करीत योगी लोक येऊन पोहोचले.

अेक समे जोगी आवियारे, करवाने संवाद ।
बाळवयमां बळनिधी, बोल्या तेनीरे साथ ।।
जोगे ते योग देखाडियारे, टाळ्यो तेमनोरे अहंकार ।
मुद्रिकाओ उतराविनेरे, कर्या सेवक ते वार ।।

संसार व्यवहार जाणवारे, कह्यो करीने विस्तार ।
योगीये सद्गुरु ओळख्यारे, नम्या चरण मोझार ।।

हे योगीलोक संघ घेऊन चालले होते. त्यांच्यामध्ये कानपूर, काश्मिर, कर्नाटक, कोकण, कलोल वगैरे भागातील लोक होते. त्यांना लहान वयाच्या इमामशाहाने सर्व प्रकारच्या योगक्रियांचे दर्शन घडविले आणि संसार काय आहे जगत् जगदीश आणि त्याची माया हे सर्व विस्तारपूर्वक समजावले. त्यामुळे त्या जोगी लोकांचा अहंकार नष्ट होऊन त्यांना सत् आणि असत् विवेकबुध्दिने कसे जाणावे हे ज्ञान प्राप्त झाले आणि त्यांनी आपल्या मुद्रिका काढून त्यांना अर्पण केल्या. म्हणजेच त्यांना गुरु म्हणून मानले. असे प्रसंग वारंवार येऊ लागले. लोक त्यांच्या मागे फिरुं लागले. या वेळी इमामशाहांचे वय अवघे आठ वर्ष होते असे वर्णन केले आहे.

संत कबीरदीनचा अंतःकाळ जवळ आल्याचे जाणून त्यांनी विचार केला की इमामशाहा लहान वयाचा असल्यामुळे व माझ्यावर त्याचे अतिशय प्रेम असल्यामुळे माझ्या मृत्यूचे दुःख तो सहन करुं शकणार नाही आणि आताच याला मी दुसऱ्या देशात पाठवले तर लोकांना त्याच्या ज्ञानोपदेशाचा लाभ मिळेल म्हणून ते आपल्या लाडक्या मुलाला उपदेश देऊन समजाऊ लागले.

अविनाशीके अंशकी, पिदरको गम पाय ।
मानवको परबोधके, पियुसे दियो लगाय ।।
बाली उमरीया चल बसे, हाजरबेग निजसंग ।
जनताके दुःख दूर करे, रखे भक्तीको रंग ।।

बेटा इमाम ! तुझे प्रागटच लोक कल्याणासाठी आहे आणि तू अशा या एकाच गांवी बसून राहशिल तर लोक कल्याणाचे महान् कार्य कसे सिध्द होईल !

पीर कबीरदीन बोलीया, गुरुजीने ते बार ।
गुजराथ जाओ बालमा, करवा युगओधार ।।

पित्याचा आदेश मिळताच आज्ञाधारी इमामशाह मुलतान सोडून बैलगाडीने हाजरबेग हा सारथी घेऊन गुजराथकडे प्रवासाला निघाले रस्त्यात जेथे जेथे मुक्काम करण्याची वेळ आली त्या त्या ठिकाणी ते ज्ञानोपदेश करुं लागले व अनेक लोक आवडीने त्यांचा उपदेश ऐकत सत्संग करुं लागले.

क्यों भूले हो बावरे, पियुसे लगन लगाव ।
बेमूल अवशर जात है, फिर नही ऐसे दाव ।।
बडी रहम है साई की, दियो मनुष्य अवतार ।
वे साइके नामको, कैसे भूले गँवार ।।

असा उपदेश देत सत्संग करीत करीत ते पुढे चालले असतांना कश्मोरा शहराच्या जवळ कोटली गांवी त्यांनी मुक्काम केला होता. इकडे मुलतान शहरी संत कबीरद्दीनयांनी महाप्रयाणाची तयारी केली. आपला प्रिय पुत्र दूर गेला असेल असा विचार करुन त्यांनी आपला देह ठेवला. इकडे इमामशाह आपल्या कांही लोका समवेत सत्संग करीत होते ते एकदम थांबले व अंतर्मूख झाले. नंतर डोळे उघडून ते एकदम उठून उभे राहिले व बोलले –

आधी रेन इमामशाहा, बिलखत भये बेचैन ।
पिदर मेरा चलबसे, बरखा टपके चैन ॥
अब तो मै जावन चहुं, दो सो कोस मुलतान ।
आवन खडे हो जाइये आखीर किये अेलान ॥


माझे पिताजी कबीरदीन यांनी देह सोडला आहे. मी त्यांच्या अंतःकाळी त्यांच्या जवळ राहू शकलो नाही. आणि इमामशाहांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या व ते एकदम उठून बोलले, मी आता दोनशे कोस दूर असलेल्या मुलतान शहरी जात आहे. ज्यांना सोबत यायचे असेल त्यांनी तयार व्हावे. कारण प्रेतयात्रा निघाली आहे व ती कबरस्थान मध्ये जाण्याच्या आधी मला तिथे पोहोचले पाहिजे आणि माझा जो हिस्सा त्यांच्या कडून घेणे आहे तो मला मिळाला पाहिजे. बऱ्याच लोकांनी इमामशाहांचे हे म्हणणे बावळट पणाचे समजून सोडून दिले. कारण मध्यरात्रीचा सभय आणि प्रेतयात्रा निघालेली, ती स्मशान भूमीत जाण्यास आणि दफन करण्यास वेळ कितीसा लागणार आणि तेवढ्या वेळात दोनशे कोस जाऊन कसे पोचणार? परंतु जे पक्के गुरुभक्त होते ते ताबडतोब उठून तयार झाले व इमामशाहांच्या गाडी जवळ येऊन उभे राहिले.

मुरख मर्म जाणे नही रे, करे हास्य विनोद ।
जोवाने सहु उभा रह्यारे, नर नारीना थोक ॥
करताये करामत दाखवीरे, रथ उडाड्यो तें वार ।
संघाथ आव्या जेटलारे, लिधा तेटलारे साथ ॥


इमामशाहांनी आपल्या अंगच्या दिव्य शक्तीने आकाश मार्गाने भक्तांच्या सहित बैल गाडीचा रथ उडविला आणि ते थोड्याच वेळात मुलतान शहरी पोंचले, तेव्हां खरोखरच प्रेतयात्रा त्यांना सामोरी भेटली.

अटकावी जनाजा उभा रह्यारे, पांती लेवाने काज ।
लोके ते मनमा विचारीयु रे, आज नही रहे लाज ॥
लोके जाण्यु लज्जा जासे, भुंडू आ कहेवाय ।
मढा पासेथी शुं मळे, मुवा जीवता कई थाय ॥

इमामशाह यांनी प्रेतयात्रा थांबवून सांगितले कीं पिताजींचे कलेवर खाली उतरवा. माझ्या वडिलांकडे माझा हिस्सा भागावयाचा बाकी राहिला आहे. लोकांना वाटले कीं हा असा



चित्र नंबर १ बाल इमामशाहांची मृत पित्याकडून दिव्यशक्तीची मागणी व मृत पित्याकडून झालेला शक्तिपात.



चित्र नंबर २ योगी निरंजननाथ व संत इमामशाहांचा वार्तालाप.

पृष्ठ १०४

वेड्यासारखा वागू लागला तर आपली लाज जाईल आणि मेलेल्या माणसाकडून याला काय मिळणार ? त्यांनी जनाजा खाली उतरवला इमामशाहा आपल्या वडिलाकडे हर प्रकारे विनवणी करुन आपला हिस्सा मागू लागले. सर्वजण लौकिक संपत्तीचा हिस्सा समजले आणि इमामशाह यांना वाटेल ते बोलू लागले. मोठमोठ्या ज्ञानाच्या गोष्टी करणारा इमामशाहा असा तमाशा कां करतोय ? सव्वा प्रहर दिवस वरती आला पण इमाम कांही स्वतःचा हट्ट सोडीना तेव्हा लोक उपहासाने बोलू लागले.

बडे उपदेशक हो गये, लोगोंको ज्ञान बताय ।
घरमें अंधियारा रहा, पर घर दिया जलाय ।।
छोटेमें बडी बात है, उपदेशककी रीत ।
ज्ञानीसे हिस्सा कहॉं, यही मुलतानकी रीत ।।

सर्व मुलतानचे लोक म्हणू लागले कीं आमच्या मुलतान शहरात अशी रीत आहे की जो ज्ञानी पुरुष–उपदेशक असेल त्याला नाती गोती, हिस्सा राहूच शकत नाही. हे शब्द इमामशाहांच्या हृदयात कट्यार प्रमाणे शिरले आणि ते आपल्या बांधवांना म्हणाले तुम्ही ज्ञानाचे मर्म न जाणता पोकळ ज्ञानाच्या गोष्टी करत आहांत तेव्हा हे मुलतानीयांनो ऐका –

मुलतानीके बेनका, जख्म लगे ता दिन ।
हिंदवा को उपदेश दूं, मुरीद न मेरा मोमीन ।।
हिंदवा मेरा बनी रहे, मै हिंदवा का होई ।
मुलतानी तुम सुन लो, हिंदवा हम संगी होई ।।

अज्ञानी मुलतानचे बांधव इमामशाहांच्या दिव्य शक्तीला न ओळखता हीन शब्द बोलून गेलेत आणि ज्ञानी सद्गुरुच्या हृदयात आवेश प्रगट होऊन त्यांनी त्यावेळेपासून एकाही मुसलमान बांधवास उपदेश न देण्याची प्रतिज्ञा केली. आणि हे शब्द इमामशाहांनी मरेपर्यंत पाळलेच, परंतु अजूनहि पाळले जात आहेत मुलतानी लोकांना ही प्रतिज्ञा ऐकून पश्चात्ताप झाला. पण आता काय उपयोग ? सवा प्रहर होऊन गेला होता म्हणून त्यांनी जनाजा उचलण्यास सुरवात केली परंतु तो हलतही नव्हता आणि इमामशाहांची विनवणी चालूच होती. त्याच वेळी चमत्कार घडला. कबीरदीनच्या जनाजातून हात बाहेर आला व त्याने एक माळ इमामशाहा यांना दिली. नंतर तोंडातून साखर दिली आणि आवाज आला कीं, 'बाकी राहिलेला हिस्सा तुला इराणच्या 'पीरशाहा' कडून मिळेल. तेव्हा तूं इराणला जा. ' डब्ल्यू. इव्होनसच्या पुस्तकाप्रमाणे संत कबीरदीन यांनी गुलाब आणि साखर दिली. परंतु इतर बहुतेक ठिकाणी माळ आणि साखरेचाच उल्लेख मिळतो.

सवा पहोर दहाडो त्या चडयोरे, पिताअे काढचो त्यां हाथ ।
माळा ते लई हाथ मारे, जुअे सघळो साथ ।।

माळा आपी पुत्रने हाथमारे, माने नहीरे मुरार ।
माळा ते ना होय माहरीरे, वस्तू आपो दातार ॥
बीजी वारे मुख काढीयुरे, संदुकमाथी ते वार ।
साकर आपी त्या शोभतीरे, गुरु इमामने सार ॥
अचरत सौ त्या पामीया, आ ते शुं केहेवाय ।
मरदा जीवता थई, लेवड देवड थाय ॥

ही इमामशाहांची विशेष शक्ति पाहून सर्व मुलतान वासी लोक आपल्या उध्दट वर्तनाचा पश्चात्ताप करुं लागले व त्यांना विनवणी करुं लागले कीं आम्हाला क्षमा करुन आपली प्रतिज्ञा मागे घ्या. परंतु इमामशाह म्हणाले आतां तोंडातून वचन बाहेर पडले ते पडले. इमामशाहा बरोबर जे हिंदु अनुयायी आले होते त्यांना आपल्या गुरुची दैवी शक्ती पाहून खूपच आनंदी आनंद झाला व ते इमामशाहांचा जय जय कार करुं लागले. त्यांच्या हृदयात हर्ष उसळला.

थोडयाच दिवसांनी इमामशाहांनी पित्याच्या आदेशा प्रमाणे इराणला जाण्याची तयारी केली. त्यावेळी प्रवास फारच कठिण होता. साधनांची सुविधा नसल्यामुळे इराणला जाणे तर अशक्यच होते. अशा कठिण परिस्थितीत इराणला इमामशाह फक्त ३४ दिवसातच जाऊन आले. तेथे गेल्यावर 'पीरशाह' त्यांना पाहून अतिशय प्रसन्न झाले व त्यांच्याकडून इमामशाहांना कांही दैवशक्ती प्राप्त झाली. इराणला 'पीरशाह' जवळ असतांना इमामशाहांनी स्वर्गाची सफर केली असे वर्णन मिळते. या साठी 'जिन्नतनामा' नांवाचे काव्य इमामशाह यांच्या नांवाने रचलेले आहे. परंतु या 'जिन्नतनामा' काव्यात कितपत सत्यता आहे हे सांगता येत नाही. इमामशाहा यांनी दैवी शक्तीच्या जोरावर जी स्वर्गाची सफर केली ही शक्यता आहे. परंतु 'जिन्नतनामा' काव्यात जे वर्णन केले आहे ते निश्चित कोणी वर्णन केले आहे, अथवा इमामशाहांच्या मृत्यूनंतर त्यांत कांहीं फेरबदल झाले आहेत यांत बरीच शंका घेण्याला जागा आहे. कारण इमामशाह यांची ज्ञानपदे व भजने यांच्याशी हे काव्य अगदीच विसंगत आहे. परंतु ते इराणला गेले आणि त्यांना स्वर्गाचे दर्शन घडले हे मात्र बऱ्याच ठिकाणी वाचायला मिळते.

वळता गोरजी चालियारे, केकनगर मोझार ।
नर इसलामशाह त्या रहेरे, शाहोजीनो अवतार ॥
बाकी हती पाती जेटलीरे, दिधी शाहोजीये हाथ ।
सरग देखाडीने मोकल्यारे, गुजराथ देशनी वाट ॥

या प्रवासानंतर ते मुलतान येथे परत आले व तेथेच थोडेदिवस मुक्काम केला. यावेळी एक आश्चर्य घडले. तीन जोगी लोक मुलतान शहरी कबीरदीन यांना दसोंद अर्पण करण्यासाठी आले परंतु संत कबीरदीनचा मृत्यू झालेला ऐकून ते पेचात पडले, कारण त्यांना संत कबीरदीन यांनी सांगितले होते कीं ब्रह्मकळांचे म्हणजेच दैवीशक्तीचे दर्शन माझ्या कुळात ज्याच्या ठिकाणी

दिसेल त्यालाच माझ्या मृत्यूनंतर तुम्ही दसवंत अर्पण करा. म्हणून काय करावे असा ते विचार करीत होते. तेव्हा हाजरबेग येऊन त्यांना ही हकिकत सांगू लागला कीं ब्रह्मकळा कबीरदीन बाबाच्या पश्चात फक्त इमामशाहात आहे. याची तुम्ही खात्री करुन घ्या. इमामशाहा यांनी पण विचार केला कीं माझ्या कुळात ब्रह्मकळा फक्त माझ्याच जवळ आहे. आणि मी जर आता ती प्रगट केली नाही तर संत कबीरदीनच्या नांवाला काळीमा लागेल. त्यांची बदनामी होईल तेंव्हा त्यांनी त्या लोकांना बोलाविले व म्हटले –

पीर इमामशाह बोलिया, बोल्या जोगी साथ ।
जोऊ होय तो जोई लो, मुको बीजी वात ।

सद्गुरु इमामशाह यांनी तोंड उघडताच जोगी लोकांना चौदा भुवन, चंद्र, तारे, सारे ब्रह्मांड दिसू लागले व अनेक दैवीशक्तींचे ब्रह्मकळांचे दर्शन त्यांना होऊं लागले. हे दिव्य दर्शन अनुभवून ते लोक अत्यंत हर्षभरीत झाले. सन्मानाने दसवंत तेथे अर्पण करुन ते समाधानाने परत फिरले.

नंतर इमामशाहा सिंधुनदीच्या तीराने गुजराथ बाजूला जाऊ लागले. रस्त्यात 'जीवन' नावाचा नावाडी नौकेने लोकांना नदी पार करीत असे. त्या दिवशी तेथे अचानक तुफान सुरू झाले व नौका बुडू लागली, जीवनने अनन्य भावाने आपल्या गुरुची मनोमन आराधना सुरु केली. त्यावेळी इमामशाहांनी प्रत्यक्ष तेथे हजर होऊन पाण्यात बुडणाऱ्या जीवनला बाहेर काढले व स्वतः नौका पवन वेगाने चालवून पैलतीरी नेऊन पोहचविली.

पुढे ते प्रवास करीत करीत 'जुणबदीना' या गावी येऊन पोहोचले. त्यांच्या कीर्तिचा डंका आता सर्वत्र वाजत होता, त्यामुळे त्यांना शत्रुपण बरेच निर्माण झाले होते. जुणबदीना या गांवी आल्यावर खोजा धर्मस्थानातील उर्मट आणि सत्तांध स्वार्थी लोकांची कीर्ति त्यांच्या कानावर आली. तेव्हा त्यांनी गरीबवेष धारण करुन 'खान्यात' म्हणजे खोजाधर्मस्थानात प्रवेश केला. कांही खोजांनी इमामशहांना तुच्छ समजून त्यांचा अपमान केला. तेव्हा इमामशाहा म्हणाले मी संत कबीरदीनचा मुलगा आहे. या सर्व बाह्य गोष्टीकडे दुर्लक्ष करून तुम्ही एकमेव सत्यज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी ठेवा. तुम्हीं अभिमान करुन रीतभात सोडून आडव्या मार्गाने जाऊ नका. परंतु मदांध खोजा लोक यांतले कांहीच समजू शकले नाही आणि ते त्यांना खान्यातून बाहेर घालवू लागले. त्या खोजा लोकांना भय निर्माण झाले की हा आपली येथली गादी बळकावून बसेल, परंतु संत इमामशाह यांना तर गुजराथकडे जायचे होते. शिवाय हिंदुमध्येच त्यांचाच बनून राहण्याची त्यांनी शपथ घेतली होती. खोजा लोकांचा अभिमान दूर करण्यासाठी ते इथे उतरले होते परंतु त्या लोकांनी कांही एक न ऐकता त्यांना जेवणही दिले नाही उलट एका असंस्कारी माणसाने त्यांना तीन लाकड्या मारल्या. इमामशाहा यांना यत्किंचितही क्रोध आला नाही. ते अतिशय शांत आणि प्रसन्न चित्ताने या लोकांचा नाद सोडून चालू लागले.

विकार रहित छे नाथजीरे, सत् ब्रह्म स्वरुप ।
दोष ते दिलमा नही धरे रे, सुखसागर अनुपम ।।

सद्गुरु इमामशाह हे विकाररहित आणि ब्रह्मस्वरुप असल्यामुळे ते कोणालाही दोष न देता पुढे चालू लागले तेव्हा रस्त्यात एक प्रेमजी खोजा नांवाचा मनुष्य पुढे आला आणि तो अतिशय आदराने इमामशाहांना घरी घेऊन गेला. त्यांना भोजन दिले व त्यांची कृपा संपादन केली.

नंतर त्यांनी पुढचा मार्ग आक्रमण करायला सुरुवात केली. जाता जाता ते चितोडगड या गांवी आले आणि गावाबाहेर एका झाडाखाली बैलगाडी सोडली आणि ते आराम करु लागले त्याचवेळी 'वेलर' नावाचा एक गवळी तेथे इमामशाहांच्या जवळ आला. तो गुरुजींना पाहून प्रणाम करुन त्यांच्या चरणाशीं बसला. इमामशाहांनी त्याचे क्षेम कुशल विचारले व किती मुलबाळं आहेत असे विचारताच तो ढळढळा रडू लागला व म्हणाला स्वामी मी तीन बायका करुनही निपुत्रिकच राहिलो. रडता रडता त्याचा कंठ सुकला. गुरुजी त्याला समजावून म्हणाले –

गोरज मुखथी बोलियारे, सांभळ वेलर वात ।
दुःखनी वारे दया करेरे, अेवो जगतनो तात ।।
संकल्प विकल्प टाळजो, राखजे मनमा धीर ।
पुत्र सुख तू पामशे, बोल्या इमामशाह पीर ।।

वेलर गवळ्याला कांही दिवसांनी पुत्रप्राप्ती झाली आणि गुरुजींच्या सांगण्यावरुन त्याचे सबंध कुळ आणि कुटूंब चितोडगड सोडून 'अेसावर' या गांवी जाऊन स्थाइक झाले. अेसावर गांवी हे सबंध कुळ इमामशाहांचे वंश परंपरागत अनुयायी आहेत.

या पुढचा प्रवास करतांना ते हाजरबेग सहित 'शिरोई' या गांवी उतरल्याचा उल्लेख मिळतो. नंतर मारवाड मधून पुढे प्रवास करीत ते दिल्लीला जाऊन पोचले. तेथे त्यांनी 'शाहदुल्ला' या मशिदीत मुक्काम केला. नमाज पढण्यासाठी अनेक लोक येऊ लागले इमामशाहामात्र ध्यानस्त बसून ईशचिंतन करीत होते. कुतुहलाने लोक त्यांच्या जवळ जाऊन म्हणाले, 'महाराज, आपण मुसलमान दिसता आणि नमाज कां पढत नाही?' तेव्हा इमामशाह नम्रतेने म्हणाले, 'माझी नमाज खुदाने मंजूर करुन टाकली आहे. तुमचा आग्रहच असेल तर माझ्या ऐवजी हे मशिदीचे मनोरे नमाज पढतील.' आणि खरोखरच मशिदीचे मनोरें खाली वाकले. इमामशाह म्हणाले, ' जरी मी मुसलमान कुळात जन्मलो असलो तरी सर्वांचा एकच अशा परमेश्वराचे ठायी मी लीन आहे. माझ्यात धर्मभेद अथवा जातीभेद नाही., कर्मधर्म संयोगाने मी इथे येऊन उतरलो आहे.'

इसी मिट्टीमे सारी दुनिया निपाया ।
इसीमे कौन हिंदु कौन मुसलमाना ।।

ही बातमी दिल्ली शहरात वाऱ्याप्रमाणे पसरली व त्या वेळचे दिल्लीचे बादशाह 'बहलोल लोदी' या अफगाणी राजाच्या कानावर ही बातमी आली. बादशाहा उत्सुकतेने त्या महापुरुषाचे दर्शन करण्यास निघाले. त्यांनी इमामशाहांना प्रश्न केला –

शहर दिल्लीमें आईया, बडे करामती शाह ।
पाक दिदार पेखने, आय खडे पातशाह ।
बहलोल खान आयके, साइको किन्ही सलाम ।
साई नमाज पढते नही, बुझो पाक कलाम ।।

यावर इमामशाह आपल्या अमृततुल्य वाणीने बोलले –

पाच नमाज हृदयमे रहे, बेहद नमाज सोय ।
हरदम लगे नमाजमें, ताको नमाज कहाँ होय? ।।
नमाजसे बहाना करे, वे नही मुसलमान ।
रोज नमाज बखानतें, आपे बडे मोमीन ।
कहाँ हिंदु इस्लाम कहाँ, पीव खोजे सोही प्रवीण ।।

बादशाह बहलोल खान शांत चित्ताने ऐकत असलेला पाहून पुनः इमामशाहा त्यांना सांगू लागले –

सायाको खोजत फिरे, पियरा तिहारी पास ।
बिलखत मृग फिरे बावरे, बन बन सुंघे घास ।।
सायाजीकी गम नही, भूले हिंदवा दीन ।
व्रत आचरमे हिंदवा, रोझा नमाज मोमीन ।।
रेन दिन लागी रहे, साहिबसे इकतार ।
अैसे साधु फकीरको, बहूरी मेरा जूहार ।।
बहलोल बुझी साइको, झंझट छोड दो आन ।
नेक बाते इमामकी बेरही कबहु बखान ।।

असा हा उच्च कोटीतला साध्या भाषेतील उपदेश ऐकून बहलोलखान बादशाहाचे मन प्रसन्न झाले. ते आदराने गुरुजींना म्हणाले, 'महाराज' आपण आपल्या स्वखुशीने माझ्याकडची कांहीतरी भेट स्विकार करा, मला आनंद होईल –

वळता तें बादशाहा बोलियारे, मांगो मांगो द्याळ ।
जे रे वस्तु तमने खपे रे, खपे गाम गराश ।।

सद्गुरु इमामशाह म्हणाले –

वळता गुरुजी बोलिया, शुं करुं गाम गराश ।
मुजने कांई नथ खपे, अेक साहेबनी आश ।।

हे बादशाह ! मला गाव वगैरे कांहीच भेट नको. त्याला मी काय करु ? मला फक्त परब्रह्म परमात्म्याच्या दर्शनाचीच गोडी आहे इतर लौकिक गोष्टीची आशा नाही. परंतु बादशहाने त्यांना प्रवासाकरिता एक रथवजा बैलगाडी दिली.

यानंतर अनेक गांवे फिरत फिरत ते गुजराथ मधील अटुणा गांवी येऊन पोहोचले. 'बॉम्बे गॅझेटियर' अथवा 'हिस्ट्री ऑफ् गुजराथ' अशा अनेक पुस्तकातून इमामशाहांचा हा इतिहास वाचायला मिळतो.

दिल्लीहून निघाल्यानंतर गुरुजी मध्यप्रदेशमधून मजल दर मजल प्रवास करीत करीत भोपाल, इंदूर, निमाडमधून थेट बऱ्हाणपूर येथे आले. तेथून खानदेशमधून प्रवास करीत असता ठिक-ठिकाणी मुक्काम करुन त्यांनी धर्मोपदेश केला. पूर्व व पश्चिम खानदेशमधून जात असतां त्यांनी बराच शिष्य संप्रदाय वाढविला. सद्गुरुंची दिव्य शक्ति आणि ज्ञानोपदेश ऐकून बरेच लोक प्रभावित होऊन त्यांच्याकडून अनुग्रह घेत. कित्येक त्यांच्या दर्शना करिता तर कित्येक केवळ कुतुहल म्हणून त्यांच्या सान्निध्यात येत. त्यांचे दर्शन घेऊन ज्ञानोपदेश ऐकून आपल्या जीवनाचे साफल्य मानीत. खानदेशमधून प्रवास करीत असतांनाचे वर्णन सद्भक्त नायाकाकांचा परम शिष्य गंगासिंह गोहिल यांनी काव्यरुपाने केलेले आहे त्यांतील कांही दोहे खाली देत आहोत –

दक्षिण देशमे विचरते, सोनगढ आये साई ।
आये पीराना जानके, सेवक आये धाई ॥
लोगनके दुःख दूर करे, साई कृपा वरसाय ।
रोग मिटाये जीवोंका, छीनमे किये सुखदाय ॥

सोनगढला मुक्कामी असतांना त्यांचा कीर्तिरुपी सुगंध सर्वत्र पसरला. लोक दर्शना करितां व आपापल्या लौकिक आशा आकांक्षा त्यांच्या कृपाशिर्वादाने पूर्ण करून घेण्याकरिता आले. महापुरुषांच्या सान्निध्यात आल्यानंतर त्यांच्या सर्व आकांक्षातर पूर्ण होतच पण त्याबरोबरच त्यांच्या पारलौकिक व पारमार्थिक आकांक्षा सुध्दा पूर्ण होत.

सुखानन्दको सोनगढ, नैन दिखे गुरुदेव ।
धाम लाछोरा चल बसे, आये अवधू भेव ॥

लाछोरा –

लाछोरा पहूँचे गुरु, हो गये आनन्दकंद ।
दरश पीराना पायके, मिट गये दुःख द्वन्द्व ॥
रवतकोठी गजेश्वरी, ता घर पहूँचे जाय ।
कृपा बडी इमामकी, महारोग मिटाय ॥

भक्त वमरस –

वमरस भक्त जना, उरमें छाय उमंग ।
सद्गुरुके चरणमें, लगे सवाया रंग ।।
वमरस घरकी दुविधा, छीनमे मिटाये साई ।
आनंद वाधे अति, सबही जीये सुखदाई ।।

भक्त सुरभाण –

सुरभाणको सद्गुरुकी, मानो लागी लगन ।
निशदिन गुरु चरणमें, ठाढे रहे मगन ।।
सुरभाणकी गति, कैसे बुजे अजाण ।
गुरु चरणमें लग रहे, आठो जाम सुजान ।।
सतगुरु बानी उचरे, धन्य सुरभाण अनुराग ।
आवागवन ताको नही, भव उबरे ही सुभाग ।।
खटमास गुरुदेवजी, ठाढे लाछोरा ग्राम ।
परहितकारी साईयः, चलने लगे बहुनाम ।।

महाराष्ट्राच्या परिसरात व विशेषतः सोनगढ लाछोरा भागात सद्गुरु इमामशाह बरेच दिवस राहिल्याचा उल्लेख वरील दोह्यावरून आढळतो. तेथील बऱ्याच रंजल्यागांजलेल्यांना दिलासा देऊन परमार्थ करीत करीत गुरुजी आणखी दक्षिणेकडे वळले, कोचरब विभागात त्यांचा निजामाशी नदीतिरावर प्रसंग घडून आला व निजामसुध्दां त्यांचा तपःप्रभाव व तेजःपूंज व्यक्तिमत्व पाहून दिङ्मूढ झाला,

कोचरब जाने के लिये, सरितातट आये गुरु पीर ।
निजाम कहे ठाढे रहो, किसविध होत अधिर ।।
रथ सहित गुरु देवजी, जलपर चले प्रबिन ।
लोगन सब देखत रहे, निजाम हुये मतिहिन ।।
कोचरबमें गुरुदेवको, इक साल किये निवास ।
सुभागी कई जीवकी, पूरन किये गुरुआश ।।

अशा प्रकारचा कोचरब मुक्कामाचा कथा प्रसंग वर्णिलेला आहे. त्यात गुरु महाराजांनी निजामाचा गर्वभंग केला. त्याविभागात गुरुजींचा जवळ जवळ एक वर्षभराचा मुक्काम होता. त्या अवधित त्यांनी बऱ्याच भक्तांचा उध्दार केलेला आहे. महात्मा पुरुषांचा कीर्तिरुपी सुगंध सर्वत्र वाऱ्याप्रमाणे संचार करीतच असतो. वस्तुतः महापुरुष प्रसिध्दीपराङ्मूख असतात, पण गांजलेली पीडीत जनता आपला भवताप मिटविण्याकरितां अनन्य श्रध्देने महापुरुषांच्या संपर्कात येतात व बंधमुक्त होतात. अशा अनेक पीडीतांचे दुःख इमामशाहावरील श्रध्देने मिटल्याचे खालील दोहचात वर्णिलेले आहे.

मोहन भक्त –

मोहनको सद्बोधसे, जगे हियामे हेत ।
ताही की गति को लिखे, उबरे कुळ समेत ।।

लासाजी चमार –

लासाजी चमारके, पूरन हुअे सब काज ।
कृपा बडी गुरु पीरकी, भव उबरे सुख साज ।।

उदाजी पढियार –

साया मेरी कोन गत, शरण राखो गुरु पीर ।
उदाजी पढीयारको, गुरु दिखे गुण गंभीर ।।

गायिका जयश्री –

तवायफको अकर्मसे, साहिब कियेरी नेक ।
बडी सुभागीन हो गई, जयश्री जुगमे नेक ।।

अशा प्रकारे अनेक सद्भक्तांना मार्गदर्शन करीत, दुःखितांचे दुःख दूर करीत मजल दरमजल मुक्काम करीत ते दक्षिणेतून पश्चिम सागर किनाऱ्याकडे वळले. नवसारी, सुरत, कानम, खंबायत, भावनगर, जुनागड, राजकोटहून बडोदा व तेथून पेटलाद, देवा या भागात गेले. मध्यंतरी कानम मधून जात असता विख्यात लुटारु 'नाया' चा समागम झाला. आपल्या तपःप्रभावाने त्यांनी त्याच्यात परिवर्तन घडवून आणले व सन्मार्गावर आणले. ही सर्व कथा 'नाया' च्या चरित्रात ऐकायला मिळते. मार्गात त्यांना अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अनेक जातीच्या, अनेक स्वभावाच्या लोकांशी त्यांचा संबंध आला. रमजु कसाई, गोजारी अहिरण, मनखाजी अहिर. एका ब्रह्मराक्षस–खविसाचा त्यानी उध्दार केला, जुम्मा खुराशानी या विख्यात फकिराशी धर्मचर्चा संबंध घडून आला. मलिक महंमद, हाजी काळू, मलिक शअबान, याकुतशाह, बाकरभिस्ती, गायिका मायावती, बन्नासिंह हाडा, जंभासिंह, तुंवार मंडासेन, जुगल बनजारा, हिरजी नाविक, सेजलदे, सवदास, मौलाजादा अलकीखान, मलिका हिराबाई वगैरे अनेक लोकांचा समागम घडला. अनेकांशी धर्मनीति बाबतीत चर्चावादविवाद संवाद झाले, कित्येकांचे अज्ञान दूर करुन त्यांना ज्ञानी बनविले. जशा प्रकारची व्यक्ति असेल तशाप्रकारचे वर्तन त्यांच्याशी करुन व सर्वावर आपली छाप पाडून त्या त्या सर्वांना इमामशाहांनी आश्चर्यचकित करुन सोडले. या सर्व प्रसंगाचे वर्णन नायाकाकांचा परमशिष्य गंगासिंह गोहिल यांनी सुंदर काव्यपंक्तीत केलेलें आहे. समाजातील विविध थरातील स्त्रीपुरुषांशी जसा त्यांचा संपर्क आला तसाच अनेकानेक संत महात्मा पुरुषांशी सुध्दा त्यांचा समागम झाला. गोस्वामी तुलसीदास, चैतन्य महाप्रभू, गुरु नानकशाह, महात्मा दादूदयाळ, संत सुरदास, संत कबीर, संत साध्वी मीराबाई तसेच कित्येक योगी महात्मा पुरुषांशी त्यांचा सत्समागम घडून आला.

सद्‌गुरु इमामशाहांचा प्रवास जरी बराच घडला तरीपण त्यांचे उपदेशाचे क्षेत्र बहुशः गुजराथमध्येच आहे म्हणून त्यांचे वाङ्मय जे उपलब्ध आहे ते विशेषतः गुजराथी भाषेतूनच आहे. इमामशाहांचे मुख्य शिष्य म्हटले म्हणजे संत नायाजी, संत भाभाराम, संत साध्वी कीकीबाई आणि संत शाणाकाका हे होत. इमामशाहांच्या संपर्कात येऊन त्यांचा समागम कसकसा घडला याचे सविस्तर वर्णन 'सद्‌गुरु इमामशाह महाराज जीवन वृत्तांत' या मराठी व गुजराथी भाषेत प्रसिध्द झालेल्या पुस्तकांत आलेले आहे. गीरमथाला आल्यानंतर बहुतेक त्यांनी आपला प्रवास थांबवला व तेथेच जवळ 'पीराणा' या स्थानी वास्तव्य केले.

गीरमथा–गीरमथामे देखिया, सप्तसाल अकाल ।

रहम किओ गुरु देवजी, सचमुच हुवे सुकाळ ।।
मेहा आये धायके, हो गये जय जयकार ।
मेदनी आयी दोडके, पावे गुरु दीदार ।।

पटेल पुत्र सजीवन –

ग्राम्य मुखीके पुत्रको, सद्‌गुरु दिये जीवाय ।
ताथे मेरा साईको, घर घर लिखे महिमाय ।।

कुवारीका क्षेत्र –

तीर फेंके गुरु पीरको, कुवारीका क्षेत्र माय ।
कर्ण भेदाये केसरी, झुक कर हुओ बिदाय ।

सद्‌गुरु स्थान –

स्थान बनाये साइको, पीरजी कीये निवास ।
ताथे लोगन उचरे, यहाँ पीराणा खास ।।

पीराणा –

पीर इमामकी रहमसे, बसे पीराना धाम ।
पीरोंका पीराना हुये, लिखे पीराणा ग्राम ।।

Imamshah himself built Dargah

वि. सं. १५२४ मध्यें रोजाचे स्थान बनविले –

पंद्रहसे चोवीसमें, रोजा स्थान स्थपाय ।
समाधि अपने हाथसे, साया को बनवाय ।।
परचा बहूत गुरु पीरका, कैसे लिखे अजान ।
जाको गुरु गम पाइया, ताको मिल गई शान ।

वि. स. १५५७ मध्यें गुरु इमामशाह पूर्ण विराम पावले–

नारायणके अंश से, प्रगटे पीर इमाम ।
पंद्रहसो सतावनमें, पाया पूर्ण विराम ।।

अभिलाषा–ज्योति जगी अविनाशकी, मानो पूर्ण प्रकाश ।
'गांगा' सद्‌गुरु इमामकी, अर्हनिश कर हूं आश ।।

गंगा सिंहाचा विनय –

बैठे रहुं गुरु चरणमें, चाहूं दिदार साई ।
गंगाकी यह आरजु, मानो पाक पीराई ।।
साया तुमेरा बनी रहुं, सुनो सद्‌गुरु इमाम ।
गांगाको अपनो लीखो, बिरद बडो बहुनाम ।।

सद्‌गुरु इमामशाहांनी पीराण्यास स्थान प्रगट केल्यानंतर ते तेथूनच धर्मप्रचार व इतर कार्य करुं लागले. बरेच योगी मुनि विचारवंत समाज प्रवर्तक लोक तेथे येऊन अनेक वार्तालाप धार्मिक-चर्चा विचार विनिमय करीत. सर्वांचा आदर सत्कार मान मरातब त्यांच्या त्यांच्या योग्यतेने करुन इमामशाहा अत्यंत लोकप्रिय झाले. त्यांच्या जीवनातले ठळक ठळक प्रसंग गंगासिंह गोहिल यांनी आलेखित केलेले आहेत, त्यांतील कांही प्रसंग खाली देत आहोत.

१) योगी निरंजननाथ

पीरजी संग बैठ सुखसाजा, मध्यान्ह आय खडे योगीराजा ।
नाम निरंजननाथ बखाने, देख पीराना हरख ऊर ठाने ।।
बडे आदर सद्‌गुरु किन्हा, प्रेम प्रसाद योगीसंग लीन्हा ।
योगी अभेद दिखे गुरु ज्ञानी, जात पात लिखे अज्ञानी ।।

एकदा सद्‌गुरु इमामशाह महाराज पीराण्यास कांही लोका समवेत सत्संग करीत होते. दुपारचा समय होता, बरोबर त्याचवेळी एका योगी पुरुषाचे आगमन झाले. त्याचे नांव निरंजन-नाथ. योगी खरोखर महाप्रभावशाळी होता. सद्‌गुरुंनी अतिशय प्रेमाने त्यांचा आदरभाव केला. आतिथ्यधामात त्यांना सोबत घेऊन जाऊन उभयतांनी प्रेमाने सहभोजन केले. योग्याची अभेदवृती होती. जाती वर्णाचा ज्या ठिकाणी किंचितही भेदभाव नाही असा तो ज्ञानी पुरुष होता. सद्‌गुरुंनी त्यांच्या सोबत बसून बराच वेळ पर्यंत सत्संग केला. अमृतरसपान करीत अभयता बराच वेळपर्यंत ईश्वरी लीलेचे व त्याच्या प्राप्तीच्या साधनांचा विचार चर्चा करीत बसले. शेवटी सद्‌गुरुंनी विनयाने योग्याला प्रश्न केला –

योगीराज कैसे दिन्ह दिदारा, महाशिवरात्री निमित्त गिरीनारा ।
दत्त प्रभुके दर्शन पै हो, योगीजन उर आनंद पै हो ।।
सांथाजी दीदार यहा पाये, योगी फिर गिरनार क्यों जावे ।
हस मुस्कराई साइया बोले, अमर पुरुष आधिन अमोले ।।

योगीराज ! इथे आपले आगमन झाले, ही तर अतिशय आनंदाची गोष्ट आहे, पण आपण अचानक कसे येऊन ठेपलांत. कोठे जाण्याची तयारी आहे काय ? कृपाकरुन आपल्या आगमनाचे कारण समजेल कां ?

"पीरजी ! योग्याचे आगमनाचे कारण असे कीं गिरीनारला जायचे आहे. मार्गात आपले स्थान लाभले म्हणून दर्शन करण्याच्या इच्छेने आपल्या चरणाजवळ आलो. आपल्या दर्शनाने खरोखर हृदयात अपार आनंद झाला. आता तर योग्याला गिरनारला जायचे आहे. तेथे महाशिवरात्रीला संत आणि सिध्दांचा महामेळा लागतो. त्यांत भगवान दत्तात्रेयांच्या दर्शनाचा लाभ घडून आला तर फारच उत्तम म्हणून गिरनारला जायचे आहे. जर आपण येथेच त्या महागुरुंचे दर्शन करवित असाल तर गिरनारला जाण्याचे श्रम वाचतील."

योग्याचे हे शब्द ऐकताच सद्गुरु मंद मंद हास्य करीत म्हणाले –"योगीराज! आपण ज्या सिध्दपुरुष–महागुरु विषयी गोष्ट करीत आहांत तो अमर पुरुष कोणाच्याही आधिन नाही की त्याला बोलावून घर बसल्या दर्शन घेऊं शकू. त्या अविगताच्या गतीचा कोणीही पार पावू शकणार नाही तर मग त्याला या ठिकाणी कसे काय बोलविता येईल. ज्याचे दर्शन प्राप्त होण्यासाठी योगी लोक गिरीकंदरात एकाग्रतेने ध्यानमग्न बनून वर्षानुवर्ष पर्यंत प्रेम साधना करतात, तरीही त्याचे दर्शन घडत नाही. अशा त्या अविगताला येथे बोलावण्याचे काम माझ्या आवाक्यात नाही. योगीराज ते महागुरु येथे कशारीतीने येऊं शकतील?"

महागुरु यहा कैसे आवे, साई पीराना कैसे दिखावे ।
बडे आनंद गिरनार जै हो, महागुरुका दर्शन पै हो ।।
झुक झुक योगी खडे हो गैया, तीन कदम अरुप हो वैया ।
गांगा सुनो यह गेबकी बाते, ता दिन योगी दिखे साक्षाते ।।

"पीराना' जवळ ही गती नाही की त्या महा योग्याला येथे बोलावून तुम्हाला त्यांचे साक्षात दर्शन करवूं शकेल! योगीराज! आपण ह्या महागुरुंच्या दर्शनाकरितां अति आनंदाने व प्रेमाने गिरनारलाच जावे. अनन्य प्रेम भावाने त्यांचे दर्शन घेऊन सत्संगाचा अलभ्य लाभ घ्यावा." सद्गुरुंनी योगीराजाला असे सांगून आपल्या गतीची मर्यादा त्यांना दाखवून दिली व त्यांना गिरनारला जाण्याचा सल्ला दिला. योगीराज नम्रतेने उभे राहिले व इमामशाहांचा प्रेमाने निरोप घेऊन तीन पावले जाऊन अंतर्धान होऊन गेले.

सत्पुरुष नायाजी आपल्या परम शिष्यास गंगासिंहास म्हणाले कीं हे गांगा ! ही तर अगम्य–गूढ वार्ता आहे. योगी पुरुषाला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी निरखणे व त्यांचा संग घडून ज्ञान चर्चा वार्तालाप करणे फारच दुर्लभ योगाच्या गोष्टी आहेत. जे योगी असतात तेच ह्या गोष्टी जाणतात.

२) काळदूतांशी संवाद

कहो गुरुजी कछु अमृतवाणी, पीरजी मूख बोले गुरुज्ञानी ।
सद्गुरु संग बैठे मध रेना, ता दिन आय कालकी सेना ॥
अति भयानक दिखे बिहाना, देखतही दिल हो गई हाना ।
आये अझल फिरस्ता दाना, कैसे आवन हुवे गुणवाना ॥

एकदा गंगासिंह आपल्या गुरुजीजवळ–संत नायाजीजवळ बसून सत्संग–वार्तालाप करीत होता. गंगासिंहानीं गुरुलीलेविषयी अभिलाषा व्यक्त केली तेव्हा सद्गुरु नायाकाका म्हणाले 'एकदा सद्गुरु इमामशाहांच्या संगतीत पीराण्यास बसलेलो होतो. मध्यरात्रीचा समय होता. अचानक लख्ख उजेड पडून त्या उजेडातून काळदूत प्रगट होऊन उभे राहिले. या दैवी फिरस्त्यांना पाहून खरोखर हृदय कंपायमानच होत होते. असे त्यांचे भयानक स्वरुप होते. सद्गुरुंनी त्यांचा आदरभाव करुन हळूच येण्याचे कारण विचारले. तेव्हा त्यांनी शांत चित्ताने सांगितले –

सायाजी तुमी रहमे समंदर, मरते जीवको बखानत सुंदर ।
सजीवन काहे करत हो साया, चेतावन यहा हम आया ॥
परहित काहे लूभाई रहैया, मरत जीवकी छांडो बैया ।
अैसा ढंग मत छांडे पीराना, चाहे यहांसे चलू दिलजाना ॥

'हे सायाजी ! तुम्ही तर दयेचे सागर आहांत म्हणून मेलेल्या जीवात्म्याला सुध्दा सजीवन करुन उठवून बसविण्याचा व्यवसाय मांडून बसलेले आहांत. ही कार्यवाही बंद करा. तुम्हास या बाबतीत सुचविण्याकरितांच आमचे आगमन झालेले आहे. तुम्ही तर दुसऱ्यांच्या कल्याणात दिल लावून बसलेले आहांत परंतु आमचे तुम्हाला असे सांगणे आहे कीं ह्या मृत जीवात्म्यास त्यांच्या कर्मगतीवर सोडून द्या आणि तुम्ही ज्याप्रमाणे शांतीने बसलेला आहांत तसेच निर्लिप्त होऊन रहा.'

सद्गुरु इमामशाह म्हणाले, 'हे देवदूत हो तुम्ही जे म्हणतात ते कदाचित खरे असेल पण माझ्याने तसे होऊ शकेल असे नाही. पीर आपली पीराई (परपीडा हरण करण्याचे व्रत) सोडण्यास कधीही तयार नाही. वाटल तर हे जगत सोडून जाण्याचा आदेश मिळाला तर तो स्वीकारण्यास मी अगदी आनंदाने तयार आहे, पण पीराईचा त्याग करु शकणार नाही.



चित्र नंबर ३ संत सद्गुरु इमामशाहांचा काळदूतांशी संवाद.



चित्र नंबर ४ सत्पुरुष इमामशाहांची नरपतनूराकडून अडवणूक व इमामशाहांचे त्यास दिव्यज्ञानदर्शन

पृष्ठ १२१

जबतक यहां रहूं पीराना, तबलग दीनोंकी पीर बखाना ।
अपनो जान उबारही सोई, कैसे तजे पीराना पीराई ।।
आपही अपना कर्म बखानो, हम ही ठाढे रहे दिलजानो ।
नेक नाम इन्सान कहैया, ठाढे पीराना पीर बुझैया ।।

'जो पर्यंत आम्हीं या धरतीवर राहात आहोंत तोपर्यंत दीनजनांचे दुःख दूर करण्यास तत्पर राहू. अशा दुःखितास स्वतःचा जाणून त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी आमच्या शिरावर आहे. पीर परहितासाठी जन्माला येतात. ते परपीडा मिटविण्याच्या आपल्या योगशक्तीचा कधीच त्याग करु शकत नाही. ज्याप्रमाणे तुम्ही तुमचे कार्य करीत आहांत त्याप्रमाणे आम्हाला आमचे कार्य करुं द्या. जोपर्यंत या धरतीवर राहायचे आहे, तोपर्यंत दुःखितांचे दुःख दूर करण्याचे पवित्र कर्तव्य मी सोडू शकत नाही.' सद्गुरु इमामशाहांनी स्पष्ट शब्दात समजावून दिले. काळदूत पूर्णपणे त्याचा आशय समजून गेले. अत्यंत आनंदाने ते म्हणाले –

पीराना सोही पीर बुझे, और को यही राह न सुझे ।।
पीर इमाम तुम नेकी बखानो, झूके फरिस्ता चले दिलजानो ।।
सुनो गांगा यही नैन दिखैया, पीर इमामका जलवा पेखैया ।।
जहा मे आयके परहित पेखो, औरनकी पीर आपमे देखो ।।

'पीरजी! तुम्हाला हा सत्याचा मार्ग दिसत आहे म्हणून तुम्ही दुसऱ्यांच्या दुःखाने पीडीत होत आहात. कित्येकांना तर हा मार्ग सुध्दा दिसत नाही. कारण कीं ते स्वतःच्या स्वार्थासाठीच जीवन जगतात. तुम्ही सत्याचे उपासक आहात तर सदैव याच पवित्र मार्गाने वागा.' असे म्हणून झुकून काळदूत विलय पावले.

गांगाजी ! हा प्रसंग तर गुरुजींच्या संगतीत बसून या डोळयांनी आम्ही न्याहाळीला आहे. त्याच दिवशी सद्गुरु पीरांच्या पीराईचे भान मला झाले व समजून आले कीं दुनियेत आलेलो आहे तर परदुःख जाणून घ्यावे. दूसऱ्यांचे दुःख आपले जाणून त्यांच्या दुःखात सहभागी व्हावे.

३) फकीर जुम्माशाह

अेक दिन आये फकीरा ज्ञानी, जुम्माशाह नाम बखानी ।।
झुक झुक पीराना संग बिठैया, उलट बाते अंतरकी कहैया ।।
सायाजी हम खोजत हारे, दिखे नही कभी पीव पियारे ।।
कैसे दिदारा साईका होवे, कहो पीराना साई बीगोवे ।।

एके दिवशी एक फकिर आला, त्याचे नांव जुम्माशाह. तो ज्ञानी फकीर सद्गुरुजींच्या चरणाशी झुकून विनयाने खाली बसला. आणि हळूच अंतरातील गोष्ट सांगू लागला –

'हे साई ! इतके वर्षे गेली आम्ही शोधून शोधून थकलो परंतु केव्हाही भगवंताचे दर्शन झाले नाही. कृपा करुन सांगा की ईश्वराचे दर्शन कोणत्या उपायाने होऊ शकेल ? माझ्या तर आयुष्याचा पैलपार आला, पण भगवंताने अजून ही या गरीब दीन दासावर दर्शन देण्याची कृपा केली नाही. या दुनियेचा त्याग केला पण दिलदार मिळाला नाही. साईने नाहक वेश बनविला आहे.'

जिक्र बिना नही पावे साई, बंदगी ताहिकी लीजो बनाई ।।
पल अेक साईसे लग रहे नैना, आय मिले सच कहू बेना ।।
सायाजीकी हक्क हे बानी, जिक्र राह भूल गये नादानी ।।
ताथे जहा बहुरी भटकाये, आज पीराना से गम पाये ।।

'हे साई ! त्या भगवंताची भक्ति केल्याशिवाय केव्हांही शांति लाभणार नाही. तुम्ही एकाग्रतेने त्याची जीकीर करा म्हणजे तो परमात्मा एक दिवस जरुर येऊन मिळेल. अेक घडी खऱ्या हृदयाने भगवंताच्या संगतीत लागून राहा. एक वेळ त्या भगवंताशी एक दृष्टी झाली तर जरूर तो येऊन मिळेल. असा तर माझा स्वामी तुमच्या पासून काही दूर नाही, परंतु तुम्ही खऱ्या हृदयाने त्या भगवंताशी प्रीत करुन घ्या.'

सद्गुरु इमामशाहांनी फकिराला सत्य घटना सांगितली. ते ऐकताच फकीराने आपली भूल कबूल केली आणि म्हणाला –

'हे साई, आपण जे सांगतात ते अगदी सत्य आहे. आतापर्यंत मी भक्तीचा मार्ग विसरुन गेलो होतो आणि म्हणूनच या दुनियेत खूप रखडलो, कोठे ही सुख वा शांति मिळाली नाही. फकिर झालो पण दुनियेच्या हद्दीतून पार जाऊ शकलो नाही. आणि सत्याचा मार्ग भुलून जे करायला पाहिजे ते करु शकलो नाही. याच गफलत मध्ये सर्व आयुष्य वाया गेले आता समज आला पण खूप उशीर होऊन गेला. आता आपल्या पवित्र चरणाजवळ आलो. आपण कृपा करुन मला सत्य मार्गावर आणले. मार्ग चुकलेल्या फकिराला आपण समज देऊन ताळयावर आणले.

मोपे रहम कीजो पीराई, ताथे जीक्र बनी रहे साई ।।
जीक्र तुमीसे अैसी बनैया, सच मुख जलवा तुम्हे पैया ।।
चले साई उर जीक्र बखाने, जल्वा ताहिको मिले दिल जाने ।।
गांगा सद्गुरु संग दिखैया, भाग्य ताहिको दर्शन पैया ।।

'हे साई ! माझ्यावर दया करा, त्या योगे भगवंताची भक्ति घडू शकेल अशी दुवा करा.' सद्गुरुंनी फकीरास शुभाशिर्वाद देतांना म्हटले –

'हे साई ! तुमच्याकडून भगवंत प्राप्तीची अशी जीकीर बनून येईल की तुम्हाला खरोखर तो परमपावन परमात्मा दर्शन देईल. तुम्ही ज्याचे दर्शन घेण्यास आतूर झालात त्या साईचा जागृत चमत्कार पाहण्याचा योग लवकरच आपणास प्राप्त होईल.

फकीर जुम्माशाह सद्गुरुंचा आशिर्वाद घेऊन परत गेला आणि तन मन प्राणाने भगवंताचा सेवेत लागला. त्याची अभिलाषा परिपूर्ण झाली आणि भगवंताची असीम कृपा त्याच्यावर होऊन त्याला साक्षात स्वरुप दर्शन झाले. जुम्माशाह खरोखर धन्य झाला.

हे गांगाजी ! सद्गुरुंच्या संगतीत बसून प्रभू मिलनाचा हा मंगल प्रसंग न्याहाळण्याचा योग घडून आला. हे तर ज्याचे नशिब जागते त्यासच दर्शन करण्याचा योग प्राप्त होतो. बाकी तर या दुनियेत भुलून पडलेले अन्यत्र भटकत असतात यात संदेह नाही.

४) गंगासिंह गोहिलवर सद्गुरु इमामशाहांची करुणा

चितोडगढमे नायाजी चेताये, गंगासिंह गोहिलको जगाये ।।
दिये उपदेश हरिस्मरण करै हो, दरश चाहे गुजरातमें जै हो ।।
स्नेही सुभागी खोजत आये, कुकसमें गुरु दर्शन पाये ।।
सद्गुरु संग गुरु महिमा जाने, ताथे दरश हित जै हो पीराने ।।

संत नायाजी पावन पर्यटन करीत असता चितोडगढला गेले होते. त्या समयी त्यांनी गंगासिह गोहिलला उपदेश देऊन सजाग बनविले आणि हरिस्मरणाचा आदेश देऊन तेथून परत फिरु लागले तेव्हा गंगासिहाने विचारलें कीं, 'गुरुदेव ! फिरुन आपले दर्शन केव्हा होईल ?' संत नायाजीने समजावीले 'बाळा ! जेव्हा तुझ्या हृदयात दर्शनाची भावना प्रगट होईल तेव्हा गुजराथमध्ये ये. तुला सद्गुरुंचे दर्शन प्राप्त होईल व तुझे सारे मनोरथ पूर्ण होतील,' असे सांगून ते चितोडगढहून परत फिरले.

कित्येक वर्षांनी त्या भाग्यशाली राजपूताचे भाग्य जागले. त्याच्या हृदयात सद्गुरु दर्शनाची भावना जागृत झाली व तो चितोडगढहून निघाला गुजराथमध्ये आला. तपास करुन कुकसच्या संत धामामध्ये दाखल झाला. सद्गुरुंचे दर्शन घडले. त्या समयी सद्गुरु नायाजींनी आपल्या सद्गुरुंचा महिमा वर्णन करुन सांगितला तेव्हां सद्गुरु इमामशाहांच्या दर्शनाची अभिलाषा त्याच्या मनात जागृत झाली म्हणून तो पीराण्यास आला.

पीर इमाम नही पाय दिदारा, सायाजी कर गये प्रयाणा ।।
बैठे रैन सुमीरे गुरु पीरा, आधी रेन आये गुणगंभीरा ।।
पाय दिदार ताहीको पै हो, गांगाजी गुरु चरण ग्रहै हो ।।
सायाजी मै परम सुभागा, सुफळ भये मेरा अनुरागा ।।

गंगासिंह पीराण्यास आला आणि पाहतो तर आपण ज्यांच्या दर्शना करिता आलो होतो ते महापुरुष तर समाधीस्त झालेले आहेत. मनोभंग झालेला गंगासिंह सद्गुरुंच्या ध्यानास बसला. खरी प्रेमलागणी होती. बरोबर मध्यरात्रीस सद्गुरु इमामशाह महाराज आले आणि त्यांनी गंगासिंहास दर्शन दिले. त्या भाग्यशाली सद्भक्ताने सद्गुरु चरण पकडलें आणि म्हणाला 'हे नाथ! माझा अनुराग खरा होता. म्हणून आपले दर्शन घडले. मी खरोखरच भाग्यशाली झालो.

प्रगट मोहे मिल गये पीराना, मिट गये मेरा आवागवाना ।।
दयानिधी मोपे किरपा करै हो, गुरु लीलामृत दीनको दें हो ।।
चाहत तोही तोहे मिली जावे, गांगा तोहे सब कुछ पावे ।।
आशिष दिन्ह गुरु कृपानिधाना, छीनमे हो गये अंतरधाना ।।

'मला प्रगट सद्गुरु इमामशाहा मिळाले. माझा आवागमनाचा फेरा मिटला. हे दयानिधी माझ्यावर करुणा करुन मला आपल्या विशुध्द लीलामृताचे दान द्या.' अशा रीतीने गंगासिहाने सद्गुरुस आपल्या विमल चरित्राचे दान मागितले. त्याच्या या अलौकिक याचनेने प्रसन्न होऊन सद्गुरुसही आश्चर्य वाटले. विस्मयाने ते म्हणाले, 'गंगासिंह! तू आपल्या गुरुची तन मन प्राणाने सेवा कर तुला जे पाहिजे आहे ते त्यांच्या प्रसादाने प्राप्त होईल.' असे म्हणून त्याच्या शिरावर आपला वरदहस्त स्थापून सद्गुरु अंतर्धान पावले.

आनंद उरमे अधिक छवाये, हरख भरे गुरुके घर आये ।।
नायाजी मुख दर्शन देखी, गुरुजी मेरी गती सब पेखी ।।
पीव पाया गंगाधर आया, धन्य हो मेरी सुफळ कमाया ।।
सद्गुरु लीलामृत मागा, धन्य धन्य तेरो अनुरागा ।।

गंगासिहाच्या हृदयात अपार आंनद झाला. स्वतःतो सद्गुरुंच्या दर्शनाने धन्य बनून गेला होता. ज्या कार्याकरिता आलेला होता तो फेरा सफळ झाला. अत्यंत विनयाने गुरुजींच्या धामात जाऊन झुकून निरोप मागितला व मार्गाला लागला. पर्यटन करीत करीत गुरुच्या धामावर कुकसला येऊन पोहोचला. सद्गुरु नायाजींनी त्याचे हसतमुख निरखून समजून गेले कीं गांगाजीने जे पाहिजे ते प्राप्त करुन आणले आहे. ते म्हणाले, 'गंगाजी आज तुझे जन्माचे सार्थक झाले तू दुसरे कांहीच न मागता सद्गुरु लीलामृत मागितले यावरुन तुझे प्रेम खरोखर धन्यतेस पात्र आहे.' सद्गुरुंनी मुक्तकंठाने त्याचे यशोगान केले ते ऐकताच गंगासिंह म्हणाला –

गुरुजी पूरण करो अभिलाषा, गुरु लीलामृत पीवनकी आशा ।।
समय पाय अमीरस पै हो, गंगा तोहे सुख शांति मिलै हो ।।

'गुरुदेव मला तर सद्गुरु लीलामृत – गुरुदेवांचे पावन चरित्राचे पान करायचे आहे. मला ही गुरुलीला ऐकवा.' गंगासिंह विनवू लागला.

'गंगासिह, तुझी ही इच्छा जरुर पूर्ण होईल. समय प्राप्त झाल्यावर तुझी ही लीलामृत श्रवणाची अभिलाषा मी तृप्त करीन त्यायोगे तुझ्या हृदयात सुख व शांति प्राप्त होईल.' असे म्हणून सदगुरु नायांनी गंगासिहास दृढ आश्वासन दिले.

५) मानसींगजी महिडाच्या शंकेचे समाधान.

महीकाठासे मानसंग आये, महिडा मुखसे बेन सुनाये ।।
साया लोग कहे मुखबानी, इमामसे मत मिली हो ज्ञानी ।।
मोमिनको नही मुरीद बनावे, हिंदवाको वे दीनमे लाये ।।
अैसी तरकीब कीयेरी साई, तामे आपनी बडी ठकुराई ।।

महीकाठाहून मानसंगजी महिडा नावाचा राजपूत सद्‌गुरुंच्या दर्शनास आला. विनयाने शिर झुकवून चरणाजवळ बसला. नंतर हळूच अंतःकरणातील वेदना व्यक्त करित म्हणाला, 'स्वामीजी, आपल्या विषयी लोकांमध्ये अशी वदंता ऐकू येते की पीर इमामशाह मोमीनलां शिष्य बनवत नाही फक्त हिंदुनाच शिष्य बनवून त्यांना 'दीन' चा बंदा बनवतात. जर तुम्ही खरोखर अशा गोष्टींना प्राधान्य देऊन स्वतःस मोठे समजत असाल तर त्यात कांहीच भलाई नाही.'

कोन हिंदु कोन मुसलमाना, साहिब घर आये मेहेमाना ।।
साच पेखो ओर हक बखानो, सोही साईके बने दीलजानो ।।
हिंदवा सोही इमान बखाने, हिंदवा रहे सोही गुणखाने ।।
जात पात साया घर नाही, भेद अभेद दिखे कबु नाही ।।

'मानसंगजी ! तुम्ही जी गोष्ट सांगतात ती कदाचित बरोबर असेल पण मला हे नाही समजत कीं, हिंदु कोण आणि मुसलमान कोण ? भगवंताने बनविलेल्या या दुनियेत आपण सर्वच मेहेमान आहोत. येथे राहुन सत्याला ओळखा. ईश्वरनामाचे स्मरण करा. अशीच माणसे ईश्वराचे अत्यंत आवडते दीलजान बनतात. बाकी जे हिंदु आहेत ते आपल्या स्वधर्माचे आचरण करुन आपले हिंदुत्व कायम राखतात. माझ्या उपदेशाने ते कांही मुसलमान होत नाहीत. असा जाती जातीचा भेद तर लोकांनी निर्माण केला आहे. पण ईश्वराच्या दरबारात असा कोणताच भेद नाही.

हम तो नामसे नाता बखाने, चाहे कोऊ माने नही माने ।।
पीर इमामको साच बखाना, मानसंग बुझे गुणवाना ।।
योगामृत गुरुकी बानी, समझ लहे कोई विरला ज्ञानी ।।
नाया गुरुके यही उपदेशा, नाम सुमीरे कटे भवक्लेशा ।।

आम्ही तर नामाशी स्नेह जोडणारे आहोत. आम्ही हाच उपदेश देतो की तुम्ही या भगवंताच्या नांवाशी आपले नाते जोडा. आमचा हा उपदेश भलेही ज्यांना पसंत नसेल त्यांनी

वाटले तर मानू नये परंतु जे खरे आहे सत्य आहे तेच आम्ही उपदेशिले आहे. मानसंगजी जो गुणवान असतो तो समजू शकतो. योगीयांची अमृतवाणी ज्ञानीजनच समजतात. दुसऱ्यास त्यांची गोडी नसते.'

नायाजी सांगतात की गुरुचा उपदेश हाच आहे की तुम्ही उठता बसता निजता खातापिता काम करतांना भगवंताचे नामस्मरण कधीही विसरु नका. भगवंताशी नामस्मरणाने नाते जोडा. तो या भव सागरातील दारुण क्लेशातून तुम्हाला सोडविल. सदगुरुंचा उपदेश श्रवण करुन मानसंगजी शांतचित्ताने आपल्या मनातील शंकेचे समाधान करुन घेऊन माघारी परत फिरला.

६) सद्‌गुरु इमामशाहांचा दरबार.

नैन दिखे सद्‌गुरु दरबारा, गांगा मैं जावुं बलिहारा ।।
हिंदु मुसलमाँ दोनो आवे, सुनी उपदेश विमल हो जाये ।।
बडे योगी मुनि गुणवाना, आय खडे गुरुधाम निधाना ।।
साहिब सबका करे सन्माना, योगी जन लगे दिलजाना ।।

सद्‌गुरु इमामशाहांचा दरबार या डोळ्यांनी पाहून मी धन्य झालो हे गांगाजी, मी स्वतः त्यांच्यावरुन ओवाळून घेईन अशा प्रकारचा तो दरबार खरोखर अवर्णनीयच होता. त्यांत हिंदु मुसलमान सर्वच जातीचे धर्माचे वर्णाचे लोक येऊन सद्‌गुरु सन्मुख बसून अमृततुल्य उपदेश ऐकून विशुध्द अंतःकरण रुप बनून जात. मोठे मोठे योगीजन मुनिवर येत सद्‌गुरुंच्या धामावर येऊन शांतीने बसून जात. सद्‌गुरु महाराज अतिथी अभ्यागतांचा स्वागत सन्मान करीत आणि ते महा पुरुष योगीजन सद्‌गुरुजींना प्रिय लागत असत कारण त्यांच्यात त्यांचा खरा अनुराग होता. अतःकरणापासून ते त्यांच्यावर प्रेम करीत.

कितने योगी आयके गैया, याद रही ओर बाते भुलैया ।।
सुनो योगी कुछ नाम बखानी, अडबंगनाथ योगी गुणखानी ।।
सतानंद अरु रसिकनाथा, जान्हवीदास अरु मकरनाथा ।।
हारितनाथ दिगंबर दासा, बहुरी योगी जन आये अवाशा ।।

असे तर कित्येक योगी-मुनिगण आले आणि गेले. त्यांच्या नावांची आठवण तर आता विस्मृत होत आली तरी पण जी नांवे आठवणीत राहिली त्यांच्या पैकी योगी अडबंगनाथ महान होते. तसेच योगी सतानंदजी, योगी रसिकनाथ, योगी जान्हवीदास, योगी मकरनाथ, योगी हारितनाथ, योगी दिगंबरदास असे कित्येक सतपुरुष-महानयोगीश्वर संत धामावर येऊन गेले आणि त्यांच्या समागमाची वेगळीच झलक दिसून आली. त्यांची परमपावक चरित्रे श्रवण करताच सद्‌गुरु इमामशाहांच्या हृदयात अपरिमित आनंद होऊन अनुराग दाटुन आला.

ज्ञानी जन बैठे उमंगा, लगे मोज पावे सत्संगा ।।
जात बरन कछु भेदानही, साहिब जात अजात लिखहि ।।
सबसे लिखावे अेक निमाई, नाम जपो मुखसे मेरे भाई ।।
जीक्र बखानो जीक्र बखानो, जीक्र बिना तुम सबही अजानो ।।

ज्ञानी पुरुष अति उत्साहाने येऊन बसत आणि संत समागमाची मौज अनुभवून प्रेमाने मग्न होऊन जात. तेथे जात पर जातीचे कांही बंधनच नव्हते. ईश्वर अजात आहे. त्याच्या घरी कोणी उच्च निच नाही, कोणी लहान मोठा नाही. केवळ एकच गोष्ट महान आहे आणि ती म्हणजे 'एकमेव ईश्वराचे स्मरण' हया शिवाय दुसरी कोणतीही गोष्ट महान नाही. सर्व उपाधींचा त्याग करुन तुम्ही ईश्वराची निर्मल विशुध्द अंतःकरणाने भक्ती करा. त्या शिवाय कधीही तुमचा उध्दार होण्यासारखा नाही. त्या ईश्वराच्या प्रेमभक्तीशिवाय खरोखर तुम्ही जीवनाची बाजी हरुन जाल. म्हणून वादविवाद, तर्क कुतर्क सोडून भक्ति करा. भगवंताची जीकीर करा. खरी गोष्ट ही आहे की भगवंताशी अजाण बनून राहू नका. त्याला नित्य ओळखा.

मेरे साईको ज्ञीक्र पियारी, ज्ञीक्रसे तुमी रखलो यारी ।।
आतुर चेत सजाग बनाया, गाफिल नर खस्ता खूब खाया ।।
भवाटवीमे भटकत भुंडे, जीवन जीवे लबाड अरु लुंडे ।।
सतकी राह जाहिको पाई, ताकी मानो सुफल कमाई ।।

माझ्या स्वामीला भक्तीच प्रीय आहे. म्हणून तुम्हाला वारंवार सांगतो कीं तुम्ही या जीकीरीने भक्तीशी स्नेह करा. त्याच्या वर अपरंपार प्रिती करा. चतुर–समजदार मनुष्य एवढ्याशा गोष्टीवरुन जागृत बनतो पण जे गाफिल असतात ते तर अनेक खस्ते खात खात भटकत राहातात या भवाटवीत असे लोक डुकरा प्रमाणे भटकतात लुच्च्या व लबाडयाप्रमाणे भटकतात. आणि ज्यांनी हा सत्याचा मार्ग स्विकारलेला असतो व त्यानुसार जो क्रियमाण करतो त्यांचे जन्मकर्म सफळ होत असते. ते लोक खरोखर दुनियेत येऊन सफळ झाले असे समजावे.

मानुषतन दुर्लभ पावा, बेर जन्म नहि आवा ।।
ज्ञानी जन यही गति बखाने, अज्ञानी शिर कटे अभिमाने ।।
बडे फकिरा मौलवी आये, काजी उलेमा पीरको पिछनाये ।।
जाके उरमे जगे बडाई, ताथे दूर रहे पाक पीराई ।।

हा मानव देह फार दुर्लभ आहे. तो वारंवार मिळू शकत नाही. ज्ञानी पुरुष ही गोष्ट मान्य करतात पण जे अज्ञानी असतात ते मात्र कोठेही डोके लावून स्वतःच्या अभिमानाच्या गोष्टी पुढे करतात. अशा अभिमानाच्या गोष्टी करणारे बरेचसे येऊन गेले मोठे मोठे फकीर, मौलवी साहेब आणि काजी उलमा वगैरे अनेक जण आले आणि सद्गुरु इमामशाहांच्या सान्निध्यात बसून त्यांच्या अगम्य गतीचे अवलोकन करुन निरभिमानी होऊन वंदन करुन परत फिरले.

लालुशाह अरु रहमानशाही, तुगलक शाहीकी दिखे पीराई ।।
जादु मंत्रका जोर कहा हे, प्रगट पीराना बैठे जहा हे ।।
नथ्थन जोगी अरु हुबलसेना, ताको इलम दिखे नीज नैना ।।
आखिर साईके आगे झुकैया, जुठे इलम ता दिन तजैया ।।

कित्येक तर असेही लोक आले की ज्यांचा स्वतःच्या इलमवर पूर्ण विश्वास होता व त्याबळावर आपण इमामशाहांची कसोटी पाहू या उद्देशाने ते सद्गुरुंच्या समोर आले. त्यांनी आपल्या मंत्र बलाचा उपयोगही केला पण जेथे पवित्र पीराना विराजमान आहे तेथे या चरपट चेटूक मंत्राचे काय बळ चालणार आहे. तरी सुध्दां स्वतःच्या विद्याबलाभिमानाने ते पुढे झाले त्यांत नथ्थन जोगी, हुबलसेन वगैरे मुख्य होते. ते फार जोरावर येऊन सद्गुरु महाराजावर आपल्या इलम-विद्येचा प्रयोग करुं लागले. पण सद्गुरुवर त्यांच्या विद्येचा काहीच परिणाम होत नव्हता. बरीच खटपट करुन सुध्दां कांही उपयोग होत नाही असे पाहून ते सर्वजण खजिल झाले दीनतेने ते सर्व सद्गुरु चरणावर लीन झाले आणि जीवनात फिरुन असे कांही मलिन काम करणार नाही अशी शपथ घेऊन शुध्दमतिचे बनून त्यांचे सेवक झाले.

परचा बहुत गुरुदेव पीराके, कोन लिखे अरु कोन कहा के ।।
जीसको गम गुरुकी आवे, लीलामृत सोही जन पावे ।।
पीर फकीरका यही दरबारा, ताको कैसे लह हू पारा ।।
नायाजी विमल यश गावे, गांगा गुरु चरण सुख पावे ।।

सद्गुरु इमामशाहांच्या चरित्राचा पार लागूच शकणार नाही. तसेच कोणीही त्यांची यथार्थ नोंद करु शकणार नाही. कोण कोठून आला आणि त्याचे उलट काम झाले असे त्यांच्या दरबारात एकही उदाहरण नाही ज्याच्या जवळ गुरुगम आहे त्या त्या सर्वांचे कार्य अपार असिम गुरुकृपेने पार पडलेले आहे. हा तर पीर फकिराचा दरबार होता. त्याचा कोणीही पार पाऊ शकेल असे नाही. नायाजी विशुध्द अंतःकरणाने सद्गुरुंचे यशोगान गात आहेत. अशाच रीतीने गांगाजी सद्गुरु चरणी लीन होऊन खरी शांति अनुभवीत आहे. सद्गुरु चरणासमान अखंड सुखाचा आस्वाद कोठेही प्राप्तहोत नाही.

७) सद्गुरु इमामशाह आणि सुलतान महेमुद बेगडा.

अेक दिन शाह महेमुद आये, बैठे पीराना शिर झुकाये ।।
कहोजी कैसे आवन हुवा, हमरे मनका संशय खुवा ।।
पीराना पुछु अेक बाते, दीन को देख क्यो मुंह फिराते ।।
हिंदवाको मुरीद बनावो, दीन से अैसो कांहे अभावो ।।

एके दिवशी अहमदाबादहून सुलतान मेहेमुदाचे आगमन झाले. गुरुजींच्या चरणावर झुकून खाली बसला. सद्गुरुंनी विचारले 'पातशाह! आपले आगमन कशाकरीता झाले, हे समजेल तर माझ्या मनाचा संशय दूर होईल.' सुलतान म्हणाला 'पीराना! आपणास एक प्रश्न विचारायचा आहे. तो असा कीं, तुम्ही 'दीन'च्या बंधाविषयी तोंड कां फिरविता तुम्ही केवळ हिंदुनाच शिष्य बनवितात पण मुसलमानांना जवळ सुध्दा बसू देत नाहीत. मला ही गोष्ट फार खटकते. तुमच्या हृदयांत 'दीन' च्या बंधाविषयी असा अभाव कां उत्पन्न होतो?'

असली बात हो गई मुलताना, ता दिन प्रतिज्ञा कीनी दिलजाना ।।
में हिंदवाका होई रहवुं, मोमिनको मुरीद नाही बनाऊ ।।
सुनो शाह प्रतिज्ञा मेरी, ताको कबहु न भंग हुवेरी ।।
फकीरा अपनी राह चलैया, शाह काहे को पुछन अैया ।।

'खरी गोष्ट अशी आहे कीं मुलतानला मी प्रतिज्ञा केलेली आहे की आजपासून मी कधीही मुसलमानांना शिष्य बनविणार नाही केवळ हिंदुच माझे शिष्य होतील. मी हिंदुंनाच उपदेश करीन. या प्रतिज्ञेनुसार मी पालन करीत आहे. माझी ही प्रतिज्ञा कधीच भंग होणार नाही. पण सुलतानजी आपणास या बाबतीत काय अडचण आहे? फकीर आपल्या रस्त्याने जात आहे त्यास आपण कां म्हणून या बाबतीत शाहानिशा करुन-हटकून विचारपूस करीत आहांत?

सारे शहरमें चर्चा होवे, नाम आपका बहुरी बीगोये ।।
शोचा यह कैसी है बानी, जाई बुझे पीरा गुणखाणी ।।
ताथे साई कदमोमे आये, पुछे बात अरुभेद बुझाये ।।
सायाजी कुछ रहम करै हो, दीन से मुंह कब हु न फिरैयो ।।

सुलतान महेमुद म्हणाले, 'हे सायाजी! साऱ्या शहरात चर्चेचा विषय झाला आहे. लोक आपल्या नांवाला कलंकित करीत आहेत. आणि जेव्हा पासून मी आपली निंदा ऐकली तेव्हा पासून हृदयात एक व्यथा जागृत झाली की हा काय अपप्रचार होत आहे. पीर इमाम विषयी लोक हा काय निंदास्पद अपप्रचार करीत आहेत. जो पर्यंत खरी हकिकत समजू शकणार नाही तो पर्यंत मन स्वस्थ होणार नाही. म्हणून आपल्याकडे आलो आहे आणि खरी गोष्ट समजावून घ्यायची आहे म्हणजे माझ्या मनातील शंका दूर होईल. शाह साहेब माझी तुम्हाला एक प्रार्थना आहे की तुम्ही 'दीन' पासून कधीही मुख फिरवू नका. एवढी कृपा तर जरुर करावी लागेल'

पतशाह लगेरी अचरज बानी, दीनसे न्यारे नही अजानी ।।
फिरभी मुरीद दीनको नही चाहु, माथे मेरी लगे तौ बाहु ।।
क्या करे हम शब्दके मारे, पीराना जिस मुख उचारे ।।
आखिर दमतक याद रखैयो, हिंदवा मेरा में हिंदवा कहैयो ।।

' पातशाह ! आपण जे बोलत आहांत त्यावरुन मला आश्चर्य वाटत आहे कीं, आपण हे काय सांगतात. मी 'दीन' शी मुख फिरविलेले नाही. सदासर्वदा 'दीन' चाच बनून राहिलेलो आहे. आपण म्हणतात कीं मी दीन पासून वेगळा बनून वागत आहे हे बरोबर नाही. हां, एक गोष्ट मात्र नक्की आहे की मी 'दीनजनांना' म्हणजे मुसलमानांना शिष्य बनण्यासाठी साफ इन्कार करतो आणि म्हणूनच माझी निंदा होत असेल आणि 'दीन' चे लोक मला गुन्हेगार म्हणून ओळखत असतील तर ती त्यांची चूक आहे. एकदा मी वचनबध्द झालेलो आहे. मी शब्दाला मान देणारा आहे, कारण वाणी वारंवार बदलायची नसते. शब्द हे ब्रह्म आहे त्या शब्दांचे पालन करणे माझे कर्तव्य आहे. सर्व 'दीन' जरी माझ्या विरुध्द उठला तरी माझा शब्द ब्रह्म माझे रक्षण करणारा आहे. कारण मी त्याचे यथार्थतेने पालन केलेले आहे. शेवटच्या दमापर्यंत मी त्याचे पालन करणार. हिंदु माझे आहेत आणि मी हिंदुचा आहे म्हणून मला हिंदु रुपानेच का ओळखीत नाहीत अथवा ओळखायला लावा. माझा निश्चय तिळमात्र ढळणार नाही. ' दीन ' ला माझा लेशमात्र इन्कार नाही.

मतवाला बनी रहो साई, मोहे लगे नहि लेश जुदाई ॥
लोगनको जैसी दरशाये, समझ पाय सोही बाते बताये ॥
हम तों साई दिखे शाहनूरों, कायम कदमोमें रहुं हुं हजुरा ॥
मिलन पीराना शांती पाई, गांगाको गुरु ज्ञान लिखाई ॥

सद्गुरु इमामशाहांचे हे स्पष्ट वचन श्रवण करताच सुलतान खरोखर शांत झाला. त्याच्या हृदयात जो कांही भेद होता तो संशय मिटला व त्यास समाधान झाले. तो म्हणाला 'हे साई, तुम्ही निर्भय होऊन आत्मानंदात निमग्न होऊन राहा. मला तर आपले विरोधी लोक जी आपली विटंबना करीत होते ते ऐकून सहन होत नव्हते. म्हणून सत्य जाणून घेण्याकरितां मी आलो माझ्या मनाचे समाधान झाले. आपण आपले कार्य जोमाने करा. विरोधकांची शक्ति आपणास नेस्तनाबूद करु शकेल येथ पर्यंत पोहोचू शकणारच नाही. त्यांना एवढी समज येऊच शकणार नाही. ते खुशाल तशा गोष्टी करोत पण शाहसाहेब मला खरोखर आपले दिव्यतेजस्वी–नूर स्वरुप पाहून आपल्या चरणापासून वेगळे होण्यास मनच होत नाही. सदैव आपल्या चरणींच लीन राहावे अशी माझी भावना आहे. आपल्या मीलनाने माझ्या हृदयात खरी शांति प्राप्त झाली. माझ्या हृदयात जो एक नासमजपणाचा अंश होता, तो आता पार निघून गेला आहे.' असे म्हणून विनयाने झुकून पातशाह महेमूद परत फिरला. या प्रसंगाचे वर्णन करीत असता संत नायाजींचा पट्टशिष्य गंगासिह गोहिल म्हणतो की हा प्रसंग मला माझ्या सद्गुरु नायाजींनी कथन करुन सांगितला आणि त्या आधाराने मी त्या प्रसंगाचे वर्णन करीत आहे.

८) संत इमामशाह आणि संत निर्वाण साहेबांचा समागम.

संत निर्वाणसाहेब मारवाडच्या जायल गुरुद्वाराहून वि. स. १५३७ मध्ये सुरतला आले. सुरतच्या नखरेबाज नबाबीच्या मदाचे मर्दन करुन नबाबी महालयासमोरील पटांगणात आपले

विशाल स्थान बनविले. या महापुरुषाने अनेक प्रकारच्या जुलूमांशी सामना करुन अंत केला आणि जनतेत खऱ्या शांतीची स्थापना केली.

पीर फकीर दिदारसे, लगी निरबानको प्रीत ।।
बडे समदर्शी साध जो, रखे संतनकी रीत ।।
—निर्वाण चरित्र प्रकाश.

संत, योगी, पीर, फकिर वलींच्या दर्शनाचे निर्वाणसाहेब अनुरागी होते म्हणून त्यांच्या दर्शनाकरिता ते दूर दूरपर्यंत पर्यटन करुन त्या महा पुरुषांचा समागम प्राप्त करीत. निर्वाणसाहेब बऱ्याच वेळा तीर्थाटनाला गेले होते. त्यासमयी पीर आणि वलींच्या मंगल मीलनाची नोंद प्राप्त होते येथे त्या पावन प्रसंगामधून सद्गुरु इमामशाहांशी त्यांचा समागम घडला त्या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

सुफी संत इमामशाहांचे मुलतान कडून आगमन झाले. गुजराथ मध्ये आल्यानंतर अहमदाबादच्या सुलतान महेमूद बेगडयाने त्यांची कसोटी केली. खऱ्या सोन्या प्रमाणे या महापुरुषास जनतेने ओळखले आणि त्या प्रभावाचा सुगंध चहुबाजूस पसरला.

मूलतानसे आइया, हजरत इमामशाह ।।
सोही सुफीयनके ढंगसे, लोगनको बडो चाह ।। १
अैसे वली दीदार के, बडे आशिक निर्बान ।।
अमदाबादमे शाहसे, मिलन हुवे दिलजान ।। २

संत निर्वाण साहेब अहमदाबादला आले तेव्हां प्रथम हजरत शाहआलमच्या दर्शनास गेले. त्यांच्या समागमानंतर सद्गुरु इमामशाहांच्या दर्शनाची उत्कंठा लागली. इमामशाहांचे विचार व आचार शुध्द पवित्र जाणून व त्यांची ज्ञानदानाची अगाध शैली जाणून लोक त्यांना वली या या महापुरुष रुपानेच ओळखत असत त्यांच्या या गुणामुळेच निर्वाण साहेब त्यांच्या दर्शनास पीराणा येथे गेले. उभय महापुरुषांचे मंगल मीलन झाले.

सोबत बैठे साधकी, उरमें बडो उमंग ।।
हजरतशाह इमामको, रखे जीक्रको रंग ।। ३
परहित पेखे साइया, आये भोम गुजरात ।।
साहिबको मत भुलीयो, बंदगी करो दिनरात ।। ४
सुफी अपने ढंगमे, साधु रहो मस्तान ।।
दोनो जीक्र बखानते, साहिबको दिलजान ।। ५

ज्याने एकाग्रतेने भगवंताची भक्ती केली, जीकीरीने अत्यंत कळकळीने भगवंताशी रंग लावला होता अशा सद्गुरु इमामशाहांना मिळण्यासाठी अत्यंत उस्हसित अंतःकरणाने संत निर्वाण

साहेब आले होते. आगंतुक प्रभावी संत पुरुषाच्या आगमनाने सद्‌गुरु सुध्दा अत्यंत उल्हसित झाले होते. दोघेही महापुरुष अत्यंत प्रेमाने व आनंदाने एकत्र बसले. सद्‌गुरु महाराज स्वतः परहितकारी परोपकाराकरिताच केवळ पर्यटन करीत करीत गुजराथ मध्यें आले आणि लोकांना उपदेश देत होते की तुम्ही ईश्वराला कधीही विसरु नका. रात्रंदिवस त्याचे नामस्करण व भक्ति करा अशा रीतीने सद्‌गुरु आपल्या परीने व साधु निर्वाण साहेब मस्त दशेत येऊन हाच उपदेश करीत होते. अशा रीतीने उभय महापुरुष एकाच भगवंताच्या भक्तीत तल्लीन होऊन एकाच भक्तीमार्गाचा उपदेश करीत असता आता एकत्र मिळाले होते.

शाहको बानी कही, सुनो साई निर्बान ।।
तुम्ही हो प्यारे रामके, हम प्यारे रहमान ।। ६
अे दुनिया हे साईकी, सिरजनहार हे अेक ।।
न्यारे नामसे भुल गये, हम तुम दोनो बिवेक ।। ७
सबका साहिब अेक हे, दो साहिब मत मान ।।
दोनोमें दुनिया डुबी, शिर कुटे अजान ।। ८
फकिरीसे यारी लगी, फक्कड लगे निर्बान ।।
दिख साधु जौहरी, दिल लगे दिलचान ।। ९

सद्‌गुरु इमामशाह म्हणाले 'संत निर्वाणजी आपण रामाचे चाहते आहांत म्हणून रामावर प्रेम करतात, कोणी कृष्णाचे चाहते असतात ते कृष्णावर प्रेम करतात, कोणी रहमानचे चाहक असतात ते रहमानवर प्रेम करतात. परंतु दुनियेला उत्पन्न करणारा एकच सांई, ईश्वर, खुदा आहे. लोक त्यासच वेगवेगळ्या नांवाने हाक मारतात आणि असे समजतात मी ज्या नांवाने हाक मारली तोच खरा ईश्वर आहे. अशारीतीने माझा तुमचा आणि या अलम दुनियेचा झगडा चाललेला आहे. या जगताची विवेक बुध्दीच द्वैती बनलेली आहे. दोघांचा मालक एक, दोन कधीहि नव्हते, नाही व असणारही नाही, तरीपण प्रत्येक व्यक्ति आपापल्या समजप्रमाणे भगवंताला अलग अलग समजून अज्ञानपणाने माथाकुट करतात, अशा मार्ग चुकलेल्यांना आपण सत्य मार्गदर्शन करुन मार्गावर आणतात, आणि हे कार्य करीत असता एका फकिराशी आपला एवढा अनुराग जागला ही खूपच आनंदाची गोष्ट आहे. निर्वाणजी ! आपण फक्कड दरवेशाप्रमाणे फिरुन साधुच्या स्वांगाने एक जौहरी–जव्हेरी रुप आणि महान संत पुरुष आहांत. खरोखर मला आपण माझे दिलजान - सहृदय लागतात. आपणाला पाहताच माझ्या हृदयात अपार प्रेम सागर दाटून येतो. पूर्वजन्माचे संबंध जागृत होतात.

करामतीके ढंगकी, जाको बडी पहेचान ।।
सोही करामती आ गये, नैन दिखे निर्बान ।। १०
हमको फकीरा साईके, जहा चेतावन आय ।।
सोये वाको क्या करे, जागे ताको सगाय ।। ११
सोही साहिबके लाल हे, नाम बुझे निर्बान ।।

बैया पकडके जीवकी, आये उबारन जान ।। १२
बडी खुशाली मिलनकी, निर्बान इमामशाह ।।
हम तुम दोनो अेक हे, दोनोकी अेक राह ।। १३
हम मजहबकी आनमें, फिरते रहे बखान ।।
निःपक्ष न्यारे दिखे, बडे साहिब निर्बान ।। १४

करामती प्रभावी महापुरुषा प्रमाणें जे परिक्षक आहेत अशा करामती पुरुषाचे अचानक आगमन झाले. या डोळयांनी निर्वाण साहेबांना न्याहाळले. मी तर फकीर–ईश्वराचादास. दुनियेला जागविण्याकरितां आलेला त्याचा एक सेवक आहे. जे जागत बसले आहेत त्यांच्याशी आमची प्रेम सगाई आहे, पण ज्यांना वारंवार जागवून सुध्दा घोर निंद्रेत घोरत पडले आहेत त्या अज्ञानी जीवांना काय करावे ? आपण सुध्दां त्याच भगवंताचे लाल आहांत. भगवंताच्या नावाची ओळख करवून, भवसागरात बुडणाऱ्या जीवात्म्यांचा हात धरुन वर काढून त्याचा उध्दार करणारे 'तारणहार' होऊन आलेला आहांत. आपल्या मीलनाने हृदय कसे पुलकित होते. अपार हर्ष होतो. निर्वाण आणि इमामशाह तुम्ही आणि मी एकच आहोत. दोघांचा रस्तापण एकच आहे. मी धर्माच्या पावन प्रचाराचा महत्वाचा भाग बजावित आहे तर आपण अत्यंत निःपक्ष निरपेक्ष रीतीने जगताची सेवा करीत आहांत. तुमच्या जवळ धर्म विषयक कोणताच आग्रहाचा भाग नाही. भगवंताच्या कोणत्याही नामाचा जाप करा. आपण अशा कोणत्याही विशिष्ट आशयाच्या धर्मांच्या अवरणापासून दुर–मुक्त राहुन सेवा करतात म्हणून आपणास 'निर्वाण' साहेब म्हणतात हे योग्य आहे. आपण खूप महान कार्य करीत आहांत.' असे म्हणत इमामशाहांनी निर्वाण साहेबांना आपल्या हृदयाशी लावून गाढ आलिंगन दिले व प्रेमाने त्यांच्या पाठीवरुन, शिरावरुन हात फिरवून धन्यवाद दिले. नंतर दोघांचा बरांच वेळ वार्तालाप सत्संग झाला. सद्गुरु इमामशाहांच्या चरणावर लोंटांगण घालून संत निर्वाण साहेब जाण्या करितां उठले व त्यांनी जड अंतःकरणाने सद्गुरु महाराजाचा निरोप घेतला.

हा पावन प्रसंग आलेखन करणारा ब्राह्मण 'कवि दुलाराम' ने 'निर्वाण चरित्र प्रकाश' नामक ग्रंथात लिहिलेले अंतिम शब्द हृदयात ठसतात. ते म्हणतात की तो दिवस केव्हा उगवेल की असे पीर फकीर आणि महान संत पुरुष वली, योगी, संत महात्म्यांचे दर्शन घडण्याचा योग प्राप्त होईल.

शाहको शीर झुकाइके, सद्गुरु हुवे विदाय ।।
'दुला' अैसा दिन कहाँ, पीर दीदारा पाय ।।

अशा प्रकारचे अनेक पावक प्रसंग सद्गुरु इमामशाहांच्या जीवनात घडून आले. तसेच त्यांच्या पश्चात त्यांच्या संत धामावर वेळो वेळी अनेक दैवी चमत्कारिक प्रसंग घडून आले. पण हे प्रसंग म्हणजे कांहीं त्यांचे जीवन सर्वस्व नव्हते. त्यांनी त्या प्रसंगातून वेळो वेळी सद्भक्तांना जो ज्ञानोपदेश केलेला आहे तोच खरोखर परम पावनकारी, प्रेरणादायी आणि मानवास जीवनाची दिशा दाखविणारा अमृत तुल्य ठेवा आहे. प्रत्येक सत्पंथीयाने आपल्या परम पूजनीय व वंदनीय अशा सद्गुरुंच्या जीवनाचा गाभा जाणून त्यांच्या मार्गदर्शनानुसार आपले जीवन घडविण्याचा प्रयत्न करावा.

२ संत हाजरबेग.

सद्गुरु इमामशाह महाराजांच्या शिष्यवर्गात पाच प्रमुख शिष्य झालेले आहेत. १)-हाजरबेग २) नायकाका ३) भाभाराम ४) कीकीबाई व ५) शाणाकाका ही त्यांची नांवे होत. यांच्या पैकी हाजरबेग हा दिल्लीच्या शाही कुटूंबातील एका प्रमुख दासीचा मुलगा. गुरु इमामशाहांच्या दिल्लीच्या प्रवासा दरम्यान त्यांच्या दैवी शक्तीच्या प्रभावाने प्रभावीत होऊन कुटूंबाचा व सर्व वैभवाचा त्याग करुन त्यांच्या सेवेत आदर पूर्वक भाग घेऊन सेवेत तत्पर राहिला त्याच्या सेवेने प्रसन्न चित्त होऊन 'हाजरबेग' ह्या संबोधनानेच सद्गुरु इमामशाहांनी त्याला. गौरविले. देशाटनात हर हमेशा सोबत राहून त्यांच्या आज्ञेत राहूनच त्याने अखेर पर्यंत सेवा कार्य बजाविले.

कित्येक ठिकाणी असा उल्लेख आढळतो कीं इमामशाह हे इराण मधून येतअसतांना अफगाणिस्तानातील एक सेवक त्यांच्या बरोबर आला तोच हाजरबेग होय. दंतकथेप्रमाणे हा सेवक त्यांच्या सेवेत सदैव फार तत्पर असे म्हणून त्याचे नांव हाजरबेग असे पडले. दुसरे असे कीं, इराणच्या कांही भागात 'हाजरा' नांवाची भटक्या लोकांची टोळी असते, त्यांच्यातील एक इमामशाहावर प्रभावित होऊन तेंथूनच त्यांच्या बरोबर त्यांच्या सेवेत लागला असावा अशी ही वदंता आहे.

सद्गुरु महाराजांच्या समागमाने आणि अविरत सेवा कार्याने प्रसन्न होऊन गुरु महाराजांच्या कृपा प्रसादाने त्यास आत्मज्ञान झाले. अनेक दैवी चमत्कार त्यांच्या कडून घडले. अलौकिक दैवी शक्तीच्या बळाने ते संत पुरुषांच्या मालिकेत जाऊन बसले. सद्गुरु इमामशाहांच्या प्रेरणेने त्यांनी अनेक लोकांना आत्मिकलाभ घडवून दिला. खुद्द स्वतःते भगवंताच्या भक्तीत हमेशा तल्लीन राहात. इमामशाहा महाराजांनी त्यांच्या अंतिम प्रयाण समयी हजारबेगला सांगितले होते की 'माझ्या निर्वाणानंतर तुझा मृत्यू होईल आणि या पीराणा येथील दर्ग्याच्या समोर वीस पावलावरच तुझे दफन होईल. उन्हाळ्यातील भर दुपारच्या वेळी अतिशय उन्हात सुध्दां तुझी कबर थंडच राहील. माझे सर्व अनुयायी सर्व प्रथम तुझ्या कबरेवर पुष्पहार चढवितील

तेव्हाच माझ्या दर्ग्यात प्रवेश करतील.' अशा प्रकारचा आशिर्वाद देऊन सद्गुरु इमामशाहांनी त्यास गौरविले. आणि खरोखर इमामशाहांच्या निर्वाणानंतरच हाजरबेगचे निर्वाण झालेले आहे. सद्गुरुंच्या वरदाना प्रमाणेच हाजरबेगची कबर भर उन्हाळ्यात दुपारच्या तळपत्या उन्हात सुध्दा थंडगारच राहते व सर्व सेवक प्रथम सद्भक्त हजरबेगलाच फुलहार चढवून आंत सद्गुरुंच्या दर्शनास जातात.

हाजरबेगच्या कबरेमधून अद्यापसुध्दां बरेच दैवी चमत्कार अनुभवास येतात. कबरेवर हमेशा गलफ (वस्त्र) घातलेला असतो सत्पंथी अनुयायाशिवाय अन्य लोकांत सुध्दां त्यांचा बराच प्रभाव पसरलेला आहे. कित्येक लोक त्यास हनुमंताचा अवतार समजतात.

Avatar of Hanuman. False.

सद्गुरु इमामशाह महाराजांना बाई बुढाई नांवाची एक बहिण होती. सद्गुरु महाराजांच्या आज्ञेने हाजरबेगने तिला सत्पंथाचे सारे रहस्य समजावून सांगितले. इमामशाहांच्या आज्ञेनेच तिने हाजरबेग कडून दीक्षा घेतली होती. एक विश्वासु धर्मोपदेशक म्हणून सुध्दा हाजरबेगने उत्तम कामगिरी बजाविलेली आहे. हाजरबेग त्या काळातील एक असाधारण कोटीतील प्रभावशाली तत्वनिष्ठ सुफी-संत होते.

सतपंथ घटपाट कलशपूजा विधीच्या माध्यमातून विश्वचक्रचालक सर्व देव देवी देवतांची उपासना, ज्योति स्वरुपाच्या माध्यमातून चिन्मयमूर्ति अविनाशी सत्–चित्–आनंदघन ईश्वराचे ध्यान आणि प्रणव ब्रह्म ॐ काराचे आद्यनारायणाच्या बीजवाचक मंत्राचे सतत स्मरण, युग–धर्मानुसार अवतार पात्र निकलंकी नारायण भगवंताचे स्मरण चिंतन ध्यान व जाप करणे, या सतपंथाच्या प्रमुख तत्वांचे सुंदर विशदीकरण हाजरबेगने बाई बुढाईला कथन करुन सद्गुरु इमामशाहांच्या शिक्षापत्रीचा उपदेश केला. आपल्या भावाचे, नव्हे, आपल्या उध्दारक सद्गुरुचे एवढे अगाध ज्ञान जाणून बाई बुढाई दिङ्मूढ झाली. जीवनाच्या अंतीम क्षणापर्यंत तिने सद्गुरुंची व सतपंथाची तन मन प्राणाने सेवा केली.

धन्य तो हाजरबेग ! व धन्य ते सत्पंथाची सद्भक्त !!
धन्य त्यांची गुरु भक्ति !!!

३ संत नायाकाका महाराज

गुजराथ मधील कानम जिल्हातील 'ठाकरडा' कुळात नायाकाकाचा जन्म झालेला होता. कित्येक लोक त्यास भील्ल-किरात जातीचा समजतात पण कवि बन्सीलालच्या नोंदीत ठाकरडा कोळी म्हणून नोंदलेले आहे. (ठाकरडा कोळी म्हणजे राजपूत पुरुषाने कोळी कन्येशी विवाह करुन झालेल्या संततीस ठाकरडा म्हणतात.) त्याचे बाड वडील लुटमारीचा धंदा करुन निर्वाह करीत. तरुण झालेला नाया सुध्दा परंपरेप्रमाणे लुटमार चोरीचा धंदा करुन आपले व कुटुंबाचे पोषण करी. नाया एवढ्या कठोर हृदयाचा होता की कधीही कोणावरही दया दाखवित नसे. निर्दयतेने लोकांना मारुन, त्यांच्या रक्ताने हात माखणाऱ्या नायाने बऱ्याच अजाण्या वाटसरुंना काळाच्या स्वाधीन करुन यमलोकी पोहचविले होते.

एकदा संवत १५१५ कार्तिक व ॥ १ च्या दिवशी म्हणजे इ. स. १४५८ च्या सुमारास सद्गुरु इमामशाह महाराज आपला परम शिष्य हाजरबेग यास बरोबर घेऊन बैलगाडीने कानम जिल्ह्यातील चांदोद गांवी जाण्यास निघाले. कानमचे निबीड अरण्यातून जात असतांनाच नायाने रस्त्यातच त्यांची गाडी अडविली आणि लुटमार करण्याकरितां सज्ज झाला. सद्गुरु महाराजांनी एकनजर नायाकडे टाकली आणि ते अंतर्यामी समजले की, पूर्वकर्माने दोषीत झालेला हा तर आपलाच मित्र आहे. ठीक आहे, याला आता सरळ मार्गावर आणणे आपले कर्तव्य आहे. असा विचार करुन सद्गुरु त्यास म्हणाले 'नाया! अरे मी तर फकीर आहे. मजजवळ पैसा अडका सोने नाणे वगैरे कांही नाही. पण तुला हवेच असेल आणि खरोखरच धनवान व्हायचे असेल तर तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ती ऐक. तू स्वतः लुटमार करुन तुझे व कुटूंबाचे पोषण करतो पण ते सर्व तुझ्या या पापकर्मात सहभागी आहेत की नाही असे त्यांना तू विचारुन ये. आम्हीं तू येई पर्यंत इथेच थांबतो.'

नाया त्याप्रमाणे घरी विचारण्यास गेला. त्याने आपला बाप पशुर, बहिण गंधोर, मुलगी धीरज, बायको केशर या सर्वांना पापात सहभागी होण्याबद्दल विचारले पण त्या गोष्टीस कोणीच

कबूल झाले नाही. हे पाहून नायाचे हृदय एकदम पालटले. सद्गुरु महाराजाजवळ येऊन त्याने पश्चात्ताप करून हा नीच व्यवसाय सोडण्याबद्दल आणि सद्गुरुंच्या सेवेत दाखल होण्याबद्दल प्रतिज्ञा केली. सद्गुरुंनी त्यास ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. त्याची सर्व आंतरिक स्थितीच पालटली गेली. क्षणात सर्व अज्ञान–अविद्या नष्ट होऊन ज्ञानमय प्रकाश सर्वत्र पसरला. त्याच्या चित्तात आपल्या तरणतारण भक्त उध्दारण सद्गुरुविषयी अनन्यभाव, प्रेम श्रध्दा प्रकट झाली. एका पदात तो म्हणतो. –

नाया कहत मोहे सतगुरु पाया, अधम लुटेरा को धंध तजाया ॥
सद्गुरु मेरी अखियाँ खोले, जनम जनम मेरे दिखे अमोले ॥ १
मिट गई रेनी भया उजियाला, दिये उपदेश गुरु मतवाला ॥
साहिब नाम संम्हारो प्यारा, राम रहिम मत पेखो न्यारा ॥ २
बहुनामी हे साईया मेरा, दिल चाहच सो नामे किजे सनेहा ॥
योगी - हुई अज्ञ - छिपै - - हो, लोगनके हितकर कहै यो ॥ ३
इमामशाह गुरु मोहे मिलैया, देखत काहे तुम मुख फिरैया ॥
जात बरन मत देखे गुंसाई, नायो कहे मेरा सद्गुरु सांई ॥ ४

ज्ञान–अज्ञान, दर्शन–अदर्शन या दोनही वृत्ती सोडून जे ब्रह्मस्वरुपी लीन राहिलेले असतात ते केवळ ब्रह्मवेत्ता नाही पण साक्षात् ब्रह्मस्वरुप परमात्माच असतात. अशा प्रकारचा अभेदभाव नायाच्या हृदयात जागृत झाला. 'अेक शब्द गुरु देवका, जाका अनंत विचार । धाके मुनिजन पंडिता, वेद न पावे पार ॥' सदगुरुंचा एकच शब्य जर अंतरात उतरला तर मनुष्याचे जीवन धन्य धन्य होते. नायाजींचे सुध्दा असेच झाले. त्याच्या हृदयात सद्गुरु दर्शन व समागमाने आत्मज्योत जागृत झाली. त्याने सद्गुरुंना विनंती केली कीं 'गुरु महाराज, सदैव आपल्या सेवेत राहावे यासाठी मला आपणाबरोबर घेऊन चला.' सद्गुरुंनी सांगितले. 'नाया तू माझ्या बरोबर येऊन काय करशिल ? एक गोष्ट खास लक्षपूर्वक ऐक. तू स्वतः योगी आहेस. तुझ्या मनावर अविद्येचं–अज्ञानाचं जे आवरण होतं ते आता दूर झालेलं आहे. आता तू खऱ्या सोन्याप्रमाणे दैदिप्यमान झाला आहेस. अज्ञान अविद्येचं आवरण फाडून तुझा आत्मसूर्य आता प्रकाशू लागला आहे. आता आपलं खरं कार्य काय आहे हे तूच समजून घे. संत आणि योगी पुरुषांचे प्रागट्य जगताच्या कल्याणाकरिताच होत असते. दुनियेतील दुःख दूर करण्यासाठीच महापुरुष पृथ्वीवर अवतरतात. तू योगी आहेस. माझ्या समागमे येऊन काय उपयोग ! मानव कल्याणाकरितां आणि अत्यंत खडतर अशा भव दुःखातून मनुष्य मात्राला मुक्त करण्याकरितां योगी लोकांनी सतत प्रयत्न करावा. नाया, तुझी हीच कक्षा आहे. स्वतः भानावर ये. जगताला भानावर आण. पूर्ण ब्रह्म अविनाशी सच्चिदानंदाच्या साम्राज्यात स्वतः विचरण कर. अन्य आत्मियांना या मार्गावर आण.

नाया मत ठाढो यहां, जै हो जग चेताय ।।
गाफिल जियरा मनाइयो, सोही हरीयश गाय ।। १
दावानल संसारमें, संत बडे सुख देन ।।
सोही सुभागी जियरा, नाया मिलावही नैन ।। २
यह जग माया मोहिनी, काहु न शके उबार ।।
लाखनमें कोऊ जगही, नाया सोही हमार ।। ३

सद्गुरुंचे शब्द ऐकताच नाया स्वस्थचित्त झाला. त्याच्या हृदयात जे कांही थोडे मायेचे आवरण असेल नसेल ते सर्व दूर निघून गेले. आणि दीनतेने तो सदगुरु चरणावर झुकून लीन झाला.

आज्ञा बडी गुरुदेवकी, नाया करेऊ प्रयाण ।।
दुवा करैं दरवेशषे, जग दुःख होवे हाण ।।

महाराज आपल्या आज्ञेचे परिपालन करण्यासाठी जरुर प्रयाण करीन, मला शुभाशिर्वाद द्या की ज्या योगे दीनदुःखितांचे दुःख निवारण होईल. सद्गुरुंचा आशिर्वाद घेऊन संत नाया कार्याला लागला. घरादाराची योग्य व्यवस्था लावून तो पावन पर्यटन करीत लोक जागृति करु लागला. झोपलेल्यांना जागवीत, भुललेल्यांना मार्ग दाखवित भव पिडीतांची पीडा मिटवीत व जिज्ञासुंना तत्त्वोपदेश करीत करीन नाया सन्मार्गाचा उपदेश, प्रचार व प्रसार करुं लागला.

संत नायाजी एकदा उत्तर गुजराथमधिल पाटण शहरात आाल, तेथे भूमानंद ब्राह्मणाशी गाठ पडली. स्नान करुन ब्राह्मण मंदीरात जात असतांना अचानक नायाजींचा स्पर्श झाला. आवेशात ब्राह्मण कटू शब्दांनी–अपशब्दांनी अद्वातद्वा बोलू लागला. पण नायाने प्रत्युत्तर केले नाही. ब्राह्मणाचे पित्त आणखी खवळले आणि त्याने एक थप्पड नायाजीला मरली. तरीपण संत बिलकुल शांतच राहिला.

खुदीया तो धरती खमे, काट खमे बनराय ।।
कठिण बचन साधु खमे, सरोवर नीर सुकाय ।।

संत पुरुषाची सहनशीलता पाहून ब्राह्मणाचे हृदय दवले आणि गद्गदीत होऊन तो त्यांच्या चरणावर पडला. संत पुरुषाने त्यास हाताने उठवून हृदयाशी लावले. भूमानंद सद्गुरुचां अनन्य भक्त झाला, त्याचे जीवन धन्य झाले.

अशाच प्रकारे पालनपुरला जाऊन संभाजी जाटाला त्यांनी उपदेश केला. लुणावडा येथील उदोजी राणा, राजपिपला येथील राजा पृथुराज, चांपानेर येथील राजा पताई रावळ, धरमपूर येथील राजा जगतसिंह वगैरे अनेक राजे महाराजांच्या गांठी भेटी घेऊन त्यांनी त्या त्या प्रदेशात सत्समागम करुन 'सत्' धर्माचा प्रचार केला. राजवंशीय लोकाप्रमाणेच अनेक गोरगरीब रंजले गांजलेल्यांना आपल्या दैवी आत्मशक्तीच्या बळाने दुःखमुक्त करीत व स्वतः अनंत हाल अपेष्टा सहन करीत संत नायाजी सद्गुरुंच्या आदेशाप्रमाणे हिंडू लागले.

एके दिवशी रात्रीच्या प्रहरी जुनागढ शहरात फिरत असतां तेथील मुसलमान राजा तातारखान घोरी याच्या सैनिकांनी त्यास कोणी सैतान समजून अटक केली. रात्रीच्या वेळी कैद केलेला मनुष्य कोण वगैरेची कोणत्याही प्रकारची विचारपूस तपास न करता तीन महिनेपर्यंत त्यांच्याकडे कोणी लक्ष्यच दिले नाही. मानव कल्याणाच्या मार्गाने चालणारा संत पुरुष अशा प्रकारे धर्म संकटात सांपडला. ईश्वरी लीला समजून संत नायाजीने सुध्दा शांत चित्ताने तिथेच अंधारी कोठडीत बसून ईश्वर चिंतन–स्मरणात वेळ घालविला. बरोबर तीन महिन्याने तातारखानाला झोपेत अत्यंत भयानक स्वप्न पडले. काळाच्या चार दुतांनी त्याला खूप मारले व त्याला जतविलें कीं काळकोठडीत तू एका संत पुरुषाला डांबून ठेवले आहे त्याला मुक्त कर नाही तर तुझा काळ आजच पूरा होईल. ताबडतोब उठून त्याने चौकशी केली. कोठडीत जाऊन संत पुरुषाचे पाय धरले व झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली. संत नायाजीने त्याला खूपच खडसावले व कठोर शब्दात त्याच्या कल्याणाचाच उपदेश देऊन आशिर्वाद दिला. नायाजीने त्याला सांगितले, तातार ! ज्यादिवशी तुझ्या कडून अथवा तुझ्या वंशजाकडून अशा स्वरुपाचा संताचा अपमान होईल त्या दिवशी जूनागढहून तुझी राजगादीच नष्ट होईल. तोपर्यंत तुम्ही सुखाने राज्य कराल. ★

(★ तातारखाननंतर पाच पीढ्यापर्यंत तेथील राजगादी कायम राहिली नंतर इ. स. १५९१ मध्ये अकबराच्या दुध भावाने अजीज कोकाने तेथे स्वारी करुन जुनागढचे-राज्य संपुष्टात आणले.)

संत नायाजी तेथुन पुढे गिरनारवर चढून गेले व तेथे त्यांनी आसन मांडून ध्यानमग्न झाले. पूर्व जन्मात अपूर्ण राहिलेली योग साधना पूर्ण करण्याकरितां आता त्यांना चांगलाच योग प्राप्त झाला. गुरु गेबीनाथांचा त्यांना तिथे समागम झाला. त्यांच्या सान्निध्यात योग साधना करुन प्रभु साक्षात्कार व गुरुदेव दत्तात्रेयांचे दर्शन घडून आले. त्यामुळे नायाजींचे जीवन धन्य झाले. त्यास अलौकिक आनंदाची प्राप्ति झाली. सात वर्षांचा काळ कसा क्षणात निघून गेला तें कोणास समजलेही नाही. शेवटी गुरु गेबीनाथांनी त्यास जागविले व सांगितले नायाजी, सद्गुरुंनी तुझ्या शिरावर जी जबाबदारी सोपविली आहे ती पूर्ण कर.

मानवहित फिरते रहो, यही गुरुको आदेश ।।
साधु तो रमता भला, नाया चलो उस देश ।।
गेबीनाथ गुरु देवजी, दत्त प्रभुकी करुणाय ।
आवत ही गिरनार पे, हरीसे ध्यान लगाय ।।
अपनी शुध बिसर गये, गाफिल मनवा मोर ।
गेबीनाथ गुरुदेवजी, पैया परु कर जोर ।।

अत्यंत दीनतेने गुरु गेबीनाथांच्या चरणी शिर ठेवून नायाजी तेथून पुढे सौराष्ट्रात अन्यत्र विचरण करुं लागले. तेथून कच्छ, भुज, अंजार नंतर सिंधमधून मारवाडला आले. अनेक सद्भक्तांना मार्गदर्शन करुन योगनिपूण केले. तेथून मेवाड, इडर, चितोडगड, कोटा, बुंदेलखंड आदि अनेक स्थळी जाऊन जन कल्याणार्थ पावन पर्यटन केले. तसेच उज्जन, माळवा, महाराष्ट्र खानदेश वगैरे ठिकाणी जाऊन त्यांनी आपले पवित्र कर्तव्य बजाविले.

गुर्जर मरु मेवाडसु कोटा बुंदेलखंड ।
सौराष्ट्र कच्छ अरु सिध्द फिरे चोखंड ।।
फिरे उज्जैन माळवां, महाराष्ट्र खानदेशजी ।
नायाजीको सबहु झुके, बडे अवधूताके भेषजी ।।

संत नायाजी जिथे गेले तेथे त्यांनी परम पावन उपदेश करुन लोकांना युगधर्माची माहिती देऊन वेदान्तीक सिध्दान्तानुसार ईश्वरानुसंधान करण्याचा मार्ग दर्शवीला. ज्या ज्या भाग्यशाली लोकांशी संत नायाजीचा समागम घडला त्या सर्वांचे जीवन धन्य धन्य झाले. त्या सर्वांनी त्यांना गुरुस्थानी मानून त्यांचा अनुग्रह घेतला अशा रीतीने परिपूर्ण पंचविस वर्षपर्यंत आपले हे पर्यटनाचे कार्य करुन संत नायाजी परत गुजराथ मध्ये आले असतां त्यांना सद्‌गुरु इमामशाहांचा समागम घडला.

आपले परम वंदनीय पूज्य सद्‌गुरुनाथ यांचे दर्शन होताच संत नायाजींच्या अंतरंगात परमभक्तीचे द्योतक अष्टभाव जागृत झाले. परमकृपाळू सद्‌गुरुंच्या चरणी सद्‌गद् भावाने शिर ठेवून प्रेमाश्रुंनी त्यांचे चरण धुतले. पूजनीय सद्‌गुरुंनी त्यास आपल्या करकमलांनी उचलून आपल्या हृदयाशी लावले. अनन्य प्रेमाने न्हाऊन निघालेली ती गुरु शिष्याची जोडी तिला जगतात तोड नाही. अगाध प्रेमसागरात संत नायाजी क्षणभर बुडी मारु लागला. २५ वर्षांच्या विरहानंतर त्या गुरु शिष्याचे आज भावमीलन झाले होतें. नायाच्या मुखातून एक शब्द सुध्दा निघत नव्हता इतका तो प्रेम विव्हल झाला होता. शेवटी सद्‌गुरुंनी वाचा फोडली.

सद्‌गुरु कहे नाया सुनो, अब मत फिरो बिदेश ।
बहूरी साल बीत गये, बीत गयो जोबन वेश ।।
तीर्थाटन बहुरी किये, नायाजी पच्चीस सालजी ।
सद्‌गुरुके चरण में, आयके ठाढे मरालजी ।।
मानयहित बहुरी फिरे, ठाढे रहो कुकसमहालजी ।
आतिथ्यधाम बनायके, जनताको किजो न्यालजी ।।

'नायाजी तू सतत पंचवीस वर्षापासून मानव कल्याणाच्या पावनपथाचे विचरण केलेस. आता तर तुला शांत चित्ताने एकाच स्थानी बसण्याची वेळ आलेली आहे. म्हणून आता दुसरीकडे कोठेही न जाता कुकस गांवातच तुझे स्थान बनवून जनतेचे अत्यंत कठिण दुःख सुध्दा दूर करून त्यांना परम सुखी बनव.' सद्‌गुरु इमामशाहांनी आज्ञा करताच अत्यंत विनम्र भावाने नाया सद्‌गुरुचरणी झुकला आणि पुढिल मार्गाला लागला.

विक्रम संवत १५४१ मध्ये म्हणजे इ. स. १४८४ च्या सुमारास संत नायाजीचे कुकस गांवी आगमन झाले. बडोदा जिल्हयातील सिनोर तालुक्यांत कुकस हे गाव आहे. तेथे संत नायाजीचे आगमन होताच तेथील साऱ्या भाविक जनतेने त्यांचा खूप आदराने भव्य सत्कार केला.

तेथील यवनांनी मात्र अनादर दाखवून संत नायाने तेथून निघून जाण्याकरिता बरेच प्रयत्न केले पण संत हृदयाने मात्र कोणावरही रोष न धरता सद्विचार पेरणीचे आपले कार्य चालूच ठेवले, कालांतराने सर्व रोष, दोष वगैरे निघून जाऊन सर्व जण संतचरणाची प्रेमाने, आपुलकीने सेवा करुं लागले. कानम पंचक्रोशीतील आसपासचे सर्वच लोक संत नायाजीच्या सत्संगात आनंद मानू लागले व आपापली हृदये संतासमोर मोकळी करुन जीवनातली सुखदुःखे विदीत करुं लागले. दयानिधी संताने सर्वांचे कल्याण व्हावे या हेतूने प्रत्येकाचे दुःख मिटविण्यासाठी प्रयत्न करुं लागले.

संत नायाजीने जिथे आपले आसन मांडले होते ती वैराण जागा स्मशानभूमी होती. रात्रीच्या वेळी अधोगतीला गेलेले प्रेतात्मे संताच्या आजुबाजूस उपद्रव माजवीत. दयानिधी संताने त्या सर्व दुःखी मृतात्म्यांचा उध्दार केला आणि त्या ठिकाणी विशाल अशा संत धामाची स्थापना केली. जनता जनार्दन हर्षभराने संत धामात येऊन परम शांति प्राप्त करुन घेत असत.

नायाजीके संत धाममे, भक्तोंकी भीड मचे भारे ।।
साधु संत और अतिथी, सबको पावे सत्कारे ।।
भजन भक्तिको रंग मचेरी, भजनानंद मंगलकारे ।।
दूर दूरके यात्रिक आयके, नायाजीकी जय पुकारे ।।

एके दिवशी रात्री संत नायाजी शांत चित्ताने आपल्या असनावर ध्यानमग्न बसलेला असतांना तेथे अचानक सिध्द पुरुष गेबीनाथाचे आगमन झाले. संताचे डोळे एकदम उघडले. गेबीनाथ गुरुदेवाला पाहताच त्वरेने आपल्या आसनावरुन उठून उभा राहिला वत्या महापुरुषाच्या चरणावर झुकला आणि म्हणाला.

' गुरुदेव गिरनार गिरी कंदरात आपण मला योगदीक्षा देऊन धन्य केले. आपली सेवा या देहाकडून पूर्ण होऊ शकली नाही. मला क्षमा करावी. आपण या अभाग्याला सजाग बनवून कर्तव्याभिमूख बनविले पण आपल्या सेवेत मात्र अंतर पडले. परंतु आज माझे भाग्य उदयास आले. इतक्या दिवसातून आज मला आपले दर्शन घडले. आता आपण माझ्याकडून सेवेचा स्वीकार करावा.

सिध्दपुरुष गेबीनाथ म्हणाले, ' नायाजी, पूर्वभवातील तुझे तारक गुरु सोहंनाथ महाराज तुला शोधत तुझ्या जवळच आलेले आहेत. हे तू तुझ्या अंतर्ज्ञानाने जाणत नाहीस कां ? आपल्या सहस्त्रारचक्राचा तो एक कप्पा खोल म्हणजे तुला सारे कांही समजून येईल. ' एवढी सुचना देऊन गुरुगेबीनाथ अंतर्धान पावले, नायाजी खूप गुढ विचारात पडला. हे सोहंनाथ महाराज कोण ? कोठले ? यांची आपली गांठ कधी कोठे केव्हा पडली ? कांही केल्या हे गुढ त्याच्याने उकलेना. शेवटी त्याच तंद्रीत ध्यानस्थ असून अंतर्यामी वसलेल्या सद्गुरु महाराजांचे स्मरण करुन

त्यांने आपली सुरता थेट सहस्त्रारचक्रावर चढविली. एकदम लख्खप्रकाश पडून त्याला जाणीव झाली. त्याने ताबडतोब तेथून प्रयाण करुन सुरतेला येऊन पोहोचला. तिथे शोध तपास केल्यानंतर सुध्दां सोहंनाथ गुरु महाराजांचा समागम होइना. कारण त्या नांवाचे कोणी संत महात्मा सुरतेस नव्हते. शेवटी उत्तर खंडामधून 'निर्वाण' नांवाचे एक योगी पुरुष आल्याचे समजल्यावरुन नायाजी तेथे गेले. संत निर्वाण साहेबांच्या धामात जाऊन त्यांना वंदन करुन ते सद्गुरू आसना समोर शांत चित्ताने बसले. निर्वाणसाहेब ध्यान मग्न होते. त्यांनी डोळे उघडले आणि समोर बसलेल्या नायाजी कडे बघून ताबडतोब ओळखले आणि ते म्हणाले.

झंझार तोहे रंग हे, आया गुरु के देश ।
दुर्लभ संत समागमा, मिटे भव क्लेश ।।
झंझार कैसे होनी हुई, रंभा मिल गइ आय ।
उनसे क्यों बिछर गये, अगली प्रेम सगाय ।।

'झंझारसिंह ! तू खरोखर सत्संगाच्या रंगात पूर्णरोतीने रंगलास. उशीरा का होईना पण सद्गुरुंच्या प्रदेशात येऊन पोहोचलास. संताचा समागम दुर्लभ आहे. त्यामुळे भवक्लेश दूर पळतात. अरे पण झंझार ! तुझी गति अशी कशी झाली. रंभादेवी तुला येऊन मिळाली तरी तू तिच्या पासून वेगळा कसा झालास परभवाची प्रेम सगाई सुध्दा विसरलास की काय ?'

संत निर्वाण साहेबांनी नायास 'झंझार' नावाने हाक मारताच नायाला सोहंनाथ स्वामींचे दर्शन झाले. निर्वाण साहेबांच्या ठिकाणी त्याला सोहंनाथस्वामी दिसू लागेल.

सोहंनाथ गुरु देवजी, में हुं बडे अबूझ ।
झंझार कहाँ रंभा कहाँ, कहाँ सोहंनाथकी सूझ ।।
नाया लुटेरा होयके, भूल गये अगली रीत ।
गोबीनाथ पिछनाईया, पूरब जनमकी प्रीत ।।

'सोहंनाथ गुरुदेव ! मी तर खरोखर अज्ञानी आहे. मला तर झंझार, रंभादेवी तसेच आपली जरा सुध्दां आठवण नव्हती. कारण कीं मी तर एक अधम नीच लुटारु झालो होतो. सद्गुरुंनी येऊन मला शुध्दिवर आणले. पर्यटनात मला गुरुगोबीनाथांची भेट झाली. त्यांनी मला मार्गावर आणले. त्यांनीच चेतविल्यामुळें मी आज आपल्या भेटीस आलो. आपण मला माझ्या पूर्व जन्माची स्मृती करून देत आहांत पण महाराज आपण या स्वरुपात या ठिकाणी कसे ? हाच मला संभ्रम होत आहे. आपले स्वरुप गुरु सोहंनाथाचे आहे पण इथे तर आपण संत निर्वाणसाहेब रुपाने अस्तित्वांत आहांत. तरी माझा भ्रमनिरास करावा.'

संत निर्वाण म्हणाले, 'बाळा ! ऐक तर मी सांगतो ती कथा म्हणजे तुला संपूर्ण स्मरण होईल. भगवान श्रीरामचंद्राच्या चौदाव्या पीढीत स्वामी देवानन्द हा सत्पुरुष होऊन गेला. त्यांच्या समाधीनंतर सोहंनाथ या नामाभिधानाने ते परत या अवनीतलावर अवतरले. त्यांनी सुध्दां समाधी

घेतल्यानंतर पुनः अवतार धारण केला. सिध्दपुरुष असल्याने सोळाव्या वर्षीच त्यांनी गृहत्याग केला. जायल गुरुद्वारी जाऊन त्यांनी दीक्षा घेतली. संत केशवदासांनी त्यास आपला शिष्य बनविले. आणि 'निर्वाण' नावाने संबोधून गुजराथ प्रान्ताच्या मार्गी लावले. तोच हा मी निर्वाण रुपाने पूर्वभवी असलेला सोहंनाथ मानवमात्राला प्रबोधन करण्याकरितां येथे सुरतला येऊन स्थाईक झालेलो आहे. झुंझारसिंह ! मारवाडमध्ये तुझे मीलन झाले त्याच्याही अगोदर उत्तर खंडात योगी ब्रह्मानन्दाशी मीलन झाले त्या दिवशी त्याला चेतवून हरीरसात रंगविले. अहाहा ! धन्य तो दिवस ! धन्य तो क्षण ! नायाजी त्या क्षणाचे कोण वर्णन करुं शकेल ? अशक्य !

सोहंनाथ गुरुदेवकी, मोहे न आवै याद ।
साया वह कैसी गति, बिलखत फिरे बरबाद ।।
लुटेराको गम नही, अधम उधारन साय ।
इमाम सद्गुरु पीरको, नाया दिये जगाय ।।

'गुरुदेव ! मला आपले तर क्षणभर सुध्दा स्मरण नव्हते मी तर असा भवाटवीत सांपडलो होतो की कधीही माझा उध्दार झाला नसता पण या अधम लुटारुवर सुध्दा अनुग्रह करण्याकरितां सद्गुरु इमामशाहांचे आगमन झाले आणि त्यांनी क्षणभर मजकडे पाहिले व मला चेतविले.

आगे तोहे अैसे कहां, मिलही सतगुरु तोर ।।
तोहे उबारन आयेंगे, साहिब बंदी छोर ।।
बंद छुडावन आइया, सोही मुरशद पीर ।।
नाया ताको बंद हुं, इमामशाह गुरु पीर ।।

नाया ! मागेच तुला सांगितले होते की तुला सद्गुरुचे मिलन होईल व तेंच तुला उपदेश करुन जागी करतील. त्या प्रमाणे तुला ज्या सद्गुरुंची प्राप्ति झाली ते तर तुझा भवबंध तोडण्याकरिता आणि सर्व प्रकारे बंधमुक्त करण्याकरितां तुला जागवून गेले. तुमचे गुरु–शिष्याचे जे अतुट नातें जुडलेले आहे ते खरोखर अप्रतिम आहे. नायाजी त्यांच्याच चरणी तू प्रेंमाने वंदन करुन राहा.'

नाया तोहे जगायके, सतकी राह दिखाय ।
सोही साहिब इमामको, निशदिन लगाहु पाय ।।
भवमे सद्गुरु भेटिया, ताको कैसे भुलाय ।
निर्बान सोही सांईके, चरणनमे बलि जाय ।।

'नायाजी ! ज्यांनी तुला जागवून सत्याचा मार्ग दाखविला त्या महात्म्यांचे निशिदिनी वंदन कर. विकट भवाटवीत ज्यांची भेट होऊन त्यांनी तुला सत्य पथावर आणले, त्या सद्गुरुला कसे विसरता येईल. अशा समर्थ स्वामीच्या चरणी हा निर्वाण सुध्दां शरण जाऊन लोटांगण घालतो.'

आगे सोहनाथ थे, अब तो बने निर्बान ।
मानवके हित आइया, योगी आवागमन ।।
परमार्थ की रीतको, बुझे साधु अतीत ।
नायाजी तुमी योगी हो, ठाढे रहो परहित ।।

' पूर्वी सोहंनाथ होते ते हल्ली निर्वाण होऊन मानवाच्या कल्याणा करिता अवतार धारण करुन आले. साधु संत अशारीतीने जनतेच्या हिताचा विचार करतात. नायाजी ! तू पण योगी पुरुष आहेस म्हणून सदा सर्वदा परहित लोक कल्याणाचा विचार कर. '

नायाजी म्हणाले, ' सोहंनाथ गुरुदेव! हा नाया खरोखर अज्ञानी आहे, या बालकावर आपल्यां अमृतमयी दृष्टीचा कृपा कटाक्ष टाका. कारण आपणच माझे सुहृद आहांत. आपली आठवण मी विसरुन गेलो होतो पण अचानक गुरु गेबीनाथांनी मला जागविले व हा अज्ञ नाया आपल्या चरणी आलेलो आहे.'

निर्वाण साहेब म्हणाले, ' नायाजी या भवाटवीत मोठे मोठे योगी सिध्द आणि देव सुध्दा भुललेले आहेत तर मानवाची गति ती काय ? नायाजी, तुम्ही संत सोहंनाथाचा शोध करीत करीत या संतधामात आलात. तुम्हाला पाहताच या निर्वाणाच्या हृदयात खरोखरच अननुभूत आनंद झाला, परम शांति मिळाली. ' संत निर्वाण साहेबांनी आनंद व्यक्त करताच नायाजीने त्यांना अंतिम प्रणाम केला.

सोहंनाथ निर्वाणको, झुक झुक लागहुं पाय ।
सद्‌गुरु मोरे दयानिधी, किजे नाया पे करुणाय ।।
नाया परहित के लिये, योगी आये मझधार ।
सोही संत अवधूतको, निर्बान करै हुं जुहार ।।

सोहंनाथ–निर्वाणांच्या चरणी वारंवार लागून प्रणाम करीत संत नायाजी विनवू लागले, ' दयानिधी, या दीन नायावर सदैव करूणा करावी. माझी हीच याचना आहे. '

संत हसून म्हणाले, ' नायाजी, परहितासाठी योगीपुरुष या संसार प्रवाहाच्या मध्यधारेत उतरतात अशा संत अवधूतांना हा निर्वाण विनयाने वारंवार प्रणाम करतो. '

सद्‌गुरु सोहंनाथचे दर्शन घेऊन व बरेचसे गूढ उकलल्यामुळे अत्यंत उल्हसित होऊन प्रेमाने त्यांचा निरोप घेऊन नायाजींनी सुरतहून प्रयाण केले. अंतरंगात ध्यान चिंतनचालू असतांनाच त्यांनी चरोतर भूमीकडे प्रयाण केले. वसो गावाजवळ येताच त्यांना अचानक एका योगी पुरुषाची आठवण झाली व दैवयोगाने त्यांची मार्गातच गाठ पडली. पूर्वभवातला तो योगी पुरुष म्हणजे या जन्मातील भाभाराम होय.

चरोतर प्रान्तातील म्हणजे हल्लीच्या खेडाजिल्हयातील वसो नगरातील कुणबी कुटूंबात भाभारामचा जन्म झाला होता. त्याच्या पित्याचे नांव केशवदास व मातेचे नाव विमलादेवी होते. जीवीबाई नांवाची एक बहिण होती. काशीविश्वेश्वराला असतांना एका महापुरुषाच्या आशिर्वादाने भाभारामचा जन्म झाला होता. तो पूर्वभवातील योगभ्रष्ट योगी होता. त्याच्या पूर्वीच्या तीन जन्मांची कथा सांगतात की एकदा तो उज्जैन शहरातील ब्राह्मण घराण्यातील दीनकररायचा पूत्र हरिराय या नांवाने प्रगट झालेला होता. जन्मापासून भगवान सदाशिवाच्या दर्शनाचा ध्यास म्हणून महाकालेश्वराच्या पूजनास सतत जात असे. पण दर्शन घडेले नाही. दुसऱ्या जन्मात काशीमधील अनंतानंद पंडिताच्या घरी करुणानंद रुपाने अवतरला. भगवान शंकराच्या दर्शनाची अभिलाषा पूर्ण झाली पण योगध्यानाभ्यासाच्या आवडीने उत्तर खंडातील हिमालयातील इन्द्रकील पर्वतावर २४ वर्षपर्यंत तपश्चर्या केली. गुरु अडभंगनाथ सिध्द पुरुषाच्या आशिर्वादाने योगाभ्यास पूर्ण करुन योगी झाला. पुढिल जन्मात तोच भाभाराम नांवाने केशवदासांच्या घरी जन्मास आला. ह्याच योगी भाभारामाच्या दर्शना करितां योगी नायाजी आले होते. दोघा योग्यांचे वाटेतच मीलन झाले. आनंदाचा पूर उमटला

कुणबी भाभारामको, दिखे नायाको रुप ।
उरमे बरोरी अवधूता, नाया योगी रुप ।।
योगी जान गुरु देवका, चरणमे शिर नाय ।
सुभागी भाभारामको, योगकी युक्ति पाय ।।

दोघे योगी पुरुषांची दृष्टी एक होताच भाभारामने सुध्दां योगी नायाजीला ओळखले आणि त्यांच्या चरणी वंदन करून प्रणाम केला. दोघं जणांनी आपापल्या अंतरातील आत्मभाव प्रगट करुन क्षेम कुशल विचारले. नायाजीने आपली पूर्वकथा सांगितली कीं,

सद्‌गुरु महिमा बडो, अब तक रहे अबुझ ।
नायाजी सद्‌गुरु मिले, भई अगम की सूझ ।।
सोही गुरुके चरितको, मोहे दियो सुनाय ।
भाभारामके हियरा, सुनतहि हरखाय ।।

मी स्वतः एक लुटारु होतो. सद्‌गुरु मिळाले आणि त्यांनी मला भक्त बनविले, त्या संत सद्‌गुरु इमामशाहांचे चरित्र नायाजीने भाभारामला मुळापासून सांगितले ते ऐकताच भाभारामला संत इमामशाहांचे दर्शन घेण्याची तीव्र जिज्ञासा लागली. तो म्हणाला, 'महात्मन्, आपण खुपच भाग्यवान आहांत. आपल्या जीवनांत आपण सद्‌गुरु महाराजांच्या समागमाने पार उतरुन गेलात पण मी अभागी अजून येथेच गोते खात आहे. आता दैव योगाने आपली भेट झालीच आहे तर या अभाग्याला सुध्दा सद्‌गुरु महाराजांच्या सान्निध्यात घेऊन चला. तुम्ही माझे आत्मस्वरूप सुहृद आहांत. माझ्यावर अनुग्रह करा.'

नायाजी म्हणाले. 'प्रिय भाभा! मनुष्याचा आत्मोन्नतीचा समय येताच सद्‌गुरु आपण होऊनच सद्भक्ताला शोधीत येतात.' नाया काकांच्या मुखातून हे शब्द बाहेर पडता आहेत तोच दैवयोगाने लांब अंतरावरून एक बैलगाडी येत असतांना दिसली. आंतरिक प्रेरणेने नायाजींनी जाणले व अत्यंत हर्षभरीत अंत.करणाने ते भाभारामला म्हणाले 'हे बघा आपले परम कृपाळू दयानिधी सद्‌गुरु इमामशाह महाराजच आपल्या परम सेवक हाजरबेगसह समोरून येत आहेत. आहाहा धन्य धन्य भाभाराम तुझ्या व माझ्याही भाग्याची. गुरु माऊली मायेची पाखर घालण्या-साठीच येथे येत आहे. चला आपण त्यांना सामोरे जाऊ.' असे म्हणून दोघे उठले व रस्त्याने बैलगाडीने जात असलेल्या सद्‌गुरु इमामशाहांना भेटण्यास गेले.

चरण ग्रही गुरु देवका, आपे किन्ह प्रणाम ।
बडे सुभागी देखिया, योगी भाभाराम ॥
योगीको योगी लिखे, आपे गुरु इमाम ।
नायाको समुजाईया, योगकी युक्ति तमाम ।

संत भाभारामने सद्‌गुरुंना शिरसाष्टांग दंडवत प्रणाम करून मोठ्या सन्मानाने आपल्या घरी आणले. दोघं जण गुरु चरणी दंडवत पडले. सद्‌गुरु इमामशाहांनी 'योगी भाभाराम उठ!' 'योगी नायाजी उठ!' असे म्हणून स्वतःच्या हातांनी उचलून आपल्या हृदयाशी लावले. सद्‌गुरुंचा अमृतोपम स्पर्श होताच दोघांच्या चित्तातील अविद्या-माया विलय पावली. त्यांच्या चित्तात सत्‌चित्‌ ब्रह्माचे ज्ञान स्फुरण पावले. सद्‌गुरु इमामशाहांनी प्रेमाने दोघांना समोर बसवून अनेक ज्ञानगोष्टी केल्या तसेच योगवाशिष्ठय आणि अथर्ववेदीय योग साधने विषयी सद्‌गुरु इमामशाहांनी बरेचसे वर्णन केले. थोड्या दिवसांनी त्या सर्वांनी एकमेकांचा निरोप घेऊन आपापल्या मार्गांनी निघून गेले.

संत नायाजी आणि भाभारामचे यानंतर बऱ्याच वेळा मिलन झाले. त्यांच्या मिलनाचे बरेच प्रसंग आहेत. सर्वच प्रसंगांचे वर्णन केल्यास खूप विस्तार होईल. संत नायाजींच्या जीवनाचे व संत भाभारामच्या जीवनाचे सुद्धा संत सद्‌गुरु इमामशाह महाराज प्रेरणामूर्ति बनले आणि अशा रीतीने योग्यांचे जीवन धन्य झाले,

नायाजी भाभारामका, मंगल हुवा मिलान ।
योगीकी गतिको बुझे, योगीके दिल जान ॥
कुकससे गुरु आयके, बैठे भाभारामके संग ।
धन्य भाग्य जिन पाइया, सूर दुर्लभ सत्संग ॥

कुकस धामामधून संत नायाजी बऱ्याचवेळा भाभारामजवळ निघून येत आणि रात्रीच्या रात्री सत्संगात व्यतीत करीत. ज्या कोणी भाग्यशाली जीवात्म्यांनी तो सत्संग ऐकला असेल ते जीवात्मे धन्य होत.

संत नायाजींच्या जीवनांत अत्यंत कसोटीचे अनेक प्रसंग आले. कसोटीच्या ऐरणीवर अनेक प्रसंगी त्यांना विधर्मीयांचे घाव सोसावे लागले. सुलतान महेमूद बेगडा, मुझफरशाह, बहादूरशाह, महंमदशाह अशा अनेक राजांचे जुलूम सहन करून नायाजीला आपली जीवननौका पार न्यावी लागली. त्याचे नावाडी सद्‌गुरु इमामशाह महाराज असल्याने प्रत्येक प्रसंगातून त्यांनी त्यांस सोडविले.

जीवनाच्या अंतिम प्रहरी संतधाम कुकस तीर्थधाम बनले कारण सर्व योगी महात्मा लोक संत नायाजींना मिळण्याकरिता व सत्संगा करिता तेथे येत असत.

योगीसे योगी मिले, मिले साधसे साध ।
भक्ति भक्त भगवंतको, महिमा बडो अगाध ।।
योगी ब्रह्मानंदजी, उत्तराखंड लुभाय ।
ता दिन योगीजन मिले, सोहि मिलनेको आय ।।

योगी पुरुषांचे मंगल मीलन म्हणजे त्रिवेणी संगमच. भक्ति भक्त व भगवंताचे मीलन होय. योगी ब्रह्मानंदजी जेव्हा उत्तरखंडात तपश्चर्या करीत होते तेव्हां त्या काळातील योगीपुरुष अवनी तलावर अवतरलेले होते तें सर्व नायाजीला भेटण्याकरिता आले. योगसिध्द अडबंगनाथ, योगी त्रिलोकनाथ, योगी ऋषभनाथ, योगी जान्हवीदासजी, योगी पद्‌मनाभ, योगी रसिकनाथ, योगी निलांबर दास, योगी सतानंदजी, योगी ओच्छवदास, योगी बिरागदास आदि अनेकाचेक महान तपेश्वरी संत समागमाकरिता येऊन गेले.

अवतार लीला योगीकी, जीव कहां बुझे अज्ञान ।
जनम जनम बीत गये, फिर भी न पावे ज्ञान ।।
बहुरी योगीजन आइया, काहु न पेखे लगार ।
अकळगति अवधूतकी, गांगा लहे न पार ।।

संत नायाजी पावन पर्यटन करण्याकरिता जेव्हा गेले होते तेव्हा ज्या भाग्यशाली जीवात्म्यांना उपदेश देऊन सन्मार्गावर चढविले होते अशा महाभाग्यवंतांच्या हृदयात सद्‌गुरुंची स्मृति जीवंत राहिली, ते गुरु दर्शनाच्या तळमळीने व्याकूळ बनून गुजराथमध्ये आले आणि सद्‌गुरु नायांच्या चरणी स्थान प्राप्त करुन त्यांनी सत्य शांति मिळविली अशा सद्भक्तापैकी पाटण येथील ब्राह्मण भुमानंद, सौराष्ट्रातील तुलसीश्याम येथील आहिर भुलाजी, सिंधमधिल नगरठठ्ठा येथील बाबामहिपत राम, तसेच धोरमजी सुमरा, कच्छ अंजार येथील देवाजी ठक्कर भुज येथील भक्त खेमाजी, भक्त सोयाजी, जेसलमेर येथील रोहित सेन परमार, मारवाडामधिल सांगानेरचे तिकमचंद वणिक वगैरे अनेकानेक भाग्यशाली सद्भक्त संत नायाजींच्या सान्निध्याने व समागमाने आपले जीवन धन्य बनवून गेले.

संत नायाजींच्या दिव्य शक्तीने अनेक चमत्कार कळत नकळत घडून आले. संताला त्याची शुध्द नसते कारण ते अतींद्रिय ज्ञानाने ईश्वराशी तादात्म्य पावतात. भगवंताची चिद्‌शक्ति अशा महात्म्याकरवी कार्य करवून घेत असते, त्यालाच आपण चमत्कार म्हणतो. अशा प्रकारच्या कांही दैवी लीला संत नाया करवी झालेल्या आहेत. अन्नसत्राचे भंडार अखूट राहणे, दुष्काळाचे निवारण होणे, कॉलऱ्याच्या साथीचे निर्मूलन होणे, असाध्य रोगाने पछाडलेल्यास सुआरोग्यवान बनविणे, महारोगाने पीडीलेल्यास रोगमुक्त करणे, गणिकेचा उध्दार करणे, गायिकेला भक्तीपरायण करणे सुलतान महेमूद बेगडचा सारख्या करडचा राजास सुध्दा स्तंभित करणे, गेहाजी सारख्या लुटारुस सन्मार्गावर आणणे वगैरे अनेक चमत्कार त्यांच्याकडून घडले हे सर्व त्यांचा परमसेवक गंगासिंह गोहिल या चितोडगड येथील सद्भक्ताने शब्दांकित केलेले आहे आणि संत नायाजींच्या नंतर पहिला गादीचा वारस म्हणून गंगाजी गोहिलच झालेला आहे.

एके समयी संत नायाजीने आपल्या सर्व भक्त समुदाय व सत्संगी लोकांच्या समक्ष आपल्या हृदयातील व्यथा व्यक्त करुन सांगितले की, 'कुकस गांवाला वास्तव्य करण्यास जवळ जवळ ४७ वर्षे झाली. आता तर माझा स्वामी माझी आठवण करीत आहे, मला बोलावीत आहे. कित्येक वेळा त्याने मला संदेश पाठविला पण लोककल्याणाच्या कर्तव्याकरितां मी स्वामींच्या बोलावण्यास मागे रेटले, पण आता तर माझ्या हृदयांत माझ्या स्वामींच्या मीलनाकरितां एक व्यथाच जागृत झाली आहे.' हे एकून सर्वांना फार वाईट वाटले. त्यांनी परोपरीने विनवून संत नायाजींना एवढचात समाधी न घेण्याविषयी आग्रह धरला. जनतेच्या हितासाठी त्यांनी आणखी एक वर्ष पृथ्वीतलावर राहण्याचे ठरविले, शेवटी भाद्रपद शुध्द बीजेच्या दिवशी समाधी घेण्याचे त्यांनी निश्चित केले. सर्व जनसमुदाय त्यांच्या भेटीला लोटला.

रजपूता अरु जाट, ठाकरडा धाये ।
समाधि मंदिर बनाय, गुरु आज्ञाये ।।
मेवाडी कळा देख, नैना छक जाये ।
बडे घुमट मंदिर, ध्वजा फऱ्हराये ।।
बुझोरी यवनराज अंबिवेक ।।

संत नायाजींने समाधी घेण्याचा दिवस व समय जाहीर केल्याने भगवंताच्या हृदयात खूप उदासिनता आली. राजपूत, जाट, मेवाडी, ठाकरडा, किरात वगैरे अनेक कलाकार बोलावून समाधी मंदीर कलाकृतिपूर्ण बांधण्याचे ठरले. समाधी सुंदर भव्य आणि अप्रतिम बनविण्याची त्यांची चढाओढ लागली पण संत नायाजी मात्र ते पाहून पुढचे होणारे भावी संकट जाणून अवाक् बनले होते, तरीपण मोठचा कष्टाने ते बोललेच. 'माझ्या प्रेमळ भक्तांनों ! तुमच्या प्रेमाचे मी कसे बरे कथन करुं शकू. लोक कल्याणाकरितां माझे आगमन झाले आणि तुम्हीच माझे सुहृदय आहांत. मी सदैव जनतेचाच बनून राहिलो होतो आणि नंतर सुध्दा जनतेपासून दूर राहू शकणार नाही. लोकांच्या हृदयात माझी विभागणी होऊन गेलेली आहे. आपल्या त्या दिव्य प्रेमाच्या आधिन होऊनच मी सदैव तुमच्या जवळच राहिन. तुम्ही माझे आहांत म्हणून माझ्या हृदयातले गुह्य मी तुम्हास सांगतो.

कुकसपे क्या बीत गये, ताको करो विचार ।
जैसे राजा अैसी प्रजा, यवनको कहा इतबार ।।
बडे मंदिर यहा बने, मानो कलामय धाम ।
पतशाही ले कहारसे, आखिर फना मुकाम ।।

एका बाजूस तुमची अभिलाषा आणि दुसऱ्या बाजूस भूतकाळाची याद जिवंत होत आहे. म्हणून विचार येतो कीं एकवेळ या कुकसच्या संतधामावर काय काय बितले आहे. तुमच्यात दीर्घदृष्टी असेल तर बितलेल्या क्षणांचा विचार करा. 'जसा राजा तशी प्रजा.' आपण सुध्दा अशाच रीतीने राहावे. बाकी विधर्मी–यवनराजाचा विश्वास कधीहि धरुं नका, नंतर तुम्हाला वाटल्यास या ठिकाणी भलेही मोठे विशाल मंदीर बांधा, कलाकृतिपूर्ण धाम बनवा पण सुलतानाच्या जुलमापुढे ते टिकणार नाही. शेवटी त्याचा नाश होईल,'

संत नायाजीने भावीच्या भहानकतेचे स्पष्ट शब्दात वर्णन केले ते ऐकताच सर्व जनता उदास झाली पण समर्थ सद्गुरु सर्व शक्तिमान आहे अशा दृढविश्वासाने भक्तांनी दीन याचना केली.

समाधीस्थान अचळ रहें, भक्तनकी अभिलाष ।
करुणा करो गुरुदेवजी, पहूँचे मनकी आश ।।

'गुरुदेव ! आपण म्हणतात त्या प्रमाणे होणार असले तरी पण आमच्या हृदयातली अभिलाषा अशी आहे कीं कोणत्याही उपायाने हे आपले समाधीस्थान अचल–कायम–अखंड राहावे आणि जनतेने आपले दर्शन करुन पावन व्हावे. लोकांची ही अभिलाषा अपूर्ण राहू नये. आपण सर्वज्ञ आहांत कृपा करून याचा उपाय सांगावा.'

जनतेच्या प्रेमाग्रहास्तव संत नायाजी म्हणाले –

जैसा शासनकाळ है, अैसा स्थान विचार ।
सोही स्थान कायम रहे,साच लिखो निरधार ।।
सद्गुरुके बेनको, सबहि लिये शिरधार ।
समाधिस्थान बनाईया, शासनकाळ अनुसार ।।

या समयी ज्याची आण प्रवर्तत आहे त्या प्रमाणे स्थान बनविले तरच ते कायम राहील. मुस्लिम शासनकाळ असल्यामुळे सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे सेवकांनी देशकाळ तसा वेश भजविण्यास तयारी केली, राज्यकाळानुसार समाधिस्थान तैयार करण्यात आले. भव्य घुमटदार समाधी मंदीर बांधून तयार झाले. हिंदुस्थापत्यानुसार समाधीमंदिर बांधले असते तर ते केव्हांच जमिनदोस्त झाले असते. गुजराथच्या सुलतानांनी हिंदु मंदीराचा विध्वंस केल्याचे बरेच प्रमाण मिळतात. खुद्द मुसलमान इतिहासकार लेखक 'फरिश्ता' ने पण याचा उल्लेख केलेला आहे. 'मिराते सिकंदरी' मध्ये पण ही हकिकत विस्ताराने सांगितलेली आहे.

सर्वज्ञ संत नायाजीने भविष्यकाळात दृष्टी ठेवून जे काम केले ते यथार्थच होते. मुस्लिम शासनातून बचावण्यासाठी बऱ्याच स्थानांचे अशाप्रकारे परिवर्तन झाल्याचे आढळते. पावागडावर महाकालीच्या पुरातन मंदीरावर घुमटामध्ये सदनशाह पीराची दरगाह जर नसती तर सुलतान महेमूद बेगडयाने कधीही ते स्थान सलामत ठेवले नसते. परंतु खरी गोष्ट तर ही आहे की पीराच्या दरग्यामुळेच ते स्थान कायम राहिले. त्यांच्या पाठीमागे लोककथा–दंतकथा बऱ्याच कांही असल्या तरी महापुरुषांच्या दीर्घदृष्टीचीच ती सफळता आहे.

जेव्हापासून सद्‌गुरु नायाजीने समाधीस्त होण्याचे वृत्त जाहिर केले तेंव्हा पासूनच जनतेच्या हृदयात एक दारुण धड धड सुरु झाली. अशा संतपुरुषाचे प्रयाण झाले तर आपण कोणाच्या अधारावर जगावे. लोक व्याकूळ होऊन संत धामावर येऊं लागले व दीनतेने आपली व्यथा कथन करुं लागले.


संत पुरुषके चरणमे, सब दुःख जात बिलाय ।
साया हमरी कौन गत, किनसे व्यथा सुनाय ।।
लोगनके हित आईया, योगी धरे अवतार ।
मे लोगनका बनी रहु, संशय नाही लगार ।।

तुम्ही असे समजता कीं मी येथून प्रयाण केल्यानंतर तुमच्यापासून दूर जाईन पण मी सदा सर्वदा तुमच्याजवळच तुमचाच होऊन राहिन, कारण जनकल्याणाकरिता योगीपुरुष अवतार धारण करतात. आज तर अजूनही मी तुमच्यातच बसलेलो आहे. तुम्हाला जे कांही मागायचे असेल ते खुशीने मागून घ्या.' धन, दौलत, पुत्र, जमिन, सुख वगैरे ज्याला जे मागायचे होते ते त्यांनी मांगितले, संसारासक्तीच्या लालची जिवात्म्यांनी जे जे मागितले ते त्यांना मिळाले. त्या बरोबर निर्लोभी अनासक्तांनी सद्‌गुरुंच्या चरणाजवळ बसून मुक्तीलाभार्थ ज्ञानाची याचना केली ते त्यांना मिळाले. कांही सद्भाग्यांनी वैराग्याची मागणी करताच ते त्यांना मिळाले कोणी भक्ति कोणी भुक्ति तर कोणी योगयुक्तिची याचना केली, ते ते सर्व त्यांना प्राप्त झाले. संत आपल्या जवळील सर्वस्व देऊन हलके झाले.


हरणाच्या चपळ गतिप्रमाणे एक वर्षाचा काळ कांही क्षणाप्रमाणे निघून गेला. संत नायांनी निश्चित केलेला संवत १५८९ चा भाद्रपद शुध्द बीजेचा दिवस येऊन ठेपला.

ठाढे लोग रोने लगे. रोवे कुकस गाम ।
नायाजीके नैना रुवे, लोगनके विश्राम ।।
प्रहरी ठाढे गुरु द्वारपे, गांगा रुवे चोधार ।
दूरसे दिखे गुरुदेवको, हियरा लगी कटार ।।

संत नायाजी समाधी घेण्यास तैयार झाले होते. कुकस गांवातील आम जनता लहान मुलाप्रमाणे अधिर बनून रडत होती त्याचे ते प्रेम पाहून निर्मोही संत नायाजींच्या नेत्रातून सुध्दा



चित्र नंबर ५ सद्‌भक्त गंगासिह गोहिल या आपल्या प्रेमी शिष्यास गादीवर बसण्याची संत नायाकाकांची आज्ञा.



चित्र नंबर ६ बालनाभारामची मंदीर व देवभक्तो विषयी बालक्रिडा पाहून मातापित्यास वाटणारा विस्मय.

गंगा–यमुनेचे प्रवाह सुरु झाले. साश्रुनयनांनी त्यांनी दुखर पाहिले तो मंदीराच्या द्वारावर असलेला पहारेकरी गांगासिंह गोहिल तर अनाथ बालकाप्रमाणे व्याकूळ होऊन अश्रुपात करीत होता. आपला परम प्रेमळ अनुज गागाची ही दशा पाहून संताच्या हृदयात जणू कट्यार लागावी त्या प्रमाणे घायळ हृदयाने ते त्याच्या जवळ गेले.

आसनसे उठ धाइया, गांगा मेरा क्यों रोई ।
साया बुलवा भेजीया, मंगल बेरन होई ॥
आनंदके दिन आइया, कैसे बहावत नैन ।
गांगा मोहे तेरे बीना, कबहु न पावै चैन ॥
गांगा मेरा बनी रहे. गांगा हिया समाय ।
सद्‌गुरुको बडे हेतसे, गांगा हिया लगाय ॥

'गांगाजी ! तू रडतोस कशासाठी. आज तर आनंदाचा दिवस आहे. परमानन्द प्रभुच्या मीलनाचा मंगल दिवस आज उगवला आहे. या अत्यंत दुर्लभ महत्वपूर्ण क्षणी तू अश्रुपात कां करतोस गांगा, मला तुझ्याशिवाय क्षणभरही चैन पडत नव्हती. तू माझाच आहे आणि सदैव माझ्यातच समावून राहशिल,' असे म्हणून नायाजीने गांगाजीला आपल्या हृदयाशी लावले. त्या आपार प्रेमी गुरु–शिष्यांचे ते मिलन खरोखर अनुपमच होय. दोघांच्या नयनातून वाहात असलेल्या प्रेमाश्रुंना कशाची उपमा देता येईल ! ते पाहून जनतेच्या नयनातून आणखी जोराचा प्रवाह वाहू लागला. संत नायांनी गांगाला हाताने धरुन आपल्या आसनाजवळ आणले.

गांगाजीको कर ग्रही, आसन समीप लाय ।
नायाजी अपने हाथसे, आचार्य तिलक लगाय ॥
गांगाजी गुरुदेवका, आसन बिराजो आप ।
संत धाम संभारीयो, सद्‌गुरुके प्रताप ॥

संत नायाजींनी गंगासिंहाला स्वतःच्या हाताने आचार्यतिलक केला. आणि हात पकडून आपल्या गादीवर बसविले व म्हणाले – 'गांगाजी ! तू या संत धामाचा सांभाळ करावा. सद्‌गुरुंच्या प्रतापाने तुला सदैव सुख आणि शांति प्राप्त होईल !'

सद्‌गुरुंचे शब्द ऐकताच व्यथीत झालेला गांगा म्हणाला – 'बाबा, मी तर एक शिपाई आहे, पहारेकरी आहे. मला गादीची गरज नाही. माझ्यासारख्या पहारेकऱ्याला ही गादी सांभाळणे शोभत ही नाही. मला मुक्त करा. मला अधिकारी व्हायचे नाही. मला आपले द्वारी पहारेकरीच राहू द्या. आणि सदैव प्रभुभक्तीत लीन राहिन असाच आशिर्वाद आपण मला द्यावा.'

संत नायाजी म्हणाले, 'गांगाजी ! जीवनभरात तू एकदाही सद्‌गुरुंच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही. तू खूप विवेकी आणि विनयी आहेस म्हणूनच मी तुझ्यावर ही कामगिरी सोपवित आहे. गुरुच्या वचनावर विश्वास ठेव आणि मी सदैव तुझ्याजवळच राहीन.' असे म्हणून नायांनी त्याच्या शिरावर आपला वरदहस्त ठेवला. अत्यंत लीनतेने गांगाने गुरु आज्ञा स्विकारली.

पंद्रहसो नव्वासी भादो, शुक्लादुज निर्वाण ।
संत नायाजीको किये, यहांसे महा प्रयाण ।।
अवनितलपे आयके, योगी लीला बखान ।
लोगनके बडे लाडिले, चल गये महेमान ।।

संवत १५८९ च्या भाद्रपद शुध्द बीजेच्या दिवशी संत नायाजी समाधिस्त झाले. एक योगी पुरुष अवनीतलावर आला आणि परहिता करितां अगम्य लीला करुन लोकांचा लाडका बनलेल्या महेमान संताने या लोकांमधून महाप्रयाण केले. संत नायाजींचे चरित्र आलेखन करणारा शाहिर बन्सीलाल शेवटी म्हणतो :-

पंद्रहसो नव्वासी भादो शुक्ल बीज बखानजी ।
समाधी लिन्ही संतको, यहांसे बडे महेमानजी ।
सोही संतनकी जीवनी, शायरके जीवन प्राणजी ।
अवगुण मोरे नाथजी, बक्षो मे हुं नादानजी ।।
बन्सीलाल चरणनका चेरा, संत पुरुषकी लीला बखानगी ।।

संत नायाजी पद्मासन घालून समाधीस्थ बसले. समाधी स्थानात त्यांच्या आदेशानुसार समाधी बनविण्यात आली. 'संत नायाजीनो जय ! नायाजी महाराजनो जय !!' जय जय कार करीत मानव मेरु संत धामामधून हळू हळू विरल झाला. गंगासिहाच्या हृदयातील विरह वेदना अजून शान्त झाली नव्हती. अधिर बनून तो तर आसनावर बसूनच अश्रु ढाळित होता.

गांगा गुरुके बिरहमे, आसन बैठे रोई ।
साया अकेला क्यों रहे, यहां नही मेरा कोई ।।
सद्‌गुरु मोहे संगमे, रखो प्रहरीको पास ।
गांगाजी आवन चाहे, नाया गुरुकी पास ।।
गांगाजी गुरुदेवसे, कबहु रहे न दूर ।
साया न्यारे क्यों हुवे, मोसे रहो हजूर ।।
नाया सद्‌गुरु देवजी, मोहे दिये विश्वास ।
गांगा तुं काहे रुवे, मैं हुं तिहारी पास ।।

अश्रु वाहात असलेल्या गांगाजीला पाहुन सद्‌गुरु हृदय द्रवले. ते आले. गांगाजीला भेटले वियोगिनीला पति मिळावा तसे सद्‌गुरु आणि शिष्याचे पुर्नमिलन झाले. गांगाच्या हृदयात जो विरह अग्नी तळपत होता तो कायमचा विलीन झाला.

खोजनहारको पाइया, पियरा अपनी पास ।
गांगाको गुरु देवजी, मिल गये खासो खास ।।

४) संत भाभाराम महाराज.

सतपंथ प्रवर्तक सद्‌गुरु श्री इमामशाहांच्या सद्भक्त मालिकेतील तिसराभक्त संत श्री भाभाराम महाराज होय. त्यांच्या जीवनलीले विषयी थोडे अवलोकन करूं या.

गुजराथ मधिल चरोतर परगण्यातील म्हणजे हल्लीच्या खेडा जिल्ह्यातील 'वसो' या गांवी पाटीदार ज्ञातीत 'कांझा' कुटूंबात केशवदास नावाचे कुलवान गृहस्थ राहात असत. ते धर्मनिष्ठ राजपुरुष होते. काशीक्षेत्राहून नित्य सांढणीच्या योगाने गंगाजळ आणून ते स्नान करीत. त्यांच्या आंगणात सदैव सदाव्रत, अतिथ्यसत्कार होत असे. केशवदास तालुक्याचा प्रमुख असल्याने जमिनमहसूल वसूल करून अमदाबाद येथील सुलतान दरबारात भरण्याकरिता जात असल्याने बादशाही दरबारात त्यांस खूपच मान आणि दबदबा होता.

केशवदासला विमळादेवी नांवाची पतिव्रता शीलवान पत्नि होती. त्या उभयतांनी तीर्थ-यात्राही बऱ्याचशा केलेल्या होत्या. काशीक्षेत्रात कित्येकदिवस राहून मुक्त हृदयाने साधुसंतांची सेवा केली होती. केशवदास आणि विमळादेवी हंस–हंसिणीची जुगलजोडी होती. जीवीबाई नांवाचे त्यांना एक कन्यारत्न होते. त्यानंतर त्यांना कांहीच संतान झाले नाही. घरात बरेच नोकरचाकर होते, पण अतिथी–संत–अभ्यागतांचे ती स्वतः आपल्या हाताने आतिथ्य सत्कार करी.

विमळादेवी एके दिवशी खूप आजारी पडली आणि खरोखरच चिरनिद्रेत पडली. नेमके त्याचवेळी अचानक एका महापुरुषाचे आगमन झाले. त्याने बाहेरूनच जोराने 'गंगामैया' अशी हाक मारली घरात खूप खळबळ माजलेली होती. सर्वजण शोकसागरात बुडालेले होते. एका सेवकाने रडत रडत महापुरुषास सांगितले, 'महाराज, ज्या गंगामैयाला आपण हांक मारता त्या तर कधीही उठू शकणार नाही अशा मरणशय्येवर पडलेल्या आहेत.'

सेवकाचे शब्द ऐकताच महापुरुष आंत गेले आणि विमळादेवी जेथे बिछान्यावर पडली होती तेथे जाऊन आपल्या कमंडलूतील जल तिच्यावर शिंपडून म्हणांले, 'गंगामैया येथून कोठेही जाऊ

नकोस, येथून जर गेलीस तर संत अभ्यागताचा सत्कार कोण करील ? माते, संताचा सत्कार करण्यास तुला येथे राहावेच लागेल. ऊठ, बीछोना सोड !' असे म्हणून त्यांनी आणखी जोर जोराने तिच्या मुखावर तिर्थ शिंपडले, तो काय आश्चर्य, विमलादेवी खरोखरच झोपेतून दचकून जागी व्हावी त्याप्रमाणे उठून बसली. तिने डोळे उघडले, ती संताच्या चरणावर झुकली. संतपुरुषाने तिच्या शिरावर वरदहस्त ठेवला व 'मैया तुम्हारा जयजयकार हो !' असा शुभाशिर्वाद देऊन त्वरेने बाहेर निघून गेले. त्वरा करून केशवदास त्यांच्या पाठीमागे पळाले पण सत्पुरुष कोठे अदृश्य होऊन गेले ते समजलेच नाही.

साधु आवत देखके, उठकर मिलीये धाय ।
क्या जानु उस वेशमे, नारायण मिली जाय ।।

केशवदास धर्म परायण असल्याने त्याने साधु सत्पुरुषांच्या सेवेकरिता पुनः काशीला वास्तव्य केले. एकदा कुंभमेळयाच्या समई हरिद्वारला जाऊन त्यांनी संत पुरुषांची खूप सेवा केली. त्यापैकी एका महापुरुषाने त्याची ती वृत्तिपाहून आशिर्वाद दिला.

केशव तेरे घर आयेंगे, योगीपुरुष अवतारजी ।
सोही संतसे होयेंगे, कुणबी कुळ उजीयारजी ।।
बडे प्रभावी महात्मा, लोगनके हितकारजी ।
कुणबी तेरे कुळमे, होयेंगे जयजयकारजी ।।

'बेटा ! केशवदास तुझ्या घरी एक योगी पुरुष अवतार धारण करील आणि तुझे कुळ उज्वल करील. तो महान प्रभावी महात्मा लोक कल्याणासाठी अवनीतलावर अवतरील ! तुझे जीवन सुध्दा धन्य होईल ! तुझे कल्याण होवो !!' असा आशिर्वाद दिला. ते ऐकून केशवदासच्या हृदयात मोठे आश्चर्य वाटले त्याने महात्मा पुरुषाच्या चरणी दंडवत प्रणाम करून चरणरज शिरावर चढविली आणि तेथून थेट वसोला प्रयाण केले.

कांही काळ गेल्यानंतर विमळादेवीला गर्भ राहिला. तिचे सारे चित्त ईश्वर भजनाकडे आणि संत महात्म्यांच्या सेवेकडे लागले. महापुरुषाचे शब्द खरे ठरले. वि. स. १५०५ मध्ये माता विमळादेवीच्या कुखमधून एक सुंदर तेंजस्वी बालक जन्मले. अंशावतारी योगी पुरुषाने या पृथ्वी-तलावर अवतार धारण केला. आकाशात मंगलवाद्ये वाजून चंदन व पुष्पवृष्टी झाली. सर्वत्र आनंदी आनंद पसरला. केशवदासांच्या अंगणात पण सनई चौघडा वाजू लागला. दीपोत्सवाप्रमाणे आनंदोत्सव उजविला गेला. याचकांना तृप्त केले, चारण भाट, ब्राह्मण वगैरेंना अपार दक्षिणा देऊन बिरुदाविले. कुळपुरोहितास पाचारुन नामाभिधान केले. 'भाभाराम' हे पवित्र नांव ठेवले.

हर्षोत्फुल्ल अंतकरणाने माता पित्याने बाल भाभारामचे लालन पालन केले. अनेकानेक बाल लीलांनी भाभारामने सर्वांची मने पुलकित केली. बालपणापासून देवधर्म व मंदीराकडे त्याची

ओढ पाहून केशवदासांना समजून आले की महापुरुषाच्या कृपाशिर्वादाप्रमाणे आपला हा बालक अंशावतारी योगीच असावा. पाच वर्षाचा झाल्यानंतर भाभारामला विद्याभ्यासाकरिता शाळेत पाठविले. पूर्वभवी सुसंस्कारी असलेल्या त्या प्रगत आत्म्याला जागविण्याची गरजच भासली नाही. लौकिक दृष्टीने शाळा शिकून लवकरच त्याने सर्व विद्यात प्राविण्य मिळविले.

तारुण्यात पदार्पण करताच भाभारामचा पेटलाद येथील पेथाभाई पटेल यांच्या सुंदर कन्येशी–रोहिणीशी विवाह झाला. स्वर्गासमान सुंदर संसारात घडीभर आनंद कल्लाल करीत त्या प्रेमी युगुलास एका गोंडस मुलाची प्राप्ति झाली. रोहिणी माता झाली. मुलाचे नांव शंकर असे ठेवले.

सर्व कुटूंब आनंदविभोर असतां अचानक दुर्घटना घडली. केशवदास मरणासन्न झाले व थोड्याच दिवसात त्यांना स्वर्गातील बोलावणे आले. भाभाराम पित्याच्या शेजारीच बसलेला होता त्याचे मुखावलोकन करताच पित्याच्या हृदयात परम संतोष वाटला. एकात्तर पिढ्यांचा उध्दार करणारा कुलदीपक अंशावतारी पुत्राचे दर्शन करताच केशवदासांच्या हृदयातली व्यथा दूर होऊन हर्षित अंतःकरणाने ते काळपुरुषाच्या आधिन झाले. स्वामीच्या स्वर्गारोहणाबरोबरच सति विमळादेवीने पण कोणताही विलंब न करता पतिच्या पाठोपाठ स्वर्गारोहण केले.

पिव मरणकी बातको, सुनते छांडे प्राण ।
ऐसी सति इह लोकमें, जुग जुग रही बखान ।।
जुग जुग रही बखान, सुफळ करती जग जाना ।
पद पंकज बलिहार, बूझे कहा बेगाना ।।
कहेत माधवदास आयो, मे तोरे शरणा ।
सुनतही छांडे प्राण, सति मत दिखे पिवमरणा ।।

पतिनिधन जाणताच सति या लोकात राहू शकत नाही स्वतःच्या पति बरोबरच ती या जगातून प्रयाण करते. सति विमळादेवीने अशाच प्रकारे आपल्या स्वामी बरोबर महा प्रयाण केले. भाभारामला हा दारुण वियोग अगदी असह्य झाला. सर्व प्रकारच्या सांसारीक भोगापासून तो विरक्त झाला. संसारातून त्याचे मन अगदीच उडून गेले. आता तर तो असार संसारापासून दूर जाण्याची इच्छा करीत होता. त्याने आपल्या अढळक संपत्तिचा सन्मार्गाने विनियोग सुरु केला. सार्वजनिक जनतेच्या सेवेसाठी त्यानें अनेक तलाव विहीरी बांधल्या. गोर गरिबांसाठी मोफत औषधोपचार केन्द्र सुरु केले. तो स्वतः कलाप्रेमी असल्याने समाजातील लहान लहान कोवळ्या बालकांना चांगल्या प्रकारचे सुसंकार घडावे यासाठी पाठशाळा काढून त्यांच्या आचार्यांची जीवनचर्या त्याने स्वतःवहन केली. अनेकानेक तीर्थक्षेत्री धर्मशाळा बांधून यात्रेकरुंची तशा प्रकारे सेवा करुं लागला. अशा एक ना दोन किती तरी लोकोपयोगी कामे करुन आपल्या संपत्तीचा त्याने सदुपयोग सुरु केला. त्या बरोबरच आपल्या स्वतःच्या जीवनाचा सुध्दा तो सदुपयोग करुं लागला. काशी, हरिद्वार बद्रीनाथ, केदारनाथ वगैरे अनेकानेक क्षेत्रावर जाऊन अन्नदान, वस्त्रदान, द्रव्यदान करुन सर्वत्र सत्पुरुषांची सेवा करुन त्यांच्या सत्संगात गढला गेला.

त्याच्या मनात वैराग्य विचाराने खूप खळबळ माजली, जगताचा असत् व्यापार पाहून व स्वार्थी व्यवहार जाणून विरक्त भाभारामचे मन फारच उदास होई. त्याचा योगभ्रष्ट योग्याचाच अवतार असल्याने अपूर्ण राहिलेला योग परिपूर्ण करण्याकरिता बरीचशी धडपड सुरु केली मार्गात थोडेसे सांसारीक बंधन होते ते दूर करण्याचा तो प्रयत्न करं लागला पण दैव योगानें ते आपोआप दूर झाले. स्वर्गभूमीसमान काशीपुरीहून घरी म्हणजे वसोला येत असतांना त्याचे मन भगवान सदाशिवाच्या वियोगाने तळमत होते.

काशी दिलमे बस गई, अब ना वसो रहाय ।
भाभाराम तुने क्या किया, पल पल हिया झुराय ।।
वसो नगरमे आइया, भाभाराम मन भंग ।
कबहु चेन न पाइया, सदा रहे असंग ।।


ज्याच्या हृदयात काशी वसलेली आहे त्याला वसो काय आवडणार. त्याचे मन घरादारात संसारात रमेना. स्वतःच्या पतीची अशी दशा पाहताच रोहिणी समजून गेली की आता समय पूर्ण भरला, म्हणून आपल्या स्वामीला या मृगजळाप्रमाणे संसारामधून मुक्त करावे.

रोहिणी नैना दिखे, अपने पियुका हाल ।
यह संसारा मानसर, पियरा मेरा मराल ।।
हंसा सोही मोती चुंगे, कबहु न आन लुभाय ।
पियरा मेरा हंस है, सोही हंस रहाय ।।


रोहिणी भाभाराम जवळ आली व विनयाने म्हणाली 'स्वामी तुम्ही माझ्या कडून तोंड कां फिरविलेस? माझा काही अपराध आहे का ? माझ्या पासून दूर राहण्याचा प्रयत्न कां करीत आहांत ?'

भाभाराम म्हणाला, ' रोहिणी ! तू समजतेस तसे कांहीही नाही पण माझे मन संसारात रमतच नाही. माझ्या हृदयाची ही व्यथा कशा रीतीने दाखवू हेच मला कळत नाही ! '

आपल्या स्वामीची ही दशा जाणून रोहिणी त्याचे चरण धरुन म्हणाली, ' प्राणनाथ ! सदैव माझेच होऊन राहा. मला तुमचीच केवळ अभिलाषा आहे. या रोहिणीला आपल्या चरणी स्थान द्या. स्वामी मी आतां येथून आपला निरोप घेत आहे. मला आज्ञा द्या. एके समयीची ही पद्मरेखा अप्सरा या जन्मात रोहिणी रुपाने आली व पूर्व संकेतानुसार आपल्याला येऊन मिळाली होती. प्राणेश्वरा ! माझा हा समय पूर्ण झाला म्हणून आता मला या लोकात राहता येत नाही. म्हणून हास्य वदनाने मला येथून जाण्याचा निरोप द्या. माझी जाता जाता एक विनंती ऐका. स्वामी ! तुम्ही योगी आहांत आणि योगीच राहणार. एके समयी या योग साधनेत चोवीस वर्षे वाया गेले होते. तुमची ही तपश्चर्या व्यर्थ गेली होती. नाथ ! ही हरलेली बाजू



चित्र नंबर ७ वर १ भाभारामच्या पित्याचे व मातेचे निर्गमन २ भाभारामची सांसारिक उदासीनता.
खाली ३ रोहिणीदेवीचे निर्गमन. ४ भाभारामचा गृहत्याग व वैराग्य धारण.



चित्र नंबर ८ सद्भक्त युवक हरिरायची उज्जैन येथील महाकालेश्वराच्या मंदिरात तपश्चर्या व करुणामूर्ति
बहिणीकडून त्याची सेवा

पृ. १४५

जिंकण्याकरिता केव्हा कटिबध्द व्हाल ? वेळीच जागृत होऊन योगी बनून जगतास पावन करा,' असे म्हणून आपल्या प्राणपतीच्या मांडीवर मस्तक टेकवून जणू स्वर्गीय स्वप्नात दंग झाली आहे अशा अलौकिक आनंद सागरात डुंबत आहे अशा भावाने तीने चिरविश्रांती घेतली. मधूर मंद हास्य करीत एखाद्या हंसिणीने हळूच पंख फडफडवून उडावे त्या प्रमाणे रोहिणी देवीचा पंचप्राण जगत रुपी मानसरोवराहून उडून गेला.

अपने पियुकी गोदमे, रोहिणी सोई उमंग ।
प्रेम दिवानी क्यो जगे, रखे प्रेमको रंग ।।
विरक्त भाभारामको, ता दिन लगेरी घाव ।
रोहिणी तुम जीत गई, हार गया मैं दाव ।।

रोहिणीने अतिशय आनन्दाने आपल्या स्वामीच्या मांडीवर चिरविश्रांती घेतली. धनुष्यातून बाण सुटावा त्या प्रमाणे त्या प्रेम दिवानीने अंतिम प्रयाण केले. भाभारामाच्या हृदयाला जोराचा धक्का लागला. प्राणप्यारी अर्धांगीचा वियोग त्याला असह्य झाला. ' रोहिणी ! तुझी अकळित गति हा भाभाराम कधीही ओळखू शकला नाही. स्वर्गलोकातून तू आलीस, माया लावून क्षणात निघून गेलीस. हा असह्य वियोग हा भाभा सोसू शकणार नाही. अशा प्रकारे अपार शोक करीत करीत भाभारामने रोहिणीच्या पार्थीव देहावर अंतिम संस्कार केले.

आता त्याच्या हृदयात शांती कोठून मिळणार. तीर्थयात्रेला जाण्यास जेव्हा तो विचार करु लागला तेव्हा त्याचा पुत्र शंकरदास साश्रुनयनाने समोर आला. भाभाराम त्यास म्हणाला. 'बाळा शंकर, रडू नकोस. शांत राहा. ईश्वर तुला सदैव सुखात ठेवो. मला परमपावन अशा वैरागमार्गाने जाण्यास तू रजा दे. प्रभु भक्तीने मला जीवन सफळ करु दे. ' असे सांगून अपार प्रेमाने त्याच्या शिरावरुन हाथ फिरवून आशिर्वाद दिला. तो थोडा शांत होतो न होतो तोच त्याची बहिण जीवीबाई रडत त्या ठिकाणी आली. भाभारामने तिच्याही मनाची समज घातली भाभारामाने आपल्या संपत्तिचा काही भाग मुलाकरिता ठेवून बाकीची आपल्या बहिणीच्या दोन मुलांना प्रेमजी आणि हिरजी यांना वाटून दिली आणि आपण स्वतः मुक्त झाला.

संसाराची मृगजळ माया त्यागून भाभाराम गृहत्याग करुन देवाला आला तेथे सुध्दा स्थिर होऊ शकला नाही. तेथून वनखंडीला आला. त्याचेच नाव चंपकवन असे सुध्दा होते. तेथे एका तलावाच्या काठी सुंदरशा बनराईत भाभारामाने आपली योग साधना सुरु केली.

ध्यानी भाभारामको, हरीसे लगन लगाय ।।
रसना लग गई नामसे, हरीमे रहे लुभाय ।।
योगीकी गतिको बूझे, टाळी लागी दिन रेन ।
हरिसे लगे हरिके हुवे, हरि बीन पावे न चेन ।।

हरिस्मरण करीत करीत भाभाराम असा एकाग्र झाला की तो हरिमयच झाला. रात्रंदिवस तो ध्यानमग्न राहू लागला. आहार निद्रेचा त्याग करुन सुरता एकमेव श्री हरीच्या ध्यानातच

लागली. बारा वर्षे पर्यंत भाभारामने ओली पाने खाऊन व नंतर बारा वर्षे पर्यंत कोरडी पाने खावून निर्वाह केला असे म्हणतात.

मस्त दशा योगीकी, कोन रखे संभाळ ।
पिवजी योग निभाइयो, सांया किये प्रतिपाळ ।।
बारा वरस पिछे बने, बाहेनी मिलनको योग ।
नटपूरसें आ गई, कीकीबाई हरि योग ।।

मस्तदशेत ध्यानमग्न बनलेल्या योग्याची काळजी घेणारा कोण होता ? तो स्वतः ज्याच्या ध्यानात मग्न होता तोच भक्तवत्साल भगवान त्याचा सांभाळ करुं शकणारा होता. त्याने एक अघटीत घटना घडवून आणली. संत भाभारामची पूर्वभवाची जीवाभावाची एक बहिण नटपूर-नडियाद्हून दैव योगाने भाभारामच्या जवळून जात असता योगध्यानाने भाभारामने तिला ओळखले. भाभारामने तिला कोणत्याही प्रकारचे अंतर न ठेवता स्वतःच्याजवळ वागविले. ती कीकीबाई खरोखर महासाध्वी विदूषी आणि सद्भक्त होती- संत सेवेने ती पुढे परत वंदनीय झाली.

सजनी संतके चरणमे, पाया परम सोहाग ।
आली मोहे मिल गये, भय उबारनको लाग ।।

कीकीबाईचे जन्मगाव अलिंद्रा हे होय. तिचे लग्न नटपूरनडियाद येथील मांडण पटेल यांच्याशी झाले होते. कालान्तराने तिला दोन मुले झाली पण दुर्दैवाने पतिनिधनाने वैधव्याची कुठार तिच्या शिरावर येऊन पडली. नटपूर तिला भयानक दिसू लागले. तिच्या दुःखात आणखी भर दुष्काळानें घातली. संसारावरून म्हणजे घरादारावरून तिचे मन उठून गेले. दोघा मुलांना बैलगाडीत बसवून स्वतः गाडी हाकून तिनें नटपूर नडियादला रामराम ठोकला. कोठें जावे हे सर्व अनिश्चित होते. रस्त्याने जात असता ती चंपकवनाच्या नजिक येऊन पोहोचली.

ग्रीष्माचे दिवस. भर दुपारी सूर्याच्या प्रखर तळपण्याने तिचे दोनही लाल व ती स्वतः खूप कासावीस झाली होती, घशाला कोरड पडली. मुले पाणी पाणी करीत असता जवळ तिला एक विहीर दिसली. पाणी काढण्याकरितां तिने जवळील कळशीला दोर बांधला व पाणी खेचू लागली. अर्ध्यापर्यंत कळशी येताच दोर तुटला. कळशी विहीरीत जाऊन पडली. कीकीबाई व्याकूळ झाली पाणी वर कसे काढावे याचा विचार करीत आजूबाजूस पाहू लागली. तिला अचानक एका विशाल वृक्षाखाली लहानशी पर्णकुटी दिसली व त्या कुटीत एक तपेश्वरी महात्मा बसलेला दिसला. ताबडतोब त्याच्या जवळ जाऊन तिने दीनतेने प्रणाम करून आपली मुष्किली सांगितली, 'महाराज ! खूप तहान लागलेली आहे. पाणी काढण्यास गेली तर दोरच तुटून कळशी विहीरीत पडली. मज जवळ दुसरे काहीही साधन नाही. मुलं तहानेने कासावीस झालेली आहेत. आपल्या-जवळ कांही साधन असल्यास द्यावे.' भाभारामने स्वतः जवळील शीतल जल तिला दिले. त्यायोगे कीकीबाई व तिची दोन मुलं तृप्त झाली.

कीकीबाईने विनयानें संतचरणी लोटांगण घातले व आपल्या दोनही मुलास संतचरणी लावले. भाभारामने कीकीबाईकडे निरखून पाहिले व अतिशय उल्हसीत अंतःकरणानें तो म्हणाला 'कीकीबाई, मी तुझीच वाट पहात होता. अखेर माझी बहिण मला येऊन मिळाली. आता तुला येथून कोठे ही जायचे नाही कारण की या स्थळी तुझे ऋण आहे. पूर्वजन्मातला हा ऋण संबंध तू कधीही तोडू शकणार नाही. म्हणून पुढे न जाता शांत चित्ताने इथेच राहा.'

महापुरुषाच्या या वक्तव्याने कीकीबाई विचारमग्न बनली अतिशय संभ्रमात पडली. शेवटी हळूच म्हणाली 'महाराज ! पूर्वभवाचा संबंध म्हणजे काय ? आपणाशी माझा पूर्वजन्माचा काय संबंध होता ? हे तर मला कांहीच समजत नाही. म्हणून कृपा करुन पूर्वजन्मातल्या ऋणानुबंधाची कथा मला समजावून सांगा.' कीकीबाईचे शब्द ऐकून संत भाभाराम थोडा स्थिर झाला. हळूच त्याने पूर्वकथा सांगण्यास सुरुवात केली.

संत भाभारामच्या तीन जन्मांची कथा मिळते. त्याचा प्रथम जन्म उज्जैन शहरात दिनकरराय नावाच्या ब्राह्मणाच्या घरी झाला. त्याचे नांव हरिराय असे होते. तो भगवान सदाशिवाचा अनन्यभक्त होता. महाकालेश्वराला प्रसन्न करण्याकरिता त्याने खूप सेवा केली बारा वर्षे निघून गेली. शेवटी एका रात्री स्वप्नात शिवाजींनी दर्शन देऊन सांगितले कीं, 'हे ब्राह्मणा! तुझी भक्ति पाहून मी प्रसन्न झालेलो आहे. परंतु तुला या जन्मात मिळू शकेल असे नाही. पुढच्या जन्मी मी तुला अवश्य मिळेन.' हरिरायचे डोळे उघडले तो स्वप्नाचा विचार करुं लागला. जर या जन्मी ईश्वर मिळणार नाही तर जीवंत राहून काय करु ? दृढनिश्चय करुन हरिरायने अन्नजलाचा त्याग केला. महाकालेश्वराच्या देवळात जाऊन शांत चित्ताने एकाग्र मनाने ध्यानमग्न झाला. अन्नपाण्याविना शरीर फक्त दुर्बळ हाडकाचामडचाचे राहिले. त्या समयी त्याची बहिण तेथे येऊन त्याची ती अवस्था पाहून खूप रडत अश्रुढाळी. तीने घरुन येतांना सोबत साखर घालून दुध आणून भाऊला प्यायचा खूप आग्रह केला. त्याने इन्कार केला. परंतु बहिणीच्या डोळ्यातून वाहात असलेल्या अश्रुधारा पाहून त्या समयी तर दुध पिऊन गेला पण फिरुन काहीही न आणण्याची तिला सक्त ताकीद दिली. परंतु बहिणीची अपार माया प्रेम पाहून त्याचे हृदय द्रवले. त्याने म्हटले,

बहेनी मारी निरखी तमारु मुख, दिलना दुःख गयारे लोल ।
भवोभव रहे संगाथ आ भव, भेळा थयारे लोल ॥
वीरा मारा लीधो योगीनो वेश, जीवोने तारवारे लोल ।
करी बहेनीने याद भवजळ, तारवारे लोल ॥

तीच ही भाभारामची बहिण या जन्मी कीकीबाई रुपाने येऊन मिळाली. कीकीबाई खरोखरच धन्य झाली व तिचे जीवन मंगलमय झाले. तिने बैलगाडी तिथेच सोडली आणि दोघ मुलाबरोबर संताच्या कुटीरा जवळच निवासस्थान केले. भाभारामच्या ध्यान साधना काळात तिने अपार परिश्रम करुन संताची सेवा केली. कालांतराने भाभारामचा कीर्तिसुगंध आजुबाजूस पसरु लागला. अनेकानेक पीडीत जीवात्मे आपल्या भौतिक सुखाच्या अभिलाषेने संतचरणावर

झुरू लागले त्या सर्वांचा दुःखभार कमी करण्यास्तव दोघं बंधु–भगिनी रात्रंदिवस झटू लागले. परदुःख पाहुन त्यांच्याच हृदयात पीड पडे, तो दुर करण्याकरितां उभयतांनी आपल्या आत्मबळाचा अधिकाधिक विकास केला.

भाभाराम एकदा ध्यानमग्न असतां काही योगीलीक रस्त्यांने जात असता त्याच्या आश्रमानजिकच विश्रांतिसाठी थोडावेळ बसले. ध्यानमग्न झालेल्या भाभारामकडे बघून त्यातील एक योगी दुसऱ्यांना सांगू लागला, 'अरे हा तर आपला इंद्रकील पर्वतावरील तपेश्वरी योगी. आपला २४ वर्षांचा तपश्चर्येचा अपूर्ण राहिलेला कार्यभाग पूर्ण करण्याकरितां येथे येऊन राहिला आहे.' असे म्हणून त्या योग्याने योगी अडबंगनाथाने आपल्या सर्व साथीदारांना म्हणजे योगी जान्हवीदास, योगी सतानंदजी, योगी रसीकनाथ वगैरे सर्व संघाला त्याचा पुनर्भव सांगून भाभारामला योगनिंद्रेतून जागविले. संत भाभारामला सर्व सिध्द पुरुष साथीदारांचे दर्शन होऊन फारच आनंद झाला. अतिशय उल्हसित अंतःकरणाने ते एकमेकांना भेटले. अनेक ज्ञानचर्चा झाल्या, भाभारामने जिज्ञासेने आपल्या पूर्व जन्मातील हकिकत विचारल्यावरुन योगी अडबंगनाथांनी ती निवेदन केली.

'भाभाराम! तुझ्या एकाच काय पण तीन जन्मांची मी तुला आठवण करुन देतो. त्यापैकी पहिला जन्म तुझा उज्जैन शहरात दिनकरराय ब्राह्मणाच्या घरी हरिराय नावाने झाला. बालपणापासून भगवान सदाशिवाच्या दर्शनाचा अनुराग झाला. भगवान महाकाळेश्वराच्या मंदीरात जाऊन बरीच तपश्चर्या ध्यान धारणा केली पण भगवंतानी स्वप्नात कौल दिला की या पुढील जन्मी तुला माझे दर्शन होईल. भगवंताच्या विरहाने झुरुन झुरुन शेवटी तू देहत्याग केलास. त्याच वेळी या तुझ्या बहिणीने तुझ्या साधना काळात अपार परिश्रम करुन तुझी सेवा केली व वारंवार तुझ्या योगसाधनेत खंडना पडू नये म्हणून तुला सदैव जागृत ठेवले. तिने धैर्य देऊन तुला बरेच समजावले पण अन्न पाण्याचा त्याग करुन तू आपला देह टाकलास ती ही साध्वी कीकीबाई सुध्दा योगभ्रष्ट होऊन आपले ऋण पूर्ण करण्याकरितां इथे तिसऱ्या जन्मात तुजजवळ आलेली आहे. तुझा दुसरा जन्म भगवान सदाशिवाच्या विरहाने झुरुन शरीर त्याग केल्याने मोक्षधाम अशा काशीपुरीत पंडित अनंतानंदाच्या घरी पुत्र करुणानंद नावाने जन्माला आलास भगवान सदाशिवाच्या दर्शनाच्या अभिलाषेने तू ज्योतिर्लींग काशिविश्वेश्वराचे पूजन सुरु केले. अनन्य प्रेम भावाने तळमळीने भगवंताचे आराधन केले. शेवटी कृपाळू भगवंताने दर्शन देऊन तुला म्हटले हे 'ब्राह्मण! मी तुजवर प्रसन्न आहे. तुला जे मागायचे असेल ते माग.' तू म्हटलेस 'प्रभु! मी दुसरे काय मागू. फक्त तुझ्या दर्शनाची अभिलाषा होती. माझा हा मौलिक मनोरथ आज सिध्द झाला. भगवंता मी एकाग्रतेने तुझे ध्यान करुं शकलो नाही तेवढा मनोरथ पूर्ण करावा' हीच याचना तू भगवंताला केल्याने भगवान शंकरानें हा तुझा मनोरथ पूर्ण होण्याकरिता सांगितले, 'करुणानंद! तुझी अभिलाषा पूर्ण होईल. उत्तराखंडात जाऊन एकाग्रतेने ध्यानमग्न हो, तू योगी होशील आणि सदैव माझा अनुरागी राहशिल.' असा शुभाशिर्वाद देऊन भगवान अंतर्धान पावले.

भगवंताच्या संकेतानुसार तू इंद्रकील पर्वतावर जाऊन तपश्चर्या सुरु केलीस. समयाचे भान राहिले नाही. रात्रंदिवस सारखा ध्यानयोग तू सुरु केलास. आहार निद्रेचे नियंत्रण केलेस योगी पुरुषाप्रमाणे २४ वर्षेपर्यंत तपश्चर्या केलीस. तुझ्या प्रेमसाधनेने भगवान शंकर दयार्द्र होऊन तुला दर्शन देण्याचा समय नजिक आला पण त्याचवेळी एक अकल्पित घटना घडली. स्वर्गलोकाकडून पद्मरेखा नांवाची अप्सरा इंद्रकील पर्वतावर उतरली. कर्मधर्म संयोगाने फिरत फिरत तू जेथे तप करीत होतास तेथेच आली. एकवेळ तिने तुजकडे पाहिले आणि ती विव्हळ झाली. तुला जागविण्याकरितां आणि रिझविण्याकरितां तिने खूप प्रयत्न केला. हावभाव, नृत्यझंकार, राग तान आलाप गायन सर्व प्रकार तिने करुन पाहिले. शेवटी तालबध्दनृत्य आणि नुपुरांच्या झंकाराने योगतंद्री तुटली. अचानक डोळे उघडले. जीवनात स्त्रीला पापदृष्टीने ज्याने पाहिले नव्हते त्या योगी पुरुषाने त्या अप्सरेची मोहिनीमूर्ति पाहताच मोहांध झाला. आणि कोणताही विचार न करता त्याने त्या मन मोहिनीला बाहुपाशात घेतले. अप्सरेला तेच हवे होते. तिचे खरे मनोरथ पूर्ण झाले. ती योग्याच्या हृदयात समावली गेली.

वेरण वासना विषय किटमे बोया,
चोवीस सालकी तपशी तपस्या खोया ।
योगी अपने कर्मपे बहुरी रोया,
बम्मन तुम बीरथ आयु बिगोया ।।
योगी तू फिरभी योगी रहाय ।।

वैरीण वासना विषयकीचडमध्ये बुडाली, परमानन्द प्रभुच्या प्राप्तिकरिता केलेली तपश्चर्या व्यर्थ गेली. साँवरी सुरत मूर्तीचा बळी पडला घडी भराच्या क्षुद्र विषयानंदात चोवीस वर्षाची तपश्चर्या घालवून टाकली. नशाबाज मनुष्याची नशा उतरल्यानंतर तो जसा पश्चात्ताप पावतो, स्वस्थ झाल्यानंतर तुझ्या हृदयात सुध्दा दारुण संतापजागृत झाला. 'योगी तू भोगी बनून हे काय केलेस? चोवीसवर्षाच्या तपश्चर्येवर पाणी फिरविलेस. आपल्याला हे काय विपरीत सुचले ? स्वतःच्या कर्मावर चिडून डोके फोडून पश्चात्ताप करुं लागला. नयनातून अपार अश्रुधारा वाहू लागल्या.

योग्याला प्राप्त करुन आनंदसागरात सुखावलेली पद्मरेखाजवळच शांत बसलेली होती. योग्याचा दारुण संताप पाहून तिच्या हृदयातून सुध्दा घडीभराचा आनंद विलयाला गेला, कारण योग्याला भ्रष्ट करण्याच्या उद्देशाने काही ती आलेली नव्हती. अनायासे त्याच्यावर तिचीदृष्टी पडली. योग्याचे दिव्य तेज प्रभा पाहून तिचे स्त्री हृदय उचंबळले आणि त्याला प्राप्त करून घेण्याची नैसर्गिक अभिलाषा तिच्या हृदयात जागृत झाल्याने तिने प्रयत्न केला. त्यात ती सफळ झाली. पण महापुरुषाच्या आत्मकल्पांताने तिचे हृदय हेरावले. पण आता काय करावे ?अचानक प्रीति झाली. कोणाला काय माहित की मागाहून पश्चाताप होईल,

जो मैं ऐसा जानती, प्रीत किये दुःख होई ।
नगर ढंढोरा फेरति, प्रीत कियो मत कोई ।।

'ब्राह्मणा ! तू हे काय केलेस ? काशीहून हिमगीरीला आलास ! योगभ्रष्ट झालास! जर अशाच रीतीने जीवन जगायचे होते तर संसारात राहून काळनिर्गमन केले असतेस तर काय झाले असते. ब्राह्मणा ! तू आपले अमूल्य आयुष्य व्यर्थ की रे गमाविलेस !' अशा प्रकारे आपल्याच कर्माला दोष देत स्फूंदत स्फूंदत तू पश्चात्ताप करीत आहेस तोच योगी पुरुषाच्या या कल्पान्ताच्या कळकळाटाने जागृत होऊन मी त्वरीत तुजजवळ आलो. तुझ्या पाठीवरुन हात फिरवून तुला धीर देत म्हटले, 'योगीपुरुषा! अधिर बनून रडू नकोस. योगभ्रष्ट झालास तर काय झाले. जेथून भुललास तेथून फिरून मोजून काढ ! भानावर ये ! तू योगी आहेस. पुनः योगीच होशिल, तुझी कधीही अधोगति होणार नाही.' माझे हे आश्वासन ऐकून तुझ्या हृदयातील संताप कमी झाला. तू परत ध्यानमग्न होण्यास स्थिर झालास हे पाहून अप्सरा तुला वंदन करून म्हणाली, 'योगीराज ! मी जाणून बुजून काही आपला तपोभंग करण्यासाठी आली नव्हती पण आपले दिव्य स्वरुप पाहूनच माझ्या हृदयात प्रेम जागृत झाले व आपणास प्राप्त करण्याची दृढ अभिलाषा जागृत झाली आणि शेवटी आपण मला मिळालात पण आता आपण ध्यानमग्न झालात तर माझे काय होईल ? मला पुन्हा केव्हा प्राप्त व्हाल ? ' तू म्हटलेस 'देवी एकदा भ्रष्ट झालो पण आता या देहाने तुला पुन्हा प्राप्त होणार नाही. तुझा प्रबळ अनुराग असलाच तर पुढील जन्मी तो पूर्ण होईल असे म्हणून तू ध्यानमग्न झालास. भगवंता एकदा मी तुझीशुध्द हरपली परंतु आता भुलणार नाही. मला पदरात घ्या. हरिस्मरण करीत करीत तू देहत्याग केलास. तोच करुणानंद योगी या जन्मी कुणबीकुळात जन्मून भाभाराम या नांवाने अवतरलास. भाभाराम हा तुझा तिसरा जन्म आहे. पद्मरेखा तीच तुझी रोहिणी होती. भगवान श्रीकृष्णाच्या वचनाप्रमाणे तू योगीच राहिलास. इंद्रकील पर्वतावर चोवीस वर्षाची बाजी जी तू हरला होतास ती तपश्चर्या करुन तू परमानंद प्रभुला प्राप्त करुन परिपूर्ण केलीं आहेस. आतापर्यंत तू हे सारे विसरला होतास पण आता तुला या तुझ्या साऱ्याच अवतारांचे यथार्थ दर्शन झाले. आता तुझा परममित्र संत नायाजी तुझ्या जवळ येऊन योगध्यानाविषयी चर्चा करील. आम्ही जातो. ' असे म्हणून भाभारामचा प्रणाम स्विकारुन योगी अडबंगनाथ व इतर योगी पुढच्या प्रयाणास लागले.

संत बीज पलटे नही, जो जुग जाय अनंत ।
उंच नीच घर अवतरे, पण आखिर संतको संत ।।

तीर्थाटनाला निघालेले संत नायाजी पावन पर्यटन करीत चंपक वनात आले. संत भाभारामच्या स्थानी त्यांच्या जवळ येऊन योगी पुरुषाचे दर्शन घेतले. उभयता योगी एकमेकास भेटले संत नायाजीने भाभारामचे यशोगीत गायीले.

धन्य चरोतरकी भूमि, धन्य भोम वसो गाम ।
धन्य जा कुळमे उपने, योगी संत भाभाराम ।।


भाभारामने प्रति उत्तर दिले. :–

नायाजी तुमी योगी हो, फिरते परहितकार ।
योगी कथा सुनाईये, किसविध हुआ उध्दार ।।



चित्र नंबर ९, वर १ पद्मरेखा अप्सरेवर मोहित होऊन योगी करुणानंदाचा तपोभंग. २ योगी अडभंगनाथांचा करुणानंदास उपदेश.
खाली – ३ भामाराम – रोहिणीचा विवाह. ४ भामाराम – रोहिणीचे मुली गृहस्थजीवन.

चित्र नंबर १८ संत भामारामला संत नामाजीकडून क्षणात विश्वज्ञानोपदेश.



'नायाजी ! तुम्ही पण योगी पुरुष आहांत. कशारीतीने तुमचा उध्दार झाला आणि पूर्वजन्माचे भान झाले, ती कथा मला सांगावी. योगीयांचे पावन चरित्र ऐकण्याची मला फार इच्छा आहे. भाभारामची जिज्ञासा जाणून संत नायाजी म्हणाले.

'भाभाराम ! मी तर एक अधमाधम लुटारु होतो. ठाकरडा कुळात जन्मून लुटमारीचा धंदा करुं लागलो. कर्मधर्म संयोगने अनुग्रहाचे दिवस निकट आले आणि सद्गुरुंचे आगमन झाले. त्या महापुरुषाने मला लुटमार चोरीचा धंदा सोडायला लावून माझ्या मूळ स्वरुपाचे भान करविण्यास माझ्या पूर्व जन्मीचा वृत्तान्त सांगितला. भाभाराम म्हणाला, 'महाराज ! हे सद्गुरु कोण ? त्यांचे नांव काय ? ' नायाजी म्हणाले, 'भाभाराम ! माझ्या सद्गुरुंच्या गतीचे वर्णन माझ्याने यथार्थतेने होऊ शकणार नाही. एका समयीच्या माझ्यासारख्या अगणित पातक्याचा सुध्दा त्यांनी अपार करुणेने उध्दार केला. मला जागृत बनवून या मार्गास लावले, त्या महापुरुषाचे नांव सद्गुरु इमामशाह हे होय. ज्याने मला नराधमामधून नरोत्तम बनविले त्या माझ्या परम प्रेमळ सद्गुरुंनी माझ्या पूर्वीच्या तीन जन्मांचे दर्शन करवून भगवंताच्या दिव्य स्वरुपाचे दर्शन घडविले व धन्य केले. तेथूनच मी जागृत होऊन सद्गुरुकृपेने प्राप्त झालेल्या या दिव्य ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरवून लोकांमध्ये धर्म जागृति करवीत फिरत आहे.'

भाभाराम म्हणाला, 'नायाजी मला आपला परम पावन पूर्वजन्म वृत्तान्त ऐकायचा आहे. तो आपणास कोणी आणि कसा सांगितला ते मला आधी सांगा.'

नायाजी म्हणाले, 'ऐका तर योगीराज ! मारवाडमध्ये 'जायल रियासत' मध्ये देवानन्द स्वामीचे पुरातन स्थान आहे. त्या महापुरुषाने जेव्हां महाप्रयाणाची तैयारी केली तेव्हा व्याकूळ झालेल्या जनतेला आश्वासन देऊन त्यांनी सांगितले आता तर सद्गुरु तुमच्या दृष्टीआड होत आहेत पण सोळाव्या पिढीत अवतार धारण करून मी पुनः या ठिकाणी येईन. मुलतान शहरात एक वणिक्गृहस्थ संतान प्राप्तिसाठी संतांची सेवा करत असतां एका महापुरुषाने त्यास आशिर्वाद दिला 'बेटा, तुझा मनोरथ पूर्ण होईल. तुला एक पुत्र होईल पण साधुचा लाल असल्याने तो वैराग्याच्या वाटेने निघून जाईल.

महापुरुषाच्या आशिर्वादाप्रमाणे वणिकाला पुत्र झाला. त्याचे नांव सोहंनाथ ठेवले. बारा वर्षांचा झाल्यानंतर एका महापुरुषाचे तेथे आगमन झाले. त्याच्याबरोबर सोहंनाथ सुध्दा उत्तरखंड हिमालयात नर नारायण पर्वतावर जाऊन ध्यानमग्न होऊन गेला. कित्येक वर्षांनी ध्यानमुक्त- झाल्यानंतर योगीराज आपल्या आसनावरुन उठला व गिरीकंदरामधून खाली उतरला. मानव कल्याणासाठी विराट मार्गाने विचरण करुं लागला. त्या सोहंनाथाचे मारवाडमध्ये आगमन झाले.

माझा प्रथम जन्म मरुभूमी मारवाडमध्ये राठोड कुळात झाला होता, त्या समयी माझे नांव झुंझारसिंह होते. सत्संग आणि संतसेवेत अनन्य प्रेम होते. एके दिवशी सोहंनाथ गुरुदेवाचे अचानक घरी आगमन झाले. माझे भाग्य जागृत झाले मी त्या महापुरुषाचे स्वागत सत्कार करून

प्रेमाने सेवा केली. त्यांचे चरण धुऊन चरणामृत घेतले. माझ्याघरचे सर्वचलोक त्या दिवशी पावन झाले. प्रसन्न होऊन योगीराजांनी मला मनोवांछित मागण्यास सांगितले. 'महाराज ! केवळ एकच वर मला मागायचा आहे. मला आवागमनातून मुक्त करावे. हे जन्म मरण फार दुःखदायक आहे म्हणून लक्षचौऱ्यायशीच्या फेऱ्यातून मला सोडवा.' माझी ही याचना श्रवण करताच संत अवाक् झाले, त्यांनी थोडावेळ ध्यानमग्न बनून सांगितले. 'राठोड ! तू जी याचना केलीस ती या जन्मात सिध्द होऊ शकणार नाही. कारण की तू जे वचन देऊन आलेला आहेस ते पूर्ण करण्याचा समय जवळ आलेला आहे. त्या बंधनातून तू सुटू शकणार नाहीस.

राठोड अगले जनममे, योगी थे ब्रह्मानन्दजी ।
बडी तपस्या कीनी, ठाडे उत्तरा खंडजी ।।
पर्यटनमे वामा मिले, किये कोल धरे ही पींडजी ।
राठोड अब तो राहचुके, पूर्व जन्म मिटे फंदजी ।।
मुरधर देशसे गुर्जर धरामे, ज्ञानी संतका हुवे मिलान ।।

झंझारसिंह ! तूं गतजन्मी ब्रह्मानन्द स्वामी नावाचा योगी पुरुष होतास. महान तपस्वी होतास. हिमालयाच्या गिरीकंदरात महान कठिण तपश्चर्या केलीस. कित्येक वर्षांनी तपश्चर्या पूर्णकरुन खाली उतरलास आणि पावन मार्गाने प्रयाण केलेस. त्या समयी एका युवतीने तुझी मनोभावे सेवा केली. प्रसन्न होऊन तू तीला मनोवांछित मागायला सांगितले. तिने म्हटले, 'महाराज ! आपण माझ्यावर प्रसन्न झाले असाल तर तुम्ही माझे स्वामी व्हा. पतिरुपाने आपली सेवा करावी हीच एकमेव इच्छा आपण पूर्ण करावी.' युवतीची याचना ऐकून तू सुन्न झालास. तिने तुला धर्मसंकटात टाकले. वचन तर दिलेले होते. तें पूर्ण करणे कर्तव्य होते. तू तिला म्हटलेस 'देवी ! या जन्मी मी योग्याचा देहधारण केलेला आहे. मी योगभ्रष्ट होऊ शकत नाही. पण पुढील जन्मी मी तुला जरुर मिळेन आणि तुझी याचना पूर्ण करीन. असे तिला आश्वासन व वचन दिले. हर्षातिशयाने ती युवती तेथून निघून जाऊन तुला प्राप्त करून घेण्याकरिता तपश्चर्या करून शेष जीवन हरिस्मरणात घालवू लागली.

त्या भाग्यवान युवतीला दिलेले वचन पूर्ण करण्याकरिता तू या जन्मी येथे अवतार धारण केलेला आहेस. ती युवती थोड्याच दिवसात तुला येऊन मिळेल. त्या रुपवतीच्या प्रेमात तू भान भुलून संसारात पूर्ण बध्द होशील म्हणून आवागमनाच्या फेऱ्यातून मुक्त होऊ शकणार नाही. पण पुढील जन्मी तू गुजराथमध्ये जन्म घेशील. तेथे एका परम विशुध्द ज्ञानी संताचे मंगल मीलन होईल. त्या महापुरुषाच्या दर्शनाने तू खरोखरच पावन होशिल. ते संत पुरुष तुझ्यावर अनुग्रह करतील आणि सत्याचे दर्शन करवतील त्या समयी तुला तुझ्या योगीस्वरुपाचे भान येईल व तूं मुक्त होशील. बेटा ! झंझारसिंहा ! अशा प्रकारे तुझा अनुग्रहाचा समय अजून बराच दूर आहे.'

अशा प्रकारे चेतावणी देऊन योगी निघून गेले. काळाच्या प्रवाहात त्यांनी भाकित केलेले सारे खरे ठरले, ती देवांगना भट्टीवंशात रंभादेवी नांवाने जन्माला आली, वचन दिलेल्या प्रमाणे

झुंझारसिंहाच्या संसारात आली. काळनिर्गमन होऊन रंभादेवीच्या प्रेमसागरात बुडालेला झुंझारसिंह मुग्ध होऊन परवश झाला.

एकदा रणशिंग ऐकून सर्व राजपूत युध्दावर जाण्याची तयारी करु लागले. झुंझारसिंहाने सुध्दा रंभादेवीचा निरोप घेऊन युध्दावर प्रयाण केले. तिने प्रेमाने पूजन करुन आपल्या स्वामीला युध्दावर रवाना केले. त्यात राठोड वीरगति पावला व पुढील जन्म गुजराथ मधिल ठाकरडा कुळात होऊन तो लुटारु बनला त्याचे नांव नायाजी लुटारु. याच लुटारुला सद्‌गुरु इमामशाहा येऊन मिळाले व त्यांनी या नायाला नरामधून नरोत्तम बनविले.

भाभाराम ! अशी आहे माझी अवतार कथा. सद्‌गुरु इमामशाह महाराजांनी मला माझ्या दिव्य स्वरुपाचे दर्शन करवून तीन अवतारांचे भान करविले आणि मला युगधर्माचे भान करविले. त्या योगे मी जागृत झालों. भाभाराम ! तू स्वतः योगी आहेस म्हणूनच मला यथार्थतेने ओळखलेस. सद्‌गुरु इमामशहांच्या अनुग्रहाने लुटारुचा संत झालो आणि आता मानव कल्याणाकरिता विराट् पंथाने पावन पर्यटन करीत आहे. भवाटवीत भुललेल्या–भरकटलेल्या जीवात्म्यांना जागवीत फिरून मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. भाभाराम ! आपल्या सारख्या योगी पुरुषाच्या समागमाने हृदयात अवर्णनीय आनंद होत आहे. खरे म्हटले तर आपण उभय गुरुबंधु या जन्मी तर मिळालेलो आहोत पण पूर्वजन्मी सुध्दा मिळालेलो होतो. आता या जन्मी तर एकमेकांच्या विरहाने कधीही राहू शकणार नाही. आपणा उभयतांना सद्‌गुरु महाराजांच्या अनुग्रहाने सोपविलेले लोक जागृतीचे कार्य पूर्णकरून एकाच समयी या जगतातून प्रयाण करायचे आहे.'

भाभाराम म्हणाले 'नायाजी ! आपणास ज्या सद्‌गुरु इमामशाहांचा समागम झाला त्या पावन पुरुषाच्या दर्शनाची अभिलाषा आहे म्हणून एकदा त्या संतपुरुषाचे दर्शन होईल असा योग सिध्द करा.'

'भाभाराम ! आपली अभिलाषा लवकरच सिध्द होईल. एकदिवस आपल्या या स्थानात सद्‌गुरु इमामशाह महाराजांचे जरुर पदार्पण होईल. त्या दिवशी आपल्या हृदयात खरोखर अननुभूत परमानंद प्रगट होईल.' असे म्हणून संत नायाजी भाभारामच्या आश्रमातून प्रयाण करीत आहे तोच आपला परमसेवक हाजरबेगसह सद्‌गुरु इमामशाह महाराजांचा रथ तेथे दाखल झाला.

भाभारामको भेटिया, इमामशाह गुरु पीर ॥
सोही संतके चरणमें, वंदहू गुण गंभीर ॥
नायाजीकी संगमे, आये इमामशाह ॥
भाभाराम के धाममें, बैठ गये बादशाह ॥

अकल्पित रीतीने तीनही योगियांचा समागम झाल्याने सर्वांना अत्यानंद झाला. संत नायाने व संत भाभारामने सद्‌गुरुचरणी लोटांगण घातले. दोघांना आपल्या हाताने उठवून इमामशाहांनी आपल्या हृदयाशी लावले.

जा घर योगी अवतरे. धन्य माता पिताय ।
धन्य धन्य तेही कुळको. धन्य वे धरती माय ।।
भाभाराम तुम योगी हो, धन्य तेरो अवतार ।
योगीको तुमी पेखिया. योगी सोही निर्धार ।।

सद्‌गुरु इमामशाहांनी आपल्याला योगी म्हणून संबोधले हे ऐकून भाभाराम म्हणाला, 'शाहसाहेब ! मला आश्चर्य वाटते की मी योगी नसून सुध्दा आपण मला योगी म्हटले हे कसे?'

मोहे बडो अचरज भयो, सुने गुरुके बेन ।
मोहे योगी कैसे लिखे, हियरा होत बेचेन ।।
संत बचन पलटे नही, भाभा तू मत भूल ।
योगी सोही योगी बने, तामे न संशय शूल ।।
सद्‌गुरु बानी आपकी, हियरा हुई निश्चित ।
रोम रोम ही रम रही, खटक रही दिल चंत ।।

'भाभाराम ! संत पुरुषाच्या मुखातून असत्यवचन कधीच निघत नाही. तूं योगी होतास आणि या जन्मी सुध्दा योगीच आहेस. ह्या गोष्टीत किंचीत सुध्दा संशय नाही.'

भाभाराम म्हणाला, 'सद्‌गुरुनाथ आपली वाणी श्रवण करताच माझे हृदय पुलकित झाले आणि रोमरोमात आपले शब्द घुमत आहेत.'

योगी जनके संगमे, योगी पावे मोज ।
पीर बडे इमामशाह, किये हक्ककी खोज ।।
भाभारामकी संगमे, लगे साईको रंग ।
ज्ञान गोष्टी बहुरी किये, हियरा जगे उमंग ।।

योगी पुरुषाबरोबर योगी पुरुषालाच आनंद वाटतो. त्याप्रमाणे महापुरुष इमामशाह पण योगसिध्द पुरुष होते म्हणून भाभारामला जवळ बसवून त्यांनी त्याच्याशी ज्ञान गोष्टी केल्या. अत्यंत आनंदभरीत व अर्थगर्भ असा त्यांचा वार्तालाप झाला.

पीर इमामशाहको अथर्ववेदका ज्ञान ।
सोही भाभारामसे, साई कह्यो बखान ।।
योग वासिष्ठ बखानके के, साहिब दियो सुनाय ।
ता दिन भाभारामको, अखंड आनंद पाय ।।

सद्गुरु इमामशाह अथर्ववेदाचे ज्ञाते होते. अथर्ववेदीय योग ध्यान ब्रह्मविद्या, आत्मशोधन समाधीयोग, राजयोग, भक्तियोग, ज्ञानयोग वगैरे संबंधी बरीच ज्ञान चर्चा झाली. युगधर्मानुसार प्रचलित ध्येय पुरुषाची उपासना, उपासनेचे माध्यम कलशपूजा, ज्योतिस्वरुप आत्म्याचे ध्यान चिंतन व लय योग यांची चर्चा होऊन काळाची अपरिमीत गति, मायेचे स्वरुप, मायापतीचे रहस्य वगैरे बाबतीत योगवासिष्ठ्यातील ज्ञानचर्चा सत्संग होऊन सर्वांची मने तृप्त झाली. भाभाराम, नायाकाका, कीकीबाई यांच्या हृदयात अखंड आनंद झाला. बरेच दिवस पर्यंत सद्गुरु महाराजांचा मक्काम तिथे राहिला. आजूबाजूच्या पंच क्रोशीतील अनेकानेक विद्वान लोक ही ज्ञानचर्चा ऐकण्यास येत. भाभारामच्या आश्रमास यात्रेचे स्वरुप आले. भाभारामचे मन वारंवार गुरु प्रेमाने व त्याच्या प्रभावाने मोहरुन येई, त्याच्या जीवनात हा अननुभूत आनंद अपूर्व होता.

वंदहु शाह इमामको, ज्ञानीकी गति ओर ।
अैसे संतके चरणमे, सदा रहहुं करजोर ।।
इमामशाहके चरणमें, झुक गये भाभाराम ।
प्रगट पीरको पेखलो, जो चाहो आराम ।।

सद्गुरु इमामशाहांचे खरे स्वरुप योगी भाभारामने तत्काळ ओळखले. तो वारंवार त्या महापुरुषाच्या चरणावर झुकू लागला. सद्गुरु इमामशाह जाण्याकरिता उठले. त्या समयी भाभाराम त्यांच्या चरणी दीनतेने झुकला. त्याच्या विनयाने सद्गुरु प्रसन्न झाले आणि शुभाशिष देऊन जाऊ लागले. परंतु त्या महापुरुषाला वंदन करुन भाभारामने जगताला समजाविले की तुम्ही प्रगट ब्रह्माला ओळखा. ब्रह्मस्वरुप महापुरुषाला जाणा तरच तुम्हाला जीवनात खरी शांति प्राप्त होईल. तुम्हाला खरोखर आराम हवा असला तर म्हणजे जन्म मरणातून निवृत्त व्हायचे असेल तर अशा ब्रह्मरुप सद्गुरुला जरुर ओळखा. त्यांनाच शरण जा. त्यांच्याच चरणाची पूजा करा.

प्रत्येक पात्र परखीने प्रेमे पूजो पाये ।
चौद भुवननो धणी प्रगट छे जुगमाहे ।।

भाभारामचे हे शब्द हृदयात कोरुन ठेवण्यासारखे आहे.

पीर फकीर संसारमे, आये परहितकार ।
ज्ञानी मुँह मत मोडीये, देखत कीजे जुहार ।।

सद्गुरुंच्या समागमानंतर ब्रह्ममय झालेल्या भाभारामच्या जीवनात खूपच स्थित्यंतर घडून आले. त्याचा कीर्तीरुपी सुगंध दशदिशात कस्तुरी प्रमाणे पसरु लागला. संपूर्ण मानव मात्राशीच काय पण संपूर्ण भूत प्राणिमात्राच्या चैतन्य स्वरुपाशी तो समरुप झाला. त्याच्या

आश्रमातून वैरभाव, रागद्वेष, मोह, क्रोध, तिरस्कार वगैरे सर्व विकार पळून जाऊन समता शांति आणि आनंदाचे साम्राज्य पसरले. अनेकानेक संत महात्मे, पीर फकीर, विदुषी साध्वी त्यांच्या जवळ येऊन गेले. प्रत्येकाने त्या लोकोत्तर विभुति जवळ मनमोकळेपणाने ज्ञानचर्चा करुन आपले मन. शुध्द पवित्र पावन करुन घेतले. पारसमण्याच्या संपर्कात आलेले गंजलेले लोखंड सुध्दा आपला स्थायी भाव सोडून सुवर्णमय होते तर या चैतन्य स्पर्शमण्याच्या सान्निध्यात आल्यानंतर कोण अतृप्त राहणार आहे ?

साध्वी कीकीबाईने आपल्या परीने होता होईल तेवढी सेवा चाकरी करुन येणाऱ्या जाणाऱ्यांचा स्वागत सत्कार केला. भुकेल्या रंजलेल्या गांजलेल्यांची स्वतः जातीनिशी लक्ष देऊन तिने सर्वांना भरविले व तृप्त केले. ज्ञान बोध देऊन भाभारामने तृप्त करावे व भोजन निवारा देऊन कीकीबाईने तृप्त करावे अशा प्रकारचे त्यांचे आश्रम जीवन अगदी सुखकारक रीतीने सुरु झाले.

चरोतर विभागातील पेटलाद या गावी सुनीति आणि निजानंद हे ब्राह्मण दाम्पत्य राहात होते. बरेच वर्षेपर्यंत ते संतानहिन होते. मनोभावाने संत सत्पुरुषांची सेवा चाकरी करुन काल व्यतीत करीत. उभय पति पत्नि सुसंस्कारी असल्यागुळे सदैव सेवापूजा, भजन, पूजन, स्वाध्याय ते करीत असत. संतांच्या आशिर्वादाने बऱ्याच दिवसांनी त्यांचा मनोरथ फळला. ब्राह्मणी गर्भवती झाली परंतु नऊ दहा महिने वर्षही होऊन गेले तरी प्रसूत होत नव्हती. मातेची वेदना तीव्र होत होती. बरेच उपचार केले पण व्यर्थ. एक नव्हे दोन नव्हे पूर्ण सात वर्षे निघून गेली. मोठ मोठे वैद्य, हकिम, देवभक्तऋषि वगैरे सर्व उपचार केले पण व्यर्थ. शेवटी कोणी अनुभवी व्यक्तीने चंपक वनात जाण्याची सल्ला दिली. संत भाभारामच्या चरणी येऊन त्या सुनीतीने आपली दारुण व्यथा निवेदन केली.

सप्त साल प्रसव नही होवे, गर्भ बसेरा हे दुःखदाय ।
ज्ञानी पुरुष वे मायासे, भाग रहे सदा मुक्ताय ।।

' महाराज ! दुःखाची गोष्ट कोणाला जाऊन सांगावी. सातवर्षांचा गर्भ पोटात आहे. पण सहजासहजी प्रसव होत नाही. कोणी दैत्य तर या गर्भात वसलेला नसेल ? महाराज ! आता तर मरण आलेलं बरं, कारण ह्या वेदना मला असह्य झाल्या आहेत.'

' माते ! दुःख विव्हल होऊन तूं जे बोलायला नव्हे ते बोलत आहेस तुझ्या गर्भात दैत्य नाही पण कोणीतरी देव पुरुष–संत पुरुषाने वास्तव्य केले आहे. मायेपासून सर्वदा मुक्त राहणाऱ्या या महापुरुषाने मनोहारिणी मायेपासून दूर जाण्याकरिता तो गर्भातून बाहेर येऊ ईच्छित नाही. माते ! सांग तुझी ईच्छा काय आहे. येणाऱ्या बालकाला मुक्त ठेवण्याची तुझी इच्छा असेल तर तो जरुर बाहेर येईल. तू जो पर्यंत हे आश्वासन देणार नाही तो पर्यंत तो बाहेर येणार नाही. संत भाभारामचे हे शब्द श्रवण करुन ब्राह्मणीने दृढतेने उत्तर दिले.

मुक्त मेरे लालको, संतनको अर्पायजी ।
अपने घर सिधाइये, बंधन देहो छुडायजी ।।

'महाराज ! आपण म्हणतात ते मला सर्वच मान्य आहे. माझ्या उदरातून पुत्राचा जन्म झाला तर मी त्यास संत चरणी अर्पण करीन मी आपणाशी वचनाने बांधलेली आहे.' असे त्या मातेने संताजवळ कबूल केले. भाभाराम म्हणाले, 'माताजी ! आता तूं निश्चिंत होऊन घरी जा. ज्या महापुरुषाने तुझ्या गर्भाचा आश्रय घेतला आहे तो महात्मा मुक्त होऊन आता बाहेर येईल.'

संत भाभारामला वंदन करून उभय पतिपत्नि घरी पटेलादला आले. घरी येताच सुनीतीने एका सुंदर मुलास जन्म दिला. पुत्राचे मुखावलोकन करताच उभयतांना अपार आनंद झाला. थोडया दिवसानंतर त्या दोघांनी संत भाभारामच्या आश्रमात येऊन बालकाला पाहून आनंदीत झालेल्या भाभारामने बालकाला आपल्या हृदयाशी लावले व म्हटले, 'माताजी, जो मायेतून मुक्त होऊ इच्छित आहे. त्या या बालकाचे नांव मुक्तिराम असे ठेवावे. संताने त्यास मुक्तिराम नांवानेच संबोधिले. दोन घडी संतचरणी बसून शुभाशिर्वाद घेऊन उभय पतिपत्नि आपल्या गांवी परत आले.

बारा बरसके लालको, गुरु चरणमे लायजी ।
भाभारामके लाल सोही, मुक्तिराम कहायजी ।।

बालक मुक्तिरामचे लालन पालन करतांना मातेने अपार आनंदात दिवस व्यतीत केले. ते सुखाचे दिवस कसे निघून गेलें ते समजले ही नाही. आणि अचानक दुःखाचा व शोकाचा समय जवळ आला. बालक मुक्तिराम बरोबर बारा वर्षाचा झाला त्या समयी त्याने स्वतःच संत भाभारामच्या दर्शनाची इच्छा व्यक्त केली. माता जागी झाली. तिच्या हृदयात प्रथमपासून ती भीती होतीच. अज्ञात बालक स्वतः होऊनच संत भाभारामच्या दर्शनाची इच्छा व्यक्त करीत असल्याने तिला ते टाळता येणार नव्हते. तिच्या हृदयात खूप कालवाकालव झाली. बालकाची इच्छा मोडणे शहाणपणाचे नव्हते. हृदयातले दुःख बळाने दाबून ती माता बालकाला घेऊन संत दर्शनास जाण्यास निघाली, निजानंद ब्राह्मण सुध्दा बरोबर जाण्यास तयार झाला. माता पित्याच्या समागमे बालक मुक्तिराम चंपक वनात संतचरणी दाखल झाला. मुक्तिरामने झडपतेने धावत जाऊन ध्यानमग्न झालेल्या भाभारामच्या चरणी मस्तक ठेवले ते उचललेच नाही. महापुरुषाने हळूच डोळे उघडून पाहिले तो मुक्तिराम आपल्या चरणावर पडलेला त्यांनी पाहिला. अपार वात्सल्याने त्याच्या शिरावर हात फिरवून भाभाराम म्हणाले 'बेटा मुक्तिराम ! तू आलास, असे म्हणून भाभारामने त्याला हृदयाशी लावले आणि संताचा तो लाडका सुपुत्र खरोखरच संताच्या हृदयात समावला गेला. थोडयावेळाने स्वस्थ होऊन संताने त्याला मांडीवर बसविले व विचारले – 'मुक्तिराम ! बाळा कशाकरिता आलास ? सुखात आनंदात आहेस ना !'

मुक्तिराम म्हणाला, 'महाराज! बऱ्याच दिवसापासून माझे मन अस्वस्थ झाले होते. आपल्या दर्शनाची ओढ मनाला लागली होती. हृदयातील ही व्यथा मातेला सांगितली. माताजी संमत झाली आणि आपल्या चरणी येण्याची अभिलाषा पूर्ण झाली. दर्शन करुन हृदयात अपार आनंद झाला. आता आपल्या या पावन चरणापासून दूर जाण्याची इच्छाच होत नाही. आपल्या चरणारविंदाजवळ राहूनच काळ निर्गमन करावा हीच मनोकामना! महाराज, आपण मला आपल्या चरणी ठेवून घ्याल ना!'

'मुक्तिराम, तुला येथे माझ्याजवळ राहायचे आहे?'

'होय महाराज, मला या ठिकाणी राहणे फार आवडेल. येथून आता मी कधीही माझ्या गावी जाणार नाही.' बालक मुक्तिरामचे हे शब्द श्रवण करताच माता सुनीतीच्या हृदयात जणू कोणी धारदार सुरी खुपसावी त्या प्रमाणे झाले. तिच्या नेत्रातून घळ घळा अश्रु वाहू लागले. मातेची ही अवस्था भाभारामने दुरुनच पाहिली आणि ते मुक्तिरामला म्हणाले–

'बेटा मुक्तिराम! तू या स्थळी राहू इच्छितोस पण तुझ्या मातेची काय अवस्था होईल? बाळा, जरा मातेच्या वेदनांचा विचार तर करुन पाहा.'

मातेचे नाव ऐकताच बालकाने मातेकडे पाहिले. तिला पाहताच तो व्याकुळतेने मातेकडे गेला व तिला घट्ट मिठी मारुन, म्हणाला, 'माताजी माताजी, तूं रडत आहेस! का म्हणून तू रडतेस? तुझ्या हृदयात एवढी वेदना कसली? माते, संताच्या चरणी राहण्याची इच्छा व्यक्त करताच तुला एवढे दुःख होत आहे तर राहिले. मी येथे राहणार नाही, पण तू रडू नकोस. शांत हो, मी तुझ्या बरोबर घरी येतो. माते तुला माझी शपथ आहे. तू रडू नकोस. मी सदैव तुझाच आहे आणि तुझाच होऊन राहिन.' असे म्हणून मुक्तिरामने मातेचे गरम अश्रु पुसले. अपार वात्सल्याने मातेने आपल्या सुपुत्राला हृदयाशी दाबले. त्या समयी मातेच्या हृदयात जो आनंदाचा महापूर उलटला असेल त्याचे वर्णन करता येणेच अशक्य आहे.

घडीभरानंतर अपार आनंद सुखसागरातून जागी झालेल्या मातेला भूतकाळाचे स्मरण झाले. ज्या समयी गर्भाची सुटका होत नव्हती तेव्हा संत चरणी येऊन आपण आपली व्यथा सांगितली होती. संताने म्हटले होते की, मायारहित अशा मुक्तात्म्याचा जन्म होणार आहे. त्या बालकाला जर तू संसारापासून अलिप्त राखण्याची शपथ घेत असशील तर त्याचा जन्म होईल.' त्यावेळी आपण संमत झालो होतो. आणि वचन दिले होते की त्या बालकाला मी आपल्या चरणी अर्पण करीन. आज तोच बालक स्वतः संतचरणी राहण्याची इच्छा करीत आहे तेव्हा आपण हे भावी बरोबर ओळखले पाहिजे. काळस्वरुप प्रभुच्या अकळीत गतीला जाणले नाही तर विकट भवाटवीमधून मुक्तीची वेळच येणार नाही. माता सुनीति खरोखरच सचेत झाली. वात्सल्य प्रेमाच्या अमृताने भरलेल्या हृदयास तिने वज्राप्रमाणे कठोर बनविले आणि ती म्हणाली –

'बाळा, मुक्तीरामा तुला या ठिकाणी राहणे आवडते ना! बोल बाळा, तुला येथे राहायचे आहे ?' मातेने बालकाला खूप लाडिकपणाने विचारले. बालक अबोलच राहिला. ती परत म्हणाली- 'बेटा, तू बोलत कां नाहीस. मला जबाब दे.' तरी सुध्दा बालक बोलला नाही. तेव्हा व्याकुळतेने मातेने म्हटले, 'बेटा, तु बोलत नसलास तर तुला मातेची शपथ आहे. तुला संत पुरुषाच्याचरणी राहणे आवडते ना ! मी तुला जरूर संमति देईन. बाळा, खुल्या दिलाने जे सांगायचे असेल ते सांग. मी तुझ्या इच्छेच्या आड येणार नाही.'

'माताजी ! आता विचारण्याचे काय बाकी राहिले आहे ? मला विचारण्याचीच गरज नाही. तुझ्या हृदयात काय वेदना होताहेत, अंतरात जे दुःख होत आहे त्या संतापाची व्यथा तू मला विचारीत आहेस. त्या स्थळी राहण्याची गोष्टच विसरुन जा.' बालक मुक्तिरामचे हे शब्द ऐकताच माता अवाक् झाली. घडीभर मौन राहून ती आपल्या बालकाला समजाविण्याकरितां आपल्या हृदयातील व्यथा व्यक्त करु लागली.

'बेटा ! एके समयी तू मातेच्या उदरी होतास. तुझा जन्म होत नव्हता, सात वर्षे निघून गेली पण तुझा जन्म झाला नाही तेव्हा आम्ही या महापुरुषांच्या चरणी आलो. प्रार्थना केली तेव्हा संताने म्हटलें होते, हा बालक कोणी भक्त होईल असे वाटते. तुम्ही याला संसारापासून मुक्त राहण्याची भावना ठेवत असाल तर त्याचा जन्म होईल. आम्ही त्या समयी तुला मायेच्या बंधनापासून मुक्त ठेवण्याचे वचन घेतले, तेव्हा त्या संताच्या करुणेने तुझा जन्म झाला. बेटा, तू या महापुरुषाचाच लाल आहेस म्हणून तू इच्छा व्यक्त करताच तुला येथे घेऊन आलो. जर तुझे मन येथे राहण्यास तयार आहे तर खुशाल येथे राहा. जेव्हा आम्हाला तुझ्या दर्शनाची इच्छा होईल तेव्हा येथे येऊन तुझे आणि संत पुरुषाचे दर्शन घेऊन जाऊ. आता तर तुझी खात्री झाली ना. तू एक संत पुरुषाचा लाडका लाल आहेस. संतच बनून राहशील यात नवल नाही.'

बालक मुक्तिराम म्हणाला 'माताजी, तुझी संमति आहे असे जाणून माझ्या हृदयात जरा बरे वाटले. तू राजी खुशीने मला संताच्या चरणी सोडून जात असली तरच मी येथे राहण्यास खुशी आहे. परंतु अट एवढीच की घरी जाऊन तू रडायचे नाही शोक करायचा नाही.'

'बाळा ! राजी खुशीनेच आम्ही तुला संत चरणी अर्पण करण्यासाठीच आलो आहोत. आम्हाला खरोखर आनंदच आहे माझा पुत्र संत होईल देवभक्त होईल याचा आम्हाला केवढा बरे स्वाभिमान राहिल. जगत्कार्य करण्याकरिता लोक कल्याणाकरितां एक जीवनपुष्प त्याग बुध्दिने आम्ही ईश्वरचरणी वाहिले त्याचा उज्वल कीर्तीरुप सुगंध चौफेर पसरुन आमच्या मनाला किती आल्हाद होईल. बाळा, तुझे हृदय संताचे आहे. ईश्वरीकार्य तुझे हातून घडायचे आहे. आम्ही पामर जीव एक साधनमात्र आहोत, पण बाळा ! आपल्या जीवनाबरोबर तू आमचा जन्म सुध्दा धन्य करशील. तुझ्या सारख्या कुलदीपक पुत्राची मातापितरे होण्याचे भाग्य आम्हाला लाभले. आमचे जीवन धन्य झाले.' हर्षातिरेकाने मातेचे हृदय भरुन आले. आता तिच्या नेत्रातून प्रेमाश्रुंचा पूर लोटला तिने आपल्या बालकाला हृदयाशी दाबून अपार प्रेम केले शेवटी त्याचा हात धरुन संत भाणाराम जवळ त्याला आणून म्हणाली–

'महाराज ! बऱ्याच वर्षापूर्वीची मानता पूर्ण करण्याचा सुयोग आज आलेला आहे. हा बालक आपला आहे. आपणच आम्हाला दिला. या बालकाला आपल्या चरणारविंदी अर्पण करतांना आम्हाला खूप धन्यता वाटते. महाराज ! आजपासून हा पुत्र आपला आहे. त्याचा आपण सांभाळ करावा. असे म्हणत मातेने मुक्तिरामचा हात संत भाभारामच्या हातात दिला आणि त्यांनी सुध्दा अपार ममतेने त्या बालकाला आपल्या मांडीवर बसविले. माता पित्याने संतचरणी वंदन करुन घरी जाण्यास संताची व बालकाची रजा घेतली.

सद्गुरुंच्या आश्रमात राहून मुक्तिरामला परम सुखाची प्राप्ति झाली. एके समयाचा उग्रभावी आत्मा योगी झाला. सोळा वर्षाचा झाल्यानंतर मुक्तिरामने संतचरणी वंदन करुन आज्ञा मागितली की, 'गुरुजी मला ध्यानमग्न व्हायचे आहे' गुरुजींनी सांगितले 'बेटा, तू गिरनारला जा. गुरु दत्तात्रयांना प्रसन्न करुन योगसाधना पूर्ण करुन घे.'

सोळा बरसकी उमरमे, जाय पहूँचे गिरनार ।
ध्यानी बैठे ध्यानमे, रिझे दत्तगुरु दातार ।।

भक्त मुक्तिरामने तपश्चर्येच्या बळाने गुरु दत्तात्रेयाला प्रसन्न केले. दर्शन देऊन-दत्तात्रेयांनी मनोवांछित मागण्यास सांगताच त्याने म्हटले, 'महाराज, आपण सदासर्वदा माझ्यावर प्रसन्न राहावे.' हेच मागणे मागितले. गुरु दत्तात्रेयांनी तथास्तु म्हणून त्याच्या शिरावर वरदहस्त ठेऊन अंतर्धान पावले. हाच मुक्तिराम संत भाभारामचा पुढे पट्टशिष्य झाला. भाभाराम महाराजांनी आपल्या पश्चात त्याला गादी अर्पण करुन निवृत्ति स्विकारली होती.


एकदा भाभाराम आपल्या आश्रमात ध्यानस्थ बसले असतांना एका एकी त्यांना आवाज ऐकू आला. 'भाभाराम ! आपण भेटण्याकरिता कुकसला येणार होता पण अजून कां आला नाही. आताच या. विलंब लावू नका.' हा अगम्य आवाज ऐकून भाभाराम लगेच कुकसला जाण्यास निघाले. आदेश झाल्यावरुन कांहीतरी विशेष असले पाहिजे असे जाणून कीकीबाई सुध्दां त्यांच्या बरोबर जाण्यास निघाली. तेथे जाऊन पोहोचतात तो तिथे संत नायाजी आपल्या सद्गुरु इमामशाहसोबत काही आगम्य गोष्टीबद्दल हितगुज करत असलेले दिसले.

सद्गुरुकी संगमे, शाणाजी आये तेंही ठाम ।
भाभारामको देखते, हियरा पहूँचे हाम ।।
पीर इमाम के चरणमे, बैठे शिर झुकाई ।
साहिबको भली भातसे, दिलकी गती सुनाई ।।

सद्गुरु इमामशाहांच्या सोबत त्यांचा प्रेमी शिष्य शाणाभाई सुध्दा कुकसला आलेला होता. भाभारामला पाहताच शाणाजींच्या हृदयात अपार आनंद दाटून आला. त्यांच्या सोबत बहिण कीकीबाईला सुध्दा पाहून त्या सर्वांना अतिशय आनंद झाला. सर्व आधिकारीक जीवन्मुक्त महात्म्यांचे ते अद्भुत भावमिलन होते. सर्व योगीश्वरांचे हे प्रेममिलन संत नायाजींच्या इच्छेनुरुप कुकस येथे त्यांच्या आश्रमात झाले होते. त्यामुळे नायाजींना विशेष आनंद झाला.



चित्र नंबर ११ सद्गुरु इमामशाह महाराज आपल्या सर्व प्रेमी शिष्यास दिव्यज्ञानोपदेश करीत आहेत.



चित्र नंबर १२ संत भाभारामचे महानिर्वाण. शिवलिंगात ज्योतिस्वरुपाने लीन होणे.

सद्‌गुरु इमामशाहांच्या चरणी मस्तक नमवून योगी भाभाराम त्यांच्या जवळ बसले. अपार वात्सल्यभावाने सद्‌गुरु इमामशाहांनी त्यांना क्षेम कुशल विचारले व आपल्या हृदयातील गुज निवेदन केले.

'प्रिय भाभाराम! प्रिय नायाजी ! प्रेमी शाणाजी ! प्रेमी हाजरबेग ! विदूषी कीकीबाई ! तुम्ही पाचहीजण माझे पंच प्राण आहात. अनंत काळापासून योगविद्येची साधना करीत करीत आज आपण या ठिकाणी एकत्र मिळालो आहोत. आज हे आपले भावमिलन यासाठी झालेले आहे की, आपण ज्या सद् धर्माचे निशाण घेऊन जगात आजवर विचरण केले त्या संतपथ सनातन धर्माला उज्वल यश प्राप्त होवो त्याला पथायोग्य साथ मिळून जन मानसावर या धर्माची चांगली छाप पडून लोकांनी त्या तत्वानुसार आपल्या जीवनाची उन्नति, जीविताचे सार्थक आणि आपल्या समाजबांधवांचा उत्कर्ष करुन घ्यावा. आपल्या जीवनाच्या उन्नतिकरिता आपण आपले कर्माचरण शुध्द पवित्र आणि उन्नत करावे. धर्माची तत्वे फार गहन असतात, बुध्दीच्या चांचल्याने मानवी मन असत्यालाच सत्य समजून स्वतःची व स्वतःबरोबर दुसऱ्यांची सुध्दा फसवणूक करुन घेतो व परिणामी दुःख पावतो. तो स्वतः आपल्या समाजाबरोबर लयास जातो. या करिता मिथ्या अविद्या मायावी विकारांचा त्याग करा. निर्लोभीपणाने रंजल्या गांजलेल्यांची सेवा करा. आपल्या परम उज्वल वैदिक सनातन धर्माच्या तत्वांची जोपासना करा. आज आपल्या धर्मावर खूप मोठे मोठे आघात होत आहेत. वैदिकसनातन धर्माचा क्षणोक्षणी ऱ्हास होत आहे. त्याचा सर्वांगीण विकास खुंटलेला आहे. धर्म रक्षकांच्या आळसूपणाने व लोभी वृत्तीने धर्म आणि कर्म मार्गात शिथिलता आलेली आहे, विधर्मीयांचा जोर जुलूम वाढत आहे. सामान्य प्रजा त्यामुळे त्रस्त होऊन ज्यांच्याकडे ऐहिक व पारलौकिक सुखाकरिता धाव घेतात तेच धर्मरक्षक होऊन गळाला बळी पडलेल्या माशाप्रमाणे त्यांची अवस्था झालेली आहे. भारतात सुलतान शाही व घराणेशाही व पर्यायाने झोटिंगशाही जास्त प्रबळ होत आहे. काळ झपाट्याने बदलत आहे. आपली ऐहिक उन्नतीच काय पण आपण पुढे सुखाने आपले घरदार तरी सांभाळू शकू किंवा नाही अशा संभ्रमात सर्व प्रजा पडलेली आहे. प्रजेत अस्थिरता अस्थाईभाव आलेला आहे. विधर्मीयांच्या जोर जुलूम जबरदस्तीला ते बळी पडत आहे. अशाच वेळी प्रजा सत्य धर्माकडे धाव घेणार व तेच लोक जागृतीचे कार्य आपणास करायचे आहे. जनतेला ऐहिक, पार लौकीक व पारमार्थीक सुख लाभावे व त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी, आपल्या मुळ सनातन धर्माची जाणिव होऊन त्यानुसार त्यांना कर्म–भक्ती–ज्ञान वैराग्य–मुक्ति या तत्व प्रणालीची योग्य जाणिव होऊन धर्माचरण सुलभ व्हावे यासाठी त्यांना समजू शकेल अशा सरळ सोप्या भाषेत उपदेश करावा. वर्णाश्रम धर्म पध्दतीचे स्वरुप लयाला गेल्यासारखे दिसत आहे. त्या आपल्या सनातन धर्माला आपणाला आधुनिक विचारधारे प्रमाणे उजाळा द्यायचा आहे. मानव मानवमात्रात प्रेमभाव सलोखा आत्मियता राहावी यासाठी आपण झटायला पाहिजे. आपले प्राचीन ऋषिवर, मुनिवर, भक्तवर, योगीश्वर ज्या मानवता धर्माचे आचरण आपणास शिकवून गेले तोच 'सत्' मार्ग आपण स्विकारुन त्याचाच प्रचार प्रसार करायला हवा. ही धूरा आपण खांद्यावर घेऊन आजपासून या कार्याला लागावे. अर्थात हे कार्य करतांना आपणास अनंत अडचणीला तोंड द्यावे लागेल. लोक द्वेष, मत्सर, तिरस्कार, निंदा करतील, झिडकारतील पण सत्यधर्माची बुज झाल्यानंतर त्यांना त्याचे महत्व

कळून येईल त्या साठी आपण कोणाचाही द्वेष करायचा नाही. सुडबुध्दीने कोणाशीही वागायचे नाही. आपली तपश्चर्या पणाला लावून नेटाने व चिकाटीने हे कार्य करावे अशी माझी आंतरिक अभिलाषा आहे. प्रिय योगीवर भाभाराम ! प्रिय योगीवर नायाजी ! मी सांगितले ते आपले लक्षात आले ना !

योगीसे योगी मिले, मानो सुहागरात ।
ताथे भाभारामको, याद किये भली भात ।।
अवनी तलपे आयके, ठाढे परहित कार ।
जात बरन कहा योगीको, बडो मानवसे प्यार ।।

योगीवरांना योगेश्वराचा समागम झाल्यानंतर रात्र आणि दिवस काय, सर्व काळवेळ त्यांचा अमृतमय ज्ञानचर्चेत निघून जातो त्याचे भानच राहात नाही. सद्गुरु इमामशाहांनी भाभारामला यासाठीच येथे बोलाविले होते. भाभाराम परम योगी आहे. हे त्यांनी जाणले होते म्हणूनच ते त्यास आणखी म्हणाले. 'या अवनीतलावर सिध्दपुरुष–संत पुरुष या साठीच अवतरतात की वंश वर्ण जात वगैरे कोणताही भेद न पाहता पृथ्वी प्रमाणे निश्चल स्थिर राहून ते भगवंताचे कार्य करुं शकतात. त्यांचे तर मानव जातीवर प्रेम असते आणि त्या प्रेमा करिताच हा सर्व योगीवरांचा या ठिकाणी मिलाप घडविलेला आहे.

संप्रदायकी झपटमे, योगी नही लिपटाय ।
दिल चाहे सोही नामसे, साहिब के गुण गाय ।।
हरिके नाम हजार है, राम कहो या कान ।
जो तेरे दिलमे बसे, सोही तेरे दिलजान ।।

'योगी पुरुषांना मत मतांतर संप्रदाय–पंथभेद राहूच शकत नाही. जगात ईश्वर एक. त्या ईश्वराला जाऊन मिळण्याचा मार्ग एक, त्याचे नाव अनेक. रुचिवैचित्र्याप्रमाणे त्याच्या उपासनेचे भेद अनेक. पण अंतिम लक्ष्य मात्र एकच म्हणून योगी पुरुषाने अंतिमध्येय प्राप्तिसाठी जगताच्या मायीक विकारापासून अलिप्त राहावे हे ठिक आहे पण ईश्वरोपासनेचा भेद मानवमात्राला उकलुन सांगण्याकरिता–लोक संग्रहाकरिता त्याने निरीच्छतेने कर्म धर्म मार्गाचे आचरण करावे. शवटी तुम्ही योगीच राहणार आहात.'

सद्गुरु इमामशाह महाराजांच्या मुखातून हा दिव्योपदेश ऐकून ते सर्व भक्त मंडळ आनंदीत झाले व धर्म प्रचाराच्या कार्यास वाहून घेण्याचे निश्चित करुन सद्गुरुचरणी नम्र भावाने साष्टांग प्रणिपात करुन आपल्या मनातील भावपुष्प त्यांनी सद्गुरुचरणी वाहिले. भाभाराम म्हणाले, कृपाळू सद्गुरुनाथ महाराज ! आपण अंगिकारलेल्या सत्यधर्म सत्पंथाचे कार्य जनमानसात रुजविण्याकरितां आम्ही कटिबध्द आहोत पण गुरुमहाराज, आपल्या कृपाशिर्वादाशिवाय ते तडिस

जाणे शक्य नाही आम्हाला तशी आपण सत्प्रेरणा द्यावी. सत्पंथाची आचार संहिता आपण आम्हाला सांगावी. आहार–विहार–विवेक–विचार यांची योग्य ती सांगड घालून आत्मज्ञान प्राप्तीचा उपाय कथन करावा. मनुष्य कर्मविमुक्त होऊन अंति इच्छित ध्येय जे आत्मसाक्षात्कार कशा रीतीने प्राप्त करुन घेऊ शकतो व निष्काम कर्मबुध्दीने जीवन्मुक्त व विदेहमुक्त होऊ शकतो. हे सर्व आपण आम्हाला सांगावे. आम्ही आपले दास शरणांगत किंकर आहोत. दयाळू निर्लिप्त आत्मवान गुरु महाराज, आपल्या चरणी आम्ही तन मन प्राणपणाने या सत्ज्ञानाची याचना करीत आहोत ती आमची अभिलाषा पूर्ण करावी. म्हणून सर्वांनी सद्गुरुचरणी दंडवत प्रणाम केला.

आपल्या परम प्रेमळ गुरुभक्त अनुचरांची अभिलाषा सद्गुरु महाराजांनी पूर्ण केली. त्यांनी उपदेशिलेले ते अमुल्यज्ञान गुरुवाणी, योगवाणी, चेतावणी, शिक्षापत्री, निकलंकी गीता वगैरे ग्रंथात ग्रंथीत केलेले आहे. (गद्य व पद्य रूपाने व आलंकारिक भाषेने युक्त असल्याने आणि वरिष्ठ योगीयांना तो संक्षिप्त उपदेश असल्याने पूर्णविवरणाशिवाय सामान्यलोकांना समजण्यास जरा क्लिष्ट वाटतो. त्याचे सोपपत्तिक विवरण मराठी भाषेतून करण्याचे कार्य चालू आहे.)

सद्गुरु इमामशाहा महाराजांच्या मुखारविंदातून श्रवण केलेले ते अमृतबिंदू सर्व सद्भक्तांनी आपल्या श्रवणेन्द्रियाद्वारा हृदयग्रंथीत संग्रहीत केले. सर्व परमानंदाच्या साम्राज्यात मग्न होऊन गेले सद्गुरु महाराजांची परम आदराने स्तुति करीत भाभाराम म्हणाले –

इमामशाह गुरु पीरका, पाया पाक दिदार ।
भाभारामके हियरा, सचमुच हुवा उजीयार ।।
जा दिन मिलके बिछरे, ता दिनकी रही याद ।
प्रगट पीराना पायके, हम ही हुवे आबाद ।।

'सद्गुरु इमामशाहांचे दर्शन खरोखर महान पवित्र आणि पावनकारी आहे. माझा सारं अंतरंग आज उजळून निघाले. मागे मला जेव्हा त्यांचे क्षणभर दर्शन झाले होते व मग अनंत काळाचा वियोग झाला होता तेव्हाच त्यांच्या दर्शन सत्संगाची ओढ मला खूप लागली होती. या प्रगट पीराला प्राप्त करुन आमचे जीवन खरोखरच धन्य झाले.'

पीर इमामको पेखला, सुमत दिये किरतार ।
गाफिल मोल गमाइया, अवसर जै हो हार ।।
बेर बेर मत पाइये, पिव मिलनको दाव ।
पेखो पीर इमामको, यही जीवनको ल्हाव ।।

जर तुम्हाला ईश्वराने खरोखर सुमति दिलेली असेल तर तुम्ही पीर इमामशाहांना जाणून घ्या. गाफील राहून अमुल्य संधी गमवाल तर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. वारंवार अशा अवतारी पुरुषांचे मिलन होऊ शकत नाही. हरघडी असा अमुल्य डाव साधता येत नाही. म्हणून

हर प्रयत्न करून तुम्ही सद्‌गुरु इमामशाहांना जाणून घ्या त्यांतच आपल्या अमुल्य जीवनाच्या सार्थकतेचे मोल आहे. ज्या भाग्यवान जीवात्म्यांनी सद्‌गुरु इमामशाहांचे अवतार कार्य व त्यांचे मन्तव्य जाणले त्या सद्‌भाग्यवंतांच्या चरणी हा भाभाराम लोटांगण घालतो. कारण तो खरोखरच श्रेष्ठ आहे. अशा प्रकारे भाभाराम मुक्तकंठाने सद्‌गुरुंची स्तुति गाऊ लागला.

नायाजीकी संगमे, गुंज बोले गुरु पीर ।
शाणाजीसे मिलीया, भाभा गुण गंभीर ॥
नायाजीसे बहुरी मिले, पीरका दिदार पाय ।
शाणाजी तोहे मिलनको, हियरा रहे तडपाय ॥

शाणाजी तुम्ही खरोखरच भाग्यवान आहांत. योगी नायांची व सद्‌गृरु इमामशाहांची भेट झाली होती पण आपली भेट होणे अशक्य होतं ते आज माझं भाग्य उदयास आलेलं आहे. तुम्हाला पाहून आज खरोखर मला स्वर्गीय आनंद झाला.'

आज अचानक मिल गये, हियरा हुआ मगन ।
शाणाजी तोहे धन्य हे, गुरुसे लगी लगन ॥
भाभाराम गुरु देवकी, गति न जाने कोई ।
जेही गुरुका बनी रहे, सोही गुरुका होई ॥

'प्रेमळ गुरुबंधु शाणाजी ! आपण सद्‌गुरुत अनन्य प्रीती लावली आहे. अशी प्रेमलय लावणाराची धन्यता होय.'

शाणाजी म्हणाले, 'भाभाराम! सद्‌गुरुंची गति कोणीच जाणू शकत नाही. पण जो सद्‌गुरुंचा प्रेमी बनून राहतो तोच सद्‌गुरुंचा अनुज (अंशी) होतो.'

योगी होकर आईया, भाभा परहितकार ।
मैं तो गुरु चरणमे, बैठ रह हुं निरधार ॥
गुरु बीन मेरा कोई नही, सोही बडे दातार ।
नैया बहे मजधारमे, साहिब खेवनहार ॥

भाभाराम ! तुम्ही तर योगी पुरुष आहांत. जनतेच्या कल्याणाकरिता आलेला आहांत आणि मी तर केवळ सद्‌गुरुंच्या चरणाजवळ शांतीने बसून राहणारा आहे. कारण की माझ्या-करितां अन्य कोणी हितकारी नाही. या विकट भवसागरात गुरुशिवाय अन्य कोणीही तारणार नाही.

गुरुको कबहु ना भूलो, गुरुसे बडा न कोई ।
शाणाजी साची कहे, गुरु करे सो होई ॥
मेरे गुरु इमामको, मैने पेख लिया पीर ।
सोही समर्थ साईया, पहूँचा वही भवतीर ॥

म्हणून तर म्हणतो कीं या सत्य सद्गुरुला कधीही विसरु नका. त्यांच्याहून कोणीही मोठे नाही. हे सद्गुरु जे करतील तेच होईल. अगम्य आगम–निगमचे गुज तेच जाणू शकतात. तेच प्रेरणा देऊन प्राणिमात्राकडून जगत्कार्य करवून घेतात. रंजल्या गांजलेल्यांची पीडा मिटवितात म्हणून त्यांना पीर सुध्दा म्हणतात. भवरोगाने व्यथीत झालेल्या रुग्णाईताला सुध्दा ते योग्य बोधरुपी औषधाने सुधारतात म्हणून त्यांना वैद्य किंवा हकीम सुध्दा म्हणतात. हृया त्यांच्या विविध भुमिका जाणून मी त्यांच्या चरणाजवळच ठाण मांडले. ते सर्व समर्थ आहेत. मी एक पामर जीवात्मा सूर्यापुढे काजवा आहे. पण त्यांचाच अंशी असल्याने ते माझा बाहू धरुन उध्दरतील अशी खात्री आहे. अशा प्रकारे शाणाजीने मुक्तकंठाने भाभारामजवळ सद्गुरु महाराजांचे यशोगान गाईले.

पतित पावन साइया, मोरे गुरु इमाम ।
शाणाजी मत भुलीयो, सद्गुरुको नाम ।।
सत्संगा गुरु पीरका, सारी रेन बीताय ।
भोर ही शिर झुकायके, योगी हुवे बिदाय ।।

संत नायाजीच्या धामात बसून सत्संग करीत सद्गुरु इमामशाहांच्या संगतीत योगी भाभारामने सर्व रात्र घालविली. महापुरुषाच्या सोबत बसून अगम्य ज्ञान समजावून घेण्यात रात्र केव्हा संपली समजले सुध्दा नाही, अरुणोदय झाला तेंव्हा सारे जण भानावर आले. सद्गुरु मुखारविंदातून स्त्रवणाऱ्या ज्ञान अमृत सरोवरात योगी भाभाराम, सततत्व जाणणारी योगिणी कीकीबाई, संत नायाजी, शाणाजी, हाजरबेग आणि अन्य सद्भाग्यवान जीवात्मे यथेच्छ विहार करीत असता सूर्योदय झाला. भगवान सहस्त्ररश्मी सविता नारायण आपल्या सहस्त्र लक्षावधी किरणांनी अवनी तलावरील अंधःकार दूर करीत चिन्मय प्रकाश पसरवित आला. त्यात आपले संपूर्ण योगी मंडल–सत्संगी मंडल न्हाऊन निघाले. संत इमामशाहांचे चरणी साष्टांग प्रणिपात करुन संत भाभाराम, साध्वी कीकीबाई यांनी सद्गुरुंची रजा घेऊन चंपकवनाचा रस्ता धरला, अपार वात्सल्यभावाने थबथबलेली दृष्टी सद्गुरु महाराजांनी उभय बंधू–भगिनीवर फिरवून ते सुध्दा आपल्या रथात बसून संत नायाजींचा निरोप घेऊन आपल्या धामावर पीराण्यास जाण्यास निघाले.

सद्गुरु इमामशाहांच्या समागमानंतर संत भाभारामने पावन पर्यटन सुरु केले. ठिकठिकाणी तीर्थक्षेत्रावर जाऊन त्यांनी अनेक साधु संत सत्पुरुषांचा समागम केला. सुलतान शाहिच्या जोर जुलूमाने त्रस्त झालेल्या प्रजेचे कल्याण कशारीतीने करावे याच विवचनेत फिरत असता त्यांनी अनेक दिनदुबळ्यांना दिलासा दिला. त्यांची संघटना घडवून आणून स्वतः आपणच आपली उन्नति कशारीतीने करवून घ्यावी याची जाणिव करुन दिली. अनेक धर्मदाय संस्थांची स्थापना करुन त्या मार्फत जनसेवेचे कार्य सुरु केले. गावोगांव भटकून लोक जागृति करुन मंदीरे, देवघरे, पूजागृहे यांची योजना करुन लोक शिक्षण व धर्म शिक्षणाचे कार्य सुरु केले. सद्गुरु महाराजांनी सोपविलेली कामगिरी शिरावर घेऊन त्यांनी सौराष्ट्र, कच्छ, उत्तर गुजराथ,

मध्य प्रदेश, खानदेश महाराष्ट्र, दक्षिण गुजराथ वगैरे भागात सुमारे बारावर्षेपर्यंत कार्य केले. मार्गात त्यांना अनेक योगी संत सत्पुरुष मिळाले. सर्वांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला व त्यांचे हीत–यश चिंतीले.

संत भाभारामच्या जीवनात अनेक कसोटीचे प्रसंग सुध्दा आले. भगवंताच्या अनेक मोहिनीमाया स्वरुपांनी त्यांना भुरळ घालण्याचा प्रयत्न केला पण त्यांचे तन नियम एकनिष्ठ निश्चल असल्याने व मनाचा दृढनिश्चय असल्याने सर्वांना नमवून त्यांनी ईशभजनी लावले. अनेक सती पतिव्रता भक्तीमती स्त्रीयांना प्रभुप्राप्तीचा मार्ग दाखवून परमज्ञानी व मुक्त केले. संतसाध्वी कीकीबाईच्या सहवासाबद्दल अनेक लोकापवाद सुध्दा सहन करावे लागले. पण संत भाभाराम सर्व गोष्टीपासून अलिप्त असल्याने निर्विकार व निरीच्छ बुध्दीने त्यांनी कर्तव्याची धुरा आपल्या शिरावर वाहिली.

जीवनाच्या संध्याकाळी सद्गुरु इमामशाह महाराजांच्या संदेशानुसार सर्व सद्भक्त सद्गुरुंच्या निवासस्थानी आणखी एकदा मिळाले. सद्गुरु महाराजांनी आपल्या प्रेमळ आज्ञाधारी सद्भक्तगणांचा खूप गौरव केला. सद्गुरु महाराजांच्या अपेक्षा सर्वांनी पूर्ण केल्या होत्या. लोक-जागृति, धर्मप्रचार, वैदिक पुरातन संस्कृतिचा प्रसार हे कार्य त्यांच्या सर्वच सद्भक्तांच्या प्रयत्नांनी ठिकठिकाणी सुरु झालेले होते. ठिकठिकाणी धर्मशाळा, मंदीरे, पूजागृहे, देवघरे स्थापन होऊन सत्पंथ सनातन वैदिक पध्दतीनुसार घटपाट पूजा यज्ञविधी सुरु झाले. सत्संग, सभा, चर्चा, कथा कीर्तने मेळावे या द्वारे पुरातन संस्कृतीचे शिक्षणाचे कार्य सुरु झाले. सद्गुरु महाराजांनी अपेक्षिलेल्या सर्व कार्याची परिपूर्णता झाली होती. अतिशय आनंदाने त्यांनी आपल्या सद्भक्तांचा भावपूर्ण गौरव करुन वरदान दिले. कर्तव्य पूर्तीचे समाधान सर्वांच्या चेहऱ्यावरुन ओसंडत असतांना दिसत होते.

सद्गुरु महाराजांचा निरोप घेऊन संत भाभाराम आपल्या आश्रमी आले. काळाच्या वहानाबरोबर सद्गुरु इमामशाह महाराज, त्यांचा परम सेवक हाजरबेग, संत नायाजी यांनी यथायोग्य समयी समाधी घेतल्याने संत भाभारामचे मन सुध्दा आता विरक्त आणि मुक्त होऊ इच्छित होते. त्यांची ही मनस्थिती पाहून साध्वी कीकीबाई आणि त्यांचे सारे सद्भक्त उदास झाले.

जनता तब रोवन लगी, भक्त रुवे चोधार ।
दयानिधी गुरु देवजी, ता दिन किये निरधार ॥
भक्त हेत ठाढे रहे, हमही बारह मास ।
पिछे भादो पंचमी, निर्वाण करही खास ॥

संत योगी भाभाराम यांनी समाधीस्त होऊन या जगाचा निरोप घेण्याची गोष्ट काढल्याने सर्व जनता अधिर बनून अश्रू ढाळू लागली. त्यांनी अनेक विनवण्या केल्या. त्यांना दिलासा देत संत भाभारामने सांगितले कीं, तुमच्या आग्रहाकरितां मी आणखी काही दिवस थांबतो पण येत्या

भाद्रपद शुध्द पंचमी–ऋषिपंचमीच्या दिवशी मी येथून महाप्रयाण करीन. जनहितासाठी संताने आपले महाप्रयाण थांबविले हे सत्य जाणून जनता समजून गेली की आता जर आपण आपले हित नाही साधले तर पस्तावा करण्याची पाळी येईल.

सद्गुरु यहाँसे जायंगे, फिर नही असो दाव ।
भाभारामके चरणमें, मनवांछित फळ पाय ।।
दुःखियन बहुरी आयके, गुरुको अरज सुनाय ।
कृपानिधन सद्गुरु, करुणा मेह बरसाय ।।

सद्गुरुंच्या चरणी लागून मनवांछित प्राप्त करण्याकरिता जनता अधिर झाली. अनेक दीन दुःखी आले त्यांनी आपली व्यथा सांगितली संत भाभारामने त्यांचे दुःख दुर केले. असे असून सुध्दा कित्येक अनुरागी असे होते की त्यांच्या हृदयाची व्यथा शांतच होत नव्हती. त्यांनी सद्गुरुंना बरोबर घेऊन जाण्याची विनंती केली. जनतेची ही वेदना जाणून संताने मोकळ्या हृदयाने मनोवांछित मागण्यास सांगितले. आशावादी जीव समयानुसार ऐहिक, पारलौकिक सुखाची अपेक्षा करीत असत कोणी धर्म, अर्थ, काम यांची अपेक्षा व्यक्त करित, कोणी रोगमुक्त होण्याची तर कोणी संकटमुक्त होण्याची अपेक्षा करीत. त्या सर्वांच्या ऐहिक मनोकामना पूर्ण होण्याचा आशिर्वाद संताने दिला. कित्येक सद्भाग्यवान ज्ञान, भक्ति, मुक्तीची अपेक्षा करीत त्यांना सुध्दा सद्गुरुंनी दिलासा दिला. कित्येक अभागी संताजवळ येऊन सुध्दा खाली हात हलवित परत आले. पूर्व जन्माचे सुकृत ज्याचे बलवत्तर असते त्यासच अशा संतांचा सहवास घडून त्यांच्या मनोकामना पूर्ण होतात. अभाग्यांना कोठले ते भान राहणार.

सद्गुरु भाभारामच्या सद्भक्तांच्या हृदयात मात्र फार कालवाकालव झाली. सद्गुरुंच्या संगतीत आपले सुध्दा गमन झाले तर किती भाग्यवान होऊ असे त्यांना वाटत होते. हा हृदयद्रावक समाचार समजताच त्यांचा परमप्रेमी सद्भक्त मुक्तिराम ताबडतोब सद्गुरुजवळ आला अत्यंत अधिर बनून तो सद्गुरुचरणी लागला व ओक्साबोक्सी रडु लागला.

भादोके दिन आ गये, लगा कलेजे तीर ।
मुक्तिराम गुरु चरणमें, बैठ बहावत नीर ।।
गुरुजी मोहे छांडके, कैसे अकेला जाय ।
अनुजको छांडो नही, संगही रखो गुरुराय ।।
गुरुबीन यहां कैसे रहूँ, ज्यो जळ बीछरो मीन ।
भाभाराम गुरुदेव बीन, मुक्ति मरै छीन छीन ।।

आपल्या प्रीय अनुज मुक्तिरामच्या हृदयाची व्यथा जाणून संत भाभाराम त्यास म्हणाले. 'बेटा मुक्तिराम ! तू रडतोस कशाकरितां. मी तुझ्याहून कांही वेगळा नाही. तू जेव्हा मिळण्याची इच्छा करशील तेव्हा येऊन मिळेल. ज्ञानी पुरुष शोक करीत नाहीत. भगवंताच्या संगत मीलन समयी दुःख शोक कशाला ?'

भाभारामके रुपको, बुझे सोही गुणवान ।
अैसे मुक्तिरामको, बुझे मेरे दिलजान ।।
मुक्तिरामके चरणमे, सबकुछ पावही साज ।
जाके हिय विश्वास है, ताको मिले महाराज ।।

भाभारामने आपल्या लाडक्या शिष्याला अनेक गुह्यगोष्टी उकलून सांगितल्या. आपल्या आश्रमव्यवस्थेबद्दल तेथील सदाव्रत, रीतीनीती, सदाचाराबद्दल, साधुसंत अतित अभ्यागताच्या आदर सत्काराबद्दल सर्व जतविले आणि शेवटी हेही सांगितले की, 'मुक्तिराम, जो पर्यंत येथे साधुसंत सत्पुरुषांचे स्वागत सत्कार सेवा होईल तोपर्यंत सर्व ऐश्वर्य नांदेल, त्यात खंड पडला अथवा आळस झाला अथवा त्यांचा अपमान झाला तर हे सर्व ऐश्वर्य लयास जाईल. यासाठी बेटा या धामाचे महत्व जाणून ही वहिवाट तू चालव माझा तुला पूर्ण आशिर्वाद आहे.'

संत गंगासिंह गोहिल, सती मेघावती, संत भोजराज, साध्वी कीकीबाई वगैरे सर्वांना प्रेमाचा संदेश देऊन व शुभ आशिर्वाद देऊन संत भाभाराम समाधीच्या तयारीला लागले. कीकीबाईला त्यांनी चंपकदलात आश्रम बांधण्यास सांगितला कारण तेथेच तुझे ऋण होते म्हणून तेथेच तू कार्यकर असा आशिर्वाद त्यांनी दिला.

संवत १५८९ च्या भाद्रपद शुध्द चतुर्थीच्या दिवशी प्रेमीजनांचा व भक्तांचा विरह हृदयात सामावून सद्गुरु भाभाराम स्वस्थ चित्ताने शिवालयात गेले आणि शांतचित्ताने आसन मांडले. मंदीराचा आंतला दरवाजा बंद करुन ध्यानस्त बसले. त्या दिवशी देवाची सर्व जनता जागरण भजन पूजन अर्चन स्मरण करीत राहिली. प्रातःकाळ झाला. मानव सागरास भरती आली. सकाळी एक प्रहर उलटल्यानंतरच मंदीराचा दरवाजा उघडण्याची सद्गुरु भाभारामची आज्ञा होती.

प्रहर जीते गुरुदेवकी, आज्ञा किये अनुसार ।
शिव मंदीरके द्वारको, भोज खोले तेही ठार ।।
सतगुरु ताहा दिखे नही, शिवलींग जेही ठार ।
प्रगट ज्योति जली रही. ज्योतिरुप निरधार ।।

अेक प्रहर उलटल्यानंतर भोजराजजीने शिवमंदीराचा दरवाजा उघडला. सद्गुरु भाभाराम कोठेही दिसले नाही. शिवलींग सुध्दा दिसत नव्हते. फक्त शिवलींगाच्या जागी शाळुंकीत एक ज्योत झगमग झगमग जळत होती.

पंचत्वमे मिला दिये, अपना स्थूल शरीर ।
ज्योतीरुपे हो गये, भाभाराम गुरु पीर ।।
लोगन आये धायके, दिखे न भाभाराम ।
ज्योतिरुप निहारके, बोले जयजयकार ।।

सद्गुरु भाभारामने आपले शरीर पंचतत्वात विलीन करून टाकले आणि ज्योतिस्वरुप बनले. त्यांच्या दर्शनास अधीर झालेली जनता धावत आली. भाभाराम दिसत नव्हते परंतु ज्योतिस्वरूप पाहून जयजयकार करुं लागले.

जय गुरु भाभारामजी, ज्योतिस्वरुप भगवान ।
प्रभुजी दर्शन दियो, बडे हो कृपानिधान ।।

ज्योतीस्वरुप सद्गुरु भाभारामला वंदन करून जनता परत जाऊ लागली. ऋषिपंचमीच्या दिवशी भाभाराम अंतर्धान पावून ज्योतिस्वरुप बनले.

ऋषिपंचमी भोर देखन नही पाये, चकित हुई देवाकी जनताय ।
आसन तहा अेक जलधारीमे, ज्योति स्वरुप दिखलाय ।।
शिवजीका अनुरागी शिवजीमे समाये, लींग तहा प्रगट ज्योत पिछनाय ।
ज्योतिस्वरुप गुरु भाभारामको, जनता लाग ही पाय ।।

जन्मजन्मान्तरीचा सदाशिवाचा अनुरागी योगी अंती आपल्या प्रेमळ प्रभु शिवात सामावून ज्योतिस्वरुपाने विलसू लागला. एक परम पावन चरित्र अनंतात लीन होऊन गेलं. त्याच्या स्मृतिचा सुमधूर सुगंध चौफेर दरवळला. आजही तो स्मृतिगंध महकतांना अनुभवाला येतो कारण तो अमर आहे.

भाभाराम गुरुदेवका, पावन चरित रसाल ।
क्षीर नीर न्यारा हो रखे, पिवत सोही मराल ।।
भाभाराम गुरुदेवका, पतित पावन नाम ।
दुर्लभ साध चरितसे, पूरण होत सब काम ।।
भाभारामके चरणमे, धन्य जगे अनुराग ।
सजनी साच बखानहु, सोही बने महाभाग ।।
संत चरीत प्रभु भजन, मानो अेकही सार ।
संत भाभाराममे, ज्ञाना, करैं हो प्यार ।।
भाभाराम गुरुदेवकी, जाये करुणा होई ।
संत पुरुष के चरितको, मानो वरनै सोई ।।

५) भक्तिमती साध्वी कोकीबाई.

वसोहून जवळच असलेल्या अलिंद्रा या गांवी हरसुखभाई नावाचा पाटीदार पटेल आपल्या कुटूंबासह सुखाने राहात होता. त्याच्या पत्निचे नाव मणिबा होते. प्रौढ वय होऊनही त्यांना संतति नव्हती म्हणून लोकांचे निपुत्रिक असे टोमणे ऐकून त्यांना फार व्यथा होत होती. कोण्या एका वडिलधाऱ्याने त्यांना सांगितले कीं तुमच्याजवळ पैसा आहे. एरवी तो काय उपयोगात येणार आहे त्यापेक्षा तुम्ही संतांची सेवा करा. त्यायोगे तुमचे मनोरथ पूर्ण होतील.

त्यांच्या चित्तात ही शिकवण चांगली ठसली. त्यानी आपल्या अंगणात येणाऱ्या साधु संतांची सेवा करण्याचे व्रत घेतले. सदाव्रत मांडले त्या योगे संत अभ्यागताचे आगमन झाले. दोघांनी प्रेमाने साधु सत्पुरुषाची सेवा करावी. यथाशक्ति दान द्यावे व अशिर्वाद प्राप्त करावा अशा प्रकारे बराच काळ निघून गेला. भक्तियोग हळू हळू रुजून फुलला व फळला एके दिवशी सोन्याचा सुर्य उगवला. सिध्दपुरुष अडबंगनाथांचे त्यांचे घरी आगमन झाले. असे पुरुष सहसा कोणाच्या घरी जात नसतात. पण त्या प्रेमी युगुलाचे भाग्य उदीत होते म्हणून योगी पुरुषाचे आगमन होऊन त्यांनी अलख जागविला.

'यावे यावे गुरुदेव !' म्हणून मणिबाने आदरपूर्वक संताला आंत यायला विनविले. आसन देऊन त्यांना बसविले व पूजन अर्चन करून चरणामृतपान केले. त्याच वेळी तिच्या हृदयात भान झाले की आज आपल्या अंगणात साक्षात ईश्वराचे आगमन झाले असून जर आपण खाली हातच राहिलो तर शेवटपर्यंत आपली अभिलाषा पूर्ण होणार नाही. आपण किती अभागी आहोत असा विचार मनात येऊन तिच्या नेत्रातून अश्रुबिंदू टपकू लागले. ते पाहून जाणकार संत योगी तिच्या हृदयाची व्यथा समजून गेले ते म्हणाले, 'माई ! तुझ्या हृदयाची काय इच्छा आहे. डोळ्यातून पाणी का वाहात आहे.'

'महाराज ! आपण तर सर्वज्ञ आहातच. शेर माटीची खोट आहे. लोक वांझ म्हणून टोमणे मारतात. संसारी जीवात्म्यास याहून अधिक दुःख ते कोणते असणार.' हरसुखाचे हे शब्द ऐकून संत म्हणाले, 'बेटा हरसुख तुझ्या नशिबात पुत्र सुखच दिसत नाही केवळ एक कन्या योग आहे. तुला एक मुलगी होईल आणि ती तुझ्या कुळाला उज्वल करील एवढेच नव्हे तर ती तुझ्या एकोत्तर पिढ्यांचा उध्दार करील अशा प्रकारची सति सन्नारी होईल.

'संत पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवा. तुमचे सारे मनोरथ सिध्द होतील.' असा आशिर्वाद देऊन रमतायोगी निघून गेला, त्यानंतर उभय पतिपत्नि स्वस्थ झाले व विचार करुं लागले की, एवढ्या महान संत पुरुषाचे आगमन झाले, पण आपण त्यांना यथार्थतः ओळखले नाही, हे खेद जनक आहे. हा योगी पुरुष कोण असावा बरे ! अशा प्रकारे ते विचार करुं लागले पण अल्पबुध्दि जीवात्म्यांना त्या महान योगी पुरुषाची ओळख आणि त्याचे विमल चरित्र कोठून समजणार. अखेर ईश्वर भजन करुन स्वतः अंगिकारलेले संत सेवेचे व्रत चालूच ठेवले.

काल निर्गमनानंतर त्यांना समजून आले कीं, महापुरुषाच्या वाणीप्रमाणे आपलें वांझपण मिटले. त्यांना आशिर्वाद फळला, मणिबाला प्रौढवयात गर्भ राहून वि. सं. १५१९ च्या श्रावण शुध्द सप्तमी शितला सप्तमीच्या मध्यरात्री कन्यारत्न प्राप्त झाले. साक्षात आद्य शक्तिच्या अंशामधून उतरुन यावी त्या प्रमाणे दिव्य कांतिमान दुहितेचे आगमन झाले. या दावानल स्वरुप भवसागरात खितपतणाऱ्या जीवात्म्यांच्या कल्याणाकरितांच साक्षात भगवतीचेच जणू अवनितलावर अवतरण झाले. हरसुखने पुरोहितास बोलावून आणून आपल्या कन्येची जन्मपत्रिका बनविली. तिच्या भावी महत्तेचे यश गुणगान करीत कुलपुरोहिताने सांगितले.—

भावीको बरनी शके, धन्य तिहारे भाग ।
सति योग शुभ लक्षणी, कुळ तारण सुभाग ।।
कुंडली ऐसी ना दिखे, लाखनमे कोई अेक ।
धन्य तुम्हारे भाग्यको, दुहिता पाई विवेक ।।

'भावी तर संपूर्णरित्या कोणीच जाणू शकत नाही पण एवढेतर स्पष्ट होत आहे की तुझ्या भाग्याची बलीहारी आहे. तुझी कन्या सति सन्नारी होईल आणि ती तुझे कुळ उज्वल करुन उध्दरील. अशी कुंडली मी उभ्या हयातीत दुसरी कोणतीच पाहिली नाही. ही तुझी कन्या खऱ्या अर्थाने रत्न आहे.' अशा प्रकारे त्या कन्येचे गुणगान करीत कुळ पुरोहिताने कन्येचे नांव 'कीकीबाला' असे सांगितले.

धन्य दुहिता आपकी, महिमा बरनो न जाई ।
सतिपनको पुकारीयो, शुभनाम कीकीबाई ।।

दिनप्रतिदिन चन्द्रकलेप्रमाणे वाढत जाऊन कीकीबाई पाच वर्षाची झाली. सकाळी सूर्योदयाच्या अगोदर स्नान वगैरे करुन मंदिरात जाई. मंदीरात घंटानाद नौबत प्रातर आरति

होई. बालिका कीकीबाई अत्यंत हर्षभराने आरतीचा आनंद लुटी. अंगणात कोणी साधु संत आल्यास बालिका स्वतःच्या हाताने त्यांना भोजन पाणी वाढीत असे, सर्वजण त्या बालिकेचे कोडकौतुक करीत. ते पाहून मणिबा आणि हरसुख आनंद विभोर होत व अशी सुसंस्कारी कन्या मिळाल्याने ते आपल्याला परम भाग्यवान मानीत.

साधु संतांची सेवा तर कोण्या भाग्यशाली जीवात्म्याकडूनच होऊ शकते. अभाग्याकडून नव्हे. सत्याचा मार्ग हतभाग्याला सुचतच नाही. दया दान आणि सत्याचा मार्ग सद्भाग्यवाना करितां आहे. अभाग्या करिता सन्मार्ग क्लेशदायक आहे. हे सर्व प्रत्येक जीवात्म्याच्या मनोगतिवर अवलंबून आहे. ज्याचं मन मोकळं असतं, किल्मिषविरहीत असतं. त्यांच्या करीतां सत्कार्य सरळ असतं. आणि ज्याचं मन मलिन संकुचित असतं त्यांच्या करितां परमार्थ विषम असतो. इथं तर माता पिताच सुसंस्कारी मग पूर्वभवाची सद्भाग्यवान योगभ्रष्ट कन्या त्यांच्या जीवनात आपल्या अंगच्या सद्गुणांनी कां पुलकित करणार नाही आपल्या मुलीच्या बाललीलाकडे व तिच्या ठायी आढळून येणाऱ्या पारमार्थिक बुध्दिकडे पाहून मातापिता आपल्या भाग्याला धन्यता देत.

कीकीबाईचे वय आता बारा वर्षाचे झाले. त्या समयी वंदनीय सद्गुरु अडबंगनाथांचे पुनरागमन झाले. ज्यांच्या कृपाशीर्वादाने जन्म झाला. तेच हे संतपुरुष आलेले होते. मातापित्याने त्यांचा सत्कार केला. संताने कीकीबाईला उपदेशाची अमृतमय वाणीचा वर्षाव करून तिच्या हृदयाला पावन केले.

'सद्गुरु [संत पुरुषांचे उद्‌गार हृदयात सतत जिकीरीने घोळवावे, कारण या मानव सृष्टीत वारंवार येणे होत नाही. अन्य प्राणि सृष्टीत कितीही जन्म घडले तरी आत्मकल्याणाच्या दृष्टीने त्यांना कांहीही महत्व नाही, म्हणून आपण आपल्याच मनानवळ हट्टाने आग्रह धरुन ईशस्मरण नित्य करायला हवे. कारण भगवंताचं पवित्र गोड मधूर नांव हेच या असार संसार सागरातलं परम सुखदायक अमृतफल होय. बाकी हा सारा संसार तर खारा दुःखरुप आहे.

सुखदुःख संसारमे, रेन दिनको मेल ।
ताको देखके मन रुवो, अविगतका यही खेल ।।
जीवन हरीके हाथमें, अेक आवे अेक जाय ।
कैसे रोना रोइये, जा विध हरीको भाय ।।

सुख आणि दुःख हे तर संसाराचे रहाट गाडगे आहे. दिनमणि उगवतो, मावळतो, दिवसामागून रात्र, रात्रीमागून दिवस येतोच. आनंदाचे सुखाचे दिवस आले म्हणून हुरळून जाऊ नये. दुःखाचे कठिण दिवस आले म्हणून खचून जाऊ नये. हा तर अविगत प्रभुचा खेळ आहे. असे जाणून त्याचे स्मरण करावे. कारण या जीवन मरणाची दोरी त्याच अविनाशीच्या हातात आहे. हरी इच्छेच्या आधिन होऊन राहावे. तो जशा प्रकारची दशा ठेविल तशा प्रकारे त्याच्या

आधिन होऊन राहण्यातच खरे सुख आहे. अज्ञानांधःकारात गोते खात असलेला मानव स्वतःच्या धारणेनुसार कार्य करतो पण भगवंताने धारलेलेच कार्य सिध्दीस जाते. मानवीबळ त्या ठिकाणी चालू शकत नाही.'

सुख दुःखाच्या या दशेचं वर्णन सद्गुरुंनी कां केलं ? हे समजू शकले नाही परंतु कीकी-बाईच्या हृदयात हा दिव्य अमौलिक उपदेश तीरा प्रमाणे रुतून बसला. कार्यसिध्द करुन सद्गुरु अडबंगनाथ जसे आले तसे पावन पंथाने निघून गेले.

भ्रमर भोरींगा ने संतजन, दंशी दंशी दूर थाय ।।
मगर मकोडा ने कामनि; पची पचीने खाय ।।

कीकीबाला आता सोळा वर्षाची उपवर झाली. तेव्हा तिच्या मातापित्याने तिच्या विवाहाची तयारी केली. नटपूर-नडियाद येथील पटेल रुखडजींचा मुलगा मंडाण पटेल बरोबर तिचा वाङनिश्चय झाला. नियुक्त दिवशी कुळरीतीप्रमाणे त्यांचा विवाह होऊन योग्य वरदक्षिणा देऊन कन्यादान करुन तिच्या मातापित्याने त्यांची बोळवण केली. निराधार बालका प्रमाणे कीकीबाईच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले.

ज्या घरात जन्म झाला. बालपणाचा निर्दोश आनंद अनुभवला साणि यौवनाचे आगमन होऊन मातापित्याच्या लाडकोडात वाढली त्या घराचा त्याग करून नटपूर–सासरी जाण्याची वेळ आली. जे आपले होते, नित्य डोळयासमोरून दूर होत नव्हते त्यांच्यातून दूर निघून जाऊन आता तर परक्या घरी जायचे आहे. अलिंद्रा हृदयात पूर्णपणे वसले होते या धरतीचा त्याग करून आता तर नटपूरमध्ये मन लावावे लागेल अशा आशा निराशेच्या उर्मी हृदयात उमटत असताच कीकी-बाई श्वसुरगृही जाऊन पोहोचली.

कुंकुम पावलांनी कुलवधुने घरात प्रवेश केला आणि आनंदी आनंद पसरला. सर्व वातावरण मंगलमय बनले. कीकीबाईच्या पावलांनी जणू लक्ष्मीदेवीचं आगमनच झाल आहे असा घरातील सर्वांना आनन्दोल्हास झाला.

एके समयी अलींद्राच्या लोभस वातावरणात रमलेल्या कीकीबाईला आता नटपूर सौभाग्यदायक आणि आनंदकारक वाटू लागले. स्वामीच्या घरात प्रेममूर्ति होऊन राहणे हेच तर सौभाग्य व सद्भाग्याचं लक्षण आहे. सति सन्नारीच्या मनाने स्वामी घर हेच तीर्थधाम आणि मोक्षाचे संधान आहे. त्याच्या शिवाय अन्य कोणते तीर्थ किंवा अनुग्रहाचे स्थान तिला नाही. कीकीबाई अशा स्वर्गीय स्थानात राहून आनन्दविभोर होऊन काळ व्यतीत करीत होती. पतिप्रेम आणि सौहार्द्र लाभून ती सुखी झाली होती. भगवत्कृपेने लवकरच ती दोन मुलांची माता झाली. सुवर्णात सुगंध यावा त्याप्रमाणे मुळच्या सुखी संसारात आनन्दी आनन्द पसरला. दोघ पतिपत्नी आपल्या मुलांच्या लालन पालनात लाडकोडात मग्न होऊन गेले.

कर्मगति कैसे मिटे, जो बिधीयनको लेख ॥
होनी सोही होती रहे, को नही मारत मेख ॥
सुखके दिन बीते गये, दुःख के दिन आये धाय ।
पियरा परवश हो गये. देख हिया तडपाय ॥

कर्मगति अति गहन आहे. विधीने लिहीलेला लेख मिटविण्यास कोणीही समर्थ नाही. जी घटना घडायची ती घडूनच येते. कीकीबाईच्या जीवनात अचानक अतिशय दुःखद घटना घडून आली. दुःखाची काळी छाया अचानक तिच्या सुखी संसारात पसरली. तिचा पति अकस्मात रीतीने आजारी पडून पथारीवश झाला. त्याची अवस्था पाहून कीकीबाईचे हृदय कंपायमान झाले.

मत छांडो मोहे नाथजी, यह संसार मझधार ।
पियरा संगमे ले चलो, तुम्ही हो प्राणाधार ॥
छोटे दो फरजंदकी, रक्षा करो तुमी मात ।
तुमी बीना जीवत नही, जळबीन मीन तडपात ॥

आसन्न मरण पडलेल्या पतीची अवस्था अतिदारुण झाली. अश्रुपूर्ण नजरेने पतिची स्थिति निरखत असलेली कीकीबाई जवळच बसून विनवित आहे 'स्वामी ! तुम्ही एकटे जाऊ नका. आपल्या सोबत मला सुध्दा घेऊन चला. मला आपणाशिवाय या दावानलरुपी संसारात एकटीला राहायचे नाही. तुम्हीच माझे प्राणाधार आहात म्हणून मला एकटीला सोडून जाऊ नका.' अतिशय दारुण शोक करुन कीकीबाई लहान बालकाप्रमाणे रडू लागली. तेव्हा कीकीबाईला दृढ आश्वासन देत मांडण पटेलच्या मुखातून वाचा निघाली की, 'देवी, तू माझ्या सोबत येशील तर आपल्या या दोन लालांची अवस्था कशी होईल? कोण यांचा सांभाळ करील. मातेशिवाय ही बालके कशी बरे जगू शकतील? पाण्याशिवाय मासा तडफडून मरण पावतो त्या प्रमाणे मातेशिवाय बालक झुरुन झुरुन मृतप्राय होतील, म्हणून देवी माझ्या सोबत येण्याची गोष्ट सोडून दे आणि या बालकांचा साभाळ कर.' भग्न हृदयाने मांडण पटेलने आपल्या पत्नीचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

'मनात धैर्य धर. निर्बळ बनू नकोस आणि भगवंतात प्रीति ठेव. तोच तुझा सहायक, मदतगार होईल. जीवन निर्वाह करण्याकरिता आपल्याजवळ शेती आहे. त्यामुळे काही मुष्किली येईल असे नाही. म्हणून हिंमत सोडू नको. हृदयातले दुःख हळूहळू विसरून आपल्या या पुत्र रत्नांचं पालन कर.' हीच आपली स्मृति आहे, संपत्ति आहे. त्यांचे परिपालन कर.' असे म्हणून मंडाण पटेलने रामराम म्हणून अंतिम श्वास घेतला.

स्वामी आपल्याला एकटीला सोडून श्री हरीच्या प्रदेशात निघून गेला. सती कीकीबाईच्या हृदयास त्यामुळे दारुण दुःख झाले. स्वामी शिवाय एक क्षणभरही या असार संसारात जीवंत राहू इच्छित नव्हती पण अंतसमयी पतिने व्यक्त केलेल्या इच्छेकरिता पुत्रांचं जतन करण्याची जबाबदारी पार पाडण्याकरितां आलेल्या व येणाऱ्या प्रसंगांना तोंड देत कसे तरी जीवन कंठावेच

लागणार. अनेकानेक विचारांच्या कोंडी तिच्या सभोवार फेर घालीत. मन व्यग्र होई. डोळयातून झरझर अश्रुंचा प्रवाह वाही. अत्यंत कठिण हृदयकरून आपल्या दोनही बालकांचे लालन पालन करीत ती दुःखाचे दिवस कंठू लागली.

पतिनिधनानंतर चौफेर भयानकता भासू लागली. जणू पति गेला तर सर्वच गेले. ईश्वर सुध्दां रुसावा त्याप्रमाणे शेतीचीसुध्दा दुःखद अवस्था झाली. पाऊसच पडला नाही, अनाज कोठून होणार दुष्काळाचे जीव घेणे दुःखद दिवस आले. आता तर नटपूरला राहणेच अशक्य प्राय होते. एके समयी याच नटपूरातून आपला पति विदाय झाला आणि आज तर आपल्यालाही या नटपूर भूमीचा त्याग करुन जाण्याचा प्रसंग येत आहे. पण जावे कोठे ? कोठे आपले अन्नपाणी लिहीलेले असेल बरे ? काय करावे ? कोणाच्या आश्रयाला जावे ?

एके दिवशी घरातील सर्व सामानाची आवराआवर करून निरुपयोगी अवजड सामानाची विल्हेवाट लावून नेमका सामान तिने बैलगाडीत भरला आणि आपल्या दोनही मुलांना गाडीत बसवून कीकीबाईने स्वतः गाडी हाकली. आपण कोठे जात आहोत याचे सुध्दां तिला भान नव्हते. अलींद्राकडे जाण्याचा तिचा इरादा होता. आपल्या या कठिण दुःखतर दिवसात माहेरचा काहीतरी आश्रय मिळेल या आशेने ती निघाली होती. कित्येक वर्षानंतर तिने अलींद्राचा रस्ता धरला होता. पण सर्वकर्ता अकर्ता भगवंताची लीला कोणाला कळू शकणार ! स्वतः ती कोठे जाण्यास निघाली होती आणि भगवंताने तिला कोठे पोहोचवून दिले ! कोणत्या धरतीवर तिचे अन्नजळ लिहीलेले होते ते तर तो जाणकार ईश्वरच जाणत होता.

मेरे मन कुछ और है, कर्ता के मन ओर ।
ओधो कहे माधो सुणो, जुठी मनकी दोर ।।
लगी प्यास बिकल भये, रोने लगे दो तन ।
धूप देख जल भरन को, जाय ठाढे तेही दन ।।

मार्ग विचरण करीत करीत कीकीबाई वरोहून तीन मैल दूर असलेल्या चंपकवनाकडे येऊन पोहोचली. ग्रीष्माचे दिवस माथ्यावर सूर्य धगधगत होता. अशा त्या माध्यान्ह समयी दोनही मुले पाणी पाणी करीत रडून आईला पाणी मागत होती. मातृहृदय व्याकूळ झाले. जवळपास कोठेच पाणी नाही. इतक्यात लांबवर एक आड दिसला. तिच्या हृदयाला थोडा धीर आला. गाडी उभी करुन तिने एक लोटा व दोर घेतला आणि पाणी आणण्यासाठी आडावर गेली.

कुवे पाणी में गई, तुटी हीरनी दोरी रे ।
नयने असु पोछता, मारी गागर फूटी रे ।।
आज को ल्हावा लीजिये, काल कोणे दिठीरे ।
तेडा आव्या श्रीरामना, अेना जोर न चालेरे ।।

कोकीबाईची अशीच गति झाली. पाण्याशिवाय मुले तळमळत होती. आड दिसला आणि त्यातून पाणी काढण्यास गेली. घड्याला दोराचा फास बांधला आणि विहीरीत सोडला. पाणी भरले गेले आणि हळू हळू ती दोर ओढू लागली पण दुर्दैवाने अर्ध्यात घडा येताच दोर तुटला. घडा विहीरीत पडला. आता काय करावे. अरेरे दैवा! काय तू ही कसोटी पाहतोस! आता पाणी वर कसे काढावे? कोकीबाई व्याकूळ झाली. बावरी होऊन ती आजुबाजूस काही वस्ती आहे की काय ते पाहू लागली. अचानक एका विशाल वृक्षाखाली लहानशा कुटीरमध्ये एका तपेश्वरी महात्म्याला पाहून त्वरेने ती त्याच्या जवळ गेली आणि दीनतेने तिने महात्म्याच्या चरणी प्रणाम करुन आपली व्यथा सांगितली.

'महाराज! अतिशय तहान लागलेली होती आणि पाणी काढण्यास विहिरीवर गेली पण दुर्दैवाने दोर तुटून सोबत असलेला एकमेव लोटा विहीरीत पडून गेला. दोन बालक आहेत. तहानेने आगदी व्याकुळ झालेले आहेत. पाणी काढण्याकरिता काही साधन असल्यास द्यावे. पाणी पिऊन शांत झाल्यावर पुढच्या मार्गास लागेन मी एक दीन अबला आहे. एवढी कृपा करावी.


संत योगी भाभारामने आपल्या जवळील थंड पाणी त्यांना प्यावयास देऊन तृप्त केले. कोकीबाईने 'महाराज! आम्हा दीन दुबळ्या वर आपले खूप उपकार झाले.' असे म्हणत महात्म्याच्या चरणावर आपल्या दोनही मुलांना वाहिले व स्वतः ती संत चरणाजवळ नमन करुन बसली. महात्म्याने सुध्दा अनिमेष दृष्टीने तिच्याकडे निरखून पाहिले व ध्यानमग्न होऊन खूप गहन विचारात मग्न झालेले दिसले.

एका एकी डोळे उघडून आनंदविभोर होऊन संत भाभारामने अत्यंत स्नेहार्द्र वाणीने म्हटले. "**बहेनी मेरी आ गई, परभवकी सगाईजी!**' अहाहा, **बहिण** माझी कोकीबाई तू आलीस! मी तुझीच वाट पहात येथे येऊन बसलो. अखेर माझी बहिण मला येऊन मिळाली आता तुला येथून कोठेही जायचे नाही. कारण या ठिकाणी तुझे ऋण आहे. पूर्व जन्मातला हा ऋण संबंध तू कधीही तोडू शकणार नाही म्हणून दुसरीकडे कोठेही न जाता आता तू याच स्थळी निवास कर.' महापुरुषाच्या मुखातील हे शब्द ऐकून कोकीबाई विचारमग्न झाली.

'काल घडलेल्या गोष्टीचे आज आपणास स्मरण राहात नाही आणि महापुरुष तर गत जन्माची गोष्ट सांगत आहे. मला तर कांहीच आठवत नाही. मी तर एक सामान्य अबला! महापुरुष कोण असतील? त्यांनी कसे जाणले असेल? खूप खूप विचार करुन ती थोडी स्वस्थ झाली. आपण हे अत्यंत दुःखद दिवस कंठण्याकरिता माहेरी जात होतो पण भूतकाळात असलेली माहेरची स्थिती आज कोठे चांगली राहिली आहे. पहिल्या प्रमाणे सुखाने तेथे थोडेच राहता येणार? इथे हे महात्मा पुरुष प्रेमभावाने राहण्याकरितां आग्रह करीत आहेत तर संतपुरुषाच्या प्रेमाग्रहाचा अनादर करुन पुढे जाणे दुर्भाग्याचे आहे.' ती समजदार होती. संताचे शब्द शिरोधार्य मानून तीने लांब अंतरावर उभी असलेली आपली बैलगाडी आणून बैलांना सोडून देऊन स्वतः संत चरणांच्या सेवाकार्यात प्रवृत्त झाली.



चित्र नंबर १३ दुष्काळपीडीत कोकीबाईंचे स्थलांतर व अनन्य रीतीने घोघी भामारामशी मिलाप.



चित्र नंबर १४ सद्‌गुरु इमामशाह, संत मामाराम, संत नायाकाका यांचा निर्वाणानंतर पीराणा येथे अद्‌भूत वार्तालाप संत शाणाकाकांच्या दृष्टोत्पत्तीस आला.

संत चरण सुखदायना, मानो सजनी मोर ।
दावानल संसार हे, संत चरण सुख ओर ॥

सत्पुरुषांच्या चरणी निवास करणे अति सुखदायक आहे. संसार दावानल आहे तर संतांच्या चरणी जे सुख आहे ते कोणीच वर्णवू शकत नाही. सद्गुरु भाभारामच्या चरणाजवळ राहिल्यानंतर तिच्या हृदयात जो शोक संताप होता तो चोराप्रमाणे पळून गेला. ती परमशांतीने दिवस कंठू लागली.

संत भाभाराम दिवसभर ध्यानमग्न रहात असे. एकाग्रतेने अविनाशी परब्रह्माशी एकतार होऊन राही. स्वतःला विसरुन जाई. ही प्रेम लयस्थिती पाहून कीकीबाई विचारमग्न होऊन गेली. अशा ध्यानावस्थेत या महापुरुषाचे दिवस कसे बरे व्यतीत होत असतील? यांची सेवा करण्यास कोण बरे येत असेल? ज्यांना स्वतःची कोणती चदरकार नाही, आहार, निद्रा आणि तृषेचे भान नाही अशा या योगी पुरुषाची सेवा कोण करीत असेल? संत पुरुषाची ही दशा पाहून कीकीबाईचे हृदय भरुन आले. म्हणून तेथेच ती मोठमोठ्याने निश्वास टाकून रडू लागली. बरोबर त्याच वेळी महात्म्याचे डोळे उघडले व मुसमुसणाऱ्या कीकीबाईवर दृष्टी पडताच ते म्हणाले–

'बहिण कीकीबाई, तू रडतेस? कां? कशा करितां? तुझ्या हृदयात कांही व्यथा आहे? संताच्या स्थानावर राहात असता अश्रु वहावयाचे नसतात. पण तुझ्या डोळ्यात अश्रु आहेत याचे कारण काय?' संताने प्रश्न विचारला म्हणून कीकीबाईने अश्रु पुसून हळूच वाचा उघडली-

'महाराज, माझ्या हृदयात आपली ही दशा पाहून दुःख झाले. मन व्यग्र झाले. मला रडण्याचे कांही एक कारण नाही.'

'बहिण कीकीबाई! योगी पुरुष ईश्वर ध्यान चिंतनात अेकाग्रबनून सर्व जगच विसरतो. जगताची त्याला जाणिव नसते तर स्वतःच्या देहाची तो शुध्दच कशी ठेवणार? तुझ्या हृदयात जी व्यथा जागृत झाली तो सहजभाव होता. पण, योगी खरोखर त्याच्या अविनाशी स्वरुपाच्या रंगात दंग झाला म्हणजे स्वतःला सुध्दा विसरतो. ताई! तू जर हा अननुभूत आनंद आणि अमृतमय स्थिती समजू शकशील तर तुझ्या हृदयात अशी व्यथा जागणार नाही. योगी पुरुषाच्या हृदयाची गति अशा प्रकारची असते.

योगी बांधी अलख साथे प्रीतडी ।
भुली गया आ दावानल संसार जो ॥
अविनाशी संगाथे बाजी लगावी प्रेमथी ।
हारजीतनी होड मांडी आवारजो ॥ टेक

आसन मांडी योगी बेठा ध्यानमा
पिवसंगाथे बनी गया अेकतार जो ॥
आहार निद्राने क्षुधा प्यास भूली गया
सायाजीनी सूरता रह्या निहारजो ॥ योगी. ॥ १
धूणी तपेने अजपा आराधता
योगी जनने हरी दर्शननी आश जो ॥
अविनाशी विना नही कोई आशरो
अलख धणी आवी बेसे अेनी पास जो ॥ योगी. ॥ २
योगी ने अविनाशी बेऊ भेळा मळ्या
अंतरमाही जागी रहे उल्हास जो ॥
परमानन्दशु प्रीती लागी रही उरमा
प्रभुजी अेना बनी गया छे दास जो ॥ योगी. ॥ ३
योगी मारो ने हुं योगीनो बनी रहु
न्यारो कदी नही रहु अेनी पास जो ॥
प्यारानी संगाथे प्रीते रहु
योगी मारो ने हु योगीनो दास जो ॥ योगी. ॥ ४
योगीनी गति कोई नही वरणी शके
अकळगति बुझे कोई हरीना दास जो ॥
हरीराय योगीना चरणमा राचता
पूरण थाये अंतरनी अभिलाष जो ॥ योगी. ॥ ५

योगी पुरुषाच्या अकळित गति विषयी सद्‌गुरु भाभारामने कीकीबाईला यथार्थ रीतीने समजाविले. गुरुगम जाणल्यावर तिच्या हृदयात असलेल्या संशय निघून गेला व ती विनम्र होऊन म्हणाली. 'गुरुदेव ! माझ्यात खरोखर अज्ञान होते म्हणून माझ्या डोळयातून अश्रु वाहात होते. आपल्या अमृतमय कृपा दृष्टीने माझ्यात समजूतपणा आला. आता अज्ञानांधकारात कधीच धडपडणार नाही.' अशा रीतीने सद्‌गुरु संगतीने कीकीबाईच्या हृदयात ज्ञान प्रकाश प्रगट झाला.

सद्‌गुरुके प्रतापसे, हुवा ज्ञान उजीयार ।
कीकीबाईके हृदयमे दशीया तत्वसार ॥

एके दिवशी कीकीबाईने भाभारामला विचारले 'गुरुदेव ! आपण त्या दिवशी म्हणाला होता की तू माझी पूर्व जन्माची बहिण आहेस. बऱ्याच दिवसापासून मी तुझी वाट बघत होतो. त्या वेळेस खरोखर मला आश्चर्य वाटत होते पण मी बोलू शकली नव्हती पण आज आपणास विचारते की, हा पूर्व जन्म कोणता ? मला तर काल घडलेल्या गोष्टी आठवत नाही, आपण गत जन्माची गोष्ट सांगत आहात. मला तर हे कांहीच समजत नाही. कृपा करुन मला समजावून सांगा.'

संत भाभारामने आपल्याला प्राप्त झालेल्या अंतर्ज्ञानाने व सद्गुरुनाथांनी दिग्दर्शीत केलेल्या त्यांच्या मागील तीन जन्मांची कथा कीकीबाईला निवेदन केली. उज्जैनीत असतांना महाकालेश्वराच्या देवळात तिने केलेल्या सेवेचे व प्रेमभावाचे वर्णन करुन तिला आपल्या पूर्व ऋणानुबंधाची जाणिव करुन दिली. आता या तिसऱ्या जन्मात आपण कुणबी कुळात भाभाराम नावाने अवतरलो आहे. सर्वस्वाचा त्याग करुन ध्यानमग्न बसलेला असतांना तुझे आगमन झाले. कीकीबाई, अशारीतीने तू माझी पूर्वजन्मातली बहिण होतीस. गत जन्माच्या वचनानुसार माझी बहिण मला येऊन मिळाली. हा तर ऋणानुबंधाचा एक योग आहे आणि तो तुला वचन दिल्या प्रमाणे शेवटपर्यंत निभावयाचा आहे. अशाप्रकारे भाभारामने कीकीबाईसमोर गत जन्माचे जीवंत स्मरण करवून सत्याचे यथार्थ दर्शन करवून दिले. पूर्वजन्माची जीवंत याद होऊन कीकीबाई खरोखर हर्षोल्हासात आनंद विभोर झाली.

एकवेळ असा होता कीं योगी भाभाराम अेकान्तात ध्यानमग्न होऊन बसत असे तेव्हा त्याच्याकडे विशेषसे कोणाचेच लक्ष्य नसे. पण जेव्हा कीकीबाईचे आगमन झाले तेव्हापासून संतधामाची शान बदलून गेली. एका लहानशा कुटिरात योगी आसन मांडून राहात असे. त्याला स्वतःची खाण्यापिण्याची शुध्द नव्हती तर ते स्थान सुंदर बनविण्याची गोष्टच कशाला, पण आता कीकीबाई आली आणि तिच्या मायेच्या पावन स्पर्शाने त्याभूमीत नव चैतन्य फुलले. तिने आपल्या स्वतःच्या प्रयत्नाने तिथे एक सुंदर आश्रम बनविला. रमणीय फुलझाडे फळझाडे लावून जगवून वाढविली. आगंतुक दर्शनार्थीची आवक-जावक वाढली. आश्रमाची विश्राम भवनासारखी रमणियता पाहून तिथेच बसून राहावे असे वाटे. दर्शनार्थींचे मन आनन्दीत पुलकीत होऊन केवळ संतदर्शनाने त्यांचे त्रिविधताप टळत. लोकांचे येथे जाणे. एवढे वाढले की महापुरुषाच्या त्या स्थानाला देव मंदीराचे स्वरुप प्राप्त झाले, श्रध्दा भावनेने लोकांची मनोकामना सुध्दा परिपूर्ण होत. एके समयी अतिभयानक भासणारी ही चंपकवनाची भूमी संत पुरुषाच्या वास्तव्याने परम पावन बनली आणि आज योगमायेच्या अवतार स्वरुपीणी कीकीबाईच्या मंगलमय स्पर्शाने परम मंगलदायक दिसू लागली, संत पुरुषाचे दर्शन स्पर्श व सहवास तसेच आनंददायक असते. त्यास जगात दुसरी तोड नाही.

सतत अहर्निश ध्यानमग्न झालेले योगी भाभाराम तर डोळे मिटूनच आत्मस्थितीत पूर्ण निमग्न राहात. पण पूर्ण आशा उराशी बाळगून बसलेल्या दुःखीत जनांची तारक कीकीबाईच होत असे. प्रत्येकाची व्यथा ती जाणून घेई. त्यांना सहानुभूति दाखवून समज देऊन सद्गुरुकृपेने प्राप्त झालेल्या दिव्य ज्ञानाचे वचनामृत पाजून तृप्त करी. तेवढयाने त्यांचे समाधान न झाल्यास ती सद्गुरु भाभारामचे चरणतीर्थ त्या लोकांना देऊन त्यांचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करी. पूर्ण श्रध्दाळू पणाने केलेले कोणतेही कार्य सफळ होऊन सिध्दीस जाते. या प्रमाणे सर्वलोक संत चरणामृताने परम पावन होऊन त्यांचे ताप टळून शांतचित्ताने परत जात. दिवसानुदिवस त्या धामावर साधु संत योगी आणि अतिथींची आवक वाढू लागली. कीकीबाई आपल्यापरीने जेवढी शक्य असेल ती सेवा चाकरी करून त्यांना संतोषवू लागली. संत भाभारामच्या द्वारे तीची वैखरी वाणी प्रसादरुप बनू लागली.

भगवंताच्या भरवशाने ती अतिथीधाम चालवू लागली. आज रसोई होऊ शकली पण उद्या कसे होईल ? अरे, ही फिकीर कोण राखेल. ज्याचे सदाव्रत असेल त्याला ती फिकीर. सदाव्रत तर भाभाराम महाराजांचे आहे आणि तो महात्मा तर हरहमेशा ध्यानमग्न–लीन झालेला असे. आता त्याचे अतिथीधाम अथवा आश्रमाची व्यवस्था कशी काय होईल गीतेत भगवंताने आश्वासन दिलेले आहेना 'जो माझा अनन्यभक्त असेल त्याचा मी बनून राहीन.' तो गीतेचा नायक भगवान मनमोहनच संतधाम चालविण्यास कटीबध्द होता. कीकीबाई पण ही त्याची लीला पाहून दंग होऊन जाई. कोठून वस्तू येतात ? कोण पाठवितो ते एक भगवंतच जाणे. पण जे कांही हवे असेल ते येऊन राही. आणि म्हणूनच आतिथ्य धामाचा कारभार चांगल्या रीतीनें चालू लागला.

लोक भाभाराम महाराजांच्या तपश्तर्येची बलिहारी मानीत तर कित्येक कीकीबाईकडे दृष्टीक्षेप टाकून म्हणत ही माताजी खरोखर शक्तिचा अवतार आहे. या योगमायेच्या पायगुणाने सर्व कांही मिळून येते पण स्वतः कीकीबाई मात्र या विषयी काहीच समजू शकत नव्हती ती फक्त जाणत होती की संत चरणाचाच हा प्रताप आहे. नवनिधी आणि अष्टसिध्दी संत चरणांच्या दासी असतात. योगी भाभारामच्या आश्रमात प्रत्यक्ष अन्नपूर्णादेवी येऊन राहिली होती हेच खरे.

संत सेवा करता करता कीकीबाई संतस्वरुपच बनून गेली. पारसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सुवर्ण होते तद्वत कीकीबाईत सुध्दा दिव्य प्रभाव प्रगट होऊ लागला. आशापूर्ण अंतःकरणाने लोक आश्रमात येत. पण संत भाभाराम सदैव ध्यानमग्न स्थितीत असत. त्यांना प्रत्येक वेळी जागविणे योग्य नव्हते. नाना लोकांचे नाना प्रश्न. लोकांच्या भावनांची होणारी कुचंबणा कीकीबाईला पाहवत नव्हती. जेव्हा भाभाराम जागृत होऊन भानावर येत तेव्हा कीकीबाई आपल्या हृदयाची होणारी स्थिती समजावून सांगी. ते एकूण भाभारामनें सांगितले –

संतको बिरद बखानके संत बनो कीकीबाई ।
लोगन के दुःख द्वन्द्वको, मेटन करो उपाई ।।
योगी बैठे ध्यानमे, करो जनताकी प्रतिपाळ ।
दुःखीयन के दुःख दूर करो, बनो लोगनके रखवाल ।।

'कीकीबाई ! तू सुध्दा संताची बहिण आहेस, दुःखियतांच्या दुःखाचे निधान करुन उपाय तूच सुचवायचा. जो पर्यंत मी ध्यानमग्न असेन तो पर्यंत माझे हे कार्य तूच करावेस.' संताच्या या आदेशानुसार कीकीबाईत एक सबळ प्रेरणा जागृत झाली व पुढे जनतेच्या साऱ्या दु.खाचे निवारण करणारी, त्यांच्या साऱ्या आशा आकांक्षांना पूर्ण करणारी प्रेरणामुर्ति ती बनली.

दिवसभर अतिथी अभ्यागतांची संतांची सेवा व रात्री भगवत् ध्यान अशा प्रकारचा तिचा नित्याचा कार्यक्रम होता. अजपा ध्यान साधनाने ती सुध्दा योगीरुप होऊन खूपच उंच कक्षेला पोहोचली होती.

संत भाभारामने बारा वर्षे साधनेत व्यतीत केली होती. तरी पण काही निष्पन्न झाले नाही. म्हणून काही तो डगमगला नाही, आपल्या साधन मार्गात निश्चलच राहिला. कीकीबाई पण त्यांच्या संगतीत ध्यान साधना व सेवाकार्य करीत असे. संत भाभारामच्या ध्यान साधनेस चोवीस वर्षे परिपूर्ण झाली आणि परमानंद प्रभु पुरुषोत्तमाचे आगमन झाले. तेव्हा भाभाराम अत्यंत प्रेम विभोर होऊन अत्यानंदाने नाचू लागला त्या समयी भगवंताशी त्यांनी बऱ्याच गोष्टी केल्या. भाभारामने आपल्या सर्व शंका कुशंकाचे निरसन केले.

ध्यानावस्थेत कीकीबाईने त्यांचा तो गुढ संवाद श्रवण केला. जाता जाता भगवंतांनी कीकीबाईला पण साक्षात दर्शन दिले आणि तिचा प्रेमयोग – हरिसाधना सफळ केली. भगवंतानी अत्यंत प्रेमळपणाने तिला मुक्त हृदयाने मनोवांछित मागण्यास सांगितले. तेव्हा तिने भगवंताला म्हटले, 'प्रभू ! आपल्याकडून मनोवांछित वरदान प्राप्त करण्याएवढी कांही मी भक्ति साधन केले नाही. केवळ आपल्या दर्शनाची अभिलाषा होती ती आज पूर्ण झाली. दयानिधी ! हा भाव नित्य राहावा. करुणादृष्टी या सेविकेवर सदैव राहावी आणि आपले मनोहारी दर्शन सतत होत राहावे.' निस्वार्थी कीकीबाईनें भगवंताच्या जवळ काहीही मागितले नाही. ज्याच्या हृदयात कोणतीही अभिलाषा नाही त्याला काय मागायचे असणार. अतिशय परिश्रमाने केलेली किमति भक्तिलोभ आणि लालसेत गमावून देता कामा नये. संताचे हृदय असेच निर्लोभी आणि निष्कामी असते. ज्याला प्रेमळ प्रभुची प्राप्ति झाली त्याच्या हृदयांचा आनंद अकथ्य – अवर्णनीय आहे. कीकीबाईने आनंद सागरात डुबकी मारुन एका पदात गायिलेले आहे–

मैं तो समर्या सुंदर श्याम, व्हाला वनमाळी रे ।
निशदिन धरती ध्यान, भक्तोना प्रतिपाळी रे ।। टेक
अजपा जप्या दिन रेन, अलखने आराध्यारे ।
हरी मुख जोवा काज, प्रेम योग साध्यारे ।। १
अंतरनी अभिलाष, आधी आधी जायेरे ।
मारा प्रभुजीनो पंथ, केम कळायरे ।। २
वीती गया दिवसने मास, वरसो वाया रे ।
जोती हती जेनी वाट, अे हरी नव देखायारे ।। ३
आशानो गढ उंचो, लाग्यो अविनाशी रे ।
तमने भजता लागी रही आज, गळामा फाशी रे ।। ४
हवे जीवन तमारे हाथ, राखो तो रहिये रे ।
वादीगरना खेल खेलावो, त्या जइये रे ।। ५
बानानीं पत नही जाय, प्रभुजी अेवा प्यारारे ।
युग वीत्यो नें आव्या धाम, नामथी न्यारा रे ।। ६
प्रथम दर्शन दिधा गुरुदेव, भाभारामे भाळ्यारे ।
करजोडी कहे कीकीबाई, अविनाशी प्रभु आव्या रे ।। ७

कित्येक वर्षांनी भक्त आणि भगवंताचे मंगल मिलन झालेले होते. प्रथम गुरु भाभारामला भगवंताने दर्शन दिले नंतर कीकीबाईवर अनुग्रह केला. भगवंताचे परमपावन दर्शन होताच त्यांचे सर्व मनोरथ सिध्द झाले. त्या मनमोहनाला प्राप्त केल्यानंतर त्याला मागायचे काय बाकी राहते. ज्याला जगताचा नाथ मिळाला त्याला सांसारिक तुच्छ वैभवाचे काम काय ?

भगवद्दर्शनानंतर कीकीबाईच्या जीवनात खूप उत्साह–आनंद आणि मनोबल–धैर्य आले. मन खंबीर बनवून तिने संत भाभारामचे आतिथ्यधाम आणि सदाव्रत जोमाने चालविण्याचे ठरविले. सदाव्रतच ते, कधी पंधरा तर कधी पन्नास तर कधी कधी शंभर दोनशे लोक यायचे. एवढ्या सर्वांची जेवणाची राहण्याची स्नानादिची सर्व व्यवस्था पाहण्याचे काम एकट्या कीकीबाईला करावे लागे. पण कोणत्याही प्रकारचा आळस न करता तिने स्वतःला या कार्यास वाहून घेतले. एकदा सदाव्रतात अनाज खुंटले. कीकीबाई चिंतातूर झाली. तात्पुरती बाहेरुन कोठून तरी सोय करावी म्हणून दरवाजाजवळ जाते तोच एक मनुष्य हात जोडून समोर आला व म्हणाला माते ही धान्याची पोती आणलेली आहेत. कोठे उतरावे ते सांगा. एकदा संत मंडळी जेवीत असतांनाच शे दिडशे साधुंचा तांडा संत भाभारामच्या दर्शनास आला. मातेने त्याच पंक्तित सर्वांना बसवून जेववून तृप्त केले. सर्वजण आश्चर्यचकित झाले. या मातेने एवढा स्वयंपाक एवढे पक्वान्न केव्हा केले असतील. एवढ्यालोकांना जेववून तृप्त केले पण स्वयंपाकाची भांडी तर कांहीच दिसत नाहीत, कीकीबाईचे हातचे ते अमृतोपम अन्न खाऊन सर्व संतजन आपणास भाग्यवान मानू लागले.

कीकीबाईला भगवंताने मुक्तहस्ताने अप्रतिम सौंदर्य दिलेले होते. संताच्या आतिथ्य धामात अनेक प्रकारची माणसे येत. एके दिवशी एकभुला–भटक्या साधु आला. साधु असून सुध्दा त्याच्या हृदयातले विषयाचे विष मिटले नव्हते. तो पंक्तीत जेवायला बसला पण जेवू शकत नव्हता कारण त्याचे ध्यान तर कीकीबाईवर लागले होते. अगदी निश्चल दृष्टीने तो कीकीबाईला न्याहाळत होता. साधुची ती विषयासक्त नजर पाहून कीकीबाई हळूच त्याच्याजवळ आली आणि थोड्या आवेशाने म्हणाली –

'बेटा, तुला दूध पाजून, भरवून मोठे केले ते दिवस तुला आठवत नाहीत कां ! तू या दुधास विसरलास तरी हरकत नाही पण जिने जन्म दिला त्या मातेला सुध्दा विसरलास ?' कीकीबाईच्या या शब्दप्रहाराने भान विसरलेला साधु शुध्दिवर आला. एकदम चपापून तो कीकीबाईकडे पाहू लागला, तो साक्षात् त्याची आई समोर उभी असलेली दिसली. साधु त्वरेने उभा राहिला आणि मातेच्या चरणावर दीनतेने पडून म्हणाला –

'माताजी, मला क्षमा कर ! माझा अपराध माफ कर. मी तुझा अधम पापी पुत्र आहे. पुत्र कूपुत्र झाला पण माते तू या गरीब हीन दीन पापी चांडाळावर कृपा कर. माते मी खरोखर मार्ग चुकलो होतो. तू मला ठिकाणावर आणले. तू साक्षात् भगवती आहेस.' असे म्हणून तो कीकीबाईच्या चरणावर झुकला अपार वात्सल्याने तिने त्याला उठविलें व 'बेटा, तू भुकेलेला आहेस. शांतीने भोजन कर.' असे म्हणून कीकीबाईने त्याला बसविले व आपल्या हाताने वाढून तृप्त केले.

संत भाभारामच्या कृपा दृष्टीने वांझपण मिटून पुत्ररत्न प्राप्त झालेल्या एका कुणबी शेटने मानता – बाधा पूर्ण करण्याकरिता एक कुशल करागिराकडून चांदीचा पाळणा तयार करवून संत धामात आणला. संत भाभाराम ध्यानमग्न होते. त्याने आश्रमात येऊन गुरुगादीला फूलहार चढवून नारळ फोडला व चांदीचा पाळणा गादी समोर ठेवून आपल्या मुलाला गादी समोर झोपविले व हात जोडून विनयाने म्हणाला, 'महाराज आम्ही तर वांझ ठरलो होतो, पण आपण आमच्यावर करुणा करुन पुत्ररत्न दिले आणि दुनियेचे टोले टोमण्यातून आम्हाला मूक्त केले. आता हा पुत्र आपण दिलेला आहे. मानता ठेवलेली होती त्यानुसार हा चांदीचा पाळणा येथे चढवून आपला कृपाप्रसाद म्हणून मुलाला घेऊन जातो.' असे म्हणून मातेने त्या मुलाला उचलून कुशीत घेतले.

कीकीबाई आली. तिने तो चांदीचा पाळणा तेथेच ठेवलेला पाहून म्हटले, 'बहेन, साधुच्या स्थानात अशा चांदीच्या पाळण्याची कांहीच जरुर नाही. उलट ह्या अशा वस्तू म्हणजे उपाध्या आहेत. तुमची मानता फळली आता हा पाळणा घरी घेऊन जा. बालक जेव्हा खेळायला लागेल तेव्हा खेळण्याकरिता त्याला द्यावा.' असे म्हणून पाळणा घेऊन जाण्यास आग्रह केला परंतु त्यांनी नाकारले आम्ही बाधेच्या बंधनातून मुक्त झालो. आता परत घरी घेऊन जाणार नाही. असे म्हणून ते दाम्पत्य कीकीबाईला वंदन करुन निघून गेले.

संतधामात अनेक प्रकारचे साधुसंत येत. या वेळेस चांदीचा पाळणा भेट म्हणून आला हे पाहून एका साधुच्या मनात तो पळविण्याची दुर्बुध्दि झाली. लाग मिळाल्यावर रात्रीच्या वेळी गुपचूप उठून पाळणा उचलून त्याने पलायन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी कीकीबाईला पाळणा चोरीस गेल्याचे समजले. ती स्वतः निरिच्छच असल्याने तिने विशेष देखभाल ठेवलीच नव्हती पण ईकडे साधु एकादकोस गेल्यानंतर एका चोराने त्याला गाठून त्याच्या झोळीतील चांदीचा पाळणा काढून घेतला व त्याला खूप मार मार मारुन अर्धमेला केले. साधु आपल्या हृदयात पश्चाताप करु लागला. मनोमन त्याने भाभारामची व कीकीबाईची क्षमा मागितली.

एकदा रात्रीचा पहिला प्रहर संपल्यानंतर आश्रमात एक योगी पुरुष संत भाभारामच्या दर्शनासाठी आला. त्या योग्याची भव्य दिव्य तेजस्वी मूर्ति पाहून व रात्रीच्या आगंतुक वेळी येण्याचे पाहून कीकीबाईला आश्चर्य वाटले. कीकीबाईने विनयाने योग्यास म्हटले 'महाराज ! आपण फार लांबून आलेले दिसतात. थोडावेळ विश्रांती घ्या तोवर मी आपल्या भोजनाची व्यवस्था करते. गुरुजी तर आता ध्यानमग्न होऊन बसलेले आहेत आणि कोण जाणे केव्हा ही त्यांची ध्यानावस्था सुटेल !' आगंतुक योगी म्हणाला, 'माताजी योगी पुरुषांची गतीच अकळित असते. ते तर आपल्यातच प्रभुच्या ध्यान चिंतनाचा आनंद अनुभवीत असतात. मला तर फक्त त्यांच्या दर्शनाची भूक आहे. म्हणून अेक वेळ त्याच ध्यानावस्थेत मला त्यांचे दर्शन करवून द्या. माताजी मी नित्य तृप्त आहे. संत भाभारामच्या दर्शनाची फक्त तृषा आहे, म्हणून त्यांच्या जवळ मला घेऊन चला.'

कीकीबाई त्या योगीवरास घेऊन गुरुजींच्या आसनाजवळ गेली. तिथे जाऊन ती ध्यानमूर्ति न्याहाळून योग्याने दंडवत प्रणाम केला अणि अत्यंत सखोल नयनांनी ती मूर्ति पाहून परम आनंदीत उल्हसीत होऊन जवळच उभ्या असलेल्या कीकीबाईच्या चरणावर झुकून म्हणाला 'माताजी ! आज आपल्या दर्शनाने खरोखर गंगामैयाच्या दर्शनाचा लाभ मिळाला. योगीवर साक्षात शंकरस्वरु, भाभाराम महाराज व आपल्या परम पावन दर्शनाने आज मी नित्य तृप्त झालो. माते, मी येतो. या बालकावर आपली कृपा दृष्टी ठेव.' असे म्हणत म्हणत कीकीबाईची चरणधूळ मस्तकी धारण करुन जसा आला तसाच निघून गेला.

योगी प्यासा दरशका, आये गुरुके धाम ।
सद्‌गुरु अरु साध्वी को, झुक झुक किये प्रणाम ।।

एकदा योगी अडबंगनाथ, जान्हवीदास, सतानन्दजी आणि रसिकनाथ हे चारही सिध्दपुरुष मानव कल्याणासाठी आपले उत्तुंग आसन सोडून खाली उतरले व जगतात पर्यटन करीत असता चंपकवनात आले. योगी भाभारामच्या आश्रमात प्रवेश करताच कीकीबाई समोरी गेली अत्यंत विनम्र भावाने तिने त्यांना प्रणाम केला. सिध्द पुरुष अडबंगनाथांनी तिच्याकडे सखोल दृष्टीने पहिल्यावर त्यांना भूतकाळ आठवला. अलिद्राला जाऊन आपण ज्यांना वरदान देऊन त्यांचा वांझपणाचा लोकापवाद मिटविला होता तीच ही कन्या आहे. ही इथे कशी आली असावी? योग्याने अनिमेष दृष्टीपात करताच कीकीबाईला पण भान आले. याच गुरुदेवांनी आपणास बालपणात संसाराची असारता समजावली होती. त्या गुरुवर्यांना जाणताच कीकीबाई अडबंगनाथांच्या चरणी दंडवत पडली, आपल्या अश्रुंनी योग्याचे चरण धुऊन मूक रुदन करु लागली. त्यागमूर्ति योगी पुरुषाच्या नेत्रातून पण जलबिंदू टपकू लागले. त्या महापुरुषाने तिच्या शिरावर वरदहस्त ठेऊन आपल्या हाताने तिला वर उठविले व म्हटले, 'बाळे, उठ ह्या जगात् सेवेतच आपल्या जन्माचे कल्याण आहे. तू चिंता करु नकोस. योगेश्वर भाभारामच्या सान्निध्यात तुझे जीवन परम उज्वल होऊन झळकेल. शिरावर जी कर्तव्यकर्माची जबाबदारी घेतलेली आहे, सेवका प्रमाणे ती पार पाड. भावी काळ उज्वल आहे.' असे म्हणून त्यांनी तिला आशिर्वाद दिला. गुरुंचा आणि शिष्येचा हा अद्‌भूत अनुराग कांही अनुपमेयच होता. तो पाहून सर्वजण आश्चर्य विमूढ होऊन गेले.

कीकीबाई स्वस्थ झाली. अन्य तीनही योग्यांच्या चरणारविंदी तिने लीनतेने प्रणाम करुन सर्वांना सद्‌गुरु भाभाराम ध्यानमग्न झालेले होते त्या आसनाजवळ घेऊन गेली. योग्यांना योगी मिळाला आणि आनंदाचा पूर उमटला, योगी अडबंगनाथ आणि सर्व योगीयांचा योगीवर भाभारामशी सत्संग झाला. त्यांनी एकत्र बसून अगम्य ज्ञान गोष्टींची चर्चा केली. कीकीबाईने एकाग्र अंतःकरणाने ती चर्चा ऐकून तिच्या अंतःकरणात प्रेमाब्धि उचंबळून आला. जेव्हा ते परत जाण्यासाठी तयार झाले, परंतु महापुरुषाचे हृदय त्यांचा वियोग सहन करु शकत नव्हते, तरीपण कठिण हृदय करुन ते उठले, तेव्हा कीकीबाई लांब उभी राहून मुसमुसत होती. ते पाहून सिध्द

पुरुषाचे हृदय दयार्द्र झाले. तें तिच्याजवळ गेले. तिच्या माथ्यावर वरदहस्त ठेवून म्हणाले, 'तू तर शक्ति स्वरुपीणी आहेस अशा मंगलसमयी अश्रु ढाळायचे नाही. बाळे ! योगी पुरुषाप्रमाणे मानव कल्याणाच्या व्यवसायात प्रवृत्त रहा. तुझे नांव सदाकाळ अमर बनून राहिल.' असे म्हणून आशिर्वाद देऊन योगीपुरुष विदा झाले कीकीबाईने झुकुन त्यांना प्रणाम केला.

हा अलौकिक प्रसंग पाहून भाभाराम महाराज सुध्दा आश्चर्यचकित होऊन गेले. काय, कीकीबाई पण योगी अडबंगनाथाना ओळखते ? असा प्रश्न त्यांच्या चित्तात उद्भवला. पर योगीयांच्या विरह व्यथेत तो प्रश्न हवेत विरघळून गेला. महापुरुषांच्या मिलनाने होणारा आनंद व नंतर होणाऱ्या वियोगाच्या दुःखाचे वर्णन होऊच शकत नाही. पण त्यांच्या संगाने प्राप्त होणारा आनंद कांही वेगळाच असतो.

योगी जनके मिलनकी, योगी को अभिलाष ।
भाभारामको देखते, पहूँची मनकी आश ।।

संत भाभारामने एकदा कीकीबाईला प्रश्न टाकलाच. 'बहिण कीकीबाई तू योगी अडबंगनाथांना केव्हापासून ओळखतेस ? तुझ्या विषयी एवढ्या आत्मियतेने योग्यांनी वात्सल्य केले ते पाहून मला खरोखर आश्चर्य वाटते.' भाभारामच्या या प्रश्नाचे उत्तर देण्याचे ऐवजी कीकीबाईने त्यांनाच उलट म्हटले, 'महाराज ! मला सुध्दा हेच आश्चर्य वाटते कीं योगीराज अडबंगनाथांशी आपले नाते काय आहे कीं आपल्या भेटीकरितां ते एवढ्या लांबहून दौडत आले ?'

पद

अडबंगनाथजी गुरुजी तमचे ओळखे, सिध्दपुरुष मळवाने केम धाय जो ।।
असलनातो शुँछे तमारो अेमनो, कहोने गुरुजी पुछु लागी पाय जो ।। टेक
पूर्वजन्ममा उत्तर खंडमा बेसीया, तपेश्वरी थई धरे प्रभुनी ध्यान जो ।।
अडबंगनाथजीना संगमा जईने बेसता, योगीजनो थई जाता गुलतान जो ।। १
सिध्दपुरुषे मुजने घणी वातो कही, योगी पुरुष प्रगटे परहितकार जो ।।
अवनिमा जई अधमने ओधारता, भक्तजनोनी निशदिन करता व्हार जो ।। २
गिरी गुफामा बेसीने तमे शुं करो, भाव करीने भजवाने किरतार जो ।।
अविनाशिना बाळ जगतमा आथडे, नांगा भुख्या लोक रुवे हजार जो ।। ३
दुःखियाना बेली थईने रहो, आंसु अेना लुछी नाखो आवार जो ।।
परमार्थमा पाछा डग भरसो नही, अफळ जाशो योगीना अवतार जो ।। ४
गुरु अडबंगनाथना शब्दो हृदयमा लागिया, उत्तरी गया छे मानो आरपार जो ।।
इंद्रकिलथी आ अवनिमा आवीया, मांडी बेठा छे परमार्थनों वेवार जो ।। ५

सिध्दि सिध्दि योगीना चरणनी दासी छे, भाव करी अेने वापरो परहित काज जो ॥
योगीनी लीला जोवाने आवीया, सद्गुरु अडबंगनाथ महाराज जो ॥ ६
परमार्थनी पूजा भाभारामनी जोता हरखीया योगीपुरुषना द्वन्द्व जो ॥
दुःखियाराना दुःखसदा हरता रहो, जोता अमने हैये थयो आनंद जो ॥ ७
कीकीबाई आ कथनी छे गई कालनी, योगी पुरुषनो त्रीजो छे अवतार जो ॥
भक्तोने काजें अवनिमा वसी रहु, मुखथी कदी मागु नही उध्दार जो ॥ ८
सद्गुरुये हेते हैया खोलीया, निरखी गुरुनी आँखे आंसु धार जो ॥
कीकीबाईये गुरुना चरण ग्रही लीधा, माफ करी दो मुजने देव मोरारजो ॥ ९

'बहिण कीकीबाई ! या सिध्द पुरुषाशी माझा खूप जूना संबंध आहे. पूर्व जन्मात उत्तराखंडात इंद्रकिल पर्वतावर तपश्चर्या करीत असता या महापुरुषाशी संग झाला होता. त्यावेळी या महायोग्याने मला चेतावणी दिली होती की, 'तपेश्वरी ! गिरीगुंफात बसून काय करशिल ? केवळ एकटयानेच हरीसाधन करण्यात काय अर्थ योग्याचे प्रागटय जनहितासाठी होत असतें. पापी जीवात्म्यांचा उध्दार, भक्तजीवांचा अहर्निश सांभाळ करण्यासाठी आणि जगतात भगवंताची लाडकी मुले भुकेलेली नग्न फिरत असतात, त्यांचे तप्त अश्रु पुसण्यासाठी पावन पर्यटन करुन भगवंताचे काम करायला पाहिजे. केवळ गिरीकंदरात एकटयाने बसून जगत्कार्य होणार नाही. परोपकारी बनून दुःखितांचे दुःख दूर करायला हवे आहे. परमार्थाच्या या व्यवहारात पाय मागे पडायला नको आणि जर कदाचित तसे झाले तर योग्याचा अवतार संपुष्टातच आला. म्हणून जर आता मार्ग चुकलास तर मुक्तिगामी न होता अधोगामी होशिल.' गुरुवर्य अडबंगनाथांचा हा अमुल्य उपदेश या तिसऱ्या जन्मात यथार्थ करण्यासाठी हा पावन व्यवसाय मांडलेला आहे आणि आपण केलेल्या उपदेशाचे यथार्थ पालन होते किंवा नाही त्याचे निरिक्षण करण्याकरितां सिध्द पुरुष आपल्या तीन साथीदारांना बरोबर घेऊन येथे आले होते परमार्थाचा हा पावन व्यवसाय पाहून योगी परम आनंदीत झाले.' गुरुदेव भाभारामच्या मुखातून हा अलौकिक संदेश ऐकून कीकीबाईच्या डोळयातून प्रेमाश्रु वाहू लागले. तीने आपण उलट प्रश्न विचारुन गुरुदेवांच्या हृदयाला व्यथीत केल्याबद्दल त्यांची क्षमा मागितली.

चंपक वनातील आश्रमात देवा येथील राजमान्य दरबार भोजराज ठाकोर नेहमी सद्गुरु भाभारामच्या दर्शनास येत असत. कित्येक वर्षापासून त्यांचा हा नियम अखंडपणे चालू होता. आता त्यांचे वयहीं खूप झाले होते. वृध्दापकाळामुळे चालवले जात नव्हते मनात सद्गुरु दर्शनाचीं खूप अभिलाषा. पण तीं पूर्ण होईल अथवा नाहीं अशा संभ्रमात असतांनाच एके दिवशीं ते सद्गुरु चरणारविंदावर झुकून पडले. डोळयातून अश्रुंच्या धारा वहात आहेत पण मुखातून एक शब्द हीं प्रगट होत नाहीं. कारण त्रिभुवन तारण सद्गुरु महात्मा सर्वाच्या अंतरातील गोष्ट जाणतातच मग बोलूनच काय उपयोग. सद्गुरुंनीं आपल्या हातांनीं त्यांना उठवून म्हटले 'भोजजी तुम्ही अश्रु ढाळीत आहांत ! का? मुखातून वाणी उच्चारा ! दरबार ! बोला,

आपल्यावर असे कोणते संकट आलेले आहे? भगवंताच्या कृपेने ते निवारण होईल. आपले काय मनवांछित असेल ते पूर्ण होईल. निःसंकोच होऊन विदीत करा.'

सदगुरुंचे हे आश्वासनपर वचन ऐकून दरबारांनी वाचा खोलली. ते म्हणाले –

गुरुजी मुखथी बोलत, जीभ झाली रहु ।
केम करीने बोलु किरपा नाथ जो ॥
हुंयु मारु रात दिवस रडी रहे ।
सद्गुरुने तेडी लावु संगाथ जो ॥
दया करीने देवामा आवी रहो ।
भांगे मारा मनडा केरी भांत जो ॥
भक्तजनो सहु आवीने भेळा थशे ।
टाळजो अेना तनडाना संतापजो ॥

'महाराज! काय बोलू? बोलतांना माझी जीभ अडखळते माझे हृदय अगदी व्याकूळ होते. रात्रंदिवस एकच ध्यास लागला आहे की कोणत्याही प्रकारे सद्गुरुंना देवाला घेऊन जावे. गुरुदेव मी हीन दीन आपला दासानुदास आहे. माझ्या मनाची अभिलाषा पूर्ण करावी. आपण देवाला येऊन निवास करावा. ज्या प्रमाणे इथे भक्तजन एकत्र येतात त्या प्रमाणे तिथे सुध्दा दौडत येतील. आपण त्यांच्या हृदयातील ताप टाळावा. सेवकांचा संताप दूर करावा. देवात राहून लोकांचे कल्याण करावे. हीचं माझी प्रार्थना आहे ही याचना पूर्ण करावी.'

भोजरायनी विनंती प्रभुये सांभळी, भक्त हेत अेने खाली किधो मुकामजो ॥
दयानिधी देवामा आवी वस्या, देवा ते दिन बनी गयु संत धामजो ॥
चरोतरना लोकोने अचरज थयु, भोजजीपर रिझीया भाभारामजो ॥
चंपकवनथी गुरुजी प्रेम परवऱ्या, जईने किधो देवामा मुकाम जो ॥

संत भाभारामने वचन दिलेले होते आणि पुढील भावी काळावर नजर ठेऊन महापुरुष ज्या काही घटना घडवून आणतात त्या अत्यंत गुढ असतात. सर्व सामान्य मनुष्य ते समजू शकत नाही. योगी भाभारामने भोजजी ठाकूरांच्या विनंतीवरुन देवाला मोठा आश्रम बांधून स्थायी निवास केला. वस्तूतः महापुरुष आश्रम मठ मंदिरे, वगैरे बांधण्याच्या व आश्रम चालविण्याच्या उपाधीत पडत नसतात पण ईश्वरच त्यांच्याकडून तसे कार्य घडवून आणतो. कारण ईश्वराचा त्यात कांही हेतु असतो.

एकदा चंपकवनातून देवाकडे येत असता रस्त्यातच संत भाभाराम आणि संत नायाजींचे मंगल मिलन झाले. संत नायाजी योगी पुरुष होते. त्यांचे सुध्दा तीन जन्म झाले. तिसऱ्या जन्मात कानम येथील ठाकरडा कुळात त्यांचा जन्म होऊन लुटारुचा धंदा करीत असत पण सद्गुरु इमामशाहांच्या समागमाने ते संत झाले होते. भाभाराम अत्यंत प्रेम आदर भावाने त्यांना आपल्या आश्रमात घेऊन गेले. संत नायाजींच्या दर्शनाने कीकीबाईला सुध्दा परम आनंद झाला. कीकीबाईचे प्रागटच योगीवर अडबंगनाथाच्या शुभाशिर्वादाने झालेले होते. भाभाराम सुध्दा त्याच सिध्द–पुरुषाच्या शुभाशिर्वादाने प्रगट झाले होते. तर संत नायाजींना पीर इमामशाहांचा समागम घडून योगीवर सोहंनाथाचा शुभ आशिर्वाद लाभला होता. अशा प्रकारे या सर्व योगीश्वरांचा पूर्व ऋणानुबंध होता म्हणून मृत्यूलोकात ते असे एकत्र मिळालेले होते कीकीबाई हा पूर्व संबंध जाणत होती म्हणून संत नायाजींच्या आगमनाबरोबर तिने मंगल गीत गाऊन त्यांचा स्वागत सत्कार केला.

पद

आव्या आव्या नायाजी महाराज, दुर्लभ दर्शन कीजीयेरे जी ।।
आ तो योगी जननो देश, ओळखीने ल्हावा लीजीयेरे जी. ।। टेक
योगी थईने अवनी माय, आव्या छो अवतार धरी रे ।।
भूल्या भटका जीव, अेना पर महेर करीरे ।। १
गुरुजी जुग जूननी सगाई, अडबंगनाथ ओळखेरे ।।
अेमा सोहंनाथ सोहाय अवतार सघळा अे लखेरे ।। २
नायाजी बेठा छे आसनवाळी, योगी आवे मळवारे ।।
हैयामा हरखाय, धन्य धन्य योगी आवतारे ।। ३
नायाजी आव्या अम घर आज, दिवाळी दन उगीयोरे ।।
परभव केरी सगाई, आनंद उरथी उछळयोरे ।। ४
गुरुजी भाभाराम महाराज, अडबंगनाथने विनवेरे ।।
कीकीबाई बेऊ करजोड, नायाजी चरणे नमेरे ।। ५

कीकीबाईने नायाकाकांना जन्मोजन्मीचे जुने प्रेम संबंध वर्णन करुन सांगितले व त्यांचा योग्य आदर सत्कार सन्मान केला नंतर तिने अपणास जो गुरु मिळाला तो कसा आहे त्या विषयी जिज्ञासु बुध्दिने प्रश्न केला.

कहोने गुरुजी अेकवार, सद्गुरु केवा मळियारे ।।
अकरम किधा दूर, भक्तीमा केम भळियारे ।। टेक

नायाजी :–

मारा गुरुजी दीनदयाळ, मुरसद साचारे ॥
क्षणमा छोडाव्या फंद, आपी मुजने वाचारे ॥ १
वसता पीराणा माहि, पीर इमामशाह रे ॥
अेमना चरणकमळनी माय, परचा अथाह रे ॥ २

कोकीबाई :–

परचा बतावे ते पीर, दुनिया वखाणेरे ॥
मने गुरुना दर्शन केरी आश, क्यारे गुरु आवेरे ॥ ३

नायाजी :–

मोंघो अवशरीयो आवे, गुरुना दर्शन थाय रे ॥
विनय करीने महाराज, आरत वाणी गाय रे ॥ ४

कोकीबाई :–

नायाजी तमारा गुरुदेव, निरखवा छे नैने रे ॥
कोकीबाई कहे अम घेर, तेडी लावो अेमनेरे ॥ ५

नायाजीने आपल्या गुरुदेवाचे यश गाइले ते ऐकून कोकीबाईने त्यांच्या दर्शनाची अभिलाषा व्यक्त केली आणि प्रेमाग्रहाने म्हटले कीं, 'एकदा आपल्या गुरुदेवांचे दर्शन करुन त्यांचा आदरसत्कार करण्याची मनात फार इच्छा आहे.' तेव्हा नायाजी म्हणाले –

आवशे आवशे मारा गुरुदेव, आंगणीये तमारा रे ॥
ते दि उजळा होशे तन मन, चेतावन हारा रे ॥ टेक.
गुरुजी बुडतानी झाले बाय, तार्या कई जीवने रे ॥
अेना गुणला वखाण्या केम जाय, पेखी लेजो भवने रे ॥ १
जांबुद्विपनी माय, थंभ अेमने रोप्यो रे ॥
प्रगट पीराणा पीर, महंमदशाह कोप्यो रे ॥ २
मारा गुरुजी अगमना भेद, भाखे जो ने खडा रे ॥
सुगरा दर्शन पामे, भागे नर कुडारे ॥ ३

कोकीबाई :–

गुरुजीना वखाण, करो छो तमे पुरारे ॥
आमने मळवानी होश, परखीये शुरा पुरारे ॥ ४
नायाजी अमारा बोल, उरमा लखी लेजो रे ॥
अेक दिन गुरुना दिदार, अमने देजो रे ॥ ५

संत नायाजींचा आणि संत भाभारामचा बराच वेळ वार्तालाप झाला. सत्संगाच्या ज्ञान चर्चेत तीघे ही जण न्हाऊन निघाले. त्यांच्या ज्ञान चर्चेच्या विमल कथांची त्यांचा परमशिष्य गंगासिह गोहिलने यथार्थ नोंद करून ठेवलेली आहे.

अत्यंत प्रेमाने उल्हसित झालेली दोघा बहिण–भावाची मने सद्‌गुरु दर्शनाकरिता व मिलनाकरिता अत्यंत आतुर झाली. त्यांनी आपली आंतरिक अभिलाषा नायाजीजवळ आणखी विदीत केली.

नायाजी म्हणाले 'भाभाराम ! कीकीबाई ! आपली अभिलाषा लवकरच सिध्द होईल. एक दिवस आपल्या या स्थानात सद्‌गुरु इमामशाहांचे आगमन जरुर होईल. त्या दिवशी आपल्या हृदयात अननुभूत परमानंद प्रगट होईल.' असे म्हणून संत नायाजी आश्रमातून प्रयाण करीत आहेत तोच आपला परमसेवक जो हाजरबेग त्यासह सद्‌गुरु इमामशाह महाराजांचा रथ तेथे दाखल झाला.

अकल्पित रीतीने सर्वही योग्यांचा समागम झाल्याने सर्वांना मोठा आनंद झाला. सर्वांनी सद्‌गुरुचरणी लोटांगण घातले. सर्वांना अत्यंत प्रेमाने उठवून सद्‌गुरुंनी आपल्या हृदयाशी लावले व आपल्या अमृतवचनाने सर्वांना शांत केले. सात दिवसपर्यंत सद्‌गुरु मुखातून अमृतधारा वाहिली. श्रीमद्‌भागवत, महाभारत, रामायण, योगवासिष्ठ, गुरुगीता, भगवद्‌गीता, वैराग्यशतक, गर्भोप-निषद् आदि अनेक विषयावर प्रवचने झाली. भाभारामला संबोधून त्यांनी अनेक पदे गायिली. हे तर ठीकच पण संत इमामशाहांचा तत्त्वोपदेश खूपच विस्तृत आहे. कीकीबाईने हा देवदुर्लभ सत्संग ऐकून तर आपले जीवन धन्य मानून घेतले. संतसेवेबरोबर ऐकायला मिळालेला तत्वोपदेश ग्रहण करून तिचे मन तृप्त होऊन गेले. सद्‌गुरुंच्या चरणाजवळ बसून तिने त्यांच्याशी जी ज्ञानचर्चा केली ती विशेष आहे. महापुरुषांचे मंगल आगमन झाले त्या समयी तिने एक मंगलगीत गाइले –

पीर इमामशाहा पधारीया, आनंद अंग न समाय ॥
धन्य धन्य दिन आजनो. मळी साहेली मंगल गाय ॥ टेक
प्रगटे पीर मुलतानमा, आवी वस्या गुजरात ॥
पीराणा गादी करी, आपे बीराज्या साक्षात् ॥ १
नायाजीनें विनंती करी, गुरुने तेडी लावो आ ठाम ॥
खेप करीने गुरुजी, आव्या चंपकवन मुकाम ॥ २
भाभारामने गुरु भेटीया, सत्संग किधो सात रात ॥
ज्ञान अमीरस पीवडावीया, गर्भ गीतानी कही वात ॥ ३
असी पदो भाभारामने, संबोधी कह्या गुरु पीर ॥
श्रोता बनी बेसी रह्या, भाभाराम गुण गंभीर ॥ ४
अवशर गोंधा मूलनो, अम घर आव्या आज ॥
करजोडी कीकीबाई विनवे, पीर इमामशाह महाराज ॥ ५

संत भाभाराम सोबत बसून होत असलेल्या सत्संगात ओतप्रोत बनलेल्या पीर इमामशाहांना जेव्हा सवलत मिळे असा वेळ काढून साध्वी कीकीबाई आपल्या हृदयातली व्यथा व्यक्त करून प्रश्न करी. गुरुजींच्या समक्ष हृदय खोलून जे सांगायचे ते स्पष्टतेने सांगून त्यांच्याकडून ती आपले गूढ उकलून घेई. कीकीबाईने गुरु इमामशाहांना संबोधून असाच एक गूढ प्रश्न टाकला –

हिंदवा मेरा नमी रहे, अने में हिंदवाका होई ॥
प्रतिज्ञा करी मुलतानमा, अे तो जाणे छे सहु कोई ॥ टेक
गुजरातमा पीर पधारीया, दिधो हिंदवानो उपदेश ॥
सत्पंथ मार्ग बतावीने, अेना कापी नाख्या क्लेश ॥ १
पूजा विधी घट पाटनी, उत्तम धर्म कहेवाय ॥
आदिकाळथी आवीयो, अेवु शास्त्र माही गवाय ॥ २
हिंदवाने मुरीद कर्या, तमे हिंदवाना दिलजान ॥
हिंदवा केम हिंदवा नही रह्या, अेनी वातो कहोने वखाण ॥ ३
ब्राह्मणनो संघ आवीयो, काशी तिरथ करवा जाय ॥
रोकी दिधा तमे नाथजीं, काशी धाम बताव्या त्यांय ॥ ४
ब्राह्मणपणु मिटावीने, अेनी जनोई उतारी दिध ॥
मुरीद किधा ते भली करी, अेने मोमीन किधा किसविध ॥ ५
सत्पंथ धर्मना संस्थापक, गुरु पीर बन्या छो आप ॥
अन्य मारगडे जो पडे, अे तो डुबे भवसंताप ॥ ६
वाडा धर्मना वेगळा, अेमा झाझी छे खेचाताण ॥
कीकीबाई तमने विनवे पीर, धर्मना कहोने अेंधाण ॥ ७

'गुरुजी! आपण धर्म प्रचार करीत करीत या गुर्जरभूमीत आलात आणि इथे सत्पंथाचे प्रवर्तक म्हणून कार्य करु लागलात मुलतानला आपण केलेल्या प्रतिज्ञेनुसार हिंदुना शिष्य बनवून आपल्या वैदिक सनातन धर्माचे ज्ञान त्यांना शिकविले हे तर ठिक पण काशियात्रेस जाणाऱ्या ब्राह्मणांना काशीविश्वेश्वराचे प्रत्यक्ष दर्शन करवून त्यांना आपले ब्राह्मणत्व मिटवायाला लावले ते कां व कसे? आपण त्यांना वेगळ्या वाड्यात नाही का घेऊन गेलात? त्यांच्या मनाची खेचाताण नाही का झाली? गुरुजी ! मी या बाबतीत अजाण आहे मला या विषयी समजावून सांगा.

पीरजी सत्पंथ स्थापीयो, निजीया धर्म महान ॥
आन कछु भाखो नही, जीवडा झाझी छे अेमा हान ॥ टेक
धर्म विचार करता रहो, धर्मथी होय कल्याण ॥
धर्मी थई धर्मने ओळखो, अेवु पीरजी वदे छें वाण ॥ १
आन धर्मीने खेपथी, समजावो शुध्द ज्ञान ॥
सत्पंथ मार्ग बतावीने, अेने करजो साचु भान ॥ २

पीर फकीरने ओलीया, अे तो धर्मना दूत कहेवाय ।।
धर्म प्रचार चाहे बधा, आनअधर्मी कहेवाय ।। ३
अवधूता योगी जना, जेना मनमा नही भेदभाव ।।
चाहे ते नामे भजो, तमे लई ल्यो भजीने ल्हाव ।। ४
पीरजी अेवु नही देखीयु, निःपक्ष पेखावो पीर ।।
अकळगति अवधूतनी, अेने निरख्या गुण गंभीर ।।
पीर फकीरना ढंगने, तमे पेखी लीधा कीकीबाई ।।
दीनना बंदा बनी रहे, नीत दीनतणा यश गाई ।। ६
निपक्ष कोई न्यारा नही, शोधी जोया बहु साध ।।
कीकीबाई पीरजीनें विनवे, मारा सद्‌गुरु रहोने अबाध ।। ७

धर्माच्या केवळ पोकळ गोष्टी बोलणारे पाहिले. त्याचे रंगढंग चाळे निरखून पाहिले. आणि त्यांची भारदस्त प्रवचने ऐकली पण केवळ धर्माच्या प्रचारा शिवाय आणि पोकळ पांडित्या- -शिवाय त्यांच्याजवळ काहीही आढळले नाही. अन्य जनांना धर्ममार्ग- दर्शित करणे सुलभ असते पण गुरुजी ते अंगी बाणविणे फार दुरापास्त असते सर्वधर्म प्रवर्तक याच गर्तेत फसलेले दिसतात. महापुरुषांची गोष्ट वेगळी आहे पण केवळ धर्मांधता अथवा अंधश्रध्दा आत्मनाशास नाही कां कारणीभूत होत ? योगी, अवधूत, पीर, फकीर, औलिया यांच्यासारखे महापुरुष सदा सर्वदा निःपक्ष, ज्यांना कोणत्याही विशिष्ट धर्माची खेचाताण नाही ते तर केवळ एक भगवंतालाच ओळखतात बाकी कांहीही असो उत्तम करणी व एकमेव ईश्वराचे स्मरण, चिंतन हीच त्यांची शिकवण व हेच त्यांचे आचरण. गुरु महाराज ! ते कसेही असो पण आम्ही या द्वन्द्वात अडकून राहू नयेत आणि सदैव अबाध राहून निरपेक्षतेने जनता जनार्दनाला आत्मकल्याणाचेच मार्गदर्शन आमच्या हातून घडावे हीच माझी मनाभिलाषा आहे.'

कीकीबाईचे असे परखड विचार आणि मानव मात्राच्या आत्मविकासाची तळमळ जाणून सद्‌गुरु इमामशाहांनीं तिला दिलासा दिला. ते म्हणाले –

सतपंथ मारग सुगम छे, अेने समजी ल्यो ने आ वार ।।
घटपाट पूजन तमने सोपीनें, अमे अलग थया निरधार ।। टेक
साची वस्तु समजावीने, कही दिधु वारंवार ।।
जुठ प्रपंच बहु मळे, वही जशो न तेनी लार ।। १
उत्तम धर्म अभडावीने, अेमा करी दिधो क्लेश ।।
पीर कहे अेवा असुरथी, दूर रहेजो तमे हमेश ।। २
कर्ता होय ते करी रहो, पूजा धर्म अने नेम ।।
सोही संगाथे आवशे, तमने राखशे कुशळ क्षेम ।। ३

निजीया धर्मने ओळखो, तमे अेना करोने वखाण ।।
परमार्थ भय उपजे, अेवु श्रीमुख उचरे छे वाण ।। ४
अवनीमा असुरो पाकसे, ते तो करशे धर्मनो लोप ।।
कीकीबाई कहे गुरुदेवजी, तमे केम नथी करता कोप ।। ५

सतपंथ मार्ग सुगम आहे असे असून त्याला छळणाऱ्या असूरांना आपण कां शिक्षा करीत नाही ? जे धर्माचा लोप होईल अशा प्रकारचे वर्तन करतात अशा धर्मद्रोही लोकांना आपण शासन कां करीत नाही ? स्वधर्म महान आहे. परधर्म भयानक आहे हे भगवंताच्या मुखातले शब्द आहेत, पण स्वधर्म म्हणजे काय ? याचे स्पष्टिकरण करून त्यांत राहिलेल्या दूषणांचे निवारण करण्याचा आपण प्रयत्न करायला हवा. हाच ना गुरुजी आपल्या सन्मार्गाचा सार. अहाहा ! धन्य आजचा दिवस, धन्य आजची घडी. आपण आम्हां उभय बंधु-भगिनींना खरोखरच परम पावन बनविले. जीवनातले सार समजावून देतांना सद्गुरु इमामशाहांनी त्यांना संबोधून आणखी अंतीम बोध केला.

सतनी वातो सांभळो, अेक नाम जपो सुखदाई ।।
निशदिन मारा नाथनु, स्मरण करोने मारा भाई ।। टेक
साचु नाम साहेबनु, अविचळ रहे जुगमाय ।।
देखाय ते बधु नाशवंत, अही रहेवानु नथी काय ।। १
कोई आजे कोई काले जशे, पाच वरस पचीस ।।
अमर कोई रहेवानु नथी, तमे जपी ल्योने अेक ईश ।। २
जुठा फंद तजी दियो, समरो सरजनहार ।।
मारु मारु तमे शीद करो, अही तारु नथी तलभार ।। ३
न्यारा थइने नाथजी, ओळखी ल्यो अेक साई ।।
बोलन हारो कोन छे, अेने ओळखी लेजो मारा भाई ।। ४
धर्मनी वातो भिन्न छे, अेना जुजवा लागे विचार ।।
पीर इमामशाह अेम बोलीया, कीकीबाई समजी ल्योनेसार ।। ५

अंतीम बोध देतांना सद्गुरु इमामशाहांनी कीकीबाईला ईश्वर नामाच्या महत्त्वविषयी सांगितले. ईश्वराचे नाम चिंतनच सत्य आणि अविचल आहे. बाकी तर सर्व नाशिवंत आहे. म्हणून त्या अविगतालाच ओळखा. धर्माच्या गोष्टी फार वेगळ्या आहेत आणि प्रत्येक मन वेग वेगळे आहे. त्यात कोठे अडकून राहणे हितावह नाही. केवळ सार समजून ईश्वराचे होऊन राहा.

अशा प्रकारे सारवस्तु समजावून देतांना सद्‌गुरु इमामशाहांनीं त्या सद्भक्तांना परमेश्वराचे स्वरुप, त्यास प्राप्त करण्याचा मार्ग योगज्ञान, आत्मज्ञान, ज्ञानोत्तर जीवात्म्यांचे कर्म, जीवन्मुक्त व विदेहमुक्त अवस्था व त्यात जीवात्म्याकडून होणारे जगत्कल्याण, आत्मोन्नति वगैरे बाबतीत सात दिवसपर्यंत समजावून सांगितले. संतभाभाराम या ज्ञानचर्चेत तर अगदी तल्लीन होऊन गेला. त्याची भाव समाधी लागली. शेवटी नायाजीने आपल्या प्रिय गुरुबंधूला त्या भावतंद्रीतून जागे करीत निरोप मागितला. तेव्हा संत भाभाराम भानावर आले. ते म्हणाले, 'अहाहा, प्रीय गुरु महाराज आमचाच काय पण अखिल जगताचा उध्दार करण्याकरितां भगवंताने आपल्या रुपाने हा अवतार धारण केलेला आहे. जगत् बाह्य चिन्हावर भूलणारे आहे. पण त्याचे अंतरंग स्वरुप जेव्हा उजळून निघेल तेव्हा त्यांच्या चित्तातील असलेले घनांधःकार रुप अज्ञान नष्ट होऊन जाईल व त्यांना केवळ अद्वैत, अभेद्य स्वरुप ईश्वराचे साक्षात् दर्शन होईल. गुरु महाराज या अज्ञ बालकावर आपण अनहद कृपा केली. या ऋणातून मला मुक्त व्हायचे नाही. आपल्या चरण कमळांची सतत अर्हनिश सेवा घडावी हीच एक अभिलाषा.'

सात दिवसानंतर सद्‌गुरु इमामशाहांनी भाभाराम जवळ निरोप मागितला तेव्हा त्यांची अवस्था एखाद्या अनाथ बालका प्रमाणे झाली. त्याच्या डोळ्यातून अश्रुंचा प्रवाह वाहू लागला. सद्‌गुरुंचा विरह त्यांस सर्वथा असह्य झाला. सद्‌गुरुंनी त्यास परत येण्याचे आश्वासन दिले व निरोप घेतला. कीकीबाईने निरोप देतांना साश्रुनयनांनी सद्‌गुरुंना विनविले—

प्रगट पीराणा धाममा, परचा पूर्या अनेक ।
कीकीबाई तमने विनवे, पीर राखजो अमारी टेक ।।

तदनंतर पीराणा येथे सद्‌गुरु इमामशाहांच्या धामावर, संत नायाजींच्या कुकस धामावर तसेच चंपकवनांत अनेक वेळा या सर्व सद्‌भक्तांचे सत्संग मेळावे होऊ लागले. सद्‌गुरु इमामशाह महारांजाकडून सर्वांना उत्तम प्रकारचे मार्गदर्शन लाभले. सत्पंथाच्या इतिहासात तो काळ अनन्यसाधारण होता. उज्वल यश व कीर्ति त्यावेळी त्या भक्तपंचायतनास लाभली व त्यांनी सुध्दा सद्‌गुरुंच्या सन्निध्यात ज्ञान साधना करुन आत्मोन्नति साधली. त्याबरोबर पारमार्थीक सेवा सुध्दा त्यांचे हातून घडली.

साध्वी कवयित्री कीकीबाईच्या जीवनांत अनेक प्रसंग आलेले आहेत. त्यांत तिच्या जीवनाच्या कसोटीचे क्षण, तिच्या ईश्वर विषयक श्रध्देचे प्रसंग, अनेक प्रेरक प्रसंग आलेले आहेत त्या पैकी एका व्यापाऱ्याच्या वेषाने आलेल्या भगवत्स्वरुपाचा अविस्मरणीय प्रसंग तिने आपल्याच शब्दात आलेखन केलेला आहे.

रुडी रुडी सत्संग केरी रात, भक्तो थाय भेळारे ।।
सद्‌गुरुनो उपदेश, सीझे सवेळा रे ।। टेक

आंधळो आवे अर्धी राते, गुरुजी मुजने भाळोरे ।।
बेठा छे दयानिधी देव, दुःखडा मारा टाळोरे ।। १
गरुजीये किधी महेर, चरणे हाथ धरीयोरे ।।
पांगळो पंथी जन, त्याथी परवरीयोरे ।। २

सत्संगाच्या रमणीय रात्रीत कित्येक अलौकिक प्रसंग घडून येत. एकदा एक अंध मनुष्य आला आणि आपले दुःख दूर करण्याविषयी विनवू लागला आणि त्याचे कार्य सिध्द झाले. तो डोळस होऊन आनंदाने घरी गेला. एक पांगळा आला. त्याने गुरु भाभारामचे चरण स्पर्श करताच त्याचे पंगुत्व गेले. एकदा एक वणझारा (व्यापारी) मालाच्या थैल्या भरुन घेऊन आला. भाभारामला झोप लागलेली होती. कीकीबाईने त्याला मधूर शब्दात ठणकावले. 'भाई वणझारा! एवढ्या अपरात्री तू कशाकरिता आलास ? महाराज तर झोपलेले आहेत. तुझ्या मालाचे पैसे कोण देईल ?

वणझारो भरीने पोठ, रातलडीये आव्यो रे ।।
गुरुजी सूता छे निंद्रामाय, राते सीध आव्यो रे ।। ३
सुखे सुवा दो महाराज, पोठ खाली करवी रे ।।
मारे प्रभाते थाऊ छे विदाय, गुरुनी सेवा करवीरे ।। ४

'माताजी ! घेण्या देण्याचा हिशेब तर भाभारामशी आहे, त्याची तू फिकीर करुं नकोस. गुरुजी झोपलेले आहेत तर असू देत. त्यांना उठवू नका. मला तर ह्या थैल्या खाली करुन घ्यायच्या आहेत. दुसरे कांहीही नाही. असे म्हणून त्याने आणलेल्या त्या अनाजाच्या गोण्या व अन्य सामान भांडार गृहात व्यवस्थेशिर ठेऊन दिले आणि निश्चित मनाने शांत बसला.

खाली करीने पोठ, विदाय येने मागीरे ।।
निरखी लीधो नैन, साचा अे सोहागीरे ।। ५
चरण ग्रही गुरुदेव, जळधारा वहावी रे ।।
तमे अबळा जात कहेवाय, भक्ति क्याथी आवीरे ।। ६

आपले कार्य पूर्ण झाले असे पाहून व्यापाऱ्याने जाण्याकरिता रजा मागितली. तेव्हा कीकीबाईने त्याजकडे पाहिले आणि ती चकितच झाली. त्वरेने तिने त्यांचे पाय धरले व प्रेमाश्रुंनी तिने त्याचे चरण प्रक्षाळिले व भावविभोर झाली. व्यापाऱ्याने या अकल्पित प्रसंगाने आश्चर्य दाखवून कीकीबाईला म्हटले, 'हे काय ? कीकीबाई ! तू तर एक अबला आहेस आणि एवढे व्यक्तिमत्व तुझ्यात कसे आले ? मला हे समजत नाही, तूं एवढी ज्ञानी आणि महानुभवी कशी झालीस ? ' व्यापाऱ्याचा हा प्रश्न गूढ आणि स्वानुभवाचा होता कीकीबाईने हळूच प्रत्युत्तर केले-

महेर करीने महाराज, भाभाराम भेटयारे ।।
मारा दुःखडा किधा दूर, संताप समेटयारे ।। ७

कांई न कहेशो कीकीबाई, अविगत आव्यारे ।।
आ तो संत पुरुषनु धाम, भक्तो मन भाव्यारे ।। ८

'दयानिधी! आपण विचारता तो भक्तिभाव मला सद्गुरु भाभाराम लाभले आणि त्यांची करुणा दृष्टी झाली म्हणून लाभला. त्या महात्म्याने माझे सारेच दुःख दूर करुन टाकले. एवढेच नव्हे पण संपूर्ण भवसंताप निवारण केला. प्रभु! अशा योग्याची कृपा झाली तर मग आणखी कोणती आशा करावी.'

'तर मग तूं खरोखर महाभाग्यशाली आहेस. अशा संत पुरुषाच्या समागमानेच तूं अविगताचे रुप ओळखू शकतेस. पण एक गोष्ट लक्षात ठेव, मी आल्याबद्दल भाभारामला कांहीच सांगायचे नाही. पहा हे आहे संताचे धाम. भक्त माझे आहेत. मी भक्तांचा आहे. त्यांचे प्रेम-भक्तिरुपी चुंबक मला येथे खेचून आणते. ही हृदयाली गोष्ट भाभारामला सांगायची नाही.'

'कृपानाथ! आपण मला बजावतात पण आपल्या आज्ञेचा भंग होण्याचा भास होत आहे. कारण ही गोष्ट तर आधीच गुरुजींच्या कानावर गेली असावी. ते पहा गुरुजी जागीच आहेत आणि ते येथेंच येत आहेत.'

मारा जागे छे भाभाराम, निद्रामा नथी सुतारे ।।
जपता अजपा जाप, योगी अव धुतारे ।। ९
दोडी आव्या छे भाभाराम, चरणमा पडीयारे ।।
अमे वणझारा लोक, गुरुजी शाने अडीयारे ।। १०

त्वरेने धावत येऊन भाभारामने आगंतुक स्वरुपाच्या चरणी मिठी मारली. तेव्हा त्यांचा हात धरुन उठवत 'अरे, अरे; हें काय? असा मोठा महात्मा आमच्या सारख्या वणझाराच्या चरणी पडतो, हे तर खरोखर विपरीत आहे. कोणी पाहिल तर अनर्थ होईल. योगी पुरुषाला हे योग्य नाही. जात, कुळ, पाहिल्याशिवाय कोणाच्याही चरणावर असे झुकून पडणे महापुरुषाचे कर्तव्य नव्हे!' व्यापाराचे बोल भाभाराम शांत चित्ताने ऐकत होते. नंतर म्हणाले-

मुकी दोने महाराज, ममत झुठो जाणी रे ।।
योगी पुरुषे वात, आपणी सर्वे जाणी रे ।। ११
हेते झाल्यो हरीये हाथ, आसने बिराज्यारे ।।
निरखी त्रिलोकीनाथ, जमडा लाज्या रे ।। १२

'प्रभु! आता हा मायेचा खेळ सोडून द्या, कारण की मी आपल्या साऱ्या गोष्टी जाणल्या. कृपानाथ! आपण आपल्या या आत्मीय स्वजनांशी असे अलगपण ठेवूनका. नाथ! माझा काय अपराध की, आपण माझ्याशी असे अलगत्व राखता! असे म्हणत असताच भाभारामच्या नेत्रातून अश्रुधारा

वाहू लागल्या. ते पाहून प्रेमळ प्रभूने त्यांना आपल्या हृदयाशी लावले. भक्त आणि भगवंताचे मंगल मिलन झाले. त्या समयी प्रभुला वंदन करून भाभाराम म्हणाले, 'सर्वेश्वर प्रभु! आपण गैबी आहांत. आपली रीत प्रीत पण गैबी–अगम्य आहे. जे गैबी असतात तेच या गूढाला समजू शकतात. प्रभुजी आपल्या करूणेनेच आपले हे अविगत स्वरुप जाणण्यास समर्थ झालो. एरवी मज पामराला आपला अंत कोठून लागणार.' असे म्हणत दोघं बहिणभाऊ भगवंत स्वरुपाच्या चरणी पडले. आपला परम पावक वरदहस्त त्यांच्या शिरावर ठेवत भगवान अंतर्धान झाले.

गुरुजी गेबी तमारी रीत, गेबी कोई जाणोरे ।।
कर जोडीने कीकीबाई, गुरुने गेबी वखाणेरे ।। १३

संत पुरुषांचे आगमन जगताच्या कल्याणासाठीच होत असते संत पुरुष जगतात मुक्ति मार्गाचे एक साधन आहे. ज्याने आंतरिक तळमळीने या साधनाचा उपयोग करून आत्मोन्नति करून घेतली ते जीवात्मे धन्य होत. भाग्यशाली जीवात्म्यावर संतकृपा होऊन त्यांचे त्रिविध ताप टळले आणि महापुरुषांच्या संसर्गाने अधम अभागी पुरुष सुध्दा श्रेष्ठ होऊन परम गतीस पावले. भगवान यमराज धर्मांचे दूत त्यांना महाप्रयाणाची सुचना देण्याकरितां आले. त्याचे रसाळवर्णन साध्वी कवयित्री कीकीबाई आपल्या शब्दात करीत आहे.

भाभाराम महाराज, भलु तमे कीधु रे ।।
गुरुजी गरीब नवाज, दुःख हरी लीधु रे ।। टेक
देवा नगरना लोक, दर्शन करवा आव्यारे ।।
निरखी लईने नाथ, करुणा मेह बरसाव्या रे ।। १
कोई सभागीने मळीजाय, किरपा गुरु देवनी रे ।।
अेना त्रिविध ताप दूर थाय, लीला कहुं अेमनी रे ।। २
गुरुजीये तार्या अभागीजीव, सभागी अेने किधारे ।।
पापीने किधा पावन, नरोत्तम बनावी दिधारे ।। ३
परमार्थमा प्रीत, गुरुजीये हाट मांड्यारे ।।
कुडा कर्म तजाय, रामना रंगमा लाग्यारे ।। ४
रेख पर मारे मेख, भाभाराम योगी रे ।।
धर्म रायना दरबार, वातो थाय अेवी रे ।। ५
भाभारामनी पासे, जइने तमे कहेजोरे ।।
परमाथनो वेपार, छोडीने तमे रहेजो रे ।। ६
कुडा कर्मना खेल, अेनाथी लोको दुःखीरे ।।
करणीना फळ पामे, बनावो तमे सुखीरे ।। ७
मृत्यूलोक आनु नाम, मरवाने सहु आव्यारे ।।
विरला कोई जन, स्मरण मन भाव्यारे ।। ८

पात्र कुपात्र नही जोई, समदर्शी तमे अेवारे ।।
भूंडाने दया शीद होई, करो छो अेनी सेवारे ।। ९
योगी तमारी रीत, निभावी केम लइयेरे ।।
लीला तमारी जोई, अंतरमा बळी जइयेरे ।। १०
रिध्दि सिध्दी तम घेर, दातार बनीया कहीथी रे ।।
आतो कर्मभूमि कहेवाय, चाल्या जावो अही थीरे ।। ११
योगीना हैया माय, सर्वे लागे प्यारा रे ।।
पापीने पुण्यवान, निरखे नही न्यारा रे ।। १२
तमे चाहो तो जवाने तैयार, बैठा अमे थइयेरे ।।
विदाय आपो महाराज, अही थी चाल्या जइयेरे ।। १३
रही जावो योगीराज, प्रभुजी तमने परखे रे ।।
कीकीबाई गुरुना यश गाय, हैया माही हरखेरे ।। १४

एकदा संत भाभारामने कीकीबाईला व सर्वच सद्भक्तांना आपल्या परलोक गमनाविषयी जाणिव दिली –

षड्मास पिछे हम जायगे, यहांसे उस देश ।।
कीकीबाई ठाढे रहो, यह सद्गुरुको देश ।।

'कीकीबहेन ! आजपासून सहा महिन्यापर्यंत मला येथे राहावयाचे आहे. नंतर येथून विदाय होऊन श्री हरीच्या प्रदेशात प्रयाण करायचे आहे. तू शांत चित्ताने इथे राहून कार्य करायचे आहे. कारण हा सद्गुरुचा देश आहे.' भाभारामच्या मुखातून हे शब्द ऐकताच कीकीबाईच्या अंगावर जणू वज्राघातच झाला. अत्यंत व्यथीत अंतःकरणाने ती म्हणाली –

गुरुजी महाप्रयाणनी वात, तमे शीदने मांडी रे ।।
दुनिया दुःखनी खाण, थई हुं तो गांडी रे ।। टेक
गुरुजी पूर्वजन्मनी सगाई, जुगते तमे जोडी रे ।।
आवी वसमी वेळाअे दयाळ, शाने नाखो तोडी रे ।। १
रहोने गुरुजी देवा माही, दुःखिया बहु लोक रे ।।
तमने विदाय थता जोई, करशे पोका पोक रे ।। २
परमार्थनो वेपार, मांड्यो हतो प्रीत रे ।।
मुख मोडीने महाराज, थया छो बे चित्त रे ।। ३
दयानिधी दिनानाथ, झाझू शुं कहेवुं तमनें रे ।।
रोता मारगडानी माय, शीद छोडी जावो अमने रे ।। ४

रुठया छे धरमराय, वारीने शीदने तेडे रे ॥
अेना दिलमा नाही ध्याय, धाय छे योगीना केडे रे ॥ ५
रामदरशी गुरुदेव, अमारी गती शीं थाशे रे ॥
जळ विना तडपे जेम मीन, झुरीने मरी जाशे रे ॥ ६
बाना केरी पत जाय, तमे छो टेक धारी रे ॥
कीकीबाई कहे करजोड, राखोने लाज अमारी रे ॥ ७

सद्‌गुरु भाभारामला विनयाने कीकीबाईने अंतरातली व्यथा सांगितली. तेव्हा तिच्या मनाचे समाधान करीत भाभारामने आपली गति तिला सांगितली. योग्याचे आगमन आणि परहिताकरिता काळनिर्गमन केला, आता तर अंतर्धान व्हायलाच हवे. अविगताच्या इच्छेंच्या आधिन होऊन जाण्याशिवाय कसे चालेल.

योगी रमता राम, अवनिमा अमे आव्यारे ॥
दिठा दुःखियारा लोक, योगीने मन भाव्या रे ॥ टेक
उत्तर खंडथी साथ, उग्र तप अमे कीधारे ॥
आव्या परहितकार, लाखेना ल्हावा लीधारे ॥ १
स्वजन लागे संसार, जल कमलवत रहियेरे ॥
मनवांछित दिधा दान, लोकोने अमे चहियेरे ॥ २
जीवन निचोवी दिधु, जन सेवा लागी सारीरे ॥
भुल्याने बतावी राह, भक्ति करजो प्यारी रे ॥ ३
हळी मळीने रह्या संगाथे, न्यारा नही थइयेरे ॥
हैयामा राखो विश्वास. साथे अमे छैइयेरे ॥ ४
अहीथी थईशु अरुप, धोखा दईशु जमनेरे ॥
करशो ज्यारे अमारी याद, आवी मळशु तमनेरे ॥ ५
सद्‌गुरुजीना अे वेण, अंतरथी रुडा लाग्यारे ॥
भली निभावी प्रीत, हृदयमा अमने राख्यारे ॥ ६
करजोडीने कीकीबाई, वधावे गुरु मारा तमनेरे ॥
लळी लळी लागु पाय, भुलशो नही गुरुजी अमनेरे ॥ ७

'कीकीबेन ! हे तर केवळ यमदूतांना मान देण्यापुरते माझे प्रयाण आहे. बाकी तर माझे इथेच तुझ्या सान्निध्यात निरंतर वास्तव्य राहिल. आतापर्यंत मी साकार राहिलो आता निराकार रुपाने राहणार आहे. जेव्हा तू स्मरण करशील तेव्हा मी हजर होऊन तुझे कार्य करील. तुझ्या हृदयातून मी दूर होणारच नाही. तुला काय वाटेल मी स्वर्गाच्या सुंदरतेला आणि सुखाला भाळून तिथे जाईल ? असे तर काही नाही. कारण योगियांना स्वर्ग दुःखदायक आणि तुच्छ वाटतो. तुला ही स्वर्गाची असारता सांगतो ती श्रवण कर.'

दिठो दुरीजन केरो देश, स्वर्ग लागे रुडा रे ।।
कडवा जेना मुळ, लोको लागे कुडा रे ।। टेक
तमने स्वर्गे जवानी आश, सुख नही जोयु रे ।।
अही रहीने रिझावो रघुनाथ, स्वर्गमा मन शुं मोह्यूरे ।। १
तपेश्वरी पामे राज, कर्म करे खोटारे ।।
थाय नर्कमा अेनो वास, मारे जमडा सोटारे ।। २
साची स्वर्गभूभी संसार, नजरे अमे दिठीरे ।।
तमे समज्या नही शुधवात, माया लागी मीठीरे ।। ३
भक्ति पदारथ पामी, हरीने भज्या जेणेरे ।।
धन धन अेनी कमाई, वखाणे देवो तेणेरे ।। ४
हाथे करोने तमे दान, सुखीया संसारीरे ।।
आ तो कल्पतरुनी छाया, मानो वात मारीरे ।। ५
स्वर्ग पुरीना देव, इंद्रादिक थाये रे ।।
मानव तन मोंघु रतन, मानो नही अेने काचेरे ।। ६
जागो भागो जंजाळी जीव, गफलत छोडो घेरीरे ।।
कीकीबाई चेतावे गुरुदेव, जमडा आवशे वेरीरे ।। ७

'गुरुदेव! आपणास प्रयाणास अजून सहा महिने बाकी आहे. माझ्या हृदयातील संताप आता पार निवारण झाला. आपण खरोखर माझ्या मनाचे समाधान केले हे सहा महिने सहा युगाप्रमाणे जावोत आणि आमच्याकडून अखंड अविरतपणे जनहित घडत राहो हीच प्रार्थना आहे.'

भाभाराम गुरु देवजी, दिन्हा दृढविश्वास ।।
मत भूलोरी बावरे, मे हूं तुम्हारी पास ।।
नुगरा सोही न्यारा रहे, सुगरा गुरुकी पास ।।
कीकीबाई मत भूलो, तुमी गुरुचरणकी दास ।।

वि. सं. १५९८ भाद्रपद शु. ।। २ या दिवशी संत नायाजींनी महाप्रयाण करण्याचा समाचार समजताच संत भाभारामच्या हृदयावर मोठा आघात झाला त्यांनी त्या महापुरुषाबरोबर महा प्रस्थान करण्याचे वचन दिलेले होते म्हणून त्यांनी प्रयाणाची तयारी सुरु केली.

त्या समयी व्याकुळ अंतःकरणाने त्यांचा पट्टशिष्य मुक्तिराम आला, परमप्रेमाने हृदयाशी लावून त्याचे त्यांनी सांत्वन केले. संत नायाजींचा शिष्य गंगासिंह गोहिल तर रडत रडतच संत भाभारामच्या चरणी पडला. डोळयातून अश्रुंचा पूर वहात आहे, सर्व अंग थरारत आहे अशी त्याची अवस्था पाहून योगी म्हणाले. 'अशा समयी ज्ञानी मनुष्य धीर सोडून केव्हाही अश्रुंढाळीत

नाही. म्हणून बाळा गंभीर हो.' तो शांत झाला. मग आहिरशिष्या मेधावती आली तिच्या हृदयाची व्यथा अत्यंत दारुण होती पण गुरुजींच्या मुखातले शीतल शब्द ऐकताच ती पण शांत झाली. इतक्यात देवाचा दरबार भोजराज आला आणि निराधार-अनाथ बालकाप्रमाणे सद्‌गुरु चरणी पडून ढसढसा रडू लागला. त्यास त्यांनी हातांनी उठवून दृढतेने आश्वासन देऊन सांगितले की, आपण ज्या स्वरुपातून दर्शन करता तसे स्थान बनवून गुरुची सेवा करावी. आपली सर्वच कामे सिध्द होतील. भोजजीला आश्वासन देऊन शांत केले. आता कीकीबाईने सद्‌गुरुचरणावर मस्तक ठेवले. तिच्या हृदयाच्या दूर्दशेचे तर वर्णनच करता येणार नाही. आपल्या बहिणीच्या हृदयाची व्यथा पाहून भाभाराम पण गद्‌गदीत होऊन गेले. ते म्हणाले –

कीकीबाई रोवत खडी, बरखा बहावत नैन ।।
देखत विकल हो गये, भाभाराम सुख देन ।।
कीकीबाई कैसे रुवे, बडे सुभागी आप ।।
भाभाराम गुरु देवका, तुम्ही बडा प्रताप ।।

'बहिण कीकीबाई, तू कां म्हणून रडतेस ? सद्‌गुरुंच्या कृपाशिर्वादाने तुझे जीवन तर सफळ झालेले साहे. गुरुजी सदैव तुझ्या जवळच आहे. मग अश्रु ढाळण्याचे कारणच काय ?

तुमसे कभी न्यारे नही. सुनोरी कीकीबाई ।।
दर्शन सद्‌गुरु देवका. तोहे पावे सुखदाई ।।
जैसा रुप यहां दिखे, वैसा धाम बनाय ।।
चंपक वनमे जायके. सदा रहो सुखदाय ।।
वहां तुम्हारा रूण हे, देवा मन लुभाय ।।
बडी कृपा गुरु देवकी, सब कुछ मिले ही आय ।।

'कीकीबाई येथे तुं ज्या रुपाचे दर्शन करतेस असेच धाम चंपकवनात जाऊन कर कारण की तेथे तुझे ऋण आहे. म्हणून मी तुला सांगतो की तूं देवात मोहू नकोस. चंपकवनात तुला सर्व कांही येऊन मिळेल. भाभारामने सुगमतेने तिच्या हृदयाचे सांत्वन केले आणि अखंड शांतीच्या आसनावर बसले. त्या समयी तिच्या मनात हेच खटकत होते की गुरुजींचा देश तर आता देवा असून मला मात्र चंपकवनात जाण्याचा आग्रह कां करीत आहेत ? मनाची ही अस्थिरता एका पदात वर्णून ती गुरुजींना सांगत साहे.

अमने देवा शीदने वळावो रे भाभाराम, गुरुजी विना केम चालशे रे ।।
वसमो तमारो वियोगरे भाभाराम, हैया मांही घणो हालसे रे ।। टेक
अबुधने अज्ञानी हता अमे जीवडारे, तमे उपदेश अमने दिधारे ।। १
सत्यनो मारग अति दोह्यलोरे, तमे अकरम दिधा तजावी रे ।। २

गुरुजी सत्संगनी रातो सोहामणी रे, पापी पावन थाय रे ॥ ३
गुरु दर्शन विना नैन बावरी रे, तमने शोधती फरे चोपास रे ॥ ४
अलगापणानी बातो तमे केम आदरी रे, सन्मुख रहोने संगाथ रे ॥ ५
सद्गुरुजीनो देश शाने अमे तजीये रे, अमने राखो तमारी पास रे ॥ ६
कीकीबाई कर जोडी तमने विनवे रे, आपो चरण कमळमा वास रे ॥ ७

भाद्रपद शुध्द चतुर्थीच्या दिवशी प्रेमी जन आणि भक्त जनांच्या हृदयाला विरहाचा चटका लावून भाभाराम स्वस्थचित्ताने आसनावर स्थिर झाले. त्या समई दुःखीत कोकीबाईला वाटले की गुरुजी रथात बसलेले असून ते प्रयाणास अगदी तत्पर झालेले आहेत. ती अती व्याकुळतेने पळत आली आणि गुरुदेव रथ थांबवा. एवढी उतावीळ कां करीत आहांत असे म्हणत आपल्या अंतरातील विरहव्यथा व्यक्त करीत गुरुजींच्या समक्ष पद ललकारु लागली.–

रथ रोकोने गुरुदेव, उतावळ शीद आवी रे ॥
मारे करवी छे हैया केरी वात, दोडी हुंतो आवीरे ॥ टेक
गुरुजी अहीथी थावो छो विदाय, नति मारी शी थासेरे ॥
तनडामा तेल खुटी जाय, दिपक बुझाई जाशे रे ॥ १

गुरुदेव :–

सद्गुरु नामनु तेल, ज्योति जलती राखो रे ॥
न्यारा थयानी वात, मुखथी नही भाखो रे ॥ २
देवामा रहीने बहेन, तमे शुं करशो रे ॥
चंपकवनमा जई, ठरीने ठाम करशो रे ॥ ३
अे धरती पर ऋण, तमारु छे रूडू रे ॥
जईने वसजो त्यांय, कदी न थाये कुडू रे ॥ ४

कीकीबाई :–

त्रण त्रणवार गुरुदेवे, ऋणनी वातो कीधी रे ॥
कीकीबाईये हृदयामांय, सहेजे लखी लीधी रे ॥ ५

साध्वी कीकीबाईने आपल्या मनातील संशय गुरुदेवांच्या चरणी रुजु केला. त्या योगे तिच्या शंकेचे निरसन झाले. तीन तीन वेळेस गुरुदेवांनी तिला चंपकवनात जाण्यास सांगितलें आणि तिथे तुझे ऋण आहे असे सांगितले त्यावरुन कीकीबाई गुरुजींचा हेतू समजून गेली व ती आज्ञा शिरोधार्य मानून विनयाने त्यांच्या चरणी झुकून दूर झाली. तेव्हा आसनावरुन उठून भाभाराम शिवालयात जाऊन पद्मासन स्थिर करुन ध्यानस्थ बसले.

वि. स. १५८९ च्या भाद्रपद शु ।। ५ च्या दिवशी गुरु भाभारामचे महाप्रयाण झाले. त्यांचे स्थूल शरीर पंचत्वात विलीन झाले. सूक्ष्म शरीर ज्योतिस्वरुपात विलीन झाले. दुसऱ्या दिवशी कीकीबाई सद्गुरुंच्या आदेशानुसार चंपकवनात जाण्यास निघाली पण तिचे पाय चालू शकत नव्हते. हृदयात खूप उल्कापात–उलथापालथ होत होते. घडीभर ती तेथेंच बसून राहिली. तिचं हृदय भरुन आलं. नेत्रातून अश्रु प्रवाह सुरु झाला. व्यथीत अंतःकरणाने ती म्हणू लागली.–

गुरुजी मुजने पोकारी महाराज, कह्यु त्रण वार रे ।।
तमे देवाथी थाजो विदाय, कह्यु छे निरधारेरे ।। टेक
गुरुजी अमे रह्या अबुज, समज्या नही वाते रे ।।
तमे थई गया अंतर्धान, अविगतना घाटे रे ।। १
गुरुजी देवाथी केम जवाय, चरणो नही चाले रे ।।
मारु हैयु करे वलोपत, नैना नीर वहावे रे ।। २
गुरुजी अमथी अलगाथई, बेठा छो अगोचर रुपेरे ।।
तमथी नही रहीशु दूर, शीदने छुपाया छुपे रे ।। ३
बहेनी रुवे चो धार, भाभाराम आवो रे ।।
मने दिधो बहु उपदेश, मिथ्या गयो मावो रे ।। ४
गुरुजी वसमी विदाय केरीवाट, भारगडो नही सुझेरे ।।
बांथ झालीने महाराज, सुझावो तो सुझेरे ।। ५
प्रगट थईने गुरुदेव, वदी रह्या वाणी रे ।।
तमे शीदने करो छो संताप, सिधावो निरवाणीरे ।। ६
गुरुये झाल्यो सेविकानो हाथ, सावध थावो बहेनीरे ।।
कीकीबाई कहे करजोड, देवाथी विदायनी कहेनी रे ।। ७

देवाहून जात असतांनाची मनस्थितीचे वर्णन करतांना कीकीबाई खरोखर गदगदीत झाली. तिच्या नेत्रातून सारख्या अश्रुधारा वाहू लागल्या. त्या समयी तिचा विरह संताप जाणून भाभारामचे हृदय द्रवले, त्वरेने येऊन त्यांनी कीकीबाईला हाताने उठविले आणि जणू मार्गदर्शक होऊन तिला हळू हळू चालवू लागले. त्या समयी स्वस्थ झालेल्या कीकीबाईला भान आले आणि गुरुजीला पाहून प्रेमाश्रुयुक्त गदगद् वाणीने बोलू लागली.–

देवाथी वळावो महाराज, विदाय अमे थइये रे ।।
चंपक वननी माय, जईने अमे रहिये रे ।। टेक
तमे कहेता हता गुरुदेव, निरखो जेवुं रुपारे ।।

तमे करजो अे रुपनी पूजाय, रिझे गुरु भूपारे ।। १
गुरुजी ज्योतिस्वरुप थया आप, ज्योति दर्शायारे ।।
तमो ज्योति स्वरुप गुरुदेव, गुणला गायारे ।। २
देवाथी थईने दूर, चंपकवनमा जइये रे ।।
तमे भक्ताधिन भगवान, ज्योतिरुप थइये रे ।। ३
ज्योतीरुपे गुरुदेव, देवामा बिराजे रे ।।
चंपकवनमा ज्योतिस्वरुप, रहेजो महाराजेरे ।। ४
प्रगट थया छो आपो आप, ज्योति रुपे स्वामीरे ।।
कीकीबाई कहे गुरुदेव, पधारो अंतर्यामी रें ।। ५

'गुरुदेव ! आपण सांगत होता कीं, ज्यास्वरुपाने मी दर्शन देईन, त्याच स्वरुपाची तुम्ही पूजा करावी. महाराज आम्हाला ज्योतिस्वरुपातूनच आपण दर्शन दिले. आता आपल्या आज्ञेनुसार चंपकवनात जाण्याकरिता मी तयार आहे पण प्रभु आपण ज्या स्वरुपाने येथे विराजमान आहांत त्याच ज्योतिस्वरुपाने चंपक वनातील आपल्या धामावर सुध्दा विराजमान व्हावे.' असे म्हणत कीकीबाई गुरुदेवांच्या चरणारविंदी दंडवत पडली आणि उठून पाहते तो गुरुदेव अंतरधान पावलेले.

आता तर तिच्या चित्तात अवसान आले होते. हळू हळू चंपकवनाचा रस्ता धरुन ती जाऊन पोहोचली. आता तिला चंपकवनाची शोभा कांही आगळीच भासली. जिकडे तिकडे मंगलकारी आनंददायक ध्वनी. पशु पक्षांचे मधूर कूंजन तिला ऐकू येऊ लागले संपूर्ण पृथ्वी जणू सुगंध सौदर्याने नटलेली, नव चैतन्याने भरलेली आहे असे तिला दिसू लागले. त्या दिव्य आनंदाचे वर्णन ती एका पदात करीत आहे.

गुरु आज्ञा शिरपर धारीने, देवाथी थया विदाय ।।
आंखेथी आंसुडा भरता, मारग हाल्या जाय ।। टेक
भले पधारो माताजी तमे, कोयलडी करे किलकार ।।
बपैया पियु पियु पोकारे, मोर करे टहुकार ।। १
मंलग गीतो गूंजी रह्याने, वनमा मची रह्यो शोर ।।
आनंद उदधी शरमा व्याप्यो, नाद थयो घनघोर ।। २
कीकीबाई तुम नैन बहावे, हरीसे मिलन मंगल घडी आय ।।
चंपकवन जहां ध्यान लगावे, वहा ठाढी रहो सुखदाय ।। ३
वहा है तुम्हारा ऋण सुख पै हो, तुमी से कैसे न्यारे रहाय ।।
जैसा रुप यहा देखन पावे, वहा अैसा धाम बनाय ।। ४

ताप हृदयना दूर करीने, आव्या छे कीकीबाई फरीने ।।
चंपक वनमां आवी वसीया, तपोभुमीनो छाई ।। ५
गुरुजी मुजने आज्ञा दिधी, शिरसावंद्य मे तो करी लीधी ।।
स्थान तमारु क्या बनावू, सुझतु नथी गुरुराज ।। ६
ध्यान धरी गुरुदेवनु सुता, स्वप्न आप्यु छे अवधूता ।।
शीदने शोच करो कीकीबाई, स्थान बनावो अहीआय ।। ७
सद्गुरुजीये स्थान बताव्यु, सुंदर त्यां मंदीर बनाव्यु ।।
ज्योति स्वरुपे प्रगट थइने, आवी बिराज्यो अही आय ।। ८
प्रगट थईने पधार्या स्वामी, ज्योतिस्वरुप आपे बहुनामी ।।
कीकीबाईना काज सिधार्या, सद्गुरु कृपा निधान ।। ९

सद्गुरुंनी स्थान दर्शविले त्या स्थळावर थोड्याच दिवसांनी मंदीर बांधले गेले. आता त्याच्या संस्थापनविधीचा समय आला त्यावेळी कीकीबाई दीनतेने गुरुच्या ध्यानाकरितां बसून प्रार्थना करुं लागली–

'गुरुदेव ! देवाला आपण ज्योतिस्वरुपाने स्थित आहांत आणि आपण आश्वासन दिल्या प्रमाणे इथे सुध्दां आपणास ज्योतिस्वरुपाने प्रगट व्हावे लागेल. तो समय आता निकट आला आहे. आम्हा भक्तांची मनोकामना पूर्ण करावी.' मंदीरात पूजा विधीचा मंगल दिवस उगवला. त्या दिवशी दीपकात वात वगैरे ठेवून सर्व जण सद्गुरुंच्या ध्यान चिंतनात मग्न होऊन त्यांच्या आगमनाची वाट पाहूं लागले.

भाभाराम महाराज तर हजरच होते. आपल्या भक्तांची ही आर्तवाणी श्रवण करताच ते स्वयं ज्योतिस्वरुपाने प्रगट झाले. सर्व मंदीर त्या उज्वल प्रकाशाने दीपू लागले. सारा आसमंत घंटानाद, नगारा, टाळ, मृदंगाच्या नादाने दुमदुमून गेला. सद्गुरु भाभाराम महाराज की जय ! साध्वी कीकीबाई माता की जय ! सर्व सद्भक्तांच्या जय घोषाने वातावरण निनादीत झाले.

साध्वी कीकीबाईच्या प्रेम, करुणा भक्तीने सर्व भक्तजन प्रभावीत झाले होते. त्या साऱ्यांनी मातेला पूर्णपणे जाणले होते. संत भाभाराम महाराज आणि साध्वी कीकीबाई यांचा अभेद्य निर्मळ विशुध्द प्रेमतंतू जोडला गेला होता. तिच्या मुखातून जे उद्गार निघत ते सद्गुरुंच्या सर्व परिपूर्ण होत. चंपकवनाची तपोभूमी आता तीर्थभूमी झाली होती. दर्शनार्थी कित्त्येक आशा आकांक्षा उराशी बाळगून येत व साध्वी कीकीबाईच्या कृपाशिर्वादाने कृतकृत्य होऊन परम उल्हसीत अंतःकरणाने त्या मातेचा महिमा गात असत.

कार्तिकी पौर्णिमा, वसंत पंचमी, धुलीवंदन, गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंति, अक्षय तृतीया, जन्माष्टमी, ऋषिपंचमी, विजयादशमी, शरद पौर्णिमा आणि दिपावलीच्या दिवसात भंडारा होऊन साधुसंत अभ्यागत योगी भक्तजनांना मोकळ्या हृदयाने प्रसादाची व्यवस्था होत असे. जिथे माता अन्नपूर्णा देवी साक्षात येऊन उभी राहात असे तेथे प्रसाद घटण्याची गोष्टच कशाला ? शेकडो हजारो मानव येऊन तृप्त होऊन जात.

सद्गुरु भाभारामच्या महाप्रयाणानंतर १२ वर्षापर्यंत कीकीबाईने गुरुधाम चालविले. अनेकानेक स्मरणीय प्रसंग तिच्या जीवनात आले. अनेक सत्पुरुष, संत, योगी तिच्या भेटीकरिता दर्शनाकरिता येत. सद्गुरु महाराजाकडून प्राप्त झालेल्या दिव्य अमुल्य ज्ञानद्वारा सत्संग करुन सर्वांना आनंदीत करीत असे. संत साध्वी कीकीबाईच्या मुखारविंदातून स्त्रवणाऱ्या ज्ञानामृताचा अलभ्य लाभ घडलेले बरेचसे प्रसंग कवि गंगासिंह गोहिल व शायर बन्सीलाल यांनी काव्यात कथन केलेले आहेत.

कीकीबाईके रुणमे, सब कोई आवे लुभाई ।।
भगिनी भाभारामकी, चरणा शिर झुकाई ।।
मेला के दिन आवते, होवे मंगलाकार ।।
मेरामण उमटी रहे, करतें जयजयकार ।।
कीकीबाईके धाम मे, दर्शन के हित धाय ।।
ऋषि पंचमी दिनको, महिमा लिखो नही जाय ।।

मेळाव्याच्या दिवशी तर सर्व वातावरण अगदी मंगलमय होऊन जात असे. सर्वत्र आनंदी आनंद उल्हास होऊन जात असे. भक्तजनांचा समुदाय जमून चारही बाजूंनी लांबलांबून येऊन सर्वजण आनंदाने सद्गुरुचा, कीकीबाईचा जयजयकार करीत. ऋषिपंचमीच्या दिवशी विशेष उत्साह हर्षोल्हास असे. त्याचे वर्णनच करता येत नाही. अशा रीतीने आंतर्बाह्य आनंदी आनंद व्यापत असे पण कीकीबाईच्या हृदयात मात्र उदासिनतेची दाट छाया पसरुन जाई ती आपल्या गुरुंच्या वियोगामुळे खूप व्यथित होत असे.

गुरुजी उजळा दिवाळीना दन के हैये मारे होळी बळेरे लोल ।।
अमने तेडावो तम पास, दिलना दुःख टळे रे लोल ।।

दिवाळी सारख्या आनंदाच्या दिवशी सुध्दा कीकीबाईच्या हृदयात वियोगाची दारुण व्यथा जागत तसे. ऋषिपंचमीच्या दिवशी तर विरहानलाचे संतप्त अश्रूंनी ती सद्गुरु महाराजांच्या चरणपादुका भिजवून टाकी. एकेक प्रसंग आठवून तिच्या डोळ्यातून झरझर अश्रु प्रवाह सुरु होई. वि. सं. १५९१ च्या ऋषिपंचमीच्या दिवशी मंगल सूर्योदयाच्या वेळी तर विरहानल अगदी असह्य होऊन ती मंदीरात आली आणि गुरुमहाराजांना म्हणाली.

गुरुजी मे आवन चहु, मोहे बुलावो पीर ।।
कीकीबाईके हियरा, अब तो धरत न धीर ।।
आ गई ऋषि पंचमी, मेरा गुरु हुवे विदाय ।।
गुरुजी मोहे संग रखो, अब ना सहु जुदाय ।।

'गुरुदेव ! मला यायचे आहे. मला बोलवायला पाठवा. आता माझ्या हृदयात धीर धरवत नाही. आणि आपल्या या महाप्रयाणाच्या दिवशीच मला बोलावून आपल्या सोबत ठेवून घ्या. मला आपल्या जवळ यायचे आहे. आता मला आपल्याहून वेगळे राहताच येत नाही म्हणून गुरुदेव या दासीची करुणा येऊ द्या. या दासीला पदरात घ्या.' असे म्हणत कीकीबाई खरोखर बेहोष होऊन गेली तिच्या हृदयातील संताप जाणून गुरुदेव भाभाराम सुध्दा द्रवित झाले. त्यांनी आपल्या प्राणज्योति रुप बहिणीचे सांत्वन करुन म्हटले.

आवन आवन मत करो, आवनको अब देर ।।
आवन घडी जब आयेगी, तब मत लगेरी देर ।।
दरसाल ठाढे रहो, जपो हरी को नाम ।।
ता पावे हरी धाममे, कीकीबाई पावो विराम ।।

'कीकीबाई ! भावनावश होऊन संताप करुं नकोस. मनास आवर, तूं ज्ञानी आहेस. भक्तिमान आहेस, विचारी आहेस. ईश्वराच्या इच्छेशिवाय कांहीच होत नाही. तुला अजून दहा वर्षे जगायचे आहे तरी तूं चिंता करुं नकोस. ईश्वरकृपेने तुला एवढा वेळ मिळत आहे तर या अमुल्य वेळाचा सदुपयोग करुन घे आणि आनंदीत अंतःकरणाने शांत चिताने त्याचे स्मरण चिंतन ध्यान कर. वेडी होऊ नकोस. शांत हो.' असे म्हणून भाभारामने कीकीबाईस शांत केले. तिचे अंतःकरण स्वस्थ झाले. व्यथा दूर झाली, आता ती आंपला समय आनंदाने व्यतीत करुन जनहिताची कामे करुं लागली. सद्गुरु विरह व्यथा त्यांच्या उपदेशाने कायमची दूर झाली. तिला अखंड सुखाची प्राप्ति झाली. महासुखात दिवस निर्गमन होऊ लागले.

शोक संताप बिलाइया, सद्गुरुके उपदेश ।।
कीकीबाई के हृदयसे, मिट गये सकल क्लेश ।।
संत सेवा हरी भजनमे, निश दिन होत आनंद ।।
कीकीबाईके दिन बीते, मानो महासुखकंद ।।

दहा वर्षाचा काळ हरणाच्या धावे प्रमाणे तेव्हाच निघून गेला. त्या काळात बरेच प्रसंग-सत्संग घडून आले. संत भाभारामचा परमशिष्य मुक्तिराम, संत नायाजींचा परमभक्त गंगासिंह गोहिल, संत इमामशाहांचा परमशिष्य शाणाजी या सर्वांचे मंगल मिलन मधून मधून चंपकवनात होई. त्या सर्वांना कीकीबाई आपल्या परीने समजावून परमयोग ज्ञानाचा उपदेश करी. संतपथाचे मार्गदर्शन करी. अडी अडचणीच्या वेळी ती त्यांना साहाय्य करी.

बारा बरस बीते गये, रुण मे रहे सुखधाम ॥
कीकीबाई गुरु चरणमे, अब तो दिजो विश्राम ॥
व्यथा पुरानी फिर् जगे, उरमें छाय उच्चाट ॥
छीनमें वे दिन आ गये, लगे हरी का हाट ॥

देवाहून रुणला येण्यास बारा बर्षे पूर्ण झाली. हृदयातलो जी विरह व्यथा होती ती आता शांत होऊन गेली होती, पण नियुक्त समय येताच कीकीबाईच्या हृदयातल्या जुन्या वेदना जागृत झाल्या पैलकिनारा – हरीचा घाट आला, आणि ऋषिपंचमीचा दिवस पण येऊन ठेपला.

सेवा किय गुरु देवकी, मानो हुवेरी भोर ॥
सद्‌गुरु मैं आवन चहु, विनंती सुनोरी मोर ॥
भाभाराम गुरु चरणमे, भोर ही निंदभर सोई ॥
कीकीबाई की यो गति, देखत जनता योई ॥

सूर्योदयाच्या आधी प्रहरभर रात्रीला म्हणजे ब्रह्ममुहूर्ताला उठून स्नानादिक कर्मातून निवृत्त होऊन कीकीबाई सेवा पूजा करण्यात तत्पर होई. आपल्या या नित्य नियमाप्रमाणे आजही कीकीबाई प्रातःकाळी उठून खटकर्मातून निवृत्त होऊन सद्‌गुरुंच्या धामात जाऊन सेवा करायला लागली सेवा करता करता दीनतेने याचना करु लागली.

' सद्‌गुरुदेव ! आता तर वेळ पूर्ण झाला. आता इथे राहण्याची इच्छा नाही. मला आपल्या पावन चरणावर स्थान द्या. आतापर्यंत माझ्यातून आपण अलग राहिला नाही, मला वचन दिल्याप्रमाणे अनेक वेळेला दर्शन दिले. माझे सारे मनोरथ सिध्द केले. आता माझी अंतिम याचना आहे की मला आपल्या चरणकमलारविंदी पूर्ण विराम द्यावा. मला स्थान द्या'. असे म्हणत संत चरणावर झुकून पडली.

सोनेरी सुर्योदय झाला. लोक संत धामात दर्शनाकरिता आले. पाहिले तो संत भाभा–रामच्या चरणावर दंडवत प्रणाम करीत झुकलेली कीकीबाई त्यांना दिसली. त्यांनी तिला जाग–विण्याचा प्रयत्न केला पण संतचरणी तिने खरोखरच पूर्णविराम घेतलेला होता. आता तिला कोणी जागवू शकणार नव्हता. संत भाभारामच्या अनन्य अनुरागी भक्तिमति कीकीबाईचे ते अंतिम दृश्य पाहून जनतेच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. कीकीबाईने खरेच या लोकातून महाप्रयाण केलेले होते.

भाभाराम गुरु देवकी, सेवा किन्ही सुखधाम ।।
कीकीबाईको पाईया, संत चरण विश्राम ।।
संवत सोलहसो अेकमें, ऋषिपंचमी बखान ।।
सद्‌गुरुके विरहमें, किये कीकीबाई गवान ।।

जीवनात अनेक वर्षेपर्यंत संत भाभारामची जीने प्राणार्पण भावाने सेवा केली होती, त्या कीकीबाईने शेवटी संत भाभारामच्या चरण कमळात पूर्ण विश्राम मिळविला. वि. सं. १६०१ च्या भाद्रपद शु।। ५ म्हणजे ऋषिपंचमीच्याच दिवशी मंगल प्रभातीच तिने या लोकामधून अंतिम प्रयाण केले.

ऋषिपंचमी गुरुदेवजी, हो गये अंतर्धान ।।
मंगलदिन सोही भोरको, किये कीकीबाई गवान ।।
जनता रोवत आई री, कीकीबाई महाभाग ।।
प्रयाण पंचम को, किये धन्य तेरो अनुराग ।।

'कीकीबाईने महाप्रयाण केले!' 'गुरुस्वरूपात कीकीबाईचा आत्मा परम विराम पावला!' ही घटना वायुवेगाने आसपासच्या गांवांत पसरली. देवा गांव दर्शन करण्याकरिता उलटले. अन्य गांवोगांवच्या लोकांचा पूर लोटला. कीकीबाईचे अंतिम दर्शन करून तिच्या चरणी वंदन करीत असता जनतेचे डोळे ओले होत. त्यांच्या मुखातून एकच शब्द निघे 'सद्‌गुरू भाभाराम ऋषिपंचमीच्या दिवशी अंतर्धान पावले आणि कीकीबाईने सुध्दा ऋषि-पंचमीच्याच दिवशी अंतिम प्रयाण केले. सद्‌गुरु आणि परम अनुरागी शिष्येचा एकाच दिवशी अंतिम योग घडून आला. धन्य आहे कीकीबाईचा सद्‌गुरु प्रति अनन्य अनुराग!!'

धन्य धन्य कीकीबाईको, धन्य तेरो अनुराग!
भाभाराम गुरुचरणमें, अंत सोई महाभाग!!

६) संत शाणाकाका महाराज

सत्पंथाच्या संत मालिकेतील सद्भक्त संत शाणाजी हे होत. सद्गुरु इमामशाह महाराजांच्या ज्ञानोपदेशाने प्रभावित होऊन शाणाजी बालपणापासूनच त्यांच्या सेवाकार्यात समाविष्ट झाला. गुजराथ मधिल लेवा पाटीदार ज्ञातीत त्याचा जन्म झालेला होता. बालपणापासून धार्मिक संस्कार त्याच्यावर झालेले असल्याने तारुण्यात पदार्पण करताच संसार प्रवाहापासून विन्मुख होऊन त्याने आपले सारे जीवन संतमहात्मा सत्पुरुषांच्या सेवेत वाहून घेतले. संसारसुख खारे आहे असे जाणून व संत पुरुषांच्या मुखारविंदातून स्त्रवणाऱ्या ज्ञानामृताचे पान करुन त्याला जगताच्या असारतेचे ज्ञान झाले. त्याच्या चित्तात वैराग्य विचार जागृत झाले. सद्गुरु महाराजांच्या नित्य सान्निध्यामुळे व त्यांच्या अनुग्रहाने त्यास ईश्वर स्वरुपाच्या ध्यानस्वरुप स्मरण चिंतनाचे ज्ञान होऊन आत्मसाक्षात्कार झाला. संत भाभाराम, संत नायाजी, साध्वी कीकीबाई यांच्या सान्निध्यात आल्यावर तर त्या नररत्नास अधिक तेज चढले. सद्गुरु इमामशाहांच्या ध्यानावस्थेत स्वस्थता मिळाल्यावर त्यांचा परम सेवक हाजरबेग व शाणाजी यांची वारंवार ज्ञान चर्चा होई.

सद्गुरु इमामशाहांच्या संपर्कात आल्यानंतर नाया लुटारुत झालेले परिवर्तन व त्यास झालेले योगज्ञान याचा प्रभाव शाणाजीवर झालेला होता. कारण ह्या साऱ्या घटना त्याने आपल्या डोळयाने पाहिलेल्या होत्या. त्यामुळे सद्गुरुंचा प्रभाव तो जाणून होता. सद्गुरु हे पारसमणीच काय पण महातत्वचिंतामणी असतात. पारसमणी तर फक्त लोखंडाचे सुवर्ण बनवू शकतो पण चिंतामणी तर प्रत्येक वस्तूला पारसमण्याचे रुप देतो. सद्गुरुंच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकास त्यांनी आत्मतत्वाचे साक्षात्कारी बनवून टाकलेले होते. मधून मधून या सर्व योगीयांचे निरनिराळया ठिकाणी मिलन, सत्संग, ज्ञान चर्चा होत असे. त्या प्रत्येक वेळी सद्भक्त शाणाजी सद्गुरु महाराजांच्या सोबत असे.

एकदा कुकस येथे संत नायाजींच्या आश्रमात सद्गुरु इमामशाह महाराजांचा मुक्काम होता. त्यांच्या सोबत हाजरबेग व शाणाजी सुध्दा होते आणि कुदरति योगायोगाने संत भाभाराम व साध्वी कीकीबाई हे सुध्दा त्या ठिकाणी येऊन मिळाले.

सद्‌गुरुकी संगमे शाणाजी आये तेही ठाम ॥
भाभारामको देखते, हियरा पहूँचे हाम ॥
पीर इमामके चरणमे, बैठे शिर झुकाई ॥
साहिबको भली भातसे, दिलकी गति सुनाई ॥

सद्‌गुरु इमामशाहांच्या सोबत त्यांचा शिष्य शाणाजीला पाहून भाभारामला अपार आनंद झाला. ते म्हणाले, 'शाणाजी तुला मिळण्यासाठी–भेटीसाठी हृदय तळमळत होते. संत नायाजीशी तर बऱ्याच वेळा भेटीचा योग आला, तसेच सद्‌गुरु इमामशाहांना पण मिळण्याचा योग आला, परंतु तुम्हाला भेटू शकलो नाही तो आज अनायासे हा योगायोग जुळून आला,

आज अचानक मिल गये, हियरा हुवा मगन ॥
शाणाजी तोहे धन्य हे, गुरूसे लागी लगन ॥
भाभाराम गुरुदेवकी, गति न जाने कोई ॥
जेही गुरूका बनी रहे, सोही गुरूका होई ॥

'शाणाजी! आपण सद्‌गुरुशी अनन्य प्रीत जोडलेली आहे. अशी प्रेमलगनी लावणाराची धन्यता होय.'

शाणाजी म्हणाले 'भाभाराम! सद्‌गुरूंची गति समजून येत नाही परंतु जो सद्‌गुरुंचा होऊन राहतो तोच सद्‌गुरूंना जाणू शकतो.

योगी होकर आइया, भाभा परहितकार ॥
मैं तो गुरू चरणमें, बैठ रह हूं निरधार ॥
गुरूबिन मेरा कोई नही, सोही बडे दातार ॥
नैया बहे मझ धारमे, साहिब खेवनहार ॥

भाभाराम! आपण तर योगी पुरूष आहांत. जनहिताकरिता आपण अवतार धारण केलेला आहे. मी तर एक केवळ सद्‌गुरूंच्या चरणारविंदी शांतचित्ताने बसून राहणारा अल्पज्ञानी जीवात्मा आहे. माझ्या सारख्या पामर जीवात्म्याला गुरू शिवाय कोणीच उध्दारू शकणार नाही या विकट भवसागरातून माझी जीवननौका पार नेणारा गुरू शिवाय अन्य कोणीही नाही.

गुरूको कबहु ना भूलो, गुरूसे बडा न कोई ॥
शाणाजी साची कहे, गुरू करे सो होई ॥
मेरे गुरू इमामको, मैने पेख लिया पीर ॥
सोही समर्थ साईया, पहूँचा वही भव तीर ॥

म्हणूनच म्हणतो सत्य सद्गुरुला कधीही विसरू नका. त्यांच्याशिवाय कोणीही मोठा नाही ते जे करतील तेच होईल. त्यांना मी पीर रूपाने ओळखले आहे. त्यांनीच माझ्या हृदयातील माया-मोहरुपी पीडा मिटवीली आहे व तेच मला या भव सागरातून पार नेतील म्हणून मी माझ्या चित्तात ठसविले आहे की सद्गुरु नामाशिवाय दुसरे कांही ही तत्व नाही व ग्राह्य नाही. हाच मला आत्मबोध झाला आहे.

पतीत पावन साईया, मोरे गुरु इमाम ।।
शाणाजी मत भुलीयो, सद्गुरुको नाम ।।
सत्संग गुरु पीरका, सारी रेंन बिताय ।।
भोरही शिर झुकायके, योगी हुवे विदाय ।।

संत नायाजींच्या धामात रात्रभर सत्संग भजनपूजन ज्ञानचर्चा होऊन योगीवर भाभाराम व महासाध्वी कीकीबाई प्रातःकाळ होताच सद्गुरु महाराजांच्या चरणरविंदी लीन होऊन आपल्या मुक्कामावर निघून गेले. सदगुरु इमामशाह महाराज देखिल आपले परम सेवक हाजरबेग व शाणाजी यांना घेऊन आपल्या धामावर निघाले.

सद्गुरु इमामशाह, किये अंतर्धान विचार ।।
सेवक सबही हाजर हुवे, पीरका पाया दीदार ।।

सद्गुरु इमामशाह जेव्हा अंतर्धान होण्याचा विचार करु लागले तेव्हा त्यांचे आंतरिक सच्छिष्य आणि स्नेह्यांना त्यांनी संदेश पाठविला त्या समयी कुकसहून संत नायाजी सद्गुरुंच्या धामावर येऊन पोहोचले. प्रातर्वंदनीय सद्गुरु इमामशाहांच्या जीवनात बऱ्याच चमत्कारीक घटना घडल्या होत्या. त्यांनी पीराण्याला आपले स्थान बनविले होते. नायाजीला जवळ बसवून त्यांनी म्हटले –

हम तो इकसठ साल रहेरी, तुमी शतदस साल जियो ।।
सद्गुरु की बानी ज्ञान उपदेश, अमीरस पान कियो ।।

'नायाजी ! मी तर केवळ ६१ वर्षच या दुनियेत राहिलो पण तुला ११० वर्षे येथे राहून जनतेची सेवा करायची आहे, सद्गुरु उपदेश-ज्ञानामृताचे पान करवावयाचे आहे. जनतेचे सदैव कल्याण करायचे आहे !' सद्गुरु उपदेशाची अंतिमवाणी कथन करुन शुभाशिर्वाद दिला.

सर्व सद्भक्त गणांच्या समक्ष त्यांना आपल्या धामाचा उत्तराधिकारी म्हणून शाणाजींची नियुक्ति करून आपल्या हातांनी त्यास गादीवर बसविले आणि सर्व वहिवट कारभार त्यांच्या स्वाधीन करून आपण स्वतः निवृत्त झाले नंतर त्यांनी समाधी घेतली.

सद्‌गुरु इमामशाहांनी आपल्या कुळातील – वंशातील स्वजनांना गादीचा अधिकारी न नेमता केवळ हिंदुलाच आपला वारसदार म्हणून सर्वाधिकारी बनविले. त्यामुळे अन्यजनांच्या हृदयावर एक प्रकारचा आघात झाला. ते कांहीही असो पण सद्‌गुरु इमामशाहांनी मुलतानला घेतलेली प्रतिज्ञामात्र यथार्थ केली.

मुलतानीके बेनका, जख्म लगे ता दिन ।।
हिंदवाको उपदेश दूं, मुरीद न मेरा मोमीन ।।
हिंदवा मेरा बनी रहे, मे हिंदवाका होई ।।
मुलतानी तुम सुन लो, हिंदवा हम संगी होई ।।

★ ★ ★ ★ ★

वंद हूँ गुरु इमामको, नाद पे गये बलिहार ।।
धन्य साध बखानिये, बुंदसे करे न प्यार ।।

नांद – शिष्य आणि बुंद – पुत्र. गुरु इमामशाहांनी आपल्या वंशजांना अथवा कुळातील कोणालाही गादीचा अधिकारी न बनवता आपल्या शिष्याला गादी अर्पण केली. सर्वत्र त्यांचा जयजयकार होऊन धन्यता मानू लागले. सद्‌गुरुंनी आपल्या वचनाचे पालन केले आणि शाणाजीला अधिकारी बनविले म्हणून विरोधियांनी खूप द्वन्द्व माजविले शाणाजींच्या हृदयात खरोखर खेद झाला.

साहिब मोहे क्यो दिये, अपने धाम अधिकार ।।
तुम बीन यहा कैसे रहु, डुब गये मझधार ।।
मोमीनके दिलमे लगे, मानो विष कटयार ।।
हिंदवाको गद्दी मिली, यही तो हक्क हमार ।।

गुरु महाराज आपण मला आपल्या धामाचा अधिकारी कां बनविले? जे लोक अधिकाराची मांगणी करीत आहेत. आपल्या हक्कांची मांगणी करीत आहेत, त्यांना ह्या स्थानाचा अधिकार सोपवून द्या. मला पामराला या कोणत्याच गोष्टीची जरुर नाही.

उनका हक वापस कियो, में हुं तुम्हारा गुलाम ।।
दिनभर सेवा आपकी, रैन जपै आराम ।।
गुलामको गद्दी कहा, मे ना चहु अधिकार ।।
जो चाहे इनको दियो, मझे तो तुमीसे प्यार ।।

गुरुदेव ! मी तर आपला गुलाम आहे, दास आहे, मला तर फक्त आपल्या सेवेशी कर्तव्य आहे. रात्रंदिवस आपल्या सेवेवाचून अन्य कांहीही नको. आपणच नाही का मला शिकविले. धन,

दौलत, संपत्ती, वैभव, मान हे सर्व ईश्वरभक्तीपासून परावृत्त करविणारे आहे. मला खरोखरच या कशाचीही गरज नाही. जीवनभर केवळ आपली सेवाच या दासाकडून घडावी हीच अपेक्षा आहे. महात्मन मला या उपाधी पासून वाचवा. सद्गुरुनाथ मजवर करुणा करा व हे अधिकार माझ्याकडून काढून घ्या व शांत चित्ताने आपली स्मरण सेवा मला करूं द्या.'

सदगुरु भोपे करुणा करो, ले लो अपना अधिकार ।।
शाणाको शान्ति मिले, करै स्मरण सेवा सार ।।
शाणाको नैन बहावते. बैठे गुरुकी पास ।।
सद्गुरु मोरे दयानिधी, में हुं तुम्हारा दास ।।
बरखा नैन बहावते, हो गई आधी रेन ।।
सद्गुरु बानी उचरे, सुनो शाणाजी बेन ।।
गुरु आज्ञा पालन करो, तुमी हो गुरुके दास ।।
शाणा क्यो दिलमे डरै, मै हुं तिहारी दास ।।

दुःख आणि शोकाने व्याकुळ झालेला. शाणाजी एका रात्रीस आपल्या सद्गुरुंच्या समाधीजवळ बसून डोळ्यातून अश्रु ढाळीत आपल्या हृदयातली व्यथा सांगू लागला. आज त्याचे मन फारच उदास झालेले होते. अर्धरात्र ही होऊन गेली तरी त्याचा करूणार्द्र पश्चात्ताप चालूच होता. एकाएकी त्यास सद्गुरुंची अगम्य वाणी ऐकू येऊ लागली 'शाणाजी ! तू घाबरतोस कशासाठी ? सदा सर्वकाळ मी तुझ्या जवळच आहे. चिंता करू नको. तुझ्यावर जी जबाबदारी टाकली तीच पूर्ण कर !'

शाणा शोच बिचारके, तुम्हे अपना बनाई ।।
अब तो मेरा बनी रहो, कैसे चहो जुदाई ।।
शाणा कीसीसे मत डरो, शिर सद्गुरु को हाथ ।।
तुम्हे अकेला क्यो रखे, मै हुं सदा संगाथ ।।
सद्गुरुकी बानी सुनी, शाणा बने निश्चिंत ।।
ता दिन शोक बिलाइया. गुरु बचन धरे चिंत ।।

सद्गुरुंच्या आश्वासनपर शब्दावर विश्वास ठेवून शाणाजी शांतीने दिवस व्यतीत करूं लागला. पण विरोधीयांच्या चित्तात चैन कोठून असणार ! एके दिवशी रात्री शाणाजींना मारण्यासाठी ते धावून आले पण सद्गुरुंनी शाणाजीला अभय दिल्याप्रमाणे त्याचे रक्षण केले.

अेकदिन आधी रेनको, लोगन आये धाय ।।
'मारो मारो' सब कहे, बहुरी शोर मचाय ।।
शाणाजी गुरु देवको, ता दिन किये पुकार ।।
सद्गुरु मोहे बचन दिये, प्रभु अब तो लिजे उबार ।।

आरत बानी सुनी के, आप घोडे असवार ।।
मार मार भगाइया, जुठे लोग तेही ठार ।।
ता दिन जुठे लोगके, मिट गये उतपात ।।
शाणाजी गुरु धामकी, सेवा करे भली भात ।।

विरोधीयांनी गादीच्या अधिकाराकरितां बंड केले होते व त्याकरितां ते शाणाजीला भिववीत होते. त्यांना सद्‌गुरुंनी अशी कांही समज दिली की नंतर पुन्हा ते कधीही शाणाजींच्या वाटेलाच गेले नाहीत.

आपला गुरुबंधु नायाजीत त्यांचे आपार प्रेम होते, म्हणून बऱ्याच वेळेला ते कुकस येथे संतधामावर जाऊन नायाजीला आपल्या हृदयातलें गुझ सांगीत असत.

नायाजी कैसे कहूं मोरे सद्‌गुरुका हेत ।।
बहुरी- बिघन - बिदारले, संग ही संग रहेत ।।
सद्‌गुरुको बुझेबीना, हम ही बडे अज्ञान ।।
नायाजी गुरुदेवको, लिखे कृपानिधान ।।
ता दिन द्वन्द्व बिलाइया, कोऊ शके नहि मार ।।
भूंडे लोग भगा दिये, आये उबारनहार ।।

शाणाजीने सद्‌गुरुंचे यशोगान करीत आपले हृदय उघडे करून आपले अनुभव सांगितले. अशाच रीतीने संत नायाजींनी सद्‌गुरुंच्या अनेक प्रेरक प्रसंगांचे वर्णन करून शाणाजीस सांगितले—

शाणाजी सोही पिवको, पेखत उपने ज्ञान ।।
बडो महिमा गुरुदेवको, कैसे बुझे अजान ।।
मोहे अधम लुटेरको, साया बना दिये संत ।।
शाणा सद्‌गुरु पीरको, महातम बडो अनंत ।।
बेर बेर चेताइया, मोहे सद्‌गुरु पीर ।।
आफतमे अलगा नही, भांगे हमारी भीर ।।

नायाजींच्या संगतीत बसून दिलखुलास गोष्टी केल्याने शाणाजींचे हृदय शांत होई. गुरुबंधुच्या मिलनाची ओढ लागत असे तेव्हा ते कुकसला संत धामावर जात. अशाच रीतीने नायाजी पण शाणाजींना मिळण्यासाठी गुरुद्वारी पीराण्यास येत असत. त्यांत त्यांचा दुहेरी हेतु सफळ होई. एक तर शाणाजीचे मिलन आणि दुसरे गुरुमूर्ति ज्योतिस्वरुपाचे व समाधीस्थानाचे दर्शन !

चलो सखी वहा जाइये, जहां बसे ब्रीजराज ॥
गोरस बेचत हरी मिले, अेक पंथ दो काज ॥

सद्गुरु इमामशाह महाराजांनी समाधी घेतल्यानंतर त्यांचा परमभक्त नायाजी व संत भाभाराम यांनीसुध्दा कालान्तराने समाधी घेतली. सद्भक्त हाजरबेगही अंतर्धान झाले होते. अशा समयी त्यांच्या परम पावक चरित्रांची आठवण करीत शाणाजी एकाग्र चित्ताने सद्गुरु महाराजांच्या समाधीस्थानात बसत असत. अनंत आठवणींच्या प्रवाहात ते कोठल्या कोठे निघून जात. मध्यरात्रही उलटून जाई तरी त्यांना भान नसे. मधून मधून सद्गुरु महाराजांची अंतर्प्रेरणा होऊन त्यांना आत्मज्ञान स्फुरु लागे तर कधी कधी त्यांची विरहव्यथा जागृत होऊन रात्रं दिवस त्यांचाच ध्यास लागे. अशा प्रकारे दिवस व्यतीत होत. आता फक्त आपले मन मोकळे करण्यास एकच स्थान होते ते म्हणजे साध्वी कीकीबाईचे रुण. मधून मधून तेथे जाऊन त्या महाविदुषी जवळ ज्ञानचर्चा, सत्संग करीत तिचे विचार व मार्गदर्शन ऐकून घेत. एकदा साध्वी कीकीबाईजवळ त्यांनी एक पावन प्रसंग वर्णन करून सांगितला.

तीनो पीराणा बैठिया, जलवा दिखावत कौन ॥
जंगाशाह येही चहे, फिर नही आवा गौन ॥

एका दिवशी रात्रीच्या वेळेस झोप लागत नव्हती म्हणून उठून बाहेर चौकात आलो. पाहातो तो सद्गुरु इमामशाह महाराज, संत भाभाराम महाराज., सद्भक्त नायाकाका महाराज हे तीनही महापुरुष एकत्र बसून सत्संग चर्चा करीत आहेत. जवळ त्यांचा परम सेवक हाजरबेग महाराज बसलेला दिसला. मी सुध्दां त्यांच्याजवळ थोड्या अंतरावर हळूच जाऊन बसलो. ती ज्ञान चर्चा फार गूढ अगम्य व आनन्ददायक होती. अशा त्या मंगल समयी कोण जाणे कोठून आणि कशा रीतीने जंगाशाह नावाचा एक फकीर तेथे आला ते समजले नाही पण त्यांच्या जवळ जाऊन झुकून प्रणाम करुन म्हणाला, 'आज तिघही पीराण्यास एकत्र येऊन बसले आहांत पण तुम्हां तिघात आपला प्रभाव कोण दाखवितो ते पहायचे आहे. साईला केवळ एकच आशा होती आणि ती म्हणजे वारंवार नश्वर जगतात येणे जाणे घडू नये हीच होय. आवागमनाचा फेरा मिटावा हीच माझी याचना आहे.' असे म्हणून फकीर शांत चित्ताने तेथे उभा राहिला-

जंगाशाह फकीर होता पण हिंदू संत साधूत खूप फिरलेला असल्याने तो आवागमनाच्या गोष्टी करीत होता. आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे इमामशाह महाराज त्यास कांही करु शकत नव्हते. तरी पण त्या समयी त्यांनी आपला हात लांब करुन त्यास एक माळा दिली नंतर नायाजीने त्यास जवळ बसवून त्याच्या कानात महामंत्राचा उपदेश केला आणि भाभारामने त्याच्या शिरावर आपला वरदहस्त स्थापन केला. तदनंतर जंगाशाह तेथेच माळा जपत शांत चित्ताने बसला.

तीन प्रहर रात्री नंतर ते तीघं महापुरुष हाजरबेग महाराजासह अंतर्धान पावले. सकाळी पाहिले तो जंगाशाह एकटाच ध्यानस्थ बसलेला दिसला. सात दिवसपर्यंत तो त्याच अवस्थेत बसला. आठव्या दिवशी ध्यान सोडून आसनावर उठून उभा राहिला आणि सद्गुरु महाराजांच्या समाधी-

स्थानात जाऊन दीनतेने झुकून म्हणाला 'महाराज, आपण खरोखरच मला या भवाटवीतील भटकण्यापासून वाचविले. आता मला रजा द्या.' असे म्हणून नम्रतेने तो पीराण्याहून निघाला. तदनंतर तो केव्हाच आणि कोठेच भटकतांना कोणालाही दिसला नाही.

असा पावन प्रसंग सांगून शाणाजी रूणहून कीकीबाईच्या चरणारविंदी झुकून रवाना झाला व पीराण्याच्या मार्गास लागला.

अेक दिन दिखे भंडारमें, खूट गयेरी अनाज ॥
शाणा रेन सुमिरन करे, रखो गुरुजी लाज ॥ १
भोरही पोठले आईया, साद करे बनजार ॥
शाणाजीके नामसे, पोठ भेजी यही ठार ॥ २
बुंदेल खंड से आइया, कंथड मेरा नाम ॥
पोठ उतारके दिजीये, अब तो मोहे आराम ॥ ३
अपनी पोठ उतारके, कंथड मागे बिदाय ॥
बनझारा ठाढे रहो, आज के दिन यहाय ॥ ४
कंथड यहा कैसे रहे, जाना है दूर दूर ॥
शाणा मेरा जुहार हे, आगे मिले हो जरूर ॥ ५
बनजाराके बेनसे, शाणा अचरज पाय ॥
नैननसे मिले नैनवा, गुरु मुरत दरशाय ॥ ६
शाणा धाये दोडके, चरणा शिर झुकाय ॥
कंथड कहा बनजार, कहा काहु देख न पाय ॥ ७
भंडार भरके चलेगये, दानी गुरु दयाळ ॥
शाणाजीको सद्‌गुरु, सचमुच किये निहाल ॥ ८
नाथ मेरा बनी रहे, मोसे रहे न दूर ॥
जब चाहु दिदारको, साहिब हाल हजूर ॥ ९

सद्‌गुरु महाराजांनी आश्वासन दिल्याप्रमाणे मधून मधून बऱ्याच वेळेस कोणत्याही रुपाने येऊन ते शाणाजीस मार्गदर्शन करीत. व आपल्या परमार्थ मार्गावर सुदृढ करीत. समर्थ सद्‌गुरुंचा वरदहस्त त्यांच्या शिरावर असल्याने कोणतीही विरोधी शक्ति त्यांचा केससुध्दा वाकडा करु शकली नाही. तरीपण विरोधीयांच्या मनात जी लालसा होती ती पूर्ण करण्याकरिता त्यांनी अमहाबादच्या सुलतानाजवळ उलट पालट समजावून हिंदु अधिकारी – गादीपति शाणाजीला सताविण्याकरिता घाट घातला आणि त्यांच्या सांगण्या वरुन सुलतानाने त्यांची कसोटीपण घेतली.

शाणा वे दिनको लिखे, रुठ गये पतशाह ॥
हिंदवाको ले आइयो, बहुरी सिपैया धाय ॥ १
शाणाजीको पकडने, आय खडे गुरु धाम ॥
कांहु देख न पाइया, सिपैया तेही ठाम ॥ २

ता दिन सिपैया चल गये, लौटके आये दुवार ॥
दिन पंच अैसी बनी, शाणा न दिखे लगार ॥ ३
लोगनको नैना दिखे, आसन बिराजे आप ॥
सिपैयाको दिखे नही, उरमे जगे संताप ॥ ४
सिपैया कहे सुनीयो हुजूर, बडी ताजुबकी बात ॥
शागाजीको सबही देखे, हुमको नही देखात ॥ ५
पतशाह अचरज हो गये, हम ही देखेंगे आज ॥
शाणाजी वो कौन है, कैसे हे हिंदवा महाराज ॥ ६
पतशाह आये गुरु धाममे, आप घोडे असवार ॥
आगे कदम नही बढ शके, द्वार खडे तोखार ॥ ७
पैदल चलके आईया, पतशाही गुरु धाम ॥
आसन बैठे देखिया, शाणाजी सुख धाम ॥ ८
दिलकी जलन सब मिट गई, मोम दिल हुवे शाह ॥
शाणाजीके चरणमें, आय झुके पतशाह ॥ ९
सत्ता मंदमें भूलके, खोई बैठे इतबार ॥
साया मोहे कीजो क्षमा, बक्षो गुना हमार ॥ १०

भक्त शाणाजीला सताविण्याकरिता आलेला बादशाह शान्त चित्ताने त्यांच्या चरणी झुकून परत गेला. संत पुरुषाला या गोष्टीची जाणिव नसते अर्थात् ते अशा लौकिकाविषयी पराङ्मूख असतात ते तर आपल्या इष्ट देवतेशी – आराध्यमूर्तिशी तद्रूप झालेले असतात. या महापुरुषाच्या अंतर्धान विषयीची नोंद अशी आढळते.

शाणाजी पडदे हुआ, ता दिनका कहुं बयान ॥
अगली रैन गुरुदेवजीं, दरशे कृपा निधान ॥ १
गुरुजी मे आवन चहु, अब तो तुमारी पास ॥
चरण कमलमे रखो, में हुं तुम्हारा दास ॥ २
शाणा सदा मेरा रहा, मोसे रहा न दूर ॥
मेरा सोही मेरा बने, मोसे रहे हजूर ॥ ३

अशा रीतीने शाणाजीने आत्यंतिक इच्छा प्रदर्शित करुन सद्गुरु चरणी तो विराम पावला. असा हा निराभिमानी संत सर्वांना सांगत असे कीं, माझ्यात कांहीच नाही मी तर सद्गुरुंचा सेवक आहे. सर्व करूणा आणि लीला सद्गुरुंची आहे.

शाणाजीमें कुछ है नही, कर्ता सो गुरुदेव ॥
मैं तो सेवक उनहीका, सदा उन्हीकी सेव ॥

★ – ★ – ★

समारोप

भाई जेम दुधमा घृत छपाया । अने तेणे प्रगट न देखे कोयरे ।।
पण जो ने माहेथी मंथी बाहेर काढिये । तब जा घृत होयरे ।।

– मुनिवर चेतावणी.

दुधात घृत दडलेले असते हे मंथन केल्याशिवाय प्रगट होत नाही. त्याप्रमाणे प्रत्येक वस्तु प्राणिमात्रात आत्मचैतन्य रुपाने परमात्मा दडलेला आहे, पण विचार मंथन केल्याशिवाय तो जाणिवेला येऊ शकत नाही. तद्वत प्रत्येक मानवात महान धर्म व्याप्त आहे पण विचारांच्या मंथनाशिवाय मानवता धर्म प्रगट होऊ शकत नाही. महान् विचार बुध्दि प्राबल्याशिवाय येत नसतात. आणि बुध्दिचे प्राबल्य मनोमंथनाशिवाय होत नाही. मनात अखिल विश्वाचे चैतन्य दडलेले आहे पण स्वतः त्यास त्याची जाणिव होत नाही, कारण स्वतः मन जड आहे. त्याला आत्म्याचा चैतन्य प्रकाश मिळाल्याशिवाय ते प्रकाशू शकत नाही. हा आत्मिक चैतन्य रुप प्रकाशसुध्दा प्रत्येक मनात भरलेलाच असतो पण अज्ञान–अविद्येची काजळी त्यावर बसलेली असते म्हणून ते त्याला समजून येत नाही. वैराग्य विचार व सतत अभ्यासाने ही अविद्येची काजळी काढून टाकता येते. ढग निवारल्यानंतर सूर्य ज्याप्रमाणे दिप्तायमान होतो त्याप्रमाणे अविद्या निरसनानंतर आत्मचैतन्य प्रकाश दिप्तायमान होतो.

सतपंथी प्रेमी बांधवांनो ! ही अविद्या माया अज्ञान निवारणाकरितां आपल्या सत्पंथ प्रवर्तक सद्गुरु इमामशाह महाराजांनी महान तत्वज्ञान ग्रंथसंपदा आपल्या साठी निर्माण करून ठेवलेली आहे. गुरुमाऊली आपल्या सच्छिष्य रुप बालकाला ज्ञानामृत पाजण्यास कधीच कमी पडत नाही, पण मूल रडल्याशिवाय आई ज्या प्रमाणे त्यास स्तनपान देत नाही तद्वत ज्ञानप्राप्तीची भूक लागल्याशिवाय व ती भूक तृप्तिकरिता योग्य अधिकारी व्यक्तिकडे गुरु, संत, महात्मा पुरुषाकडे गेल्या-शिवाय ही ज्ञानभिक्षा त्याला मिळणार नाही. आज आपण भौतिक सुखात जरी कितीही लोळत असलो (वस्तुतः ते सुख नसतेच तो सुखाचा नुसता आभास असतो.) तरीपण आत्मिक मानसिक शांति शिवाय सारी सुखे लटकी असतात.

भौतिक अथवा लौकिक सुखाने मानवी जीवनास पूर्णता येत नसते. आत्मिक वा मानसिक सुखाने मानव पूर्ण तृप्त होऊन श्रेय लाभ घडवून आणतो. संसार कार्याकरिता – उदरनिर्वाहाकरितां ज्या प्रमाणे आपण अविश्रांत परिश्रम करीत असतो, त्यांत कमीपणा पडू देत नाही; वस्तुतः इंद्रियजन्य सुखाच्या पूर्तिसाठीच आपण झटत असतो, पण परिणामी शिवाशिवीच्या खेळाप्रमाणे ते सुखही आपल्या पदरात पडू शकत नाही एकाद्या भाग्यवानालाच ते सुख प्राप्त होऊ शकते, बाकीतर संसाराच्या रामरगाड्यात चिरडले जाऊन त्या सुखालाही वंचित होतात व परमार्थातूनही वगळले जातात. याचा साधक बाधक विचार करुन हे बांधवांनो वेळीच जागृत व्हा. हाती आलेली मानव जन्मरुपी अमुल्य संधी वाया जाऊ देऊ नका. प्रेय सुखात मग्न राहून श्रेय प्राप्तिही हातची गमावू नका.

प्रेमी बांधवांनो आपल्या सर्वांच्या सद्भाव प्रेरणेने व सहकार्याने सद्गुरु महाराजांची बहुतेक सर्व ग्रंथ संपदा मराठीत रुपांतरीत करुन एकेक पुष्प आपल्या हाती समर्पित करण्याचे कर्तव्य यथाशक्ति, यथाबुध्दि व यथापरिस्थितीनुरुप करीत आहे. प्रत्येक सत्पंथी बांधवाचे कर्तव्य आहे की आपली ही धर्मसंपदा, ज्ञानग्रंथ संपदा प्रत्येकाच्या घरी असणे आवश्यक आहे. आपल्याला व आपल्या भावी पिढीला परंपरागत या ज्ञानसंपदेचा लाभ होणार आहे हे निश्चित आहे. घरात धर्मग्रंथ असणे हे घराचे भूषण आहे, एवढेच नव्हे तर ज्या घरात धर्मग्रंथ गुरुमहाराज व ईष्ट आराध्य दैवताचा फोटो-प्रतिमा असतात व त्यांची उदधूप दिप पुष्पेकरुन पूजा केली जाते त्या घरात कोणतीही बाधा प्रवेश करुं शकत नाही, असे अनुभव सिध्द महापुरुषांचे वचन आहे. आपण ही त्याचा अनुभव घ्यावा व सुखी संपन्न व उन्नत व्हावे ही आंतरिक अभिलाषा व शुभेच्छा.

– प्रकाशक

प्रकाशित झालेले सत्पंथ ज्ञान साहित्य

१)	श्री सद्गुरु इमामशाह महाराज जीवनवृत्तान्त. (मराठी व गुजराथी आवृत्ति)	रु. ५–००
२)	श्री सत्पंथ ज्ञान् पद संग्रह (भजनावली) (गुरुवाणी, योगवाणी, आगमवाणी, उपदेशवाणी)	७–००
३)	मनहर ज्ञान (मराठी भावार्थासह)	४–००
४)	अमृतवाणी – दोहावली (मराठी भावार्थासह)	२–५०
५)	शिक्षापत्री आणि नित्यपाठ, (मराठी आणि गुजराथी आवृत्ति)	२–००
६)	गुरुवंदना (मराठी, गुजराथी, हिंदी पदे व थाळ)	३–००
७)	श्री सत्पंथ घटपाट पूजा विधी यज्ञ.	१३–००
८)	श्री सत्पंथ नवनीत	३०–००

प्रकाशित होणारे आगामी ज्ञान साहित्य

१) मुनिवर चेतावणी. (मराठी अनुवादासह)

यात सद्गुरु इमामशाह महाराजांनी सत्पंथी गृहस्थाश्रमी अनुयायास केलेले दिव्य ज्ञानोपदेश वेगवेगळे दृष्टान्त देऊन, जीवन साफल्य करुन श्रेय प्राप्ति कशा रीतीने साधता येईल त्याचे सुरेख वर्णन आहे.

२) ऋषिवर चेतावणी. (मराठी अनुवादासह)

यात स्वतः सद्गुरु महाराजांनी ज्या साधनांच्या योगाने श्रेयलाभ घडविला त्या साधनांचे वर्णन व वानप्रस्थाश्रमी सत्पंथी अनुयायास केलेला दिव्य तत्त्वोपदेश वर्णिलेला आहे.

३) श्रीमद् दश अवतार. (मराठी अनुवादासह)

निर्गुण निराकार ईश्वराने सगुण साकार रुप धरण्याचे प्रयोजन व अवतार कार्य यांचे साखळीपूर्ण वर्णन असून धर्मप्रवर्तक सद्भक्तांचे चरित्र, नवव्या व दहाव्या अवतारातील ज्ञानोपदेश व आगम चेतावणी यांचे विशेष वर्णन केलेले आहे.

मिळण्याचे ठिकाण : श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर.
ता. यावल, जि. जळगांव

शुध्दि पत्र

पृष्ठ	ओळ क्र.	अशुध्द शब्द	शुध्द श	पृष्ठ	ओळ क्र.	अशुध्द शब्द	शुध्द शब्द
२६	२१	सतगुरु	नूर	१८	१५	दिलचान	दिलजान
२७	२२	ह्माम	इस्ल	[illegible]	२२	सत्पंथाची	सत्पंथाचे
२८	२४	त्यांचा	त्य	[illegible]	शेवटची	गुइय	गुह्य
३३	५	त्यांचा	त्य	[illegible]	११	भहानकतेचे	भयानकतेचे
३५	२६	दशावतारांच्या	द		१	दुखर	दुरवर
३८	८	टाळणारांचे	टाक		शेवटची	सवैव	सदैव
४५	१३	येऊन-होऊन	होऊन-		१२	परत	परम
५४	७	ससजा	समजा	[illegible]	१४	शिवाजींनी	शिवजींनीं
६१	शेवटची	ब्यास्थाई	ब्रह्म—		३०	हेरावले	हेलावले
			मंदीर		८	थथायोग्य	यथायोग्य
६३	२०	प्रत्येत	प्रत्येक		१९	धर्मरक्षक होऊन	धर्मरक्षक धर्मभक्षक होऊन
६८	२०	नमे	नये				
६८	२६	नीत धोत	नीत नी		२१	माझा सारं	माझे सारे
७०	१	रळण	रक्षण		१४	साणि	आणि
७०	१९	रहेवू	कहेवू		२	त्याने	त्याचे
७०	२२	काहे	आहे		६	पर	पण
९१	८	ते	X		१८	तमचे	तमने
९२	३	मुसलमान	मुलतान		४	सिध्दी सिध्दि	रिध्दी सिध्दी
९४	७	चैन	नैन		[illegible]	गोंधा	मोंधा
९८	१२	गोरज	गोरजी		१५	षड्माम	षड्मास
१०९	४	भगवंताचा	भगवंताच्या		१७	बांथ	बाय
१११	१०	अंतःकरणतील	अंतःकरणातं		[illegible]	शरमा	उरमा
११७	शेवटची	उरह्सित	उल्हसित		२५	सद्गुरुंच्या	सद्गुरुंच्या कृपेने
११८	४	नामस्करण	नामस्मरण		[illegible]	दास	पास

realpatidar.com

realpatidar.com